महाराष्ट्र आणि वाराणसी यांच्यामधील परस्पर संबंधांचा अभ्यास

(१७ वे शतक ते १९ वे शतक)

प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्त्व विषयात

विद्यावाचस्पती (पीएच्.डी.)

पदवीसाठी सादर केलेला प्रबंध

संशोधक

गिरीश दत्तात्रय मांडके

(रजिस्ट्रेशन नंबर : 106/ Ph.D./ ARC/ 294)

प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्त्व विभाग,

डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था, अभिमत विद्यापीठ,

पुणे - ४११००६

डिसेंबर २०१९

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की गिरीश दत्तात्रय मांडके यांनी प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व विभाग, डेक्कन कॉलेज, अभिमत विद्यापीठात प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व या विषयात विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) या पदवीसाठी सादर केलेला **'महाराष्ट्र आणि वाराणसी यांच्यामधील परस्पर संबंधांचा अभ्यास (१७ वे शतक ते १९ वे शतक)'** हा शोध प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. माझ्या मते प्रबंधातील संशोधन पूर्णपणे स्वतंत्र आणि नवीन आहे. या प्रबंधात उद्धृत केलेल्या साहित्याचा संदर्भ यथायोग्य रीतीने दिलेला आहे.

प्रा. रबीन्द्र कुमार मोहंती	**प्रा. प्रमोद जोगळेकर**	**गिरीश दत्तात्रय मांडके**
मार्गदर्शक	**सहमार्गदर्शक**	**संशोधक विद्यार्थी**

ऋणनिर्देश

"महाराष्ट्र आणि वाराणसी मधील परस्पर संबंधांचा अभ्यास (१७ वे शतक ते १९ वे शतक)" या पीएच्.डी.च्या प्रबंध निर्मितीच्या योगदानात मला अनेकांचे सहकार्य लाभले. गुरुवर्य गो.बं. देगलूरकर सरांशी अनेकदा अनौपचारिक चर्चा होत असत. एकदा वरील विषयासंबंधात आमच्यात चर्चा चालली असताना सरांनीच मला हा विषय माझ्या पीएच.डी. च्या दृष्टीने चांगला आहे आणि याच विषयावर तू पीएच्.डी.कर असा योग्य आणि मोलाचा सल्ला दिला. मार्गदर्शक आणि तत्वज्ञ असलेले सर आणि माझ्यात गेल्या तीन दशकांपासून गुरु-शिष्याचा ऋणानुबंध आहे. या प्रबंधामागील प्रेरणा त्यांचीच आहे. माझ्या या प्रबंधाच्या निर्मितीमध्ये प्रा. रबीन्द्र कुमार मोहंती आणि प्रा. प्रमोद जोगळेकर यांचे योगदान महत्वाचे आहे. मित्र आणि मार्गदर्शक या दोनही भूमिकेत ते सदैव माझ्या बरोबर होते. हा प्रबंध पूर्णत्वाला जाण्यात त्यांचा मोलाचा सहभाग आहे. प्रा. सुषमा देव, विभाग प्रमुख आणि श्री. जगन्नाथ कुलकर्णी, प्र.कुलसचिव यांनी मला वेळोवेळी दिलेल्या सहकार्यामुळेच कॉलेज मधील माझे काम सांभाळून हा प्रबंध पूर्णत्वास नेता आला.

डॉ. सचिन जोशी, डॉ. श्रीकांत प्रधान, डॉ. शिवेंद्र काडगांवकर, डॉ. उमेश बगाडे, डॉ. अभिजित दांडेकर, डॉ. पुष्कर सोवनी, डॉ. श्रीकांत गणवीर, प्रा. गोपाळ जोगे, डॉ. शंतनु वैद्य, डॉ. अभिनव कुरकुटे, डॉ. शिल्पा सुमंत, डॉ. माधवी गोडबोले या माझ्या मित्रांचा आणि डॉ. रा.पां.गोस्वामी, डॉ. माधवी कोल्हटकर, डॉ. आशा गुर्जर या जेष्ठ सहकाऱ्यांचा माझ्या प्रबंधनिर्मितीतील सहभाग लक्षणीय आहे. या प्रबंधातील अनेक विषय मी माझ्या या मित्रांबरोबर चर्चिले आहेत. त्यांनी कधीही आणि कुठलीही नाराजी न दाखविता माझे विचार अनेकदा ऐकले आहेत. प्रसंगी या मित्रांनी अनेक नवीन विचारही मला सुचविले. त्यांच्या या सहज-सुलभ सहकार्याची आठवण सदैव राहील. डेक्कन कॉलेज ग्रंथालयातील माझे सहकारी डॉ. तृप्ती मोरे, श्री. रामचंद्र शिगवण, श्री. धनंजय सुरवसे, श्री. तानाजी राठोड, श्री. समाधान शिंदे, श्री. दत्तात्रय दळवी, श्री. प्रशांत पसनूर, सौ. भाग्यश्री कांबळे, सौ. पल्लवी छल्लारे, सौ. संजीवनी मानकर यांनी केलेल्या सहकार्याबाबत त्यांचेही मी आभार व्यक्त करतो. डेक्कन कॉलेज मधील माझे सहकारी श्री. ज्ञानेश्वर भिलारे, श्री. ज्ञानदेव भुरुकुंडे, श्री. मनोहर खैरनार, श्री. मुकुंद गुजर यांनी केलेल्या सहकार्या बद्दल त्यांचेही आभार.

वाराणसीतील क्षेत्र संशोधनात मदत करणाऱ्या डॉ. माधव रटाटे, श्री. मकरंद म्हैसकर, श्री. मुरलीधर पटवर्धन यांचेही मी आभार मानतो.

माझी पत्नी डॉ. भारती आणि माझा मुलगा चि. ओंकार या दोघांचे सहकार्य आणि पाठिंबा नसता तर प्रबंधनिर्मितीचे हे काम पूर्ण होणे शक्य नव्हते. प्रांपचिक आणि पारमार्थिक या दोनही बाजू खंबीरपणे त्यांनी सांभाळल्यामुळेच हे काम तडीस जाऊ शकले. या प्रसंगी माझ्या आई-वडीलांचे ऋणही मी व्यक्त करतो. हे प्रबंधरुपी शिवधनुष्य पेलण्यास ज्याने मला बुद्धी, प्रेरणा आणि शक्ती दिली त्या काशीविश्वेश्वराच्या चरणी हा प्रबंध मी रुजू करतो.

दि. ९-१२-२०१९

पुणे (गिरीश दत्तात्रय मांडके)

आकृत्या आणि चित्रांची यादी

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले

विषयाची ओळख

प्रास्ताविक

वाराणसी तथा काशी नगरी ही सांस्कृतिक तसेच धार्मिक शहर म्हणून प्रसिद्ध आहे. वाराणसीचे प्राचीन उल्लेख वैदिक साहित्यातून आढळून येतात. महाभारत, पुराणे, बौद्ध वाङ्मय, जैन वाङ्मय तसेच हुएनत्संग सारख्या परकीय प्रवाशांच्या प्रवासवर्णनातून काशीचे अनेक उल्लेख आढळतात. काशीस्थित राजघाट येथे झालेले उत्खनन, सारनाथ येथील उत्खननातून मिळालेले बौद्धकालीन स्तूप, मठ, अशोकस्तंभ यावरून काशी नगरीची प्राचीनता इ.स.पूर्व आठव्या शतकापर्यंत गेलेली आहे. यावेळेपासूनच अखंडपणे काशीची वाटचाल भारतातील प्रमुख सांस्कृतिक तसेच धार्मिक स्वरुपात झालेली आहे.

'काशीस जावे नित्य वदावे' या उक्तीप्रमाणे भारतातील हिंदूधर्मीय लोक हे नित्यनेमाने काशीयात्रा करीत असतात. त्यामुळेच काशीचे स्वरूप बहुढंगी, बहुभाषी झालेले आहे. मागील हजार वर्षाचा कालखंड पाहता महाराष्ट्रातूनही अनेक घराणी वाराणसीत स्थायिक झालेली दिसतात. त्यामध्ये भट्ट, शेष, दीक्षित ही प्रमुख घराणी आहेत. या घराण्यातील लोकांनी आपल्या बुद्धीसामर्थ्याच्या जोरावर वाराणसीतील धार्मिक तसेच सांस्कृतिक जीवनात उच्च स्थान प्राप्त केले होते. काशी क्षेत्राचे धार्मिक महत्त्व लक्षात घेऊन सतराव्या-अठराव्या शतकात मराठ्यांनी सामाजिक, धार्मिक वर्चस्वाबरोबरच राजकीय वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

अठराव्या शतकातील एकमेव आणि बलाढ्य हिंदू सत्ताधीश हे मराठेच असल्यामुळे काशी, मथुरा, प्रयाग आणि अयोध्या ही हिंदूची प्रसिद्ध धर्मक्षेत्रे-तीर्थक्षेत्रे आपल्या ताब्यात असावीत अशी मराठ्यांची आकांक्षा होती. त्यामुळे वाराणसी-काशी ही मराठ्यांनी ताब्यात घेऊन तिथे काशीविश्वेश्वराची पुन:स्थापना करणे ही पेशवे आणि त्यांचे सरदार यांनी राजकीय तसेच धार्मिक ध्येय बाळगले होते. रोहिले आणि अयोध्येचे नबाब यांच्या संघर्षात अयोध्येच्या नबाबाला लष्करी मदत करण्याच्या मोबदल्यात मराठ्यांना नबाबाकडून मथुरा, प्रयाग, काशी, अयोध्या आणि प्रयाग ही हिंदूची धर्मक्षेत्रे ताब्यात द्यावीत अशी अट होती. मराठ्यांनी रोहिल्यांचा पराभव केला, परंतु दरम्यानच्या काळात मराठे हे इतर राजकीय कामात अडकून पडल्यामुळे ही ठिकाणे मिळविणे त्यांना शक्य झाले नाही. कालांतराने वाराणसी ही इंग्रजांच्या ताब्यात गेल्यामुळे वाराणसीवर ताबा मिळविण्यांच्या प्रयत्नाला कायमची खीळ बसली.

मराठे वाराणसीला मुसलमानी सत्तेपासून सोडवू शकले नाहीत तरी त्यांच्या राजकीय सत्ताप्रभावावरील वर्चस्वता आणि महत्तेमुळे अठराव्या शतकातील वाराणसीच्या भरभराटीमध्ये त्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. वाराणसी-काशी वरील अफाट धार्मिक श्रद्धेपोटी मराठ्यांनी या नगरीत मोठे वाडे, धर्मशाळा, मंदिरे, संस्कृत विद्येच्या अध्ययनासाठी पाठशाला व त्याबरोबरच गंगातीरावर मोठ्या घाटांची निर्मिती केली. या सर्व कारणांमुळे महाराष्ट्राचा काशीनगरीवरील मराठी प्रभाव आजही आपणांस मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. आधुनिक भारतीय इतिहास लेखनात वाराणसी संबंधीत मराठ्यांच्या या राजकीय, सामाजिक-धार्मिक आणि स्थापत्य विषयक प्रयत्नांकडे दुर्लक्ष झालेले दिसते. या प्रबंधात तो इतिहास सम्यकपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

वाराणसीचा प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहास

प्राचीन इतिहास

दैवत्व, मिथके आणि परंपरा धारण केलेल्या वाराणसीत अनादी काळापासूनच्या जीवनाचे अस्तित्व दिसून येते. इ.स.पूर्व १००० पासून मानवी वस्तीचे पुरावे पुरातत्त्वीय उत्खननातून आढळून आले आहेत. म्हणूनच या शहराला 'विश्वातील सर्वात जुने शहर' म्हटले जाते. अनेक शहरे आणि संस्कृती उदयास आल्या आणि नाहीशी झाल्या. पुराणांनुसार वाराणसीमध्ये वैदिक काळानंतर इ.स.पूर्व १५०० मध्ये प्रथम वसाहत झाली. इ.स.पूर्व ८०० पासून वाराणसीत सलग वसाहती झाल्याचे इतिहासात संदर्भ मिळतात. शैक्षणिक केंद्र म्हणून हे शहर प्रसिद्ध होतेच, त्याचबरोबर लघुउद्योगांचे तसेच कापड उद्योगांचे केंद्र म्हणूनही बौद्धपूर्व काळापासून प्रसिद्ध होते. भारतीय वैद्यकशास्त्राचा जनक धन्वतरी हा या शहराचा राजा होता. भारतीय शल्यचिकित्सेचा जनक सुश्रुताचे शिक्षणही हे वाराणसीत झाले होते.

याच काळात जैनधर्माने सुद्धा आपली सुधारणावादी चळवळ सुरू केली. इ.स.पूर्व आठव्या शतकात जैन तीर्थंकर पार्श्वनाथाचा जन्म वाराणसीत झाला होता. शेवटचा तीर्थंकर महावीर याने सुद्धा वाराणसीच्या सांस्कृतिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला होता. इ.स.पूर्व आठव्या ते सातव्या शतकामधल्या जातककथांमध्ये बुद्ध जन्माअगोदरच्या बुद्धांच्या कथांमध्ये वाराणसीचा संदर्भ येतो. या शहराच्या ऐतिहासिक वाढी संबंधी अभ्यास करताना भारतीय सभ्यतेची ओळख आपोआपच होते (मोतीचंद्र १९६२: २७-३०).

गंगा आणि वरूणा नद्यांच्या संगमाजवळच्या प्रदेशाला राजघाट म्हणतात. तिथे जुनी वस्ती असल्याचे सहजच लक्षात येते. जुने शहर हे वरूणा आणि गोमती नदीच्या मधल्या भागात पसरले होते.

गंगेच्या उत्तरेला २० कि.मी.वर त्यांचा संगम झालेला आहे. महाभारतात या शहराचा उल्लेख ओझरता आला आहे. परंतु त्यानंतरच्या जातक कथांच्या मध्ये या नगरीचे वर्णन विविध तऱ्हेने केलेले आढळते. इ.स. पूर्व आठव्या शतकातील शतपथ ब्राह्मण ग्रंथामध्ये या नगरीचे जे वर्णन आलेले आहे त्यात ग्रामीण जीवन आणि राजघाट येथील वस्तीचे चित्रण आढळून येते.

पुराणांमध्ये आलेल्या दिवोदासाच्या गोष्टीतून प्राचीन काळातील सत्तासंघर्षाचे प्रकटीकरण दिसते. त्याचबरोबर धार्मिक आणि राजकीय व्यवस्थेतील बदलांवरही प्रकाश पडतो. याकाळात यक्ष, गंधर्व आणि सूर्य यांची पूजा पद्धती प्रचलित होती. जैन आणि बौद्ध साहित्यातून तीर्थंकर पार्श्वनाथ, महावीर आणि बुद्ध यांच्या शिक्षण, चिंतन व प्रवचनासंदर्भात वाराणसी भेटीचे संदर्भ मिळतात. या साहित्यातून हस्तकला, कापड आणि व्यापारी वस्तू उदा.-सुगंधी अत्तरे, लाकडी तसेच हस्तीदंती वस्तू यांचेही संदर्भ मिळतात. राजगृह आणि तक्षशिलेला जोडणाऱ्या उत्तरापथाच्या मार्गावरील वस्तीचे उत्तम ठिकाण म्हणूनही वाराणसी प्रसिद्ध होते. मौर्यकाळातही हा प्रसिद्ध मार्ग होता आणि महत्त्वाचे म्हणजे मुस्लिम काळातही या मार्गाचे अनेकदा पुनर्निर्माण करण्यात आले. या मार्गालाच सध्या ग्रॅट ट्रंक रोड, राष्ट्रीय मार्ग क्र.२ असे म्हणतात. हे शहर हे व्यापारधंद्यासाठीही प्रसिद्ध होते. या शहराचे गंगेवरील स्थान महत्त्वाचे आहे. बंगाल व बिहार हे पश्चिमेकडील सुपीक प्रदेश एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला मध्यभारत आणि दख्खनचा प्रदेश होता (मोतीचंद्र १९६२: ३१-४९)

इ.स. पूर्व पाचव्या शतकाच्या अखेरीस काही काळासाठी शिशुनाग आणि नंद घराण्यांनी काशीवर राज्य केले. इ.स.पूर्व चवथ्या शतकात मौर्य घराण्याने राज्य केले. अशोकाने (इ.स. पूर्व २७२ -२३२) बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि सारनाथला भेट दिली. त्याच्या आश्रयाखाली अनेक शहरात मठ, स्तूप आणि विहार बांधले गेले. मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर वाराणसीच्या भरभराटीला उतरती कळा लागली (मोतीचंद्र, १९६२: ५०-६५). इ.स. पहिल्या शतकात उदयास आलेल्या कुषाण साम्राज्यामुळे वाराणसीत परत भरभराटीला सुरूवात झाली. कुषाण राजा कनिष्कच्या इ.स. पहिल्या शतकातील शिलालेखात बौद्धधर्माबरोबरच यक्षपूजाही करत असल्याचा संदर्भ आहे. याच काळात शैवपंथही भरभराटीला आला होता. अजूनही शहराला तीर्थ म्हणून ओळखले जात नव्हते. राजघाट येथे मिळालेल्या अनेक मातीच्या मुद्रिकांवरून या शहरातील नागरीवस्तीच्या भरभराटीची कल्पना येऊ शकते. उत्खननातून दिसून येणारी घरांची रचना, रस्ते, सांडपाण्यासाठी केलेली गटारांची व्यवस्था यातून प्रगत व्यवस्थेचे दर्शन घडते. कुषाण काळ ते गुप्त काळ या दरम्यानच्या काळात वाराणसीनगरातून अनेक कलाकुसरींच्या वस्तू मिळालेल्या आहेत. उदा.-बोधीसत्व, यक्ष आणि नागाच्या मूर्ती (मोतीचंद्र १९६२: ७६-८२).

गुप्तकाळ हा (इ.स. ३२०-५५०) धर्मातील चैतन्य आणि परिवर्तनासाठी ओळखला जातो. या काळाला 'भारताचे सुवर्णयुग' समजतात. हिंदू धर्मातील शैव आणि वैष्णव परंपरा याच काळात परमोच्च बिंदूला पोहचली आणि स्कंद, सूर्य, लोक आणि ग्राम दैवतांचे पंथही विकसित झाले आणि त्यांना मान्यताही मिळाली. या काळातील स्थापत्याचे काही नमुने या शहरामध्ये आणि सभोवतालच्या प्रदेशात पसरले आहेत. पंचक्रोशी मार्गावर फेरफटका टाकला तर गुप्तकाळातील तुटक्या शिल्पांचे अनेक नमुने इतस्ततः पडलेले अथवा अनेक वास्तूच्या भिंतींमध्ये चिणलेले दिसतात. याच काळात पुराणे रचण्यास सुरूवात झाली. प्रकटीकरणाचे प्रतीक आणि ब्रह्मज्ञान याद्वारे साहित्यातून शिव प्रामुख्याने दिसू लागला. वायू, मार्कंडेय आणि मत्स्य या सुरूवातीच्या पुराणातून शिवाचे महत्त्व सांगितले गेले व त्यासाठी तीर्थयात्रा मार्ग तयार केला गेला (मोतीचंद्र १०६२: ८८-१०१).

इ.स. सातव्या शतकात चीनी बौद्ध भिक्षु हुएन त्संग याने या शहराला भेट दिली होती. हे दाट लोकवस्तीचे शहर असून, महत्वाचे शैक्षणिक केंद्रही आहे असे तो वाराणसी शहराचे वर्णन करतो. वाराणसीतील वीस महत्वाच्या मंदिरांचा तो उल्लेख करतो. या बरोबरच तो तीस मीटर उंच व तांब्यांच्या पत्राने मढविलेल्या शिवलिंगाचाही उल्लेख करतो. हा मौर्यकालीन स्तंभ असून त्याचा तुटलेला भाग आता 'लाट भैरव' म्हणून ओळखला जाते. सध्या त्याची उंची फक्त १.५ मीटर आहे. इ.स. आठव्या शतकात आलेल्या शंकराचार्यांच्या उपदेशाने ब्राह्मणी विचारसरणीचे पुनरूत्थान झाले. त्यामुळे बौद्ध विचारसरणी या मातीतून उखडली गेली (मोतीचंद्र १०६२: १०३).

मध्ययुगीन इतिहास

मध्ययुगीन कालखंडात वाराणसी एका राजसत्तेकडून दुसऱ्या राजसत्तेकडे जात राहिली. कनौजच्या मौखरीं कडून गुर्जर प्रतिहारांकडे, शेवटी अकराव्या शतकात कलचूरी राजा गांगेयदेव (इ.स. १०३०-१०४०) आणि त्यानंतर त्याचा पुत्र कर्ण (इ.स. १०४१-१०७०) यांच्या ताब्यात वाराणसी गेली. कर्णाच्या मृत्यूनंतर वीस वर्षांच्या आतच गंगा-यमुनेच्या दोआबामध्ये एका नवीन राज्यशक्तीचा उदय झाला. हे घराणे म्हणजे गाहडवाल घराणे होय. त्यांनी इ.स. १०९० च्या सुमारास वाराणसी ते कनौज पर्यंतच्या प्रदेशावर आपले वर्चस्व निर्माण केले. गाहडवाल घराण्यातील गोविंदचंद्र हा याकाळातील प्रख्यात राजा होता. तो स्वतःला विष्णूचा अवतार समजत असे. विष्णूचे वसतीस्थान असलेल्या वाराणसीचा रक्षणकर्ता तो समजत असे. त्याने इ.स. १११४-१११८ या काळात दोन वेळा मुस्लिम आक्रमणकर्त्यांचा पराभव केला व हिंदूधर्माचे संरक्षण केले. त्याची राणी कुमारदेवी ही वज्रयान पंथाची उपासक होती. तिने सारनाथ येथील अनेक इमारतींचा जीर्णोद्धार केला. तसेच बौद्ध भिक्षुंसाठी नवीन विहारही बांधले. याचा मंत्री लक्ष्मीधर हा

मोठा विद्वान असून त्याने चौदा खंडात 'कृत्यकल्पतरू' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात काशीतील ३५० मंदिरांचे वर्णन आले असून हिंदू तीर्थांबाबतची आपली मते मांडली आहेत. गोविंदचंद्राच्या काळात वाराणसी हे वेद, व्याकरण, तत्त्वज्ञान व आयुर्वेद अभ्यासासाठी शैक्षणिक केंद्र म्हणून प्रख्यात होते. याच काळातील पंडित दामोदर भट्ट लिखित 'उक्तिव्यक्ती प्रकरण' या ग्रंथात लोकसंस्कृती आणि सामाजिक जीवनाचे चित्रण आढळते. त्यामध्ये घर, शेती, तांदूळ आणि गव्हाचे पदार्थ, बागा, उपवन आणि फळे, गाई आणि बैल, राजा आणि प्रजा, अर्थव्यवस्था आणि व्यवसाय, धार्मिक जीवन यांचा उल्लेख येतो. याच काळात स्कंद पुराणाचा प्रमुख भाग म्हणून काशीखंडाचा समावेश केला गेला.

गोविंदचंद्राचा नातू जयचंद्र हा चाहमान घराण्यातील राजा पृथ्वीराजाचा विरोधक होता. दोघांमधील कलहाचा फायदा घेऊन मुहमंद घोरीचा गुलाम सेनापती कुतुबुद्दीन ऐबक याने जयचंद्राचा इ.स. ११९४ मध्ये पराभव करून त्याचा शिरच्छेद केला. त्यांच्या सैन्याने शहराचा नाश केला व शहरवासीयांना लुटले. एकट्या वाराणसी शहरातील एक हजार मंदिरे पाडून नष्ट केली. त्याच मंदिरांच्या अवशेषांतून त्या मंदिरांच्या जोत्यावरच मशिदींची उभारणी केली. गोविंदचंद्राच्या वैभवशाली राज्याचा या आपत्तीने शेवट झाला. इ.स. ११९७-९८ मध्ये कुतुबुद्दीन ऐबकच्या दुसऱ्या स्वारीने जयचंद्राचा मुलगा हरिश्चंद्र याचा पराभव केला आणि गाहडवाल राज्याचा शेवट झाला (मोतीचंद्र १९६२: ११७-१३२).

उत्तर मध्ययुगीन कालखंड -मुस्लिम राज्य

इ.स. १२०६ मध्ये कुतुबुद्दीन ऐबक दिल्लीचा बादशहा झाला. त्याने इ.स. १२१० पर्यंत राज्य केले. अशा तऱ्हेने दिल्ली सल्तनतची स्थापना झाली आणि गंगेचे संपूर्ण खोरे मुस्लिम सत्तेच्या अंमलाखाली आले. इ.स. १३०० मध्ये फिरोझशहा तुघलकाने पुन्हा एकदा वाराणसीतील मंदिरांचा नाश केला. इ.स. १४०० मध्ये वाराणसी हे जौनपुरच्या शर्की सुलतानांच्या ताब्यात जाऊन पुन्हा एकदा मंदिरांचा विध्वंस झाला. पाडलेल्या मंदिरांच्या अवशेषांतून जौनपुर येथील मशिदींची उभारणी केली गेली. शांततेच्या काळात हिंदूंनी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. परंतु वारंवार होणाऱ्या मुस्लिम आक्रमणांमुळे त्यांचाही नाश झाला. नंतरच्या काळात जौनपुरच्या शर्की सुलतानांकडून दिल्लीच्या लोधी घराण्याच्या ताब्यात वाराणसी आली. लोधींच्या काळातही वाराणसीतील मंदिरांचा पुन्हा एकदा नाश झाला. सोळाव्या शतकात मुघल बादशहा अकबराच्या काळात (इ.स. १५५६-१६०५) वाराणसीत शांतता प्रस्थापित झाली. अकबराने धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. अकबराचे दोन राजपूत मंत्री मानसिंग व तोडरमल यांनी वाराणसीतील अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. नव्याने मंदिरे व घाट बांधले. तोडरमलने विश्वेश्वर मंदिराचा नारायणभट्टांच्या सहकार्याने जिर्णोद्धार केला.

अकबराचा नातू शहाजहानच्या काळात (इ.स. १६२८-१६५७) मुघलांचे धोरण पुन्हा बदलले. शहाजहानच्या आज्ञेने वाराणसीतील ७६ मंदिरांचा नाश केला गेला. त्याच्यानंतर गादीवर आलेल्या औरंगजेबाचे धोरण हिंदूविरोधाचेच होते. इ.स. १६६९-७३ या काळात त्याने दिलेल्या आज्ञेने पुन्हा एकदा शहरातील मंदिरांचा नाश करण्यात आला आणि त्याजागी मशिदी बांधण्यात आल्या. त्यामध्ये विश्वेश्वर, कृत्तीवासेश्वर आणि बिंदुमाधव मंदिरांचा समावेश होतो. इ.स. १६६५ मध्ये फ्रेंच प्रवासी टाव्हेरनी (Tavernier) याने वाराणसीला भेट दिली होती. त्याने बिंदुमाधव मंदिराचे विस्तृत वर्णन केले आहे. हे वर्णन महत्त्वाचे आहे, कारण यानंतर लवकरच इ.स. १६७३ साली औरंगजेबाने हे मंदिर नष्ट केले. औरंगजेबाने शहराचे नावही बदलून 'मुहम्मदाबाद' केले. परंतु ते फार दिवस टिकले नाही. सतराव्या शतकाच्या अगोदरची कोणतीच मंदिरे सध्या वाराणसी शहरात अस्तित्वात नाहीत. अपवाद फक्त कंदवा येथील कादर्मेश्वर मंदिराचा आहे. आडबाजूला असलेल्या या मंदिराकडे आक्रमकांचे लक्ष गेले नाही. बाराव्या शतकातील पुराणात उल्लेखिलेले वाराणसीचे वैभव व सौंदर्य सतराव्या शतकापर्यंत राहिले नाही. वाराणसी शहराचा वारंवार नाश होत असला तरी बौद्धिक आणि धार्मिक विचारांचे महत्त्वाचे केंद्र म्हणून नेहमीच कार्यरत राहिले.

वाराणसीचा उत्तर मध्ययुगीन कालखंडाचा इतिहास हा उत्तर भारतातील लोकप्रिय भक्ती चळवळीने व्यापलेला दिसतो. या चळवळीत अभिजात संस्कृत वाङ्मयाची जागा स्थानिक भाषेतील वाङ्मयाने घेतली. हिंदू रूढीवादी आणि पुराणमतवादीचे केंद्र म्हणून जरी वाराणसीची ओळख असली तरी चौदावे शतक ते सतराव्या शतकाची सुरूवात या दरम्यानच्या काळात झालेल्या भक्ती चळवळीच्या पुनरूत्थानामध्ये वाराणसीचा सहभाग लक्षणीय होता. रामानंद, कबीर, रोहीदास, तुलसीदास, चैतन्य, गुरुनानक हे या भक्ती चळवळीत क्रियाशील कवी व धर्म सुधारक होते. तुलसीदासाने लिहिलेला 'रामचरितमानस' हा ग्रंथ फारच महत्त्वाचा आहे. या ग्रंथाचा बरासचा भाग वाराणसीत लिहिला गेला (मोतीचंद्र १९६२: १८९-२४९).

आधुनिक काळ आणि ब्रिटीश कालखंड

अठराव्या शतकात दिल्लीच्या मोगल बादशाहीच्या ऱ्हासाच्या काळात म्हणजेच इ.स. १७२२ मध्ये वाराणसी अयोध्येच्या नबाबाच्या ताब्यात आली. त्यानंतर ते मनसाराम (इ.स. १७३०-१७३८) या हिंदू जमिनदाराच्या ताब्यात आले. त्यानेच काशीच्या 'काशीराज' ची स्थापना केली. त्याचा मुलगा बलवंतसिंग याने (इ.स. १७३८-१७७०) इ.स. १७३९ मध्ये अयोध्येच्या नबाबाकडून येथील सत्ता मिळविली आणि कालांतराने आपले स्वतंत्र राज्य स्थापिले. त्यानंतर जवळजवळ चाळीस वर्षे वाराणसी हे महत्त्वाचे केंद्र होते. इ.स. १७६३ मध्ये गंगा नदीच्या दुसऱ्या बाजूला रामनगर येथे त्याने किल्ला बांधला. इ.स. १७८१ मध्ये

बळवंतसिंग याचा मुलगा चेतसिंग व वॉरन हेस्टिंग्ज मध्ये कलह निर्माण झाला. मध्यंतरीच्या काळात इ.स. १७७५ मध्ये अयोध्येच्या नबाबाने ते ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात दिले. शेवटी इ.स. १७९४ मध्ये काशीचे राज्य पूर्णतया ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आले (मोतीचंद्र १९६२: २५०-२९४).

महाराष्ट्र आणि वाराणसी संबंधाचे पूर्वसूरींनी केलेले इतिहास संशोधन

प्रसिद्ध भारतविद्यावेत्ते डॉ. मोतीचंद्र यांनी इ.स. १९६२ मध्ये हिंदी भाषेत लिहिलेल्या 'काशी का इतिहास' या ग्रंथात काशी अर्थात वाराणसी संबंधीत सर्वसमावेशक इतिहास लिहिण्याचा पहिल्यांदा प्रयत्न झाला. हा इतिहास लिहित असताना ऐतिहासिक सामुग्रीची जुळवाजुळव करताना त्यांना आलेले अनुभव ग्रंथाच्या प्रस्तावनेत नमूद केले आहेत. ते लिहितात, ''काशी अर्थात वाराणसीच्या इतिहासाची साधने कालौघात नष्ट झाली. अठराव्या शतकात जेव्हा मराठ्यांचा वाराणसीशी संबंध आल्यानंतरच्या काळातील अनेक कागदपत्रे पुण्याच्या पेशवा दफ्तरात उपलब्ध असून त्या कागदपत्रांतून वाराणसी संबंधीत अपूर्व माहिती मिळते. फक्त नीरस अशा राजकीय बाबींबाबतच यात माहिती नसून वाराणसी नगराच्या विविध गोष्टींवरही प्रकाश पडतो'' (मोतीचंद्र १९६२: प्रस्तावना पृ.४). एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या सुरवातीस मराठी संशोधकांनी प्रसिद्ध केलेल्या असंख्य ऐतिहासिक कागदपत्रांच्या साह्याने त्यांनी 'काशी का इतिहास' या पुस्तकातील वाराणसी संबंधीत अठराव्या शतकातील इतिहासाचे विवेचन केलेले दिसते. मोतीचंद्राच्या आधीही वाराणसी संबंधीत इतिहास लिहिण्याचा त्रोटक प्रयत्न बनारस हिंदू विश्वविद्यालयातील मराठी इतिहास संशोधक अ.स.आळतेकर यांनी केला आहे. त्यांनी दोन इंग्रजी ग्रंथ (१९३७ आणि १९४३) आणि एक मराठी ग्रंथ (१९४१) लिहिलेले आहेत. 'काशी प्राचीन नगरी असून या शहराची पुनर्बांधणी अनेकदा झालेली दिसते. आधुनिक वाराणसी ही मुख्यत्वेकरून मराठानिर्मित वाराणसी आहे,' असे त्यांनी प्रतिपादन केले आहे (Altekar 1943: 23).

मराठा इतिहास संशोधनात काम करणाऱ्या संशोधकांनी मूळ ऐतिहासिक कागदपत्रे मोठ्या संख्येने प्रकाशित केली. त्यात छत्रपती, पेशवे व त्यांचे सरदार यांचे दिल्लीतील मुघल बादशहा, अयोध्येचे नबाब, काशीनरेश, कलकत्तेकर इंग्रज यांच्याबरोबर संबंध कसे होते हे सांगणारी शेकडो कागदपत्रे प्रकाशित झालेली आहेत. पण त्यांचा वापर करून सुसंगतपणे इतिहास मांडण्याचा प्रयत्न आजपर्यंत कोणीही केलेला नाही. इतिहास अभ्यासकांनी लिहिलेल्या इतिहासात अठराव्या शतकातील मराठ्यांच्या दिल्ली केंद्रीत राजकारणात वाराणसी अधून मधून डोकावते इतकेच. अठराव्या शतकातील प्रकाशित मोडी-मराठी कागदपत्रांतून मराठ्यांच्या हिंदुस्थानातील राजकारणाबाबतची जेव्हा जेव्हा चर्चा केली गेली त्या त्या वेळी हिंदुस्थांनाच्या राजकारणात प्रयाग, काशी, गया आणि मथुरा ही तीर्थस्थाने ताब्यात घेण्याची मराठ्यांची मनीषा होती असे

दिसून येते. इतिहास अभ्यासकांना ही कागदपत्रे अभ्यासण्यासाठी उपलब्ध होती, परंतु त्यांनी त्या कागदपत्रांचा एका बाजूनेच विचार केला असे दिसून येते. ही एक बाजू म्हणजे कागदपत्रातून दिसून येणारी मराठ्यांची दिल्लींवर वर्चस्व मिळविण्याची धडपड. दिल्ली काबीज करून दिल्लीवरून स्वत:च राज्य करावे अशी मराठ्यांची इच्छा कधीही दिसून आली नाही. दिल्लीच्या तख्तावर मुघल बादशहाला बसवावे, फक्त तो आपल्या तंत्राने वागेल अशी राजकारणी शक्ती मराठ्यांकडे असावी असे धोरण मराठ्यांच्या या सर्व पत्रव्यवहारातून दिसून येते. मराठ्यांच्या या दुय्यम प्रतीच्या धोरणाला प्राधान्याने अधोरेखीत करण्यात इतिहास अभ्यासकांनी धन्यता मानलेली दिसते.

याच प्रकाशित मोडी-मराठी कागदपत्रातून मथुरा, प्रयाग, वाराणसी, अयोध्या, गया ही हिंदूची धर्मक्षेत्रे-तीर्थक्षेत्रे प्रत्यक्षात आपल्या ताब्यात असावीत असेच धोरण मराठ्यांचे होते असे दिसते. याच दुसऱ्या बाजूकडे इतिहास अभ्यासकांनी म्हणावे तितके लक्ष दिलेले दिसत नाही. वाराणसी शहराचे मराठ्यांशी असणाऱ्या राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि स्थापत्य संबंधाने महाराष्ट्राच्या इतिहासात मोलाची भर घातलेली आहे. वास्तविक भौगौलिकदृष्ट्या वाराणसी हे महाराष्ट्रापासून फारच दूर आहे. तथापि महीकावतीच्या बखरीत महाराष्ट्र धर्माचा विस्तार सांगताना पूर्वेकडील सीमारेषा वाराणसीपर्यंत नेल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील विद्वत्तेचा वारसा सांगताना वाराणसीतील मराठी लोकांनी निर्माण केलेल्या विद्वत परंपरेचा आधार घेऊनच पुढे जावे लागते. अठरापगड जातीजमातींनी बनलेल्या महाराष्ट्रातील सामाजिक-धार्मिक जीवनाला एकत्रित घट्टपणे बांधून ठेवण्याचे काम वाराणसीस्थित धर्मसभेतील विद्वान लोकांनी दिलेल्या धर्मनिर्णयांमुळे झालेले दिसते. या धर्मनिर्णयात कदाचित प्रागतिक विचारसरणी दिसत नसेल, तरी सामाजिक-धार्मिक जीवनाची घडी विस्कळीत न होऊ देण्याची दक्षता घेतलेली दिसून येते. मराठी लोकांनी वारासणीत निर्माण केलेल्या स्थापत्याला वगळून मराठी स्थापत्याचा अभ्यास करणे अशक्यच आहे. वाराणसीत मराठ्यांनी निर्माण केलेल्या स्थापत्यात विविधता दिसून येते. मंदिरे, वाडे, अन्नछत्रे, गंगेवरील घाट यांचा समावेश यात होतो. महाराष्ट्रात मराठ्यांनी निर्माण केलेले स्थापत्य एका बाजूला आणि मराठ्यांनी एकट्या वाराणसीत निर्माण केलेले स्थापत्य दुसऱ्या बाजूला, अशी तुलना जर केली तर, कदाचित वाराणसीतील स्थापत्य निर्मितीचे पारडे वर होईल. मराठ्यांनी आपल्या सामाजिक-धार्मिक श्रद्धेपोटी वाराणसीत मोठ्या प्रमाणावर स्थापत्य निर्मिती केली आणि त्यावर प्रचंड प्रमाणात पैसा खर्च केला. विश्वनाथ मंदिराचे एकदा नव्हे तर दोनदा पुनर्निर्माण केले. या सर्व गोष्टींमुळेच मराठ्यांचे हिंदुस्थानातील राजकारणात प्राधान्याने वाराणसीवर लक्ष केंद्रीत झालेले दिसते. परंतु मराठ्यांच्या या वाराणसी केंद्रीत धोरणाकडे इतिहास अभ्यासकांनी फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. या प्रबंधात मराठ्यांच्या या उपेक्षीत बाजूचाच शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. तो करत असताना अगोदरच्या अभ्यासकांनी या बाबतीत काय काय साधने

जमविली होती व काय अभ्यास केला होता हे पाहणेही महत्त्वाचे आहे. अर्थातच या ऐतिहासिक मोडी-मराठी कागदपत्रांतून राजकीय इतिहासाबरोबरच सामाजिक, धार्मिक आणि स्थापत्य इतिहासाबाबतही मोठ्या प्रमाणावर माहिती मिळते.

एकोणीसाव्या शतकातील उत्तरार्धात मराठ्यांच्या इतिहास संशोधनास सुरूवात झाली. इ.स. १८२६ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रँड डफ कृत इंग्रजी भाषेतील 'हिस्टी ऑफ मराठाज्' या त्रिखंडात्मक ग्रंथावर पुण्यातील डेक्कन कॉलेज मधील एम.ए.चे विद्यार्थी नीलकंठ जनार्दन कीर्तने यांनी इ.स. १८६७ साली टीका केली. ग्रांट डफच्या ग्रंथातील काही दोष व न्यूने दाखविण्यासाठी या टीकेचा उपयोग झाला. या टीकेचे सर्वाधिक महत्त्व म्हणजे 'परकीय लोकांनी लिहिलेला इतिहास हा त्यांच्या नजरेतून ते लिहित असतात. आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे' हे तत्त्व या निमित्ताने मराठी समाजमनावर ठसले गेले. यानंतर विविधज्ञानविस्तार मासिकातून अनेक बखरी प्रसिद्ध झालेल्या आहेत. यानंतर मात्र इतिहास संशोधनाची दिशा बदललेली दिसते. इ.स. १८८५ च्या सुमारास साने, मोडक आणि चिपळूणकर यांनी संपादित केलेल्या काव्यइतिहास संग्रहातून अस्सल ऐतिहासिक पत्रे छापण्यास सुरूवात झाली. ऐतिहासिक पत्रव्यवहार छापून प्रसिद्ध करणे या मराठा इतिहास संशोधनातील महत्त्वाच्या पर्वाचा हा श्रीगणेशा होता. यानंतर पारसनीसकृत भारतवर्ष, वा.वि. खरेकृत ऐतिहासिक लेखसंग्रह, वि.का. राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाची साधने ही ग्रंथमाला अशा अनेकविध साधनातून शेकडो पत्रे प्रकाशित झालेली दिसतात. 'एक अस्सल चिटोरे सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे' या वि.का. राजवाडेकृत धोरणाचा प्रभाव पुढील शतकभर मराठा इतिहास संशोधनावर पडलेला दिसतो. यात प्रामुख्याने पारसनीसकृत इतिहाससंग्रह मासिकपुस्तक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे प्रकाशित वार्षिक अहवाल, वार्षिक इतिवृत्ते, संमेलनवृत्ते आणि शंभर वर्षाची परंपरा लाभलेले त्रैमासिक, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे प्रकाशित 'संशोधक' त्रैमासिक, पेशवेदप्तर प्रकाशित 'पेशवे दप्तर'चे ४५ खंड आणि अजूनही बरीच काही ग्रंथसामुग्री, यातून शेकडो ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध झालेली आहेत. या व्यतिरिक्त वाड डायरी, शिंदेशाही इतिहासाची साधने भाग १, सातारा इतिहास संशोधन मंडळ प्रकाशित गो.स. सरदेसाईकृत भाग १ व २, वा.वि. खरे कृत ऐतिहासिक लेखसंग्रह- खंड सात व पंधरा यातून वाराणसी संबंधीत अनेक पत्रे प्रकाशित झालेली आहेत.

''महाराष्ट्र-वाराणसी परस्पर संबंधाचा अभ्यास (१७ ते १९ वे शतक)'' या प्रबंधाला सहाय्यभूत ठरतील अशी कागदपत्रे अगदी सुरवातीपासून म्हणजेच एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि संपूर्ण विसावे शतकभर प्रकाशित झालेली दिसतात. त्यातून वाराणसी संबंधात अनेक कागदपत्रे उजेडात आलेली आहेत. परंतु त्या कागदपत्रांचा अभ्यास करून महाराष्ट-वाराणसी संबंधीत फारसे कोणी लेखन केलेले दिसत नाही. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे, रियासतकार सरदेसाई आणि दत्तात्रय बळवंत पारसनीस या तीन व्यक्तिंचा

याला अपवाद होता. मराठ्यांच्या राजकीय इतिहास संबंधीत इंग्रजी लिखाणात जदुनाथ सरकारांच्या ग्रंथांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी पर्शियन तवारिखा आणि कागदपत्रांच्या आधारे मुघल केंद्रीत इतिहास मांडणी केलेली आहे. काही प्रमाणात त्यांनी मराठी कागदपत्रांचा सुद्धा वापर केला आहे, ''महाराष्ट्र-वाराणसी परस्पर संबंध'' या प्रबंधात मराठी दृष्टीकोनातून वाराणसीचा शोध घेण्याचा विचार असल्याने ऐतिहासिक मोडी-मराठी कागदपत्रे आणि इतर मराठी साधनांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केलेला आहे. एखाद्या विशिष्ट बाबतीत मराठी कागदपत्रांमधून कमी माहिती मिळत असेल तर त्याच वेळी काही बाबतीत पर्शियन आणि इंग्रजी साधनांचा उपयोगही केलेला आहे.

मराठ्यांच्या इतिहास लेखनाच्या सुरूवातीच्या काळात म्हणजेच इ.स. १८९८ साली वि.का. राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १' या ग्रंथातून मूळ ऐतिहासिक पत्रेही प्रसिद्ध केली गेली आणि त्यातील माहितीवर आधारीत बाळाजी बाजीरावांच्या उत्तर हिंदुस्थानातील मोहिमांबाबत विवेचन करताना त्यांनी काशी-वाराणसी संबंधात चर्चा केलेली आहे. पूर्वेकडील काशी व बंगाल हे प्रदेश घेण्याचा प्रयत्न करत असताना बाळाजी बाजीराव स्वत: काशीत जाऊन आले होते. त्यानंतर त्यांनी अनेक वेळा आपले सरदार शिंदे यांना काशी घेण्याची वारंवार आज्ञा केलेली दिसते. दिल्ली भोवतालचे राजकारण आणि अब्दाली कडून पानिपत येथे झालेला पराभव यामुळे मराठ्यांचे काशी घेण्याचे सर्व प्रयत्न तसेच राहिले आणि पुढे कधीही 'श्री' म्हणजेच काशी ही कधीही मराठ्यांच्या हातात आली नाही असा त्यांच्या विवेचनाचा मतितार्थ दिसतो (मइसा १, १८९८: प्रस्तावना पृ.३९-४०). मराठी लोकांच्या मनात काशीबद्दल असलेले महत्त्व ओळखून राजवाड्यांनी महाराष्ट्र-आणि वाराणसी संबंधीत विषयाचा परामर्श घेतला होता. संशोधकांच्या पुढच्या पिढीतील अभ्यासकांनी काशी-वाराणसी संबंधीत अनेक कागदपत्रे प्रसिद्ध करण्याचा सपाटा लावला, परंतु त्यावर आधारीत इतिहास लिहिण्याचे फारसे प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. वाराणसी संबंधीत फुटकळ लेखन झालेले दिसते. परंतु प्रकाशित कागदपत्रांचा पद्धतशीर अभ्यास करून त्यांना एका विशिष्ट धाग्यात गुंफण्यांचे काम रियासतकार सरदेसाई यांनी केलेले दिसते. अर्थातच रियासती लिहित असताना त्यांनी मराठ्यांचा राजकीय इतिहास सलगपणाने मांडण्याकडे प्राधान्याने लक्ष दिलेले दिसते. त्यामुळेच रियासतीच्या वेगवेगळ्या खंडातून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते पेशवाई संपेपर्यंत जेव्हा जेव्हा मराठ्यांचा वाराणसीशी संबंध आला ते ते प्रसंग पद्धतशीरपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. काशी आणि काशीविश्वनाथ यासंबंधी मराठ्यांच्या धार्मिक भावना, काशीविश्वनाथाची पुन:स्थापना, उत्तर हिंदुस्थानातील राजकारण करते वेळी मराठ्यांचे हिंदूंची धर्मक्षेत्रे सोडविण्यासंबंधीत प्रयत्न व त्यासाठी अयोध्येकर नवाबाला रोहिल्यांविरूद्धच्या लढ्यात मदत करताना हिंदूची धर्मक्षेत्रे त्रिस्थळी म्हणजेच प्रयाग, काशी आणि गया ताब्यात द्यावीत ही घेतलेली भूमिका, पानिपत युद्धानंतर हिंदुस्थानी

राजकारणात मराठ्यांना बसलेला हादरा आणि दिल्लीतील दुबळ्या मुघल बादशाहीच्यामुळे उत्तर हिंदुस्थानातील राजकारणात निर्माण झालेली पोकळी, यातून इंग्रजांचा भारतीय राजकारणात झालेला प्रवेश आणि त्यामुळे वाराणसी ताब्यात घेण्याचे मराठ्यांचे कायमचे भंगलेले स्वप्न, या सर्व राजकीय घटकांची मांडणी गो.स. सरदेसाई यांनी मूळ मराठी-कागदपत्रांद्वारे मराठी रियासतीत केलेली आहे.

मूळ मोडी-मराठी कागदपत्रांचे प्रकाशन आणि त्यावर आधारीत इतिहास लेखन करणारे तिसरे अभ्यासक म्हणजे दत्तात्रय बळवंत पारसनीस होत. भारतवर्ष आणि इतिहाससंग्रह मासिकांद्वारे त्यांनी वाराणसी संबंधीत अनेक कागदपत्रे प्रसिद्ध केली, त्यावर टीपा लिहिल्या. इतिहाससंग्रह मासिकामध्ये काशीविश्वेश्वराची पुनःस्थापना, नानांची काशीयात्रा, लाला सेवकराम- कलकत्तेकर इंग्रजांजवळील मराठ्यांचा वकील, महादजी शिंदे यांचे वैद्य शुकदेव मिश्र, सदाशिवरावभाऊ यांचा बनारस येथील तोतया, सरफोजी भोसले यांची काशीयात्रा, नाना फडणविसांच्या काशीवासास गेलेल्या एका अभिष्टचिंतकाचे पत्र, काशीक्षेत्रातील कर्मनाशीचा पूल इत्यादी विषयावरील मूळ मोडी-मराठी पत्रे आणि त्यावरील त्यांचे भाष्य प्रकाशित केलेले आहेत.

कॅलेंडर ऑफ पर्शिअन कॉरसपॉन्डन्स, नागपूर रेसिडेंसी रिपोर्ट यात इंग्रजी कागदपत्रे प्रसिद्ध झाली असून त्यात कलकत्तेकर इंग्रज, वाराणसीतील इंग्रजांचे रेसिडेंट यांनी मराठी सत्ताधीश म्हणजेच नाना फडणवीस, महादजी शिंदे, अहिल्याबाई होळकर आणि नागपूरकर भोसले यांच्याशी केलेला पत्रव्यवहार प्रकाशित झाला आहे. या इंग्रजी पत्रांतून इंग्रज-मराठा राजकीय बाबी, काशीयात्रा, काशीविश्वनाथ मंदिर, काशी मधील मराठा निर्मित स्थापत्यातील घाट, मंदिरे, अन्नछत्रे, वाडे आदी विषयांचा उहापोह झालेला आहे.

वाराणसीतील सामाजिक आणि धार्मिक इतिहासाचे अवलोकन करीत असताना वाराणसीतील विद्वत परंपरेचाही विचार करावा लागतो. वाराणसीतील या विद्वत परंपरेत मराठी विद्वान पंडितांचा बहुमोल्य वाटा आहे. हरप्रसाद शास्त्री आणि रंगनाथस्वामी यांनी या परंपरेची ओळख पहिल्यांदा करून दिली. सन १९१२ च्या 'इंडियन ॲन्टिक्वेरी' या इतिहास संशोधनाला वाहिलेल्या नियतकालिकात वाराणसीतील दक्षिणी ब्राह्मण विद्वान घराण्यांची ओळख करून देताना शेष, भट्ट, धर्माधिकारी, भारद्वाज, चतुर्धर उर्फ चौधरी, पुणतांबेकर, पायगुंडे या घराण्यांची माहिती हरप्रसाद शास्त्री यांनी दिलेली आहे. एका वेगळ्या लेखात रंगनाथस्वामी यांनी शेष घराण्यातील विद्वत परंपरेची माहिती दिली आहे. यानंतरच्या काळात 'गागाभट्टाचे घराणे - गो.स. सरदेसाई (१९४४), श्रीशिवछत्रपती आणि गागाभट्ट - पां.वा. काणे (१९३०), चतुर्धर उर्फ चौधरी घराणे - पी.के. गोडे (१९५४) आदि संशोधकांनी वेगवेगळ्या घराण्यांसंबंधी संशोधनपर लेख लिहिले. या सर्व विद्वान मराठी घराण्यांची माहिती एकत्रितपणे महामहोपाध्याय काशीनाथ वासुदेव

अभ्यंकर यांनी पतंजली महाभाष्याच्या प्रस्तावना खंडात (१९५४) दिली आहे. अशाच तऱ्हेची माहिती हिंदी भाषेत बलदेव उपाध्यायकृत वाराणसी की पांडित्य परंपरा (१९८३) आणि गोपीनाथ कविराजकृत काशी की सारस्वत साधना (१९९८) या ग्रंथात दिलेली आहे.

वाराणसीचे महत्त्व हे तिच्या धार्मिक जीवनावर अवलंबून आहे. पूजापाठ, तीर्थयात्रा आणि अध्ययन-अध्यापन ही या जीवनाची वैशिष्टचे आहेत. वाराणसीतील या जीवनाचे प्रतीक आजच्या प्रमाणेच सतराव्या शतकातील ब्राह्मणच होते. सन १६०० ते १६५० दरम्यान रचलेल्या वरदराजकृत 'गीर्वाणपदमंजरी' आणि सन १७०२ ते १७०४ दरम्यान लिहिलेल्या ढुंढिराजकृत गीर्वाणवाङ्मंजरी या ग्रंथात ब्राह्मण विशेषत: दक्षिणी म्हणजेच प्रामुख्याने महाराष्ट्रीय ब्राह्मणांचे दररोजच्या जीवनाचे चित्रण रेखाटले आहे. मोतीचंद्र यांनी 'काशी का इतिहास' या ग्रंथात वरील दोन ग्रंथातील आशयाबाबत चर्चा केलेली आहे. रघुनाथराव विंचूरकर हे महाराष्ट्रातील नाशिक जवळील एका लहानशा संस्थानाचे अधिपती होते. त्यांनी सन १८४८ ते १८५१ दरम्यान काशीयात्रा केलेली होती. या काशीयात्रेचे वर्णन त्यांनी 'तीर्थयात्रा प्रबंध' (लेले, १९६४) या ग्रंथात केलेले आहे. या ग्रंथात त्यांनी वाराणसीतील ब्राह्मणी जीवनाचे चित्रण रेखाटले आहे. एकोणिसाव्या शतकातील अखेरच्या काही दशकातील वाराणसीतील महाराष्ट्रीय ब्राह्मणी समाजाचे चित्रण 'आमचे पुण्यक्षेत्र (काशी)' या ग्रंथातून दिसून येते (धोपेश्वरकर १९००).

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात नवशिक्षणाने प्रेरीत झालेल्या नवीन पिढीने आत्मचिंतन करण्यास सुरूवात केली. याचाच परिणाम म्हणजे आपण कोण आहोत? आपली राजकीय, सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती कशी आहे? याबद्दल विचार विनिमयास सुरूवात झालेली दिसते. सहाजिकच स्वत्वाचा शोध घेणाऱ्या या पिढीने राजकीय इतिहासाचा शोध घेताना सामाजिक, धार्मिक इतिहासाकडेही लक्ष देण्यास सुरूवात केलेली दिसते. जात हे हिंदू समाजव्यवस्थेचे एक महत्वाचे लक्षण असल्याने जातींचा अभ्यास करण्याकडे संशोधकांचे लक्ष गेले. यातूनच रा.भि. गुंजीकर लिखित 'सरस्वतीमंडळ अथवा महाराष्ट्रातील ब्राह्मणजातीचे वर्णन' (१८८४) हा ग्रंथ तयार झाला. महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजाबद्दलची माहिती देऊन ब्राह्मण उपजातींबद्दलची सविस्तर माहिती देणारा हा पहिलाच ग्रंथ होता. याच ग्रंथाच्या परिशिष्टात ब्राह्मण जातींमधील ग्रामण्यांची निर्णयपत्रके/निवाडापत्रे प्रकाशित झालेली आहेत. नंतरच्या काळात इतिहास संशोधनाचे ध्येय उराशी बाळगून उदयास आलेल्या भारत इतिहास संशोधन मंडळाच्या वार्षिक अहवाल, इतिवृत्ते, त्रैमासिके यातून महाराष्ट्र समाजातील सर्व जातींबद्दलचे संशोधन प्रकाशित करण्यात आले. विशेषत: ब्राह्मण जात आणि त्यातील ग्रामण्याबाबत मंडळातील संशोधकांनी मूळ ऐतिहासिक पत्रे प्रसिद्ध करण्यावर भर दिलेला दिसतो. यात काशी येथील धर्मसभेने दिलेली निर्णयपत्रके आणि महाराष्ट्रातील निरनिराळ्या गावातील म्हणजेच सोपारा, पैठण, राजापूर, नाशिक, पुणे

येथील धर्मसभेने दिलेली निर्णयपत्रे प्रसिद्ध केलेली आहेत. देवरूखे यांची मूलोत्पत्ति- वि.का. राजवाडे, जोशी, पाध्ये व नानासाहेब पेशवे - का.ना. साने, शिवकालीन शास्त्री व पंडित (शेणवीजातिनिर्णय) - पां.न. पटवर्धन, सारस्वतांचे ब्राह्मणत्व - द.वि. आपटे, या व्यतिरिक्त ब्राह्मणेतर जातीमधील ग्रामण्याबाबत अथणी-शेट्टी - द.वि. आपटे यांचाही लेख विशेष लक्षात घेण्याजोगा आहे. याव्यतिरिक्त ब्राह्मणातील उपजातींनी आपापल्या जातींचा इतिहास लिहिला आहे. त्या ग्रंथात त्या विशिष्ट जातींवर मध्ययुगीन कालखंडात कोणकोणती ग्रामण्ये आली आणि ती ग्रामण्ये संपुष्टात आणण्यासाठी त्या जातीने केलेल्या प्रयत्नांचा इतिहास दिला आहे. त्यामध्ये चितळेभट्ट प्रकरण - रा.स. पिंपुटकर (१९२६), गौड सारस्वत ब्राह्मणांचा इतिहास - रा.न. सोहनी (१९३७), कुडाळदेशकर (इतिहास आणि व्यक्ति)- गुं.फ. आजगांवकर (१९५५), श्री शांतादुर्गा चतु:शताद्बी महोत्सव ग्रंथ- पांडुरंग पिसुर्लेकर, देवरूखे ब्राह्मणांचा इतिहास - रमेश विष्णु निंबकर (२०१०) या ग्रंथाचा समावेश होतो. महाराष्ट्रातील ग्रामण्ये आणि काशीतील तसेच महाराष्ट्रातील धर्मसभेने दिलेली निर्णयपत्रके यांचा एकत्रित अभ्यास करून इंग्रजी भाषेत ओ हेन्लॉन आणि माधव देशपांडे यांनी काही संशोधन केले आहे.

त्रिस्थळी यात्रा आणि महाराष्ट्र यांचा अनोन्यसंबंध आहे. यात काशी, प्रयाग आणि गया या तीन स्थळांच्या यात्रेचा समावेश होतो. मध्ययुगापासून म्हणजेच इसवी सनाच्या तेराव्या शतकापासून महाराष्ट्रातून काशीयात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंचे संदर्भ मिळतात. सोळाव्या शतकात पैठणहून काशीला स्थायिक झालेले मराठी विद्वान पंडित नारायणभट्टांनी 'त्रिस्थलीसेतू' हा गंथ लिहून त्रिस्थळी यात्रेचे महत्त्व वाढविलेले दिसते. नंतरच्या काळात म्हणजेच सतराव्या शतकापासून उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या मराठी सत्तेच्या आश्रयाने काशीयात्रेची लोकप्रियता महाराष्ट्रीय समाजामध्ये वाढत गेलेली दिसते. या काशीयात्रेसंबंधी मोडी-मराठी कागदपत्रांतून असंख्य संदर्भ मिळतात. त्यामध्ये वाड डायरीज्, राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पारसनीसकृत इतिहाससंग्रहातील पत्रे आणि लेख, गो.स. सरदेसाईकृत पेशवे दप्तरांचे १ ते ४५ खंड, पु.म. जोशीकृत सिलेक्शन्स फ्रॉम पेशवा दप्तर खंड १, वा.वि. खरेकृत ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड ७ इत्यादी ग्रंथांचा समावेश होतो. या सर्व कागदपत्रांचा अभ्यास करून संशोधकांनी पेशवे आणि पटवर्धन घराण्यातील स्त्रियांच्या काशीयात्रेसंबंधीत काही लेख लिहिले आहेत. त्यात सरस्वतीबाईंची काशीयात्रा (ऐतिहासिक लेखसंग्रह खंड ७) - वा.वि. खरे (१९१२) आणि काशीयात्रा (पेशवेकालीन महाराष्ट्र)- वा.कृ. भावे (१९७६) मराठी रियासत खंड ३ व ४ - गो.स. सरदेसाई यांच्या लेखांचा समावेश होतो. याशिवाय मराठा साम्राज्यातील इतरही राज्यकर्ते काशीयात्रा करीत होते. त्यामध्ये सर्फोजीराजे भोसले (दुसरे) तंजावरकर, रघुनाथराव विंचूरकर, नागपूरकर भोसले यांच्या काशीयात्रेचे संदर्भ मिळतात. इ.स.१८५७ नंतरच्या काळात रेल्वे सुरू झाल्यामुळे नंतरच्या काळातील काशीयात्रांचा समावेश प्रबंधात केलेला नाही.

तंजावरकर सर्फोजीराजे दुसरे यांच्या काशीयात्रेसाठी महाडिक अे.कृष्णस्वामी (१९५१), तुलजेंद्रराजे भोसले (१९९९) यांची पुस्तके आणि इरिना ग्लुश्कोवा यांचा लेख (२००४) इत्यादी ग्रंथ आणि लेखातील माहिती उपयोगी ठरते. रघुनाथराव विंचूरकरांच्या काशीयात्रेसाठी 'तीर्थयात्रा प्रबंध' (लेले १९६४) हा ग्रंथ, तर नागपूरकर भोसल्यांच्या काशीयात्रेसाठी नागपूर अफेअर्स, खंड १(शेजवलकर १९५४) या ग्रंथातून मराठी साधने आणि Calender of Persian Correspondence, Vol.VI, VII, IX आणि Nagpur Residency Records, Vol.III, IV या पाच ग्रंथातून इंग्रजी साधने प्रसिद्ध झालेली आहेत. नागपूरकर भोसले घराण्यातील रघुजी तिसरा यांच्या काशीयात्रेचा पोवाडा विविधज्ञानविस्तार (१८४९) या मासिक पुस्तकात प्रकाशित झालेला आहे. या शिवाय या.मा. काळे कृत नागपूरकर भोसल्यांची बखर, या ग्रंथातूनही नागपूरकर भोसल्यांच्या काशीयात्रेची माहिती मिळते.

वाराणसीला भेट देणाऱ्या तीर्थयात्रेकरूंमध्ये गंगाकिनाऱ्यावरील प्राचीन घाट व मंदिरे पाहण्याची इच्छा असते. सलग दोन हजार वर्षे, कधीही खंड न पडता, सातत्याने मानवी संस्कृती नांदत असलेले शहर अशी या शहराची ओळख आहे. परिपूर्ण-सर्वोकृष्ट हिंदू संस्कृतीचे नगर अशीही या शहराची ओळख आहे. संस्कृत तसेच इतर प्रादेशिक भाषेतील ग्रंथांमधून या संबंधीत वर्णन येते. तीर्थयात्रेचा भरभराटीस आलेला मार्ग, मंदिरांमधील उत्सवामुळे तयार झालेले वातावरण, गंगाकिनाऱ्यावरील घाट, मंदिरे, अन्नसत्रे आणि मठांचे अस्तित्व यामुळे या वर्णनाला पाठबळ मिळते. यात्रांचे नकाशे, चित्रे आणि फोटो, धार्मिक-पवित्र जागांवरील मूर्ती या साधनांतूनही याला अधिक बळकटी मिळते. या शहराकडे एखाद्याने जरी नुसती नजर टाकली तरी त्यातील गुंतागुंतीच्या गोष्टींमधून त्याला काहीतरी नवीन माहिती मिळून जाते. अनेक मंदिरांची शिखरे जरी जुनी दिसत असली, तरी सतराव्या शतकात उत्तर भारतात दिसून येणाऱ्या मुघल स्तंभांच्या साह्याने उभी असलेली दिसतात. गंगाकिनाऱ्यावरील स्थापत्याशी यमुना नदीच्या काठावरील दिल्ली व आग्रा येथील मुघल किल्ले, हवेल्या यांच्याशी विलक्षण साम्य आढळून येते. स्थापत्यातील या बारकाव्यांमधून वाराणसीकडे पाहिले तर 'हिंदूचे शहर' म्हणून ज्या काही पारंपरिक अपेक्षा असतात, त्याला तडा जातो, हे बारकावे निराशा उत्पन्न करतात. इ.स. १६०० च्या अगोदरचे एक सुद्धा स्थापत्य-इमारत गंगाकिनाऱ्यावर दिसून येत नाही. वाराणसी शहराच्या क्षितीजावर दिसणाऱ्या मनोहारी दृष्याला सतराव्या शतकातील दोन मशिदींच्या रूपाने छेद गेलेला दिसतो. काशी प्राचीन नगरी आहे, परंतु या शहराची पुनर्बांधणी अनेकदा झालेली दिसते. आधुनिक वाराणसी ही मुख्यत्वेकरून मराठानिर्मित वाराणसी आहे असे प्रसिद्ध इतिहास अभ्यासक अ.स.अळतेकरांचे (१९४३) मत आहे. आळतेकरांच्या या विधानाला सहाय्यभूत ठरतील असे पुरावे ऐतिहासिक मोडी-मराठी आणि इंग्रजी कागदपत्रांतून दिसून येतात. मराठी कागदपत्रे प्रामुख्याने राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पारसनीसकृत इतिहाससंग्रह, सरदेसाईकृत पेशवे दप्तरचे खंड,

होळकरशाहीच्या इतिहासाची साधने यातून प्रसिद्ध आहेत, तर इंग्रजी कागदपत्रे 'Calenders of Persian Correspondence' या ग्रंथ मालिकेत प्रसिद्ध झालेले आहेत. या मराठी आणि इंग्रजी कागदपत्रांतून घाट, मंदिरे, अन्नछत्रे, वाडे हे कोणी व कधी बांधले हे कळते. परंतु हे स्थापत्य बांधतांना खर्च किती आला, त्यांची स्थापत्यशैली कोणती होती याबाबत ही कागदपत्रे काहीच सांगत नाहीत. वाराणसीतील स्थापत्याची वर्णने आणि विश्लेषण करणारी अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. या प्रबंधासाठी उपयोगात आणलेली स्थापत्य विषयक पुस्तकांची नावे संदर्भामध्ये दिलेली आहेत.

वाराणसीतील मराठा स्थापत्यांवर संस्कृत आणि मराठी भाषेत शिलालेख कोरलेले आहेत. त्यावरून त्या स्थापत्याचा कर्ता, नाव आणि कालाचा संदर्भ मिळतो. अहिल्याबाईंकृत काशीविश्वनाथ मंदिरावरील शिलालेख भाऊशास्त्री वझेकृत 'माझा चित्रपट आणि काशीचा संपूर्ण इतिहास' (१९३९) या पुस्तकात प्रकाशित आहे. अहिल्याबाईंकृत मणिकर्णिका घाटावरील तारकेश्वर मंदिराचा शिलालेख M.V. Burway (1922) यांच्या पुस्तकात प्रसिद्ध आहे. पंतप्रतिनिधींनी बांधलेल्या बिंदुमाधव घाटावरील मंदिरातील शिलालेख हे अ.ना. भागवतकृत पंतप्रतिनिधी घराण्याचा इतिहास या पुस्तकात प्रसिद्ध आहेत (भागवत १९२९). बिंदुमाधव मंदिरावरील एक संस्कृत शिलालेख अप्रसिद्ध असून त्याचे वाचन प्रथमच या प्रबंधात दिले गेले आहे.

महाराष्ट्राचा जसा वाराणसीच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि स्थापत्य घटकांवर प्रभाव पडला, तसाच प्रभाव वाराणसीचा महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक व्यवस्था व चालीरिती, स्थापत्य, मराठी भाषा व साहित्य यावर पडलेला दिसतो. काशीयात्रेचा परिणाम मराठी समाज, संतसाहित्य पडलेला आहे. काशीयात्रेच्या स्मृतींचा प्रभाव मराठी समाजमनावर पडलेला दिसतो. याचेच प्रतिबिंब मराठी बखर वाङ्मय आणि संत साहित्यात दिसून येते. या स्मृतींचाच धांडोळा इरिना ग्लुश्कोव्हा (२०१७) यांनी घेतला आहे. सोळाव्या-सतराव्या शतकातील उत्तर भारतीय स्थापत्याचा महाराष्ट्रातील स्थापत्यावर प्रभाव पडला. त्यामुळेच अठराव्या शतकातील महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्यावर नागर शैलीचा म्हणजेच पर्यायाने वाराणसीतील स्थापत्य शैलीचा कसा प्रभाव पडला याचा अभ्यास म.श्री.माटे यांनी 'मराठेशाही वास्तुशिल्प' (२००८) या पुस्तकात मांडला आहे.



आकृती क्र.१ : महाराष्ट्र आणि वाराणसी यांच्यामधील परस्पर संबंधांचा अभ्यास (१७ वे शतक ते १९ वे शतक) या प्रबंध विषयाच्या भौगोलिक व्याप्तीचा नकाशा

पूर्वसूरींच्या संशोधकांनी प्रकाशित केलेली मूळ साधने, प्रकाशित लेख आणि पुस्तके या सर्वांचा धांडोळा घेऊन 'महाराष्ट्र-वाराणसी परस्पर संबंधांचा अभ्यास (१७ वे १९ वे शतक)' या प्रबंधाची मांडणी मराठी दृष्टीकोनातून करण्याचा प्रयत्न केला आहे.

भौगोलिक व्याप्ती (आकृती क्र.१)

'१७ ते १९ व्या शतकातील महाराष्ट्र' या संकल्पनेची व्याप्ती ही सध्याच्या महाराष्ट्रापुरती मर्यादित अर्थाने घेतलेली नाही. अठराव्या शतकात भारतामधील सर्वदूर प्रांतात मराठ्यांनी आपला राज्यविस्तार केला व तिथेच ते स्थिरावले. उत्तरेत महाराष्ट्राबाहेर ब्ऱ्हाणपूर, इंदौर, महेश्वर, उज्जैन, सागर, झांशी, ग्वाल्हेर तर दक्षिणेत तंजावर पर्यंत मराठी राज्याचा विस्तार झालेला दिसून येतो. सन १७५८ च्या दरम्यान मराठी साम्राज्याची सीमा अटक पर्यत गेलेली दिसते. पानिपत येथील पराजयाने या सीमेच्या वाढीला मर्यादा आली. या प्रबंधात भौगोलिक व्याप्ती दर्शविलेल्या नकाशात सन १७५८ मधील मराठी साम्राज्याच्याच सीमारेखा अधोरेखीत केलेल्या आहेत. या प्रचंड विस्तारलेल्या साम्राज्यात मराठे आपल्या बरोबर आपली संस्कृती, परंपरा, भाषा, धार्मिक विचार-आचारही बरोबर घेऊन गेले आणि त्याबरोबरच तेथील स्थानिक संस्कृतीमध्येही पूर्णपणे सामावून गेले. महाराष्ट्र-वाराणसी संबंधातील अभ्यासात या सध्याच्या महाराष्ट्राच्या बरोबरीने बृहत् महाराष्ट्राचाही समावेशही करण्यात आलेला आहे.

वाराणसी हे नगर उत्तरप्रदेशात असून अर्धचंद्राकृती गंगा नदीच्या पूर्व किनाऱ्यावर वसले आहे (अक्षांश २५° १८' उत्तर, आणि रेखांश ८३° १' पूर्व). बुद्धपूर्व महाजनपदाच्या काळात काशी हे सोळा जनपदांपैकी एक जनपद होते आणि या जनपदाची राजधानी वाराणसी हे नगर/शहर होते. काळाच्या ओघात जनपदांचे अस्तित्व नष्ट झाले. मोठ मोठ्या साम्राज्यांमध्ये त्यांचे विलयन झाले. काशी या जनपदाचे अस्तित्वसुद्धा याच पद्धतीने संपुष्टात आले असावे. कालातरांने काशी जनपदाचे अस्तित्व वाराणसी नगरापुरतेच उरले असावे. म्हणूनच नंतरच्या काळात काशी आणि वाराणसी ही नावे एकाच नगराकरीता समानार्थी म्हणून उपयोगात येऊ लागली. या प्रबंधातसुद्धा ही दोन्ही नावे एकाच वेळी उपयोगात आणली आहेत आणि सध्याच्या वाराणसी या नगराचे जे भौगोलिक क्षेत्र आहे तेच क्षेत्र या प्रबंधात ध्यानात घेतलेले आहे. वाराणसीच्या दोन हजार वर्षांच्या कालखंडात या शहराला विविध नावाने ओळखले गेले आहे. वाराणसी, काशी, अविमुक्त, आनंदकानन, महाश्मशान या विविध नावांनी वाराणसी नगर/शहर ओळखले जाते. विविध पुराणांतून, जातककथांमधून, महाकाव्यांतून आणि काशीखंडातून या नावांमागचा इतिहास समजतो.

वाराणसी

वाराणसी या नावामागेही अनेक मतांतरे दिसून येतात. पुराणांनुसार वरूणा आणि असी या दोन नद्यांच्या मध्ये हे नगर/शहर वसले असल्यामुळे या शहराला 'वाराणसी' असे म्हणतात. महाभारतात वरूणा नदीलाच 'वराणसी' असे म्हटल्यामुळे तिच्या काठावर वसलेल्या शहराचे नाव 'वाराणसी' असे पडले. 'वरणा' असे एका वृक्षाचे नाव आहे, आणि अशा वृक्षांनी वेढलेल्या शहराला 'वाराणसी' असे नाव पडले. वाराणसी नावाचाच अपभ्रंश मुघल काळात बनारस, तर ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात बेनारस झाला.

काशी

काशी शब्दाची उत्पत्ती काश (चमकणे) या धातुपासून झाली आहे. ही नगरी निर्वाणाच्या मार्गाला प्रकाशित करते, शिवाच्या प्रकाशापासून हे नगर प्रकाशित झाले आहे, असे वर्णन काशीखंडात केले आहे. काशी रहस्य या ग्रंथात काश नावाच्या गवतापासून काशी हे नाव पडले असे लिहिले आहे. एफ.ए.पॉर्जिटर यांनी काश नावाच्या राजाशी काशीचा संबंध जोडला आहे. याच्याच वंशात पुढील काळात काशीचा राजा दिवोदास झाला. अथर्ववेदाच्या पैप्पलाद शाखेमध्ये पहिल्यांदा काशी शब्द आला आहे. बुद्धपूर्व महाजनपदांच्या काळात काशी हे एका जनपदाचे नाव होते व वाराणसी शहर हे त्या जनपदाच्या राजधानीचे नांव होते.

अविमुक्त

शिवाने कधीही या नगरीला सोडले नाही म्हणून या नगरीला अविमुक्त म्हणतात असे अग्निपुराणात लिहिले आहे. शिवपुराणात अविमुक्त शब्दाची व्याख्या 'सर्वांना मुक्ति देणारा' अशी केली आहे. अवि याचा अर्थ पाप होतो, म्हणजेच पापापासून मुक्तता देणारी ही नगरी आहे, असे वर्णन लिंगपुराणात आले आहे. (मोतीचंद्र १९६२: १७०)

आनंदकानन/आनंदवन

पुराणात वाराणसीला आनंदकानन म्हटले आहे. शिवाला वाराणसी नगरी ही अतिशय प्रिय होती. ती त्याला आनंद देत होती, म्हणून ही नगरी आनंदकानन अथवा आनंदवन आहे.

महाश्मशान

पद्मपुराण, मत्स्यपुराण, काशीखंड यात या नगराचा उल्लेख महाश्मशान असा केला आहे. काशीखंडात असे वर्णन आहे की जर कोणी महाश्मशानात जाऊन तेथेच मृत्यू पावला तर त्याला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही, म्हणजेच त्याला मुक्ति मिळते.

संशोधनाची उद्दिष्टे

१. अठराव्या शतकातील वाराणसी ही 'मराठी वाराणसी' म्हणून ओळखली जात असे. काशीवरील या मराठी प्रभावाचा अभ्यास करणे.

२. सतराव्या शतकापासून काशी, प्रयाग, मथुरा ही हिंदूंची तीर्थक्षेत्रे ताब्यात घेण्याचे मराठ्यांचे प्रयत्न सुरू होते. मराठ्यांच्या संपूर्ण १७५-२०० वर्षांच्या राजकीय सत्ताकाळात वाराणसीवर प्रभुत्व निर्माण करणे हे त्यांचे ध्येय असल्याचे दिसते. वाराणसी आणि मराठे यांच्यामधील राजकीय संबंधाचा आढावा घेऊन नव्याने फेरमांडणी करणे.

३. पंधराव्या शतकापासून मराठी पंडीत विद्याभ्यासासाठी वाराणसीस जात असत. वाराणसीतील संस्कृत विद्या आणि हिंदू धार्मिक जीवनावर मराठी पंडितांनी आपली छाप पाडली होती. त्यांनी आपल्या ग्रंथांद्वारे केलेल्या या कार्याचा आढावा घेणे.

४. महाराष्ट्रातील सामाजिक स्थित्यंतरात वाराणसीतील धर्मसभेने महत्वाची भूमिका बजावली आहे. जात ही भारतीय समाजव्यवस्थेचे एक महत्वाचे अंग आहे. महाराष्ट्रीय समाजही याला अपवाद नाही. पंधराव्या-सोळाव्या शतकापासून महाराष्ट्रीय समाजव्यवस्थेतील विशेषत: ब्राह्मण वर्गातील उपजातींमध्ये 'ब्राह्मणत्वासाठी' तंटे उपस्थित झाले. इतर जातीतही असेच तंटे म्हणजेच ग्रामण्ये उपस्थित झाली. याबाबतीत वाराणसीच्या धर्मसभेने दिलेल्या निर्णयांचा आढावा घेणे.

५. 'त्रिस्थळी यात्रा' ही महाराष्ट्रीय समाजात फारच लोकप्रिय आहे. प्रयाग येथील माघीस्नान, काशीतील विश्वनाथाचे दर्शन आणि चार्तुमासातील काशीवास आणि गयेत पितरांचे श्राद्ध करणे या त्रिसूत्रीला एकाच धाग्यात गुंतविण्याचे श्रेयही वाराणसीतील मराठी पंडितांकडे जाते. मराठ्याच्या इतिहासकाळातील अशा काशीयात्रांचा आढावा घेणे.

६. काशीविश्वनाथ मंदिर उभारणीतील नारायणभट्ट आणि अहिल्याबाई होळकर यांचे योगदान, काशीविश्वनाथ मंदिराचा इतिहास, त्याचे स्थापत्य तसेच काशीविश्वनाथ मंदिराचे स्थान व त्यासंबंधीत मराठी जनमत यांचा आढावा घेणे.

७. आज दिसणारी वाराणसी ही मराठ्यांनी निर्माण केलेली वाराणसी आहे. वाराणसीतील प्रमुख देवता विश्वनाथाच्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे कार्य असो किंवा शहरातील ब्रह्मपुरी, अन्नछत्रे, मंदिरे तसेच गंगाकिनाऱ्यावरील घाट यातील मराठी लोकांचा सहभाग हा मोठ्या प्रमाणावर आहे. वाराणसीतील या मराठा निर्मित स्थापत्याचा आढावा घेणे.

८. महाराष्ट्र-वाराणसी परस्पर संबंधांचा अभ्यास करताना सतरावे शतक ते एकोणिसाव्या शतकातील वाराणसीच्या संस्कृतीचा महाराष्ट्राच्या संस्कृतीवरही फार मोठ्या प्रमाणात परिणाम पडलेला दिसून येतो. या परिणामांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती

१. ऐतिहासिक कागदपत्रे, बखरी, यात्रावर्णने, इंग्लिश रेकॉर्डस वगैरे

काशीच्या इतिहासाचा परामर्ष घेताना आपणास ऐतिहासिक साधनांची मोठ्या प्रमाणावर कमतरता भासते. काळाच्या ओघात काशीतील अनेक दस्तावेज नष्ट झाले. सतराव्या-अठराव्या शतकात सर्वदूर पसरलेल्या मराठी साम्राज्यामुळे निर्माण झालेली लिखित सामुग्री मोठ्या प्रमाणावर आजही उपलब्ध आहे. या कालखंडाशी निगडीत काशीसंबंधी माहिती मराठी कागदपत्रातून मोठ्या प्रमाणात मिळते, किंबहुना सतराव्या ते एकोणिसाव्या शतकातील काशी संबंधीत माहितीसाठी याच मराठी साधनांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. याच काळात काशीवर ईस्ट इंडिया कंपनीचे वर्चस्व निर्माण झाले. त्यामुळे या कालखंडाशी संबंधीत असंख्य इंग्लिश कागदपत्रे, पुस्तके व काही प्रवासवर्णने आज उपलब्ध आहेत. या ऐतिहासिक कागदपत्रांचा, बखरींचा, यात्रावर्णनांचा पद्धतशीर अभ्यास करण्यात आला.

२. प्रबंधामध्ये वापरण्यात आलेल्या नावांबाबत स्पष्टीकरण

मराठी कागदपत्रांमधून काशी, वाराणसी, बनारस ही तीनही नावे येतात. एकाच स्थळाच्या निर्देशासाठी ही नावे येत असल्याने संदर्भासाठी जे पत्र उपयोगात आणले आहे त्या पत्रातील नाव मजकुरात वापरले आहे. काशी आणि वाराणसी हे नाव सरसहा एकाच वेळी वापरल्याचे आढळते. परंतु अठराव्या

शतकातील उत्तरार्धातील काही मराठी कागदपत्रांमधून बनारस नाव येते. अशा वेळी त्या संदर्भात 'बनारस' या नावाचा उपयोग केला आहे. इंग्रजी कागदपत्रांतून 'Benares' असा उल्लेख येतो. व्यक्तींच्या/घाटाच्या नावांमध्येही भिन्नता आढळून येते. संदर्भपत्रामध्ये जे नाव आले आहे त्याच नावाचा उपयोग मजकुरात केलेला आहे. उदा.-

व्यक्तीचे/घाटाचे नांव	**मराठी कागदपत्रांतून आलेले नाव**
बलवंतसिंह	बलवंतसिंग, बळवंतसिंग
चेतसिंह	चेतसिंग
सुजाउदौला	शुजाउद्दौला, सुज्याउद्दौला
अब्दाली	अबदाली, आबदाली
बाळाजी बाजीराव पेशवे	बाळाजीराया
मणिकर्णिका	मनकर्णिका

३. पुराभिलेखागारातील दस्तावेज

सतरावे शतक ते एकोणिसाव्या शतकातील इतिहासाचा अभ्यास करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे ऐतिहासिक कागदपत्रे होत. सदर प्रबंधाचा अभ्यास करताना पुराभिलेखागारात असणाऱ्या कागदपत्रांच्या अभ्यासाचा विचार करण्यात आला होता. त्यादृष्टीने पुणे पुराभिलेखागार आणि डेक्कन कॉलेजच्या मराठा इतिहास संग्रहालयातील कागदपत्रांचा प्रामुख्याने अभ्यास करण्यात आला. गेल्या शंभर वर्षामध्ये या पुराभिलेखागारातील कागदपत्रांचा अभ्यास करून शेकडो कागदपत्रे प्रसिद्धही करण्यात आली. त्याचा धांडोळा वर घेण्यात आलेला आहेच. काळाच्या ओघात महाराष्ट्र-वाराणसी राजकीय बाबीं संबंधीत अनेक कागदपत्रे प्रसिद्धही झालेली दिसतात. या दोनही पुराभिलेखागातील महाराष्ट्र-वाराणसी संबंधातील अप्रसिद्ध कागदपत्रांचा शोध घेता काही कागदपत्रे हाताशी लागली. परंतु प्रबंधाचा विषय पुढे जाईल अशी नवीन माहिती त्यात फारशी मिळू शकली नाही. काही माहिती जरूर मिळते, पण तीच माहिती दुसऱ्या प्रकाशित कागदपत्रांमधून अगोदर माहित झालेली असते. अशा वेळेला प्रकाशित साधनांचाच या प्रबंधात वापर केला आहे. नाना फडणवीस, नागपूरकर भोसले, महादजी शिंदे, अहिल्याबाई होळकर यांचे कारभारी/वकील एक तर कलकलत्त्यात तसेच वाराणसीत नेमलेले असत. ते आपापल्या धन्याला पत्र पाठवून वाराणसीतील तसेच हिंदुस्थानातील माहिती वरचेवर लिहित असत. त्यामुळे एकच गोष्ट कमी-जास्त माहितीने उजैन, महेश्वर, नागपूर आणि पुणे येथे पोहचत असे. तसेच या ठिकाणी नाना फडणवीसांचे वकीलही असत. त्यामुळे वाराणसी किंवा उत्तर हिंदुस्थानातील माहिती दोन-तीन ठिकाणाहून पुण्यापर्यंत पोहचत असे. उदा. चेतसिंग आणि वॉरन हेस्टिंगमधील वाराणसीतील सन

१७८१ मधील लढाईचे वर्णन हे विश्वंभरपंत आणि बेनीरामपंतामार्फत नागपूरकर भोसल्यांना पत्राद्वारे कळत असे. नागपूरकर भोसल्यांना आलेली ही माहिती नाना फडणवीसांचे नागपूर मधील वकील बाबूराव वैद्यांमार्फत पुण्याला पोहचत असे आणि तीच माहिती नाना फडणवीसांचा कलकत्त्यातील वकील लाला सेवकराम मार्फत नाना फडणवीसांस पुण्यात मिळत असे. अशी काही अप्रसिद्ध कागदपत्रे पुणे पुराभिलेखागार आणि मराठा इतिहास संग्रहालयात मिळून आली. कागदपत्रे अप्रसिद्ध आणि माहिती मात्र प्रसिद्ध आहे, अशा वेळी प्रकाशित साधनांचाच वापर केला आहे. काशीतील ब्राह्मणांना पेशव्यांतर्फे वर्षासने देण्यात येत असलेले अनेक कागदपत्रांतून आढळून आले. तीच माहिती प्रकाशित साधनांतून मिळते. त्यामुळे याही ठिकाणी प्रकाशित साधनांचाच वापर केला आहे.

इंदूर, महेश्वर, धार, देवास, उजैन, सागर, झाशी हा भाग मराठी सत्तेच्या अधिपत्त्याखाली येत असल्याने तेथील राजकारभाराची अनेक कागदपत्रे या पुराभिलेखागारात मिळतात. परंतु वाराणसी हा भाग कधीही मराठ्यांकडे प्रत्यक्षात आला नाही. त्यामुळे येथील राजकारभाराची, जमाखर्चाची कागदपत्रे येथील पुराभिलेखागारात मिळत नाहीत.

तात्पर्य पुराभिलेखागांराचा अभ्यास करूनही त्यांचा वापर करण्यावर मर्यादा आलेली आहे.

४. क्षेत्रीय निरिक्षणे (Field Observations)

सुमारे २००-२५० वर्षापूर्वी गंगातीरावर मराठ्यांनी बांधलेले घाट, काशीविश्वनाथाच्या मंदिराबरोबर इतर मंदिरांची निर्मिती व राहण्यासाठी बांधलेले वाडे व धर्मशाळा आजही अतिशय मजबूत परंतु काही वेळा दुर्लक्षीत अवस्थेत वाराणसीत दिसून येतात. यांची बांधणी, त्यांचे आराखडे आणि त्यांची छायाचित्रे याद्वारे या पुरातत्त्वीय अवशेषांचा अभ्यास करण्यात आला. काशीतील नाना फडणवीसांच्या वाड्यांचा नकाशा फडणवीसांचे पुण्यातील वंशज श्री.अशोक फडणवीस यांच्या कडून मिळाला.

५. सद्यस्थितीतील मराठी समाजाकडून गोळा केलेली माहिती

काशीनगरीत मोठ्या प्रमाणावर आजही मराठी समाज राहत आहे. त्या लोकांकडील मिळालेल्या ऐतिहासिक माहितीचा प्रबंधात योग्य त्या ठिकाणी वापर केला आहे. त्यांच्याकडील माहितीचे आदान-प्रदान केले, त्यांच्या मुलाखती घेणे आणि छायाचित्रे घेणे या तंत्राचा वापर सदरील अभ्यासात करण्यात आला. बिंदुमाधव मंदिराचे कारभारी मुरलीधर पटवर्धन यांनी बिंदुमाधव संस्थानची माहिती दिली. वाराणसीतील जुन्या घराण्यांची तसेच वास्तूंची माहिती दिली. बिंदुमाधव मंदिरावरील शिलालेखांचे फोटो तसेच नव्या अप्रसिद्ध शिलालेखाच्या वाचनाला परवानगी दिली. डॉ. माधव रटाटे

आणि श्री.मकरंद म्हैसकर यांनी गंगातीरावरील घाट तसेच मराठी लोकांच्या वाड्यांच्या अभ्यासात प्रत्यक्ष जागेवर जाऊन केलेल्या क्षेत्र निरीक्षणात मदत केली.

प्रकरण दुसरे

महाराष्ट्र-वाराणसी राजकीय संबंध

प्रास्ताविक

इसवीसनाच्या सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी महाराष्ट्रातील परकीय मुसलमानी सत्तेविरूद्ध उठाव केला, त्याचाच परिणाम म्हणजे शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली त्यांनी उभारलेले स्वत:चे राज्य होय. या नवीनच असलेल्या स्वराज्याला ग्रहण लागले ते औरंगजेबाच्या दख्खनच्या स्वारीच्या वेळी. पण औरंगजेबाच्या मृत्यूनंतर लवकरच मराठ्यांची शक्ती वाढली व त्यांच्या एकत्रीत प्रयत्नांमुळे पेशावर ते तंजावर आणि गुजरात ते बंगाल पर्यंत त्यांनी स्वत:चे साम्राज्य स्थापन केले. पानिपतच्या पतनानंतर त्यांचे राजकीय वर्चस्व क्षीण होत गेले आणि एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातच ब्रिटीश सत्तेने त्यांना नेस्तनाबूत केले. सतरावे शतक ते एकोणिसावे शतक या संपूर्ण काळात त्यांच्या काही इच्छा, आकांक्षा होत्या. याच इच्छा, आकांक्षाना मूर्त रूप देण्यासाठी त्यांनी सतत दोन शतकभर लष्करी संघर्ष केला. पण या लष्करी संघर्षाला कारणीभूत ठरल्या त्या त्यांच्या राजकीय आणि धार्मिक प्रेरणा. या दोनही प्रेरणा या परस्पर प्रेरक अशा होत्या. मराठ्यांनी भारतभर राजकारण केले, त्यासाठी मेहनत व कष्ट घेतले. हिंदु धर्माचे संरक्षण आणि संघटन करणे हे या राजकारणा मागील उद्देश आणि लक्ष्य होते.

प्रयाग, काशी व गया या स्थानांकडे हिंदू हे आपली धार्मिक तीर्थस्थळे म्हणून पाहतात व आयुष्यात एकदा तरी त्यांना भेट द्यावी अशी त्यांची इच्छा/भावना असते. परंतु अनेक शतके ही हिंदूंची तीर्थक्षेत्रे मुसलमानांच्या ताब्यात होती व अनेक वेळा त्यांना जिझिया करासारख्या संकटाचा सामना करावा लागत असे. अनेक वेळा त्यांना मंदिरे, पवित्र स्थाने मुसलमानांच्या द्वारा पाडलेली व भ्रष्ट केलेली व त्या जागी मशिदी/दर्गे उभारलेले पहावे लागत असे. मुसलमानांच्या काळात तर ही परिस्थिती फारच बिघडली. औरंगजेबाच्या काळात ही परिस्थिती फारच खालावली. त्याच्याच काळात सहेतुकपणे मथुरेचे केशवाचे तसेच वाराणशीचे विश्वनाथाचे मंदिर पाडले गेले. यानंतर जरी ही परिस्थिती हळूहळू निस्तेज होत गेली तरी या तीर्थस्थानांच्या हालाखीमध्ये किंचितही फरक पडला नाही.

मराठ्यांचे राजकीय तसेच लष्करी वर्चस्व भारतात वाढायला लागले तसतशा त्यांच्या इच्छा, आकांक्षा निर्भिडपणे व्यक्त होऊ लागल्या. हिंदू धर्माच्या पुनरोद्धारासाठी कटिबद्ध असलेल्या मराठ्यांना या तीर्थक्षेत्राची दुर्देवी, हतभागी दशा दिवसेंदिवस अधिकच दिसू लागली. सतराव्या-अठराव्या शतकातील एकमेव प्रबळ हिंदू सत्ताधीश असलेल्या मराठ्यांचे मन काशी भोवती केंद्रीत झालेले दिसते. पंधराव्या-सोळाव्या शतकापासून काशीतील धार्मिक-सामाजिक क्षेत्राचे नेतृत्त्व मराठी लोकांनी आपल्या बुद्धीसामर्थ्याच्या बळावर मिळविले होते. शिवछत्रपतींच्या रूपाने जेव्हा त्यांच्या राजकीय आकांक्षाना पाठबळ मिळाले तेव्हापासून मराठी माणसांच्या मनात काशीविश्वनाथाची पुन:स्थापना करण्याचे वेध लागले. या वेधाचेच रूपांतर काशीवर प्रत्यक्ष ताबा मिळविण्याच्या प्रयत्नात झाले. सतराव्या-अठराव्या शतकात छत्रपती, पेशवे आणि त्यांचे सरदार यांनी काशीवर प्रत्यक्ष सत्ता मिळविण्याच्या राजकीय प्रयत्नांचा आढावा या प्रकरणात तपशिलवारपणे घेण्यात आला आहे.

सतरावे शतक: छत्रपती व काशी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात त्यांचा काशीशी पहिल्यांदा संबंध आला तो धार्मिक दृष्टीने. औरंगजेबाच्या कैदेतून सुटल्यानंतर महाराष्ट्रात परत येताना ते सरळ रस्त्याने न येता खूपच वेगळी वाट पत्करून काशी म्हणजेच वाराणसी मार्गे राजगडावर म्हणजेच महाराष्ट्रात परत आले. शिवाजी महाराजांच्या दक्षिण दिग्विजयच्या वेळी गोवळकोंड्याचा कुत्बशाह व शिवाजी महाराज यांची भेट झाली, त्यावेळी सुलतानाने त्यांना विडा दिला होता. परंतु "जो पर्यंत मी औरंगजेबाच्या तावडीतून वाराणसी सोडवत नाही व विश्वनाथाच्या मंदिराची उभारणी करत नाही तो पर्यंत हा विडा मी स्वीकारू शकत नाही" असे त्यांनी सांगितले होते (वाकसककर १९३०: १३६). औरंगजेबाला हरविण्यासाठी त्यांनी विजापूर व गोवळकोंड्याच्या सुलतानांकडे मदतीची मागणी केली. या बखरीचा कर्ता हा काही शिवाजी महाराजांना समकालीन नव्हता. परंतु शिवछत्रपतींच्या आयुष्याचे ध्येय काय होते ते हा बखरकार सांगतो. सर्वसामान्य माणसे शिवाजी महाराजांच्या कृतीकडे कोणत्या ऐतिहासिक नजरेतून बघत होते हे दिसून येते.

छत्रपती संभाजी महाराजांनी अंबेरच्या जयसिंहाचा मुलगा रामसिंहाला लिहिलेल्या पत्रांतूनही औरंगजेबाला नेस्तनाबूत करण्याची व काशी तसेच इतर ठिकाणच्या हिंदू मंदिराची पुनर्बांधणी करण्याचे ध्येय दिसून येते. छत्रपती संभाजी महाराज लिहितात, "आता समय आला आहे की त्या प्रत्यक्ष यवनाधमाला कारागृहात घालून मंदिरस्थापनादी आपले धर्म पुन: सर्वत्र चालू करावे" (सरदेसाई १९४१: ६५). छत्रपती राजाराम महाराजांचा अमात्य रामचंद्रपंत यांनी लिहिलेल्या आज्ञापत्रातून असे सांगितले आहे की राजाराम महाराजांनी नर्मदापार करून उत्तरेतील अनेक शहरे तसेच प्रांत जिंकून काशीला भेट देऊन

विश्वनाथाची मूळ जागी स्थापना केली (खरे १९६०: ३०). राजाराम महाराजांनी नक्कीच नर्मदा पार केली नव्हती. परंतु यातून राजाराम महाराजांचे ध्येय काय होते हे नक्कीच समजून येते. छत्रपती राजारामांच्या दोन सरदारांनी नर्मदा पार करून माळव्यातील सिरोंज पर्यंत धडक मारली होती (आपटे आणि दिवेकर १९२५: ६७). त्यातील एक सरदार इतका पक्का होता की तो दिल्ली तसेच उत्तरेतील इतर शहरे जिंकण्याचा करार राजाराम महाराजांशी करायला तयार होता (शिचसा ५, पत्र क्र.७६७, ८४६). रामचंद्रपंत अमात्यांनी लिहिलेल्या वरील वाक्यात बरेच तथ्य असलेले दिसते. मुसलमानांच्या ताब्यातून वाराणशी तसेच इतर क्षेत्रे सोडविण्याचे ध्येय राजाराम महाराजांचे होते हेच यातून दिसून येते.

इ.स.१७०० ते १७४०: बाळाजी विश्वनाथ पेशवे, बाजीराव पेशवे आणि काशी

इ.स. १७१९ मध्ये बाळाजी विश्वनाथ दिल्लीतील काम आटोपल्यावर आपल्या फौजेसह वाराणसीला गेले होते (वाड डायरी ३: ११५). त्यावेळी त्यांनी निश्चितच काशी विश्वनाथाची मुस्लिम राज्यकर्त्यांनी काय दशा करून ठेवली आहे हे पाहिलेच असणार. त्याच्या मनातही हे तीर्थस्थळ मुसलमानांच्या ताब्यातून सोडविण्याचे नक्कीच आले असणार. परंतु त्याबाबत आजपर्यंत काहीही पुरावा प्राप्त झालेला नाही.

दि. २४-७-१७३५ च्या पत्रात पहिले बाजीराव पेशवे नारायण दीक्षित पाटणकरांना लिहितात, ''मथुरेच्या जवळचा प्रदेश जेव्हा आमच्या ताब्यात येईल त्यावेळी मी तुम्हाला त्यांच्याजवळील दहा गावे इनाम देईन'' (कासंपया, पत्र २५, पृ.४८). पहिल्या बाजीरावांचा मुलगा रघुनाथराव अशाच आशयाचे एक पत्र दि. ३-६-१७५४ रोजी नारायण दीक्षितांचा मुलगा वासुदेव दीक्षित यांना लिहिताना दिसतो (कासंपया, पत्र ११९, पृ.११८).

इ.स. १७३६ च्या एका पत्रात बाजीरावांनी मुघल बादशाहा मुहंमदशाला मदत करताना एक करार केलेला आहे. त्या करारातील एक कलम हे प्रयाग, काशी, गया व मथुरा ही गावे स्वत:च्या जाहागिरीसाठी मागितल्याचे आहे (पेद १५, पत्र क्र.८६, पृ.८२). ही तीर्थक्षेत्रे हिंदूंच्या ताब्यात असावीत असा या मागण्यामागील हेतू होता हे मान्य करणे कठीण आहे. परंतु बाजीरावांच्या मृत्यूनंतर लगेचच लिहिलेल्या इ.स. १७४० मध्ये चिमाजीआप्पा आणि बाळाजी बाजीरावांनी पेशव्यांचे दिल्ली येथील वकील हिंगणे यांना लिहिलेल्या दोन पत्रांवरून बाजीरावांचे हेच लक्ष होते हे सिद्ध करता येईल. पत्रात चिमाजीआप्पा लिहितात, ''तीर्थरूप नाना म्हणजेच बाळाजी विश्वनाथांनी रयतेची दुवा आणि ब्राह्मणांची स्थापना केली. त्यांचाच आदर्श धरून बाजीरावांचीही देवाब्राह्मणांची स्थापना करून काशी महास्थळी विश्वेश्वराचा जीर्णोद्धार करण्याची इच्छा होती'' (हिंगणे दप्तर १, पत्र १५, पृ.१४). बाजीरावांच्या याच इच्छेचे प्रतिबिंब बाळाजी

बाजीरावांनी हिंगणे यांना लिहिलेल्या पत्रांमध्ये उमटलेले दिसते. असफजाह निजाम पहिला याला स्वत:चा विद्रोही मुलगा नासिरजंगाविरूद्धच्या लढ्याच्या वेळी मराठ्यांची मदत पाहिजे होती. त्यावेळी निजामाने प्रयाग येथील यात्रेकरूंवरील कर माफ करणे व काशीची जहागीर बाजीरावाला देण्याविशी अनकुलता दर्शविली होती. त्याच पत्रात ते लिहितात की प्रयाग, वाराणसी ही माहाक्षेत्रे यवनमुक्त होऊन गोवध बंदी व्हावी अशी सवाई जयसिंग आणि बाजीरावांची इच्छा होती (हिंगणे दप्तर १, पत्र १९, पृ.२०).

इ.स.१७४० ते १७६१: बाळाजी बाजीराव पेशवे आणि काशी

या काळातील काशीशी संबंधीत मराठा इतिहासातील मंडळींमध्ये प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो पेशव्यांकडील नानासाहेब पेशवे व त्यांचा धाकटा भाऊ रघुनाथराव पेशवे यांचा. याच बरोबरीने त्यांच्या खांद्याला खांदा लावून राजकीय कृत्यात भाग घेणारे त्यांचे सरदार म्हणजेच शिंदे व होळकर होत.

पहिल्या बाजीरावांच्या मृत्यूनंतर लगेचच २५ जून १७४० ला बाळाजी बाजीरावांना पेशवाईची वस्त्रे मिळाली. पहिल्या बाजीरावांचे उत्तरेतील लष्करी चढाईचेच धोरण त्यांनी ठेवले. आपल्या कारकिर्दीतील पहिल्या आठ वर्षातच त्यांनी उत्तरेत चार स्वाऱ्या केल्या. पहिली स्वारी १८ डिसेंबर १७४० पासून ३० जुलै १७४१ केली. या स्वारीत त्यांना माळव्याच्या सुभेदारीच्या सनदा सवाई जयसिंहामार्फत महंमदशहा बादशहाकडून मिळाल्या व त्यामुळे मराठ्यांचे प्रादेशिक वर्चस्व यमुनेच्या पर्यंत निर्माण झाले. सन १७४१-४२ च्या सुमारास पेशव्यांचा बंगालकडे स्वारीस जाण्याचा विचार चालला होता. पेशव्यांची ही मोहिम दि.१८ डिसेंबर १७४१ पासून ३० जुलै १७४३ पर्यंत चालली (मराठी रियासत ४: ३५). नागपूर चांद्यामार्गे हंड्या मकडाई, शिवनीवरून नर्मदा काठाने गढा-मंडळा हस्तगत करून ते बादशहाकडे माळवा, बुंदेलखंड, अलाहाबाद इत्यादी प्रांताची चौथाईची मागणी करीत होते. दुसरीकडे रघुजी भोसल्यांपासून बचाव करण्यासाठी बंगालचा नबाब अलिवर्दीखानाने बादशहाकडे मदतीची मागणी केली. 'त्याबदल्या मोबदला म्हणून आम्ही बादशाहीस तोशीस लावून देणार नाही' असे बाळाजी बाजीरावांनी बोलणे चालू केले होते. ते मान्य करून अलीवर्दीचे संरक्षण करण्याचे काम बादशाहाने ताबडतोब पेशव्याकडे सोपविले. याच चालून आलेल्या संधीचा फायदा घेऊन बादशहाच्याच हुकूमाने बंगालमध्ये उतरून पेशव्यांनी रघुजी भोसले यांस नेमस्त केले. नानासाहेब पेशव्याच्या याच दुसऱ्या स्वारी दरम्यान त्यांचा काशी म्हणजेच वाराणसीशी पहिल्यांदा संबंध आला. या स्वारीत पिलाजी जाधवही पेशव्यांच्या बरोबर होते. १७ मार्च १७४२ ला पिलाजी जाधवांनी नानासाहेब पेशव्यांना लिहिलेल्या पत्रात काशीताईंनी काशीला यात्रेला येण्याचे संकेत दिलेले आहेत (सिपेद१, पत्र ५७, पृ.४२). पिलाजी जाधव लिहितात की, "आम्ही हिंदुस्थानचे स्वारीस येते समई तीर्थरूप मातुश्री ताईंनी मजला महायात्रेस घेऊन जाणे यैसी आज्ञा केली. त्यास कासीकडे जावयाचे

जालियास घेऊन जाऊ अैसे आम्ही बोलिलो. तयास हाली बंगालियाकडे आमचा जावयाचा डौल आहे. ऐशी यास स्वामींचे मर्जीस येईल तरी मातुश्रींची रवानगी करावी.'' यावरून पेशव्यांच्या बंगालवरील मोहिमेच्यावेळी काशीबाई त्याच्या बरोबर होत्या याबाबत खात्री होते. परंतु पेशव्यांच्या बरोबर त्या सतत होत्या याबाबत शंका आहे. पेशव्यांनी आपली खास माणसे किंवा सरदार त्यांच्या बरोबर दिले असावेत आणि त्या वेळोवेळी स्वतंत्रपणे तीर्थस्थानांचा भेटी देत असाव्यात असे वाटते.

याच मोहिमेत नानासाहेब पेशवे बुंदेलखंडात मोहिमेवर असताना त्यांच्या छावणीमध्ये असणाऱ्या खंडेराव बापूजी चिटणीस यांनी ८ नोव्हेंबर १७४२ रोजी लिहिलेल्या पत्रात ''मातुश्री व चिरंजीव बाबा कार्तिकस्नानाकरीता श्रीकाशीयात्रेमध्ये आहेत. स्नाने जाहली म्हणजे देशी येतील'' अशा तऱ्हेचा मजकूर काशीबाई आणि जनार्दनपंत यांच्या संदर्भातील असावा (पेद २०, पत्र २८, पृ.२०). मराठी रियासतीमध्ये सरदेसाई यांनी हे पत्र काशीबाई संदर्भात दाखविले आहे (मराठी रियासत ४: १०१). याचवेळी बुंदेलखंडातून नानासाहेब पेशवे रघुजी भोसल्यांना आवर घालण्यासाठी बंगालकडे जावयास निघाले. १ फेब्रुवारी १७४३ च्या पत्रात बातमी आहे की, '' पटणे प्रांते न जाता प्रयाग, काशी क्षेत्रे जवळ जाणोन येथे आले. त्रिवेणी संगमी स्नाने झाली. सकल विधि उत्तम रीतीने जाहला. प्रयागच्या सुभाही आग्रहपूर्व नावा दिल्या. बहुत लोक नावांत बसून किल्याजवळ स्नाने करून वटदर्शन करून आले'' (पुरंदरे दप्तर १, पत्र १५०, पृ.१०१). बाळाजी बाजीरावांच्या मनात याच वेळी काशी घेण्याचे विचारही आले. परंतु नारायण दीक्षितांच्या विनंती वरून काशी ताब्यात घेण्याचा विचार त्यांना सोडून द्यावा लागला. पेशवे शकावलीत ९ फेब्रुवारी १७४३ ला घडलेला प्रकार वर्णन केला आहे तो असा. नानासाहेब पेशवे काशी जवळ येताच त्यांना काशी घेण्याची इच्छा झाली. त्यांच्या जवळीच सैन्य पाहताच काशीचा अधिकारी म्हणजेच अयोध्येचा नबाब चिंताक्रांत बनला. पेशव्यांनी काशी घेण्याचा प्रयत्न केला तर काशीतील मराठी ब्राह्मणांचा शिरच्छेद करण्यात येईल असे त्यांने काशीतील मराठी ब्राह्मणांना सांगितले. पुढे त्या ब्राह्मणांनी काशी न घेण्यासाठी पेशव्यांचे मन वळविले. नंतर पेशव्यांनी व इतरांनी साध्या वेशात जाऊन गंगास्नान केले (मइसा २: ९७). नारायण दीक्षितांचे याच घटनेवर अधिक प्रकाश टाकणारे २७ जून १७४२ रोजीचे एक पत्र उपलब्ध आहे (मइसा ३, पत्र ३९७, पृ.३६९). पत्रातील मजकूर पुढील प्रमाणे आहे.

> पुरवणी राजश्री दीक्षित स्वामींचे सेवेसी ++++++++++ मल्हारजी छावणी अंतर्वेदीत केली. राजश्री राम दीक्षित तिलक सैन्यात आहेत. गोविंद नाईक आले. त्यांनी सांगितले व पत्रे साहूकारांची येतात. मल्हारजीचे चित्तांत की, मशीद विश्वेश्वराची ज्ञानवापीजवळी ते, पाडून देवालय करावे. परंतु पंचद्राविडी ब्राह्मण चिंता करितात की, हे

मशीद प्रसिद्ध आहे. पातशहाचा हुकूम नसता पाटील देऊळ करील. एखादा पातशहा दुष्ट जाला ह्मणजे ब्राह्मणांस मरण येईल. जीवच घेईल. यवन प्रबळ या प्रांती आहेत. सर्वांचे चित्तास येत नाही. दुसरे जागा बांधिले तरी बरे अहे. ब्राह्मण चिंता करितात.+++++++++ ब्राह्मणांची तरी दुर्दशा होईल. गंगा समर्थ. काशी ब्राह्मण चिंता करितात. मना करीसा कोणी नाही. मना करावे तरी पा की, देवाची स्थापना मना करावी हा दोष. परंतु ब्राह्मणा संकट न पडे ते करावे हे पुण्य विशेष. याजवर विश्वेश्वराचे चित्तांत येईल ते करील. चिंता करून काय होणे? याजवर मशीद पाडू लागतील तेव्हा सर्व ब्राह्मण मिळतील आणि श्रीमंतांस विनंतिपत्र पाठवितील. ऐसा विचार जाला आहे.

ज्ञानवापी मशीद पाडून त्याजागी विश्वेश्वर मंदिराची उभारणी करण्याच्या बाबत काशीतील ब्राह्मण हे दुविधेमध्ये होते असे वरील पत्रावरून समजून येते. एका बाजूला धर्माचा प्रश्न होता, तर दुसऱ्या बाजूला जीवाचा प्रश्न होता. ब्राह्मणांनी धर्मापेक्षा जीव वाचवण्याला प्राधान्य दिले. बाळाजी बाजीरावांनी आणि मल्हारराव होळकरांनी काशीविश्वेश्वराचा जीर्णोद्धार करण्याची आपली इच्छा मनामध्येच ठेवली व ते परत आले.

सन १७४८ मध्ये अब्दालीने सरहिंदवर हल्ला करून ते काबीज केले व तो दिल्लीच्या रोखाने येऊ लागला. तेव्हा महंमदशहा बादशहाने शहाजादा अहंमदशहा, वजीर कमरूद्दीनखान, सफदरजंग यांना त्याच्या विरूद्ध पाठविले. या युध्दात बादशहाचा विजय झाला परंतु त्याचा वजीर ठार झाला. या युद्धावरून परतत असतानाच महंमदशहा बादशहाचा मृत्यू झाला व त्याचा मुलगा अहमदशहा बादशहा बनला. त्याने सफदरजंगास वजीरी दिली त्याचबरोबर अलाहाबाद, अयोध्या या सुभ्यावर नेमणूकही केली. अयोध्येच्या सुभ्यामध्ये काशी येत असल्याने बाळाजी बाजीराव जयाजी शिंदे यांचा दिवाण रामचंद्रबावा यांना लिहिलेल्या पत्रात लिहितात, ''सफदरजंग बरोबर मैत्री केल्याने खूपच फायदा आहे. त्याच्याशी स्नेह ठेवा, अप्रिय बोलून विग्रह वाढवू नका. भविष्यात काशी घेता येईल. कारण ते त्याच्या अंमलाखालील प्रदेशात आहे'' (कासंपया, पत्र ६७, पृ.७८).

थोड्याच दिवसात बादशहा व वजीर यांचे संबंध बिघडले व दोघेही एकमेकांपासून सावधतेने राहू लागले. सफदरजंगाने दिल्लीत आपल्या विरोधकांवर सूड घेणे सुरू केले. पंजाबचा सुभेदार मीरमन्नू, जाटाचा प्रमुख सूरजमल्ल व फरुखाबादचा अहंमदखान बंगश व बरेलीचा सादुल्लाखान रोहिला यांच्याशी त्याचे संघर्षाचे प्रसंग घडून आले सन १७५० च्या सुमारास रोहिले व पठाणांनी वजीराचा प्रदेश लखनौ व अलाहाबाद प्रांतामध्ये मोठ्या प्रमाणावर लूटमार व जाळपोळ करून कहर उडवून दिला होता.

अहमदखान बंगशाने लखनौ जिंकल्यानंतर फेब्रुवारी-मार्च १७५१ मध्ये वजीराच्या अलाहाबादच्या किल्ल्याला वेढा घातला होता. त्यावेळी बंगशाची नजर वजीराच्या अमलाखालील काशी व आजूबाजूच्या प्रदेशावरही पडली होती. बंगश काशीवर हल्ला करणार या नुसत्या वार्तेनेच काशीतील जनजीवन अतिशय विस्कळीत झाले होते. त्यावेळच्या काशीतील परिस्थितीचे वर्णन मराठी कागदपत्रातून आलेले आहे. अनेक मराठी कुटुंबे काशीस राहत असत. त्यातील नारायण दीक्षित पाटणकरांचे घराणे फारच प्रसिद्ध आहे. नारायण दीक्षित पाटणकर या घटनेच्या अगोदरच मृत्यू पावले होते. त्यांचा मोठा मुलगा वासुदेव दीक्षित हे औरंगाबादमध्ये राहून सावकारी तसेच राजकारणात भाग घेत होते. तर दुसरा मुलगा बाळकृष्ण दीक्षित हे काशीमध्ये राहून त्यांची सावकारी पेढी चालविण्याबरोबरच धार्मिक तसेच राजकीय बाबतीततही लक्ष देत असत. त्यांचा केशव दीक्षित हा पुतण्याही काशीत त्यांच्याबरोबर राहत असे. या दीक्षित कुटुंबाचा पेशवे तसेच इतर मराठा सरदारांबरोबर वारंवार आर्थिक, धार्मिक तसेच राजकीय बाबतीत वारंवार पत्रव्यवहार होत असे. अहमदशहा बंगश काशीवर हल्ला करणार या नुसत्या वार्तेनेच काशीत काय घडले यांचे वर्णन केशव दीक्षित व बाळकृष्ण दीक्षित यांनी आपले औरंगाबाद मधील बंधू वासुदेव दीक्षित यांना दि. १३-२-१७५१ रोजी लिहिलेल्या पत्रात दिसून येते (मइसा ३, पत्र ३७६, पृ.३४६). अहमदशहा बंगशाने जेव्हा काशीवर हल्ला केला त्यावेळी नारायण दीक्षितांचा मुलगा बाळकृष्ण आणि वरील पत्राचा लेखक केशव हे आपल्या पित्याच्या श्राद्धासाठी गयेला गेले होते. तेथे आलेल्या पत्रातून त्यांना असे समजले की पठाणांनी प्रयागची नवीन वस्ती लुटली, बायकांना कैद केले आणि ते आता काशीस येणार अशी वार्ता आहे. हे ऐकूनच काशीमध्ये मोठा आकांत झाला. दोन दिवस शहरात दिवेच लागले नाहीत. दहा दिवस काशीमध्ये प्रलय झाला. काशी ते पटण्याचे गाडीभाडे ऐंशी रुपये झाले. ओझे उचलण्यासाठी (कामगार) माणसे मिळेना. सर्व लोक मिर्झापूर, आजमगड किंवा गंगापार पळून गेले. या गडबडीमुळे लोकांचे हाल ऐकून अहमदशहा बंगशने सात सावकारांना निरोप पाठवून त्यांना परवाना देऊन आश्वस्त केले की, 'मी बादशहाचा नोकर आहे, मी शहर लुटावयास आलेलो नाही, मला बदनाम करू नका, लोकांना दिलासा देऊन शहरात सुखरूप रहा, रयतेला त्रास होणार नाही.' अहमदशहा बंगशापासून परवाना मिळाल्यानंतर काशीच्या कोतवालाने पाच जणांना गंगापूरला पाठविले. तिथे सर्व मामला ठरल्यानंतर लोक परत शहरात येऊ लागले. बाळकृष्ण दीक्षित औरंगाबादला राहणारे आपले बंधू वासुदेव दीक्षित यांना दि.७ मे १७५१ रोजी लिहिलेल्या पत्रातून अहमदशहानी केलेल्या वरील गडबडीबाबत सांगतात की, ''काशीचा राजा बळवंतसिंग हा प्रयागला जाऊन पठाणाला भेटला व सात लक्ष रूपये देऊन काशीची लूट थांबवली'' (मइसा ३, पत्र ३८३, पृ.३५४). याच पत्रात त्यांनी अहमदशहा बंगशचा मराठ्यांनी केलेल्या पराभवाचे वर्णन केले आहे. रोहिले व बंगशाशी चाललेल्या युद्धात वजीराला मराठ्यांकडे याचना करण्याशिवाय दुसरा पर्यायच उरला नाही.

राजपूतांविरूद्धच्या मोहिमेनंतर शिंदे व होळकर नुकतेच रिकामे झाले होते व इतर प्रांतावर त्यांची नजर गेली होती. मराठ्यांच्या तर्फे शिंदे-होळकर हे वजीरासह पठाणांवर चालून गेले. फरुखाबादेजवळचा बंगशाचा किल्ला फत्तेगडला वेढा घातला आणि होड्यांचा पूल बांधून पलीकडून बंगशास येणारी रसद बंद केली. बंगशाच्या मदतीसाठी येणारे सादुल्लाखान व बहादूरखान या दोन रोहिल्या सरदारांवर चढाई करून त्याचा पराभव केला. रोहिल्यांची ही वाताहत ऐकून अहंमदशहा बंगशाचे अवसान संपले. त्यांची सर्व फौज वाट फुटेल तिकडे जीव बचावून निघून गेली व मागे राहिलेली त्याची उभी छावणी व प्रचंड लूट वजिरास प्राप्त झाली. अशा रितीने दिल्लीची मोगल बादशाही बुडविण्याचा पठाणांचा हा जबरदस्त प्रयत्न मराठ्यांनी पूर्णपणे हाणून पाडला (मइसा ३, पत्र ३८३, पृ.३५४).

मराठ्यांनी दाखविलेल्या शौर्यामुळेच रोहिले व अफगाणांची राज्ये आकुंचन होत गेली व त्यांच्या प्रांताची सीमा गंगेच्या पलीकडे गेली होती. मराठ्यांच्या या मदतीमुळेच त्यांना आपल्या मागण्या पुढे करण्यास संधी प्राप्त झाली. मराठे फक्त पैशावरच संतुष्ट नव्हते. सफदरजंगाच्या ताब्यात असलेल्या प्रयाग व काशी ही तीर्थक्षेत्रे ताब्यात घेण्यास ते आतुर होते. दोनही सरदारांनी सफदरजंगाकडे वारंवार याची मागणी केली. सफदरजंगाने शेवटी अगदी मेटाकुटीला येऊन अखेरीस सनद मंजूर केली, तसेच मराठ्यांना या दोन स्थळांची फर्माने देण्यासाठी बादशहाचे मन वळविले (शिंइसा १, पत्र ९०, पृ.७६). वाराणसीत राहणाऱ्या बाळकृष्ण दीक्षितांच्या पत्रामधून या सनदेबाबत अधिक माहिती मिळते. १० मार्च १७५२ रोजी औरंगाबादला राहणाऱ्या आपल्या भावाला लिहिलेल्या पत्रात दीक्षित लिहितात की, ''काशीची सनद नबाब वजीराने दिली. एकशे चाळीस गाव व काशी आली. अंमलदार गोपाळपंत गोविंदभट बरवे गराडेकर राजश्री रघुनाथ बाजीराव यांचे मेव्हणे येताती'' (मइसा ३, पत्र ४७१, पृ.४३७). (टीप: राजवाडे यांनी हा प्रसंग इ.स. १७५६ मध्ये टाकला आहे. सरदेसाई यांनी इतर पत्रातील माहितीच्या आधारे या पत्राचा कालखंड १० मार्च १७५२ असा निश्चित केला आहे).

वजीर सफदरजंग व रोहिले पठाणांच्या या युद्धात पठाणांना मदत करण्यासाठी अब्दाली परत जानेवारी १७५२ मध्ये परत हिंदुस्थानात येण्यास निघाला. अब्दालीच्या भीतीने सफदरजंगाने मराठ्यांच्या म्हणजेच शिंदे-होळकरांच्या साह्याने पठाणांशी तह केला. अब्दाली चालून येतो हे पहाताच बादशहाने मराठ्यांना घेऊन दिल्लीला या असा निर्वाणीचा हुकूम सफदरजंगास पाठविला. वजीराने लगेच शिंदे-होळकरांशी संपर्क साधून परशत्रूंपासून बादशाहीचा बचाव करण्यासाठी पेशव्यांशी करार केला. या करारान्वये पठाण, राजपूत वगैरे देशांतील बंडखोर किंवा अब्दालीसारखे परदेशीय शत्रू यांजपासून पेशव्यांनी मोगल बादशाहीचा बचाव करावा असे ठरले. मुलतान, पंजाब, सिंध, रजपुताना व रोहिलखंड इतक्या

विस्तीर्ण प्रदेशावर चौथ बसविण्याचा हक्क मराठ्यांना ह्याच करारनाम्याच्या जोरावर प्राप्त झाला व ह्या हक्कांच्या संरक्षणार्थ पुढे अब्दालीशी, रोहिल्यांशी आणि रजपुतांशी त्यांना झुंजावे लागले (मइसा १, पत्र १, पृ.१). परंतु वजीर व मराठे दिल्लीत पोहचण्याआधीच अब्दालीशी बादशहाने करार करून पंजाब व सिंध प्रांत दिला. पुढील काळात दिल्लीत अनेक प्रसंग घडले.

लवकरच परिस्थिती पालटली. सफदजंगाने बादशहाविरूद्ध बंड पुकारले. थोरल्या गाजीउद्दीनला दक्षिणेत घेऊन गेलेल्या शिंदे-होळकरांविना दिल्लीतल्या बापूजी हिंगणे वकील व अंताजी माणकेश्वरांसारख्या दुय्यम सरदारांवर भली मोठी जबाबदारी पडली. बादशहा व वजीराच्या भांडणात कोणाचा पक्ष धरावा हा मराठ्यांपुढे पेच पडला. बादशहाने सफदरजंगाच्या विरूद्ध मराठ्यांकडे मदत मागितली व त्या बदल्यात वजीराचे दोन सुभे प्रयाग व अयोध्या आहेत ते बाळाजीरायास देतो माझ्या कामास तुम्ही येणे अशा अर्थाचे पत्र पेशव्यास पाठविले (मइसा ३, पत्र ४३३). शिंदे होळकरांनी वजीराशी केलेला करार विसरून अंताजी माणकेश्वर व बापूजी हिंगणे यांनी बादशहाच्या दोन सुभ्याचे अमिष स्विकारले व वजीराचा पाडाव केला. त्यावेळी बापूजी हिंगण्यांनी पातशहाच्या हातचे दोन सुभ्याचे शिक्के करविले. दिल्लीत जरी वजीराचा पाडाव झाला तरी प्रयाग व अयोध्या हे दोन सुभे त्याच्या ताब्यात होते. ते त्याजकडून काढणे शक्य नव्हते. बादशहाच्या मदतीसाठी बाळाजी बाजीराव यांनी रघुनाथरावाला उत्तरेस पाठविले (३० ऑगस्ट १७५३). परंतु रघुनाथराव दिल्लीस पोहचण्या अगोदरच वजीर दिल्ली सोडून लखनौस परत गेलेला होता.

रघुनाथरावाची हिंदुस्थानातील पहिली मोहिम ही ३० ऑगस्ट १७५३ ते १० ऑगस्ट १७५५ अशी दोन वर्षे चालली. या दराम्यानच्या काळात काशी संबंधी काही गोष्टी घडून आल्या. त्याचा सविस्तर वृत्तांत पुढीलप्रमाणे आहे.

अब्दाली परत गेल्यामुळे बादशहाला आता मराठ्यांच्या मदतीची गरज नव्हती. रघुनाथरावानेही उत्तरेत आल्यावर दिल्लीच्या राजकारणात लक्ष न घालता जाटाच्याप्रकरणात लक्ष घालून कुंभेरीचा रणसंग्राम घडवून आणला. २० जानेवारी १७५४ ते २२ मे १७५४ असा चार महिने हा रणसंग्राम झाला. अखेरीस १८ मे १७५४ रोजी जाटांचा पाडाव होऊन जाट व मराठ्यांमध्ये तह झाला. या जाटाच्या फत्तेचे म्हणजे कुंभेर घेतल्याचे १७ मे १७५४ रोजी रघुनाथरावाने सफदरजंगास पाठविले (मइसा १, पत्र ३५, पृ.७२). या पत्रासंबंधी राजवाडे म्हणतात की, ''हे पत्र अशाकरीता पाठविले की ही बातमी ऐकून सफदरजंगाने नरम यावे. सफदरजंगाचे व सूरजमल जाटाचे सख्य होते. या दोघांनी गाजीउद्दिनविरूद्ध लढाई चालविली होती. परंतु गाजीउद्दिनच्या बाजूला मराठे होते व त्यांनी जाटाचा पराभव केला होता. तेव्हा सफदरजंग अर्थातच

एकटा पडला. अशा समयी पत्राचा दपटशा गेला असता तो काशी बाबूराव महादेवाच्या हाती देईल या उमेदीने हे पत्र लिहले आहे.''

या बापूराव महादेव दातार यास जेव्हा रघुनाथरावाने काशीचा ताबा घेण्यास पाठविले तेव्हा सफदरजंग अळमटळम करू लागला. ७ मार्च १७५४ रोजी रघुनाथरावाने बाबूराव महादेव दातारला पाठविलेल्या पत्रात तसा उल्लेख तो करतो (मइसा १, पत्र २९, पृ.३८). याच रघुनाथरावाच्या पहिल्या उत्तरहिंद मोहिमेमध्ये काशी संबंधी आणखी एक गोष्ट घडून आली ती म्हणजे पेशव्याचे गुरू नारायण दीक्षितांचा मुलगा बाळकृष्ण दीक्षित यांची आलमगीर बादशहाशी दिल्लीत झालेली भेट होय. नारायण दीक्षितांच्या मृत्यूनंतर काशीत पेशव्यांतर्फे धार्मिक, सामाजिक व राजकीय व्यवहार हे बाळकृष्ण दीक्षित पहात असत. वजीर गाजीउद्दीन व मराठ्यांनी नव्याने बादशहापदावर बसविलेल्या आलमगीर (दुसरा) बादशहाबरोबर त्यांची भेट झाली. या भेटीचे अनेक वृत्तांत उपलब्ध आहेत. स्वत: बाळकृष्ण दीक्षितांनी आपले औरंगाबादला राहणारे थोरले बंधू वासुदेव दीक्षितांना २-११-१७५४ रोजी लिहिलेल्या पत्रातून या भेटीसंबंधी सविस्तर लिहिले आहे (कासंपया, ले.१३०, पृ.१२३). पत्रातील मजकूर पुढील प्रमाणे -

''काशीतून स्वार होऊन श्रीमंत राजश्री रघुनाथपंत दादांचे भेटीस गेलो. वडीलांचे आशीर्वादे सर्वांशी ओळख भेटी जाहल्या. चाळीस दिवस दिलीत होतो. श्रीमंतांनी बहुत स्नेह कृपा केली. काही मेळवावे म्हणून गेलो नाही. उगेच जावेसे चित्तांव आले. दिल्ली शहर पहावे निमित्य गेलो.............. रघुनाथपंत दादांनी आम्हास पालखी, मोत्याचा चौकडा व तीन हजार रूपयांचा गांव एक दिल्हा व पातशहाकडून पंधरा हजार रूपयाचे गांव काशी अलीकडे नेमून घेतले............. वडील म्हणतील की काशीजवळ घेतले गांव हे हस्तगत कसे होतील. तरी (काशीच्या) राजाने आधी मान्य केले तेव्हा हे कार्य केले.''

या दीक्षित कुटुंबाला पेशवे तसेच हैद्राबादचा निजाम हे दोघेही गुरू मानत असत. निजामाने यांना औरंगाबादेजवळील सातारे हे गांव जहागीर दिले होते. निजाम व पेशव्यांमधील अनेक राजकीय गोष्टी औरंगाबादमध्ये राहणारे नारायणभट दीक्षितांचे थोरले चिरंजीव वासुदेव दीक्षित यांच्या मार्फत होत असत. काशीला राहणारे यांचे धाकटे भाऊ जेव्हा दिल्लीस जाण्यास निघाले तेव्हा पेशव्यांनी निजामामार्फत त्यांचा योग्य तो मान ठेवण्यास बादशहाकडे विनंती केली होती. सदरील भेट दिल्लीस झाल्यानंतर निजामाने ३ ऑक्टोबर १७५४ रोजी पेशव्यांना पत्र लिहिले आहे (मइसा ३, पत्र ४४५, पृ.४०६). पत्रातील मजकूर पुढील प्रमाणे - ''जे वेळेस दीक्षित माा ची स्वारी देहेल्लीस पोहचली व येविाा हुजूरास सूचना जाली, हुजूरांनी मजला त्याचे घेऊन येणेकरिता आज्ञा दिल्हे वरून मी तेच वेळेस हुजूरांचे आज्ञेप्रमाणे मी सर्व

गोष्टींची व्यवस्था ठेवून त्यांना दिल्ली शहरांत घेऊन येऊन हुजूरास त्यांचे पेशवाईकरिता सूचना केल्यावरून त्यांणी दरवाज्यापावेतो येऊन उभयतांनी एकमेकांचे हात धरून सत्कार केला व हुजूरांनी दीक्षितांची स्तुती अशी केली की, जसे आपण राजा शाहू छत्रपतींचे गुरू आहांत, त्या प्रमाणे माझेही गुरू आहांत व मोठे महाराजांनी (नारायणभट दीक्षित) अवरंगजेब यांजला आशीर्वाद दिल्हा होता, त्याप्रमाणे राज्याची अभिवृद्धी जाली व आमचे मतात ज्याप्रमाणे आमचे पयगंबराची जशी प्रतिष्ठा आहे, त्याप्रमाणेच आमचे वडिलांनी आपला सत्कार ठेविला व आपण मोठे समर्थ आहांत व आह्मांवर येथे येऊन, कृपा करून दर्शन दिल्हे याचे स्तवन मी करण्यास समर्थ नाही व येणेकडून माझे मस्तक आकाशास पोहोचले. सारांश, याप्रमाणे भाषण होत राहिले व हुजूर यांणी दीक्षित यांचे आगमन, अति अपूर्व समजून, दीक्षित यांस पंधरा हजार रूपयाची जागीर नजराणा देऊन, बादशाही फर्मान सनदा करून दिल्ह्या व पोषाख व पालखी व खिलत जवाहीर ह्मणजे रत्न अलंकार व मोरचल वगैरे सत्कार बहुत केला व फार प्रकारे प्रार्थना केली.''

८ जून १७५५ रोजी आपल्या बंधूस लिहिलेल्या पत्रात बाळकृष्ण दीक्षित कळवितात की, ''पातशहा पानिपतावर जाऊन, ते फत्ते करून, परत दिल्लीस आले. रघुनाथराव कुंभेरीस जाटावर मोहितेवर असून त्यांच्यात तह होताना दिसत आहे. जाट वीस लाख रूपये देतो. परंतु मराठे अधिक मागत आहेत. अयोध्येचा वजीर सुज्याउद्दौला अयोध्येसच आहे. काशीचा राजा बळवंतसिंगाच्या मुलीचे लग्न ठरले आहे. काशीत महामारी आहे. यावर्षी इकडे जरीचा (कॉलऱ्याचा) फैलाव झाला आहे. माणसे मरत आहेत. महागाई वाढली आहे. तांदूळ चवदा शेर पासून अठरा शेर आहेत. गहू पांच सव्वापांच पासऱ्या, हरभरे सत्तावीस शेर, जव मणभर, तेल सा शेर, तूप साडेतीन शेर याप्रमाणे धारणा आहे'' (मइसा ३, पत्र ४५४, पृ.४२५).

ऑगस्ट १७५५ मध्ये रघुनाथराव उत्तर हिंदुस्थानच्या मोहिमेवरून परत आल्यानंतर त्यांना एक वर्षाने म्हणजेच नोव्हेंबर १७५६ ला परत उत्तर हिंदुस्थानात मोहिमेवर दुसऱ्यांदा जावे लागले. यावेळी निमित्त होते अब्दालीच्या तिसऱ्या स्वारीचे. यावेळी शिंदे होळकर हे मराठ्यांचे सरदार दक्षिणेत होते. त्यामुळे अब्दालीला मैदान मोकळे मिळाले. नोव्हेंबर १७५६ मध्ये काबूलहून निघून त्याने थेट दिल्ली, मथुरा आदी प्रदेशाची राखरांगोळी करून १ एप्रिल १७५७ रोजी तो परतही गेला. अब्दालीला शह देण्यासाठी पेशव्यांनी रघुनाथरावांना पाठविले. परंतु ते थेट अब्दालीवर न जाता मध्येच रेंगाळत राहिले. परिणामी अब्दालीची व त्यांची समोरासमोर भेटच झाली नाही. अब्दालीने उजाड केलेल्या या प्रांतातून काहीच धनलाभ होणार नाही हे जाणून नानासाहेब पेशव्यांनी काशी, प्रयाग, बंगाल वगैरे प्रांतावर पूर्वेकडे स्वारी करून मातब्बर पैसा मिळवावा असा सल्ला रघुनाथरावांस दिला होता. परंतु रघुनाथरावांनी या स्वारीत

पंजाबची मोहिम हाती घेऊन अटक पर्यंतच्या प्रदेशावर ताबा मिळविला. तेथील कारभाराची व्यवस्था करून ते परत १६ सप्टेंबर १७५८ च्या दरम्यान पुण्यास परत आले.

सन १७५७ च्या दरम्यान काशीवर अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला याने हल्ला केला. त्यामुळे काशीचा राजा बळवंतसिंग याने पेशव्यांचे सहाय्य मागितलेले दिसते. काशीमध्ये स्थायिक झालेले नारायणभट्टाचे चिरंजीव वासुदेव दीक्षित रघुनाथरावांना लिहिताना म्हणतात की, ''राजे बलवंतसिंगानी जसे काशीचे पालन पंधरा वर्षे केले आहे तसे अन्य कोणीही केलेले नाही. तुह्माला (म्हणजे मराठ्यांना) वजीराने काशीस्थळाच्या सनदा दिल्या. परंतु उलट वजीरच राजाला लिहितो की तुह्मी मराठ्यांना काशीचा अंमल देऊ नये. काशी न मिळण्यामागे राजाचा हात नाही. आता वजीराने प्रयाग येथील घरांवर चौक्या बसविल्या आहेत. लूट करीत आहे. काशीवर त्यांचा मोठा दात आहे. राजाने आजपर्यंत या स्थळाचे रक्षण केले. लोक भयभीत झाले आहेत. गंगेची प्रार्थना लोक करताहेत. तुम्ही येथे सैन्यानिश या म्हणजे राजाही आपल्या सैन्यासह तुह्मास सामील होतील. काशीचेही रक्षण करावे तसेच राजाचेही रक्षण करावे. म्हणजे आपली किर्ती सर्वत्र पसरेल. वजीराच्या त्रासामुळे येथील लोकांनी गंगेत जलसमाधी घेतली. राजाबद्दल बरे-वाईट गोष्टी तुम्हास सांगितल्या असतील त्यावर आपण विश्वास न ठेवणे. लवकरात लवकर काशीमध्ये या.'' (पेद २७, पत्र क्र.२०९, पृ.२०८). या पत्राचा काही निकाल लागला नाही. रघुनाथरावाने ७ मार्च १७५४ रोजी बाबूराव महादेवाला लिहिलेल्या पत्रात काशी क्षेत्रात अंमल बसवायचा आदेश दिला आहे. अंमल बसवू न शकल्यास परत आपल्याकडे येण्याचा निर्देश दिला आहे (मइसा १, पत्र २९, पृ.६८).

१७५५ मध्ये सुजाउद्दौलाने प्रयाग देऊन काही पैसे देण्याचे दादांपासी कबूल केले होते. पुढे प्रयाग न देता पैसा देण्यास त्याने दोन-तीन वर्षे लाविली. नंतर १७५८ त दादांशी काशी, अयोध्या द्यावयाचा करार केला व प्रयागासंबंधी चालवाचालव केली व तीनही शेवटी दिली नाहीत. ह्यास मुख्य कारण दादांचा नेभळा कारभार. पुढे हे काम विठ्ठल शिवदेव यांजवर सोपवून दादा देशी आले. परंतु विठ्ठल शिवदेवानेही मामलत बारा लाखांवर चुकविली (कासंपया, पत्र १६६,१६७, पृ.१५४,१५५).

पहिल्या बाजीरावांचा मुलगा जनार्दनपंताची पत्नी सगुणाबाई ही पतीनिधनानंतर काशीयात्रेला गेली होती. बाळाजी बाजीरावांनी या यात्रेच्या व्यवस्थापनासाठी तुबाजी अनंताची नेमणूक केली होती. यात्रा ब्रह्मावर्तास असताना या तुबाजी अनंताने बाळाजी बाजीरावांना दि. ३-३-१७५७ ला पत्र लिहिले आहे. पत्रातील मजकूर असा आहे, ''काशीचा राजा बलवंतसिंग यांनी चुनारगडचा किल्ला घेतल्याने अयोध्येच्या सुभेदाराने दहा-पंधरा हजार सैनिकांसह त्यांच्यावर चढाई करून तो काशी पर्यंतचा आला आहे. बलवंतसिंग

डोंगरी भागात पळून गेला आणि त्यांचे सरदारही काशी सोडून निघून गेले आहेत. त्यामुळे तेथे अंधाधुदी माजली असल्यामुळे ब्रह्मावर्तास अधिक राहणे झाले.'' (पेद ४०, पत्र ४०, पृ.३४).

शिंदे घराणे व काशी

पूर्वेकडील काशी व बंगाल हे प्रदेश घेण्याचा बाळाजी बाजीरावांचा उद्देश १७४२ पासूनच चालला होता. या त्याच्या प्रयत्नात शिंदे व होळकर यांचे सहाय्य त्यांना नेहमीच मिळत असे. शिंदे व होळकरांना मराठ्यांच्या राज्यविस्तारासाठी पेशव्यांतर्फे नेहमी उत्तर हिंदुस्थानात मोहिमेवर जावे लागे. ३ जुलै १७४५ ला राणोजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर जयाप्पा शिंदे यांना सरदारी मिळाली. २९ एप्रिल १७४७ च्या पत्रात जयप्पा म्हणतात की, ''आमचे वर्तमान तरी बंगाले प्रांत जावयाचे प्रयोजन नाहीसारखे झाले. त्या प्रांते फौज कोणाची न गेली म्हणून माघारे फिरोन बघेलखंडातून दर मजलीने उजेनीकडे येत असो'' (शिंइसा भाग १, पत्र ५९, पृ.५३). म्हणजेच पूर्वेकडे बंगालकडे जाण्याचा त्यांचा विचार होता. परंतु दुसऱ्या कोणाच्या मदतीअभावी त्यांना त्यावेळी परत फिरावे लागले असण्याची शक्यता आहे. सन १७५१ च्या सुमारास जेव्हा वजीर सफदरजंगाच्या रोहिले व पठाणांविरूद्धच्या मोहिमेत मराठ्यांनी त्याला केलेल्या मदतीच्या बदल्यात बादशहाकडून पर्यायाने सफदरजंगाकडून काशी देण्याचे फर्मान मिळाले असे बाळाजी यशवंत गुळगुळे याला दि. १८ जून १७५१ रोजी जयाजी शिंदे लिहितात (शिंइसा १, पत्र ९०, पृ.७७). जयाप्पा मे १७५३ मध्ये हिंदुस्थानात जाण्यास निघाला त्यावेळी बाळाजींनी जयाप्पाला काशीचे काम उरकून घ्यावयाची कामगिरी सांगितली होती. पुढे कुंभेरचा वेढा झाल्यानंतर काशीकडे जाणार तो त्याला नागोरची कामगिरी आली व काशीचे काम तसेच तहकूब ठेवावे लागले.

सन १७५२ मध्ये झालेल्या रोहिले पठाण विरूद्ध सफदरजंग यांच्यात झालेल्या युद्धात मराठ्यांनी केलेल्या मदतीच्या बदल्यात सफदरजंगाने काशी व त्याच्या आसपासची १४० गावांची सनद दिल्याचे पत्र बाळकृष्ण दीक्षितांनी १० मार्च १७५२ रोजी लिहिलेले आहे (मइसा ३, पत्र ४७१, पृ.४३७). त्यात या प्रांतात अंमल बसविण्याची कामगिरी रघुनाथरावाचा मेव्हणा गोपाळराव गोविंदभट बरवे यांना सांगितल्याचे लिहिले आहे. काशी तसेच अंतर्वेदी मध्ये अंमल बसविण्याचे काम गोपाळराव बरवे यांस सांगितल्याचे २६ मार्च १७५४ च्या पत्रात रामाजी अनंत दाभोळकरांनी बाबूराव महादेव दातार यांना लिहिले आहे (मइसा १, पत्र ३१, पृ.६९).

२० जानेवारी १७५४ ते २२ मे १७५४ असा कुंभेरीचा रणसंग्राम झाला, त्याच दरम्यान बाबूराव महादेव दातार यास जेव्हा काशी क्षेत्री अंमल बसविण्यास पाठविले तेव्हा सफदरजंग अळमटळम करू लागला. ७ मार्च १७५४ रोजी बाबूराव महादेव दातार व गोपाळराव बर्वे यांना रघुनाथरावांनी लिहिलेल्या

पत्रात ते म्हणतात की, ''सफदरजंग श्रीक्षेत्रीची अमलाची पेरवी होऊ देत नाही'' (मइसा १, पत्र २९, पृ.६८). १९ ऑगस्ट १७५४ मध्ये मेडत्याच्या मोहिमेवर असताना जयाप्पा बाबूराव महादेव दातारला म्हणतो की, ''श्रीक्षेत्र म्हणजेच काशी व अंतर्वेद येथील अंमल बसवायचा तर सरकारची जास्तीची फौज त्या प्रांते पाहिजे. आमची मेडत्याची स्वारी आटोपल्यावर आम्ही त्वरीत तुह्मांकडे अंतर्वेदीतून येतो. श्रीक्षेत्रातील अंमल खुला करणे ही गोष्ट मनात फार आहे'' (मइसा १, पत्र ३७,३९, पृ.७४,७५). ५ ऑक्टोबर १७५४ ला सफदरजंगाच्या मृत्यूची बातमीही बाबूराव महादेवाने जयाप्पाला कळविली होती (मइसा १, पत्र ४३, पृ.७८). पुढे लवकरच २५ जुलै १७५५ रोजी जयाप्पाचा नागोर येथे खून झाला. त्यामुळे काशीकडे मोहिम करण्याचे तहकूब राहिले. ते दोन तीन साले तसेच राहिले. जानेवारी १७५९ मध्ये दक्षिणेत असणाऱ्या शिंद्यांची म्हणजेच जनकोशी व दत्ताजी यांची रवानगी नानासाहेबांनी उत्तरेत केली. या मोहिमेत बाळाजी बाजीरावांनी त्यांना ज्या कामगिरी सांगितल्या होत्या त्या येणेप्रमाणे - १) लाहोरचा बंदोबस्त करणे २) सुजाउद्दौलाकडून काशी-प्रयाग घेणे व बंगालवर स्वारी करणे ३) सुजाउद्दौल्याला अगर गाजीउद्दीनला वजीरी देऊन करसे तरी पन्नास लाख काढणे (कासंपया, पत्र क्र.१६५, १६६, १६७, १७१, पृ.१५३-१६१).

बाळाजी बाजीरावांच्या सांगण्यावरून तसेच बादशहा व वजीराच्या परवानगीने दत्ताजीने पटणा, बंगालवरील मोहिम काढली. या त्याच्या कामातील दोन मुख्य अडथळे अयोध्येचा सुजाउद्दौला आणि नजीबखान रोहिला याचे होते. अंतर्वेदीत मराठ्यांचा अंमल बसणे व काशी व प्रयाग येथे त्याचा वावर असणे हे दोघाच्याही हिताचे नव्हते. त्यामुळे जनकोशी व दत्ताजी आपलाही प्रांत बेचिराघ करणार किंवा घेणार हे पाहताच दोघांनीही एकत्र येऊन दत्ताजीला विरोध केला. त्यांच्याबरोबर लढत असतानाच अब्दालीचा शह आला. नोव्हेंबर १७५९ ला अब्दालीने लाहोर घेऊन दिल्लीकडे कूच केले. १० जानेवारी १७६० ला अब्दालीने नजीबखानाच्या साह्याने बरारी घाटावर दत्ताजीचा पराभव करून त्याला ठार मारले. पुढे कधीही काशी मराठ्यांकडे येऊ शकली नाही.

यानंतर अब्दालीचा पाडाव करण्यासाठी म्हणून उद्गीर मोहिमेनंतर सदाशिवरावाची रवानगी उत्तर हिंदुस्थानात झाली. दत्ताजीच्या पाडावानंतर बरोबर एक वर्षाने १४ जानेवारी १७६१ ला मराठ्यांचा पानिपतावर जबरदस्त पराभव झाला. या पराभवाने खचून जाऊन बाळाजी बाजीरावही १७६१ ला मरण पावले. या पाठोपाठच्या घटनांमुळे उत्तर हिंदुस्थानच्या मराठी सत्तेवर मोठा आघात झाला.

इ.स.१७६१ ते १७८०: पानिपतोत्तर मराठे व काशी

पानिपत मोहिमेसंबंधी उत्तर भारतातून आलेल्या पत्रांतून तेथील राजकीय परिस्थितीची भरपूर कल्पना येते. विशेषत: काशीस्थित दीक्षित कुटुंबाद्वारे लिहिलेल्या पत्रांतून उत्तर भारतातील विशेषत: काशीतील राजकीय परिस्थिती आणि तेथील मराठी माणसांची स्थिती समजून येते.

सदाशिवरावभाऊ पानिपतच्या मोहिमेवर असतानाची बातमी देताना ८ डिसेंबर १७६० च्या पत्रात बाळकृष्ण दीक्षित लिहितात की, ''सांप्रत श्रीमंत राजेश्री भाऊ व तथा राजश्री विश्वासराव फौजेसहवर्तमान इंद्रप्रस्थावरी आहेत. अबदाली व रोहिले व सुज्यावतदौले ऐसे एकत्र यमुनेचे दक्षणतीरी आहेत. मातबर युद्ध जाहाले. झटापटी होत आहेत. होईल ते वर्तमान लेहून पाठवून देऊ'' (मइसा ३, पत्र क्र.५०८, पृ.४६३).

१४ जानेवारी १७६१ ला पानिपतचे युद्ध संपले होते. परंतु दळणवळणांच्या साधनां अभावी एका ठिकाणची बातमी दुसरीकडे पोहचण्यास काही वेळ लागत असे. पानिपतच्या युद्धाच्या अखेरच्या दिवसांच्या बातम्याही अशाच युद्ध संपून गेल्यानंतर लिहिलेल्या दिसतात. वास्तविक यावेळी युद्ध संपून मराठ्यांच्या विरूद्ध निर्णय झालेला होता

१८ जानेवारी १७६१ ला लिहिलेल्या पत्रात बाळकृष्ण दीक्षित लिहितात, ''पश्चिमेकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री भाऊ फौजेसहवर्तमान दिल्लीपलिकडे पाणिपतावरी आहेत. अबदालीशी व श्रीमंतांशी चहू कोशांचा अंतराय आहे. तीन युद्धे मातबर जाहाली. दोन्ही फौजा कायम आहेत. पठाणाकडील थोडे बहुत माणूस मारिले गेले. पठाण आपले स्थळ सोडून चार कोश मागे सरला. काहीशी शिकस्त पठाणाने खाल्ली आहे. अबदालीचा कमजोर आहे. पुढे होता होईल ते पहावे. मुलुखांत धामधूम बहुत आहे. काळ काही बरा नाही. ईश्वर लज्जा राखील ते खरी'' (मइसा ३, पत्र क्र.५०९, पृ.४६४).

२४ जानेवारी १७६१ ला काशीहून लिहिलेल्या पत्रात बाळकृष्ण दीक्षित मराठे व अब्दालीच्या फौजा पानिपतावर असल्याचे सांगतात. या दोन्ही सैन्यामुळे सभोवतालच्या मुलखाचा नाश झाल्याचेही ते लिहितात. हे लिहित असतानाच ते मराठ्यांच्या युद्धातील डावपेचाचीही हकीकत कळवितात. ते लिहितात - पानिपतच्या मोहिमेत असताना उत्तर हिंदुस्थानच्या अंतर्वेदी तसेच अयोध्येच्या नबाबाच्या प्रांतात जर धामधूम केली तर आपल्या प्रांताच्या संरक्षणासाठी सुजाउद्दौला अब्दालीशी फारकत घेऊन आपल्या प्रांताकडे निघून जाईल, त्यायोगे अब्दालीच्या सैन्याची ताकद कमी होईल या आशेने सदाशिवरावभाऊ गोपाळ गणेश बर्वे तसेच गोविंदपंत बुंदेले यांना नबाबाच्या प्रांतात धामधूम करण्यास सांगतात. परंतु ऐनवेळी नबाबाचे अयोध्येतील सैन्य येऊन या दोघांचाही पाडाव झाला. गोविंदपंत बुंदेले हे पानिपतच्या

स्वारीत मराठ्यांच्या सैन्यातील मातब्बर व्यक्तिमत्व होते. वरील लढाईत त्यांच्या मृत्यूचीही बातमी दीक्षित यांच पत्रात पुढे देताना लिहितात की, "गोविंदपंतही पळत होते तो गोळी लागोन घोड्यावरून पडिले. अविंधाचे हस्तगत जाहाले. त्यांनी नाश केला. मोठा माणूस होता. गेला." (मइसा ३, पत्र क्र.५११, पृ.४६५).

२७ जानेवारी १७६१ च्या पत्रात म्हणजेच युद्ध संपून १४ दिवस झाल्यानंतर लिहिलेल्या पत्रात दीक्षित पहिल्यांदा मराठे युद्धात हरल्याचा उल्लेख करताना लिहितात की, " श्रीमंत राजश्री भाऊ सरदार व फौजसहवर्तमान पाणिपतावरी होते. अबदालीची फौजही आसपास जवळ ती चौ कोशांचे अंतरे होती. त्यासी, पौष शुद्ध ८ स युद्ध उभयतांमध्ये भारी झाले. प्रात:काळपासून संध्याकाळपर्यंत युद्ध झाले. उभयपक्षी लोक बहुत पडिले. शेवट श्रीमंतांचा मोड झाला. तमाम सैन्य जे राहिले ते पळाले. बुणगे लूटले. ऐशी खबर लखनऊस आली. लखनऊस खुशाली झाली. लखनऊचे लिहिले येथील अधिकारी यासी आले की बरगी सर्व मारिले गेले, कांही पळाले. ऐसी खबर आदितवारी पंचमीस सहा घटिका रात्रीस कळली............ हरिभक्त शिकस्त खाऊन पळाले. परंतु कोणाची काय गत झाली? पळाले कोण? पडले कोणे? हे काही खबर नाही. मोड होऊन पळाले ही खबर सत्य आहे. बरगे पळाले हे सत्य" (मइसा ३, पत्र क्र.५१०, पृ.४६४).

पानिपतच्या युद्धात विश्वासराव व सदाशिवरावभाऊ हे जिवंत आहेत की मृत झाले हे नक्की न समजल्यामुळे पुढे कित्येक दिवस ते जिवंत असावेत अशा बातम्या होत्या. ९ एप्रिल १७६१ च्या पत्रात दीक्षित लिहितात की, "अबदालीचे व आपले फौजेचे युद्ध तुंबळ जहाले; आपले सरदारांस जिकडे फावले तिकडे गेले; इकडे नाना प्रकारे वर्तमाने येतात; तरी तथ्य वर्तमान ल्याहावे ह्मणोन लिहिले ते कळले. ऐशास युद् मोठे जहाले. विश्वासराव अभिमन्यूप्रमाणे रण भेदून कैलासवासी जहाले. चिरंजीव भाऊ व जनकोशी शिंदे अला जाटच्या मुलखांत आहेत. दहा पांच बातम्या आल्या. शोधास माणसे कारकून गेले" (मइसा ३, पत्र ५१७, पृ.४७०).

पानिपतावर मराठ्यांची हार झाली हे वर्तमान काशीत कळताच काशीच्या राजाने दीक्षितांना सावधगिरीचा सल्ला दिला. आपल्या कुटुंबासह ते काशीतून निघून गंगेपलीकडे काशीचा राजा जेथे राहतो त्या रामनगरच्या आश्रयास गेले. कालांतराने तेथून निघून ते दहा बारा कोसावरील गावात राहावयास गेले. परंतु तेथील ग्रामस्थांनी ही माणसे मराठी आहेत हे जाणून खूप त्रास दिल्याचेही ते लिहितात (मइसा ३, पत्र ५१०, ५१२, पृ.४६४, ४६७). काशीचा राजा बळवंतसिंग यांनी पानिपत युद्धानंतर दीक्षित परिवार व त्याच्या धार्मिक कृत्यांना संरक्षण पुरविले. २० एप्रिल १७६१ च्या पत्रात याबद्दल दीक्षित लिहितात की,

''आम्ही श्री सोडून बाहेर दोन मास आहो. परंतु स्वोत्कर्षाचे वर्तमान आता येऊ लागले तेणेकरून चित्त स्वस्थता झाली. विशेष. येथे राजाने ह्या दिवसांत बहुत परामृष केला तेणेकरून श्रीत बहुतांची अब्रू राहिली आणि आमच्या विषयी तो सर्वांस हेच सांगितले जे, माझी आणि बाळकृष्ण दीक्षितांची भिन्नता नाही, ज्यास मला उपद्रव करावयाचे सामर्थ्य असेल त्याणे यांस उपद्रव करावा. ऐसा अहंकार धरून उपद्रव होऊ दिला नाही. ब्राह्मणभोजन आदिकरून सर्वा गोष्टींचा आपण समाचार घेत असे. ऐशी विशेषेकरून प्रीती केली. सर्वास आपलेकडील मुत्सदि यांस सांगितले जे, मी कैलासवासी नारायण दीक्षित यांचा लेक, मला त्यांचे व्रत चालवणे जरूर, त्याचे माणसाशी कोणी मुजाहीम होई तरी नि:शंकविना आज्ञेवांचून तोंड फोडा. ऐशी नित्य ताकीद करी असे. आणि आमच्या शिवास आज्ञा केली जे, तुमचे दीक्षितांचे असतील व बैतल माल दीक्षितांसी सोडविला आहे, त्यांस कोणी धादा पाठविला तरी ज्याप्रमाणे दीक्षितांचे वेळी साहित्य लोकांचे होत असे त्याप्रमाणे करीत जाणे, तुझे ह्मटले कोणी न आयके तरी मला सांगणे, मी त्याचे पारपत्य करीन. ऐसे सांगितले; आणि त्याजप्रमाणे दोन महिने चालविले. कळावे. सर्वत्र वडिलांचे पुण्येकरून निर्वाह होतो. आता पुढेही वडिलांचेच पुण्येकरून चालेल. आता आम्ही दो चौ दिवसांत श्रीस जाऊ. चिंता न करणे. राजाचेच जाग्यांत आहो'' (मइसा ३, पत्र ५१९, पृ.४७२).

इंग्रजांचा भारतीय राजकारणात झालेला प्रवेश हा पानिपतोत्तर हिंदुस्थानच्या राजकारणात झालेला महत्वाचा बदल होय. सन १८५७ च्या प्लासीच्या लढाईमध्ये झालेल्या त्यांच्या विजयाने त्यांचा बंगालमध्ये पाय रोवला गेला. १७६१ च्या पानिपतच्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाला त्याच्या दुसऱ्याच दिवशी १५ जानेवारी १७६१ ला इंग्रजांनी शाहआलम बादशहाचा पटणा येथे झालेल्या युद्धात पराभव केला. पुढील थोड्याच अवधीत सुजाउद्दोला व मीर कासीम यांनाही आवर घातला. वरकरणी शाहआलम बादशहाचे स्वामीत्व स्वीकारून हाती आलेल्या बळाच्या आधारावर नबाब ठेवणे किंवा काढून टाकणे इंग्रजांनी सुरू केले. २३ ऑक्टोबर १७६४ रोजी काशीजवळील बक्सार येथे झालेल्या युद्धाचे वर्णन रघुनाथरावदादाला लिहितांना त्यांचा बातमीदार लिहितो की, ''लढाई मातबर झाली. तरवारी तरवार जाली. संध्याकाळ जाला. शुजाउद्दौल्याचे दोघे मोठे सरदार ठार झाले. सुवर्णभद्रात (शोणनदीत) बारा हजार माणूस बुडोन मेले. वस्तभाव गेली. राहिली फौज वाराणसीस आली. बुणगे व पातशहा मागून येत आहेत'' (पेद २९, पत्र ५०, पृ.४४,४५). बक्सारच्या यद्धाचा परिणाम म्हणजे अलाहाबाद (प्रयाग) पासून बंगाल समुद्रापर्यंतचा प्रदेश इंग्रजांचे कबजात गेला. मल्हारराव होळकरांचाही पाडाव झाला. या परिस्थितीचे वर्णन करताना मराठ्यांचा कलकत्ता येथील येथील वकील निलो गोपाल लिहितो की, ''प्रयागचे किल्यात चारसे गोरा आहे. या देसचे माणूस कमी आहे. जेथे नाजूक जागा आहे तेथे आपले जातीचेच माणूस ठेवतो. किल्यात सता दुसरियाची नाही. जेणे प्राो पातशाहास सांगावे तेणेप्राो करावे. सुज्यातदोल याचे चिरंजीव जाले आहेत. जे

इंग्रज सांगेल तेणेप्राो करावे. दुसरे या प्रांती कोणी नाही. पाच माहाल सुज्यातदौलेयास इंग्रजाने दिल्हे आहेत तितके खाऊन बसावे इतके त्याचे स्वाधीन आहे. कलकत्या पासून यमुनापावेतो अमेल इंग्रजाचा, मधे दुसरा कोणी नाही. पातशाहास चालीस लाख रुपये द्यावे ते कसकसे तरी बंगाल्याचे चोवीस, बाकी कुरा वगैरे प्रयाग मिलोन सोला याजप्राो द्यावे. बाकी काही नाही. सर्व आपण खातो. सुज्यातदोल व मल्हारबा वगैरे सर्व सरदार मिलोन कुऱ्यास आले. फौज लाख पावेतो होती. तेथे नज्यफअलीखान व फिरंगी गोरा पाचसे व या देसीच तीन हजार व तोफा होत्या पाच सात हजार फौज याजप्राो याचा सरंजाम कमी असता लाख फौज मोडिली. याजकरिता इंग्रजास मराठे म्हणजे काही नाही असे हावभरी जाला आहे. परंतु बाजतबरसाद देसीहून सरंजाम चांगला आणून दिलीस जावे हे आहे. बाजारआवई प्रयाग देणे घेणे हे कठीण आहे. इंग्रज येक पाऊल जागा साधावी हे करील परंतु देणे हे त्याच्या वस्तु कठीण दिसते.............. बंगाल सारा इंग्रजाचे स्वाधीन. सर्व हिकडे याचे, दुसरे काही मध्ये कोणी नाही. जे आहे ते ते याचे स्तापित आहेत.'' (पेद २९, पत्र ९०, पृ.८५).

उत्तरेतील ह्या स्थितीचे अवलोकन करून पेशव्यांनी १७६५ च्या अखेरीस रघुनाथरावांची रवानगी उत्तरेतील मोहिमेवर केली. पण जाटाच्या विरोधामुळे त्यांना दिल्लीपर्यंत पोहचताच आले नाही. जाटांशी कसाबसा तह करून ते परत फेब्रुवारी १७६७ ला परत फिरले. जाटाविरूद्धच्या युद्धासाठी त्याने इंग्रजांकडे मदत मागितली होती. मराठ्यांचे दोन वकील पूर्व हिंदुस्थानात होते. एक निलोपंत नावाचा वकील कलकत्त्याला इंग्रजांजवळ होता, तर दोन धोंडो खंडेराव नावाचा वकील काशीला होता. ्या दोन वकीलांकडून मराठ्यांना तिकडच्या बातम्या समजत असत. त्यांच्या त्यांच्या कुवतीप्रमाणे व समजुतीप्रमाणे ते परिस्थितीचे अवलोकन व आकलन करून बातमीपत्रे पुण्यास पाठवित असत. पानिपतोत्तर हिंदुस्थानातील राजकीय परिस्थिती सांगताना ते लिहून जातात की इंग्रजांशी आपला स्नेह आहे व त्या बदल्यात ते आपणांस काशी, प्रयाग व गया आपणांस लिहून देत आहेत. धोंडो खंडेराव लिहितो की, ''इंग्रज तूर्त मुख्य सरदार कलकत्यांत आहे. त्याचा नायेब तूर्त पातशाहापासी श्री प्रयागी कर्नाल बाकर म्हणोन मातबर सरदार आहे. आणखीहि लाहान मोठे सरदार बहुत प्रयागी आहेत. सर्व मिलोन पंधरा हजार गाडदी व गोरे मिलोन आहेत. पातशाहा त्याचे आज्ञेत आहे, पुढे जाऊ शकत नाहीत. अहमदखान पठान आपले स्थलावर आहे. नजीबखान रोहिला दिली प्रांती आहे. सुज्यातदौला आपले फौजेनिसी अयोध्ये लखनऊ प्रांती आहे. इंग्रजासी दबून आहे. इंग्रजापुढे सांप्रत काही नवाबाचे चालत नाही. इंग्रज सत्यवादी आहेत. जो सुज्यातदौलास मुलूक दिल्हा आहे तो घेऊन सुजातदौला उगाच आहे. राजे बलवंतसिंग करारा्रो सुज्यातदौल्यास रुो देतात, परंतु नवाबास बहुत भीत असतात. नवाबाचा राग बहुत बलवंतसिंगावर आहे. बलवंतसिंग इंग्रजाचे बलने आहे. इंग्रज सत्यवादी आहे. स्वामीसी बहुत स्नेह करावा म्हणौन इच्छितात. आपल्यासी स्नेह करून पातशास

पुढे घेऊन जाऊन दिलीस बसवावे हे इंग्रजाचे मनात बहुत आहे. याप्राो रा निलो गोपाल वकील यानी ठरविले होते, परंतु आपली स्वारी देशास गेली यास्तव तो विचार ते समई राहिला व आबदाली लाहोराहून माघारा काबलास गेला. सिखानी त्यासी बहुत हैरान केले. आबदाली क्षोपनिशेप विलायेतेस गेला यात संदेह किमपि नाही. श्रीमध्ये सावकारी बहुत लिहिली आली आहेत की, सिखानी त्यासी हैरान बहुत केले व त्यासीहि खबर गेली की, इंग्रज समागमे घेऊन श्रीमंत मजवर लडावयासी येतात हेहि ऐकोन व सिखानी हैरान केले व फौज न राही, सर्व पेचामुले ये प्रांती येत नाही. हे रान रिकामे आहे, यास्तव आपण सीघ्र कटी फौज व तोफखाना उत्तम घेऊन सत्वर येऊन फिरंगियासी श्नेह करून जाटाचे पारिपत्य उतम प्रकारे करावे. जाटाने बहुत लबाडी केली आहे. सर्वासी वैर केले आहे. नजीबखानासी व जाटासी पहिले पासून वैरच आहे. फिरंगीयासीहि सांप्रत वैर केले आहे. फिरंगी म्हणतात की, आम्ही पातशाहास घेऊन दिलीस जाऊ. जाट म्हणतो की, येकटे पातशाहास पाठवा. तुम्ही फौज घेऊन न येणे. जर तुम्ही याल तरी लढाई होईल. यास्तव फिरंगी पुढे जाऊ शकत नाहीत. इंग्रज हे म्हणतात की जे समई श्रीमंत येतील ते समई तुम्हास नेऊन दिलीस बसऊ. याप्राो सर्व इंग्रजाचे कारभारी बोलतात'' (पेद २९, पत्र १९२, पृ.२००-२०४).–

याच पत्रात काशी, प्रयाग व गये बद्दल सांगतांना ते लिहितात की, ''श्रीकासी व श्रीप्रयाग व श्रीगया सहजामध्ये आपल्यास येतील. जेसमई आपला व इंग्रजाचा श्नेह जाला तेसमई सहजामध्ये ज्याप्राो पूर्वी लाहोरचे साली हरिद्वार परगणा पातशाहापासून मागोन घेतला त्याप्राो पातशाहा आपल्यास त्रिस्थली देईल व इंग्रज आपल्यास त्रिस्थली देतील यांत किमपि संदेह नाही. मुख्य गोष्ट राजा बलवंतसिंग आपल्यासी बहुत येकनिष्ट आहे. हे वर्तमान सर्व वाो रा धनराज दीक्षित सांगतील व रा निलो गोपाल सांगतील. सुज्यातदौल्यास किमपि जोर राहिला नाही. नावमात्र नवाब आहे. जे फिरंगी सांगतील ते करील. त्यासी राजे बलवंतसिंगासी बहुत अकस बहुता दिवसापासून आहे व अंतरवेद तरी पातशाहास दिल्ही आहे. जे समई पातशाहास आपण इंग्र(ज) मिलोन नेऊन दिलीस बसवितील ते समई सहजच आपल्यास अंतरवेद येईल व किला इंग्रज आपल्यास देतील. याप्राो सर्व गोष्टी निलोपंतानी इंग्रजासी केल्या आहेत. त्रिस्थली कलमात लेहून दिल्ही आहे त्यावर इंग्रजानी करार केला आहे. जेसमई दिल्लीत आपण व इंग्रज जातील ते समई त्रिस्थली आपली जाली यात किमपि संदेह नाही. परंतु स्वामीनी कटी फौज व तोफखाना घेऊन सत्वर यावे. हुजरात उतम घेऊन यावे. हुजराती सिवाये कार्यहोत नाही यैसे सर्व म्हणतात व आपलेहि अनुभवास आले आहे. यास्तव जरूर हुजराती फौज घेऊन यावी व तोफखाना बहुत उतम घेऊन यावा. सारांश श्रीकासीतील मोठे थोर थोर तपश्वी हेच म्हणतात की, आपली फते व्हावी यास्तव श्रीकासीत धर्महि जरूर पाठवावा व अनुष्ठाने पाठवावी'' (पेद २९, पत्र १९२, पृ.२००-२०४).–

धोंडो खंडेरावाची उपर्युक्त कल्पना केवळ कागदावरची होती. आपल्या हातातून काशी सोडण्यास इंग्रज अजिबात तयार नव्हते.

– थोरले माधवराव पेशव्यांना उत्तर भारतीय राजकारणावर लक्ष देण्यास खूप कालपर्यंत वेळच मिळाला नाही. नंतरच्या काळात जेव्हा त्यांनी त्यामध्ये लक्ष घातले त्यावेळी त्यांनी आपल्या सरदारांना प्रयाग आणि वाराणसीवर ताबा मिळविण्याच्या आज्ञा दिलेल्या आहेत. श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांचे मरणसमयी झालेली नऊ कलमांची याद इतिहास संशोधक दत्तात्रय बळवंत पारसनीस यांनी प्रसिद्ध केलेली आहे. त्यातील एका कलम असे आहे की, ''श्रीकाशी, प्रयाग ही दोन्ही स्थळे सरकारांत यावी, असा तीर्थरूपांचा हेत होता. त्यास प्रस्तुत करावयाजोगे दिवस आहेत. दहावीस लक्षांची जहागीर मुबदला पडली तरी देऊन दोन्ही स्थळे हस्तगत करावी. प्रयत्न करावा.'' बाळाजी बाजीराव तसेच थोरले माधवराव दोघेही आपल्या मृत्यूपर्यंत कोणतीही किंमत देवून या दोन स्थानांवर मराठ्यांचा कबजा कसा होईल हे पाहत होते (ऐति.स्फु.ले ३: ९७).

१८ नोव्हेंबर १७७२ ला थोरले माधवराव पेशवे यांचा मृत्यू झाल्यानंतरच्या काळात बऱ्याच घडामोडी झाल्या. नारायणराव पेशव्यांचा खून होऊन रघुनाथरावदादा पेशवा झाला. पुढे बारभाईचे कारस्थान शिजून सवाई माधवराव यांस पेशवे पद प्राप्त झाले. रघुनाथरावांनी आपल्या बचावासाठी इंग्रजांकडे धाव घेतली. इंग्रजांच्या साह्याने पेशवेपद मिळविण्याचा त्याने आटोकाट प्रयत्न केला. १ मार्च १७७६ येथे इंग्रज व मराठे यांच्यामध्ये पुरंदरचा तह झाला. दादांस दरसाल तीन लक्ष पंधरा हजार नेमणूक देऊन त्यांनी दंगाधोपा किंवा फितूर न करिता गंगातीरास (गोदावरी काठी) रहावे असे रघुनाथरावांबद्दल एक कलम त्यांत होते. परंतु हा तह मुंबईच्या इंग्रजास तसेच दादांसही मान्य होणारा नव्हता. पुढील काळात इंग्रज व मराठे यांचे संबंध तणावाचेच राहिले, त्यामुळे दादांना पेशवाईवर येण्याचा मार्गच खुंटला व पुण्यात सवाई माधवरावाचे बस्ताव कारभाऱ्यांनी चांगलेच बसविले. शेवटी कंटाळून रघुनाथरावांच्या मनात काशीमध्ये जाऊन स्नानसंध्या करावे असे आले. यासंबंधीचा तपशील मराठ्यांचा कलकत्यांच्या इंग्रजांकडील वकील लाला सेवकराम नाना फडणविसास एका पत्राद्वारे कळवितो तो असा, ''आम्ही (हेस्टिंग्ज) श्रीमंत राजश्री दादासाहेबांस बहुत प्रकारे समजावून सांगितले की तुम्हांस गंगथडीस जाहागीर देतात, ती घेऊन स्नानसंध्या करावी. श्रीमत म्हणतात की, आम्हास एकंदर यांचे अंमलात राहणे नाही. आह्मास श्रीकाशीस घेऊन जाणे म्हणजे स्वस्थ स्नानसंध्या करीत जाऊ. त्यास जर जलमार्गे आणावे, तर त्यांचा ब्राह्मणधर्म राहणार नाही. खुषकीचे मार्गे आणखी एक दोन पलटणे सांगाते देऊन आणावे, तर सहजच कजिया उभा राहिला. मग तुमचे आमचे सोरहस्य राहणार नाही. यास्तव तुम्ही आम्हांस लिहून देणे की, तुम्ही श्रीमंत दादांस काशीस

आणता, त्यात आम्हांकडील कोणाही सरदाराचा रतीमात्र उपसर्ग जाल्यास खुद्द निसबत जाब करू म्हणजे आम्ही एकदोन पलटणे सांगाते देऊन गुजरातीचे वाटेने उज्जयनेवरून काशीस आणू. आम्ही उत्तर केले की, श्रीमंतांस तुम्ही काशीस आणावे हा करार तुमचे आमचे तहनाम्यांत नाही. त्यांनी गंगथडीस राहावे. करारनाम्याप्रमाणे वर्तणूक करू. तुम्ही नूतनच गोष्टी सांगितल्यास आम्ही काय लिहून द्यावे?'' (पदमव, लेखांक १, पृ.५८).

सदाशिवरावभाऊचा तोतया व काशी

सदाशिवरावभाऊ याचे एकंदर दोन तोतये इतिहासात होऊन गेले. पहिल्या तोतयाला कुलाबा येथे पकडून महादजी आणि रघुजी आंग्रे यांनी इ.स. १७७६ मध्ये हत्तीच्या पायी दिले. त्याशिवाय उत्तर हिंदुस्थानात काशी येथे इ.स. १७७९-८० मध्ये एक दुसरा तोतया प्रसिद्धीस आला. इ.स. १७७९ मध्ये एक इसम, आपण भाऊसाहेब आहोत, असे म्हणून इटावा येथे आला व तेथील सुप्रसिद्ध व्यापारी लाला बालगोविंद याजकडे जाऊन, भाऊसाहेबांची जुनी ओळख काढून, त्याच्या येथे राहिला. लाला बालगोविंद हा भाऊसाहेबांचा परिचित असल्यामुळे या तोतयाचे रूपसादृश्य पाहून, त्यासही तो भाऊसाहेब असावा, असे भासले. त्याचे वय, त्याची आकृती आणि त्याच्या शरीरावरील कित्येक खुणा यांचे भाऊसाहेबांच्या शरीराशी इतके साम्य जुळले की, लाला बालगोविंद अगदी फसला व त्याने हा खरोखर भाऊसाहेब आहे असे समजून, त्याने त्याचा फार आदरसत्कार केला. परंतु पुढे काही दिवसांनी त्यास असे दिसून आले की, याचा स्वभाव व वागण्याची तऱ्हा भाऊसाहेबासारखी नाही. तेव्हा त्यास संशय येऊन, त्याची त्याने विशेष विचारपूस केली. तेव्हा या लफंग्या गृहस्थाने त्याचे असे समाधान केले की, ''पानिपतची लढाई झाल्यानंतर मी जखमी होऊन कुमाउनच्या पहाडात पळून गेलो व तेथे फकिराचा वेष घेऊन पांच वर्षेपर्यंत योगसाधन केले. त्यामुळे माझ्या वागणुकीत व स्वभावांत अंतर पडले असेल. नंतर मी कुमाऊनच्या पहाडांतून रोहिलखंडांत आलो व बैराग्याच्या वेषाने फिरत फिरत येथे आलो आहे. आता मला प्रसिद्धपणे भाऊसाहेब असे व्यक्त करावयाचे आहे. तर तू मला सहाय्य कर.'' लाला बालगोविंद याने त्यास असे कळविले की, ''काशी येथे भाऊसाहेबांच्या परिचयाचे पुष्कळ मराठे ब्राह्मण आहेत. त्यांच्याकडे तुम्ही जा. म्हणजे तुमची ओळख पटेल.'' त्याप्रमाणे तो इटाव्याहून चित्रकूटास गेला आणि तेथून त्याने मोरोजीभट्ट रामचंद्र कोटकर आणि गणेशभट्ट इत्यादिकांस काशी येथे पत्रे लिहिली व त्यांना भेटावयास बोलाविले. अर्थात अशी पत्रे जाताच मोरोजीभट्ट व धोंडोभट्ट हे तत्काल चित्रकूटास आले आणि त्यांनी या तोतया भाऊसाहेबांची भेट घेतली. बाह्यचर्चेवरून त्यांना हा खरोखरच भाऊसाहेब आहे असे वाटले. परंतु या इसमाने पानिपतच्या लढाईस जाण्यापूर्वी मी तुमच्याजवळ लाखो रूपयांची ठेव ठेवली आहे; ती माझी मला परत द्या, असे मागणे

केले. त्यामुळे या भिक्षुकमंडळीस हा कोणी लबाड मनुष्य आहे असे वाटून त्यांनी त्याचे बिंग बाहेर फोडिले; व हा भाऊसाहेब नव्हे म्हणून लोकांमध्ये जाहीर केले. हे जेव्हां त्या तोतयास समजले, तेव्हा त्याने, ''मी काशी येथे येऊन तुमच्यावर हक्क सांगून माझी ठेव परत घेईन.'' असा धाक घातला. भिक्षुकांनी ती गोष्ट नाकबूल केली व ते काशीस परत गेले. तदनंतर हा तोतया भाऊसाहेब स्वत: काशी येथे गेला आणि तेथे त्यांने आपले मोठे प्रस्थ माजविले. या तोतयामध्ये भाऊसाहेबाच्या चेहऱ्याचे व शरीराचे इतके साम्य होते की, काशी येथेही पुष्कळ लोकांस तो खरा भाऊसाहेब आहे असे वाटले व त्यांनी त्याचा सन्मान करून, त्यास खर्चाकरितां द्रव्यही दिले. अशा प्रकारे काशी येथे त्याचे मोठे प्रस्थ वाढत जाऊन त्याने पुष्कळ लोकांस ठकविले व सावकार लोकांकडून पैसे घेऊन त्याने हजार पाचशे सैन्यही जमविले. तात्पर्य, थोड्या दिवसांत ह्या तोतया भाऊसाहेबांनी पालखी, घोडे वगैरे स्वारीचा थाट जमविला आणि गावामध्ये मोठी चळवळ उत्पन्न केली.

या वेळी ईस्ट इंडिया कंपनीतर्फे मि. टॉमस ग्रॅहम या नावाचे काशी येथे रेसिडेंट होते. त्यांच्या कानापर्यंत ही तोतयाची चळवळ जाऊन पोचली व त्यांनी हा खरा भाऊसाहेब आहे की नाही, याची चौकशी चालू केली. याचवेळी एक गृहस्थ, या तोतयातर्फे काशी राजा चेतसिंग याच्याशी गुप्त रीतीने कारस्थाने करून व पैसे जमवून काही कट करण्याचा प्रयत्न करीत होता. तेव्हा मि. ग्रॅहम यांस भीती उत्पन्न होऊन, त्यांनी चेतसिंग राजाची भेट घेतली व त्याच्या मदतीने या तोतयास पकडून कैद करविले. नंतर काही दिवसपर्यंत हा खोटा भाऊसाहेब काशी येथे बंदीवासात होता. पुढे ग्रॅहम यांनी कलकत्ता सरकारशी पत्रव्यवहार करून, त्यांच्या परवानगीने या तोतयाची रवानगी चुनारगडच्या किल्ल्यावर केली आणि त्याच्या खरेपणाबद्दल फार बारीक रीतीने चौकशी चालविली. परंतु त्याचा बरोबर निकाल लागला नाही. पुढे मि. ग्रॅहम यांची बदली मद्रास येथे सर अयरकूट यांच्या सेक्रेटरीच्या जागेवर झाली व ते तिकडे निघून गेले. पुढे हा इसम इ.स. १७८१ च्या ऑगस्टपर्यंत तसाच बंदीवासांत राहिला. नंतर हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज हे काशी येथे आले व तेथून चुनारगडास गेले. तेथे त्यांनी या इसमाची सर्व हकीगत ऐकून घेतली आणि त्यास सोडून दिले. पुढे तो काशी येथे परत आला आणि लौकरच मृत्यू पावला (जुन्या ऐति. गोष्टी ४: ६).

इ.स. १७८० ते १८००: नाना फडणवीस, महादजी शिंदे, वॉरन हेस्टिंग्ज, चेतसिंग व काशी

सतराव्या शतकातील ऐंशीचे दशक हे मराठ्यांच्या इतिहासात आत्यंतिक रोमहर्षक प्रसंगाने भरलेले दिसते. पेशव्यांच्या घरातील कर्तबगार पुरुषांचा झालेला अंत आणि त्याबरोबरच पेशव्यांच्या अखत्यारीतील दुय्यम

कारभाऱ्यांचा तसेच सरदारांचा उदय व त्यांचा मुख्य राजकारणात झालेला प्रवेश हे या दशकाचे मुख्य वैशिष्ट्य होय.

थोरले माधवराव पेशवे व नारायणराव पेशवे यांच्या आकस्मित निधनानंतर उद्‌भवलेल्या राजकीय परिस्थितीत उदयास आलेल्या बारभाईंच्या प्रयत्नाने उत्तर पेशवाईचा इतिहास रोमाचकारी झालेला दिसतो. यातीलच दोघे मुत्सद्दी म्हणजे नाना फडणवीस व महादजी शिंदे होत. प्लासीच्या लढाईनंतर भारतीय राजकारणावर पकड मिळवणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीच्या राजकीय उत्कर्षाचा हा काळ होय. अठराव्या शतकातील मराठ्यांच्या राजकीय वर्चस्वाच्या महत्वाकांक्षा आणि अमेरिकन स्वातंत्र युद्धात पराभूत झालेल्या इंग्रजांना आपल्या सत्ताविस्तारासाठी भारतीय उपखंडात निर्माण झालेल्या संधी यामुळे दोघांमधील संघर्ष अटळ होता. या संघर्षाला कारण ठरले ते रघुनाथरावदादा यांच्या राजकीय इच्छा व त्यासाठी त्यांनी घेतलेली इंग्रजांची मदत. १ मार्च १७७६ रोजी मराठे व कंपनी सरकारामध्ये झालेला पुरंदरचा तह व त्यानंतर झालेला १७ जानेवारी १७७९ मध्ये झालेला वडगांवचा तह यामुळे कंपनीच्या प्रतिष्ठेला आळा बसला होता. कालातरांने हे दोन्हीही तह गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्जने नाकारले. आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेसाठी त्याने पेशवे, भोसले, निजाम व हैदर यासर्वांवर लष्करी आक्रमणे सुरु केली. याला प्रतिशह दिला तो नाना फडणविसांनी. सन १७७९ मध्ये त्यांनी इंग्रजांविरुद्ध पेशवे, भोसले, निजाम व हैदर या चौघांनाही इंग्रजाविरुद्ध एकत्र आणून चौकडीचे राजकारण उभे केले. याला पूरक म्हणून त्यांनी काशीचा चेतसिंग, दिल्लीचा नजफखान, पोर्तुगीज, फ्रेंच, डच अशा सर्व लहान मोठ्यांना इंग्रजां विरूद्ध उठविले. इंग्रजांच्या नीतीधोरणाला पुरेपूर ओळखणारे नाना फडणवीस, इंग्रजांबद्दलचे आपले विचार काय आहेत तसेच त्यावेळची राजकीय परिस्थिती कशी आहे हे काशीचा राजा चेतसिंगला दि. ४-२-१७८१ रोजी लिहिलेल्या पत्रात लिहितात, ‘‘इंग्रज बेइमान, छिद्रान्वेषी. बंगाला वगैरे ज्या दौलतीत त्यांचा पाय शिरला तेथील अहवाल काय झाला व इमान देऊन स्नेह कसा राखतात हे महशूर आहे. दक्षिणेत सुद्धा याच प्रकारचे त्यांचे कपट वाढवीत चालले. खुषकीत टोपीकरांची चाल वाईट, सबब यांस पोख्त सजा करून काढून लावावे, हीच नेक सल्ला जाणून इंग्रजांचे तंबीचा नक्षा सरकारांत मुक्रर झाला. त्याप्रमाणे सरकारांतून लढाई सुरू आहे. भोसले बंगाल्याचे सरहद्दीवर जाऊन पोचले. हैदरखान यांणी चेनापट्टण, आर्काट वगैरे कुल ठिकाणे कबजात आणिली. निजामअलीखाँ बहादूर यांच्याही फौजा शिकाकोल राजमेंद्रीकडे जाणार. असा चौंकडून ताण बसला आहे. इंग्रज पांवप्यादे म्हणजे पायदळ शिपाई किती दिवस टिकणार! ईश्वरसत्तेने होईल ते दिसेल. सरकारांतून आणखीही मातबर फौज बंगाल्यांत कलकत्त्याचे सुमारे रवाना होत आहे. फौजेच्या सरंजामाचे तजविजेविशी आपल्यास पेशजी लिहिण्यात आले. त्याचा जबाब अद्याप आला नाही. सबब वाट पाहत आहो. इंग्रजांची चाल बादशहा आदिकरून सर्व दौलतदारांस वाईट दूरदृष्टीचे मार्गे समजोन

त्यांची तंबीची शक्कल अंमलांत आणावी. आपणाकडून उत्तर आले की बंगाल्याकडे पोख्त फौज आली ऐसे समजावे. कितेक जाबसाल बोलण्यास राघो मल्हार आपणाकडे पाठविले आहेत, ते सविस्तर बोलतील त्याप्रमाणे तर्तूद व्हावी. हा ऐन वख्त आहे. पुन: अशी संधि मुद्दाम आणून येणार नाही. पत्रांचे जाब जलद येऊन पोचावे" (कासंपया, पत्र ३०६, पृ.२७४; मराठी रियासत ६: २१७).

काशीचे राज्य हे अयोध्येच्या नबाबाच्या अखत्यारीत येत असे. जेव्हा कलकत्तेकर इंग्रजांचा अयोध्येच्या नबाबाशी संघर्ष सुरू झाला त्यावेळी काशीचा राजा बळवंतसिंगांनी वेळोवेळी इंग्रजांना मदत दिली. त्याबदल्यात त्यांना नबाबाविरूद्ध इंग्रजांचे राजकीय संरक्षण मिळत असे. कालांतरांने अयोध्येच्या नबाबाचा इंग्रजांकडून पराभव झाल्यानंतर काशीचे राज्य हे कलकत्तेकर इंग्रजांच्या अखत्यारीत आले. सन १७७८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने डच, फ्रेंच, मराठे व हैदर यांच्या विरूद्ध एकदमच युद्ध सुरू केले. सहाजिकच त्यांना आर्थिक बाबतीत तंगी जाणवू लागली. यावेळी काशीचा राजा चेतसिंग होता. चेतसिंगाकडे खूप रूपये आहेत ही बातमी हेस्टिंग्जला मिळाली. आपल्या उपकाराखाली दबलेल्या अनेक राजांकडून आर्थिक मदत घेण्याचा निर्णयही याच सुमाराम कंपनीने केला. त्यानुसार हेस्टिंग्जने तीन पलटनच्या सैनिकांचा वर्षाचा पाच लाख रूपये खर्च चेतसिंगाच्या माथी मारला. हा खर्च मी देऊ शकत नाही हे चेतसिंगाने वारंवार हेस्टिंग्जला कलकत्त्याला लिहून पाठविले. परंतु हेस्टिंग्जने रूपये देण्याचा आपला निर्णय कायम ठेवला. उलट त्याच्याकडे लढाईसाठी दोन हजार घोडेस्वार पाठवावेत अशी मागणी केली. चेतसिंगाला हे पाठविणेही जमले नाही.

चेतसिंगाचा हा व्यवहार पाहून हेस्टिंग्ज त्याच्यावर नाराज झाला. इंग्रजांविरूद्ध संघर्षाची जरूरी पडली तर आवश्यकता म्हणून त्याने आपल्या ताब्यातील किल्ल्यांमध्ये संपत्ती व लढाईचे सामान जमवायला सुरूवात केली. मराठ्यांशीही पत्रव्यवहार तो करू लागला. जर मराठे किंवा फ्रेंचांनी इंग्रजांविरूद्ध युद्ध सुरू झालेच तर त्यांना तो मदत करण्याची संधी शोधू लागला. मराठ्यांबरोबर चेतसिंगाची काही तरी कृती चालली होती याचा पुरावा नाना फडणवीसांना पुरुषोत्तम महादेवाने लिहिलेल्या सप्टेंबर १७८१ च्या पत्राद्वारा दिसून येतो. पत्रांत लिहिले आहे की जर महादजी शिंदेंनी कलकत्त्यावर हल्ला केला तर अयोध्येचा नबाब व चेतसिंग हे अर्धा खर्च करण्यास तयार आहेत. परंतु पुरुषोत्तम महादेवाचा सल्ला असा होता की असे रूपये आल्यानंतरच पुढचे पाऊल उचलावे. कलकत्त्याला जाणाऱ्या सैन्यात दिल्ली, रोहिले व आसफउद्दौलाचे सैन्य सामील होणार होते. गंगा पार करण्यासाठी चेतसिंग नावा तसेच त्यांच्या पुलांची व्यवस्था करणार होता (दिमरा, लेखांक ६२, पृ.६१).

इंग्रजांना रूपये न देणे तसेच इंग्रजांविरूद्ध इतरांशी हातमिळवणी करणे या गोष्टींमुळे वॉरन हेस्टिंग्ज चेतसिंगास अटकाव करण्याच्या उद्देशाने १५ ऑगस्ट १७८१ ला काशीला आला. काशीला आल्यानंतर हेस्टिंग्ज व चेतसिंग यांच्यात अनेकदा बोलणी होऊन चेतसिंगला अनेकदा अपमानित व्हावे लागले. शेवटी तर शिवाला घाटावरील किल्ल्यांत अटकही झाली. परंतु यावेळी काशीतील जनतेनेच उठाव केल्यामुळे चेतसिंगाची सुटका झाली व तो रामनगर व त्यानंतर लतीफपूरच्या किल्ल्यांच्या आश्रयाला गेला. २१ ऑगस्ट १७८१ ला चेतसिंगच्या फौजेची व वॉरन हेस्टिंग्जच्या फौजेची चकमकही उडाली. यावेळी वॉरन हेस्टिंग्ज खरे तर मारला जायचा. परंतु नागपूरकर भोसल्यांचे वकील बेनिरामपंत व विश्वंभरपंत यांच्या मदतीने आपली सुटका करून घेतली.

या प्रसंगांचे लाला सेवकरामने लिहिलेल्या मराठी कागदपत्रातून बहारदार वर्णन मिळते. हा लाला सेवकराम हा नाना फडणवीसांनी पाठविलेला पुणे दरबाराचा कलकत्तेकर इंग्रजाकडील वकील होता. ६ जानेवारी १७८२ लिहिलेले पत्र फार महत्त्वाचे आहे. वॉरन हेस्टिंग्ज कलकत्याहून बनारस येथे १३ ऑगस्ट इ.स. १७८१ रोजी आला. त्यावेळी चेतसिंग व हेस्टिंग्ज यांच्यात लढाई झाली व चेतसिंग चुनारगडास पळून गेला. चेतसिंगाने नंतर आपले वकील पुण्यास, महादजी शिंदे व अहिल्याबाईंकडे मदतीसाठी रवाना केल्याची बातमी लाला सेवकराम पत्रातून देतो. या लढाईत नागपूरकर भोसल्याचे वकील बेनीरामपंत व विश्वंभरपंत हे हेस्टिंग्ज बरोबर होते व त्यांनी त्याला मदतही केली. लाला सेवकराम या पत्रात पुढे लिहितो की चेतसिंग राजा पळून जाऊन महादजी शिंदे यांच्याकडे गेला. महादजी शिंदे यांनी आपला दिवाण पुढे पाठवून चेतसिंगाचा सन्मान केला व त्याला हत्ती, घोडे व पोषाख दिला. ही गोष्ट वॉरन हेस्टिंग्ज याला समजताच त्यांने इंद्रसेन साहेबास महादजी शिंदेंकडे पाठविले (पदमव, लेखांक ५, पृ.७०-७१). वरील पत्रालाच एक पुरवणी पत्र जोडून लाला सेवकराम वॉरन हेस्टिंग्ज बाबत अधिक माहिती देतो. काशीतून चेतसिंग पळून गेल्यानंतर काशीच्या प्रदेशात चाललेल्या अंधाधुंदीमुळे वॉरन हेस्टिंग्ज आणि त्याची बायको हे दोघेही सुरक्षिततेसाठी नेहमी रात्रंदिवस श्रीगंगेचे मध्यभागी नावेत राहतात. दर दोन तीन दिवसांनी कामानिमित्ताने शहरात येऊन दरबार भरवितात. याच पत्रात लाला सेवकराम पुढे लिहितो की चेतसिंगास हाकलून दुसऱ्या राजास म्हणजेच बळवंतसिंगाचा जावई दुर्विजयसिंहाचा मुलगा महिपनारायण सिंह यास काशीच्या राज्यावर बसविले आहे (पदमव, लेखांक ६, पृ.७२).

इंग्रजांच्या त्रासाला कंटाळून चेतसिंग महादजी शिंदेंकडे आला. शिंद्यांची मदत घेऊन इंग्रजांशी लढा द्यावा असा त्याचा विचार दिसतो. त्याच्या कडील पैशांवर नजर न ठेवता इंग्रजांचे पारिपत्य करून राज्य राखण्यावर नजर ठेवावी असा सल्ला नाना फडणवीसांनी दि. २७-११-१७८१ च्या पत्रात महादजी शिंदे

यांना दिला आहे. नाना फडणवीस लिहितात की, ''चेतसिंग राजा पांच हजार फौज व पन्नास हत्ती खजिना घेऊन बिजेगडास कुटुंब ठेवून रेवामुकुंदपुरास आला, तेथून मुजरत पत्रे राजश्री पाटीलबावांस पाठविली. राजाचे मत फिरोन जमाव करून, इंग्रजावर जावे. पाटीलबावांकडे वकील रवाना केला, तो आल्यावर काही पैक्याची तोड पडल्यास त्या प्रांती जावे असा विचार दिसतो म्हणोन विस्तरे लिहिले, त्यास अमानी इंग्रजास मिळाला व फितुर चेतसिंगाचे फौजेत जाल्यामुळे राजा हलका जहाला, या मुळे निघाला, परंतु हिंमत आहे, अशा समयी त्याची कुमक करून इंग्रजांचे पारपत्य करावे. केवळ पैक्यावरच दृष्टी ठेवू नये. मसलतीवर नजर ठेवून करावे. समय आहे '' (कासंपया, पत्र ३३२, पृ.२९३).

चेतसिंग काशीतून परागंदा झाल्यानंतर काशीच्या राज्याचा त्याचा कोणताही संबंध परत आला नाही. वर लिहिल्याप्रमाणे चेतसिंगाने महादजी शिंद्यांच्या मार्फत काशीवर परत अधिकार मिळविण्याचा प्रयत्न केला, परंतु तो सफल झाला नाही. चेतसिंगाचा मृत्यू इ.स. १८१० मध्ये झाला. महादजी शिंद्यांनी चेतसिंगाला आपल्या राज्यामध्ये जहागिरी दिली. चेतसिंग प्रकरणानंतर (इ.स. १७८१) नाना फडणवीसांच्या काशी घेण्याच्या प्रयत्नाला खीळ बसली. काशी आता आपल्या ताब्यात येणे शक्य नाही अशी धारणा नाना फडणवीसांची झाली असावी. मुसलमानांना आर्थिक भरपाई देऊन ज्ञानवापी मशिदीच्या ठिकाणी विश्वनाथांचे मंदिर पुन्हा बांधले जावे यासाठी नाना आपल्या वकिलांमार्फत प्रयत्नशील होते. पण त्यात त्यांना यश आले नाही. काशीविश्वनाथाच्या पुन:स्थापनेसाठी त्यांनी खूपच प्रयत्न केले (अधिक माहितीसाठी पहा - प्रकरण चवथे).

नाना फडणवीसांनी जसा इंग्रजांविरूद्ध चौकडीचा तह केला होता तसाच इंग्रजांनी पुढाकार घेऊन पेशवा, निजाम व इंग्रज या त्रिवर्गाने टिपू सुलतान विरूद्ध १ जून १८९० ला तह केला. त्यातील मुख्य आशय असा होता की तिघांनी टिपूच्या राज्यावर मोहीम करून जो मुलूख सुटेल तो सारखा वाटून घ्यावा. नाना फडणवीसांचा कलकत्तेकर इंग्रजांकडील वकील लाला सेवकरामच्या १० जुलै १७९० च्या पत्रातही या तहाचा उल्लेख आहे. लाला सेवकराम लिहितो की बडे साहेब (कॉर्नवॉलीस) २ महिनेपासून असे सांगत आहे की नव्या करारनाम्याप्रमाणे पेशवे टिपूवरील मोहिमेसाठी परशुरामभाऊ पटवर्धनाच्या नेतृत्वाखाली पन्नास हजार फौज मदतीसाठी पाठविणार आहेत. त्यावर दरबारातील लोक व सावकार असे म्हणतात की त्या बदल्यात पेशवे इंग्रजाकडून चाळीस पन्नास लक्ष रूपये घेतील. परंतु कंपनीकडे तर पैसे नाहीत. त्यामुळे इंग्रजांकडे असलेली काशी घेऊन ते मदत करतील (इतिहास संग्रह, पुस्तक १, अंक ११, जून १९०९, पृ.१०१). या तहाबाबत गो.स. सरदेसाई लिहितात की, ''तह ठरत असताना नाना फडणवीसांनी इंग्रजांकडून काशी क्षेत्रांबाबत इंग्रजांकडे एक मागणी केली. काशी क्षेत्र इंग्रजांच्या ताब्यांत असून तेथील विश्वेश्वराचे मंदिर औरंगजेबाने पाडून तेथे मशीद बांधली होती, ती मशीद पाडून पुन: तेथे मंदिर पूर्ववत् करण्यास इंग्रजांनी

मान्यता द्यावी अशी नानाने मागणी केली. मॅलेटने हे म्हणणे युक्तिने रहित करविले (मराठी रियासत ७: २९१).

वास्तविक सन १७७७ अहिल्याबाई होळकर यांनी याच मशिदीच्या शेजारील जागेत काशी विश्वेश्वराचे मंदिर बांधविले होते. त्यामुळे सन १७९० मध्ये नाना फडणवीसाने हे मंदिर बांधण्याचा फिरून प्रयत्न का करावा हा प्रश्न उरतोच. त्याला औरंगजेबाने मंदिर पाडून ज्या जागी मशीद बांधली त्याच जागी मंदिर असावे असा त्याचा मानस असावा का? वरील पत्रान्वये असे दिसून येते की औरंगजेबाने ज्या जागी मंदिर पाडून मशीद उभारली त्याच जागी श्रीकाशीविश्वेश्वराचे मंदिर असावे अशी नानांची आणि इतर मराठी लोकांची इच्छा होती असे दिसते. परंतु प्रत्यक्षात असे होऊ शकले नाही. कालातरांने सन १७७७ मध्ये अहिल्याबाईंनी बांधलेल्या श्रीविश्वेश्वराच्या मंदिरावरच लोकांची श्रद्धा बसली. आजही औरंगजेबाने मंदिर पाडून बांधलेली मशीद ज्ञानवापी मशीद म्हणून प्रसिद्ध असून त्याच्या शेजारील जागेत अहिल्याबाईंनी बांधलेले श्रीकाशीविश्वेश्वराचे देऊळ उभे आहे.

सन १७९० मध्ये टिपू विरूद्ध चालू झालेल्या युद्धासंबंधीच्या बातम्याची माहिती देताना काशीमध्ये डंकन साहेबाने लोकांकडून या युद्धाच्या खर्चाकरिता करसे पैसे गोळा केले हे लाला सेवकरामने नाना फडणवीसांना लिहिलेल्या पत्रात सांगितले आहे, ''टिपूनाईकाची आंग्रेज लोक दहशत बहुत मानतात. पैसा यांजवळ नाही. यास्तव बंगालेचे मुलुखात जुलूम बहुत मांडिला आहे. नबाब मुबारकदौला व मुजफरजंग व मनीबेगम व आणिक जमीदार लोकांनी गंज व बाजार व हाट वस्ती करून त्याचा नफा पहिलेपासून खात होते, ते सारे बंद करून एक करोड रुपये नफा नवा पैदा केला व आंग्रेज लोक सारे मुलुकात तहसील करितात. अगर काही बाकी राहिली तर जमिदारची जमिदारी विक्री करून रुपये घेतात. डंकिन साहेबाने श्रीकाशीजीमध्ये ब्रह्मोत्तर व रोजआलतमगा व खैरात वगैरे बंद करून पंचवीस लक्ष रुपयेची जमा बडेसाहेबांस लिहून पाठविले. बडेसाहेबाने हे गोष्टीची कौसल करून जाब लिहिले की, पाच लक्ष रूपयेची दामाशाही करून त्या लोकांसी देणे व बाकी वीस लक्ष रुपये सरकारात पाठवावे व कलकत्त्याचे मातबर बंगालीयांपासून एक करोड रुपये मागतात. शहरची घरगणती करतात. पुढे काय करतील ते सेवेसी निवेदन करू '' (इतिहास संग्रह, पुस्तक १, अंक ११, जून १९०९, पृ.१०३).

टिपू विरूद्ध इंग्रज व मराठे यांचा करार झाल्याचे समजताच काशीचा बडतर्फ राजा चेतसिंग लाला सेवकराम मार्फत पुणे दरबारशी संपर्क साधून इंग्रजांकडून परत काशीचे राज्य मिळवून द्यावे अशी विनंती करतो हे सांगताना लाला सेवकराम नाना फडणीसास लिहितो की, ''राजश्री सदाशिपंत, राजा चेतसिंगाचे वकील, राज्यभ्रष्ट जाल्यापासून कलकत्त्यास आहे. सारे कौसली लोक व सारे आंग्रेज मातबर यांची बहुत खुशामद केली व करितो व तीस चाळीस हजार रुपयेही खर्च केले; परंतु काही ठिकाण लागत नाही. हल्ली

आंग्रेज लोकांनी बहुत आर्जव करून सरकारचा नवा करारनामा करविला व मदत मागितली. ही खबर राजा चेतसिंग श्रीकाशीवालेस कळताच, आपले वकिलास लिहिले की, आम्हांकाडून लाला सेवकरामची मार्फत श्रीमंत पेशवासाहेब व नानासाहेबांचे सेवेची बहुत कर जोडून विनंती लिहावी की, आमचे राज्य गेले; श्रीमंतांचे कृपेकरून प्राप्त होईल. श्रीमंतसाहेबांशिवाय दुसरा आसरा नाही व हे वक्त आंग्रेज लोक सरकारचे बहुत काबूमध्ये आहेत. सेवकाने राजेमजकूरचे लिहिणेप्रमाणे सेवेसी अर्ज लिहिली. जर धनीची मर्जी या कामावर असली, तर आज्ञा जाल्यास वकील मजकुरासी बोलून यांचा बंदोबस्त होईल'' (इतिहास संग्रह, पुस्तक १, अंक ११, जून १९०९, पृ.१०६).

सन १७९२ नंतर महादजी शिंदे दक्षिणेत म्हणजेच पुण्यास आले. बाल पेशवा सवाई माधवराव यांस नाना फडणवीसांच्या प्रभावातून मुक्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कालातरांने सवाई माधवराव पेशवे उघड उघड महादजींच्या तंत्राने वागू लागले. त्यामुळे नाना वगैरे कारभाऱ्यांची मने अत्यंत अस्वस्थ झाली. त्यांनी काशीयात्रेस निघून जाण्याचा घाट घातला. परंतु महादजींनीच नानांची समजून घालून त्यांस राहवून घेतले. नानांचा काशीयात्रेस जाण्याचा कांगावा आहे असे मॅलेट वृत्तांत कळवितो. यामध्ये नानांची महादर्जीबरोबर संघर्ष टाळण्याची इच्छा आहे अशी मॅलेट यांस खात्री वाटते. ४ नोव्हेंबर १७९२ रोजी नानांनी महादर्जीस तोंडी निरोप दिला की, ''मला सेवेतून मुक्त करण्याचा आपण श्रीमंतांना सल्ला दिल्याचे समजते. माझ्या आर्थिक व्यवहाराविषयी शंका घेण्यात येते. तेव्हा मी माझी कमाई येथेच ठेवून निघून जातो. त्यामधून सर्व हिशेब चुकता करावा'' (मराठी रियासत ७: ३६८). नानांच्या दप्तरात एक त्यांच्या हातचे टिपण सापडले आहे. त्यामध्ये पुढील मजकूर आढळतो. ''बहुत दिवस मनांतून हेतू होता की काशीयात्रा घडावी. परंतु तसा समय दृष्टिस पडेना. ईश्वरी कृपेकडून दक्षिण हिंदुस्थानचा बंदोबस्त व सर्वांसी तह सरकारचे (होऊन) व राजश्री पाटीलबाबांचे येणे याच समयी होते व राजश्री भाऊचेही येणे. सर्व आपली मंडळी, एक तुम्हाखेरीज एके ठिकाणी श्रीमंतांजवळ होणे आणि यांच्या संमताने श्रीमंतांचा संतोषेकरून निरोप होणे. यास प्रथम अनुकूलता व हे मला घडणे व मागे संभाळावयास राजश्री हरिपंत तात्या, यांची अंत:करणपूर्वक (खात्री) करून घेऊन जावयाचा विचार केला आहे. तुम्हास कळावे म्हणोन लिहिले आहे.'' हे पत्र कोणास लिहिले आहे ते समजत नाही. ह्या हेतूप्रमाणे नानांचे काशीयात्रेस जाणे अखेर घडले नाही. तथापि, त्यांनी श्रीकाशीक्षेत्राचे नित्यश: दर्शन घडावे म्हणून एक काशीक्षेत्रांतील सर्व देवालयांचा रेशमी नकाशा तयार करून आणिला होता. त्याचे ते नित्य दर्शन घेत असत (ऐति. टिपणे : ७२).

शरणार्थी मराठे राज्यकर्ते आणि काशी

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात ईस्ट इंडिया कंपनीच्या मजबूत, सुरक्षित आणि वाढत्या सत्तेच्या प्रभावाखाली असलेल्या प्रदेशात वाराणसी म्हणजेच बनारस सारख्या शहरात राजकीय शांतता, स्थिरता निर्माण झाली. पूर्व भारतातून भारताच्या इतर भागात जाणारे व्यापारी मार्ग बनारसवरूनच जात असल्यामुळे व्यापार वाढला, आर्थिक सुबत्ता वाढू लागली. धार्मिक दृष्ट्या महत्वाच्या असलेल्या या शहराकडे भारतातील इतर भागातून हजारो लोक आकृष्ट होऊ लागले. इंग्रजांच्या कृपाक्षेत्राखाली राजकीय सुरक्षा मिळाल्याने राजकीय घराण्यातील अनेक लोकांना कामधंदाच उरला नाही. सहाजिकच राजकीय आणि धार्मिक महत्त्व असलेल्या या शहराची निवड इंग्रजांचे राजकीय शरणार्थी म्हणून अनेक राज्यकर्त्यांनी केली. काही वेळा इंग्रजांनी राजपदावरून पदच्युत केल्यामुळे अनेक राजकर्त्यांना बनारसमध्ये ठेवले गेले. मुघल बादशहा शाहआलम दुसरा यांचा मुलगा राजपुत्र जहाँदर शाह, अयोध्येचा नवाबपदावरून हटविण्यात आलेला वजीर अली, अमृतराव पेशवे, चिमाजीआप्पा पेशवे, बायजाबाई शिंदे, सातारचे राजे छत्रपती प्रतापसिंह याबरोबरच अनेक राज्यकर्त्यांना बनारस शहरात राजकीय आश्रय मिळाला.

अमृतराव पेशवे

आयुष्याच्या अखेरीस काशीयात्रा करणे आणि जमलेच तर तेथेच स्थायिक होण्याकडे मराठी लोकांचा कल होता. याला अपवाद मराठी राज्यकर्ते सुद्धा नव्हते. मराठी राज्यात कर्तृत्व दाखविण्याच्या संधी कमी झालेल्या दिसताच अनेक राज्यकर्त्यांना काशीची आठवण झालेली दिसून येते. रघुनाथराव पेशवे हे त्यापैकीच एक होते. सवाई माधवराव पेशव्यांच्या राज्यरोहणामुळे दिशाहीन बनलेल्या रघुनाथरावांनी सत्तास्पर्धेतून बाहेर पडण्याच्या इच्छेने इंग्रजांकडे काशीस स्थायिक होण्याची इच्छा व्यक्त केली होती. पेशवे आणि इंग्रज यांच्यातील राजकारणामुळे त्यांना काशीस जाणे जमले नाही आणि त्यांचा मृत्यू शेवटी कोपरगावास झाला. याच सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत महादजी शिंदे आणि नाना फडणवीस यांच्यातील सत्तास्पर्धेची परिणिती नाना फडणविसांच्या काशीवासाच्या इच्छेत झालेली दिसते (पहा-काशी आणि नाना फडणवीस). रघुनाथराव पेशव्यांचा दत्तक मुलगा अमृतराव पेशव्यांच्या नशीबी मात्र काशीवास लिहिलेला दिसतो. पेशवेपदांच्या साठमारीत दुसऱ्या बाजीरावांची सरशी झाल्यामुळे अमृतरावांनी इंग्रजांचा आश्रय घेतला. शेवटी मराठा राजकारणाला कंटाळून इंग्रजांकडून वार्षिक सात लाख रूपयांची पेन्शन घेऊन काशीस स्थायिक होण्याचा निर्णय घेतला.

काशीस जातानाची त्यांची पत्रे उपलब्ध आहेत. काशीला जाण्याकरता इंग्रजांकडून मार्गाची दस्तके मिळवून अमृतराव ऑगष्ट २००४ नंतर भिंगार, खर्डे या मार्गाने पुढे नागपूर प्रांतात गेले. तेथून श्रीकाशीस

जाताना वाटेने गोंडवनातून मार्ग चालत असताना मार्च १८०५ मध्ये अमृतरावांची सर्व काशीयात्रा पेंढाऱ्यांनी लुटली. स्वत: अमृतराव कसाबसा जीव बचावून नागपूरास परत आले. तेथे नागपूरकर भोसल्यांनी त्यांचा उत्तम प्रकारे परामर्श घेतला. नागपूरकर भोसल्यांनी त्यांना मदत म्हणून पंचवीस हजार रूपये दिले. पुढे सन १८०५ च्या अखेरीस ते श्रीकाशीस जाऊन पोहचले. अमृतरावांनी पुढे जन्मभर क्षेत्रवास केला. इ.स. १८२४ साली ते श्रीकाशी क्षेत्रांत मृत्यू पावले (ऐलेसं १५ १९४८: ८०५६).

अमृतराव पेशव्यांबरोबर एकंदर चार हजार लोकांचा गोतावळा होता. त्यामध्ये पायदळ तसेच घोडदळाचाही समावेश होता. काशीतील कुरूक्षेत्र तलावाशेजारी त्यांना राहण्यास जागा देण्यात आली. या कुरूक्षेत्र तलावात गंगेतून पाणी येण्यासाठी मार्ग होता. पावसाळ्याच्या दिवसात गंगा नदीतील पाण्यामुळे तलावात अधिक पाणी येत असल्याने अमृतरावांचे राहण्याच्या ठिकाणी पूरस्थिती निर्माण होत असे. सन १८०७ मध्ये अमृतरावांच्या सैन्याच्या दोन गटात मारामारी झाल्यामुळे गोंधळ उडून काशीतील नागरिकांना त्रास झाला होता. काशीतील इंग्रजांच्या सैन्याने ताबडतोब या गोंधळावर नियंत्रण मिळविले. अशा तऱ्हेच्या गोंधळाला नियंत्रित करण्यासाठी इंग्रजांना बनारसमधील सैन्यादलात वाढ करावी लागली. सन १८१७ मध्ये अमृतराव पेशव्यांनी बनारसचा मॅजिस्ट्रेट बर्ड यांच्याकडे आपला माणूस पाठवून, आपण वाराणसीमधून जाण्याआधी, कर्जबाजारीपणामुळे जे लोक तुरूंगात असतील त्यांना सोडवावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली आणि त्यांच्यासाठी त्यांनी काही रकमेची तरतूद करण्याचे मान्य केले. परंतु ही रक्कम रूपये अठरा हजारपेक्षा जास्त होता कामा नये अशी अट टाकली. मॅजिस्टेट बर्डने अमृतरावांच्या या इच्छेचा लगेचच स्वीकार केला. ६८ कर्जदारांची यासाठी निवड करण्यात आली. त्यांच्या कर्जाची एकूण रक्कम रूपये २६,५००/- झाली. कर्जदाता आणि कर्जदार या दोघांशी चर्चा करून ही रक्कम रूपये १७,९१०/- इतकी कमी करण्यात आली. अमृतरावांतर्फे एवढी रक्कम अदा करून कर्जदारांची मुक्तता करण्यात आली.

पुण्यामध्ये पेशवे दरवर्षी रमण्यात दानधर्म करीत असत. अमृतरावांनी हीच पद्धती बनारसमध्ये सुरू केली. सन सप्टेंबर १८२४ मध्ये बनारसला भेट देणाऱ्या बिशप हेबर यांनी अमृतराव पेशवे यांच्या बद्दल लिहिले आहे. आपल्या जन्मदिनी ते प्रत्येक ब्राह्मण आणि आंधळा-लंगडा असलेल्या माणसांस एक शेर तांदूळ आणि एक रूपया देत असत. शहरापासून जवळच असलेल्या चार दरवाजे असलेल्या वाड्याचे वर्णन करताना हेबर लिहितात की, ''यातील तीन दरवाजे हे याचकासाठी आणि भेट देणाऱ्यासाठी असून चौथा दरवाजा हा फक्त पेशवे आणि त्यांच्या नोकरचाकरांकरीता होता. दुसऱ्यांदा दक्षिणा घेता येऊ नये म्हणून दान घेणाऱ्याला दिवसभर आत रहावे लागत असे. अशा प्रसंगी कधी कधी पन्नास हजार पेक्षा जास्त रूपये वाटले जात असत. अमृतराव एका वर्षात दीड लाख रूपये दान करीत.'' बिशप हेबर वाराणसीत

आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी अमृतराव पेशव्यांचे निधन झाल्याची नोंद त्यांनी केली आहे. बनारसचा मॅजिस्टेट मि. ब्रुक अमृतराव पेशव्यांबद्दल लिहितो की, "ते फार चांगले आणि दयाळू माणूस होते. ते तत्वाने धार्मिक आणि दानशूर होते, पण त्यांनी त्यांचे अनावश्यक प्रदर्शन कधीच केले नाही. माझ्या समजुतीप्रमाणे अजूनही बनारसच्या हिंदूमध्ये त्यांच्यासारखे पैसा आणि औदार्य असलेली जिवंत उदाहरणे आहेत."

एकंदरीत अमृतराव पेशव्यांचे स्थानिक ब्रिटीश अधिकाऱ्यांबरोबर चांगले संबंध होते. सन १८१० मध्ये गृहकर (house Tax) चळवळीमध्ये निदर्शने करणाऱ्या लोकांना शांत करण्यात आणि शहरात शांतता प्रस्थापित करण्यामध्ये अमृतराव पेशव्यांचा सहभाग होता. सन १८१४ मध्ये लॉर्ड हेस्टिंग्जने बनारसला भेट दिली त्यावेळी अमृतराव पेशव्यांनी आपला मुलगा विनायकराव यांच्या बरोबर त्यांची भेट घेतली होती. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दिवसात त्यांना ख्रिश्चन धर्मामध्ये रस निर्माण झालेला होता (Swami Medhasananda 2002: 823-826).

चिमाजीआप्पा पेशवे (दुसरे)

सवाई माधवराव पेशवे यांच्या मृत्यूनंतर आणि इ.स. १७९६ मध्ये दुसरे बाजीराव पेशवे पदावर येण्याच्या अगोदर काही कालावधीसाठी चिमाजीआप्पा यांना पेशवेपद मिळाले होते. बाजीराव पेशवे (दुसरे) यांचा हा धाकटा भाऊ होय. पेशवाई खालसा झाल्यानंतर सन १९१९ मध्ये चिमाजीआप्पा हे वाराणसीला स्थायिक झाले. पेशव्यांकडून जिंकलेल्या प्रदेशातून त्यांना वार्षिक सहा लाख रूपयांची पेन्शन देण्यात आली. वाराणसीमध्ये असी घाटाजवळ त्यांचा राहण्याचा वाडा होता. सन ३० मे १८३२ मध्ये त्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या पाठीमागे त्यांची पत्नी कावेरी, वय ११ आणि दहा वर्षाची दत्तक मुलगी होती. त्याचबरोबर नोकरचाकर, हत्ती, घोडे, उंट आणि गाईगुरे होती. त्याच्या जामदारखान्यात सोने, हिरे-माणके, दागिने आणि चांदीच्या वस्तू होत्या. त्यांच्या या इस्टेटीच्या व्यवस्थेसाठी महिना ७००० ते ८००० खर्च होता. चिमाजीआप्पांच्या मृत्यूसमयी त्यासर्व वस्तूंची किंमत पाच लाख एवढी असल्याने कंपनीला हाव सुटली. मृत्यूसमयी त्यांना फार कर्ज असल्याने कंपनी सरकारने त्यांच्या नोकरचाकरांचे हिशेब चुकते करून त्यांना कामावरून कमी केले. पीलखाना, घोड्यांची पागा, उंटखाना आणि गुरेढोरे ग्वाल्हेर किंवा पुण्याला पाठविली किंवा दान म्हणून देण्यात आली. त्यांना मिळणाऱ्या पेन्शनमधून त्यांचे कर्ज फेडले गेले आणि त्यांची मालमत्ता विकून आलेल्या पैशातून पत्नी आणि मुलीच्या चरितार्थासाठी फंड तयार केला. मालमत्ता विक्री करून आलेली रक्कम बनारसच्या ट्रेझरी मध्ये आठ टक्के व्याजाने गुंतवली. त्यांची विधवा पत्नी आणि सासरे यांनी कंपनीच्या या अर्थनीतीला विरोध केला. अशा मुळे पेशव्यांच्या मोठेपणाची मानहानी होते असे

त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या विधवा पत्नीने राहते घर सोडण्यास नकार दिला होता. कंपनीच्या दयेवर राहण्यापेक्षा पुणे अथवा ग्वाल्हेर येथे उर्वरीत आयुष्य काढावे अशी त्यांची इच्छा होती. सरकारी रोख्यामध्ये गुंतविलेल्या मुद्दलावर मिळणाऱ्या व्याजाव्यतिरिक्त त्यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नव्हते. कोर्टकचेऱ्यामधील दावे लढण्यात उर्वरीत आयुष्य गेल्यामुळे हळूहळू त्यांना आत्यंतिक दरिद्री अवस्था प्राप्त झाली (Kasturi २०१२: ११०-१३९).

छत्रपती प्रतापसिंह

सन १८१८ मध्ये पेशवाई खालसा केल्यानंतर इंग्रजांनी सातारला मराठ्यांच्या स्वतंत्र सातारा राज्यांची स्थापना करून तेथे सातारच्याच भोसले घराण्यातील प्रतापसिंहांना राज्यावर बसविले. याच छत्रपती प्रतापसिंह महाराजांना १८३९ मध्ये पदच्युत करून त्यांची रवानगी काशीस केली गेली. २५ मार्च १८४० ते १४ ऑक्टोबर १८४७ पर्यंत छत्रपती प्रतापसिंहांचे वास्तव्य काशी येथे झाले. प्रति माह रू. ९,५७५ इतकी पेन्शन त्यांना मंजूर करण्यात आली. त्यांचा मृत्यू काशी येथेच झाला. त्यांच्या वाराणसी वास्तव्याबद्दल फारशी माहिती मिळत नाही.

नाना फडणवीस आणि महादजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर मराठी साम्राज्याला उतरती कळा लागली. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात काशीत भिकाजी अनंत पटवर्धन हे पेशव्यातर्फे कारभारी होते. नागपूरकर भोसले, शिंदे, होळकरांच्या कारकूनांना जसा मान काशीत मिळतो, तसा त्यांना मिळत नाही अशी त्यांची तक्रार होती. याचे कारण म्हणजे भारतीय राजकारणात या सरदारांचे वजन बाजीरावांपेक्षा अधिक होते. पेशव्यांच्या कलकत्त्यामधील वकीलाला सांगून आपला मान काशीत वाढवावा अशी पत्रातून दुसऱ्या बाजीराव पेशव्यांना पटवर्धन प्रार्थना करतात (पेद ४३, पत्र ६६, पृ.५९). याच काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्याचा विस्तार भारतभर होण्यास सुरूवात झाली. सहाजिकच महाराष्ट्र-वाराणसीच्या राजकीय संबंधांना याच काळात पूर्णविराम मिळाला. राजकीय संबंधांच्या पूर्णविरामामुळे सामाजिक, धार्मिक, स्थापत्य इत्यादी संबंधांना बाधा पोचली नाही. संपूर्ण एकोणीसाव्या शतकात काशीच्या सामाजिक, धार्मिक आणि स्थापत्य इत्यादी संबंधात महाराष्ट्रीय समाजाने मोलाची भर घातलेली दिसते. या गोष्टींचा आढावा पुढील प्रकरणात घेण्यात आला आहे.

प्रकरण तिसरे

महाराष्ट्र-वाराणसी सामाजिक व धार्मिक संबंध

प्रास्ताविक

खूप प्राचीन काळापासून वाराणसी हे एक व्यापारी केंद्र असून त्या बरोबरच शिक्षणाचेही एक मुख्य केंद्र होते. काशी मध्ये तक्षशिलापासून लोक शिक्षणासाठी येत असत असे जातकांमध्ये सांगितले आहे. गुप्तकाळात वाराणसी हे वैदिक शिक्षणाचे केंद्र होते व विद्यार्थी आश्रमातच गुरुच्या जवळ राहून शिक्षण घेत असत. गाहडवाल काळात म्हणजेच अकराव्या-बाराव्या शतकात 'उक्तिव्यक्ति' प्रकरणातून असे दिसून येते की वाराणसीत शास्त्रांच्या अध्ययनाची चांगली सुविधा होती. गुरुजन विद्यार्थ्यांना शिकवित तसेच त्यांच्या राहण्याची आणि भोजनाचीही सोय करीत. त्याकरीता त्यांना राज्यांकडून काही मदत मिळत असे. महमूद गझनीच्या आक्रमणानंतर संस्कृतविद्येच्या शिक्षणाचे वाराणसी एकमेव केंद्र झाले, कारण पश्चिम भारत, पंजाब आणि काश्मिरचे संस्कृत पंडित स्थलांतरीत होऊन वाराणसीत येऊन राहू लागले. चौदाव्या शतकात म्हणजेच मुहम्मद तुघलकाच्या काळातही वाराणसी संस्कृतविद्या शिकण्याचे मुख्य केंद्र होते आणि तिथे धातुवाद, रसवाद, तर्क, नाटक, ज्योतिष, साहित्य इत्यादि प्रकार शिकविले जात असत. सिंकदर लोदीच्या काळात वाराणसीत पंडित आणि त्यांच्या शिक्षणसंस्थाना मोठे नुकसान झाले यात काही शंका नाही.

मुघल काळाआधी वाराणसीतील पंडिताच्या इतिहासाबाबत खूपच कमी माहिती उपलब्ध आहे, परंतु अकबराच्या काळात सर्वत्र शांतता प्रस्थापित झाल्यावर वाराणसीत पुन्हा पंडित हळूहळू स्थिर झाले. मुघलकालीन संस्कृत साहित्याच्या इतिहासात वाराणसीच्या पंडितांचा फारच मोलाचा सहभाग होता. या काळातील हजारो हस्तलिखितांचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की यातील बहुतांशी हस्तलिखिते ही बनारसच्या पंडितांनी लिहिलेली आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या हस्तलिखित ग्रंथांचे लेखक कोणी कान्यकुब्ज किंवा सरयूपारी स्थानिक ब्राह्मण नसून दक्षिण भारतीय महाराष्ट्रीय ब्राह्मण होते. याचे कारण हेच असू शकते की संस्कृत विद्येची रूची स्थानिक ब्राह्मणांपेक्षा पंचद्रविड ब्राह्मणात जास्त असावी (मोतीचंद्र १९६२: ४०९).

बर्नियर या फ्रेंच प्रवाशाने वाराणसीच्या शिक्षण पद्धतीवर बराच प्रकाश टाकलेला आहे. सतराव्या शतकात म्हणजेच सन १६६० साली औरंगजेबाच्या कारकिर्दीत तो वाराणसीला आला होता. तो शहराच्या आसपासच्या गावातील सुंदरता आणि पीकपाण्याची तारीफ करतो. बर्नियरच्या नुसार संपूर्ण वाराणसी शहरच हिंदू लोकांचे विद्यालय होते. भारताच्या या अथेन्समध्ये फक्त ब्राह्मण आणि दुसरे भक्त हे वाचन करण्यात आपला वेळ घालवीत होते. पद्धतशीरपणे क्रमबद्ध शिक्षण देणारी कोणतीही संस्था त्यावेळी वाराणसीत अस्तित्वात नव्हती. शहराच्या वेगवेगळ्या भागात आपापल्या घरी अथवा कोणत्या तरी श्रीमंतांच्या परवानगीने त्यांच्या बागेत गुरूजन राहत असत. काही गुरूंपाशी चार शिष्य होते, तर काही जवळ पाच-सहा शिष्य होते. प्रसिद्ध विद्वान गुरुजींजवळ दहा-पंधरापेक्षा अधिक शिष्य नसत. विद्यार्थी आपल्या गुरुंपाशी दहा-पंधरा वर्षांपर्यंत राहत असत आणि हळू हळू अभ्यास करीत. अधिकतर विद्यार्थी गरमी आणि भोजनामुळे सुस्त असत अशीही माहिती बर्नियर देतो. विद्यार्थी सावकाशपणे आपले शिक्षण घेत असत. कारण त्यांच्यात कोणतीही स्पर्धेची भावना नव्हती आणि अधिक विद्वत्ता दाखविल्याने कोणत्याही तऱ्हेचा मान वाढणे अथवा इनाम मिळण्याची आशा नव्हती. महाजनाच्या कृपेने मिळणारी खिचडी ते खात असत. अभ्यासक्रमात पहिल्यांदा विद्यार्थी व्याकरणाच्या सहाय्याने संस्कृत शिकत असत. त्यानंतर पुराण आणि त्याही पुढे जाऊन दर्शन, आयुर्वेद, ज्योतिष, इत्यादी विषय त्यांच्या इच्छेने शिकत असत (मोतीचंद्र १९६२: २३०-२३१).

या काळातील संस्कृत विद्येच्या अभ्यासाने असे लक्षात येते की मूळ शास्त्ररचनेपेक्षा आधीच अस्तित्वात असलेल्या शास्त्ररचनेवरील टीका लिहिण्यात पंडितांना अधिक रस होता. व्याकरण, धर्मशास्त्र आणि वेदांत हे विषय त्यांच्या आवडीचे होते. पण या विषयावरील त्यांच्या ग्रंथात मौलिक विचारांचा अभाव होता. याची दोन तीन कारणे संभवितात. पहिले कारण म्हणजे त्यावेळी संस्कृत साहित्यात नव्यन्यायाचा काळ चालला होता. त्यात निरर्थक तर्कांवरच अधिक भर दिल्याने मौलिक विचारांवर बंधने आली. दुसरे कारण म्हणजे संस्कृत विद्येच्या क्षेत्रात ब्राह्मण या एकाच जातीचे अधिपत्य राहिले त्यामुळे संस्कृत विद्येची गति मंद झाली आणि समाजातील इतर जनजीवनाशी त्यांचा संबंध तुटला. तिसरे कारण म्हणजे सतराव्या शतकात वाराणसी हे संस्कृत विद्येच्या बरोबरच स्थानिक व्रजभाषेतील साहित्य निर्मितीतील एक मोठे केंद्र बनले. अनेक संस्कृत पंडित व्रजभाषेत साहित्य निर्मिती करू लागले (मोतीचंद्र ९६२: ४१०).

वाराणसीतील महाराष्ट्रीय पंडित आणि त्यांची संस्कृत विद्या, हिंदूधर्मविषयक ग्रंथ निर्मितीतील योगदान

दहाव्या शतकात मुहम्मद गझनीच्या भारतावरील स्वाऱ्यानंतर लवकरच संबंध उत्तर भारत मुसलमानी सत्तेच्या अधिपत्याखाली गेला. तक्षशिला, नालंदा सारखी शैक्षणिक केंद्रे मुसलमानी सत्तेच्या आघाताने नष्ट झाल्याने तुलनेने मुस्लिम सत्ताकेंद्रापासून दूर असणाऱ्या वाराणसीकडे पश्चिम भारत, पंजाब आणि काश्मिरचे संस्कृत पंडित स्थलांतरीत होऊ लागले. हीच परिस्थिती चौदाव्या शतकात महाराष्ट्रात घडून आली. अल्लाउद्दीन खिलजी, मुहम्मद तुघलक आणि बहमनी सत्तेच्या अधिपत्याने राजसत्तेचा संस्कृत विद्येला असणारा राजाश्रय तुटला. परिणामी अनेक महाराष्ट्रीय पंडित घराणी उच्चविद्याभासासाठी वाराणसीकडे स्थलांतरीत होऊ लागली. वर लिहिल्याप्रमाणे अकबराच्या काळापासूनच महाराष्ट्रीय ब्राह्मणांसाठी वाराणसी हे पवित्र तीर्थ बनले होते. महाराष्ट्रीय पंडित वाराणसीत फक्त यात्रा करण्यासाठीच येत नसून, त्यातील बहुतेक लोक वाराणसीत कायमचे स्थायीक झाले आणि आपल्या विद्वत्तेने वाराणसीची किर्ती वाढविण्यास कारणीभूत ठरले. महाराष्ट्रात पेशव्यांची सत्ता सुरू झाल्यानंतर महाराष्ट्र आणि वाराणसी यांच्यामधील संबंध अधिक दृढ झाले, परिणामी मोठ्या संख्येने महाराष्ट्रीय ब्राह्मण काशीयात्रेस येऊ लागले आणि पेशवे सुद्धा वाराणसीत सुधारणा करण्यासाठी खूप पैसे खर्च करू लागले. महाराष्ट्रीय ब्राह्मणांपैकी अनेक लोक पुण्याहून पेशव्यांकडून येणाऱ्या वृत्तिवर वाराणसीतील आपले जीवन चालवित आणि पेशव्यांच्या कल्याणांसाठी पूजापाठ करीत असत.

पंधराव्या-सोळाव्या शतकापासून अनेक महाराष्ट्रीय पंडित घराणी संस्कृतविद्येच्या अभ्यासार्थ वाराणसीत स्थलांतरीत झाली. महामहोपाध्याय हरप्रसादशास्त्री याबाबतीत अधिक भाष्य करताना लिहितात की, ''महाराष्ट्रातील पैठण, पुणतांबा, कोपरगाव, नाशिक, नांदेड आदि ठिकाणची महाराष्ट्रीय घराणी शेष, भट्ट, धर्माधिकारी, भारद्वाज, चतुर्धर उर्फ चौधरी, पुणतांबेकर, पायगुंडे ही संस्कृत विद्येच्या अभ्यासार्थ वाराणसीत आली आणि कायमची स्थायीक झाली'' (Shastri 1912: 7-12).

भट्ट घराणे

ज्या महान पंडिताने वाराणसीतील हिंदू धर्म आणि संस्कृतीच्या उत्तर भारतीय सिद्धांताविरूद्ध हिंदू धर्म आणि संस्कृतीबाबतचे दक्षिणीमत प्रस्थापित केले ती व्यक्ती म्हणजे भट्ट घराण्यातील नारायणभट्ट होय. याच नारायणभट्टांनी राजा तोडरमलाच्या साह्याने वाराणसीतील विश्वनाथ मंदिराची सन १५८५ मध्ये पुन:स्थापना केली होती. नारायणभट्टांची विद्वत्ता व सदाचरण यामुळे त्यांना 'जगद्गुरु' अशी पदवी लावण्यात येऊ लागली व मन्त्रजागरणाचे वेळी सर्व वैदिकांमध्ये त्यांचे घराण्याला अग्रपूजेचा मान मिळू लागला. हा मान

अजूनहि त्या घराण्याकडे चालू आहे. धर्मसभा भरतात त्यात गंधाचा पहिला मान भट्टांचा आहे. लोकांच्या धर्मव्यवस्थेकरिता भट्टांनी निबंधग्रंथ लिहिले. ह्या निबंधात जुन्या स्मृती जमेस धरून व ठिकठिकाणचे आचार संकलित करून त्यांनी व्यवस्थित पद्धत बांधून दिली. गाधिवंशानुचरितम् या ग्रंथात भट्ट घराण्याची माहिती आली आहे. त्यानुसार नारायणभट्टांचे पिता रामेश्वरभट्ट होते. पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धात ते पैठणहून वाराणसीस गेले. नारायणभट्ट, श्रीधरभट्ट आणि माधवभट्ट असे त्यांचे तीन पुत्र होते. रामेश्वरभट्टांच्या शिष्यवर्गात अनेक नामांकित विद्वान होते. त्यात कोंकणचे अनंतभट्ट चित्तल (चितळे), दामोदरसरस्वती व मधुसूदनसरस्वती यांचे गुरू माधवसरस्वती, महेश ठक्कर व शंकरमिश्र हे प्रमुख होते.

रामेश्वरभट्टांच्या मृत्यूनंतर श्रुती, स्मृती आणि षट्दर्शनाचे अभ्यासक असणाऱ्या नारायणभट्टांनी त्यांचे स्थान ग्रहण केले. काशी येथील विश्वेश्वराचे मंदिर मुसलमानांनी उद्ध्वस्त करून तेथे मशीद बांधली होती. पुढे नारायणभट्ट काशीस असता मोठे अवर्षण पडले. तेव्हा नारायणभट्टांने भागीरथीत अनुष्ठान करून तपोबलाने विपुल पर्जन्यवृष्टि करविली. या त्यांच्या प्रभावावरून तेथील मुसलमान अधिकाऱ्यांनी त्यास विश्वेश्वराचे मंदिर पुन: बांधण्याची परवानगी दिली. सन १५८५ मध्ये नारायणभट्टांने बांधलेले हे मंदिर सन १६६९ मध्ये औरंगजेबाने पाडले. नारायणभट्ट हे मोठे मीमांसक होते. त्यांचे बारा ग्रंथ मार्तंड या संज्ञेने प्रसिद्ध आहेत. त्यांतील मुहूर्तमार्तंड शके १४९३ म्हणजेच सन १५७१ त लिहिला असा उल्लेख आहे. नारायणभट्टांनी बंगाल व बिहार येथील पंडितांशी वादविवाद करून त्यांजवर आपला शह बसविला. गया, काशी व प्रयाग या तीन क्षेत्रांत यात्रेकरूंनी तीर्थविधी कसे करावे या संबंधाने 'त्रिस्थलीसेतु' या नावाचा ग्रंथ नारायणभट्टांनी लिहिला. राजा तोडरमल याच्याशी नारायणभट्टांचा चांगला परिचय होता. बंगालचा सुभेदार असताना त्याने नवद्वीप येथील विद्यानिवास भट्टाचार्य वगैरेस व मिथिला येथील विद्वान पंडितांस व नारायणभट्टांस आपल्या येथे बोलावून त्यांचा आपल्यासमक्ष वाद करविला. त्या वादांत नारायणभट्टांनी इतर सर्व पंडितांस जिंकिले. नारायणभट्टांचा दक्षिणेत प्रसिद्ध असलेला ग्रंथ म्हणजे 'धर्मप्रवृत्ति' नावाचा असून त्यांचाच दुसरा सर्वमान्य ग्रंथ 'प्रयोगरत्न' हा उत्तरहिंदुस्थानात प्रमाणभूत मानतात. प्रयोगरत्नासच नारायणभट्टी असे नाव आहे. याशिवाय अन्त्येष्टिपद्धति, अयननिर्णय, आतुरसंन्यासविधि, आरामोत्सर्गपद्धति, आह्निकविधि, काशीमरणमुक्तिविचार, कालमाधवव्याख्या, गोत्रप्रवरनिर्णय, तिथिनिर्णिय, त्रिस्थलीसेतु, तुलापुरुषमहादानप्रयोग, दिव्यानुष्टानपद्धति, रुद्रपद्धति इत्यादी अनेक ग्रंथ आहेत. यातील बरेच ग्रंथ आजही प्रचारात आहेत व त्यावरून आपली धार्मिक कृत्ये लोक करतात.

नारायणभट्टांचे बंधू श्रीधरभट्ट यांनी सापिण्ड्यदीपिका किंवा सापिण्ड्यमीमांसा ह्या नावाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांचे कनिष्ठ बंधू माधवभट्ट यांनी सुर्यार्घ्यदानपद्धति हा ग्रंथ लिहिला आहे. रामकृष्णभट्ट,

शंकरभट्ट आणि गोविंदभट्ट असे नारायणभट्टांना तीन पुत्र होते. रामकृष्णभट्टांचे तंत्रवार्तिकाची व्याख्या, ज्योतिष्टौमपद्धती व जीवत्पितृकनिर्णय हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. नारायणभट्टांचे द्वितीय पुत्र शंकरभट्ट हे मोठे मीमांसक होते. त्यांनी शास्त्रदीपिका या ग्रंथावर टीका (प्रकाश नावाची) लिहिली. शंकरभट्टांचा द्वैतनिर्णय म्हणून फार प्रसिद्ध ग्रंथ आहे. या ग्रंथात कृष्णजन्माष्टमीव्रत, नवरात्रव्रत, संनिपाताशौच वगैरे विषयात जी भिन्नभिन्न मते आहेत त्यांचा विचार करून मीमांसाशास्त्राच्या आधारे निर्णय दिले आहेत. हे निर्णय दाक्षिणात्य ग्रंथकारांच्या मतावर अवलंबून राहून दिले आहेत असे शंकरभट्टांनी स्पष्ट सांगितले आहे. भट्ट घराण्याची माहिती सांगणारा 'गाधिवंशानुचरित' हा ग्रंथ शंकरभट्टांनीच लिहिला आहे.

नारायणभट्टांचे ज्येष्ठ पुत्र रामकृष्णभट्ट यांना तीन पुत्र होते, दिनकरभट्ट, कमलाकरभट्ट व लक्ष्मणभट्ट. दिनकरभट्ट हे महाविद्वान होते. या दिनकरभट्टांनी शास्त्रदीपिकेवर भाट्टदिनकरमीमांसा किंवा भाट्टदिनकरी, शांतिसार, दिनकरोद्द्योत हे ग्रंथ लिहिले. दिनकरोद्द्योत हा ग्रंथ त्यांचा मुलगा गागाभट्ट यांनी पुरा केला. कमलाकरभट्ट हे अत्यंत विद्वान, अनेकशास्त्रात पारंगत होते. नारायणभट्टांचे खालोखाल भट्टवंशात कमलाकरभट्टांची योग्यता आहे असे म्हणण्याला हरकत नाही. त्यांनी केलेल्या बावीस ग्रंथांची यादी शांतिरत्न या ग्रंथाच्या शेवटी दिलेली आहे. कमलाकरभट्टांचे प्रमुख ग्रंथ म्हणजे निर्णयसिंधु, शूद्रकमलाकर, विवादताण्डव, काव्यप्रकाशव्याख्या, गोत्रप्रवरदर्पण, शांतिरत्न हे होत.

नारायणभट्टांचे द्वितीय पुत्र शंकरभट्टाचा मुलगा नीलकंठभट्ट हा मोठा निबंधकार झाला. दानमयूख वगैरे बारा 'मयूख' त्यांने लिहिले. हिंदु कायद्याच्या संबंधाने हिंदुस्थानात नीलकंठाच्या ग्रंथांचा अधिकार सर्वमान्य असून त्यांचा 'व्यवहार मयूख' हा ग्रंथ नीलकंठी या नावाने प्रसिद्ध आहे.

नारायणभट्टांचा प्रपौत्र म्हणजेच दिनकरभट्टांचा मुलगा विश्वेश्वभट्ट होय. याला पित्याने गागाभट्ट असे लाडके नांव दिले, तेच पुढे प्रसिद्ध झाले. यांनीही उत्कृष्ट विद्या संपादन करून आपल्या घराण्याचा लौकिक वृद्धिंगत केला. शिवदिननाथ कवीचा गुरु केसरीनाथ हा गागाभट्टाचा मातुल होय. यावरून काशीला गेले तरी दक्षिणेतील आपला संबंध ह्या दक्षिणी पंडितांनी तोडला नव्हता असे दिसते. मीमांसा, न्याय, अलंकार व वेदान्त या विषयांत गागाभट्टांची प्रवीणता विशेष असून त्याजवर त्यांनी ग्रंथ लिहिले. 'दिनकरोद्योत' ग्रंथात त्यांच्या पित्याने कित्येक विषय सोपे म्हणून सोडून दिले होते, त्यांची पूर्तता गागाभट्टांनी केली. याशिवाय बौधायनसूत्राप्रमाणे निरूढ पशुबन्धप्रयोग व पिण्डपितृयज्ञप्रयोग हे दोन ग्रंथ, न्यायशास्त्रावर भाट्टचिंतामणि तसेच चांद्रसेनीय कायस्थावरील कायस्थधर्मप्रदीप हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. भट्ट घराण्याची पिढीजात विद्त्ता, लौकिक व धर्मशास्त्रसंबंधी अधिकार ओळखूनच शिवाजी महाराजांनी गागाभट्टांस मुद्दाम आमंत्रण देऊन त्यांच्याकडून राज्याभिषेक करून घेतला (सरदेसाई १९१४: ४९० आणि काणे १९३०: १-२४).

भट्टवंशातील विद्वान पुरुषांनी वेळोवेळी धैर्याने पुढे येऊन पूर्वीच्या निबंधकारांना ज्या सुधारणा सुचविण्याचे धैर्य झाले नाही त्या केल्या असे दिसून येते. शंकरभट्टांनी आपल्या द्वैतनिर्णयात द्विजानांही मुलीचा पुत्र व भगिनीपुत्र दत्तक घेता येतो असे मीमांसापद्धतीने ठरविले व त्याचाच नीलकंठभट्टांनी अनुवाद केला. शंकरभट्टांनी प्राचीन सर्व निबंधकारांचे मताचे विरुद्ध लग्न झालेला व मुले झालेला मनुष्यही दत्तक पुत्र होऊ शकतो असे सिद्ध केले. पा.वा.काणे लिहितात की, ''नीलकंठभट्टांनी अनुवाद केल्यामुळे इंग्रजांच्या काळातील मुंबई इलाख्यात अशा प्रकारची दत्तविधाने सरसहा चालू होती. नीलकंठभट्टांनी सर्व भरतखंडांत इतरत्र कोणीहि न मानलेला असा बहिणीचा गोत्रज म्हणून वारसा प्रस्थापित केला व तो मुंबई इलाख्यात मान्य होता. मिताक्षरादि प्राचीन निबंधकाराचे मताचे विरुद्ध नीलकंठभट्टांनी भार्या व पुत्र यांचे ठिकाणी पुरुषाचे स्वत्व नाही असे सिद्ध केले. याचप्रमाणे गागाभट्टांनी धैर्य धरून क्षात्र कर्माचे आत्यंतिक पालन करणऱ्या परंतु संस्कार बरेच वर्षे लुप्त झालेल्या शिवाजी महाराजांचा व्रतबंध व वैदिक पद्धतीने राज्याभिषेक करून नवी प्रथा पाडली. या दृष्टीने या भट्ट घराण्याची व विशेषत: गागाभट्टांची कामगिरी कौतुक करण्यासारखी आहे.'' (काणे १९३०: २३).

शेष घराणे

महाराष्ट्रात उदय पावून विद्वत्तेत व शास्त्र उपासनेत अखिल भारतीय महत्त्व पावलेल्या पट्टीच्या विद्वान घराण्यांत शेष कुलाचे स्थान अग्रगण्य ठरेल. वेद व शास्त्र या विषयावरचा असा कोणताही भाग आढळणार नाही की ज्यात शेष पंडितांनी ग्रंथरचना केली नसेल. पंडितपरंपरा एखाद्या घराण्यांत चार दोन पिढ्याच टिकली असेल, पण काही शतकांनी मोजता येईल अशी अव्याहत पंडितपरंपरा शेषघराण्यांत प्रामुख्याने आढळते. ही किर्ति शेषांनी काशीस जाऊन आपल्या विद्वत्तेचा झेंडा जेव्हा फडकावला तेव्हापासून ते आजतागायत सर्वश्रुत अशी आहे. काशी हे धर्मपीठ खरे, पण व्याकरण शास्त्रावर महत्त्वाची ग्रंथरचना करून काशीस व्याकरणपीठाचा मान मिळवून देणारे शेष पंडितच होते (कानोले १९५०:५६).

काशीच्या शेष शाखेतील कृष्ण पंडिताने मुरारी विजय नाटकात ''अस्तिकिल दाक्षिणात्यस्य गोदारोघो वास्तव्यस्य'' (आम्ही दाक्षिणात्य असून गोदाकाठचे राहणारे आहोत) एवढेच मोघम म्हटले आहे. काशीतील शेष घराणे हे दाक्षिणात्य म्हणजेच तेलगू असून कालांतराने ते महाराष्ट्रीय ब्राह्मण म्हणून ओळखले जाऊ लागले असे हरप्रसाद शास्त्री म्हणतात (Shastri 1912: 7-12). शेष हे आंध्र असून सप्त गोदावरी प्रांतातले असावेत असे रंगनाथस्वामींनी म्हटले आहे (Ranganthsvami 1912: 245). वि.का.राजवाडे शेषांना गोदावरी काठावरील पुणतांब्याचे म्हणवितात (राजवाडे १९२२: २१). वि.अं.कानोले त्यांना गोदावरी काठावरील नांदेडचे समजतात. शेष वंशातील मूळ पुरुष रामकृष्ण असून त्याचा काळ तेरावे

शतक असावा. शेष घराण्याच्या अनेक शाखा नांदेड परिसरात राहावयास असाव्यात असा कानोले यांचा तर्क आहे. त्यातीलच एका शाखेतील विष्णु पंडित हा नांदेडहून काशीस गेलेला पहिला शेष पंडित मानण्यात येतो. त्याने महाभाष्यावर टीका लिहिली. वेद व शास्त्रे या विषयांवर अनेक भाष्ये, स्फुट टिप्पण्या व टीका त्यांने लिहिल्या असे तो आपल्या महाभाष्यावरील टिकेत लिहितो. याचा काळ रंगनाथस्वामी इ.स. १४०० देतात. विष्णु शेषांच्या नंतर काही कालाने काशीच्या शेषशाखेत शेषनृसिंह पंडित यांचा उल्लेख येतो. यांचा काळ इ.स. १४७० असा येतो. यानेच आपल्या 'गोविंदार्णव' या धर्मशास्त्रावरील ग्रंथात असे म्हटले आहे की मी तो ग्रंथ काशीजवळील गोविंदचंद्रवास्तक तांडव या राजाच्या आज्ञेवरून लिहीत आहे (कानोले १९५०: ५६).

याच शेषनृसिंह पंडिताचा पुत्र शेषकृष्ण हा काशी शाखेतील सर्वात नामांकित ग्रंथकार व विद्वान पंडित होता. व्याकरण शास्त्रावर पाणिनीय सूत्राचे आधारे प्रक्रीयप्रकाश, पदचंद्रिका, प्राकृतचंद्रिका, शब्दालंकार इत्यादि बरेच ग्रंथ त्याने रचले असून शिवाय काव्य, नाटक, चंपू इत्यादि बहुविध विषयांवर याची ग्रंथरचना सर्वश्रुत आहे. 'शूद्राचारशिरोमणी' हा धर्मशास्त्रावरील त्याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. काशीस संस्कृत व्याकरणाचे पीठ म्हणून मान मिळवून देणारे शेष पंडितच होत. सुप्रसिद्ध वैय्याकरणी व थोर ग्रंथकार भट्टोजी दीक्षित हे याच शेषकृष्णाचे शिष्य होत. शेषकृष्णाचा भाऊ शेष चिंतामणी हा सुद्धा चांगल्यापैकी ग्रंथकार होऊन गेला. याची रसमंजिरीपरिमल आणि इतर बरीच ग्रंथरचना आहे. शेषकृष्णाचा पुत्र शेष विरेश्वर यांची ग्रंथसंपदा प्रसिद्ध नाही. संस्कृत साहित्यातील विविध प्रकारात आपला अमोल ठसा उमटविणाऱ्या तीन महान संस्कृत पंडित त्याचे शिष्य होते. गंगालहरीकर्ता जगन्नाथ पंडित हा त्याचा पहिला शिष्य होता. रसगंगाधर, भामिनीविलास, आसफविलास, अमृतलहरी, पियुषलहरी हे त्यांचे इतर ग्रंथ प्रसिद्ध आहेत. 'सिद्धांतकौमुदी'' लिहिणारा भट्टोजी दीक्षित हा त्याचा दुसरा शिष्य. तर्कसंग्रहकर्ता अन्नमभट्ट हा त्याचा तिसरा शिष्य होय. सतराव्या शतकात उदयास आलेले हे सर्व विद्वान प्रसिद्ध लेखक होते. याच घराण्यातील एका शाखेशी संबंधीत असणारा शेष महादेव हा शहाजहानचा मुलगा दारा शुकोहचा संस्कृतचा गुरु होता (Altekar 1943: 72).

चतुर्धर किंवा चौधरी घराणे

महाभारतावर टीका लिहिणारा नीलकंठ चतुर्धर हा वाराणसीचा रहिवासी होता. सन १६८० मध्ये लिहिलेला शिवताण्डवटीका आणि सन १६९३ मध्ये लिहिलेला गणेशगीताटीका हे दोनही ग्रंथ त्याने काशीमध्ये लिहिलेले आहेत असे पी.के.गोडे लिहितात (Gode 1954: 492). त्याने हरिवंशावर लिहिलेल्या टीकेत तो कूर्परग्रामात म्हणजेच कोपरगांवात राहणारा, गौतम गोत्राचा आणि चतुर्धर उपनाम अशी स्वत:ची ओळख

करून देतो. सन १६८० मध्ये नीलकंठाने लिहिलेल्या शिवतांडव टीकेत तो स्वत:ला "श्रीमच्चौधरिनीलकंठवशिना" असे लिहितो. यावरून असे दिसून येते की चौधरी आणि चतुर्धर ही दोनही आडनावे तो एकाचवेळी वापरत होता. सन १६८३ मध्ये अनंतभट्ट प्रकरण म्हणजेच देवरूखे ब्राह्मणांच्या ग्रामण्यासबंधी काशीमध्ये ब्राह्मण भोजन घालण्यासंबंधी एक पत्र प्रसिद्ध झाले आहे. त्यात काशीतील हरि दीक्षित कोकणातील नारायण दीक्षितांना पत्र लिहितांना त्यांचा वाराणसीतील जावई गोविंद दीक्षित चौधरी यांचा उल्लेख करतो. सन १६८३ मधील काशीतील हा गोविंद दीक्षित चौधरी म्हणजेच नीलकंठ चतुर्धराचा मुलगा आणि शिव दीक्षित चतुर्धराचा पिता गोविंद चतुर्धर उर्फ चौधरी असावा असे पी.के.गोडे यांचे प्रतिपादन आहे (Gode 1954: 492). नीलकंठ चतुर्धरचा नातू शिव दीक्षित याने सन १७४६ मध्ये पैठण येथे लिहिलेल्या 'धर्मतत्त्वप्रकाश' या ग्रंथात चतुर्धर घराण्याचा वंशवृक्ष देऊन त्याचा जन्म वाराणसीचा आहे असे लिहिले आहे. म्हणजेच महाराष्ट्रातील गोदावरीकाठच्या कोपरगावात राहणारे हे चतुर्धर उर्फ चौधरी घराणे सतराव्या शतकाच्या मध्यास केव्हातरी वाराणसीत स्थायीक झाले असावे. शिव दीक्षितचा मुलगा गंगाधर दीक्षित याला सन १७४६ मध्ये फत्तेसिंग भोसल्यांच्या शिफारसीवरून अहमदनगर जिल्ह्यातील शेवगांव येथील निवडुंगे हा गाव इनाम दिला होता. या सनदेतही गंगाधर दीक्षित संबंधी 'कासीकर हल्ली वास्तव्य पैठण' असे लिहिलेले आहे. चतुर्धर घराण्यातील पुढची पिढीही काशीमध्ये राहत आहे (चित्राव १९३७: ४९९). मंत्रकाशीखंडटीका, मंत्रभागवत, मंत्ररामायण, महाभारतभावदीप, वेदान्तकतक, शिवताण्डवव्याख्या, षट्तन्त्रीसार, हरिवंशटीका, गणेशगीताटीका, सौरपौराणिकमतसमर्थन, रुद्रसारसंग्रहव्याख्या रुद्रमीमांसा हे नीलकंठ चतुर्धराचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

पुणतांबेकर घराणे

महाराष्ट्रातील गोदावरी काठावरील पुण्यस्तंभ म्हणजेच पुणतांबे येथील पुणतांबेकर घराणे हे सोळाव्या शतकाच्या अंती किंवा सतराव्या शतकाच्या सुरूवातीला वाराणसीत स्थायीक झाले असावे. महादेव पुणतांबेकर हे या घराण्यातील प्रसिद्ध विद्वान म्हणजेच मोठे नैयायिक होते. भवानंद सिद्धांतवागीश हे बंगाली प्रसिद्ध नैयायीक होते. त्यांनी 'चिंतामणि दीधिति' या गंथावर टीका लिहिली ती 'भवानंदी' या नावाने प्रसिद्ध आहे. बंगालमधील नवद्वीप येथील बंगाली विद्वानांनी भवानंद सिद्धांतवागीशांशी असलेल्या असूयेपोटी या टीकेकडे दुर्लक्ष केले. परंतु या उलट या टीकेकडे काशीतील मराठी विद्वानांनी आदराने पाहिले. या टीकेच्या समर्थनार्थ पुढे आलेले काशीस्थित मराठी पंडित होते महादेव पुणतांबेकर. त्यांनी या भवानंदी टीकेच्या समर्थनार्थ ग्रंथ लिहिला तो 'भवानंदी-प्रकाश' या नावाने प्रसिद्ध आहे. बंगाली विद्वानांनी घेतलेल्या सर्व

आक्षेपांचे खंडण त्यांनी या ग्रंथात केलेले आहे. या ग्रंथाची छोटी आवृत्तीही त्यांनी 'सर्वोपकारिणी' नावाने प्रसिद्ध केली. काशीमध्ये आजही हे घराणे नांदत आहे (उपाध्याय १९८३: ३०-३१).

पायगुंडे घराणे

सिद्धांतकौमुदीकर्ता भट्टोजी दीक्षितचा पुत्र हरि दीक्षित याचा नागेश भट्ट हा शिष्य होता. हे महाराष्ट्रीय ब्राह्मण असून त्यांचे आडनांव काळे होते. काशीमध्येच राहून त्यांनी आपले सर्व ग्रंथ लिहिले. सर्वसाधारणपणे आयुष्याच्या शेवटी त्यांनी क्षेत्रसंन्यास घेतल्यामुळे सन १७४२ मध्ये जयपूरचे महाराज सवाई जयसिंहानी केलेल्या अश्वमेध यज्ञात ते उपस्थित राहू शकले नाहीत. या प्रसंगावरून त्यांचा काळ अठराव्या शतकाचा पूर्वार्ध समजला जातो. प्रयागच्या जवळील श्रृंगवेरपुर (आत्ताचे सिंगरौर) येथील राजा त्यांचा आश्रयदाता होता. व्याकरणशास्त्रात प्रकांड पंडित असलेले नागेशभट्ट यांनी साहित्यशास्त्र, धर्मशास्त्र, योगशास्त्र आदी शास्त्रातही ग्रंथ लिहिले होते. वैयाकरण सिद्धांत मंजूषा, परिभाषेन्दूशेखर, लघु शब्देन्दुशेख, महाभाष्य प्रदीपोद्योत या त्याच्या व्याकरणाशास्त्रावरील ग्रंथांव्यतिरिक्त आचारेन्दुशेखर, तिथीन्दुशेखर, तीर्थेन्दुशेखर, प्रायश्चितेन्दुशेखर आदी धर्मशास्त्रावरील ग्रंथ सुद्धा लिहिले (उपाध्याय १९८३: ४६,६२).

नागेशभट्टाचेच पट्टशिष्य वैद्यनाथ पायगुंडे होते. त्यांनी आपल्या गुरुंच्याच महत्त्वाच्या ग्रंथावर टीकाग्रंथांची निर्मिती केली. त्यातील काही ग्रंथ हा फार महत्त्वाचा आहेत. त्यांचा मुलगा बालम्भट्ट पायगुंडे वैयाकरणी पेक्षा धर्मशास्त्रवेत्ता अधिक होता. त्याने मिताक्षरा ग्रंथावर 'बालम्भट्टी' नावाची टीका लिहिली आहे. बालम्भट्टाची पत्नी लक्ष्मी हिने हा ग्रंथ लिहिला अशी जनमानसात समजूत आहे, म्हणून त्या ग्रंथाला 'लक्ष्मी व्याख्यान' असेही म्हणतात. कलकत्त्यातील इंग्रज संस्कृतज्ञ अधिकारी हेनरी टॉमस कोलब्रुक याच्या आदेशावरून 'धर्मशास्त्र-संग्रह' नावाचा ग्रंथ त्यांनी तयार केला. हिंदु धर्माचे कायदे समजून घेण्याकरीता या ग्रंथाचा त्यावेळच्या इंग्रजी कचेऱ्यात वापर करण्यात येत होता. सन १८३० मध्ये याचा मृत्यू झाला त्यावेळी त्यांचे वय नव्वद वर्षाचे होते. म्हणजेच यांचा जन्म सर्वसाधारणपणे सन १७६० च्या दरम्यान झाला असावा. उत्तर पेशवाईतले प्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे हे बालम्भट्टांचे शिष्य होते. वैद्यनाथ पायगुंडेचे जावई देव आणि त्यांचे शिष्य अहोबलशास्त्री यांच्याकडे प्रसिद्ध वैयाकरणी नीलकंठशास्त्री थत्ते यांचे शिक्षण झाले (उपाध्याय १९८३: १४७-१४९). हे नीलकंठशास्त्री थत्ते दुसरा बाजीराव आणि छत्रपती प्रतापसिंहाचे समकालीन होते. त्याकाळातील इंग्रजांचे अधिकारी सरदार नातूंचे ते जावई होते.

भारद्वाज घराणे

भारद्वाज घराणेही सोळाव्या शतकाच्या आसपास महाराष्ट्रातून काशीमध्ये स्थलांतरीत झाले असावे. या घराण्याचे वैवाहिक संबंध काशीतील प्रसिद्ध भट्ट घराण्यांशी झाले असल्यामुळे भारद्वाज घराण्याची काशीतील प्रतिष्ठित घराण्यात गणना होत असावी. भट्ट घराण्यातील प्रख्यात वंशज धर्मशास्त्रप्रवीण 'मयूखकार' नीलकंठभट्टांनी आपल्या मुलीचा विवाह सतराव्या शतकात भारद्वाजकुलातील महादेवभट्ट यांच्याशी केला होता. दिनकरभट्ट आणि दिवाकरभट्ट असे दोन पुत्र महादेवभट्टांना होते. दिनकरभट्टांनी 'न्यायमुक्तावली' वर प्रमेयाबहुल व्याख्या लिहून न्यायशास्त्रात आपला ठसा उमटविला. हा ग्रंथ दिनकरी या नावानेही ओळखला जातो. दुसरा पुत्र दिवाकरभट्टांची वंशपरंपरा पुढे चाललेली दिसते. दिवाकर⟶वैद्यनाथ..........⟶सीताराम⟶हरिराम⟶बालकृष्णभट्ट असा वंशवृक्ष या शाखेत दिसतो. एकोणिसाव्या शतकातील प्रसिद्ध व्याकरणकार आणि शास्त्रार्थी महामहोपाध्याय दामोदरशास्त्री हे बालकृष्णभट्टांचे पुत्र होत (उपाध्याय १९८३: २६८).

एकोणीसाव्या शतकातील वाराणसीतील महाराष्ट्रीय पंडित परंपरा

काशीमध्ये 'काशी राजकीय संस्कृत पाठशाला' ची स्थापना दि. २८ ऑक्टोबर १७९१ मध्ये झाली. या संस्थेच्या स्थापनेमध्ये इंग्रजी सत्तेचा हातभार होता. सन १७५० च्या सुमारास ईस्ट इंडिया कंपनीचे राजकीय प्रभुत्व बंगाल, बिहार आणि उत्तर प्रदेशावर निर्माण झाले होते. या प्रदेशावर आपले राज्य सुस्थापित करण्यासाठी कंपनीच्या अधिकाऱ्यांना हिंदू आणि मुसलमानांना प्रसन्न करणे आवश्यक होते. त्यासाठी कंपनीने त्यांच्या प्राचीन विद्या सुरक्षित करण्याचा संकल्प केला आणि त्यासाठी अध्ययन-अध्यापन करण्यासाठी मदरसा आणि पाठशालेची स्थापना केली. इंग्रजांनी वाराणसीत स्थापन केलेली 'काशी राजकीय संस्कृत पाठशाला' ची स्थापना ही याच संकल्पनेचे फलीत होय. पुढील दोनशेपेक्षा अधिक वर्षांपर्यंत अव्याहतपणे या पाठशालेने संस्कृत विद्येच्या क्षेत्रात आपले बहुमोल योगदान दिलेले दिसते. या संस्थेच्या सुरवातीच्या काळात म्हणजेच संपूर्ण एकोणिसाव्या शतकातील जडणघडणीत महाराष्ट्रीय संस्कृत पंडितांचे योगदान महत्वपूर्ण असलेले दिसते. त्यामध्ये काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे, राजारामशास्त्री कार्लेकर, बापूदेवशास्त्री, बाळशास्त्री रानडे यांचा समावेश होतो.

काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे

काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे हे महाराष्ट्रातील वाई येथून व्याकरणशास्त्रातील अधिक अध्ययनासाठी काशीस आले. अध्ययन पूर्ण झाल्यानंतर काशी राजकीय पाठशालेतच व्याकरणशास्त्राचे अध्यापक म्हणून काम करू

लागले. त्यांच्या शिष्यवर्गात पंडित राजारामशास्त्री कार्लेकर, पंडित बाळशास्त्री रानडे आणि पंडित यागेश्वरशास्त्री ओझा होते. महाभाष्याच्या अध्यापनासाठी ते विशेष प्रख्यात होते. त्यांचा काशीतील कार्यकाल सन १८२० ते १८५० च्या दरम्यानचा होता (उपाध्याय १९८३: १५६).

राजारामशास्त्री कार्लेकर (सन १८०५-१८७५)

राजारामशास्त्री कार्लेकरांचा जन्म काशीतच झाला. काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे यांचे हे शिष्य होत. त्याच्याप्रमाणेच व्याकरणशास्त्रात यांनी अधिकार मिळविला. चित्रकूट निवासी विनायकराव पेशवे हे दरवर्षी भारतातील विद्वानांना शास्त्रार्थ चर्चेसाठी चित्रकूटला बोलवित असत. अशाच एका शास्त्रार्थ चर्चेत राजारामशास्त्री गेले असताना त्यांच्या विद्वत्तेने प्रभावित होऊन विनायकरावांनी त्यांचा सन्मान करून पारितोषक दिले. त्याचवेळी काशी राजकीय पाठशाळेचे अध्यक्ष जॉन म्यूर हे इंग्रजी कचेरीत न्यायाधीश होऊ शकेल अशा हिंदू धर्मशास्त्र जाणणाऱ्या संस्कृत पंडितांच्या शोधात होते. राजारामशास्त्रींची विद्वत्ता पाहून जान म्यूर साहेबांनी त्यांना आझमगढच्या जिल्हा न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमले. धर्मशास्त्रात प्रकांड पंडित असलेले आणि हिंदू स्मृतींच्या आधारे खटल्यांचा निकाल लावणाऱ्या माणसांची नेमणूक न्यायाधीश म्हणून करावी असे इंग्रज सरकारला वाटत होते. शास्त्रीजी त्यावेळचे काशीतील सर्वश्रेष्ठ विद्वान होते. तेव्हा सरकारने त्यांना आझमगढ जिल्ह्याच्या कचेरीत न्यायाधीश म्हणून नेमले. कालांतराने यातून निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी ग्वाल्हेरच्या दरबारातील पंडितांना शास्त्रार्थामध्ये पराभूत केल्यामुळे शिंदे सरकारकडून राजारामशास्त्रींचा बहुमोल वस्त्र आणि द्रव्यराशी देऊन सन्मान केला गेला. याच काळात विधवा विवाहाबाबत भारतात जोरदार वादावादी सुरू झाली. नवीन सुधारणावादी लोक हे विधवा विवाहाच्या बाजूने होते तर प्राचीन भारतीय धार्मिक परंपरेचे अनुयायी हे विधवा विवाहाच्या विरोधी होते. हिंदू समाजात उत्पन्न झालेले हे बहुचर्चित आंदोलन पंडितांच्या क्षोम-विक्षोभाचे कारण बनले. मीमांसा वैदिक धर्माच्या विद्वानांसाठी हा ज्वलंत विषय होता. या विषयांवर राजारामशास्त्रींनी 'विधवोद्वाह-शङ्का समाधी' नावाचा ग्रंथ लिहिला. सन १८५६ नंतर त्यांची नियुक्ती ही गव्हर्नमेंट संस्कृत कॉलेजमध्ये संख्याशास्त्र व त्यानंतर धर्मशास्त्राचे अध्यापक म्हणून झाली (उपाध्याय १९८३: १५९).

श्री बापूदेवशास्त्री (सन १८१९-१८९०)

महामहोपाध्याय पंडित बापूदेवशास्त्री हे आपल्या काळातील मोठे विद्वान व प्रतिभाशाली ज्योतिर्विद होते. यांचे कुटुंब कोकणातील गुहागर जवळील वेळणेश्वर गावचे. परांजपे हे त्यांचे मूळ आडनांव. महादेवाची सेवा करत असल्याने त्यांना देव-परांजपे म्हणू लागले. अष्टाध्यायी, शिक्षा, पिंगलसूत्र, रूपावली, अमरकोष आदी

विषयातील प्राथमिक शिक्षण नागपूर व पुणे येथे झाल्यानंतर त्यांना गणितशास्त्रात आवड निर्माण झाली. याच त्यांच्या आवडीमुळे त्यांनी सिंहोर (मध्य प्रदेश) येथील पॅलिटिकल एजंट लान्सिलाट बिलकिन्सनच्या साह्याने पाश्चात्य गणितशास्त्राचा अभ्यास केला. याच विलकिन्सच्या शिफारसीने त्यांना काशीस्थित गव्हर्नमेंट संस्कृत कॉलेजमध्ये सन १८४२ मध्ये ज्योतिष अध्यापकाची नोकरी मिळाली. 'बीजगणित' हा हिंदी भाषेतील ग्रंथ त्यांनी सन १८५० मध्ये तयार केला. व्यक्त गणितम्, भूगोल वर्णनम्, खगोलसार हे त्यांनी हिंदी भाषेत लिहिलेले ग्रंथ होत. त्याचबरोबर सूर्यसिद्धान्त सोपपत्तिक, फलित विचार, सायनवाद हे संस्कृतमध्ये लिहिलेले इतर ग्रंथ होत. सन १८६४ मध्ये त्यांना लंडनच्या रॉयल एशियाटीक सोसायटीने मानद सदस्यत्व देऊन सन्मानित केले.

बापूदेवशास्त्रींचे भारतीय पंचाग निर्मितीतील योगदानही बहुमोल आहे. त्यांनी तयार केलेले 'दृक सिद्ध पंचाग' या नावाचे पंचाग आजही काशीतून दरवर्षी प्रसिद्ध केले जाते. यांच्या विद्वत्तेच्या प्रभावाने ब्रिटीश सरकाने त्यांना सी.आई.ई. आणि महामहोपाध्याय या दोन पदव्यांनी सन्मानित केले. इ.स.१८८७ साली महाराणी व्हिक्टोरियाची सत्तेवर येऊन पन्नास वर्षे झाली होती. त्या निमित्ताने ब्रिटीश सरकारने संस्कृत पंडितांच्या सन्मानासाठी 'महामहोपाध्याय' ही पदवी निर्माण केली. ही पदवी मिळविणारे श्रीबापूदेवशास्त्री हे पहिले संस्कृत पंडित होते (उपाध्याय १९८३: १६७).

बाळशास्त्री रानडे (सन १८३९-१८८२)

बाळशास्त्री रानड्यांचे वडील गोविंदभट्ट हे कोकण-महाराष्टातील अंजनवेल गावाहून काशीला आले होते. त्यांचा पुत्र बाळशास्त्री रानडे याचा जन्म सन १८३९ मध्ये काशीतच झाला. बाळशास्त्री हे व्याकरणाशास्त्रातील नवीन शोधाकरता संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहेत. बाल्यावस्थेत असतानाच त्यांचा ब्रह्मावर्तातील बाजीराव पेशवे आणि चित्रकूटच्या विनायकराव पेशवे यांच्याशी संबंध आला होता. विनायकराव पेशव्यांनी त्यांची अलौकिक विद्वत्ता पाहून 'बाल सरस्वती' ही पदवी त्यांना दिली. ग्वाल्हेरच्या शिंदेसरकारकडूनही त्यांना मानसन्मान मिळाला होता. ग्वाल्हेरमध्येच बाबाशास्त्री बापट यांच्याकडून सिद्धान्त कौमुदी आणि मोरशास्त्रींकडून न्यायशास्त्रात आणि राजारामशास्त्री कार्लेकरांकडून व्याकरणशास्त्राचे शिक्षण मिळाले. मंडीनरेश आणि काशीनरेशांकडूनही त्यांना सन्मान प्राप्त झाला होता. व्याकरण-महाभाष्य टिप्पण, परिभाषेन्दुशेखर वरील 'सारासार विवेक' टीका आणि बृहज्ज्योतिष्टोम पद्धती हे ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत (उपाध्याय १९८३: १८१).

वाराणसीतील महाराष्ट्रीय समाजाची जीवनपद्धती

वाराणसीचे महत्त्व हे तिच्या धार्मिक जीवनावर अवलंबून आहे. पूजापाठ, तीर्थयात्रा आणि अध्ययन-अध्यापन हे या जीवनाची वैशिष्ट्ये आहेत. वाराणसीतील या जीवनाचे प्रतीक आजच्या प्रमाणेच सतराव्या शतकातील ब्राह्मणच होते. सन १६०० ते १६५० दरम्यान रचलेल्या वरदराजकृत 'गीर्वाणपदमंजरी' आणि सन १७०२ ते १७०४ दरम्यान लिहिलेल्या ढुंढिराजकृत गीर्वाणवाङ्मंजरी या ग्रंथात ब्राह्मण विशेषत: दक्षिणी म्हणजेच प्रामुख्याने महाराष्ट्रीय ब्राह्मणांचे दररोजच्या जीवनाचे चित्रण रेखाटले आहे. मोतीचंद्र यांनी 'काशी का इतिहास' या ग्रंथात वरील दोन ग्रंथातील आशयाबाबत चर्चा केलेली आहे. रघुनाथराव विंचूरकर हे महाराष्ट्रातील नासिक जवळील एका लहानशा संस्थानाचे अधिपती होते. त्यांनी सन १८४८ ते १८५१ दरम्यान काशीयात्रा केलेली होती. या काशीयात्रेचे वर्णन त्यांनी 'तीर्थयात्रा प्रबंध' या ग्रंथात केलेले आहे. या ग्रंथात त्यांनी वाराणसीतील ब्राह्मणी जीवनाचे चित्रण रेखाटले आहे. तसेच एकोणिसाव्या शतकातील अखेरच्या काही दशकातील वाराणसीतील महाराष्ट्रीय ब्राह्मणी समाजाचे चित्रण विश्वनाथ बापूजी धोपेश्वरकृत 'आमचे पुण्यक्षेत्र (काशी)' या ग्रंथातून दिसून येते.

गीर्वाणपदमंजरी आणि गीर्वाणवाङ्मंजरी यातून दिसणारी महाराष्ट्रीय ब्राह्मणी जीवनपद्धती

सदरील दोनही ग्रंथातून वाराणसीतील ब्राह्मण जीवनावर विशेषत: महाराष्ट्रीय ब्राह्मण जीवनातील भोजनावर विशेष प्रकाश पडतो. या दोनही ग्रंथात काशीतील ब्राह्मणांच्या गंगास्नान, पूजापाठ इत्यादी प्रात:काळच्या घडामोडींचे वर्णन येते. महाप्रयोगानंतर ब्राह्मण मणिकर्णिका घाटावर स्नान करत होते आणि त्यानंतर संध्या, ब्रह्मयज्ञ, निर्वाप, तर्पण आणि देवपूजा करत होते. आजही वाराणसीतील ब्राह्मणात आणि काही घरात विशेष प्रसंगी संन्याशाला घरी बोलावण्याची पद्धत आहे. वाराणसीतील मठात संपूर्ण भारतातून आलेले संन्यासी राहत असत. संन्याशाला आमंत्रण देताना सुद्धा ब्राह्मण आपल्या जातीचे भान राखत असत. गीर्वाणपदमंजरी मध्ये वाजपेयी म्हणजेच यजमान ब्राह्मण एका कर्नाटकी संन्याशाला आमंत्रण देतो, त्यातून या ग्रंथाचा लेखक वरदराज याच्या देशाचा-प्रांताचा पत्ता लागतो. गीर्वाणवाङ्मंजरी मध्ये यजमान ब्राह्मणाद्वारे एका महाराष्ट्रीय संन्याशाला आमंत्रण दिले गेले, त्यावरून त्या ग्रंथाचा लेखक ढुंढीराज हा महाराष्ट्रीय ब्राह्मण असावा हे कळून येते. त्यावेळी दक्षिणी ब्राह्मण हे बंगाली ब्राह्मणांच्या लांबलचक नावावरून त्यांची चेष्टा करायचे असे या ग्रंथातून दिसून येते.

संन्याशांना शिवाशिवीची खूप भिती वाटत असे, कारण रस्त्यावरून यजमानांच्या घरी जाताना 'बाजूला व्हा' अशी भूणभूण सारखी चालत असे. घरी पोहचल्यावर संन्याशाला उच्च आसनावर बसविले जात

असे आणि भोजनाच्या वेळी त्याच्या समोर मोठे (केळीचे) पान ठेविले जात असे. काही वेळेला संन्याशाला किंमती वस्त्रही दिले जात असे. भोजनानंतर यजमान ब्राह्मण आणि त्यांच्या परिवारातील इतर लोक संन्याशाबरोबर वार्तालाप करीत असत. संन्याशीही कधीकधी यजमानांच्या कौटुंबिक गोष्टीत रस घेत असे आणि काही वेळा सल्लाही देत असे.

वाराणसीतील दक्षिणी लोक आजच्या प्रमाणेच घाटांच्या आसपास राहत असत. गीर्वाणवाङ्मंजरी मधील यजमान हा बिंदुमाधव घाटाजवळील दूधविनायक मुहल्ल्यात राहत होता. आजच्या सारखाच तेव्हाही घराचा काही भाग भाड्याने देण्याची प्रथा होती. घराच्या चारही बाजूला ओवऱ्या असत आणि मध्यभागी मुख्य मोठे घर असे. भाड्याने राहणारा माणूस/कुटुंब अशाच एका ओवरीवजा घरात राहत असे.

गीर्वाणवाङ्मंजरीचा ब्राह्मण यजमान हा चिडचिड्या स्वभावाचा दाखविला आहे. तो आपली पत्नी तसेच मुलाला शिवी सुद्धा देत असे. ब्राह्मण आपल्याकडील रुपये हे अंत:पुरात एका चांदीच्या पेटीत ठेवीत असे. चौखंबा बाजारातून दोन रुपयाच्या ढेउआ पैशातून मूषक माधवच्या दुकानातून सामान खरेदी करण्याची यजमान ब्राह्मण आपल्या मुलास आज्ञा देतो. दोन रुपयात मुलगा खूप सामान खरेदी करतो, त्यावरून त्याकाळात वाराणसीत खूप स्वस्ताई असल्याचे दिसते. अडीच शेर तूप आठ आण्यात मिळत असे; म्हणजेच तूपाचा भाव आठ रुपये मण होता. पुढे मुलांकडून भोजनासाठी लागणाऱ्या वस्तूची यादी येते. त्यात वेगवेगळ्या प्रकारचे मसाले, आटा, मैदा, आणि भाजीची खरेदी तसेच अन्नपूर्णा मंदिराच्या बाजारातील कच्ची तशीच पिकलेली केळी आणि काळभैरवाच्या बाजारातील पालेभाजी इत्यादींची माहिती मिळते.

गीर्वाणपदमंजरी मध्ये विजापुर आणि मध्यदेशाचे वर्णन येते. मध्यदेशाच्या वर्णनात रत्ने, मसाले, धान्य, भाज्या, सारखर, मीठ, दूध, तूप, तेल, पशुपक्षी आणि वनस्पती या गोष्टी येतात. गीर्वाणवाङ्मंजरी मध्ये यजमान वाजपेयी गौड देशातील पिकपाण्याचे उत्पादन, तेथे राहणारे चार वर्ण, शिल्पी आणि नाच-गाण्यावाल्याचे वर्णन करतो. वाराणसीतील तत्कालीन पंडित हे मुघल प्रथेमधून उत्साहित होऊन आपले भौगोलिक ज्ञान वाढवत असण्याची शक्यता आहे. वेगवेगळ्या प्रांतातील शास्त्रांविरुद्धच्या गोष्टी त्यांना माहित होत्या. ज्या प्रदेशातून या गोष्टी येत असत त्यांची प्रशंसाही ते करत.

गीर्वाणपदमंजरी आणि गीर्वाणवाङ्मंजरी या मधून काशीतील ब्राह्मण जीवनाचे जे चित्र उभे राहते त्याच्या अगदी विरूद्ध चित्र सतराव्या शतकातील लेखक वेंकटाध्वरिकृत विश्वगुणादर्शचंपू या ग्रंथातून दिसून येते. काशीचे ब्राह्मण शस्त्र धारण करून आपल्या जीवनाचा निर्वाह करतात, देवतांना स्नान घालतात आणि वेगळ्या प्रकारे भात शिजवितात. उष्टे भोजन करायला त्यांना भिती वाटत नाही. मुसलमान तसेच खालच्या

जातीच्या लोकांशी संगत धरतात, चांडाळाच्या स्पर्शाची पर्वा न करता रस्त्यातून इकडे तिकडे फिरतात. प्रात:काळी स्नान करून धोब्याने धूवून आणि गाढवावरून आणलेले कपडे घालून बाहेर कामाला जातात. फिरत असताना ते अस्पृश्य अशा मुसलमान प्रमुखाला शिवतात आणि तसे असूनही ते त्यानंतर स्नान करीत नाहीत. ते अस्पृश्य तसेच मुसलमान लोक, जातीबाहेरील तसेच ज्ञानशून्य लोकांबरोबर भोजन करतात. शास्त्रविधी न समजता ज्या कन्यांबरोबर ते विवाह करतात, त्या जेव्हा तरूण-युवती होतात,त्या वेळी ते पैसे कमविण्यासाठी देशात इतरत्र फिरतात. एकमेकांशी मिळण्याच्या आशेमध्येच त्यांचे तारूण्य निघून जाते, अशा तऱ्हेने बुद्धी भ्रष्ट होऊन पतिपत्नी परलोकवासी होतात. वाराणसीतील लोक शिकलेले नसत. जर हजारात एकादा शिकलेला असेल तो श्रुतिस्मृतिच्या विरूद्ध काम करतो किंवा त्यांच्या पासून दूर जातो. मुसलमान हे स्वभावाने क्रूर, निर्दय आणि धर्मवेडे असून ते ब्राह्मणांचा धर्म आणि देवतांचा नाश करतात. कायस्थ लोक मुसलमानांची नोकरी स्वीकारून, त्याच्याकडून राज्यांच्या रक्षणाचे अधिकार प्राप्त करून देवता आणि बाह्मणांचे संरक्षणच करतात. शास्त्राचा अभ्यास करणारे ब्राह्मण यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान आणि प्रतिग्रह ह्या षट्कर्मात निरंतर असतात. त्यापैकी याजन, अध्यापन आणि प्रतिग्रह हे तर त्यांच्या उपजीविकेचे साधने होती. यजन, अध्यापन आणि दान या परमार्थाच्या गोष्टी होत्या, द्रव्याच्या अभावी ही तीन्ही कर्मे करण्यात शिथिलता येत असे (मोतीचंद्र १९६२: २४५-२४८).

रघुनाथराव विंचूरकर कृत एकोणीसाव्या शतकाच्या मध्यातील वाराणसीतील समाजाचे चित्रण

सन १८४८ ते १८५१ या काळात रघुनाथराव विंचूरकरांनी केलेल्या उत्तर हिंदुस्थानातील तीर्थयात्रेमध्ये काशीयात्रेचाही समावेश होता. जवळजवळ दहा महिने त्यांचे वास्तव्य काशीत होते. त्यायात्रेचे वर्णन 'तीर्थयात्रा प्रबंध' या ग्रंथात उपलब्ध आहे (लेले १९६४). काशीतील सामाजिक जीवन, तेथील यात्रा, उत्सव, यात्रेकरू यांचे अतिशय तपशीलवार वर्णन त्यात आहे. रघूनाथराव विंचूरकर हे मराठी ब्राह्मण असल्यामुळे सहाजिकच त्यांच्या वर्णनातून ब्राह्मणी महाराष्ट्रीय समाजाचे चित्रण प्रामुख्याने आढळते (लेले १९६४: ८२). लेले लिहितात, '' काशीक्षेत्री लोक भांग पिणारे आहेत. त्या ठिकाणी उत्तम वैदिक ब्राह्मण बहुत आहेत व त्याचप्रमाणे व्याकरण, न्याय, पूर्वमीमांसा-उत्तरमीमांसा म्हणजे वेदांत, या चार शास्त्रांत प्रवीण असे पुष्कळ शास्त्री आहेत. परंतु साहित्यशास्त्र म्हणजे नाटक, अलंकार, चंपू, यात विशेष म्हणण्यासारखा प्रवीण असा शास्त्री रघुनाथराव यास कोणीही आढळला नाही. तेथील ब्राह्मणांच्या शेंड्या फार लांब व मोठ्या असतात. पागोटे क्वचित कोणी घालतो. बहुधा बोडकेच असतात. लग्नांत वराच्या मागे देखील बोडके जातात. त्यांची पंचे नेसण्याची रीत फार आहे. ते बहुधा स्वच्छंदी असतात. त्यांस खाण्याची प्रीती फार असून, यात्रेकरी ब्राह्मणभोजन घालतात, त्यांत थोडे कमी पडले तर तोंडावर त्यांची निंदा

करण्यास ते मागे पुढे पाहत नाहीत. भोजनसमयी परस्परे आग्रह करण्याची त्यांची फार चाल आहे. काशीत पक्वाने फार उत्तम होतात. त्यांत मोतीचुराचे लाडू जसे तेथे होतात, तसे कोठेच होत नाहीत. त्या शहरी तांब्यापितळेची भांडी चांगली होतात. जरीचे काम व पीतांबर, पांबऱ्या वगैरे रेशमी कापडही चांगले तयार होते. बंगाली व राधानगरी कापड तेथे फार मिळते. प्रत्येक ठिकाणी बाजार चांगले आहेत. कोणताही पदार्थ मिळत नाही असे नाही. म्हणूनच काशीला हिंदुस्थानी लोक बनारस असे म्हणतात. बनारस ह्या शब्दाचा अर्थ असा आहे की, जेथे सर्व रस बनलेले आहेत ते ठिकाण. तेथे हलवायाची दुकाने बहुत आहेत आणि बहुतेक लोक त्या दुकानांतूनच आयते पदार्थ विकत घेऊन खातात. तेथे सोवळ्याओवळ्याचे मान कमी आहे. बहुतेक जिनसांची स्वताई असते. विड्याची पाने तेथे दोन जातीची मिळतात. एके जातीचे नांव बंगला व दुसरे जातीचे नांव मघई. त्यांत बंगला जातीची पाने फार तिखट व उष्ण असतात. मघईची पाने चांगली सुवासिक असतात. गुलाब, केवडा, यांचे पाणी तेथे बहुत मिळते. भांगेच्या घोट्यात हेच पाणी मिश्रण करितात. यामुळे त्याचा खप फार असतो.''

काशीतील शिमग्यातील बुढ्या मंगलचा उत्सव व आश्विन मासातील रामलीलेच्या उत्सवाचे अतिशय मनोहर वर्णन या ग्रंथात केलेले आहे. रघुनाथराव काशीत असताना अनेक मराठी माणसांच्या संपर्कात आले. त्यापैकी काही त्यांच्यासारखेच यात्रेकरू होते तर काही तेथेच स्थायीक झालेले महाराष्ट्रीय लोक होते. झांशीचे अधिपती आणि पुढे प्रसिद्धीस आलेल्या राणी लक्ष्मीबाईचे पती गंगाधरराव नेवाळकर. ग्वाल्हेरच्या शिंद्यांचे सरदार बाबा आपटे, मालेगांवकर राजेबहाद्दर, बाळाजीपंत नातू आदी प्रतिष्ठित लोकही त्यांना भेटतात. काशीक्षेत्रस्थांपैकी भट्टांचे वंशातील जयरामभट्ट, काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे वैयाकरण, गणेशशास्त्री हारडीकर नैयायिक, सोनभट्ट भुसकटे वैदिक रामचंद्रशास्त्री सोलापूरकर, काकाराम पंडित, आत्माराभट धर्माधिकारी यांच्याशीही त्यांच्या भेटी व बोलाचाली होत असत. काशीक्षेत्रातील मराठी लोकांनी बांधलेले घाट, मंदिरे, वाडे यांचीही माहिती 'तीर्थयात्रा प्रबंध' या ग्रंथातून मोठ्या प्रमाणात मिळते. काशीतील एकोणिसाव्या शतकाच्या मध्यातील समाजजीवनाचे प्रभावी चित्रण यातून दिसून येते (लेले १९६४: ७३-८०).

विश्वनाथ बापूजी धोपेश्वरकरकृत एकोणीसाव्या शतकाच्या अखेरच्या काही दशकातील वाराणसीतील महाराष्ट्रीय ब्राह्मणी जीवनपद्धतीचे चित्रण

विश्वनाथ बापूजी धोपेश्वरकरांचे वास्तव्य एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस दोन-तीन वर्षे काशीस होते. त्या अवधीत काशीत त्यांना आलेल्या अनुभवांच्या आधारे त्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस काशीमधील मराठी समाजाची सामाजिक स्थिती कशी होती हे सांगताना काशीतील मराठी

समाजजीवनातील ग्रामण्ये, मराठी भिक्षुक, शास्त्रीपंडित आणि त्यांचे संस्कृत विद्येचे अध्यापन, विधवांची स्थिती, ब्राह्मण भोजने आणि अन्नसत्रांवर भाष्य केलेले आहे (धोपेश्वरकर १९००). आपले अनुभव शब्दबद्ध करीत असताना आपल्या लिहिण्यामागील आपली भूमिका काय आहे याचे स्पष्टीकरण त्यांनी आपल्या प्रस्तावनेत केले आहे. ते म्हणतात, ''कर्मधर्मसंयोगाने माझे वास्तव्य जवळ जवळ तीन वर्षे काशीस झाले. इतक्या अवधीत अनेक गोष्टी माझे अवलोकनात आल्या, लोकस्थिती पूर्णपणे लक्षात आली, अनेक स्थलांविषयी अनेक गोष्ट ऐकल्या, त्या सर्वच पुस्तकात देता आल्या नाहीत. परंतु ज्या देण्यासारख्या वाटल्या त्या क्वचित्प्रसंगी स्वानुभवावरून दिल्या आहेत. तसे करताना कोणत्याही विशिष्ट पंथाचे अनुकरण न करिता क्षेत्राची वस्तुस्थिती काय आहे हे होताहोईल तितके कोणत्याही व्यक्तिस अथवा वर्गास उद्देशून न लिहिता प्रसंगपात् योग्य व वाजवी टीका करून वाचकांपुढे ठेविली आहे. पण जाणूनबुजून बहुजनांची मने दुखावण्याचा इराद्याने नव्हे, तर त्यात सुधारणा होणे इष्ट आहे एवढाच उद्देश आहे'' (धोपेश्वरकर १९००: प्रस्तावना पृ.३). एकोणिसाव्या शतकातील अखेरच्या दशकात धोपेश्वरकरांचे वास्तव्य तीन वर्षे काशीत झाले होते. त्याचबरोबर त्यांचे वास्तव्य महाराष्ट्रातही झालेले होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्राच्या प्रबोधनकाळातील सामाजिक सुधारणांचे वारे त्यांच्या विचारांवर पडलेले दिसतात. त्यामुळेच वाराणसीतील महाराष्ट्रीय ब्राह्मणीजीवन पद्धतीवर ताशेरे ओढताना त्यांच्यातील शिष्ट-अनिष्ट पद्धतीवर ते आपले मत व्यक्त करताना दिसतात. त्यामुळेच पुढील विवेचनात काशीतील महाराष्ट्रीय जीवन पद्धतीचे त्यांनी केलेले वर्णन त्यांच्या सुधारणावादी मतांसह उद्धृत केलेले आहे.

काशीतील मराठी समाजामध्ये प्रामुख्याने ब्राह्मण वर्गाचेच प्राबल्य होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सुद्धा या वर्गातील ग्रामण्यांचे स्वरूप कसे होते याचे विवेचन करताना धोपेश्वरकर लिहितात, ''त्यावेळीही पंचगंगाघाट, दुर्गाघाट, ब्रह्माघाट, दशाश्वमेधघाट या घाटांवर दाक्षिणात्यांची वस्ती पुष्कळ म्हणजे जवळ जवळ आठ हजार अदमासे होती. यापैकी खाऊन पिऊन सुखी असे लोक फार थोडे आढळतात, बाकी भिक्षुकवर्गाचा भरणा फार आहे. हा महाराष्ट्रीयांचा समाज जरी थोडा आहे तथापि त्याचे आपापसात नेहमी धर्मसंबंधी कलह लागले असतात व ग्रामण्याशिवाय एक आठवडाही सूना जात नाही. खरोखर काही भिक्षुक अशिक्षित व अक्षरशत्रु लोक तर आपला उदरनिर्वाह ग्रामण्यावरच करीतात. आज अमक्याने अमके काम केले, 'टाका त्याला जातीबाहेर!' पुन्हा चार दिवसांनी 'अमुक रुपये दे म्हणजे प्रायश्चित्त देऊन घेऊ!' वगैरे निंद्य व हलकट प्रकार येथे नित्य ऐकण्यात येतात. जातीबाह्य करणे जितके सोपे आहे, तितकेच किंवा त्याहूनही अधिक सोपे जातीत घेणे झाले आहे. येथील तडवाले लोक म्हणजे भिन्न भिन्न जातीतील मुख्य धर्माधिकारी यांचे हात गरम केले म्हणजे मग कसेही दोष असोत त्यास ते शुद्ध करून घेतात!'' (धोपेश्वरकर १९००: ८४).

धोपेश्वरकरांनी काशीतील भिक्षुकवर्गाबाबत फारच कठोर भाष्य केले आहे. हे भाष्य करीत असताना 'काशीकर म्हणजे लुच्चा' या वाक्प्रचाराचा वापर ते भिक्षुकांकरीता करीतात. भिक्षुकांचा चरितार्थ हा काशीला येणाऱ्या यात्रेकरूंवरच चालत असतो, असे सांगताना यात्रेकरूंचे रूपांतर पर्यटकांमध्ये झाल्याचेही निरीक्षण नोंदवितात. ते लिहितात, ''या भिक्षुकवर्गाप्रमाणे स्वार्थी व मतलबी लोक फारच थोडे आढळतील. पुष्कळ यात्रेकरूंना यांच्या ठगविद्येचा अनुभव आलाच असेल, म्हणून येथे अधिक लिहिण्याची आवश्यकता नाही. 'काशीकर' म्हणजे 'लुच्चा' हे सुप्रसिद्धच आहे. पुष्कळांना असे वाटत असेल की हे लोक क्षेत्रांत राहतात तेव्हा यांचे आचरणही शुद्धच असले पाहिजे. परंतु हा केवळ भ्रम आहे. यांची कृष्णकारस्थाने जर आज जगापुढे आणली तर यांचे आचरण एखाद्या टाकाऊ धर्मलंडापेक्षाही अधिक तिरस्करणीय व निंद्य ठरेल. आता सर्वच भिक्षुक असे असतील असे नाही; परंतु चांगल्यांची संख्या फार थोडी. या भिक्षुकांपैकी काही लोक चांगले सधन व घरंदाज असे आहेत. परंतु पुष्कळांची स्थिती शोचनीय आहे. या लोकांस भिक्षुकीशिवाय अन्य रोजगार नसल्याकारणाने येऊन जाऊन त्यांची भिस्त काय ती यात्रेकरूंवर असते. यामुळे एखाद्या वर्षी यात्रा कमी आली म्हणजे त्यांना पंचाईत पडते. शिवाय उत्तरोत्तर धर्मश्रद्धा कमी होत चालल्याकारणाने व पूर्वीप्रमाणे लोकांत आता त्राण उरले नाही. यामुळे दानधर्म करण्याची कोणास फारशी इच्छा होत नाही. आजकाल कित्येक लोक तीर्थविधि न करता फक्त क्षेत्रावलोकन करूनच परत जातात'' (धोपेश्वरकर १९००: ८५).

काशीतील मराठी पंडितांची परंपरा फारच मोठी आहे. सोळाव्या शतकापासून लिखित स्वरूपात आणि मोठ्या प्रमाणावर काशीतील या पंडिती परंपरेचे पुरावे मिळण्यास सुरूवात होते. भट्ट, शेष, धर्माधिकारी, चतुर्धर, पायगुंडे आदि कितीतरी मराठी घराणी काशीमध्ये प्रसिद्ध होती. इंग्रजी अमदानीत सुद्धा ही परंपरा सुरूच असलेली दिसते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस काशीतील मराठी शास्त्री-पंडित यांच्या विषयी धोपेश्वरकर लिहितात, ''महाराष्ट्र वर्गात सन्माननीय लोक म्हटले म्हणजे वैदिक व शास्त्री जन होय. पाश्चात्य ज्ञानापुढे यांचे तेज जरी झळकत नाही तरी हे लोक मोठ्या बाण्याने राहतात. पुष्कळांना राजाश्रय आहे. सांप्रत वेद विद्येचा जरी लोप होत चालला आहे तथापि काशीत अद्याप ती कायम आहे, इतकेच नव्हे परंतु चारी वेद मुखोद्गत असे अद्याप वैदिक येथे आढळतात. वेद मुखोद्गत असलेले लोक अन्य ब्रह्मवृंदांत आढळत नाहीत याचे काय कारण असेल ते असो. परंतु दाक्षिणात्यांत वेदाध्ययन फार आहे; यामुळे त्यांना सर्व लोक बहुमान देतात व मोठमोठ्या सभांतून त्यांची योग्य प्रकारे संभावना होते हे त्यांना फार भूषणास्पद आहे. वसंतपूजा, सभा वगैरे नित्यश: येथे चालू असतात व त्यावर यांचा चरितार्थ चालतो'' (धोपेश्वरकर १९००: ८६).

काशी क्षेत्र हे गीर्वाण भाषेच्या अध्ययनाचे एक आदिपीठच आहे, असे म्हणून धोपेश्वरकर काशीला 'हिंदुस्थानाचे ऑक्सफर्ड' अशी उपमा देतात. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस काशीमध्ये सुरू असलेल्या संस्कृत अध्ययनाबाबत त्यांनी उत्तम अभिप्राय दिलेला आहे. ते लिहितात, ''काशीतील बहुतेक पंडितांचे घरी संस्कृत पाठशाला व वेदशाला आहेत व अध्ययन काही गुरुदक्षणा न देता अगदी फुकट दिले जाते. ही गोष्ट स्तुत्य आहे. काही पंडित गरीब परंतु बुद्धिवान व होतकरू अशा विद्यार्थ्यांचे अध्ययन व पालनही करीतात. अशांची संख्या अर्थात थोडीच आहे. कारण देशकालवर्तमानानुसार असे करणे सर्वत्रांस साध्य नाही. परंतु ही पूर्वापार वेदकालापासून चालत आलेली शिक्षणपद्धती अद्याप दृष्टोत्पत्तीस येते, विद्या विक्रय करणे म्हणजे मोठे पाप आहे असा आमच्या लोकांचा पूर्वापार समज आहे; व धर्मशास्त्रालाही ही गोष्ट संमत नाही. परंतु हल्लीचे मन्वंतर सर्व बदलल्यामुळे सर्व गोष्टी आजकाल विपरीत चालू आहेत. असो. हे शास्त्री प्रात:काळी आपल्या शिष्यवर्गास घेऊन त्यांस निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने देतात. कोणी काव्य शिकतो आहे; कोणी व्याकरण अध्ययन करीत आहे; कोणी धर्मशास्त्राचे अध्ययन करीत आहे; कोणी वेदपाठ करीत आहे; वगैरे देखावा एखाद्या पंडिताचे घरी पाहिला असता मनाला मोठा संतोष होतो. आता ही शिक्षणपद्धति सर्वांशी निर्दोष आहे असे मुळीच नाही. परंतु त्यांतल्यात्यांत घेण्यासारखी गोप्ट अशी आहे की, गुरू व शिष्य यांमध्ये जे एक प्रकारचे प्रेम आढळते ते पाश्चात्य शिक्षण पद्धतीत सांपडत नाही'' (धोपेश्वरकर १९०० :८७).

काशीतील विधवा स्त्रियांच्या दयनीय आणि कष्टपद स्थितीचेही वर्णन धोपेश्वरकर यांनी केले आहे. हे करीत असताना त्यांची चौकस दृष्टीही दिसून येते. इ.स. १८९६ साली सुधारक वर्तमानपत्रात काशीतील विधवा स्त्रियांबाबत पंडिता रमाबाईंच्या लेखातील गर्भपात आणि बालहत्या यांचा संदर्भ देऊन काशीक्षेत्रासारख्या ठिकाणी असा अनाचार होणे ही गोष्ट एकंदर समाजाला मोठी निंद्य आहे असा निष्कर्ष ते काढतात. काशीतील विधवा स्त्रियांविषयी ते लिहितात, ''येथील विधवांची स्थिती फार खेदकारक आहे; व यांची संख्या संन्यासाप्रमाणे येथे पुष्कळ आहे. पति मरणोत्तर, ज्या कोणास त्राता नाही अशा विधवा काशीवास करण्याकरिता येतात. यात तरुणीही असतात; व वृद्धही असतात. येथे आल्या अथवा कोठेही गेल्या तरी आयुष्ययात्रा ही विधवांना कष्टकारक असते. काही लोकांचे घरी किंवा अन्नसत्रात कामकाज करून आपला उदरनिर्वाह करितात; किंवा कष्ट करण्याचे सामर्थ्य नसते; अशा विधवा भिक्षा मागतात किंवा अन्नसत्रात जेवून कालक्षेप करितात. ही गोष्ट आपल्या समाजास मोठी लाजिरवाणी आहे'' (धोपेश्वरकर १९००: ८८-८९).

काशीमध्ये येणाऱ्या यात्रेकरूंमध्ये पाप-पुण्यांच्या कल्पना असतात. तीर्थाला भेट देऊन पाप नष्ट करणे आणि पुण्यांची कमाई करणे याला यात्रेकरूंकडून प्राधान्य दिले जाते. त्यामुळे गंगास्नान, देवदर्शन, ब्राह्मणभोजन आणि दानधर्म या गोष्टीं काशीत मोठ्या प्रमाणावर शतकानुशतके सुरू आहेत. यात्रेकरूंकडून घालण्यात येणाऱ्या ब्राह्मणभोजनामुळे काशीमध्ये तयार झालेल्या आळशी, निरुद्योगी आणि भोजनभाऊ वर्गावर धोपेश्वरकरांनी भाष्य केले आहे त्यातून भोजनभाऊ ब्राह्मणवर्गाचे मार्मिक चित्र रेखाटले आहे. ते लिहितात, ''या क्षेत्रांत यात्रेकरू नेहमी येत जात असल्यामुळे सहस्रभोजने व ब्राह्मणभोजने नित्य चालू असतात. याचा परिणाम असा झाला आहे की, येथे एक आळशी, निरुद्योगी व भोजनभाऊ वर्ग कायमचा झाला आहे. वर्षातून आठ महिने उन्हाळा असल्यामुळे कपड्यालत्यांचीही फारशी आवश्यकता या देशात लागत नाही. अंगावर एक रुमाल किंवा लहान उपवस्त्र असले ह्मणजे ते अंगावर टाकून स्वेच्छाचाराने इत:स्तत: उघडे बोडके या क्षेत्रांत हिंडले तरी कोणी नावे ठेवीत नाही. ही स्थिती गरीब लोकांनाच लागू आहे असे नाही. परंतु मोठमोठाले शास्त्री व पंडितसुद्धा अशाच तऱ्हेने राहतात. काशीस्थ लोक जात्या फार मानी व चिकित्सखोर आहेत. भोजनाला कोठे जाणे असले म्हणजे तीन बोलावण्याखेरीज सहसा येत नाहीत. जेवणाचा बेत जर बारा वाजता असला तर सकाळचे आठ वाजल्यापासून बोलावणेकरी बोलावणे करून जातो. पहिल्या बोलावण्यात भांगेच्या तयारीत लागण्याचा कांहीचा प्रघात आहे. दुसरे बोलावणे आले की, स्नान करावयाचे; व तिसऱ्या वेळी मारून मुटकून स्वारी एकदाची बाहेर पडते; व ती अशा थाटाने की, हातात एक लहान तांब्या व फुलपात्र घेतलेले आहे; पांबरी किंवा कंद नेसली आहे, अंगावर एक रेशमी उपवस्त्र घेतले आहे कपाळाला भस्म फासले आहे किंवा गंधाचा टिळा लाविला आहे; कित्येकांना फार घाईचा बेत असला तर स्नान न करिता धोंडभट्टी सुद्धा चालते-अशा थाटाने भांगेच्या तारेत व आपला कोणी साथी असला तर त्याच्याशी घोगऱ्या आवाजात गप्पागोष्टी करीत, काशीच्या गलिच्छ गल्यांतून सोवळ्याने दूरपर्यंत जातात! आता भोजनाचे प्रसंगी आपल्या चालीप्रमाणे त्यांना आग्रह विशेष लागतो हे जरी खरे आहे तथापि इतक्याने ते तृप्त होत नाहीत. बुंदीच्या लाडवांचे भोजन असले तर त्या पक्वान्नास 'घोड्याचा दाणा' असे टोपण नाव त्यांनी दिले आहे. काशीतील भिक्षुकांना मोतीचूर फार प्रिय आहे व हे पक्वान्न काशीत चांगलेही होते. परंतु सर्व यजमानांना अशी शक्ति नसते, व ज्याला जशी ऐपत असेल त्याप्रमाणे तो करितो. काशीत भोजनाचा प्रकार ठराविक मक्त्यावर दिलेला जातो. ह्मणजे पात्री चार आणे, आठ आणे, रुपया वगैरे जसे पक्वान्न त्याप्रमाणे ठराव करून घेतात. परंतु त्यांतल्यात्यात लबाडी पुष्कळ होते. एखादा यजमान पंक्तित जाण्यासारखा नसला किंवा शुद्र असला म्हणजे साहजिक ही सर्व व्यवस्था एखाद्या ब्राह्मणाच्या डोक्यावर तो लादतो व मग मागेपुढे असे होते की १०० पानांचा मक्ता असला म्हणजे ५० किंवा पाऊणशे पात्रे घालतात व बाकी पैसे खिशात! हा अनुभव पुष्कळांना आलाही असेल. असा प्रकार जरी थोडा आहे

तरी तो आहे इतके म्हटल्यावाचून राहवत नाही. कित्येक ब्राह्मण तर दिवसांतून दोन तीन श्राद्धे झोडतात. या श्राद्धात किंवा सहस्त्रभोजनांत बहुतेक लोक आपल्या ओळखीचे किंवा आपले इष्टमित्र यांना बोलावूनच संख्या पूर्ण करितात. या योगे होते काय की, कधी कधी चांगल्या विद्वान ब्राह्मणावर क्वचित पाळी येते'' (धोपेश्वरकर १९००: ८९-९०).

वर सांगितल्याप्रमाणे काशीमध्ये अन्नदान केल्यामुळे पुण्य मिळते या कल्पनेमुळे अनेक दानशूर व्यक्तिंनी अन्नछत्रांची व्यवस्था केली होती. बाजीराव पेशवे(दुसरे), अमृतराव पेशवे, शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, पंतप्रतिनिधी वगैरे संस्थानिक यांनी काशीत अन्नछत्रे स्थापून त्यासाठी काही पैशांची व्यवस्था केल्याचा वृत्तांतही धोपेश्वरकर देतात. मराठीत एक म्हण आहे 'अडल्याची काशी कोणी जावे तिजपाशी' म्हणजेच ज्याला कष्ट करावयाचे नसतात तो काशीला जातो. म्हणजेच जीवन जगण्यापुरते सुद्धा ज्याला पैसे कमविता येत नसतील त्याने भिकारी बनून काशीस जावे. जीवनातून निवृत्त झालेली, वृद्ध झालेली किंवा ज्यांना आपल्या चरितार्थासाठी काहीही कमाविता येणे शक्य नसते ती माणसे काशीस जातात. काशीस अनेक दाते धर्मार्थ दान देत असतात, अन्नदान करीत असतात. त्यातूनच मरेपर्यंत या लोकांचा चरितार्थ चालू शकतो. धोपेश्वरकर सुद्धा 'मठी निद्रा व छत्री भोजन' हा वाक्प्रचार सांगून अन्नसत्रात बारानबारा चोवीस वर्षे भोजन करणाऱ्या भिक्षुकांविषयी लिहिताना अन्नछत्रांच्या व्यवस्थेविषयी भाष्य करतात. ते लिहितात, ''दातृत्वांत हिंदुस्थानवासी लोकांची सर्वत्र ख्याती आहे; व यासारखा दुसरा धर्मही नाही हे खरे. परंतु आमची दान करण्याची तऱ्हा काही निराळी आहे. कारण ते सत्पात्री आहे किंवा नाही हा विचार करण्याचे भानगडीत कोणी फारसे पडत नाही. हे या क्षेत्रातील अन्नसत्रे किंवा सदावर्ते किंवा अशा धर्मसंस्था यातील व्यवस्थेवरून लक्षात येईल'' (धोपेश्वरकर १९००: ९०).

धोपेश्वरकरांनी बाजीरावांच्या ब्रह्मावर्तातील अन्नसत्राचा दाखला देताना काशीतील अन्नसत्र शिंदे सरकारांनी कशा रितीने सुरू केले याचीही चर्चा केली आहे. ते लिहितात, ''पुण्यातून शेवटच्या रावबाजीचे पलायन झाल्यापासून ब्राह्मणज्ञातीस दारिद्र्याने घेरले आहे व त्यापैकी कांहीची वृत्ति जी भिक्षुकी तिला तेव्हापासून जी उतरती कळा लागली आहे तिचे वर्णन करता येत नाही. बाजीरावाबरोबर पुण्याहून पुष्कळ ब्रह्मसमुदाय निघाला व त्यांचे कायमचे ठाणे ब्रह्मावर्तास झाल्यावर त्यांनीही आपला मोर्चा तेथेच फिरविला. बाजीरावसाहेबांचे हयातीपर्यंत या ब्राह्मणांची चंगळ होती; परंतु त्यांचे पश्चात भिक्षुक लोकांची स्थिती इतकी खराब झाली की, ब्रह्मावर्तास गेलेल्या लोकांवर तर एक मोठा प्रसंगच पडला होता! पुष्कळांस तर उपाशी मरण्याची पाळी आली होती. परंतु दैववशात् कै.महाराज जयाजीराव शिंदे यांची स्वारी यात्रेनिमित्त काही वर्षापूर्वी तेथे गेली होती. त्यांनी त्यांची ती शोचनीय स्थिती पाहून प्रत्येक माणसी हयातीपर्यंत दोन रुपये

देण्याची व्यवस्था केली व ती अद्याप चालू आहे. या परोपकाराबद्दल ते व त्यांची मुले महाराजांना अद्याप दूवा देत आहेत. हे व अशाच कारणांनी आलेले लोक उत्तर हिंदुस्थानात फार आहेत. पैकी काशी व प्रयाग या ठिकाणी बरीच वस्ती आहे'' (धोपेश्वरकर १९००: ९३). ब्रह्मावर्ता सारखेच शिंदे सरकारांनी काशीला बालाजी घाटावर अन्नसत्र सुरू केले होते त्याची हकीगत धोपेश्वरकरांनी दिली आहे. ते लिहितात, '' येथे एक बालाजीचे अन्नसत्र आहे. या सत्रांत नित्य दोन तीनशे ब्राह्मण भोजन करतात. या संस्थानाचा खर्च शिंदे सरकाराकडून चालला आहे. सुमारे ३०-४० वर्षापूर्वी महाराज जयाजीराव शिंदे बहादुर यांची स्वारी या क्षेत्री आली होती. त्यासमयी त्यांनी ६ लाख रुपयांवर उदक सोडले व त्यांची इच्छा अशी होती की, ती रक्कम प्रत्येक ब्राह्मणास १०० रुपये दक्षणेच्या रूपाने द्यावी. ही गोष्ट काशीतील वैदिक व पंडित लोकास रुचली नाही. त्यांचा आग्रह असा पडला की, सरसकट सारखी दक्षणा न देता ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे दिली पाहिजे. त्यावेळी तारक मठाधिपति गोविंदबुवा हे महाराजांचे गुरु होते. त्यांचे सांगण्यावरून ही सर्व रक्कम सरकारात जमा केली व तिच्या व्याजावर हे अन्नसत्र चालू आहे. येणेप्रमाणे या सत्राचा वृत्तांत आहे'' (धोपेश्वरकर १९००: ९५-९६).

काशीतील अन्नछत्रे व त्यांचे व्यवस्थापन तसेच भोजनभाऊ भिक्षुकवर्गाबद्दल धोपेश्वरकरांनी अतिशय परखडपणे लिहिलेले आहे. ते लिहितात, ''या पुण्यक्षेत्री गरिबांना उदर निर्वाहार्थ अनेक सोयी आहेत. म्हणजे अन्नसत्रे होत. या सत्रांपासून एक प्रकारे निरुद्योगी लोकांस चांगलेच उत्तेजन मिळाले आहे असे म्हणण्यास हरकत नाही. काशीक्षेत्रांत सुमारे ३६० अन्नसत्रे आहेत असे ह्मणतात. परंतु ही अतिशयोक्ति असावी. तथापि इतकी गोष्ट खरी की, निदान शेपन्नास तरी आहेत. ही सर्व सत्रे या चालू शतकांतली असून राजाश्रित आहेत. या सत्रांत फक्त ब्राह्मणांनाच भोजन मिळते. अन्य जातीतही अशी सत्रे पुष्कळ आहेत. यावरून इतकी गोष्ट सिद्ध होते की, या क्षेत्रांत दानधर्म जितका होतो तितका अन्यत्र कोठेही होत नसेल. परंतु अशी शंका वाटते की, या अन्नसत्र स्थापकांचे काय उद्देश असावेत व ते कितपत सफल होत आहेत. केवळ वर्षोनवर्ष ब्राह्मणांनी जेवून क्षेत्रवास करावा इतकाच जर असेल तर तो पुष्कळांशी सिद्धीस जात आहे. परंतु सांप्रत रूढ असलेली दान धर्माची पद्धत म्हणजे पात्रापात्र विचार न करणे ही मुळीच इष्ट नाही व या पासून अनेक तोटे आहेत''(धोपेश्वरकर १९००: ९४).

दु:खितास सुखी करणे, क्षुधिताला अन्न देणे, वस्त्रहीनास वस्त्र पुरविणे वगैरे धर्म फार स्तुत्य आहे ही गोष्ट कोणीही कबूल करील. परंतु दान देते वेळी ते सत्पात्री आहे किंवा कसे अथवा त्याचा उपयोग चांगल्या तऱ्हेने होतो किंवा दुरूपयोग होतो याविषयी प्रत्येकाने विचार केला पाहिजे. अपात्री दान केलेले निरर्थक आहे असे शास्त्रातही सांगितले आहे. हेच तत्त्व धोपेश्वरांनी काशीतील अन्नसत्रात जेवणाऱ्या

ब्राह्मणांस लावले आहे. ते लिहितात, ''या क्षेत्रांत प्रतिदिनी सुमारे आठ हजार वस्तीपैकी अडीच हजार ब्राह्मण केवळ अन्नसत्रांवर आपली उपजीविका करून आहेत. पैकी स्त्री वर्गाचा येथे विचार कर्तव्य नाही. कारण त्या परतंत्र आहेत. शिवाय काही अंध, अपंग, रोगग्रस्त वगैरे लोक वजा करून सुमारे दीड हजार पुरुषसंख्या आढळेल. ही विचारसरणी फक्त दाक्षिणात्यांविषयीच आहेत. अन्य लोकांची यात गणना नाही. हे सर्व लोक नित्यशः यथेच्छ भोजन उडवून काय व्यवसाय करतात असा प्रश्न केला असता उत्तर असेच येईल की-काही नाही. स्नानसंध्या करून कालक्षेप करतात-नाही! वेदाध्यान किंवा शास्त्र पठण करतात-नाही! यापैकी पुष्कळांची दैनिक व्यवस्था म्हटली म्हणजे भोजन; नंतर वामकुक्षी; व सायंकाळी एखाद्या घाटावर किंवा भटकचेरीवर गप्पा झोकणे या पलीकडे काही नाही. अगर त्यांस कोणी विचारले की, तुह्मी येथे काय उद्योग करता? तर त्यांचा जबाब हाच मिळे की ''काशीवास.'' जणूकाय सत्रांत जेवणे म्हणजे काशीवास करणे की काय नकळे. अशा रीतीने आपल्या अमोल्य आयुष्याचे दिवस हे लोक फुकट घालवितात.'' (धोपेश्वरकर १९००: ९४-९५).

अन्नसत्रातील व्यवस्थापकांच्या लाडीलबाडीबाबतही धोपेश्वरकरांनी कोरडे ओढलेले आहेत. ते लिहितात, ''आणखी एक मोठे अन्नसत्र दशाश्वमेध घाटी आहे. या ठिकाणीही सुमारे ३०० ब्राह्मणांना भोजन मिळते व वर २ पैसे दक्षणा. जेवणाचा बेत इतका उत्तम असतो की, एखाद्या श्रीमान् गृहस्थाचे घरी सुद्धा तसा असेल किंवा नाही याची शंका आहे. हे अन्नसत्र मद्रास प्रांतांतील काही व्यापारी लोकांनी चालविले आहे. सदरहू दोन अन्नसत्रांना सोडून आणखी लहान मोठी अन्नसत्रे अनेक आहेत. पैकी बहुतेक दक्षिणेतील सरदारांची म्हणजे, नागपूरचे भोसले, पंतप्रतिनिधी, पंतसचीव वगैरे संस्थानिकांची आहेत. त्याचप्रमाणे अन्य ठिकाणी म्हणजे प्रयाग, गया, अयोध्या, मथुरा वगैरे सर्व क्षेत्रांत एकदोन लहान मोठी अन्नछत्रे आहेत. या अन्नसत्रांवर देखरेखीकरिता व्यवस्थापक कारकून हे ब्राह्मणच आहेत. यापैकी काही अन्नसत्रांत चांगली व्यवस्था आहे; परंतु काहीमधील प्रकार अगदी उलट आहे. म्हणजे जेथे १० पात्रांचे अन्नसत्र आहे त्याठिकाणी पांचच घालतात. कारण कारकुनाला येथे विचारणारा कोणी नसतो. अन्नसत्राचा यजमान हा काशीत नसल्याकारणामुळे वर्षांतून ठरावीक रक्कम संस्थानाप्रीत्यर्थ कारकुनाला पाठवितो. तेव्हा काशीतले रावसाहेब हेच बनतात, अशा तऱ्हेने लबाडीने पैसा मिळवून काही कारकून चांगले गब्बर श्रीमंत झाले आहेत. अशा गोष्टी स्वतः यजमान दूर असल्यामुळे त्याचे नजरेस येत नाहीत'' (धोपेश्वरकर १९००: ९७-९८).

महाराष्ट्रीय समाज, ग्रामण्ये आणि काशीतील धर्मसभेची निर्णयपत्रके

सोळाव्या व सतराव्या शतकातील उच्चविद्याविभूषित मराठी पंडीत घराण्यांनी संस्कृत विद्येमध्ये एक नवीनच क्रांती घडविली. विविध ज्ञानशाखेमध्ये विविध तऱ्हेचे काम अनेक लोकांनी केले. राज्याच्या आश्रयाने तयार

होणारे सारसंग्रह ग्रंथ हे सर्वसामान्य माणसांना डोळ्यापुढे ठेवून लिहिले जाऊ लागले व तो साहित्याचा सर्वसाधारण भाग बनला. कमलाकर भट्टांचा 'शुद्रकमलाकर', शेष कृष्णाचा 'शुद्राचारशिरोमणी' या ग्रंथांची निर्मिती होऊन त्याद्वारे समाजातील खालच्या वर्गालाही धार्मिक कृत्यात सहभागी करून घेतले जाऊ लागले. दक्षिणी पंडीतांनी यामध्ये मध्यवर्ती भूमिका बजावली (Shastri 1912: 7-12). त्यापैकी कित्येक लोक कोकण किनारपट्टीतून किंवा कृष्णा, गोदावरी, भीमा नद्यांच्या काठी असलेल्या धार्मिक क्षेत्रांतून स्थलांतरीत झाले होते. पैठणहून भट्ट व देव, कोपरगांवाहून चतुर्वेदी, पुणतांब्यातून पुणतांबेकर, नांदेडातून शेष घराण्यांबरोबरच पायगुंडे, भारद्वाज आदी घराणी महाराष्ट्रातून काशीला आली. विविध ज्ञानशाखांमध्ये त्यांनी केलेल्या अभ्यासातून कित्येक प्रख्यात ग्रंथ निर्माण झाले. काशीतील धार्मिक तसेच सांस्कृतीक क्षेत्रात त्यांनी आपल्या कर्तृत्वाने अधिकारीत्व मिळविले, समाजाचे नेतृत्व केले.

विलक्षण बौधिकत्व आणि सामाजिक संरचना या दोनही गोष्टी समजून घेण्यासाठी काशीतील सामाजिक वातावरण आणि हे पंडीत जेथून आले तो प्रदेश व स्थान विचारात घेणे महत्वाचे आहे. या काळातील जोराने होणारी सामाजिक स्थित्यंतरे बघणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्र देशातील ब्राह्मण वर्ग हा 'ब्राह्मण्यांच्या श्रेष्ठ-कनिष्ठ' या द्वंद्वात अडकला होता. गावातील तंटे विशेषत: जातीअंतर्गत आणि दोन जातींमधील तंट्यालाच सर्वसाधारण भाषेत 'ग्रामण्य' अशी संज्ञा वापरली जाते (मोल्सवर्थ १८५७: २५०). अशा तऱ्हेची ग्रामण्ये समाजातील सर्व स्तरातील जातींमध्ये होत होती. बहुतेक वेळा हे तंटे स्थानिक पातळीवर सोडविले जात असत. पण जर ते स्थानिक पातळीवर सोडविले गेले नाहीत तर ते समाजाच्या वरच्या स्तरात मोडणाऱ्या धर्मसभा अथवा शंकराचार्यांच्या पीठाकडे अंतिम निर्णयासाठी जात असत. महाराष्ट्रातील ब्राह्मण वर्गातील हे तंटे/ग्रामण्ये काशीतील धर्मसभेकडे येत असत. काशीतील धर्मसभेतर्फे ही निर्णयपत्रे/निवाडापत्रे तयार करून ती महाराष्ट्रातील ब्राह्मणसभेकडे पाठविली जात असत. हे न्यायनिर्णय फारच गुंतागुंतीचे असत. काशीमध्ये स्थलांतरीत झालेली ही पंडित घराणी आपल्या बरोबर महाराष्ट्रातील स्थानिक शत्रूभाव व नाराजी घेऊन येत असत. त्याचा परिणाम या निर्णयपत्रातील निर्णयावरही पडण्याची शक्यता असे. सोळाव्या शतकापासून हे स्थानिक तंटे अधिक जोरकसपणे पुढे आले. 'ब्राह्मण म्हणजे कोण?' हे शोधण्याचा प्रयत्नाला ते लागले. ब्राह्मणांचे अधिपत्य जोरकसपणे आणि न्यायोचित ठरविण्याचे नवे मार्ग शोधू लागले. ब्रिटीश काळामध्येही हे तंटे परतपरत निर्माण होऊन त्यावर नव्याने निर्णयपत्रे दिलेली आढळतात. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस वाराणसीतील महाराष्ट्रीय समाजजीवनातील ग्रामण्ये किती शुद्र आणि क्षुल्लक कारणांमुळे होत हे मागील प्रकरणात विस्ताराने लिहिलेलेच आहे.

महाराष्ट्रातील ब्राह्मणांची बदलती परिस्थिती

महाराष्ट्रातील ब्राह्मणांची उत्पती, त्यांच्यातील उपजाती, घराणी, वंश, स्थलांतर, वैवाहिक संबंध, धर्मांतरण या मुद्यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील ब्राह्मणांची ग्रामण्ये अभ्यासावी लागतील. सह्याद्रीखंड हे महत्त्वाचे स्थळपुराण असून त्यामध्ये ब्राह्मण जातीची उत्पत्ती आणि त्यांच्या उपजातींबद्दल अनेक प्रकरणे आहेत. संपूर्ण भारतात ब्राह्मणांना दोन विभागात विभागले आहे. (१) पंचगौड ब्राह्मण - यामध्ये उत्तर भारतीय ब्राह्मणातील सारस्वत, कान्यकुब्ज, मैथिली, गौड आणि उत्कल यांचा समावेश होतो. (२) पंचद्रविड ब्राह्मण - यामध्ये दक्षिणेतील महाराष्ट्र, आंध्र, द्राविड, कर्नाट आणि गुर्जर यांचा समावेश होतो. परशुरामाने समुद्र हटवून कोकण प्रांत कसा तयार केला आणि तिथे वेगवेगळ्या ब्राह्मण जातींना कसे वसविले याची माहीती सह्याद्रीखंडात वर्णन केली आहे. चित्तपावन आणि सारस्वत हे बाहेरून या प्रांतात आल्याचे यात वर्णन आहे. कऱ्हाडे, पाध्ये आणि इतर ब्राह्मण हे ब्राह्मण्यापासून दूर गेलेल्या ब्राह्मण उपजाती आहेत. सामाजिक वर्गीकरणाचे जतन करताना ब्राह्मण पंडितांमध्ये झालेल्या संघर्षातून काही ब्राह्मण उपजाती विंध्य पर्वताच्या दक्षिणेतील प्रदेशात स्थायिक अथवा स्थलांतरीत झाल्या. त्यातूनच पंचगौड आणि पंचद्रविड असे वर्गीकरण झाले असण्याची शक्यता आहे. पश्चिम भारतातील ब्राह्मण जातीसमूहाचे इतिहास अभ्यासक रा.भि.गुंजीकर यांनी ब्राह्मणांमधील आठ उपजातींची नोंद केली आहे. देशावरील देशस्थ ब्राह्मण, कोकणातील चित्तपावन किंवा चिपळूणे, कऱ्हाडे, शेणवी अथवा सारस्वत, देवरूखे, किरवंत, पद्ये, आणि पळशे या त्या जाती होत (गुंजीकर १८८४: १७९-१८०). इतिहासात या नावाची उत्पत्ती शोधणे कदाचित अवघड आहे. काही नावे गावांच्या नावावरून पडलेली असावीत, कारण काही ब्राह्मण जातीसमूहाची जास्तीत जास्त वस्ती त्या गावात राहत असावी. उदा.- चिपळूण, कऱ्हाड, देवरूख, पळशे. काही जातींची नांवे त्यांच्या व्यवसायावरून पडलेली असावीत. उदा.-किरवंत, धार्मिक दृष्ट्या कमी दर्जाची काम केल्यामुळे मूळ जातीतील उच्च दर्जा गमावलेल्या सारस्वत ब्राह्मण जातीतून ही जात तयार झाली. गोव्यातून कोकणात स्थलांतरीत झालेल्या सारस्वत ब्राह्मणांना शेणवी हे उपपद लावतात. कारकुनी अथवा तद्संबंधीत हुशारीची कामे याची असावीत असा हा शब्द दर्शवितो. देशस्थ ब्राह्मणाचा दुसरा गट आहे. काशीमध्ये स्थायीक झालेल्या दक्षिणी ब्राह्मणांमध्ये यांची संख्या जास्त आहे. वेदातील कोणत्यातरी एका शाखेशी जोडलेले ब्राह्मण म्हणजेच ऋग्वेदी, अथर्ववेदी ब्राह्मण, कोणत्यातरी पंथाशी जोडलेले म्हणजेच स्मार्त, माधव ब्राह्मण अशा सुद्धा ब्राह्मण उपजाती असतात. एखादा माणूस ब्राह्मण असणे किंवा षट्कर्मी असणे या एकाच नाण्याच्या बाजू आहेत. काळाच्या ओघात या ब्राह्मण समूहाने इतरही अनेक उद्योग करण्यास सुरूवात केली. सोळाव्या/सतराव्या शतकापासून काही ब्राह्मण घराण्यांकडे कर गोळा करण्याचे अधिकार होते, तसेच त्यांची लष्करी ठाणीही होती. ब्राह्मण तसेच मराठा घराण्यांकडे कारकूनी कसब, धार्मिक प्रतिष्ठा आणि

जमीनीवरील तसेच स्थानिक कचेरीवरही मालकी/ताबा होता. कोकणातील खोती ही पद्धत वंशपरंपरा महसूल मिळविण्याचे साधन होते. काही ब्राह्मण घराण्यांना धार्मिक कामे करण्याच्या बदल्यात जमीनीवरील करातून सूट दिलेली दिसते. काही ब्राह्मण लोकांनी धार्मिक पुरोहितपणाचा धंदा सोडून शेती तसेच सावकारी धंदा सुरू केला. देशस्थ ब्राह्मणांच्या मुलाला कोकणात धार्मिक कार्ये करण्याला रामचंद्र यादवाच्या काळात सुरूवात झाली. त्या बदल्यात त्यांना जमीन तसेच कचेरीही देण्यात आली. सतराव्या शतकाच्या शेवटी चित्तपावन ब्राह्मणांनी स्थानिक तसेच क्षुद्र जातीचे आहेत म्हणून विरोध केला. पळशी गावात राहणाऱ्या पळशे ब्राह्मणांना ते शुक्ल युजुर्वेदी शाखेचे ब्राह्मण नाहीत असे ते म्हणू लागले. सन १५२० ला कोकणात पोर्तुगीजांचे आगमन झाल्यावर गोव्यातून कोकणात तसेच देशात ब्राह्मणांचे स्थलांतर झाले. सतराव्या शतकात कऱ्हाडे ब्राह्मणां विरूद्ध कोकणातून तक्रार झाली की ते घाटावरून आले असून त्यांनी स्थानिक हक्क व व्यवसाय हडप केले आहेत (O'Hanlon 2010: 210).

महाराष्ट्रातील ब्राह्मण उपजातीमधील संघर्ष जेव्हा जेव्हा उग्र रूप धारण करू लागला तेव्हा एक ब्राह्मण उपजात दुसऱ्या ब्राह्मण उपजातीचे ब्राह्मणत्व नाकारू लागली. 'ब्राह्मण म्हणजे कोण? हा प्रश्न वारंवार विचारला जाऊ लागला. यातूनच न्याय-निवाडा करण्यासाठी या ब्राह्मण उपजातींनी काशी येथील धर्मसभेकडे हा प्रश्न नेला व त्यांच्या कडून वेळोवेळी निर्णय आणले गेले. पुढे आपण ब्राह्मण उपजातीतील सारस्वत ब्राह्मण आणि देवरूखे ब्राह्मण या दोन जातींना ब्राह्मण्यांच्या ग्रामण्यांना कसे सामोरे जावे लागले व त्यातून त्यांनी आपली सुटका कशी करून घेतली हे पाहणार आहोत.

सारस्वत ब्राह्मणांची ग्रामण्ये व काशीतील धर्मसभेची निर्णयपत्रके

महाराष्ट्रातील सारस्वत ब्राह्मणांचे मूळ उत्तर भारतातील पंचगौड ब्राह्मणापैकी एक असलेल्या गौड ब्राह्मणांशी असलेले दिसते. परशुरामाने जेव्हा पृथ्वी निःक्षत्रिय केली त्यावेळी त्याने यज्ञ केला. त्यावेळी त्याने गौड ब्राह्मणांना कोकणात आणले असे सह्याद्रीखंडात वर्णन आहे. त्यांची प्रारंभिक वस्ती गोवा प्रांती झाली. ग्रामप्रमुख आणि मंदिराच्या साधन संपत्तीवर असणारे त्यांचे नियंत्रण यामुळे ते पोर्तुगालच्या राज्यात 'राजकीय मध्यस्थ' आणि 'करसंकलन अधिकारी' म्हणून प्रस्थापित झाले. समकालीन कागदपत्रात त्यांचा उल्लेख येत असून शिक्षक, राज्यकारभार आणि राजदूत/दुभाषे म्हणून ते काम करीत होते. ते व्यापारही करीत. कोकण आणि दख्खनच्या घाटमार्गातून होणाऱ्या तरतऱ्हेच्या वस्तूंचा व्यापार करण्यासाठी त्यांनी वखारी उभारल्याचीही नोंद आहे. गोव्यातून कोकणात आलेल्या सारस्वत कुटुंबांना 'शेणवी' असे म्हणतात. अशा या गौड सारस्वत ब्राह्मणांवर सतराव्या शतकात म्हणजेच इ.स. १६३० व १६३१ या साली दोनदा ग्रामण्ये आल्याची नोंद आहे. त्यानंतर सन १६६४ साली झालेल्या ग्रामण्याचा निर्णय हा रत्नागिरी

जिल्ह्यातील राजापूर येथे विशेष धर्मसभा भरवून करण्यात आला. अशा तऱ्हेने शिवकाळातच या समाजावर तीन ग्रामण्ये झालेली दिसतात.

सन १६३० मधील ग्रामण्य

मुंबईतील प्रसिद्ध देवालय वालुकेश्वर आणि तेथील पूजा अर्चा ही सर्व सारस्वत ब्राह्मणांपाशी आहेत, ती काढून घेण्याकरीता, हे ब्राह्मण नव्हेत असे म्हणून सरकारात फिर्यादी झाल्या होत्या. त्या संबंधाने काशीहून निर्णयपत्र आणले. काशीच्या धर्मसभेने सारस्वतांच्या बाजूने निर्णय दिला आहे. वैशाख १५५२ म्हणजेच एप्रिल-मे १६३० रोजी संस्कृतमध्ये निघालेल्या निर्णय पत्रात पुढील मजकूर होता (आपटे १९३५: २-३).

निर्णयपत्राची सुरूवात ही देशस्थ, चित्तपावन, कर्नाट, गुर्जर आणि मुंबईत राहणारे इतर ब्राह्मणवर्ग आणि काशीस्थित दादामभट्ट आणि इतरांना शुभेच्छा देऊन करण्यात आलेली आहे. निर्णयपत्र पुढे म्हणते की कुशस्थळी आणि साष्टी या तुमच्या देशातील घराणी षट्कर्मे करतात याला तुम्ही हरकत घेतली. पण त्यांची ही कृती अयोग्य आहे असे म्हणणे शक्य नाही. देशावर ही माणसे संन्यास घेतात, सगळीकडे श्रौत आणि गृह म्हणजेच अग्नीहौत्रासारखी वैदिक कर्मे करतात असे विद्वान लोकांच्या तोंडून ऐकावयास येते. आणखी महत्वाचे म्हणजे याच्या जातीत चौथ्या टप्प्यावर संन्यास घेतात हे कमलाकर भट्टाने सांगितले आहे. ते गौड जातीचे ब्राह्मण असून त्यांच्या जातीत त्यांना मान आहे. सारस्वत ब्राह्मणांच्या या समुदायाने इतर स्थानिक ब्राह्मणांचे शत्रूत्व ओढून घेतले. पूर्ण ब्राह्मण पदासाठी आवश्यक अशी षट्कर्मे करण्याला ते लायक आहेत या त्याच्या दाव्याला त्यांचा विरोध होता.

काशीच्या धर्मसभेने त्यांचे म्हणणे योग्य ठरविले. त्यांच्या परंपरा बघून आणि त्यांच्यातील जीवनाच्या चौथ्या आणि शेवटच्या टप्प्यावर संन्यास घेण्याची प्रथा बघून ते ब्राह्मण असल्याचे त्यांनी मान्य केले. संन्यास घेणे हे ब्राह्मणत्वाचे महत्वाचे लक्षण आहे यावर कमलाकर भट्टाने जोर दिला. हे पत्र सर्व लोकांनी पाहिले आहे. एकोणीस जणांच्या या निर्णयपत्रावर स्वाक्षऱ्या असून त्यांत काशीतील भट्ट, शेष, धर्माधिकारी, देव, जडे, पुणतांबेकर, मित्र, देव, तारे, दशपुत्रे, पुराणिक, कर्करे, अयाचित आणि अग्निहोत्री घराण्यातील प्रतिनिधी आहेत (आपटे १९३५: २-३). दत्तोपंत आपटे (१९३५) यांनी लेखामध्येच या लेखाचा कालखंड संदिग्ध असल्याचे म्हटले आहे. हा लेख प्रसिद्ध होण्याअगोदरच सन १८८४ मध्ये रा.भि.गुंजीकर लिखित 'सरस्वती मंडल' नामक पुस्तकात परिशिष्ट २ रे, लेख २, पृ.२६-२७ वर थोड्याफार फरकाने हाच लेख छापला आहे. मात्र त्यांचा कालखंड ते सन १७८८ हा देतात.

सन १६३१ मधील निर्णयपत्र

गोव्यात फिरंगी लोकांनी सासष्टी प्रांत जाळून लुटून बलात्काराने बाटविला त्यावेळी केळोशी नजीक कुशस्थळी ग्रामी असलेल्या गौडपादाचार्य परंपरतेतील प्राचीन मठाचा सन १५६७ मध्ये नाश करण्यात आला. मठ उध्वस्त झाल्यानंतर तत्कालीन परंपरागत स्वामी (श्रीमद् भवानंद सरस्वती) हे गोवा प्रांताच्या आसपास गोळवण, चिन्नर वगैरे मठात काही काळपर्यंत राहिले. गोव्यात लौकर स्वस्थता होण्याची चिन्हे दिसेना, तेव्हा कोठेतरी पुण्यक्षेत्रांत वास्तव्य बरे, म्हणून श्रीक्षेत्र काशी येथेच जाऊन राहू लागले.

पुढे सन १६०० (शके १५२२) च्या सुमारास फिरंगी अंमलात सर्वत्र स्वस्थता झाल्यावर गोव्यातील ब्रह्मवृंदाला शिक्षादीक्षादिदानार्थ परंपरागत धर्मगुरूंची आवश्यकता वाटून त्यांचा शोध चालविण्यात आला. तेव्हा सदानंद स्वामींचे शिष्य, श्रीमद् भवानंद सरस्वती काशी क्षेत्री होते तेच परंपरागत धर्मगुरू आहेत असे समजून त्यांना गोवा प्रांती श्रीशांतादुर्गा देवीच्या सान्निध्यात पुन: मठ तयार करून राहण्यास विनंती करण्यात आली. पण त्यांस काशीवास विशेष श्रेयस्कर वाटून स्वत: गोमंतकी येण्यास नकार दिला (पिसुर्लेकर १९६६: १४६). प्राचीन कुशस्थळी मठ पुनर्जीवित करण्याच्या उद्देशाने काशीच्या धर्मपीठाने सन १६३१ साली एक निर्णयपत्र दिलेले आहे.

कुशस्थळी निवासी विठ्ठल शेणवी नावाचा मनुष्य यात्रेनिमित्त काशीला आला व त्याने काशीतील धर्मसभेला विनंती केली की मला संन्यासदीक्षा द्यावी. संन्यास घेतल्यानंतरच त्याला नव्या मठाचा मुख्याधिकारी बनता येणे शक्य होते. काशीतील धर्मसभेतील विद्वान ब्राह्मणांनी चर्चा करून 'संमतीपत्र' काढले. त्यावर म्हणजेच या निर्णयपत्रावर संमतीदर्शक म्हणून धर्मसभेतील पंडीतांच्या स्वाक्षरी आहेत (गुंजीकर १८८४: २२-२४). निर्णयपत्रावर स्वाक्षरी करणारे ब्राह्मण हे ब्राह्मणातील वेगवेगळ्या उपजातींचे प्रतिनिधीत्त्व करताना दिसतात. सह्याद्री प्रदेशातील ब्राह्मणांना उद्देशून हे निर्णयपत्र दिले आहे. ब्राह्मणांची पंचगौड ब्राह्मण आणि द्रविड ब्राह्मण अशी परंपरागत विभागणी केलेली आहे. निर्णयपत्राची भाषा संस्कृत असून ते पुढील प्रमाणे आहे- 'विश्वेश्वराच्या शहरात राहणारे सर्व पंचद्रविड ब्राह्मण म्हणजेच द्रविड, आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र आणि गुर्जर यांनी दक्षिणेतील सह्याद्री पर्वतरांगेत राहणाऱ्या पंचगौड व पंचद्रविड ब्राह्मणांना नमस्कार करीत आहोत. हल्ली एक कुशस्थहीहून विठ्ठल, श्यामराज यांचा मुलगा काशीयात्रेला आला आहे. त्याने आमच्या धर्मसभेपुढे संन्यासदीक्षा देण्याची विनंती केली आहे.'

काशीतील पंचद्रविड मधील विद्वान ब्राह्मण विश्वेश्वराच्या मंदिरातील मुक्तीमंडपात येऊन याबाबतीत खोलवर चर्चा केली. कुशस्थलीहून आलेला विठ्ठल हा सारस्वत ब्राह्मण असून पंचगौड ब्राह्मणांमधील असल्याचे त्यांनी ठरविले. श्रुतिस्मृतींनी सांगितलेले आचार आणि षोडश संस्कार यांना आहेत. ब्रह्मचर्याश्रम,

गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम या चारही आश्रमाला अनुरूप त्यांचे कर्म आहे, आठव्या वर्षी त्यांचे उपनयन होते. यावरून सर्वानुमते ते ब्राह्मण आहेत असा निर्णय झाला. धर्मसभेपुढे सारस्वतांच्या मत्स्याहाराचा प्रश्न पुढे आला. परंतु हा काही फार मोठा अडथळा नाही असे धर्मसभेला वाटले. कोकणातील पंचगौड मासे खातात त्याला फार मोठी परंपरा असून परशुरामानेच याला मान्यता दिलेली आहे. त्यामुळे धर्मसभेतील पंडीतांनी त्यांना पूर्ण ब्राह्मण असल्याचा निर्वाळा दिला. षोडष संस्कारासाठीही ते पात्र आहेत असेही सांगितले.

वरील निर्णयामुळे कुशस्थळी येथील मठाचा 'मठाधिपती' होण्याचा विठ्ठलाचा मार्ग मोकळा झाला. संन्यास ग्रहानंतर त्याचे 'सच्छिादानंद सरस्वती' असे नामकरण केले गेले धर्मसभेने त्यांना पुढील सूचना दिल्या.

तेथे संन्यासमंत्रोपदेश करणारे संन्यासी भवानंदसरस्वती या नावाचे गुरु आणि भट्टकुलोत्पन्न लक्ष्मणभट्ट या सर्वांनी सुचविले की, स्वदेशी जाऊन वाहन, छत्रचामर, शिष्यपरंपरा, शिक्षा, दीक्षा देणे इत्यादी करावे, स्वजातीयांनी त्यांची आज्ञा मान्य करणे योग्य आहे.

या निर्णयपत्राला संमती दर्शविणाऱ्यांची मोठी यादी जोडली आहे. त्यामध्ये भवानंद सरस्वती यांच्या बरोबरच शेष, दीक्षित व धर्माधिकारी घराण्याचे प्रतिनिधी आहेत.

वरील दोनही निर्णयपत्रात शेणवी हे ब्राह्मण आहेत असे सांगितले असून सुद्धा तब्बल ३० वर्षाने हा विवाद परत उभा राहिला. या वेळेला काशी हे ठिकाण नसून कोकणातील राजापूर येथे ही धर्मसभा भरली. सन १६६४ मध्ये भरलेल्या या धर्मसभेशी काशीचा संबंध असल्याचे दिसते. काशी येथील भट्ट घराण्यातील प्रसिद्ध विद्वान गागाभट्ट या धर्मसभेला उपस्थित असून तेच हे निर्णयपत्र देतात. या सभेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नुकत्याच उदयास आलेल्या शिवाजी महाराजांच्या प्रदेशात ही धर्मसभा भरविली होती (पटवर्धन १९३३: २९३).

निर्णयपत्राच्या सुरूवातीला कोकणातील कऱ्हाडे व इतर ब्राह्मणांचे स्वागत करून गागाभट्ट पुढे लिहितात की, '' माझ्याकडे आलेल्या तुमच्या शिष्टमंडळाने मला एक उदान्तपत्र दिलेले असून त्यात खूप वर्षापूर्वी 'शेणवी' कोकणातील लोक त्याच्या प्रदेशात झालेल्या परकीय सत्तेच्या संकटाने आणि दुष्काळाने स्थलांतरीत होऊन राजापूर आणि पट्टन येथील रहिवासी झाले. या प्रांतातील त्यांची संख्या वाढल्याने येथील लोकांनी त्याच्याबाबत आक्षेप घेतले. त्यांचा धर्म कोणता आहे? भूतकाळातील त्यांची जीवनपद्धती काय होती? याबाबत तुम्ही आम्हाला लिहून पाठविलेत तर त्यांनी कसे जीवन जगावे हे आम्हाला सांगता येईल.''

यावर माझे उत्तर पुढील प्रमाणे आहे - शिवाजी महाराजांकडे हा प्रदेश आल्यानंतर सह्याद्रीमध्ये राहणारे, ब्राह्मणांसारखा पेहराव करणारे शेणवी (जमातीचे) लोक त्यांच्याकडे भेटवस्तू घेऊन गेले. त्यांची भेट स्वीकारल्यानंतर राजाने दरबारातील पंडितांना, प्रांतातील धर्माधिकाऱ्यांना विचारले की, ''या शेणवी लोकांचा धर्म काय आहे? त्यांची पारंपारिक जीवनपद्धती काय आहे? हे शेणवी लोक दिसतात ब्राह्मणासारखे, पण काम करतात शेतीचे.''

पत्राच्या पुढील भागात धर्मसभेसाठी जमलेल्या विद्वान ब्राह्मणांची यादी येते. यामध्ये प्रामुख्याने काशीस्थित ब्राह्मण घराण्यातील प्रतिनिधी आहेत. त्यांचे नेतृत्व गागाभट्ट करतात. भट्टोजी दीक्षित घराण्यातील शितीकांत दीक्षित, शिवाजी महाराजांच्या दरबारात पुढे पंडित झालेले रघुनाथ पंडित, शिवाजी महाराजांचे दरबारी कवी कविंद्र परमानंद, शिवाजी महाराजांचे कुलोपाध्याय प्रभाकर उपाध्याय, काशीस्थित देव घराण्यातील अनंत उपाध्याय, शेष घराण्यातील महादेव शेष यांचा समावेश होतो. कृष्णा गोदावरी नद्यांच्या प्रदेशातील विद्वान ब्राह्मणही यात आहेत. राजापूर येथील धर्माधिकारी असणाऱ्या गुर्जर घराण्यातीलही प्रतिनिधी आहेत. शृंगारपूरच्या राजांचे पुरोहित व ज्योतिषी असणाऱ्या पुरोहित घराण्याचे प्रतिनिधी, तसेच शिवाजी महाराजांच्या प्रांतातील ब्राह्मण समाजाचे पुरोहित गोलवलकर पाध्ये घराण्याचे प्रतिनिधी या धर्मसभेत उपस्थित होते. स्मृतीकौस्तुभ, दिनकरोद्योत, भागवतभास्कर, गोविंदार्णव या ग्रंथाद्वारे या धर्मसभेत या विषयावर चर्चा झाली. शेवटी गागाभट्टांच्या नेतृत्वाखाली भरलेल्या धर्मसभेने आपला निष्कर्ष काढून तो राजाला म्हणजेच शिवाजी महाराजांना कळवला. संकटे, दुष्काळ यामुळे होणारे स्थलांतर, तसेच त्यामुळे त्यांच्या जीवनपद्धतीत झालेले बदल यावर यात चर्चा करण्यात आली. इतिहासकाळात दुष्काळामुळे शेणवी कसे जगले याबाबत चर्चा झाली. त्यांनी स्वीकारलेले कृषीकर्म आणि इतर व्यवसाय यावरही चर्चा करण्यात आली.

शेणवींचा इतिहास पुढे दिला आहे. गागाभट्टांनी सह्याद्रीखंडातील इतिहास सांगितला नाही, कारण ते सारस्वत ब्राह्मणांना मदत करणारे होते. त्यांनी पद्मपुराणातील नारदाची गोष्ट नमूद केली. जगामध्ये दुष्काळ पडला असता खूप ब्राह्मणांचा नाश झाला. खूप लोक स्थलांतरीत झाले. काही ब्राह्मणांनी वनस्पती आणि दुग्धजन्य पदार्थांवर उपजिविका केली. शेणवी लोकांनी मासे, समुद्रीप्राणी, हरिण, पक्षी, जंगली तसेच पाळीव प्राणी खावून उपजिविका केली. त्यातून आपला स्वतःचा मार्ग शोधला. यामुळे त्यांनी ब्राह्मणत्वाचा जीवनमार्ग सोडला. यानंतर शेणवींनी आपले कृषीकर्म आणि इतर व्यापार सुरूच ठेवला. त्यामुळे त्याचा सामाजिक दर्जा बदलला. कृषीकर्म हीच त्यांची पारंपारिक जीवनपद्धत बनली. त्यांनी वैश्यवृत्ती धारण केली. शेणवी मासे खातात हा राजापूर येथील धर्मसभेपुढील प्रश्न नव्हता, तर शेणव्यातील काही लोक

पिढ्यानपिढ्या शेतकरी आहेत ही गोष्ट त्यांच्यापुढे होती. शेतीसंबंधांमुळे ब्राह्मणांचे गुणधर्म असुरक्षित झाले आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या शेतकी हालचालीमुळे, व्यापारामुळे ब्राह्मणत्त्वाच्या खुणा पुसल्या जात आहेत. अशा प्रकारच्या चर्चा धर्मसभेत झाल्या. या निर्णयावर शेणवी समाजांच्या काय प्रतिक्रिया आहेत त्याचा पत्रव्यवहार उपलब्ध नाही. या धर्मसभेचा उल्लेख नंतरच्या कुठल्याही जातीसभेमध्ये सापडत नाही. नंतरच्या काळात शेतकरी असणे हे ब्राह्मणत्त्वाच्या आड आलेले दिसत नाही या प्रदेशातील अनेक ब्राह्मण जातीसमूहात शेती व व्यापार ही कर्मे चालत आलेली दिसतात.

देवरूखे ब्राह्मणांची ग्रामण्ये व काशीतील धर्मसभेची निर्णयपत्रके

देवरुखे ब्राह्मणांचा प्रथम उल्लेख 'शतप्रश्नकल्पलता' या सन १६९० मध्ये लिहिलेल्या ग्रंथात आढळतो. या ग्रंथातील 'चितळे-भट्ट' प्रकरणातील 'ब्राह्मणांचा' उल्लेख 'देवरुखे ब्राह्मण' असा केला आहे. या चितळे-भट्ट प्रकरणात देवरुखे ब्राह्मण हे अपंक्त कसे ठरले याची कथा येते. वासुदेवभट्ट चितळे नावाचा विद्यासंपन्न आणि धनधान्यसंपन्न चित्तपावन ब्राह्मण रत्नागिरी जवळील बसणी गावी राहणारा होता. त्याने रस्त्यावरील एक बुजलेले तळे तेथे पाणी काढावे या हेतूने खणण्यास घेतले होते. त्यावेळी त्याने असा नित्यक्रम आरंभिला की जो कोणी रस्त्याने जाणारा भेटेल त्याला तळ्यातील मातीच्या चार पाट्या वाहण्यास सांगावे. चांगले कार्य आहे असे पाहून व त्याचा नांवलौकिकही ऐकण्यात आलेला असल्याकारणाने विशेष काही आडकाठी न घेता कोणीहि त्याप्रमाणे करीत असे. पुढे एके दिवशी असे झाले की, त्याच रस्त्याने काही पाच दहा ब्राह्मण, वेदशास्त्रविशारद, इष्टापूर्तादि करणारे व तर्कशास्त्रात कुशल असे ब्राह्मण येत होते. त्यांना ह्या चितळे भट्टाने वरील प्रमाणेच सांगितले. पण ती गोष्ट या ब्राह्मणांना पसंत पडेना. त्या ब्राह्मणांनी ते काम करण्यास नकार दिला. त्यामुळे चितळे भट्टाने रागावून त्यांना शाप दिला की तुमच्या पंक्तीला कोणीही जेवावयास बसू नये व जे बसतील त्यांना दारिद्र प्राप्त होईल. शतप्रश्नकल्पलताकाराच्या म्हणण्याप्रमाणे हा तळ्याच्या पाळीवरील वृत्तांत शके १४९९ (सन १४९०) मध्ये घडला व तेव्हापासून चितळे भट्टाचा एक पक्ष उत्पन्न होऊन देवरुखे ब्राह्मणांच्या अपंक्ति प्रकरणाला सुरूवात झाली असावी (पिंपुटकर, १९२६:१४). देवरुखे ब्राह्मणांच्या अपंक्ति प्रकरणाचा विषय सर्वदूर पसरलेला दिसत नाही. प्रत्यक्षात देवरुख्यांचे सर्व व्यवहार सुरळीत सुरू असलेले दिसतात. चितळे भट्ट पक्षाचा द्वेषाग्नि कोठे कोठे धुमसत राहून मधून मधून त्याने पेट घेतलेला आहे. इतिहासात सर्वसाधारपणे दर पन्नास ते शंभर वर्षाच्या अंतराने हे प्रकरण पुढे येऊन देवरुखे ब्राह्मणांच्या अपंक्ति प्रकरणांचा तंटा नाशिक, पैठण आणि काशी क्षेत्री जाऊन तेथील धर्मसभेकडून निर्णयपत्रे मिळविलेली दिसतात. प्रत्येक निर्णयपत्रकात देवरुखे पंक्तिपावन असल्याच्या निर्णय झालेला दिसतो.

सन १४९० मध्ये या चितळे भट्ट प्रकरणानंतर सुमारे दोनशे वर्षाच्या अवधीत देवरुखे ब्राह्मणांनी आपण पंक्तिपावन आहोत हे सिद्ध करण्यासाठी काशीस्थित धर्मसभेकडून सन १५८३, १६५७ आणि १६८३ या वर्षी जातीनिर्णय पत्रके आणली. अशाच तऱ्हेचे तंटे त्यांनी महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांकडे तसेच पैठण येथील धर्मसभेकडे नेऊन तेथूनही जातीनिर्णयपत्रे मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

सन १५८३ मधील मुक्तिमंडपातील निर्णय

सन १४९० मध्ये चितळे भट्ट प्रकरण घडल्यानंतर हा वाद कोकणातील काही लोकांच्या प्रयत्नाने म्हणा अगर प्रत्यक्ष श्रीक्षेत्र काशी येथेच उपस्थित झाले म्हणून म्हणा, पण हे प्रकरण आणखी ८६ वर्षांनी थेट प्रत्यक्ष श्रीकाशीक्षेत्रापर्यंत जाऊन त्याचा एक निर्णय लागलेला आहे. हा निर्णय श्रीक्षेत्र काशी येथील प्रसिद्ध विश्वनाथ मंदिरातील मुक्तिमंडपात लागलेला आहे. या मुक्तिमंडपांत ब्रह्मवृंदापुढे आलेल्या वादविषयक विषयांची चर्चा होऊन त्यांचा निर्णय लागत असे. या निर्णयाची हकिगत काशीस्थ कोझरेकर गणेश भट्ट यांनी कोकणातील देवर्षी ब्राह्मण म्हणजेच देवरुखे ब्राह्मण गणेश प्रभु भडसवळे, हरदे प्रभु तेरे, विश्वनाथ प्रभु चापेकर, बाळ प्रभु खालगांवकर आणि आरेकर महाजन यांना पत्रातून कळविली आहे. त्यात जी हकिगत लिहून आली आहे ती अशी - काशीमध्ये आठ वर्षे वास करणारे विठ्ठल ज्योतिषी आणि त्यांचा मुलगा कृष्ण ज्येतिषी या दोघांनी अग्निहोत्राचा स्वीकार केला. विश्वेश्वरभट्ट अभ्यंकर, हरिभट्ट भावे, गोविंदभट्ट गोडबोले आणि केशवभट्ट अभ्यंकर आदि चितपावन ब्राह्मणांनी विठ्ठल ज्योतिषी यांचेबरोबर यज्ञात ऋत्विज्य पत्करिले. याच पत्रात कोझरेकर शास्त्री असे लिहितात की याच सभेत चितळे भट्टाचाच कोणीतरी जनार्दनभट्ट या नावाचा नातू अगर पणतू या वेळी काशीस आलेला होता. त्याने सभेत असे सांगितले की, ''आमचे घरी देवर्षि ब्राह्मणांसाठी अनंतभट्टाने उद्धारपत्र लिहिले आहे. त्यात अनंतभट्ट असे लिहितो की देवर्षि ब्राह्मणांसांगाते द्वेषु केला होता जो तो शास्त्रविरुद्ध, त्यास आम्हांस अन्नसंबंध आहे, जे न म्हणति त्यास विश्वेश्वराची आण.'' या पत्रातील पुढील मजकूर असा आहे की, ''इतुके आईकोन तेथे सभासदि विचारू केला जो अनंतभट्टि देवर्षी ब्राह्मणांसांघाते द्वेषु केला तो शास्त्रविरुद्ध या कारणे चिपळुणे, कऱ्हाडे, देवर्षि, महाराष्ट्र हे समस्त ब्राह्मण समान वैदिक कर्मि वा अन्नसंबंधी समस्तांशि अधिकार ऐसा निश्चय जाहाला याहि ब्राह्मणी परस्पर द्वेषु करू नये.'' याच निर्णयपत्रावर ''तत्र संमतिः'' असे म्हणून पुढे ''भावये गणेशभट्ट दीक्षित प्रमुख चिपोळणे; बखले कृष्णभट्ट प्रमुख कऱ्हाडे; शेष कृष्णभट्ट पंडित प्रमुख महाराष्ट्र; गोपीभट्ट प्रमुख गुर्जर; विद्यानिवास भट्टाचार्य प्रमुख गौड; रघुपति उपाध्याय प्रमुख तैलभुक्त समस्त ब्राह्मणांचे समत्ति करून'' अशी निरनिराळ्या प्रांतांतल्या निरनिराळ्या ज्ञातीच्या प्रमुखांची संमति लिहिलेली आहे. इतकेच नव्हे तर पुढे ''खरे गणेशभट्ट, चितळे जानभट्ट, सावरकर विठोबा, केशव नाईक प्रमुखांपाशी देवर्षि

ब्राह्मणाचे ताम्रपटे पाठविले असति'' असा स्पष्ट उल्लेख असून त्या ताम्रपटावर पुढे ''देवर्षि ब्राह्मणांस आम्हास पूर्वी अन्नसंबंध होता मध्ये अनंतभट्टि नाही म्हणितले होते ते गोविंदभट्ट आदि करून देवर्षि ब्राह्मण विठ्ठल अग्निहोत्री याचे घरी आम्ही अन्नसंबंध केला तुम्ही सकळ करितसा कोणी अन्नसंबंध न म्हणति त्याशि श्रीविश्वेश्वराची आण ते अति पाषांड मत करिती.............इति मुक्तिमंडपामध्ये निर्णय:।। हा मजकूर लिहिलेला होता (पिंपुटकर १९२६: १५).

या निर्णयपत्रातील मजकुरापासून एक अत्यंत महत्वाची अशी गोष्ट समजते ती म्हणजे वासुदेव (अनंतभट्ट?) चितळे भट्टाने शेवटी माफी मागितली.

सन १६५७ मधील मुक्तिमंडपातील निर्णय

सन १४९० मध्ये उपस्थित झालेला चितळेभट्टाचा वाद थोडया फार प्रमाणात कोकणच्या भूमीत वावरतच होता. सन १५८३ मधील मुक्तिमंडपातील निर्णयानंतर काही काळ हे प्रकरण थंडावले. यानंतर सुमारे ७५ वर्षांनी म्हणजे सन १६५७ मध्ये या वादाने परत डोके वर काढले. पण याही वेळी निर्णय देवरुखे ब्राह्मणांच्या बाजूनेच लागला. यावेळी श्रीक्षेत्र काशी येथील मुक्तिमंडपात महाराष्ट्र, कर्नाटक, कोंकण, तैलंग, द्राविड इत्यादी प्रांतातील विद्वान ब्राह्मणांसमक्ष देवर्षि म्हणजेच देवरुखे ब्राह्मणांबाबत विचार विनिमय करण्यात येऊन त्यांना वेदशास्त्रपुराणेतिहास यातील परमार्थ पूर्णपणे अवगत असून ते ऋतुयजनयाजनादि सदाचरणशील, पंक्तिपावन व शरीरान्वयार्ह असे अत्युत्तम ब्राह्मण आहे असा निर्णय दिला गेला. इतकेच नव्हे तर शेवटी शपथ घालून ठेविली आहे. ती अशी - ''देवर्षि ब्राह्मणांच्या सद्ब्राह्मण्यांविषी विद्वानांकडून परिशोधन झाले असता देवर्षि ब्राह्मणांना दोष आहे म्हणून जे म्हणतील ते विश्वेश्वराचा द्रोह करणारे व ब्रह्मघातकी असे होतील.'' या निर्णयपत्राखाली कित्येक यति, परिव्राजक व अनेक विद्वानांच्या संमतिदर्शक सह्या असून त्यात श्री छत्रपति शिवाजीमहाराज यांना अभिषेक करणारे प्रसिद्ध गागाभट्ट यांचीही स्वाक्षरी आहे (पिंपुटकर १९२६: १९).

श्री क्षेत्र काशी येथील ब्राह्मणभोजन

काशीधर्मसभेतील या दोन निर्णयानंतरही हा वाद कमी-अधिक प्रमाणात धुमसतच होता. पण हा वाद थोडक्यात निभावला. हिंदू धर्मातील वादांवरचा शेवटचा प्रर्याय हा ब्राह्मणभोजन असतो. समाजातील वरिष्ठ वर्ग जो ब्राह्मण वर्ग याला जर संतुष्ट ठेवले तर ते या वादांवर पडदा टाकू शकतात असा तुलनेने सोपा उपाय असे. देवरुखे ब्राह्मणांच्या अपंक्तिपणाच्या निर्णयामध्येही हा ब्राह्मणभोजनाचा प्रयत्न केला गेला. सन १६५७ मधील काशीस्थित मुक्तिमंडपातील दुसऱ्या निर्णयपत्रानंतर पंचवीस वर्षातच असा प्रयोग केला गेला. सन

१६८३ मधील वाराणसीतील हरि दीक्षित यांनी कोकणातील नारायण दीक्षित यांना लिहिलेल्या पत्रातून सदरील माहिती मिळते. ते लिहितात की, "जे कोणी स्पर्धा करीत होते ते ब्राह्मण पंडित वैदिक आम्हांपाशी येऊन बोलिले जे तुह्माआह्मांमध्ये द्वेष करीत होते, आजपर्यंत स्पर्धा होती ते स्पर्धा मोडावी जर तुह्मी शेदोनशे ब्राह्मणभोजन कराल तर स्पर्धा मोडेल. या उपर आम्ही ब्राह्मणभोजन केले." याप्रमाणे नांवाला ब्राह्मणभोजन होऊन सदर प्रकारचे व क्षणिक टिकणारे भांडण थांबले. या पत्राच्या शेवटी कोण कोण ब्राह्मण जेवावयास आले होते त्यांची नांवे दिली असून त्यात शंकरभट्ट आंबेकर, रामभट्ट ठोसर, शामभट्ट रामडोहकर, गणेशपंत दशपत्र, श्रीपतभट्ट कर्वे, शामभट्ट काळे वगैरे इसमांची नांवे आहेत (पिंपुटकर १९२६: २२).

काशीतील या तीन निर्णयानंतरही अठराव्या शतकात सन १७२४ मध्ये सातारच्या शाहू महाराजांजवळ तसेच पैठणच्या धर्मसभेपुढे हा वाद नेला गेला. परंतु दोनही ठिकाणी देवरुखे ब्राह्मणांच्या बाजूनेच निर्णय लागलेले आहेत.

लिंगायत आणि जैन समाजातील ग्रामण्य आणि काशीतील धर्मसभेची निर्णयपत्रके

इतर जाती समूहाच्या हक्कांचे तंटे काशीमध्ये अशाच तऱ्हेने जात होते का? बेळगाव जिल्ह्यातील अथणी येथील जैन आणि लिंगायत जमातीतील तंटा हा या शहरातील शेट्टी घराण्यातील कागदपत्रात नोंदवला आहे. विशेष म्हणजे ही सर्व कागदपत्रे मोडी लिपीत व मराठी भाषेत आहेत. लिंगायत धर्मगुरुंप्रमाणेच जैन धर्मीय साधूंनासुद्धा शहरातून मिरवणुकीने आणता येण्याचा हक्क आहे का? हे खरे तर तंट्याचे कारण होते. जिथे चारही वेदात आणि शंभर शास्त्र, तर्कशास्त्रात प्रवीण असे राजा व राज्याचे पंडित लोक राहतात त्या काशीतील पंडितांना हे प्रकरण अंतिम निर्णयासाठी पाठवावे अशी दोन्ही जमातींनी अथनीच्या हवालदाराकडे विनंती केली. त्यानंतर २९ ऑक्टोबर १६५६ ला अथणीचा हवालदार अब्दूल अलीने काशीच्या फौजदाराला पत्र लिहून विनंती केली की, "पंडितांची सभा बोलवावी, त्यांना या खटल्याचे स्वरूप सांगावे. वेद आणि शास्त्रामध्ये प्रवीण असणाऱ्या पंडितांना हा खटला विषद करा. त्यांच्याकडून वेद आणि शास्त्रांवर आधारीत असलेला निर्णय घ्या आणि त्याप्रमाणे आम्हास कळवा" (आपटे १९३०, पत्र ३५३, पृ.३५४-३५५).

पक्षपात न करणाऱ्या निर्णयाची अपेक्षा असणाऱ्या अथणीच्या जनतेची याबाबतीत निराशा झाली. ३ डिसेंबर १६५८ मध्ये झालेल्या सभेच्या नोंदीमध्ये असे आढळते की काशीला गेलेल्या लिंगायत जमातीची नेते मंडळी जयपत्र मिळविण्यात यशस्वी झाली आणि त्यांनी ते पत्र शहराच्या जेष्ठ अधिकाऱ्यांसमोर सादर केले. त्यानंतर ५ महिन्यांनी जैन गुरु आणि जैन लोकांनी काशीला जाऊला स्वत:चे

जयपत्र घेऊन आले. मधील पाच महिन्याच्या काळात दोन्हीही समाजातील माणसे काशीला जाऊन आपापल्या बाजूंची निर्णयपत्रे घेऊन आले (आपटे १९३०, पत्र ३५४, पृ.३५५-३५६).

यामुळे हा निर्णय पुढे जाईना. त्यामुळे शहरातील लोकांनी निर्णय घेण्याचे ठरविले. ३० डिसेंबर १६५८ रोजी पुढील सभा भरली. त्यात दोन्हीही पक्षकारांनी आपली बाजू मांडली. ''लिंगायतांच्या गुरुंना मिरवणुकीने जाता येईल. जैन गुरुंना जाता येणार नाही'' असा सभेने लिंगायतांच्या बाजूने निर्णय दिला. तसेच या निर्णयाचा महजर देखील काढण्यात आला (आपटे १९३०, पत्र ३५६, पृ.३५७-३५८).

हा निर्णय देणाऱ्या काशीस्थ पंडितांची नावे आपणा जवळ नाहीत. या दोन्हीही पक्षकारांनी आपापली बाजू ही एकाच पंडित सभेपुढे मांडली की वेगवेगळ्या हे माहित नाही. बहुतेक त्यांनी त्यांना अनुकूल असणाऱ्या पंडित सभेकडून निर्णयपत्रे घेतली असावी. धार्मिक हक्कांच्यामध्ये असलेल्या विरोधाबाबतचा हा मुद्दा होता. दोन्ही पक्षकारांचा मान आणि ओळख याला यामध्ये महत्त्व आले होते. अथणीच्या या घटनेमध्ये काय काय युक्तीवाद केले हे माहित नाही. परंतु हे महत्त्वाचे दिसते की काशीच्या पंडितांनी दोनही पक्षकारांच्या बाजूचे निर्णय दिले.

लिंगायत विरूद्ध जैन ग्रामण्यात दक्षिण भारतीय शहरातील मुस्लिम हवालदाराच्या दृष्टीनेही धार्मिक तंटे सोडविण्यासाठी काशीतील पंडितांची महत्त्वाची भूमिका होती. राजे आणि राजकीय आश्रयदाते याच्याशी काशीतील पंडितांचे जवळकीचे संबंध होते. लिंगायत आणि जैनांच्या ग्रामण्यात जी पत्रे उपलब्ध आहेत त्यामध्ये काशीतील पंडितांना 'राज्या राज्याचे पंडित आहे, शास्त्रज्ञ आहेत' असे सांगून त्याचा या क्षेत्रातील अधिकार मान्य केलेला दिसतो (आपटे १९३०, पत्र ३५३, पृ.३५४-३५५).

संपूर्ण मराठा कालखंडात महाराष्ट्रात झालेल्या ग्रामण्यांची संख्या शेकड्यात भरेल अशी आहे. काशीपर्यंत मात्र त्यापैकी थोडीच पोहचलेली दिसतात. वरील ग्रामण्यांचा अभ्यास करता असे दिसून येते की ही सर्व ग्रामण्ये ही समाजातील जाती व्यवस्थेच्या वरच्या थरातीलच आहेत. ब्राह्मण समाज विशेषत: कोकणातील ब्राह्मण समाज हा अनेक उपजातींमध्ये विभागला गेला होता. उच्च-निच्चता हे जाती व्यवस्थेचे अविभाज्य अंग होते. त्यामुळे सहाजिकच एक ब्राह्मण जात दुसऱ्या ब्राह्मण जातीला कमी लेखे. ब्राह्मण्य म्हणजे काय? ब्राह्मण कोणास म्हणावे? असे प्रश्न जो तो एकमेकांस विचारू लागले. यातूनच ही ग्रामण्ये तयार झालेली दिसतात. याचवेळी या ब्राह्मण समाजातील उच्च शिक्षित विद्वान वर्ग काशीकडे आकृष्ट झाला होता. आपल्या विद्वत्तेने त्याने तेथील समाजव्यवस्थेत मानाचे स्थान मिळविले होते. वेद, वेदांगे, न्यायशास्त्र, तर्कशास्त्र आदि अनेक विषयांत त्यांनी गती प्राप्त केली होती. त्यावरील ग्रंथाची निर्मितीही मोठ्या प्रमाणावर त्यांच्याकडून होत होती. महाराष्ट्रातील भट्ट आणि शेष घराणे हे तेथील विद्वतसभेचे नेतृत्त्व करीत होते.

सहाजिकच या ब्राह्मण वर्गातील ग्रामण्यांच्या सर्व घटना अंतिम निर्णयासाठी काशीतील धर्मसभेकडे नेण्यात आल्या. या धर्मसभेचे वैशिष्ट्य म्हणजे यात देशस्थ, चित्तपावन, कऱ्हाडे, देवरूखे, सारस्वत ब्राह्मण याच बरोबर आंध्र, कर्नाटक, द्रविड आणि गुर्जर ब्राह्मणांचेही प्रतिनिधी यात असत. महाराष्ट्रातील ब्राह्मण उपजातींतील परस्पर द्वेषाचा/तिरस्काराचा कोणताही परिणाम त्यांच्या निर्णयपत्रांवर पडलेला दिसून येत नाही. ब्राह्मणत्व सिद्ध करण्याचे तंटे ज्या ज्या वेळी या धर्मसभेपुढे आले त्या त्या वेळी वरील सर्व ब्राह्मण उपजातींच्या प्रतिनिधींनी धर्मग्रंथ पाहून, प्रसंगी बदलती सामाजिक, राजकीय परिस्थिती पाहून या सर्व ग्रामण्यांच्या घटनांमध्ये त्या ब्राह्मण उपजातीच्या ब्राह्मणत्वाच्या बाजूने निर्णय दिला आहे. निर्णयपत्रातील निर्णय मानण्यासाठी धर्मसभेने विश्वेश्वराची मान्यता घेतली होती. 'ज्याला अन्नसंबंध मान्य नाहीत त्याला विश्वेश्वराची आण' अशा तऱ्हेचा मजकूर निर्णयपत्राच्या शेवटी टाकण्यात येत असे. मुस्लिम परशत्रुंचे आक्रमण आणि त्यांनी काबीज केलेल्या राजकीय सत्तेच्या पार्श्वभूमीचा परिणाम काशी धर्मसभेच्या निर्णयांवर झाला असण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रापासून खूप दूर अंतरावर राहणाऱ्या काशीतील ब्राह्मण समूहाला परकीय सत्तेची दाहकता स्वत:च्या प्रदेशात राहणाऱ्या आणि बहुसंख्येने असणाऱ्या महाराष्ट्रातील ब्राह्मण समूहापेक्षा अधिक जाणवली असावी. त्यामुळे आपला जातसमूह ग्रामण्यांच्या घटनेमुळे विखुरला न जाता एकसंध राहिला पाहिजे अशी तीव्र भावना त्यांच्या या निर्णयपत्रातून दिसून येते. काशी धर्मसभेने दिलेले निर्णय महाराष्ट्रातील जातीसमूह कितपत मानत असत यात शंका आहे. कारण अशा तऱ्हेची ग्रामण्ये परत परत उद्भवलेली पाहायला मिळतात. निर्णयपत्र आल्यानंतर एखादे ग्रामण्य तात्पुरते थंडावल्यासारखे वाटते. परंतु दर २५-३० वर्षांनी ते परत उसळून वर येत असे. निर्णयासाठी परत ते काशीतील धर्मसभेपुढे येत असे. काही वेळेला अशी ग्रामण्ये इतर ब्राह्मणांना पंक्तिभोजने देऊनही सोडविली गेली. यातून त्याच्याशी अन्नसंबंध जोडून त्याच्या ब्राह्मणत्वाला आमची मान्यता आहे असा संदेश जात होता.

काशी धर्मसभेने दिलेले निर्णय आणि मुक्तिमंडप

काशीतील धर्मसभेने दिलेल्या प्रत्येक निर्णयपत्रांमध्ये 'काश्यां मुक्तिमंडपे' म्हणजेच काशी येथील विश्वेश्वराच्या मंदिरातील मुक्तिमंडपामध्ये हा निर्णय घेण्यात आला असा उल्लेख आढळतो. विश्वेश्वराच्या मध्यवर्ती गर्भगृहाच्या दक्षिण, पूर्व, उत्तर आणि पश्चिम दिशेला अनुक्रमे मुक्ति, शृंगार, ऐश्वर्य आणि ज्ञान मंडप आहेत असे काशीखंडात विवेचन आले आहे. नारायणभट्टाने लिहिलेल्या 'त्रिस्थलीसेतू' या ग्रंथात या चारही जागाबद्दल माहिती आली असून मुक्तिमंडपाचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान वर्णन केले आहे. नारायणभट्टानेसुद्धा 'त्रिस्थळी सेतू' ग्रंथ लिहिताना काशीखंडातूनच काही श्लोक घेतले असून मुक्तिमंडपाच्या वैशिष्ट्यांवर अधिक भर देताना तो म्हणतो की वेद, धर्मशास्त्र, पुराणे आणि इतिहास या विषयावर तेथे चर्चा होत असे.

काशीखंडातून श्लोक घेताना नारायणभट्टाने त्यांच्या मांडणीद्वारे मुक्तिमंडपाच्या 'दक्षिणीपणावर' भर दिला. दक्षिण दिशेला असणाऱ्या मुक्तिमंडपात अभ्यास करणारे ब्राह्मणही 'दक्षिणी' होते हे या संदर्भात ध्यानात घ्यावे.

या इथे एक समकालीन समांतर घटना घडलेली दिसून येते. ओडिसाचा राजा प्रतापरूद्रदेव यांने इ.स. १५२० च्या सुमारास जगन्नाथपुरी येथील जगन्नाथाच्या मंदिराच्या दक्षिण दिशेला मुक्तिमंडपाची उभारणी केली. हा मंडप स्तंभयुक्त असून त्यात विद्वान उत्कल ब्राह्मण बसून सामाजिक व धार्मिक कायदेविषयक बाबीबाबत निर्णय घेत असत. नारायण भट्टांचा मुलगा शंकर लिहितो की या उत्कलच्या विद्वतसभेने पूर्वीय पंडिताबरोबर वादविवाद करण्यास नारायणभट्टाला निमंत्रण दिले. मुक्तिमंडपाची कल्पना ही दक्षिणी पंडितांनी जगन्नाथ पुरीच्या मुक्तिमंडपावरून घेतली की या उलट विश्वेश्वर मंदिरातील मुक्तिमंडपाची कल्पना पुरीची पंडितांनी घेतली याबद्दल माहिती मिळत नाही. या मुक्तिमंडपात बसून काशीतील पंडितांनी केलेल्या धर्मनिर्णयात दक्षिणी पंडितांचे भरघोस योगदान असल्याचे दिसून येते (O'Hanlon 2010: 219-220).

इ.स. १६५९ मध्ये औरंगजेब बादशहाने काशी येथील विश्वेश्वर मंदिर पाडून त्या जागी मशीद उभारली. या घटनेनंतर जी निर्णयपत्रे दिली गेली त्यामध्ये मुक्तिमंडपाचा उल्लेख येत नाही. तसेच काशीमधील दुसऱ्या कुठल्याही स्थळाचे नाव येत नाही. मग निर्णयपत्रातील मुक्तिमंडपाची कल्पना ही केवळ कविकल्पना आहे की खरोखरीच अशा तऱ्हेचा मंडप काशीविश्वनाथ मंदिरात अस्तित्वात होता? सन १६६९ मध्ये विश्वेश्वराचे मंदिर औरंगजेबाने पाडल्यानंतर जे जोते शिल्लक राहिले त्यावर त्याने मशीद उभारलेली आहे. जेम्स प्रिन्सेपने त्या जागेचा नकाशा बनविला आहे. सन १८२२ मध्ये प्रिन्सेपने काढलेल्या या मंदिराचे कल्पनाचित्र (conjectural reconstruction) हे काशीखंडातील माहितीवर आधारित काशीतील ब्राह्मणांच्या अनुमानावर आधारित होते. फुलीच्या आकाराचा पदविन्यास असलेल्या या मंदिरातील मध्यवर्ती गर्भगृह/मंडपात विश्वेश्वराचे लिंग असून त्याच्या बाजूना आठ उपगर्भगृहे/मंडपाची रचना असल्याचे दिसते. त्यामध्ये सर्वात पुढील मंडप प्रिन्सेपने मुक्तिमंडप म्हणून दाखविला आहे. व्यक्तिगत कल्पना, एकमेकांना जोडलेले मंडप, त्यातील देवतांना दिलेली नावे ही उथळपणे काशीखंडावर आधारीत होती. नंतरच्या काही दशकात त्याने बनविलेल्या पदविन्यासाच्या कल्पनाचित्रालाच खराखुरा पदविन्यास लोक समजू लागले. सध्या जर अशा तऱ्हेची धर्मसभा भरली व त्याद्वारे निर्णयपत्रे दिली गेली तर ते कोठून दिले जाते असे काशीतील अभ्यासकांना विचारले तर ते 'सांङ्ववेद विद्यालयाचे' नांव सांगतात. परंतु त्या संस्थेला केवळ १०० वर्षाचाच इतिहास आहे. सन १६६९ मध्ये काशीविश्वनाथ मंदिराच्या विध्वंसाबरोबरच

मुक्तिमंडपही नष्ट झाला. तेव्हा सन १६६९ ते सांङ्गवेद महाविद्यालयाची स्थापना या दरम्यानच्या काळात धर्मपरिषदा कोठे भरत असत आणि निर्णयपत्रके कोठून दिली जात असत यांची माहिती मिळत नाही.

बदलत्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचा न्यायिक व्यवस्थेवरील परिणाम

सोळाव्या आणि सतराव्या शतकात महाराष्ट्रातील समाजाकडून ग्रामण्याबाबत काशीतील धर्मसभेकडून निर्णय घेतले गेले. प्रत्येक वेळी त्या सभेने बदलत्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचे भान ठेवून समाजामध्ये दुही निर्माण होऊ नये म्हणून प्रागतिक विचारसरणीची कास धरून ब्राह्मणत्वापासून वंचित झालेल्या समाजाच्या बाजूने निर्णय दिला आहे. त्या त्या वेळच्या समाजाने तो निर्णय मानलाही. परंतु हे निर्णय काही काळ्या दगडवरील रेघ ठरले नाहीत. पुढील काळात या निर्णयांनाही आव्हाने दिली गेली. सन १६६४ मध्ये कोकणातील असमाधानी ब्राह्मणांकडून काशी धर्मसभेकडे दाद मागण्यात आली. या गोष्टींसाठी धर्मसभा गठीत करण्यात आली. या धर्मसभेच्या नोंदींच्या कागदपत्रातून शिवाजी महाराजांनीसुद्धा त्यांना विनंती केलेली आढळते. कोकणातील बऱ्याच भूभागावर त्यांची सत्ता स्थापित झाल्याने समाजातील जाती व्यवस्था नीट राखण्यासाठी राजा म्हणून त्यांनी उचललेले हे एक पाऊल होते. काशीच्या पंडितांकडून विनंतीला प्रतिसाद मिळून शिवाजी महाराजांच्या राज्यात नव्यानेच समाविष्ट झालेल्या कोकणातील राजापूर येथे एक धर्मसभा भरली गेली. शिवाजी महाराजांच्या दरबारातील मुत्सद्दी, स्थानिक प्रतिष्ठित घराणी आणि गागाभट्ट, अनंतदेव आणि महादेव शेष या धर्मसभेत उपस्थित होते.

या आधीच्या ग्रामण्यांची निर्णयपत्रे काशीतील धर्मसभेकडून दिली गेली होती. त्यांचे स्थानही काशीतील विश्वेश्वर मंदिर आणि मुक्तिमंडप होता. पहिल्यांदाच असे दिसते की राजापूर येथील धर्मसभेमध्ये काशीतील पंडित उपस्थित होते. प्रक्रिया उलटी घडत होती. काशीकडे महाराष्ट्र न जाता, महाराष्ट्रात राजापूर येथे पंडितांच्या रूपाने काशी अवतरली होती. कोकणामध्ये येण्यासाठी या पंडितांना काय कारण झाले ते समजत नाही. धर्माचा आणि पवित्र ब्राह्मणांचा रक्षणकर्ता म्हणून शिवाजी महाराजांकडून त्यांना काय आशा होती हे कळत नाही. त्यातील काही जणांनी कोकणात नव्याने स्थापन झालेल्या शिवाजी महाराजांच्या राज्याशी स्नेहाचे संबंध निर्माण केले. हे लक्षणीय आहे की या सभेने दिलेल्या निर्णयपत्राची सुरूवात ही शिवाजी महाराजांच्या प्रशस्तीने झालेली आहे.

काशीविश्वेश्वराचे मंदिर पाडले गेल्यानंतर त्याला प्रतिवाद कसा केला गेला याचे वृत्तांत मिळत नाहीत. या धर्मसभेला उपस्थित असलेले काशीतील प्रसिद्ध पंडित गागाभट्ट यांनी नंतरच्या काळात म्हणजेच सन १६७४ ला महाराजांना राज्याभिषेक केला. सन १६५७ मध्ये देवरूखे ब्राह्मणांच्या काशीतील

निर्णयपत्रांवर सुद्धा गागाभट्टांची स्वाक्षरी आहे. म्हणजेच सन १६५७ सालापासून गागाभट्ट हे महाराष्ट्रातील बदलती राजकीय व सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करीत असावेत. त्याचेच फलीत म्हणून हिंदुधर्मानुसार मराठे हे क्षत्रिय ठरून शिवाजी महाराजांचा छत्रपती होण्याचा मार्ग खुला झाला. मोठ मोठे व उत्तम दर्जेदार सोयी असलेले भव्य वाडे व घरे आणि ब्राह्मणांना मिळणाऱ्या धर्मादाय दक्षिणा या लक्षणांनी युक्त असे एक नवीनच अस्तित्व महाराष्ट्रीय लोकांचे काशीमध्ये निर्माण झाले.

सन १६८० मध्ये छ.शिवाजी महाराजांचे निधन झाले. पुढील दशकात मुघल आक्रमण आणि घरातील दुहींमुळे मराठा राजकारण दुभंगले गेले. सन १७२४ मध्ये देवरूखे ब्राह्मणांनी परत आपली तक्रार काशीमध्ये न नेता प्रथम जंजिराच्या सिद्दीकडे आणि नंतर सातारच्या छत्रपती शाहू महाराजांच्या दरबारातील राजपुरोहितांकडे केली (पिंपुटकर १९२६: ८५). काळाच्या ओघात सन १७२० पर्यंत राजकीय परिस्थिती स्थिरस्थावर झाली आणि सातारा, कोल्हापूर आणि पुणे या प्रशासकीय व आर्थिक केंद्रांच्या आश्रयाने चित्तपावन ब्राह्मणांचे नवे नेतृत्व पेशव्यांच्या रूपाने पुढे आले. न्यायिक अधिसत्ता असलेला एक नवीनच गट तयार झाला. रामशास्त्री प्रभुणेंच्या नेतृत्वाखाली त्यांची स्वतंत्र न्यायिक व्यवस्था विकसित झाली.

नारायणभट्टकृत 'त्रिस्थलीसेतू' आणि महाराष्ट्रीय लोकांनी केलेल्या काशीयात्रा

सोळाव्या शतकात महाराष्ट्रातील पैठण येथील भट्ट घराणे वाराणसीस स्थायीक झाले. या घराण्यातील नारायणभट्टांनी 'त्रिस्थलीसेतू' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. तीर्थयात्रेवरील हा महत्त्वाचा ग्रंथ आहे. सामान्य, प्रयाग, काशी आणि गया असे चार विभाग यामध्ये आहेत. यात यात्रेकरूंसाठी ध्येय व उद्दिष्टचे दिलेली असून प्रत्येक तीर्थात कोणकोणते विधी करावेत याची चर्चा यात केली आहेत. यातील २/३ भाग हा काशी व तेथील तीर्थे यांच्या वर्णनाने व्यापलेला आहे. उर्वरीत भाग प्रयाग व गया संबंधीत आहे. बाराव्या शतकातील लक्ष्मीधरभट्टकृत 'कथाकल्पतरू' आणि तेराव्या शतकातील हेमाडपंताच्या 'चतुर्वर्गचिंतामणि' या नारायणभट्टांच्या पूर्वसूरींनी रचलेल्या ग्रंथातून नारायणभट्टांनी तीर्थयात्रा संबंधीत संकल्पना घेतलेल्या असण्याची शक्यता आहे. असे असले तरीही तीन पवित्र नगरींना एकाच साखळीत जोडणाऱ्या 'त्रिस्थळी' या संकल्पनेच्या निर्मितीचे श्रेय नारायणभट्टांना देणे आवश्यक आहे. या त्रिस्थळी बरोबर यात्रा जोडल्याने काशी-प्रयाग-गया हे एकाच यात्रेत करावयाचे ही संकल्पना दृढ झाली. या तीनही नगरांना एकाच धाग्यात जोडणाऱ्या दुव्याला नारायणभट्टांने 'सेतू' हे नाव दिले आहे.

सतराव्या शतकात महाराष्ट्रात हा ग्रंथ फारच लोकप्रिय होता. त्यामुळे नारायणभट्टांच्या वंशजांनीही त्यावर अनेक संक्षिप्त टीका लिहिल्या. महाराष्ट्रीय पंडितांनी तीनही शहरात आपल्या संपर्क यंत्रणा प्रस्थापित

केलेल्या होत्या, तसेच आपल्या संपर्कजालाच्या साहाय्याने काशीपासून दूर असलेल्या महाराष्ट्रीय समाजामध्येही आपले संबंध प्रस्थापित केले होते. काशीतील मराठी ब्राह्मण आणि त्यांचे प्रतिनिधी यांनी काशी आणि महाराष्ट्रात त्रिस्थळी यात्रेच्या हस्तलिखितांद्वारे तीर्थयात्रा या संकल्पनेचा प्रसार केला. संस्कृत शिकलेला मराठी ब्राह्मणवर्ग हा उच्च शिक्षणासाठी काशीला आला होता. याच वेळेला काशीसंबंधीत अनेक बाबीही मराठी भाषेत समाविष्ट झाल्या. सोळाव्या शतकात लिहिल्या गेलेल्या मराठीतील लोकप्रिय ग्रंथ 'गुरूचरित्रा'मध्ये काशीमहात्म्याचे पहिल्यांदा दर्शन घडते. काशी महात्म्यामुळे खूप लोक काशीकडे वळू लागले. त्रिस्थळी यात्रेमध्ये काशीयात्रा हा मुख्य उद्देश आहे. त्यामुळेच त्रिस्थळीयात्रा ही काशीयात्रा आणि त्यानंतर 'महायात्रा' म्हणून ओळखली जाते. या महायात्रेसाठी काही नियम बनवले आहेत. प्रयाग व गयाला जाण्यापूर्वी तसेच जाऊन आल्यावर दोनदा किंवा तीनदा काशीप्रवेश करणे आवश्यक आहे अशी महाराष्ट्रीय यात्रेकरूंसाठी सूचना आहे. तसेच चातुर्मासात काशीवास करणे जरूरी आहे. अशा तऱ्हेच्या सूचना करून काशीतील महाराष्ट्रीय पंडितांनी 'महाराष्ट्र ते काशी' हा मार्ग निश्चित केलेला दिसतो.

महाराष्ट्रीय लोकांनी केलेल्या काशीयात्रा

सन १८५३ मध्ये भारतात रेल्वे उभारणीला सुरवात झाली. सन १८५७ च्या उठावानंतर इंग्रजांनी सैन्याची जलद हालचाल, दारूगोळा ने-आण यासाठी रेल्वे उभारणीकडे मोठ्या प्रमाणावर लक्ष दिले. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात सर्वदूर पसरलेल्या रेल्वेच्या जाळ्यांमुळे भारतात प्रवास करणे सुखकर होऊ लागले. 'माझा प्रवास' हे प्रवासवर्णन करणारे गोडसे भटजी हे रेल्वेशिवाय महाराष्ट्रातून तीर्थयात्रेला जाऊन आलेले आणि इतिहासात नोंद असलेले शेवटचे यात्रेकरू असावेत. यानंतरच्या काशीयात्रांवर्णनांमध्ये रेल्वेने गेल्याची नोंद आहे. उदा. सन १८८० मध्ये पंतप्रतिनिधींची केलेली काशीयात्रा. या आधीच्या काळात म्हणजेच शिवकाळात तसेच पेशवाईत काशीयात्रा करून सुरक्षित परत येणे ही मोठी सुदैवाची गोष्ट समजत असत. यात्रेकरूंवर मार्गात नानाप्रकारच्या दैवी व मानवी आपत्ति गुदरत असत. सर्व प्रवास पायी करावा लागत असे आणि त्याकाळी सामान्यत: नेहमी अस्वस्थता व दंगेधोपे चालू असत. त्यापासून उद्भवणारे अनर्थ यात्रेकरूंवरसुद्धा ओढवल्याशिवाय राहत नसत. मार्गात चोरी व वाटमारी यांचा उपद्रव नेहमी होत असल्यामुळे एकटे दुकटे जाण्याचेतर राहोच, पण शेपन्नासांबरोबर एकत्र यात्रेस निघाला म्हणजे कुटुंबातल्या माणसांची पुन: भेट होणार नाही असे गृहीत धरून सर्व निरवानिरव करून जात असे व यात्रा पूर्ण करुन तो सुरक्षितपणे परत आला की मोठा दैववान व पुण्यवान समजला जात असे (ऐलेसं ७ १९१२: ३७५७).

काशीयात्रेचा प्रवास फार दूरचा. एकंदर दोन महिने जाण्यास व तितकेच महिने परत येण्यास लागत. म्हणजेच चार महिने जाण्यायेण्यातच जात असत. परंतु महायात्रा म्हणजे केवळ गंगायमुनांचे किंवा फल्गु नदीचे स्नान करणे आणि काशीविश्वेश्वराचे व विष्णुपदाचे दर्शन घेणे नव्हे. त्या सर्व क्षेत्री गेल्यावर तीर्थश्राद्धे वगैरे अनेक विधी असून त्यांत काही दिवस मोडत. नाना प्रकारचे कष्ट सोसून मनुष्य इतका दूर देशी आला असल्यामुळे त्याला काशीवास व इतर क्षेत्रांचा वास घडावा असे सहजच वाटून त्याचा मुक्काम प्रत्येक क्षेत्रांत कमी अधिक दिवस पडावा. काशीस गेल्यानंतर कित्येकांना अयोध्या, मथुरा यासारखी रामकृष्णादिकांची अवतारकृत्ये जेथे घडली ती स्थळे पाहण्याची इच्छा स्वाभाविक होत असे. यदाकदाचित तेही शक्य न झाल्यास दक्षिणेतील आपला गाव सोडल्यावर वाटेने लागणाऱ्या महानद्या व त्यांच्या तीरावरची तीर्थे येथेही मुक्काम पडल्यामुळे काशीयात्रा हा जातायेता मिळून तब्बल सहा महिन्याचा उद्योग झाला होता.

महाराष्ट्रीय लोकांची तीर्थयात्रा म्हणजे एक प्रकारची मोहिमच भासत असे. याउलट महाराष्ट्रीय लोकांची लष्करी मोहिम ही तीर्थयात्रा वाटत असे. याचे कारण असे की यात्रेकरूंना प्रवासात सुरक्षितता हवी असल्यामुळे ते एकटे दुकटे न जाता, जर कोणी पेशवे अगर इतर सरदार लोक काशीयात्रेसाठी निघाले तर त्यांच्या संरक्षणाखाली निघत असे. त्यामुळे यात्रेत एक हजारापासून चाळीस हजारापर्यंतची यात्रेकरूंची संख्या असावयाची. वाटेत यात्रेवर हल्ला करणाऱ्या भिल्ल, पेंढारी वगैरे लुटारू लोकांची संख्याही शेकड्यांनी-हजारांनी मोजण्यासाठी असल्यामुळे त्यांना तोंड देण्याकरिता तितकेच फौजबंद लोक यात्रेकरू आपल्याबरोबर बाळगत. पेशवे घराण्यातील राधाबाई, काशीबाई, सगुणाबाई आणि सरस्वतीबाई पटवर्धन यांच्या काशीयात्रेचे स्वरूप असेच होते. या फौजबंद लोकांमुळे यात्रेला एखाद्या लष्करासारखे स्वरूप येत असे. याउलट मराठे जेव्हा पानिपतावर युद्धासाठी निघाले तेव्हा त्यांच्याबरोबर अनेक मराठी माणसेही तीर्थयात्रेसाठी निघाली. लष्कराचे आयतेच संरक्षण लाभल्यामुळे लष्करातील माणसे आणि तीर्थयात्रेकरूंनी वाटेतील तीर्थांच्या ठिकाणी मोठमोठे मुक्काम केले. याचा परिणाम लष्करी मोहिमेवर झाला. पानिपतच्या मोहिमेचे वर्णन वाचताना हा तीर्थयात्रेकरूंचाच समूह चालला आहे असे स्वाभाविकपणे वाटून जाते.

सतराव्या शतकापासून अनेक मराठी लोकांनी काशीयात्रा केलेली कागदपत्रातून दिसून येते. त्यात छत्रपती शिवाजी महाराज, बाळाजी विश्वनाथ पेशवे, बाजीराव पेशवे, नानासाहेब पेशवे, नागपूरकर भोसले तसेच इतर लोकांनी काशीयात्रा केलेली दिसते. परंतु यांचे स्वरूप वेगळे होते. लष्करी मोहिमेनिमित्त उत्तर हिंदुस्थानात गेल्यानंतर जवळच काशी असल्याने ही काशीयात्रा त्यांनी केली. तथापि या संबंधीत ऐतिहासिक कागदपत्रातून लष्करी मोहिमांचाच वृत्तांत फक्त आढळतो. काशीयात्रेचे सविस्तर वर्णन यात मिळत नाही. याच काळात स्वतंत्रपणे काशीयात्रेला गेल्याची काही उदाहरणे आहेत. त्यात पेशवे, नागपूरकर

भोसले, पटवर्धन सरदार यांच्या विधवा स्त्रियांच्या काशीयात्रांची कागदपत्रे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. याच कागदपत्रांच्या आधारे त्यांनी कशाप्रकारे काशीयात्रा केली त्यांची चर्चा या प्रकरणात करण्यात आली आहे.

पेशव्यांच्या घरातील स्त्रियांनी केलेल्या काशीयात्रा

पेशव्यांच्या पुरूषांपैकी पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ, बाळाजी बाजीराव आणि रघुनाथराव हे राजकारणानिमित्त जेव्हा उत्तर भारतात मोहिमांवर गेले तेव्हा त्यांनी प्रयाग तसेच काशीचे दर्शन केले. पेशवे घराण्यातील एकंदर सहा स्त्रियांनी काशीयात्रा केल्याचे दाखले आहेत. पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ यांची पत्नी राधाबाई, दुसरा पेशवा बाजीराव यांची पत्नी काशीबाई आणि पहिल्या बाजीरावांचा मुलगा जनार्दन याची पत्नी सगुणाबाई आणि येसूबाई(?) यांनी काशीयात्रा केलेली दिसते. पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ यांची मोठी मुलगी भिऊबाई ही राधाबाई बरोबर तर दुसरी मुलगी अनुताई घोरपडे काशीबाई बरोबर काशीयात्रेला गेल्याचे उल्लेख आहेत. अर्थात त्यावेळी काशीविश्वनाथाचे मंदिर अस्तित्वात नव्हते. परंतु तेथे जाऊन गंगास्नान आणि काशीवास करण्याचे पुण्य मात्र त्यांनी घेतले असावे.

राधाबाईंची काशीयात्रा

पहिल्या बाजीरावाच्या कारकिर्दीत मराठ्यांचा जम उत्तरेत बसू लागला. राजपुतान्यातील राजेरजवाडे बाजीराव पेशव्यांस आपल्या बरोबरीचा मान देऊ लागले हे ऐकून बाजीराव पेशव्यांची मातोश्री राधाबाई यांनी आपली काशीयात्रेस जाण्याची मनीषा बाजीरावांकडे व्यक्त केली. पेशव्यांनी आपल्या मातोश्रीच्या उत्तरेकडील प्रवासाची तयारी केली. उत्तरेतील समस्त राजेरजवाड्यास मातोश्रींच्या प्रवासाविषयीचा कार्यक्रम जासुदामार्फत कळविला. उत्तरेस शिंदे, होळकर, बुंदेले असे जे मातब्बर मराठे सरदार होते त्यांना पत्रे लिहून मातोश्रींचा प्रवास बिनधोक होण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्यास सांगितले.

राधाबाईंचा काशीयात्रेचा बेत झाला तेव्हा सदाशिव नाईक काशीस होते. सदाशिव नाईक हे बारामतीचे प्रसिद्ध सावकार होते. वयोवृद्ध झाल्यानंतर काशीवास करावा या उद्देशाने त्यांनी काशीस वास्तव्य केले होते. काशीमध्ये ते पेशव्यांतर्फे कामही करीत. गंगेवरील घाट बांधणे, मंदिरे तसेच धर्मशाळा बांधणे, मराठी ब्राह्मणांच्या ब्रह्मपुरी वसविणे, अन्नछत्र चालविणे वगैरे कामे ते करीत असत. दुसरी महत्वाची बाब म्हणजे त्यांचे आणि पेशव्यांचे नातेसंबंधही होते. पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ व त्यांची पत्नी राधाबाई यांची मुलगी भिऊबाई ही सदाशिव नाईक यांचे चिरंजीव आबूजी नाईक यांस दिली होती. सदाशिव नाईक यांस दोन पुत्र, वडील बाबूजी नाईक व धाकटे आबूजी नाईक. हे दोघेही बारामतीस राहात असत. या

सर्व कारणांमुळे काशीस्थित सदाशिव नाईकांचा राधाबाईंना काशीला मोठाच स्थानिक आश्रय होता. त्याशिवाय दुसरा आश्रय असा की, बाजीराव व चिमाजी आप्पा यांचे गुरू कायगावकर नारायण दीक्षित यापूर्वी काही दिवस कायगावाहून काशीस राहावयास गेले होते. २१-१०-१७३४ च्या बाजीरावाला लिहिलेल्या पत्रानुसार या सुमारास ते काशीत राहत असल्यांची नोंद मिळते (पेद ३०, पत्र ११०, पृ.८०-८१). दीक्षित काशीत आहेत या आधारावरच राधाबाई त्यांच्यामागून पाच-सात महिन्यांनी काशीस जाण्यास निघाल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्याबरोबर आपल्या जावयाचा वडील भाऊ बाबूजी नाईक यास घेतले होते.

पुण्याहून मातोश्री राधाबाई दि. १४ फेब्रुवारी १७३५ रोजी काशीयात्रेस निघाल्या. दि. २६ मे १७३६ रोजी सर्व यात्रा निर्विघ्नपणे संपवून परत आल्या. राधाबाईंबरोबर परिवार विशेष मोठा नव्हता. बाबूजी नाईक, महादोबा पुरंदरे व वासुदेव जोशी (कल्याणकर) हे तीन मातब्बर त्याच्याबरोबर यात्रेत होते. यात्रा मुक्कामांचे दरम्यान ठिकठिकाणी सत्कार स्वीकारावे लागतील, वाटाघाटी कराव्या लागतील, आपण स्वत: विधवा स्त्री असल्यामुळे समक्ष काही स्वीकारणे योग्य नाही, यासाठी पेशवा परिवारातील पुरुष मनुष्य बरोबर असणे वाजवी होईल, हे लक्षात घेऊन निदान पेशव्यांचा प्रतिनिधी म्हणून छोट्या सदाशिवला (भाऊसाहेब) यात्रेबरोबर पाठवावे अशी राधाबाईंनी चिमाजीआप्पांना विनंती केली होती. ही विनंती नम्रपणे पण ठामपणे नाकारताना चिमाजीआप्पा १४-२-१७३५ च्या पत्रात लिहितात की, ''वरकड चिरंजीवांचे यात्रेचे दिवस हे आहेत यैसे नाही........तुम्ही यात्रा करावयास जाता, देवधर्म तीर्थ करावयास चिरंजीवाचा पायगोवा होईल यैसे आहे'' (पेद ९, पत्र ११, पृ.८).

सन १७३५-३६ चा पंधरा महिन्याचा काळ उत्तरेत अतिशय धामधुमीचा होता. मार्च महिन्यात राधाबाई बऱ्हाणपुरास पोहचल्या. माळवा प्रांत ताब्यात घेण्यासाठी पिलाजी जाधव-सिंदे-होळकर हे सरदार शिकस्त करीत होते. बादशहाची फौज त्याच्या विरूद्ध होती. शत्रूच्या फौजा त्या प्रदेशात फिरत होत्या. त्यांच्या पासून यात्रेला धोका नको म्हणून बऱ्हाणपूरच्या मुसलमान सरदाराने मातोश्रींच्या संरक्षणाकरिता नर्मदा पार होईपर्यंत शे-दोनशे राऊत दिले. अशा या धामधुमीत बऱ्हाणपुरावरून पुढे जाण्यास बाबूजी नाईकांस धास्ती पडली होती. दि. ८-३-१७३५ च्या पत्रात बाबूजी नाईक लिहितात की, ''बुराणपूरचे अविंधाने शेंदोनशे राऊत व दोणशे बरकंदाज नरमदापावेतो दिले. उदईक कूच करून पुढे जातो; परंतु राजकी वर्तमान सुभेदार व कमर्दिखान बुंदेलखंड प्रांती आहेत. परस्पर युध होते. होळकर व सिंदे रामपुरियानजीक होते. .... अविवेके आम्ही निघालो. मातबर माणसाजवळ गेलिया उपरी चिंता नाही, परंतु पंथ दूर. समय की सकलीत सामान आम्हासमागमे नाही. कदाचित बलकुबल तर घरास तरी सुरक्षित

यावे. स्वामी पुण्यवान आहेत. चिंता तो नाही. पुढे होईल वर्तमान होईल ते लिहून पाठऊ. बुंदेलखंडावरून जावे तो कमर्दिखानाचा शह; सवाईजीकडे जावे तो दूर गेले. तूर्त नरमदेपावेतो जातो'' (पेद १४, पत्र २१, पृ.२८).

राधाबाईंनी आपल्या परिवारासह दिनांक १८ एप्रिल रोजी नर्मदापार होऊन बढवाईवर मुक्काम केला. मे महिन्यात त्या उदेपुरास गेल्या. १८ मे १७३५ रोजी उदेपुराहून लिहिलेल्या पत्रात बाबूजी नाईक जोशी लिहितात की, ''आठ दहा दिवस राणाजीनी आपले संनिध ठेऊन मातोश्रींचा सन्मान उत्तम प्रकारे केला. माहालात मातोश्रीस नेली. राणाजी मातोश्रींचे दर्शनास माहालांत गेले. मोत्याची मळ १, पदक १ व हातचे सोन्याचे चुडे किंमत तो माफक परंतु जनांत बहुमान हेच गोष्ट थोर आहे. हत्ती छावा १,५००० रूपये खर्चास. बिहारीदास यांनी १००० येक हजार नजर केली. दरमजला सत्वरीच जयपुरास जाऊन सवाईजीची भेटी घेऊन सत्वरीच पुढे जाऊ'' (पेद ९, पत्र १२, पृ.९).

उदेपुरहून यात्रेकरु मंडळी जयपुरास गेली. सवाई जयसिंगांनी दोन-अडीच महिने त्यांचा पाहुणचार केला. तिथेच त्रिस्थळी यात्रेच्या प्रवासासाठी बादशहाकडून दस्तके आली. २१-१०-१७३५ रोजी बाजीराव व चिमाजीआप्पांना लिहिलेल्या पत्रात महादोबा पुरंदरे लिहितात की, ''मातुश्री बाईस पातशहाची दस्तक त्रिस्थळी यात्रा करून सुखरूप नर्मदापार करून द्यावे यैसी दिल्ही आहेत. गुरूज बारदार दोघेजण व हजार स्वार दिल्हे आहेत. मथूरेहून पुढे गेली, यात्रा करून जातील. जागाजागा उमरावानी अहेर मेजवान्या जवाहिर व हत्ती घोडे देऊन गौरऊन आपल्याले हादेतून पोहचाऊन देतात. जागाजागा उमराव द्रव्यही देतात'' (पेद १४, पत्र ३९, पृ.४३). जयपूरहून निघताना सवाई जयसिंगानी राधाबाईंबरोबर यात्रेच्या सुरक्षिततेसाठी नारायणदास नावाचा प्रतिष्ठित माणूस तसेच दिलीपसिंग नावाच्या राजपूत माणसाच्या नेतृत्वाखाली दिसते. स्वाराची फौज दिली होती (साइसंमं २, पत्र २६२, पृ.१९१). पुढील प्रवासात नबाब महंमद बंगशाने सहाय्य केले. दिनांक १-१०-१७३५ च्या पत्रात महंमद बंगाशाबद्दल लिहिताना सदाशिव बल्लाल बाजीरावांना लिहितो की, ''रायांनी (बाजीराव) आम्हांस स्मरण करून पत्र लिहिले व आमचे भरवसियावर पाठविले. तर त्यांची मातुश्री व आमची दोन नाहीत.'' असे म्हणून कुरेजाहानाबादपावेतो यात्रेच्या सुरक्षिततेसाठी ताकीदा पाठविल्या व मातोश्रीस यमुनापार करून दिले. वाटखर्चासाठी हजार रूपये तसेच साशाची वस्त्रे म्हणजेच विकेशा बाईला नेसता येतील अशी सोवळी पातळे म्हणजे आलवणे दिली (पेद ३०, पत्र १३४, पृ.१०४).

सप्टेंबरपासून मथुरा, वृंदावन, कुरूक्षेत्र असे प्रयाण करून दिनांक १७ ऑक्टोबर रोजी राधाबाई काशीस दाखल झाल्या व २४ मे सन १७३६ रोजी यात्रा संपवून पुण्याला परतल्या. यात्रा मुक्कामांची संक्षिप्त

नोंद अशी आहे : ता. १४ फेब्रुवारी १७३५ पुण्याहून प्रयाण, ८ मार्च बुऱ्हाणपूर, १८ एप्रिल नर्मदापार बढवाई, ६ मे उदेपूर, १८ मे नाथद्वार, २१ जून जयपूर मुक्काम १५ सप्टेबर पर्यंत, सप्टे-ऑक्टो.मथुरा, वृंदावन, कुरुक्षेत्र, प्रयाग, १७ ऑक्टोबर काशीत दाखल, २३ डिसेंबर काशीहून गयेकडे प्रयाण, जानेवारी १७३६ गयेहून बुंदेलखंडमार्गे सागरहून बढवाईजवळ नर्मदा उतरुन २४ मे १७३६ मध्ये पुण्यात दाखल (मराठी रियासत ३, पृ.४६७). १ जून १७३६ ला मावंदे केले. यात्रा खर्च १ लाख रु.आला (पेद २२, पत्र १३६, पृ.१७५).

काशीतील वास्तव्यात राधाबाईंच्या दानधर्माच्या संबंधीत महत्वाची घटना सांगताना नारायण दीक्षित पाटणकर दि. २६-१२-१७३५ पत्रात बाजीराव तसेच चिमाजीआप्पांना लिहितात की, ''मातुश्री राधाबाई कार्तिक शुद्ध द्वादशीस श्रीस आली. त्रयोदशीपासून तीर्थविध आरंभिला. तो सर्व करून पौष वद्य पंचमीस स्वार होउन गयेस गेली. येथे जो धर्म जाहाला तो पत्री लिहिला येत नाहि. परस्पर लोकसांगता कळो येईल. आम्हास पुशिले परंतु नाहि. पंचवीसांतीसामध्ये तर उत्तम धर्म होता. लोकोत्तर कीर्त होती परंतु इश्वरास कर्तव्य ते जाहाले. माहाराष्ट्र ब्राह्मणास येक कपर्दिका कोणास पावली नाहि व चीत्तपावनांस उत्तम प्रति पांचासातास दाहापर्यंत पावले. वरकडास येकदोन पाविले. दाहांपांचांस कपर्दिकाहि पावलि नाहि. व येक कराडि बायको माहादाजीपंताची माय आलि होती तिणे आपल्ये ज्ञातीस सर्वांस दाहदाह रुपये पाविले. वरकड सर्व ज्ञातींस तीन तीन रूपये पाविले हे तुम्हास परस्पर कळेलच. यानंतर बाईचा धर्मामध्ये आपण मन घालून धर्म करवावा तर आपणास काशी सोडून देशास जावे लागे, यास्तव आपण बोलिलो नाही'' (पेद ३०, पत्र १४७, पृ.११६-११७). नारायण दीक्षितांच्या तक्रारीचा आशय असा की, बाईंनी पंचवीस तीस हजार रुपयांहून जास्ती रकमेचा दानकर्म काशीस केला, परंतु तो तारतम्य पाहून केलेला नसल्यामुळे महाराष्ट्र ब्राह्मणांना दक्षिणा मिळावी तितकी मिळाली नाही व इतर ब्राह्मणांना जास्ती मिळून बाईच्या लौकिकास उणेपणा आला. याचे कारण बाईचे सल्लागार महाराष्ट्रीय भिक्षुक नव्हते, काशीचे गौड ब्राह्मण किंवा पंडे वगैरे लोक होते. नारायण दीक्षितांना ही व्यवस्था बदलता आली असती, परंतु तसे केल्याने स्थानिक गौड आदिकरून ब्राह्मणांशी वाकुडपणा येऊन दीक्षितांना काशीत नांदणे बिकट झाले असते.

राधाबाईंनी उमानाथ पाठक यांना तुम्ही आमचे क्षेत्रोपाध्ये आहात म्हणून पत्र लिहून दिले आहे. बाजीराव, चिमाजीआप्पा तसेच त्यांचे वंशजही क्षेत्रोपाध्ये म्हणून तुम्हाला पूजतील असे त्या पत्रात त्या म्हणतात (पेद ९, पत्र २५, पृ.१७).

राधाबाईंनी काशीयात्रा केली तो काळ उत्तरेतील राजकारणाच्या दृष्टिकोनातून अतिशय गुंतागुंतीचा होता. मराठ्यांच्या सत्ता प्राप्तीच्या आकांक्षा वाढल्या होत्या. स्वत: बाजीराव पेशवे आपल्या शिंदे, होळकर,

पवार, बाजी भिवराव या सरदारांसह माळवा तसेच राजपुताना प्रातांत लष्करी हालचाली करीत होते. बाजीरावांना अटकाव करायचा असेल तर त्यांनाच जर बादशाही अंमलदारी दिली तरी ते आपल्या प्रदेशावर आक्रमण करणार नाही असा जयसिंगांनी बादशहाकडे युक्तीवाद केला. परंतु त्यामुळे जयसिंग मराठ्यांकडे झुकले आहेत असा विरोध करीत त्यांच्या विरोधकांनी दिल्लीत बादशहाजवळ दुसरी फळी तयार केली. त्याला अटकाव करण्यासाठी खुद्द जयसिंगांनीच बाजीरावांना उत्तरेत आमंत्रित केले. राधाबाईंची काशीयात्रा व ही परिस्थिती एकाच वेळेला उत्पन्न झाली. राधाबाई जेव्हा उदेपूर-जयपूरला पोहचल्या त्या वेळेस बाजीरावांच्या या राजकारणाला वेग आला होता. सहाजिकच जयपूरला पडलेल्या दोन-अडीच महिन्याच्या मुक्कामात राधाबाईंकडूनही या राजकारणाला हातभार लागला असण्याची शक्यता आहे. ऑगस्ट १७३५ च्या एका पत्रात चाललेल्या राजकारणाबाबत सवाई जयसिंगांनी राधाबाईंच्या सल्ल्याबाबत विचारले असता त्यांनी उत्तरे दिले की आम्ही यात्रेस चाललो आहोत. राजकारणाचा विचार त्याचा त्याजवर म्हणजे बाजीरावांवर आहे (पेद १४, पत्र ४७, पृ.५१). परंतु त्याचवेळी मात्र राधाबाईंनी जयसिंगाची कन्या मांडीवर घेऊन त्याचा जावई रावराजे दलेलसिंगास बुंदीच्या गादीवर बसविले व पेशवे व त्यांच्या वंशजाकडून संरक्षणाची हमी दिली. या मागे रजपूत-मराठा संबंध दृढ व्हावेत असा राधाबाईंचा राजकारणी विचार नक्कीच असणार (मइसा ६, पत्र ५५६, पृ.६२९). राजकीयदृष्टया अतिशय संवेदनशील अशा काळात राधाबाईंची ही काशीयात्रा पार पडली. उत्तर हिंदुस्थानातील राजपूत राजे व मुसलमान सत्ताधीश अशांकडून त्यांचा मोठा सन्मान करण्यात आला. ठिकठिकाणी त्यांचा सत्कार करून मानाच्या भेटीही दिल्या. नबाब महंमद बंगश तर 'पेशव्यांची मातोश्री व आमची दोन नाहीत' असे म्हणतो. यावरून मराठ्यांबद्दल उत्तरेतील जनतेत आदरवजा धाकही दिसून येतो.

काशीताईंची काशीयात्रा

''१७४२ मध्ये नानासाहेब पेशवे बुंदेलखंडात छावणीस असताना पुढील सालारंभ त्यांनी काशी, प्रयाग, गया या यात्रा करून आले, त्या वेळी काशीताई बरोबर जाऊन ती दोन तीन वर्षे काशीसच राहिली.'' असे गो.स. सरदेसाई आपल्या रियासतीत लिहितात. त्याच लेखात पुढे ते असेही लिहितात एकूण पाच वर्षे काशीताई काशीमध्ये राहिल्या (मराठी रियासत ४: १०१). परंतु तसे घडलेले दिसत नाही. सन १७४१ ते १७४२ आणि १७४६ ते १७४७ अशी दोनदा त्यांनी काशीयात्रा केली असे प्रसिद्ध झालेल्या पत्रांवरून दिसून येते. नानासाहेब पेशव्यांनी आपले काशीचे तीर्थोपाध्ये वझे यांना सन १७५८-५९ मध्ये लिहून दिलेल्या उपाध्येपणाच्या सनदेमधेच चिरंजीव जनार्दनपंत व मातोश्री काशीबाई यांना दोनदा काशीयात्रेला

पाठविल्याचा संदर्भ आहे (वाड डायरी ३, पत्र १६४, पृ.११७). या काशीबाई म्हणजे पहिल्या बाजीरावांच्या पत्नी होत आणि चिरंजीव जनार्दनपंत म्हणजे पहिल्या बाजीरावांचा मुलगा होय.

काशीताईंची पहिली काशीयात्रा

सन १७४१-४२ च्या सुमारास पेशव्यांचा बंगालकडे स्वारीस जाण्याचा विचार चालला होता. पेशव्यांची ही मोहिम दि. १८ डिसेंबर १७४१ पासून ३० जुलै १७४३ पर्यंत चालली (मराठी रियासत ४: ३५). या स्वारीत पिलाजी जाधवही पेशव्यांच्या समागमे होते. १७ मार्च १७४२ ला पिलाजी जाधवांनी नानासाहेब पेशव्यांना लिहिलेल्या पत्रात काशीताईंनी काशीला यात्रेला येण्याचे संकेत दिलेले आहेत (सिपेद १, पत्र ५७, पृ.४२). पिलाजी जाधव लिहितात की, ''आम्ही हिंदुस्थानचे स्वारीस येत समई तीर्थरूप मातुश्री ताईंनी मजला महायात्रेस घेऊन जाणे यैसी आज्ञा केली. त्यास कासीकडे जावयाचे जालियास घेऊन जाऊ अैसे आम्ही बोलिलो. तयास हाली बंगालियाकडे आमचा जावयाचा डौल आहे. ऐशी यास स्वामींचे मर्जीस येईल तरी मातुश्रींची रवानगी करावी.'' यावरून पेशव्यांच्या बंगालवरील मोहिमेच्यावेळी काशीबाई त्यांच्या बरोबर होत्या याबाबत खात्री होते. परंतु पेशव्यांच्या बरोबर त्या सतत होत्या याबाबत शंका आहे. पेशव्यांनी आपली खास माणसे किंवा सरदार त्यांच्या बरोबर दिले असावेत आणि त्या वेळोवेळी स्वतंत्रपणे तीर्थस्थानांना भेटी देत असाव्यात असे वाटते.

याच मोहिमेत नानासाहेब पेशवे बुंदेलखंडात मोहिमेवर असताना त्यांच्या छावणीमध्ये असणाऱ्या खंडेराव बापूजी चिटणीस यांनी ८ नोव्हेंबर १७४२ रोजी लिहिलेल्या पत्रात 'मातुश्री व चिरंजीव बाबा कार्तिकश्नानाकरीता श्रीकाशीयात्रेमध्ये आहेत. स्नाने जाहली म्हणजे देशी येतील' अशा तऱ्हेचा मजकूर काशीबाई आणि जनार्दनपंत यांच्या संदर्भातील असावा (पेद २०, पत्र २८, पृ.२०). मराठी रियासतीमध्ये सरदेसाई यांनी हे पत्र काशीबाई संदर्भात दाखविले आहे (मराठी रियासत ४: १०१). पेशव्यांची शकावली (मइसा खंड २) या ग्रंथात जनार्दनपंत दि. ९ डिसेंबर १७४२ ला नाशिकमध्ये गोदावरी स्नान करीत आहे अशी नोंद मिळते. जर वरील पत्रातील मातुश्री या काशीबाईच आहेत असे समजले तर त्या डिसेंबर १७४२ मध्येच महाराष्ट्रात आल्या असाव्यात. तीर्थयात्री काशीयात्रेच्या परतीच्या प्रवासात येताना नाशिक-त्र्यंबकेश्वर मार्गे येऊन, तेथील देवदर्शन करतात, अशा तऱ्हेचे संदर्भ काशीयात्रेच्या परतीच्या प्रवासात मिळतात हे या निमित्ताने अधोरेखीत करणे गरजेचे वाटते. अशा तऱ्हेच्या परतीच्या प्रवासात जनार्दनपंत ९ डिसेंबर १७४२ ला गोदावरी स्नान करीत असावा.

याचवेळी बुंदेलखंडातून नानासाहेब पेशवे रघुजी भोसले यांस आवर घालण्यासाठी बंगालकडे जावयास निघाले. १ फेब्रुवारी १७४३ च्या पत्रात बातमी आहे की, ''पटणे प्रांते न जाता प्रयाग, काशी क्षेत्रे

जवळ जाणोन येथे आले. त्रिवेणी संगमी स्नाने झाली. सकल विधि उत्तम रीतीने जाहला. प्रयागच्या सुभाही आग्रहपूर्व नावा दिल्या. बहुत लोक नावांत बसून किल्याजवळ स्नाने करून वटदर्शन करून आले'' (पुरंदरे दप्तर खंड १, पत्र १५०, पृ.१०१). पेशवे शकावलीत ९ फेब्रुवारी १७४३ ला घडलेला प्रकार वर्णन केला आहे तो असा : नानासाहेब पेशवे काशी जवळ येताच त्यांना काशी घेण्याची इच्छा झाली. त्यांच्या जवळीच सैन्य पाहताच काशीचा अधिकारी म्हणजेच अयोध्येचा नबाब चिंताक्रात बनला. पेशव्यांनी काशी घेण्याचा प्रयत्न केला तर काशीतील मराठी ब्राह्मणांचा शिरच्छेद करण्यात येईल असे त्यांने काशीतील मराठी ब्राह्मणांना साांगितले. पुढे त्या ब्राह्मणांनी काशी न घेण्यासाठी पेशव्यांचे मन वळविले. नंतर पेशव्यांनी व इतरांनी साध्या वेशात जाऊन गंगास्नान केले (मइसा २: ९७).

वरील दिनांका दरम्यानचे खंडो गोमाजीने महादोबा पुरंदरे यांना लिहिलेले दि. २४ फेब्रुवारी १७४३ (?) चे पत्रांत असे लिहिले आहे की, ''मातुश्री ताई वाराणसीत सुखरूप आहेत. गयेस गेली होती, आली आसतील. माघस्नान यंदा जाले नाही. पुढे करून येतील'' (मइसा ६, पत्र १६३, पृ.२७०). या पत्रातील प्रसंग जरी खरा असला तरी या पत्राची तारीख तपासणे आवश्यक आहे.

येथपर्यंत काशीताईंच्या पहिल्या काशीयात्रेसंबंधी विवेचन केले. या विवेचनात काशीताईंची काशीयात्रा आणि नानासाहेब पेशव्यांची काशीयात्रा याबाबत वेगवेगळी चर्चा केली आहे. काशीबाईंच्या पहिल्या काशीयात्रेच्या प्रवासाचे वर्णन उपलब्ध नाही. परंतु त्या काशीस गेल्या होत्या हे नक्की. त्यांच्या काशी(वाराणसी) येथील वास्तव्याच्या दोन-तीन नोंदी कागदपत्रांत मिळतात. परंतु त्या नोंदीच्या कालाच्या/तारखेच्या बाबतीत काही शंका उभ्या राहिल्या आहेत. वरील विवेचनावरून असे दिसते की नानासाहेबांनी काशीताईंच्या काशीयात्रेबाबत स्वतंत्र व्यवस्था केलेली दिसते. त्या व्यवस्थेच्या साह्यांने काशीताईंनी काशीयात्रा केली व त्यां व्यवस्थेच्याच साह्याने त्या स्वतंत्रपणे महाराष्ट्रात परत आल्या. नानासाहेबांनीसुद्धा उत्तर हिंदुस्थानच्या मोहिमेवर असताना 'प्रयाग, काशी जवळच आहे, तर देवदर्शनही उरकून घेऊ' या उद्देशाने प्रयाग व काशीयात्रा केलेली दिसते. वरील विवेचन लक्षात घेतले असता असे दिसते की काशीताई काशीयात्रेहून महाराष्ट्रात नानासाहेबांच्या अगोदरच येऊन पोहचल्या असाव्यात. म्हणजेच पेशवे शकावलीतील जनार्दनपंताच्या गोदावरी स्नानाचा संदर्भ पाहता त्या डिसेंबर १७४२ मध्येच काशीयात्रेहून परत आल्याचे दिसते.

आता प्रश्न आहे तो म्हणजे 'काशीताई १७४२ ला काशीयात्रेला गेल्या त्या १७४७ ला परत आल्या. म्हणजे त्या जवळ जवळ पाच वर्षे काशीयात्रेत होत्या' या रियासतकारांच्या विधानाचा. काशीताई सन १७४२ ते १७४७ पर्यंत काशीयात्रेत असत्या तर पेशवे शकावलीतील नोंदी नुसार '२८ मे १७४३ ला

त्या रामेश्वर यात्रेहून परत येतात' या नोंदीला काहीही अर्थ उरत नाही. तसेच काशीताईच्या १७४६ च्या काशीयात्रेला जातानाच्या तसेच येतानाच्या प्रवासवर्णनांचे संदर्भही मोठ्या प्रमाणावर मिळतात (याची चर्चा पुढे केली आहे). त्यामुळे काशीताई काशीयात्रेत पाच वर्षे होत्या या रियासतकारांच्या विधानाला पाठबळ मिळू शकत नाही. त्यामुळे वरील आणि पुढे केलेल्या विवेचनावरुन त्यांनी दोनदा काशीयात्रा केली असे दिसून येते.

काशीताईंची दुसरी काशीयात्रा

काशीबाईं पहिल्या काशीयात्रेनंतर लगेचच रामेश्वर यात्रेला गेल्या असाव्यात. २८ मे १७४३ ला काशीबाई रामेश्वर यात्रेहून पुण्यास परतल्या अशी पेशव्यांच्या शकावलीत नोंद आहे (मइसा २: ९३). वा.कृ.भावे लिखित 'पेशवेकालीन महाराष्ट्र' मधील 'काशीयात्रा' हे प्रकरण आणि सरदेसाई गो.स. लिखित 'मराठी रियासत, खंड ४' मधील 'मातुश्री काशीबाईची काशीयात्रा' बाबतच्या लिखाणानंतर काही ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध झाली ती जोशी पु.म. संपादित 'Selection from the Peshwa Daftar, New Series, Vol.I, Expansion of Maratha Power (1707-1761)' या पुस्तकात. त्यामुळे सहाजिकच काशीबाईंच्या काशीयात्रेसंबंधी काही कालासंबंधीत नोंदीत सुधारणे करणे जरूरीचे आहे.

काशीबाई जानेवारी १७४६ च्या सुरवातीला दुसऱ्यांदा काशीयात्रेसाठी निघाल्या असाव्यात. कारण १८ जानेवारी १७४६ च्या विसाजी दादाजीच्या पत्रानुसार तो मुक्काम भामोडे येथे काशीबाईंची वाट पाहत होता. काशीबाई बरोबर त्यांचा भाऊ कृष्णराव महादेव जोशी चासकर तसेच विसाजी दादाजी हा खाजगी कारभारीही नानासाहेबाने दिला होता. यात्रेसाठी लागणाऱ्या डेऱ्यांची तसेच बाकीचे कारखाने म्हणजे यात्रेसाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या जिनसांची व्यवस्था पाहणारी खाते व्यवस्था, वाहतुकीसाठी लागणाऱ्या उंटाची व्यवस्था पहाण्याचे काम विसाजी दादाजी याजकडे होते. यात्रेसाठी लागणाऱ्या दस्तकांची व्यवस्था मराठ्यांचे दिल्ली येथील वकील बापूजी महादेव यांजकडून लवकरात लवकर करावी अशी नानासाहेब पेशव्यांपाशी त्यांनी विनंती केलेली होती (सपेद, पत्र ६८, पृ.५१). काशीबाई कायगाव-टोके, वेरूळ, बऱ्हाणपूर, सिरोंज, झाशी, काल्पी या मार्गाने प्रयागास गेल्या. काशीबाई प्रकृतीने अशक्त असाव्यात. बऱ्हाणपूर मुक्कामी त्यांचा भाऊ कृष्णराव चासकर लिहितो, ''मातुश्री ताईंचे शरीर बहूत सूक्ष्म झाले आहे. यास्तव मजली लहान कराव्या लागत आहेत'' (पेद १८, पत्र १३६, पृ.७७).

सामान्य व गरीब लोकांना स्वतंत्रपणे यात्रा करणे अवघड असल्यामुळे कोणातरी राजाच्या, संस्थानिकांच्या किंवा त्यांच्या कुटुंबातील स्त्रियांच्या आश्रयानेच यात्रेस निघावे लागे. कारण फौजेचे संरक्षण हे यात्रेतील मुख्य होऊन बसलेले साधन इतरांना सुलभ नव्हते. काशीबाई सिरोंज येथे पोचल्या (२८ मार्च

१७४६) तेव्हा त्यांच्याजवळ दहा हजार यात्रा जमली होती. यात्रेसाठीची दस्तके व यात्रेच्या जकातीची माफी सर्वसामान्य माणसांपेक्षा थोरांना मिळणे सहज शक्य असे. अर्धी वाट चालून येऊनही यात्रेची दस्तकेही दिल्लीहून आलेली नव्हती. बाईंचा कारभारी विसाजी दादाजी वारंवार बापूजी हिंगण्यांना त्याविषयी लिहिताना दिसतो. दस्तके वेळेवर न आल्यामुळे तब्बल दहा दिवस मुक्काम सिरोंजेस करावा लागला. सिरोंज येथेच बाईंच्या पायाला व्यथा झाली होती (पेद ४०, पत्र ३७, पृ.३०). बाईंना काशीविश्वेश्वराचे दर्शन करसे घडते यांची काळजी विसाजीस होती असे बा.कृ.भावे लिहितात. परंतु यावेळी काशीमध्ये नारायणभट्टाने बांधलेले काशीविश्वेश्वराचे मंदिर अस्तित्वात नव्हते. औरंगजेबाने ते सन १६६९ सालीच पाडले होते. तर अहिल्याबाईंनी बांधलेले काशीविश्वेश्वराचे मंदिर साधारणपणे सन १७७७ च्या सुमाराम बांधले गेले. मधील १०८ वर्षांच्या कालखंडात हिंदू लोक काशीविश्वेश्वराचे अस्तित्व त्या जागेवर आहे हे कल्पून/समजून भक्तीभावाने त्या जागेचे दर्शन घेत असत.

सिरोंजच्या पुढे बुंदेलखंडात मराठ्यांचे बुंदेल्याशी युद्ध सुरू होते. त्यामुळे पुढे संकराजी नारायण (?) त्यांच्या राऊतांच्या संरक्षणाखाली यात्रा झाशी, काल्पीवाटे यमुनापार झाली. बापूजी महादेव हिंगणे यांनी पाठविलेली दस्तके झाशी येथे प्राप्त झाली (सिपेद १, पत्र ७०,७१,७२, पृ.५२,५३). काशीबाई पुढे प्रयागमार्गे काशीस जेष्ठ बहुल चतुर्थी इंदुवारी पोहचल्या (सिपेद १, पत्र ७३, पृ.५४).

काशीबाईं काशीस आल्यानंतर त्यांच्याबरोबर सामना रंगला तो काशीचा राजा बळवंतसिंग यांच्यांशी. खैरउद्दीन अलाहाबादी लिखित 'बलवंतनामा' या ग्रंथात काशीबाईंसंबंधी पुढील माहिती आली आहे. बळवंतसिंगाचा भाऊ दासाराम याने बलवंतसिंगाशी काशी राज्यातील वाटा मिळावा म्हणून त्याच्या विरूद्ध विद्रोह केला होता. तीस-चाळीस हजार लोकांच्या समुदायाने आलेल्या पेशव्यांच्या मातोश्रींच्या संरक्षणासाठी सशस्त्र फौजही बरोबर होती. ते पाहून दासारामने काशीबाईंपाशी शरण जाऊन काशीचे अर्धे राज्य बलवंतसिंगांपासून घेऊन देण्यांची विनंती केली. काशीबाईंनीही मागचा पुढचा विचार न करता त्याची साथ केली. दासारामला जर अर्धे राज्य दिले नाही तर काशीतील मराठ्यांचे सैन्य त्याच्या विरूद्ध पाठवू अशी काशीबाईंनी धमकी दिल्याची तक्रार बलवंतसिंगांनी बादशहाकडे केली. अयोध्येचा नबाब सफदरजंगाचाही त्याला पाठिंबा होता. दिल्लीतील मराठ्यांचे वकील बापूजी महादेव हिंगणे यांनी याबाबतीत मराठे असे काही करणार असल्याचा इन्कार केला. पुढे याबाबतीत काहीही घडून आले नाही (Qanungo 1937: 65-66). मराठी पत्रातूनही या घटनेसंबंधी माहिती येते. हिंगणे पेशव्यांस लिहितात, ''बाराणसीहून बळवंतसिंगाचे लिहिणे आले की दशाराम जमीनदारास मातु:श्री कबिल्या सुद्धा घेऊन चालली आणि आम्हास सांगून पाठविले की यास अर्धे राज्य देणे, नाही तर फौज उतरेल. बादशहांनी बळवंतसिंगास कळविले,

माझीच मातु:श्री जाणून त्यांचे साहित्य करणे, तुमची चार माणसे मारली तरी हरगीज न बोलणे. माझ्या म्हटलियावर माझे घरास आली'' (मराठी रियासत ४: १००).

काशीराजा बलवंतसिंगाच्या मनात काशीबाईंसंबंधी थोडा राग शिल्लक असल्याचे पुढील घटनेवरून कळून येते. काशीबाईंचा कारभारी विसाजी दादाजी दि. १७-७-१७४६ च्या पत्रात बलवंतसिंगाने काशीबाईंना त्रास दिल्याचे लिहितात. बलवंतसिंगाने काशीबाईंना पेशव्यांची मातोश्री म्हणून आपल्या राजवाड्यातच राहावयास जागा दिली व घोडी, उंट, शिलेदारांना दुसरीकडे राहावयास जागा दिली. पुढे आठ दिवसामध्ये पाच घोडी चोरांनी चोरली. बलवंतसिंगांकडे याबाबतीत तक्रार केल्यावर त्यातील दोन घोडी परत केली. त्यामुळे बाकीची घोडीही त्यानेच नेली असतील असे समजून त्याच्याकडे ती परत देण्याचा तगादा लावला. परंतु चोरी केल्याने नाव खराब होईल या भितीने त्यांच्या म्हणजेच ''काशीबाईंच्या बरोबरील फौज स्थानिक लोकांशी कजिया म्हणजेच भांडण करतात, अमलाची वाट लावतात, तर मी काय करू?'' अशी उलटीच तक्रार त्याने अयोध्येचा नबाब सफदरजंगाकडे नेली. 'गयेस जावयास विदा करणे' असे नबाबाने राजास लिहून पाठविले. हे कळताच बापूजी हिंगणे यांनी काशीत चातुर्मासापर्यंत राहण्याची परवानगी बादशहाकडून मिळवून दिली (पेद ४०, पत्र ४२, पृ.३५). काशीत काशीबाईंच्या पायाच्या व्यथेने परत उचल खाल्लेली दिसते. आजारपण, काशीतील पावसाळा यामुळे चातुर्मासातील चार महिने काशीसच मुक्काम झाला. पुढे नारायण दीक्षितांच्या सल्ल्याने कार्तिकस्नाने उरकून यात्रा गयेस गेली (पेद ९, पत्र ३९, पृ.२६). एक महिना यात्रा गयेस होती. सर्व धार्मिक विधी संपवून पौष शुद्ध चतुर्थीस यात्रेने माघस्नानाकरीता प्रयागास प्रस्थान केले (पेद १८, पत्र १३९, पृ.७९). यात्रा प्रयागास आली त्यावेळी नबाब अमीरखान मारला गेल्याची खबर आली. त्यामुळे प्रांतात जमीनदारांची गडबड उडाली. नवा सुभा नेमल्याखेरीज ही गडबड थांबणार नाही. या गडबडीमुळे यात्रेला धोका पोहचण्याचा संभव असल्यामुळे यमुना ओलांडताना मराठ्यांनी लष्कर तयार ठेवावे अशी यात्रेच्या कारभाऱ्यांनी रामचंद्रबाबास विनंती केली होती (पेद ४०, पत्र ४७, पृ.३८).

काशीबाईंचा वाराणसीस एक वर्षे राहण्याचा इरादा होता. कोणास राहाणे असेल तरी राहाणे, नाही तरी जाणे असे त्या म्हणत होत्या. काशीबाईंबरोबर तीस चाळीस हजार यात्रा होती. श्रीमंताची आज्ञा त्रिस्थळी यात्रा करून परतावे अशी होती. काशीचा अधिकारी म्हणजे राजा बळवंतसिंग व अयोध्येचा नबाब सफदरजंग यांचे सहकार्य काशीबाईंच्या यात्रेला नव्हते किंबहुना त्यांचा त्रासच यात्रेला होत होता. असे असताना सुद्धा काशीबाई काशीत राहावयाचा हट्ट करीत होत्या. उत्तर भारतातील अशा राजकीय अस्थिरतेच्या मुळे त्यांचा कारभारी विसाजी दादाजी याला यात्रेच्या सुरक्षिततेची काळजी वाटत होती (पेद

४०, पत्र ४९, पृ.४०). यात्रेच्या सुरक्षिततेच्या काळजीने विसाजी दादाजीची पत्रे दिल्लीस बापूजी महादेव हिंगणे व दक्षिणेस नानासाहेब यांस गेली. त्यांची उत्तरे 'काशीतून लवकर निघा' अशी आली. काशीबाईंच्या यात्रेचा बंदोबस्त उत्तर हिंदुस्थानात मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांजकडेच होता. नबाब अमीरखान मारला गेल्याची प्रयागला जेव्हा बातमी आली, तेव्हा यात्रेला वाटेत शत्रूलोकांकडून त्रास होऊ नये म्हणून शिंदे-होळकरांनी काशीबाईंना लवकरात लवकर प्रयागहून निघण्याबाबत तगादा लावला (सिपेद १, पत्र ८१, पृ.५९). तेव्हा काशीबाई रामचंद्रबाबास लिहितात, ''मला संकट पडले आहे. कैसे म्हणाल तर माझ्या चित्ताव काशीत दोन चार महिने रहावे. परंतु हे मला बळेच ओढून काढितात.......माझे जाणे काशीस होय ते गोष्ट करणे'' (पेद १८, पत्र १३५, पृ.८८). काशीबाई अशा रितीने काशीस राहण्यास हट्ट करू लागल्या तेव्हा यात्रेबरोबर असलेले बाईंचे बंधू कृष्णराव चासकर यांनीही त्रागाच करण्याचे ठरविले. ते बाईस म्हणाले, ''तुम्ही यमुना उतरीत नाही तरी आपण वेणीत (प्रयागची त्रिवेणी) जीव देतो. असे सांगून ते डेऱ्यातून निघोन गंगातीरी गेले.'' विसाजी दादाजी याच पत्रात (दि. ५-२-१७४७) रामचंद्रबाबास लिहितात की, ''आम्ही बहुता प्रकारे सांगोन याच्या डेऱ्याजवळ मातुश्रीस नेऊन त्यास राहाऊन निदानी इतकाच विचार केला की, तुम्ही यमुना उतरून काल्पीच्या घाटास चला. तेथे राजश्री मल्हारराव व राजश्री जयाप्पा व राजश्री (रामचंद्र) बाबा आहेत. ते सांगतील तैसा विचार करावा. इतके ठरवून येथून कूच करावेसे जाले आहे. उद्या कूच करून पुढे येणार पण विश्वास येत नाही. घडीघडी विचार नवेच होतात. ये सोबतीने यावयाचे आम्ही कबूल करीत नव्हतो. त्यास बहुता प्रकारे श्रीमंतानी सांगोन समागमे लावून दिल्हे. आजीपावेतो तिरस्थली यात्रा उत्तम प्रकारे सर्वांची जाली, याउपरी हे विघ्न निर्माण जाले. आम्ही गरीब माणूस हे तो संकट येऊन पडिले. जर तुम्हा पावेतो पावेसे केले आहे हे घडोन आले म्हणजे पुढे आपण विचार करणे तो करतील'' (पेद ४०, पत्र ५०, पृ.४१).

''मातुश्री (काशीबाई) गयाश्राद्ध करून श्रीप्रयागास आल्या, प्रयागी मकरस्नान संपादिले. शिमगी पूर्णिमा करून देशास चालणार'' असे वर्तमान २३ फेब्रुवारी १७४७ च्या हिंगणे यांच्या पत्रात आहे. या पत्रात हिंगणे आणखी कळवितात, ''सफदरजंगाचे दरबारी वर्तमान आले की मातुश्री पुत्राशी आजुर्दा आहेत, म्हणून वाराणसीसच राहू म्हणतात. हे गोष्ट नबाबांनी आम्हास पुसली. आम्ही विनंती केली, गोष्ट फटकळ आहे. हे स्थळे ऐसी आहेत की हिंदु होऊन क्षेत्र सोडावे ऐसा हेत होत नाही. जागा जागा ऐस वर्तमाने आहेत.'' यावरून बाई पुत्राशी भांडून बाहेर राहते असा प्रवाह त्यावेळी उठला होता हे खरे (मराठी रियासत ४:१००). काशीबाईसंबंधी हे पत्र फेब्रुवारी १७४७ मधील आहे. तेव्हा याच वेळी बाईंना यात्रेस निघून एक वर्ष झाले होते. यात्रेने परत फिरावे या सर्वांच्या एकमुखी मागणीने काशीबाईंनी काशीस

राहण्याचा हट्ट सोडून दिलेला दिसतो. यात्रा परतीच्या प्रवासास लागून जून-जुलै १७४७ पर्यंत पुण्यात पोहचली असावी.

यात्रेत काशीबाईंबरोबर विसाजी दादाजी, कृष्णराव चासकर(जोशी) व त्यांची पत्नी आणि अनुताई घोरपडे (पहिल्या पेशव्यांची मुलगी व पहिल्या बाजीरावांची बहीण) बरोबर होत्या. यात्रेमध्ये काशीबाईंच्या पायाच्या व्यथेचा उल्लेख मिळतो. हा आजार त्यांना खूप आधीपासूनच होता. त्यावर उपचार करण्यासाठी निजामाकडील वैद्य आणावा अशीही सूचना होती. रियासतकारांनी काशीबाईंच्या यात्रेसंबंधीत कारणमीमांसेत सासू-सून भांडण (राधाबाई-काशीबाई), आई-मुलगा भांडण (काशीबाई-नानासाहेब पेशवे), काशीबाईंची नादुरूस्त प्रकृती, इत्यादी अंदाज वर्तविले आहेत. अर्थात ते अंदाजच आहेत. काशीबाई बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर म्हणजेच सन १७४० नंतर सलग काही वर्षे काही ना काही निमित्त काढून कधी रामेश्वर तर कधी त्रिस्थळीयात्रेच्या (एकूण दोन वेळा) निमित्ताने सन १७४७ पर्यंत पुण्याबाहेर राहिलेल्या दिसतात. इतका प्रदीर्घ काळ बाहेर घालविल्यानंतरही त्यांची यात्रा करण्याची हौस फिटलेली दिसत नाही. साधारणपणे सन १७५३ मध्ये काशीबाईंचा मुलगा रघुनाथ बाजीराव हा उत्तर हिंदुस्थानात मोहिमेवर गेला असताना त्या रघुनाथरावास परत त्रिस्थळी यात्रेस घेऊन जाण्याबाबत लिहितात. त्या लिहितात, ''हिंदुस्थानात गेल्यावरी प्रयागचा किला घेऊन आपण भागीरथीस जाऊ म्हणून लिहिले, हे श्रवण करून बहुत हर्ष जाला. तरी ईश्वरसतेकरून प्रयाग मुक्त जाला म्हणजे आम्हास घेऊन जावे. भगवंत तुमच्या मनोदयानरूप कार्यसिधी करो'' (पेद १८, पत्र १४८, पृ.८५). काशीबाई २७ नोव्हेंबर १७५८ रोजी वारल्या. त्याच्या अस्थी 'कृष्णाजी महादेव चिपळूणकर यांचेबरोबर महायात्रेला पाठवल्या' अशी दि. १८-१२-१७६० ची नोंद आहे. (पेद १८, पत्र १५९, पृ.९०) काशीबाईंच्या दुसऱ्या काशीयात्रेच्या (सन १७४५-४६) खर्चाकरता नानासाहेब पेशव्यांनी रु.१,००,०००/- च्या हुंड्याची तरतूद केलेली होती. तसेच दान देण्यासाठी १ काशीत व १ गयेत अशा एकूण दोन हत्तीही त्याच्याबरोबर देण्याची तरतूद केली होती (वाड डायरी ३, पत्र १४०, पृ.१०४).

सगुणाबाई यांची काशीयात्रा

पहिल्या बाजीरावांचा धाकटा मुलगा जनार्दनपंतांची बायको सगुणाबाई ही काशीयात्रेला जाण्यास साधारणपणे सप्टेंबर १७५५ च्या दरम्यान निघाली असावी. दि. २९ सप्टेंबर १७५५ रोजी नानासाहेब पेशव्यांनी दिल्लीस्थित हिंगणे बंधूना लिहिलेल्या पत्रात विजयादशमीच्या मूहूर्तावर सगुणाबाईंना काशीस रवाना केल्याचा उल्लेख मिळतो. अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला, काशीचा राजा बळवंतसिंग तसेच प्रयागच्या फौजदारांना लागणारी ताकीद परवाने पत्रे सगुणाबाईंना उपलब्ध करून देण्याची आज्ञा नानासाहेब पेशवा हिंगणे बंधूना

देतात (हिंगणे दप्तर १: ११६). सगुणाबाईंचा प्रवास नर्मदा ओलांडल्यानंतर सिरोंज, झाशी, काल्पी, बह्मावर्त, प्रयाग, काशी असा नेहमीच्याच मार्गाने म्हणजे मराठ्यांची ठाणी ज्या ज्या ठिकाणी आहेत अशा सुरक्षित प्रदेशातून झालेला दिसतो. त्यांच्या बरोबर तुबाजी अनंत म्हणून नानासाहेब पेशव्यांनी व्यवस्थापक दिलेला होता. दि. २५ व २६ फेब्रुवारी १७५६ रोजी अनुक्रमे सगुणाबाई व तुबाजी अनंत यांनी नानासाहेब पेशव्यांना यात्रा प्रवासात काल्पी मुक्कामाहून पत्रे लिहिली (पेद ४०, पत्र १००, पृ,८९ आणि सिपेद१, पत्र १८७, पृ,१८२). काल्पी येथे त्यांना प्रयागला काही तरी गडबड झाल्याचे समजले. त्यामुळे यात्रेच्या सुरक्षिततेसाठी गोविंद बलाल व हरि विठ्ठल हे प्रयागपर्यंत येणार व त्यानंतर काशीपर्यंत गोविंद बल्लाळांचा पुत्र बरोबर येणार असल्याचे त्यांनी लिहिले आहे.

काल्पीहून ब्रह्मावर्तास गंगातीरी यात्रा तिसऱ्या दिवशी पोचली (२९ फेब्रुवारी १७५६). तेथे तीर्थविधी व गंगास्नान झाले. तेथे चौदा दिवस राहणे पडले. दि. १४ मार्च १७५६ ला नानासाहेब पेशव्यांना तुबाजी अनंत लिहितो की, ''ब्रह्मावर्तास जास्ती मुकाम पडण्याचे कारण असे की, काशीचा राजा बळवंतसिंग व अयोध्येचा सुभा यांचा बिघाड झाल्यामुळे सुभेदार दहा पंधरा हजार फौज घेऊन काशीवर आला व काशीहून बळवंतसिंग पळून डोंगरात गेल्या कारणाने त्या बाजूला अंधाधुंद माजली. मातबर लोक काशी टाकून गेले. अशा स्थितीत पुढे जाण्याची पंचाईत पडली.'' नानासाहेबांनी नबाबास व प्रयागच्या सुभ्यास देण्याकरिता सगुणाबाईंबरोबर पत्रे दिली होती. ती तुबाजी अनंत याने पुढे पाठविली व मागाहून नबाबाकडे नारोपंत नावाचा गृहस्थही रवाना केला. त्यांची उत्तरे आल्यावर यात्रा प्रयागकडे जाण्यास निघाली (पेद ४०, पत्र ४०, पृ.३३). ती कुरा-जहानाबादेवरून निघून प्रयागास फाल्गुन वद्य चतुर्दशीस म्हणजेच २९ मार्च १७५६ रोजी पोचली. तेथे त्रिवेणीसंगमावर राहून व तीर्थविधी उरकला व चौथ्या दिवशी काशीकडे रवाना झाली (पेद ४०, पत्र १२४, पृ.१२०). प्रयागहून निघाल्यानंतर पहिलाच मुक्काम प्रयाग शेजारील झोंसी (सध्याचे नाव झुशी, हे गाव सध्या अलाहाबादचे उपनगर म्हणून ओळखले जाते.) गावात पडला. दि. २ एप्रिल १७५६ रोजी सगुणाबाईंनी नानासाहेब पेशव्यांना लिहिलेल्या पत्रातही सुजाउद्दौला व बलवंतसिंग यांचा बिघाड झाल्याचे लिहिले आहे. सगुणाबाई लिहितात, ''नवाब सुजातदौला यांचा व बलवंतसिंगराजे यांचा बिघाड झाला होता. यामुले नवाबाने बलवंतसिंगावरी मोहीम केली. बलवंतसिंग पार उतरोन पलोन गेला, त्याजवरी याणी पूल बांधोन पार केले. लतीबपुरचा किला नवाबाने घेतला. जबरदस्ती पोहचलियावरी बलवंतसिंगाने सलूख केला. पंचवीस लाख रूपये देऊ केले. कार्य जालियावरी नवाबाने बलवंतसिंगाची ठाणी माघारी दिल्ही. नवाब अयोध्येस गेले'' (पेद २१, पत्र १७०, पृ.१८५). बाई काशीस चैत्र शुद्ध नवमीस म्हणजेच ९-४-१७५६ रोजी पोहचल्या. तेथे आठ दिवस राहून व तीर्थविधी उरकून

त्यांनी गयेकडे कूच केले. गयेस त्या वैशाख शुद्ध प्रतिपदेस म्हणजेच ३० एप्रिल १७५६ रोजी पोचल्या. तेथे गयावर्जने करून परत काशीस आल्या (पेद ४०, पत्र १२५, पृ.१२०).

यात्रेस जाताना प्रयाग-काशीकडे सुज्याउद्दौला व बलवंतसिंग याच्यात बिघाड झाल्यामुळे प्रयागास पोहचण्यास पोहचण्यास फाल्गुन महिना उजाडला. त्यामुळे प्रयागातील माघस्नानाची पर्वणी हुकली. सगुणाबाई गयेहून काशीस परत आल्यानंतर मे १७५६ ते जानेवारी १७५७ पर्यंत काशीसच राहिल्या. ३० जानेवारी १७५७ ला अंताजी माणकेश्वर नानासाहेब पेशव्यांना सगुणाबाई माघस्नानाकरीता प्रयागास आल्याचे लिहितात. सगुणाबाईच्या मनात प्रयाग झाल्यानंतर मथुरेसही यात्रेस जावयाचे होते. परंतु अब्दालीची स्वारी या भागात झाल्यामुळे तुम्ही मथुरेस न येता काल्पीवाटे देशास परत जावे असा निरोप अंताजी माणकेश्वराने सगुणाबाईस दिला होता (पेद २१, पत्र ९६, पृ.१०५). यामुळे सगुणाबाई माघ वद्य ७, दि. ११ फेब्रुवारी १७५७ प्रयागाहून निघून २२ फेब्रुवारी १७५७ ला झाशी, तेथून सिरोंज, उज्जैन, ओंकार मांधाता, बऱ्हाणपूर, कासिरीचा घाट, येवला, नाशिक, त्र्यंबकेश्वर करून जून १७५७ च्या सुमारास पुण्यास पोहचल्या असाव्यात. म्हणजे सप्टेंबर १७५५ ते जून १७५७ अशी पावणेदोन वर्षे सगुणाबाई यात्रेमध्ये होत्या.

सगुणाबाई काशीयात्रेस गेल्या असता त्यांना खर्चास नव्वद हजार रूपये देण्याविषयी पेशव्यांनी गोविंदपंत बुंदेले यांजकडे वराता केली. यावेळी गोविंदपंत दक्षिणेत गेले असून त्यांचा मुलगा बाबाजी गोविंद कामावर होता, त्याने ही वराता स्वीकारली नाही. सबब रघुनाथरावांनी त्यास खालील खरमरीत पत्र ता. १३ मार्च १७५७ च्या स्वारीतून लिहिले, ''ऐवज आम्हाकडे नाही, आम्हास अनुकूल न पडे, आम्ही सरकारचे चाकर नाही, गोविंदपंताचे चाकर, याप्रमाणे नाना प्रकारच्या बयादा सांगितल्या. पंचवीस हजार रूपये दिले, बाकीचा ऐवज नाही म्हणोन जाबसाल केला. ऐशास तुम्ही ऐवज न दिला ही गोष्ट उत्तम न केली. तुम्ही मातबर मामलेदार हरप्रयत्न करून ऐवज द्यावा, न दिला ही फार वाईट गोष्ट केली. तर पत्र पावतांच बाकीचा पासष्ट हजार ऐवज झाशीस बाईकडे पावता करणे. अंतर केल्यास खावंदाची परिछिन्न अवकृपा तुम्हांवर होईल'' (मराठी रियासत ४: ४९१).

देवराव मेघशाम लपाटे हा छत्रपती शाहू महाराजांच्या मर्जीतला माणूस सगुणाबाईं बरोबर त्रिस्थळी यात्रेत होता. त्याने तेथील परिस्थितीचे वर्णन सदाशिवरावभाऊ यांस दि. ५-३-१७५७ रोजी लिहिले आहे. तो लिहितो की यात्रा परतत असताना माघस्नानाकरीता यात्रा प्रयागला आली असताना तेथील नबाब महमदकुलीखान याने यात्रेकरूंना यात्राकरासाठी फार त्रास दिला. याच वेळी दक्षिणेतून पाच सात यात्रा प्रयागला एकत्र आल्या होत्या. पुण्याची राजेश्री मोरो बल्लाळ व राजेश्री बज्याबा कऱ्हाडची व वाईची यात्रा

विश्वनाथ वैद्य तसेच करमाळ्याची व नागपूरचीही यात्रा एकंदर सात हजार जमा झाली होती. सगळ्यांकडे तो हासील मागू लागला. तेव्हा देवराव मेघशाम यांनी मध्यस्थी करून मातोश्री म्हणजेच सगुणाबाई कडून वस्त्रे, एक घोडा व दोन कडी असे देऊन हासील न घेण्याविषयी सांगितले. यात्रेकरूंकडील कर हे प्रयागच्या नबाबाचे उत्पन्नाचे एक प्रमुख साधन होते. त्यामुळे माझी लक्ष रूपयांची प्राप्ती बसविली असे तो म्हणाला. तेव्हा श्रीमंतांच्या स्नेहाच्या बदल्यात कर न घ्यावा असे त्यास देवराव मेघशाम यांनी सांगितले (पेद २१, पत्र १०२, पृ.१२०).

सगुणाबाई विधवा, पोटी पुत्रसंतान नाही, केवळ दिरांच्या मर्जीवर अवलंबून. त्यांनी कृपा केली म्हणून त्यांना यात्रा घडली. त्या कामी भाऊसाहेब पेशव्यांकडे पुढारीपण असून सगुणाबाईंची बहुतेक पत्रे त्यालाच उद्देशून लिहिलेली आहेत. त्या पत्रावरूनही बाई एकंदर परिस्थिती लक्षात घेऊन वागत असल्याचे दिसून येते. पत्रांची धर्ती पाहिली असता बाईचा स्वभावही गरीब असल्याविषयीच खात्री पटते (भावे १९७६: ३३२).

येसूबाईंची काशीयात्रा

सगुणाबाईंप्रमाणे पेशव्यांच्या आप्तापैकी कोणी दुसरी स्त्री सन १७५७ त काशीयात्रेस गेली होती. याच सुमारास रघुनाथरावही उत्तरेतील मोहिमेत असण्याची शक्यता आहे. कारण येसूबाई रघुनाथरावाकडे देशी जाण्यासाठी पैशांची मदत मागते. तसेच येसूबाईंच्या बरोबर असणाऱ्या यात्रेला त्रास झाला असता रघुनाथरावाची पत्रेही काशी व गयेच्या अधिकाऱ्यांना जातात. पण त्या पत्रांचा काहीही उपयोग झाला नाही. याच सुमारास नुकतीच अब्दालीची स्वारी हिंदुस्थानावर होऊन मराठ्यांचा धाक काहीसा नाहीसा झाला होता.

येसूबाईंनी रघुनाथरावाला लिहिलेल्या पत्रात त्या चिरंजीव संबोधतात व काशी-गयेच्या मार्गावरील कष्टांचे वर्णन करतात. कामदारखान नावाच्या अधिकाऱ्याने चौकीवर यात्रेकरूंपासून सव्वानऊ रूपये वसूल केले. त्यानंतरही साडेतीन हजार रूपयांची बाकी राहिली. त्यासाठी ओलीस म्हणून विश्वनाथभट वैद्य यांना धरून नेले. मागाहून रूपये पाठविले तेव्हा मानपूरच्या गढीतून शिपायांनी ते लुटले व रूपये नेणाऱ्या माणसांनाही ठार मारले. त्यावर परत कामदारखान यास साडेतीन हजार रूपये दिले तेव्हा वैद्य सूटून आले. त्यानंतर गया येथील चौकीवर सुमारशहा राजा याने प्रत्येक खापरास सव्वानऊ रूपये, गरीब यात्रेकरू असेल त्यापासून सव्वाआठ, सव्वासात रूपये घेतले. त्यानंतर गयावर्जने झाली. पुढेही सव्वानऊ रूपये खापरास व दर्शनार्थींना पावणेदोन रूपये भरले. असे एकूण पस्तीस हजार रूपये यात्रेकरूंकडून घेतले. तेथून पुढे आल्यावर दाऊदनगरी येथील चौकीवर गंगा उतरण्यासाठी प्रत्येक माणसाकडून पाऊण रूपया/एक रूपया

घेतला. काशीच्या राजाने जाते वेळी प्रत्येक माणसाकडून अर्धा रूपया व येते समयी अर्धा रूपया असे एकूण चार हजार रूपये घेतले. काशीचा फौजदार नंदलाल याने तर चार महिने अंगावर घातलेल्या कपड्यांवरही कर घेतला. त्याला बरोबर नेलेली पेशव्यांची पत्रे दाखविली पण त्याचा उपयोग झाला नाही (पेद १८, पत्र क्र.१४६,१४७, पृ.८३,८४). या घटनेचा आर्थिक जमा-खर्चही आपणास वेगळ्या कागदपत्रात आढळून येतो तो पुढीलप्रमाणे - (सिपेद १, पत्र क्र.२००, पृ.१९३)

श्री

जुलै १७५७

यादी यात्रेस रुा.गयेस जाता पडिले बिा.रुा.

५००० बलवतसिंग राजा कासी याणे घेतले

४००० नावेचा उतार म्हणौन.

२००० गयेस जातां.

२००० गयेहून येतां.

४०००

१००० सणगे लोकी घेतली होती व जुनीहि होती त्याचा हसील.

५०००

१८००० कामदारखान पठाण मईवाला याणे खंडणी घेतली.

३८९०० संदरशाराजा गया याणे घेतले रुा.

२८००० मुरार चौकीदार सवनऊ सवआठ सवासात प्रो.

५००० बाहेर निघता गयेहून सवा नऊ रुा यात हमी होती ती घेतली दुबारा.

३३०००

२००० कोचेची चौकी दुबारा घेतली.

२०० धोडभटास घेतले.

३७०० आम्ही पठाणाचे लस्करांत होतो त्वेव्हा रुा.जादा होते ते सनोखी मारून नेले.

३८९००

६१९००

ताा.

५१९०० माणेकरी याणी दिल्हे

१०००० विस्वनाथभट यांचे आंगावर पडले ते आम्ही दिल्हे.

६१९००

सरस्वतीबाई पटवर्धन यांची त्रिस्थळीयात्रा

वासुदेवशास्त्री खरे यांनी सरस्वतीबाई पटवर्धन यांच्या काशीयात्रेची कागदपत्रे प्रसिद्ध केली आहेत व त्या कागदपत्रांआधारे काशीयात्रेचे विवेचनही केले आहे (ऐलेसं ७ १९१२: ३७५७-३७०१). पुढे याच विवेचनाचा आधार घेत वा.कृ.भावे यांनी आपले काशीयात्रा प्रकरण सजविलेले दिसते (भावे १९७६: ३२६-३३८). सरस्वतीबाई पटवर्धनांच्या काशीयात्रेचे वर्णन वरील ग्रंथांच्या आधारेच करण्यात आले आहे.

पटवर्धन सरदारांपैकी अत्यंत शूर सरदार गोपाळराव पटवर्धन यांची पत्नी सरस्वतीबाई सन १७८३ च्या ऑक्टोबर महिन्यात मिरजेहून काशीयात्रेस निघाल्या. सरस्वतीबाई काशीयात्रेस निघणार ही आवई मिरजेच्या आसपास सांगली, कुरंदवाड, गणेशवाडी, हरिपूर, तासगाव, इचलकरंजी, जमखिंडी, तेरदाळ, मनोळी, नरगुंद, रामदुर्ग इत्यादी गावी आधीच होऊन सरस्वतीबाईंनी मिरज सोडली तेव्हा पाच चारशे यात्रेकरू त्यांच्या बरोबर मार्गस्थ झाले. बाईंचे दीर बाळासाहेब यांनी बाईंच्या दर्जास शोभेचा उंट, घोडे, डोल्या, स्वार, प्यादे, शागीर्द इत्यादी लवाजमा दिला होता. यात्रेचा परचक्रापासून बचाव करण्याकरिता, सैन्यात वाटेने आघाडीपिच्छाडीचा ज्या रीतीने यात्रेचा बंदोबस्त ठेवतात त्या रीतीने यात्रेचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यात्रेच्या आघाडीला पटवर्धनांचे आप्तइष्ट व आश्रित यापैकी गोविंदपंत सखदेव व चिंतोपंत चालत, मध्ये कानोपंत रहात व पिच्छाडीचे रक्षण बळवंतराव यादवाडकर करीत. मार्ग क्रमताना ही व्यवस्था होती. पण तळावर मुक्काम पडला म्हणजे रात्रीच्या वेळी अधिकच काळजी घ्यावी लागे. तेथे प्रमुख लोक रात्री जागून आळीपाळीने गस्त घालीत.

सरस्वतीबाईंनी सन १७८३ च्या ऑक्टोबर महिन्यात मिरज सोडली, त्यावेळी पुढील सर्व अडचणी लक्षात आणून परशुरामभाऊ पटवर्धन व खुद्द पेशवे यांची पत्रे शिंदे, होळकर, इंग्रज इत्यादिकांस घेतली होती. मिरजेहून रहिमतपूर व रहिमतपुरावरून बारामती या मार्गाने जाऊन यात्रेने भीमेच्या काठचे गार-दौड गाठले. गार-दौडापर्यंत ठिकठिकाणी नवी यात्रा येऊन मिळतच होती. गार-दौडाहून सरस्वतीबाई दरकूच दरमजल करीत कायगाव टोक्यास पोचल्या. बाईंनी येथे सात दिवस मुक्काम केला. येथे चोहोकडील यात्रा आणखी जमून मूळ यात्रा नदीच्या प्रवाहाप्रमाणे एकसारखी फुगत चालली. कायगाव, टोके व प्रवरासंगम या तीन गावांत यात्रा पांगली होती ती चार हजारांपर्यंत असावी असा बाईंनी तर्क केला. कायगाव येथून यात्रा वेरूळ, देवगाव, वाकळे, कासारबारी घाट, भडगाव, वरणगाव मार्गे बऱ्हाणपूरास बाराव्या दिवशी पोहचली. बऱ्हाणपुरावरून बाई आपल्या दिरास लिहितात, ''मार्गी चालताना अडचणींची वाट लागली म्हणजे यात्रेचा खोळंबा फार वेळ होतो. दररोज एक दोन माणसे घोड्यावरून पडोन अथवा लाथ लागोन जाया होत असतात. यात्रेत फार करून कंगाल फार आहेत. यात्रेत चोरीचा उपद्रव भारी आहे. याजमुळे नवे प्यादे असामी २५ ठेविले आहेत. यात्रेत चारी प्रहर घस्त घालावी लागते.''

बऱ्हाणपुरावरून यात्रा महेश्वरच्या घाटाने महेश्वरला गेली. महेश्वर ही अहल्याबाई यांची राजधानी होती. नर्मदा नदी नावेतून पार करून यात्रा महेश्वरला उतरली. अहल्याबाईने यात्रेतील ब्राह्मणांना व गोरगरिबांना शिधा व एक एक रुपया दक्षिणा दिली. सरस्वतीबाईची व अहल्याबाईंची भेट झाली. महेश्वरास असतानाच बातमी आली की, 'उत्तरेत महर्घता फार झाली आहे, काल्पीकडे व प्रयाग वगैरे प्रांतांत सातआठ शेरांची धारण झाली आहे. झाशीपासून उज्जनपावेतो कंगाल येऊन राहिले आहे. तिकडून यात्रा जातेसमयी अन्नाविषयी यात्रेची निभावणी होऊ देणार नाही.' यासाठी पुढचा बेत सर्वांचे विचारे ठरविण्याकरिता मातबर गृहस्थांची सभा भरवून त्याजपुढे हा प्रश्न ठेवला. पण कोणाचाही पक्का मनसबा ठरेना. तेव्हा महांकाळेश्वराचे दर्शन घेऊन भेलशापर्यंत जावे व पुढचा बेत पुढे करावा, असा निकाल बाईंनी सांगितला. अहल्याबाईंसही हा मनसुबा पसंत पडून त्यांनी आपणाकडील शंभर राऊत यात्रेबरोबर उज्जनीपर्यंत दिले. महेश्वरापासून उज्जनीपर्यंत होळकरांचा मुलूख होता. त्यात होळकरांच्या ठिकठिकाणच्या कमाविसदारांनी यात्रेचा बंदोबस्त उत्तम ठेवला. उज्जनीहून भेलशाला जाताना शिंद्यांनी आपले राऊत व प्यादे यात्रेबरोबर दिले. भेलस्यास यात्रेचे चारपाच मुकाम झाले. भेलसा सोडल्यावर पाऊस लागला व कंगालांनीही उपद्रव केला. त्याचे वर्णन सरस्वतीबाईंनी आपले दीर बाळासाहेब पटवर्धनांना लिहिलेल्या पत्रात केले आहे की, 'गोरगरीब भाकरी करू लागल्यास (कंगालांनी) वर पडोन न्यावी व उष्ट्या पत्रावळी टाकावयास गेले तर हातातून घ्याव्या. याप्रमाणे कंगालांच्या झुंडीच्या झुंडी जागा जागा जमा झाल्या होत्या. मार्गाने चालो लागले म्हणजे एकीकडून यात्रेची रव व एकीकडून कंगालांची रव पडावी. याप्रमाणे पांच पांच हजार मिळोन देशाकडे जाऊ लागले. पर्जन्य भारी लागला. दोन दोन दिवस सूर्य दर्शन नाही अशी पावसाची झड लागली.' भेलशाहून यात्रा सागरला आली. सागरपासून यमुनेपर्यंत बुंदेल्यांचा मुलूखच असल्यामुळे बुंदेल्यांनी आपल्या कमाविसदारांना पत्रे दिली व यात्रेबरोबर पंचवीस स्वार व नगारानिशाणही ठेवले. यात्रा यमुनेवर गेल्यानंतर प्रयाग पाच मजला अंतरावर राहिले

प्रयाग, काशी व गया ही हिंदूची प्रमुख क्षेत्रे त्यावेळी इंग्रजांच्या ताब्यात होती. यासाठी बाईंनी पेशवे सरकारचे पत्र जासूदजोडीबरोबर प्रयागच्या इंग्रजांकडे आगाऊ रवाना केले. म्हणून यमुना उतरल्यावर प्रयागापर्यंत दोन चौक्या होत्या तरी बाईंच्या यात्रेस एक पैसाही पडला नाही. प्रयागास प्रयागवळाबरोबर दक्षिणा करार केली ती दर स्वारीस रुपये तीस व सड्या माणसास रुपये तीन येणेप्रमाणे होती. प्रयागाप्रमाणे काशीसही इंग्रजांच्या बंदोबस्तामुळे यात्रेस जकातीचा उपसर्ग पोचला नाही. इंग्रजांचा दस्तक, चकती, तेलंगे टोपीकर असामी २ व हरकारे जोडी याच्या जोरावर यात्रा निर्विघ्नपणे काशीत गेली. यात्रा क्षेत्री गेल्यावर इंग्रजांनी गंगापुत्रास ताकीद दिली की, 'यात्रेकरू आहेत. यासी कोणी कज्जा भांडण जास्ती जलाल करू नये!' बाई काशीस होत्या तेव्हा स्वदेशी (महाराष्ट्रीय) व परदेशी यात्रा ४०/५० हजार पावेतो मिळाली

होती. काशीहून निघताना लॉर्ड हेस्टिंग्जपासून रहदारीचे दस्तक व गयेच्या महसुलाची चकती बाईंनी मिळविली असल्यामुळे त्यांना गयेसही कर पडला नाही. गयेला जाताना बाईबरोबर दहा हजार यात्रा होती. पण एवढ्या यात्रेकरिता करमाफी मिळविण्याचे कामी बाईंना दरबार खर्च दहा हजार रूपये आला. सरस्वतीबाईंनी नवऱ्याची पाच व घरातील मंडळीची नक्त एकूण चौदा गयावर्जने केली, त्याचा खर्च साडेआठ हजार रुपयांवर गेला. त्यात रोख रुपये दोन हजार, दोन शेरांची दोन सोन्याची कडी, एक शेराची सोन्याची साखळी, कुडक्या, चांदीचे एक ताट, दोन वाट्या, चंबू, पंचपात्री, पळी असा विषय आणि शालजोडी, पीतांबर ही वस्त्रे होत. खेरीज गयावळास मोडनिंब तालुक्यात शंभर रुपयांची जमीन इनाम करून देण्यात आली. गयेत यात्रेचा मुक्काम तीन महिने पडला. त्या मुक्कामत मरीचा उपद्रव होऊन माणसे नित्य मरावी. त्यांतील पुरुषाबरोबर त्यांच्या स्त्रियांनी अग्निप्रवेश करावा हा प्रकार घडतच होता. काशीहून गयेस जाण्यास चौदा दिवस लागले. टोक्यापासून प्रयाग ५४ व्या मजलां नंतर आले. वाटेत मुक्काम २६/२७ झाले व प्रवास ४६१ कोस झाला. रोजची मजल सरासरी ७/१० कोसांची असे. काशीस यात्रा परत आल्यावर कोणी अयोध्या, मथुरा, बदरीकेदार इकडे गेले व निम्मे शिम्मे यात्रा राहिली ती बरोबर घेऊन सरस्वतीबाई पूर्वीच्या मार्गानेच परत देशी आल्या (भावे १९७६: ३२६).

सर्फोजीराजे भोसले (दुसरे) तंजावरकर यांची काशीयात्रा

महाराष्ट्राच्या राजकीय तसेच सांस्कृतिक वारशाच्या विस्ताराची सुरवात शिवाजी महाराजांच्या वडिलांच्या म्हणजेच शहाजी महाराजांच्या कारकिर्दीतच झाली होती. शहाजी महाराजांच्या कर्नाटकातील सत्तेचा विस्तार दक्षिण भारतात दूरवर तमिळनाडू मधील तंजावर मध्ये झालेला पहायला मिळतो. इ.स. १६७६ ते १८५५ अशी जवळजवळ पावणे दोनशे वर्षे टिकलेल्या या मराठी सत्तेने तामिळ संस्कृतीवर आपला आपुलकीचा ठसा उमटविलेला आहे. याच घराण्यातील महत्वाचा राजा म्हणजे छत्रपती सर्फोजी महाराज (दुसरे) होत (इ.स. १८९८ ते १८३२).

सर्फोजीराजे दुसरे यांनी त्यांच्या आयुष्यात दोनदा तीर्थयात्रा केली. पहिल्या तीर्थयात्रेत त्यांनी तंजावरच्या आसपासच्या तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या (डिसेंबर १८०१ ते जानेवारी १८०२). 'शरभेंद्र तीर्थावली' या ग्रंथात या यात्रेचे वर्णन आले आहे (महाडीक १९५२). दुसरी तीर्थयात्रा केली ती त्रिस्थळी यात्रा होय (सप्टेंबर १८२० ते एप्रिल १८२२). सर्फोजींनीच लिहिलेल्या 'त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या' या काव्यात त्यांनी भेटी दिलेल्या यात्रेतील तीर्थस्थानांच्या महतीचे वर्णन केले आहे. शरभेंद्र तीर्थावली मध्ये तीर्थयात्रेमध्ये येणाऱ्या पवित्र क्षेत्रातील राजाने केलेली धार्मिक कार्ये तसेच स्वत:बद्दलच्या माहितीकडे पुरेसे लक्ष दिलेले दिसते. याउलट 'त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या' मध्ये अशा तऱ्हेची माहिती मिळत नाही. याची भरपाई तंजावर मधील सरस्वती महल ग्रंथालयातील मोडी कागदपत्रातून मिळते. 'राजा सर्फोजी दुसरा' या

तूळजेंद्रराजे भोसले यांनी लिहिलेल्या इंग्लिश पुस्तकात या कागदपत्रांचा उपयोग करून काशीयात्रेची माहिती दिली आहे (Bhosale 1999: 82-94).

काशीयात्रेला जाण्यापूर्वी सुमारे वर्षभर आधी यात्रेच्या तयारीसाठी सर्फोजींनी मद्रासला भेट देऊन त्यांच्या मार्फत कलकत्याच्या गव्हर्नर जनरलकडे यात्रेसाठी परवानगी मिळविण्यासाठी अर्ज केला होता. यात्रामार्गात सर्व सोयी देण्याविषयी मद्रासच्या गव्हर्नरकडे संमती मागितली. आपल्या राज्याच्या उत्पन्नातून यात्रेसाठी काही आर्थिक मदत करावी तसेच याबाबतच्या सूचना यात्रा मार्गातील ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी, तहसिलदार, कलेक्टर यांना देण्यात यावेत अशीही मागणी त्यांनी केली. यात्रेबरोबर नेण्यात येणाऱ्या जनावरे उदा. घोडे, बैल, उंट व हत्ती यांच्यासाठी चारा तसेच घासदाण्याची तरतूद करण्याची सूचना अधिकाऱ्यांना करावी अशीही मागणी त्यांनी केली. यात्रामार्गात ठिकठिकाणी राजाच्या योग्यतेप्रमाणे त्यांचा मानमरातब राखावा व २१ तोफांची सलामी देऊन योग्य इतमामात स्वागत करण्याच्या सूचना देण्यात याव्यात असेही कळविले. गव्हर्नर जनरलने या सर्व सूचना स्वीकारून त्यांचे अधिकारी व इतर राजेरजवाड्यांना स्वागत, मानमरातब, आर्थिक सहाय्य तसेच धान्यपुरवठा करण्याच्या सूचना दिल्या. या वेळी सर्व भारत ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिपत्याखाली आला होता. गव्हर्नर जनरलच्या या सूचनांमुळे मदतीत सुलभता आली आणि जिथे जिथे सर्फोजी महाराज गेले व मुक्काम केला त्याठिकाणी त्यांचे राजेशाही स्वागत झाले.

प्रत्यक्ष यात्रेला निघण्यापूर्वी राज्याचा सर्व कारभार त्याने आपला मुलगा राजपुत्र शिवाजी (दुसरा) याजकडे सूपूर्त केला. राज्याचे सरखेल रामोजी सर्जेराव घाटगे यांना आपल्या सर्व सूचनांचे पालन करावयाची व आपल्या अनुपस्थितीत राजपुत्र शिवाजीला मदत करण्याच्या आज्ञा दिल्या.

प्रत्यक्ष यात्रा निघायच्या वेळेस धार्मिक विधी करण्यासाठी काही पवित्र धार्मिक वस्तूंची मागणी केली गेली. त्यापैकी पूर्णकुंभ, ध्वज, श्वेतछत्र, दीप, शंख इत्यादी होत. स्नान केल्यानंतर राजांनी पांढरा झगा व हिरवी पायघोळ विजार परिधान केली. कांचीच्या शंकराचार्यांनी दिलेली रूद्राक्षांची माळ गळ्यात घातली. कुलदेवतेचे दर्शन घेतले, ब्राह्मणांना दाने दिली. उजव्या पायाने प्रारंभ करून ३२ पावले टाकून घोड्यावर स्वार झाले. तंजावर, वृद्धाचलम, तिरूपती, मंगलगिरी, श्रीशैलम, गंजम, जगन्नाथपुरी, मोघीर, मार्गे प्रयाग, काशी, गया, कलकत्ता परत येताना परत जगन्नाथपुरी, नागपूर, आदिलाबाद, मल्लीपेट, शहाबाद, नांद्याळ, कडाप्पा, तिरूपती, कालहस्ती, कांचीपुरम, पणरोट्टी, चिदंबरम, तंजावर असा त्यांचा यात्रा प्रवासाचा येता-जातानाचा मार्ग होता.

जातानाच्या प्रवासात जगन्नाथपुरीच्या मंदिराचे दर्शन, पूजापाठ करून, रोख रक्कम दान दिली. पुरीच्या राजाने त्यांचे स्वागत केले. गाठीभेटी होऊन भेट वस्तूंचे आदानप्रदान झाले. त्यानंतर मोघीरमार्गे

सर्फोजी प्रयागला पोहचले. तेथील त्रिवेणी संगमावर पूजा करून हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे सर्व विधी यथासांग पूर्ण केले. त्यानंतर ते काशीला पोहोचले. काशीत 'तंजावर तंम्बूरन मठात' त्यांनी वास्तव्य केले. तंजावरच्या राजाच्या अन्नछत्राचाही त्यांनी विजयादशमीपर्यंत वापर केला. हिंदू धर्म प्रथेप्रमाणे मनिकर्णिका, दशाश्वमेध घाटावरील सर्व धार्मिक विधी पार पाडले. सर्व तीर्थात स्नान केले. दंडपाणी, काळभैरव, लोकार्कदेव, योगिनी, त्रिलोचन, धर्मेश्वर, विरेश्वर, ओंकारेश्वर, रत्नेश्वर आदि मंदिरात जाऊन दर्शन घेतले. देवाला भेटी चढविल्या. काशीविश्वेश्वराचे दर्शन घेऊन त्यालाही वस्त्रे तसेच रत्ने वाहिली. नित्ययात्रा, अंतर्गृहयात्रा, पंचक्रोशीयात्रा केल्या. थोडे दिवस काशीमध्ये थांबून ११ मार्च १८२१ मध्ये गयेला पोहचले. गया शहरातील अरूंद रस्ते व गलिच्छ वस्ती यामुळे सर्फोजींनी गयेचा राजा मित्रजितसिंग बहादुर यांच्या राजवाड्यात मुक्काम केला. सर्फोजींनी ४७ श्राद्धे अष्टगयेला, ३७ श्राद्धे पंचगयेला आणि ३ श्राद्धे येकोधिष्टाला केली. मोठ्या प्रमाणावर ही श्राद्धे असल्यामुळे दिवसाला ७ अशी त्यांनी श्राद्धे केली. त्यांनी भीमगया व बोधगयालाही भेटी दिल्या. गयेवरून सर्फोजी कलकत्त्याला गेले. कालीघाटावरील काली मंदिरात पूजा केली. हुगळी (गंगा) नदीच्या दुसऱ्या काठावरील फोर्ट डेव्हिड येथे गव्हर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंग्जचीही त्यांनी २६ फेब्रुवारी १८२२ रोजी सकाळी १० वाजता भेट घेतली. सर्फोजींच्या स्वागतासाठी गव्हर्नर जनरलने सर्व तयारी केली होती. दोघाचेही वास्तव्य गंगेच्या वेगवेगळ्या काठावर असल्यामुळे जाण्यायेण्यासाठी गव्हर्नर जनरलने जहाजाची व्यवस्था केली होती. राजांबरोबर त्याचा जावई जिवाजी मोहिते, डॉ. जॉर्ज सटन, बाळूराव इंगळे, मधूस्वामी महाडीक, दुभाषी डेव्हिड पिल्ले हे होते. गव्हर्नर जनरलच्या घराजवळ पोहचल्यानंतर सर्फोजींचे स्वागत एडीसी व त्याच्या सेक्रेटरीने केले. स्वागत समारंभात सर्फोजींनी लॉर्ड हेस्टिंग्जला व त्यांच्या पत्नींना भेटी/नजराणा दिला. या भेटीप्रित्यर्थ २१ तोफांची सलामी दिली गेली. दुसऱ्या भेटीदरम्यान गव्हर्नर जनरलने सर्फोजींना सोनेरी चापाची बंदुक, घड्याळ, चांदीचा सोन्याची कलाकुसर असलेली अंबारी, हस्तीदंत, घोडा भेटीदाखल दिला. राजांचा जावई व इतर लोकांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे भेटी दिल्या. सर्फोजींनी हरिद्वारला जाण्याची इच्छा व्यक्त करताच, 'पावसाळी हवामान तुमच्या तब्येतीच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही,' असे कारण देत नकार दिला.

कलकत्त्याहून तंजावरला परत येताना सर्फोजीराजे पुन्हा जगन्नाथपुरीला गेले. तेथून ते नागपूर, आदिलाबाद, गल्लीपेट, शहाबाद, नांद्याळ, कडाप्पा , तिरूपती, कालहस्ती, तिरूथनी, कांचीपुरम, पणरोट्टी करत ७ एप्रिल १८२२ रोजी चिदंबरमला आले. राजांनी सांगितलेल्या प्रमाणे चिदंबरम येथे राजांच्या स्वागतासाठी समारोह आयोजित करण्यात आला. तेथे त्यांची आई व मुलाची भेट झाली. लष्करी मानवंदना झाली. स्वागत समारंभाला रेसिडेंट ब्लॅकबर्न मुद्दाम चिदंबरम येथे आला होता. मद्रासच्या गव्हर्नर तर्फे

सर्फोजींना नजराणा दिला गेला. तंजावरला आल्यानंतर लगेचच त्यांनी रामेश्वरला प्रयाण करून काशीची गंगा रामेश्वरला अर्पण केली व आपली यात्रा पूर्ण केली.

संपूर्ण यात्रा प्रवासात राजाच्या संरक्षणासाठी तीन हजार स्वार असून बरोबर इंग्रज डॉक्टर जॉर्ज सटनही होता. याचा मृत्यू या प्रवासादरम्यान झाला. यात्रेच्या प्रस्थानाच्या वेळेचे राजांचे चित्र उपलब्ध असून चित्राच्या पार्श्वभागी इंग्लिश सैनिक दिसत असून मध्यभागी राजांचे घोड्यावरील चित्र आहे. सर्फोजींच्या आज्ञेवरून त्यांच्याबरोबर जाणाऱ्या ब्राह्मण, सैनिक तसेच नोकरांच्या तंजावरला राहणाऱ्या परिवारांच्या योगक्षेमासाठी काही रक्कम देण्यात आली. यात्रेकरूंसाठी लागणारा खर्च खूपच मोठा होता. त्यासाठी तंजावरच्या रेसिडेंटाशी पत्रव्यवहारही केला जात होता. जनावरांचे खाद्य, पशू उपचार आणि जनावरे मृत्यू पावल्यानंतर त्या बदल्यात केलेली पशू खरेदी यासाठी मोठ्या प्रमाणावर पैशाची गरज भासत असे. माणसांचीही काळजी घेतली जात असे. उत्तर भारतातील थंडी लक्षात घेऊन माणसांसाठी वस्त्रे (पांघरूणे), दररोजच्या वापरातील वाहने तसेच इतर वस्तू खरेदी केल्याची नोंद पत्रव्यवहारात दिसून येते.

यात्रे दरम्यान सर्फोजींच्या योग्यतेनुसार त्यांचा मानमरातब ठेवला जात असे. प्रत्येक ठिकाणी तहसीलदार, कलेक्टर, कोतवाल, न्यायाधीश अथवा स्थानिक राजे त्यांचे स्वागत करून त्यांचा योग्य मानमरातब राखत असत. त्यांच्या स्वागतासाठी मेजवान्या दिल्या जात. कलकत्तास्थित गव्हर्नर जनरलने कलकत्ता दाखवण्यासाठी चार घोडयांची बग्गी त्यांना दिली होती. शहरातील श्रेष्ठ नगरजनांनी त्यांचे स्वागत केले. त्यांच्यामध्ये मौल्यवान वस्तूंच्या भेटींचे आदानप्रदान झाले. दान दिल्याने पुण्यप्राप्ती मिळते या धर्मशास्त्राने सांगितलेल्या संकल्पनेनुसारच सर्फोजींनी ब्राह्मणांना तसेच ब्रिटीश अधिकाऱ्यांना भेटी दिल्या.

छोट्याशा राज्याचा अधिपती असलेल्या सर्फोजींची उत्सुकता वाखाणण्याजोगी होती. त्यांनी एका इंग्लिश चित्रकाराला पैसे देऊन वाटेत दिसणाऱ्या गोष्टींची चित्रे काढविली. दक्षिण भारतात माहिती नसलेल्या वृक्ष आणि वनस्पतींमध्ये राजांना रस होता. जमविलेल्या वनस्पतींच्या नवीन जातींची रवानगी त्यांनी न चुकता बंगी टपालातून केली. प्रत्येक पार्सल बरोबर बिया तसेच फळांबाबतीच्या सूचना दिलेल्या असून त्याची लागवड राज्यात करण्याचा त्यांचा मानस होता. रेशमाच्या किड्यांच्या ३ पेट्या त्यांनी जहाजाद्वारे तंजावरला पाठविल्या. रेशमांच्या किड्यांची वाढ व त्यांचे दुष्काळापासून संरक्षण याबाबतीतही त्यांनी सूक्ष्म माहिती घेतली.

सर्फोजींवर कलकत्त्याचा प्रभाव खूपच पडला. तिथे त्यांनी शस्त्रास्त्रे, बंदुकीची दारू बनविण्याचे कारखाने यांना भेटी दिल्या. आधूनिक जहाजे व जहाज बांधणीच्या गोदींना भेटी दिल्या. त्यांनी अक्षरांचे ठसे पाडणाऱ्या कारखान्याना भेटी देऊन इंग्लिश आणि देवनागरी (मराठी) लिपीचे ठसे विकत घेतले. या ठशांद्वारेच त्यांनी दक्षिण भारतात म्हणजेच तंजावरला उभारलेल्या छापखान्यातून मराठी पुस्तके छापवून

प्रसिद्ध केली. परंतु सर्वात लक्षणीय गोष्ट म्हणजे कलकत्ता येथील बोटॅनिकल गॉर्डन होय. आपले स्वत:चे बोटॅनिकल कलेक्शन वाढावे म्हणून त्यांनी खूप मोठी रक्कम खर्च केली.

दीड वर्षात साठपेक्षा जास्त तीर्थक्षेत्रांना आणि त्यासंबंधीत माणसांना त्यांनी भेटी दिल्या. परंतु यावेळी त्यांनी त्यामध्ये खूपच चोखंदळपणा दाखविला. त्यांनी अर्ज केलेल्यापैकी कितीतरी गोष्टी कलकत्ता येथील अधिकाऱ्यांनी कबूल केल्या नाहीत. सर्फोजींनी जगन्नाथपुरीला भेट दिली व पूजाअर्चा केली त्याच्या वर्णनांची खूप पत्रे त्यांनी तंजावरला पाठविली. जगन्नाथपुरीला सर्फोजींनी काही दिवस वास्तव्य केले. देवाला आणि ब्राह्मणांना दान देण्यासाठी त्यांनी तेरा हजार रूपये खर्च केले. जगन्नाथपुरीच्या वास्तव्यात मकरसंक्रात लागली. त्यावेळी त्यांनी २१ पिशव्या तिलशर्करा पाठविली. ती तंजावरला पोहचेल की नाही याची चिंता त्यांना लागली होती.

यात्राप्रवासात सर्फोजींनी महाराष्ट्राच्या पूर्वभागातून प्रवास केला. 'त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या' या सर्फोजींनीच लिहिलेल्या काव्यात विदर्भातील अदासा गणपतीच्या मंदिरांचेच फक्त वर्णन आले आहे. नागपूर पासून हे स्थान फक्त उत्तरेस २ कोस अंतरावर असून लहान टेकडीवर बसलेले आहे असे खुद्द कवीच काव्यात म्हणतो. यात्रेवरून परत येताना सर्फोजी पाच दिवस नागपूरला राहिलेले होते. परंतु नागपूरकर भोसल्याच्या परिवारातील कोणी त्यांना भेटल्याचे किंवा सर्फोजींनी रामटेकला भेट दिल्यांच्या नोंदी कागदपत्रांतून मिळत नाहीत.

संपूर्ण यात्राप्रवासात सर्फोजी तंजावर मधील आपल्या परिवाराशी संपर्क ठेवून होते. त्यांचा मुलगा शिवाजी (दुसरा) याने इंग्लिश रेसिडेंटला लिहिलेल्या पत्रात इंग्रजी भाषेत केलेल्या चुकीमुळे सर्फोजी वैतागले. तसेच आजारी असलेल्या आपल्या मुलीने इंग्लिश डॉक्टरला चेहरा आणि हात दाखविला नाही म्हणून चिंताही व्यक्त केली. यात्रेदरम्यान आपल्या दत्तक आईचा साठावा वाढदिवस साजरा करण्याचे पत्र त्यांनी आपला मुलगा शिवाजी (दुसरा) याला तंजावरला पाठवले. यात्राप्रवासात असतानाही ते आपल्या कुटुंबाला आनंद देण्यास विसरले नाहीत. त्यांची पत्नी अहिल्यांबाबाई आणि सून सिदम्बाबाई या रामेश्वर यात्रेस गेल्या आणि तेथून आल्यावर पूजाही घातली. प्रवासात त्यांनी बरोबर घेतलेला डॉ. जॉर्ज सटनचा मृत्यू होतो हे ऐकताच गव्हर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंग्जने त्यांच्या साठी डॉ. मॅकलीडला पाठविले. यात्रेवरून परत आल्यानंतर डॉ. मॅक्लीओड आणि त्यांचा सहाय्यक डॉ. सिल्व्हेस्टर यांना एक हजार वराह सोन्याची नाणी त्यांनी दिली.

वेगवेगळ्या प्रकारचे श्राद्धविधी करण्यासाठी सर्फोजी ५५ दिवस गयेमध्ये राहतात आणि त्यानंतर स्थानिक ब्राह्मणांनी सांगितलेल्या दैनंदिन पूजा करण्यासाठी तीन महिने काशीमध्ये वास्तव्य करतात. काशीत

त्यांनी संस्कृत हस्तलिखिते खरेदी केली. तीच हस्तलिखिते आता तंजावरच्या सरस्वती महल ग्रंथालयाची शान वाढवित आहेत (Glushkova 2003 आणि Bhosale 1999).

रघुनाथराव उर्फ अण्णासाहेब विंचूरकर यांची काशीयात्रा

रघुनाथराव उर्फ अण्णासाहेब विंचूरकर हे दक्षिणेतील पहिल्या प्रतीचे सरदार आणि विंचूर संस्थानचे चीफ म्हणजे मुख्य अधिपति होते. यांचे पूर्वज विठ्ठल शिवदेव विंचूरकर हे पेशव्यांचे सेनापती होते व त्यांनी उत्तर भारतात शिंदे, होळकरांबरोबर तसेच स्वतंत्रपणे अनेक लढाया करून व त्यात जय संपादून मराठ्यांचे राज्य वाढविण्यात व स्थिर करण्यात मोलाची भूमिका पार पाडली होती. इंग्रज सरकारच्या काळात त्यांच्या ताब्यात नाशिक जवळील विंचूर संस्थान होते. त्यांचा जन्म १८२४ सालचा. त्यांच्या पित्याचा मृत्यू सन १८३५ मध्ये झाल्यावर विंचूर संस्थानच्या अधिपतिपदी रघुनाथरावांची नेमणूक झाली. यांनी विंचूर संस्थानचे अधिपति असताना एकंदर तीन तीर्थयात्रा केल्या. १८४८ साली उत्तर हिंदुस्थानची तीर्थयात्रा, १८६४ साली मध्यदेश आणि दक्षिणेकडील हंपी-विरूपाक्षाकडील तीर्थयात्रा आणि १८७८ मध्ये हंपी-विरूपाक्षापुढील दक्षिणेतील तीर्थयात्रा या होत. आपल्या अभ्यासाच्यादृष्टीने त्यांची पहिली यात्रा महत्वाची आहे (लेले १९६५).

३० ऑक्टोबर १८४८ ते १० मे १८५१ हा रघुनाथराव विंचूरकरांच्या उत्तर हिंदुस्थानातील तीर्थयात्रेचा कालखंड आहे. जवळ जवळ पावणे दोन वर्षे रघुनाथराव या यात्रेत होते. यात्रेला निघायच्या वेळी रघुनाथरावांनी घरातील देव व पितरांसंबंधी धार्मिक कृत्ये केली व कुलदेवता नरसिंहाला नमस्कार करून वाड्याच्या बाहेर पडले. त्यांस पोहचविण्यास आलेल्या रयतेने त्यांना गावाच्या वेशीपर्यंत साथ दिली. वेशीवर सर्वांचे रामराम, सलाम, जोहार घेऊन ब्राह्मण भिक्षुक व गरीब याचक यांस दक्षिणादिकांनी संतुष्ट करून घोड्यावर स्वार होऊन सर्वांचा निरोप घेऊन पुढे चालते झाले. रघुनाथरावांनी आपले बरोबर सरंजाम व मंडळी बरीच घेतली होती. त्यात भिक्षुक, कारकून, शागीर्द, आचारी, पाणके, खटपटे मिळून ब्राह्मण मंडळी २५ होती; हुजरे, खिजमतदार, चोपदार, छत्री व अबदागीर धरणारे, मोततदार, सारवान, कोठीकडील माणसे, मशालजी, भिस्ती, भोई वगैरे गडीमाणसे ५०-६० होती. स्वार व मेवाती याबरोबर त्यांचा जमादार व दफेदार मिळून पंचवीस-तीस माणसे होती. शिवाय खासे घोडे व बारगिरी घोडे, उंटे व गाड्यांकरिता बैलांच्या जोडया, मिळून तीस पसतीस जनावरे; एक म्याना आणि सात आठ गाड्या इतका खाजगी सरंजाम असून शिवाय भाड्याच्या गाड्या व भाड्यांची तट्टे वेगळीच होती.

या यात्रेचे वैशिष्टय म्हणजे रघुनाथराव पहिल्यांदा हिंदुस्थानांच्या उत्तरेतील तीर्थस्थाने हरीद्वार, ऋषीकेश, बदरीकेदार, बदरीनारायण या यात्राकरून परत ऋषीकेशला येऊन दिल्ली, कुरूक्षेत्र, शुकताल,

आहार, फरुकाबाद, शृंगीरामपूर, कानपूर, ब्रह्मावर्त, लखनौ, अयोध्या, अनुपनगर करत जानेवारी १८५० च्या सुमाराम म्हणजे मकरमास स्नानाकरिता प्रयागास आले. प्रयागसंगमी स्नान करून त्यांनी मोठा चौरंग आणि ध्वज वेणीतीरी अर्पण केला. ज्या समयी रघुनाथराव हे प्रयागास आले, त्याच संधीस बाळाजीपंत नातू हे कुटुंबासह तेथे यात्रेस आले होते. त्यास रघुनाथराव हे प्रयागास आल्याची खबर समजताच ते त्यांच्या भेटीस आले.

पूर्वी प्रयाग क्षेत्री वेणीस्नानास व वेणीदानास सरकारी कर होता. परंतु तो कर इंग्रजसरकारने माफ केला. प्राचीन काळी प्रयागवळ, गंगापुत्र हे यात्रेकरांस फार त्रासवून त्यापासून शक्तीपेक्षा जास्त कर घेत असत. त्या करास 'स्वारीसंबंधी कर' असे नाव होते. त्यामुळे गरीब यात्रेकरी लोकांस फार पीडा होई. रघुनाथरावांचे पूर्वज शिवाजी विठ्ठल हे त्रिस्थळी यात्रेस आले होते. त्यावेळी तिन्ही क्षेत्री जुलमाने कर घेण्याची अनीति पाहून त्यांनी नेम ठरविला की, दर स्वारीस म्हणजे घोडे, माणूस व घोड्यावर बसणारा यापासून पंधरा रुपये घेत जावे. याप्रमाणे तिन्ही क्षेत्री बहुत वर्षे क्रम चालला. नंतर इंग्रज सरकारने सर्व बंद करून मर्जी असेल ते त्यांनी द्यावे असे ठरविले. विंचुरापासून प्रयागवळ व गंगापुत्र यांचे गुमास्ते रघुनाथराव यांजबरोबर असून त्यांचा सर्व वाटखर्च रघुनाथराव यांकडून मिळत असे.

प्रथम त्रिवेणीदर्शन होताच रघुनाथराव यांनी गंगाभेट केली व गंगेस अर्घ्य देऊन स्नानाची उत्तम सचिल वस्त्रे प्रयागवळास दिली. गंगातीरी पूर्वांग उत्तरांगासहीत द्वादशाद्ध प्रायश्चित करून दशदाने व गोदाने दिली. ते दिवशी रघुनाथराव यांनी व्रत ग्रहण करून उपोषण केले. दुसरे दिवशी तीर्थश्राद्ध केले. गंगाभेट, सचिलवस्त्रे व प्रायश्चित्ताचे तीनचतुर्थांश आणि पिंडाची दक्षिणा इतका विषय प्रयागवळ घेतात. त्याप्रमाणे रघुनाथराव यांकडील त्यांनीच घेतला. रघुनाथराव यांनी त्रिवेणीची महापूजा केली. त्यासंबंधी बराच विषय प्रयागवळास मिळाला, शेवटी प्रयागवळाची पूजा केली. तेव्हा त्यांनी किनखाबी अंगरखा, विजार, शेला, पागोटे, धोतरजोडा ही वस्त्रे मोठ्या किंमतीची देऊन एक उत्तम घोडा दान दिला. त्या घोड्यावर त्यास बसवून वाद्यघोषसहीत घरी पोहचते केले. रघुनाथराव यांनी एक मास पर्यंत प्रत्यही पंचवीस ब्राह्मणांस पक्वानांचे भोजन घातले. तिलांचा लक्ष होम केला.

प्रयागहून विंचूरकरांची तीर्थयात्रा काशीस आली. चक्रपुष्करणी येथे अर्घ्य देऊन व सचिलस्नान करून गंगापुत्रास पोषाख दिला. विंचुरापासून प्रवासात बसण्याकरिता जो म्याना बरोबर आणला होता, त्यात गंगापुत्रास बसविले आणि दक्षिणा देऊन घरी पावते केले. गंगापुत्र हे चक्रपुष्करणी वरील भेट व अर्घ्य आणि सचिल वस्त्रे घेतात. यापुढे त्यांचा काही संबंध राहत नाही. दुसरे दिवशी तीर्थश्राद्ध, पिंडदान व गोदान केले. पुढे पंचक्रोशी यात्रा केली. या यात्रेत विश्वेश्वराचे दर्शन व मणिकर्णिकेत स्नान करण्याबरोबर इतर अनेक देवदेवता व तीर्थांना भेटी दिल्या. काशीत विंचूरकरांचे रहाणे एकंदर दहा महिने झाले. काशी नंतर विंचूरकर

गयेस गेले. तेथे गयावळांनी त्यांच्यासाठी एक वाडा तयार करून ठेवला होता. विंचूरकरांनी गदाधर व विष्णुपद यांचे दर्शन घेतले. ते वेळेस गयावळ ब्राह्मणांस भूयसी दक्षिणा वाटावी लागते, तसेच भोजनासही सांगावे लागते. गयायात्रेतील श्राद्धविधि सांगण्यास दक्षिणी ब्राह्मण असतात. त्यांच्याकडून गयेला अनेक स्थानी श्राद्ध व पिंडदान त्यांनी केले. प्रत्येक दिवशी दोन ते तीन श्राद्धे व पिंडदाने त्यांना करावी लागली. सर्व श्राद्धे करून झाल्यानंतर गयावळ यांची पूजा करून त्यांना दक्षिणा देऊन संतुष्ट केले. गयायात्रेचे निमित्ताने रघुनाथराव यांचा गयेस पावणेदोन महिने मुक्काम झाला. त्यानंतर पुन्हा काशी, प्रयाग, कानपूर, ब्रह्मावर्त, कनोज, बटेश्वर, ग्वाल्हेर करत आल्यामार्गानेच महाराष्ट्रात परत आले.

प्रवासात तसेच काशी मध्ये विंचूरकर असताना काही महत्वाचे प्रसंग घडले ते पुढीलप्रमाणे होत. तीर्थयात्रेमध्ये जाताना व येताना दोन्ही वेळा त्यांनी कानपूर नजीक ब्रह्मावर्ताला भेट दिली. दोन्ही वेळा त्यांची दुसऱ्या बाजीरावांशी भेट घडून आली. ब्रह्मावर्ताच्या पहिल्या मुक्कामात त्यांचा एकंदर दोन महिने मुक्काम पडला. पहिल्या भेटीतच बाजीराव बोलले की, ''आम्ही येथे आल्यापासून आमचे सरदारांपैकी, रघुनाथराव तुम्हीच येऊन भेटला! येणेकरून संतोष वाटला.'' ब्रह्मावर्ती असताना बाजीरावसाहेब व रघुनाथरावांच्या दररोज गाठीभेटी होत असत. भेटीत ते बहुधा दक्षिण प्रांतीच्या वार्ता पुसत असत. कधी नाशिक, त्रिंबक येथील स्थिती, कधी कोणते सरदाराचा वंश हल्ली कोण आहे, त्यास उत्पन्न काय आहे, इंग्रेजांची चाकरी कोणते सरदार करितात, वगैरे प्रश्न करीत. त्यांची उत्तरे रघुनाथराव आपले माहितीप्रमाणे देत असत. एके दिवशी बाजीरावसाहेब हे नानासाहेब म्हणजेच आपल्या दत्तक पुत्रास म्हणाले की, ''रघुनाथराव (विंचूरकर) यांचे पूर्वज विठ्ठल शिवदेव हे आमचे दादासाहेबांचे (रघुनाथरावदादा) आत्मलिंग होते.'' याच सुमारास रघुनाथराव यांच्या पत्नीचेही निधन झाले होते. त्यामुळे बाजीराव साहेब त्यांना म्हणाले की, ''बरे तर, लौकर यात्रा करून परत यावे. याच मुक्कामी तुमचे लग्न कर्तव्य आहे. यात्रेहून परत येताना जेव्हा रघुनाथराव ब्रह्मावर्तला गेले तेव्हा बाजीरावसाहेब मरणासन्न अवस्थेत होते. दि. २८ जानेवारी १८५१ ला रघुनाथरावांच्या उपस्थितीतच बाजीरावसाहेबांचे निधन झाले.

रघुनाथराव विंचूरकर हे सन १८५० मध्ये काशी येथे असतानाच राजघाटावर दारूच्या पिंपाचा स्फोट होऊन अनेक माणसे मृत्यूमुखी पडली. शिखांविरूद्ध चाललेल्या युद्धासाठी म्हणून ही दारू इंग्रजांनी जमा करून ठेवली होती. काशी क्षेत्री त्यांचा मुक्काम एकंदर दहा महिने पर्यंत होता. त्यामुळे काशीत त्यांच्या अनेक मराठी-अमराठी लोकांच्या गाठी पडल्या. झाशी संस्थानचे अधिकारी गंगाधरराव बाबासाहेब हे काशीयात्रेस याच सुमारास आलेले होते. त्यांची व रघुनाथरावांची भेट झाली. याच वेळेस राजेबहाद्दरही काशीयात्रेस आले असताना त्यांना भेटले. अतिशय बारीक सारीक नोंदी करणारे रघुनाथराव काशीतील विश्वेश्वर मंदिराच्या इतिहासाबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसते. इतर ठिकाणची अचूक माहिती देणारे विंचूरकर

मात्र सन १८५० मध्ये अस्तित्त्वात असलेले काशीविश्वेश्वरांचे मंदिर हे नारायणभट्टाने बांधलेले आहे असे मत नोंदवितात. ते मंदिर अहिल्याबाईंनी बांधलेले आहे हे काशीत प्रसिद्ध असताना ते याबाबतीत अनभिज्ञ का आहेत हे समजत नाही.

नागपूरकर भोसले व काशीयात्रा

महाराष्ट्राच्या पूर्व भागात नागपूरकर भोसल्यांची सत्ता होती. नागपूर, चांदा, ओडिसा, छत्तीसगड, गढा-मंडळा आदि भागावर प्रत्यक्ष सत्ता स्थापन करून बंगाल-बिहार मधून चौथाई वसूल करण्याच्या सनदा मिळाल्या होत्या. पूर्वेकडील हिंदूस्थानची वाटणी शाहूमहाराजांनी करून दिली होती त्यात बंगाल, बिहार, ओडिसा हे प्रांत नागपूरकर भोसल्यांच्या वाटेला आले होते. काशी, अयोध्या, प्रयाग हे भाग पेशव्यांकडे आलेले होते. त्यामुळे राजकीयदृष्टया काशीशी नागपूरकर भोसल्याचा संबंध आला नाही. नागपूरकर भोसले यांनी यात्रेनिमित्ताने अनेकदा पंढरपूर, जगन्नाथपुरी, अलाहाबाद, गया, काशी येथील यात्रा केलेल्या दिसतात. यातील बहुतेक यात्रा ह्या राजकीय तसेच लष्करी मोहिमेदरम्यानच झालेल्या दिसतात. धार्मिक हेतू मनात ठेवून केलेल्या यात्रा या फारच कमी प्रमाणात दिसतात.

सन १७४३ च्या दरम्यान नानासाहेब पेशव्यांनी प्रयाग-बंगालवर मोहिम केली त्यावेळी पहिले रघुजी भोसले सुद्धा बंगालवरील मोहिमेसाठी आले होते. त्याच वेळी नानासाहेब पेशवे व पहिले रघुजी भोसले यांची गया येथे गाठ पडली होती. त्यावेळी रघुजींनी गया यथे गयावर्जन केले असे म्हटले जाते (काळे, १९३६:५५). दुसऱ्या रघोजींचा भाऊ खंडोजी भोसले उर्फ चिमणाबापू यांनी बंगालच्या स्वारीनिमित्ताने जगन्नापुरीची यात्रा केली (Shejwalkar 1954, L.No.105, pp.114). दोनही यात्रा या लष्करी मोहिमेनिमित्त त्या प्रांतात गेल्यानंतर करण्यात आलेल्या दिसतात.

वर लिहिल्याप्रमाणे राजकीयदृष्ट्या नागपूरकर भोसल्यांचा संबंध काशीशी कधीही आला नाही. जो संबंध आला तो फक्त धार्मिक कारणांसाठीच आलेला दिसतो. सन १७८४ च्या कार्तिकमासी मुधोजी भोसले यांनी जानोजी भोसले यांच्या स्त्रिया व आपली कन्या बाळाबाई हिची रवानगी काशीयात्रेस केली होती. यांच्या बरोबर आणखी शरीरसंबंधी लोक, कारकून मंडळी, शहरातील लोक यात्रेच्या उद्देशाने गेले होते सर्वत्र त्रिस्थळी संपादून फाल्गुन वद्य ८ रोजी रामक्षेत्रास (रामटेक) येऊन पोचले. नर्मदा दक्षिण तीरी बारा कोस आल्यावर जानोजी भोसले यांचे स्त्रीस (गुणवंताबाई महाडिक) लखनादौडच्या मुक्कामी देवाज्ञा झाली (Shejwalkar 1954, L.No.187, pp.200-201).

बाळाबाई त्रिस्थळी यात्रेला येत आहेत असे भोसल्यांचा वकील बेनिराम पंडीत यांने इंग्रजांना कळविले होते व त्याच्याच विनंतीवरून इंग्रजांनी नबाब असफद्दौला, नबाब हैदरबेग खान व इतर गृहस्थांना पत्रे लिहून विनंती केली की तिला व तिच्या बरोबरील सर्व नोकर चाकरांना प्रवासात सर्व सोयी पुरविण्यात

याव्यात. त्याच्या बरोबरील माणसांना दस्तकेही देण्यात आली (CPC-VI, L.No.896.989, pp.312,331). याच तीर्थयात्रेचा उल्लेख सरस्वतीबाई पटवर्धन (मिरजकर) यांच्या तीर्थयात्रेच्या कागदपत्रातही आलेला दिसतो. २७ फेब्रुवारी १७८४ रोजी लिहिलेल्या पत्रात सरस्वतीबाई पटवर्धन लिहितात की आम्ही जेव्हा प्रयागला पोहचलो तेव्हा दक्षिणी यात्रेकरूंचे आणखी तीन संघ प्रयागला आले होते. एका संघांत महादजी शिंद्यांचे दिवाण भाऊ बक्षी यांची मातोश्री मुख्य होती. दुसरा संघ मुधोजी भोसले नागपूरकर यांची कन्या बाळाबाई यांचा होता. तिसरा संघ गणपतराव दीक्षित नाशिककर यांचा होता. सरस्वतीबाई पटवर्धनांचा संघ व आलेल्या इतर तीन संघांनी मिळून प्रयागवळांशी एकच करार केला. त्यामुळे दर स्वारीस वीस रुपये व सड्यास तीन रुपये याप्रमाणे प्रयागवळांनी घ्यावे आणि दर स्वारीमागे तीन माणसांस माफी करावी असा करार झाल्यामुळे व इंग्रज अंमलदारांची ताकीद असल्यामुळे प्रयागवळांनी यात्रेस त्रास दिला नाही (ऐलेसं ७, पत्र क्र.२७४१, पृ.३७८४).

१९ मे १७८८ रोजी मुधोजी भोसले यांचे निधन झाले. सन डिसेंबर १७९२ मध्ये त्यांच्या गयावर्जनासाठी दुसरे रघुजी भोसले यांनी आपली मातोश्री चिमाबाईसाहेब, त्यांचा धाकटा भाऊ व्यंकोजी उर्फ मन्याबापू भोसले, परसोजी भोसले उर्फ बाबासाहेब आणि गुज्याबादादा गुजर यांना त्रिस्थळी यात्रेस पाठविले. इंग्रज व नागपूरकर भोसले यांचे स्नेहाचे संबंध असल्यामुळे त्यांची बडदास्त काशीत इंग्रजांनी चांगल्या प्रकारे ठेवली होती. भोसल्यांचे इंग्रजांकडील वकील विश्वंभरपंत व वेणीरामपंत यांचे संबंधही इंग्रजांशी सलोख्याचे होते. एकदा काशी येथील एका दलालाने माधोजी नाईक काळे यांचे पेढीवरून काही मोहरांची थैली व्यंकोजी भोसले यांना आणून दिली. परंतु देताना त्यांतील काही सोन्याच्या मोहरा काढून त्याबदल्यात तांब्याच्या मोहरा थैलीत ठेवल्या. ही बाब व्यंकोजी भोसले व चिमाबाईसाहेब यांना समजल्यावर त्यावर नुसता रागच व्यक्त केला. कारण इंग्रज व भोसल्यांचे सलोख्याचे संबंध होते व इंग्रजांच्या रयतेवर सक्ती नको म्हणून प्रकरण वाढविले नाही. परंतु ही बातमी व्यंकोजी भोसल्यांचा सोबती व्यंकोजी नाईक पिडदी यांना समजताच त्या दलालाला त्यांनी ठार मारले व उंटाच्या पायाला बांधून त्याला शहरभर फिरवावे असा विचार केला. पुढे त्या दलालाच्या ज्ञातीला हे कळल्यावर त्यांनी एकच हाहाकार केला. काशीतील इंग्रज अधिकाऱ्यांचा व नागपूरकर भोसल्यांचा स्नेह असल्याने त्यांनी विश्वंभरपंत व वेणीरामपंत यांच्या मध्यस्थीने त्यांना तसे न करण्याबाबत सांगितले. त्यामुळे या दलालाचा मुडदा त्या ज्ञातीकडे त्यांनी सोपविला. त्रिस्थळी यात्रेहून येताना व्यंकोजी भोसले यांनी व चिमाबाईसाहेब यांनी नर्मदा काठी मुक्काम केला. त्याच रात्री नर्मदेला पूर येऊन त्यांचे बरेच सामानसुमान वाहून गेले. ही बातमी दुसरे रघुजी भोसले यांना कळताच त्यांनी सर्वांना सुरक्षितपणे नागपूरास आणले (काळे १९३६: १७२). याच व्यंकोजी भोसल्यांनी सन १८११ च्या दरम्यान दुसऱ्यांदा काशीयात्रा केली ती आपली माता चिमाबाई हिच्या

गयावर्जनाच्या निमित्ताने. परंतु या यात्रेत असतानाच त्यांची तब्बेत खालावून वाराणशी मुक्कामीच त्याचा मृत्यू झाला (काळे १९३६: २२१-२२२).

नागपूरच्या मराठा राज्यात तिसरे रघुजी भोसले (सन १८१८ ते १८५३) हे शेवटचे सत्ताधीश होत. त्यांनी सन १८३९ मध्ये काशीयात्रा केली होती. त्याच्या या काशीयात्रेचे वर्णने एका पोवाड्यात आलेले आहे (विविधज्ञानविस्तार, पुस्तक ११ अंक ११-१३, नोव्हेंबर-डिसेंबर १८४९). हा पोवाडा कोकू व आबा या दोन शाहीरांनी रचलेला आहे असे पोवाड्याच्या शेवटी उल्लेख आलेला आहे. पोवाड्याची सुरवातच तिसऱ्या रघुजीच्या गुणवर्णनपर श्लोकांनी होते. अनेक विशेषणे त्याला लावलेली दिसतात. तिसऱ्या रघुजीला रघूत्तम म्हटले असून नागपूरचा उल्लेख शेषपुरी आणि फणींद्रपूर असा केलेला दिसतो.

> ''कल्पतरू यशस्वी जगी श्रीमंत प्रभु भोसले धनी। नवखंडामधि अक्षयी झेंडा फत्तेजंग भाल्याची अणी ।। धर्ममूर्ति साक्षात लक्ष्मीकांत शांत प्रतिमा दुसरी। गोब्राह्मण प्रतिपाळ सदोदित कृपानिधी सागरलहरी।। गौरवर्ण कोमलांग शोभे दिव्य हिरा नवखण गहरी। जडित पाचुचा हार गळ्यामधि मुक्तनुरा मंदिलावरी।। पादपद्म पोटऱ्या विराजित सुवर्णपत्रे जयापरी। रघुत्तमाचे पूर्व तपोबळ प्रगट जाहले शेषपुरी।। स्वनगरी वसविली साम्यना अमरेन्द्राची अमरपुरी। सदा सौख्ये जनप्रजा आनंद कीर्ति वर्णिती घरोघरी ।।

एके दिवशी तिसरे रघुजी भोसले आपल्या लोकांस विचारून पुण्यशील अशा काशीनगरीला भेट देण्याचे ठरवून सन १८३९ म्हणजे शके १७६१ चे आश्विन वद्य अष्टमीस काशीयात्रेस निघतात. नागपूरहून काशीयात्रेस निघताना पहिला मुक्काम नेहमी रामटेक वर होत असे, त्याप्रमाणे तिसरे रघुजी हे रामटेकला येऊन बाकाबाई या आपल्या आजीची काशीयात्रेला जाण्याची परवानगी घेऊन यात्रेस रवाना झाले. नर्मदा ओलांडून रघुजी प्रयागला पोचतात. याच सुमारास बाईजाबाई शिंदे याचे वास्तव्य सुद्धा प्रयाग, काशी या ठिकाणी होते. शिंदे व भोसले यांच्या गाठीभेटी होऊन मेजवान्या होतात. या सुमारास एक मजेदार गोष्ट घडून येते. रघुजी प्रयागला येताच इंग्रजांकडून त्यांना सलामी दिली जाते व धुम्रनाव म्हणजेच आगबोटीत बसण्याची त्यांना विनंती केली जाते. परंतु राजाचे मुत्सद्दी यात मोडता घालतात. कदाचित इंग्रज राजाला आगबोटीत घालून कलकत्त्याला घेऊन जातील अशी त्यांना भिती वाटली असावी. परंतु नंतर रघुजीं बोटीत बसून परतही आले. नंतर प्रयागचा किल्ला पाहून राजाची स्वारी काशीस आली.

काशीला आल्यानंतर काशीक्षेत्रस्थ ब्राह्मणांचे मुख्यांनी महाफळ देऊन त्यांचे स्वागत केले. नंतर गंगेत स्नान करून विश्वेश्वराचे दर्शन घेतले. या प्रसंगाचे सुंदर वर्णन पोवाड्यातून केलेले आहे.

काशी क्षेत्र ते मजल पांच मधिं मुक्काम श्रींमतांचे। आड येति मग विप्रमुख्य ते भेटीस राजेन्द्राचे।। निबिड सदन अतिरम्य हवेल्या जुनाट आम्ही तुमचे। महाफळ देती प्रसाद मानस तृप्त करी तयांचे।। याचक जन बोलती "धन्य आज भाग्य उदेले अमुचे। पूर्वापर तो लौकिक भक्षिले अन्नहि भोसल्याचे"।। सुस्थळ पाहुन डेरे दिधले किनखाप बनातीचे। रौप्य स्तंभ देदीप्य सभोती घटाव ते सैन्याचे ।। प्रथम सुरधुनीचे पूजनालागि बेगी। करुं लवकर विप्रां बोलवा लागि वेगी।। ह्मणती झटिती गंगापुत्र सामोग्रि आणा। नृपवर पुरवी तै वस्त्र पात्रेहि नाना।। स्नान करुनि गंगेचे निघाली स्वारि नृपाची .तत्क्षणी। सह मंडळ सवे विप्रसमुदाय येई विश्वेश्वर भुवनी।। मग नृप करी साष्टांग जोडुनी अनन्यभावे द्वयपाणी।। विश्वश्वर विश्वाचा दाता विश्वंभर त्रिशूळ पाणी।।

काशी नंतर रघुजीची यात्रा गयेला गेली. गयावळांना सवा लक्ष रुपये दक्षिणेबरोबरच गज, घोडे, वस्त्रेही दिली. या सर्व गोष्टींनी खुष होऊन गयेच्या ब्राह्मणांनी रघुजीला प्रति रामचंद्राची उपमा दिली व राजाला म्हणाले "स्वर्गि पितृव्य धाले" (तेरे पितर सरग भयो). गयावळांना आनंदित करून, विष्णूपदाचे दर्शन करून वीस दिवस मुक्काम केल्यावर रघुजी परत काशीस आले. नंतर त्यांनी काशीत तुलादान केले. बुद्धामंगळ, रामनवमीचा उत्सव केला. पंचक्रोशी यात्रा करून काशी सोडली. मिर्झापूर, रेवा, जबलपूर, रामटेक असे करत रघुजींची काशीयात्रा परत फणींद्रपूरास म्हणजेच नागपूरास परत आली.

सन १७५७ च्या प्लासीच्या लढाईनंतर बंगाल, बिहार, अयोध्या या प्रांतावर ब्रिटीशांची सत्ता हळूहळू प्रस्थापित झाली. त्यामुळे या प्रदेशातील तीर्थस्थाने त्यांच्या कबजात गेली. मराठ्यांना प्रयाग, काशी, गया या ठिकाणी तीर्थयात्रा करण्यासाठी इंग्रजांची परवानगी घ्यावी लागत होती. उदा. मुधोज भोसले नागपूरकर यांची कन्या बाळाबाई व इतर बरोबर असणाऱ्या माणसांनी यात्रेसाठी इंग्रजांची दस्तके घेतली होती. गयेला जाणारे पेशव्यांचे नातेवाईक महिपतराव व त्यांच्या बरोबरील २००० माणसांसाठी इंग्रजांनी मुक्त मार्ग व इतर सुविधा उपलब्ध करून द्याव्या असे पत्र महादजी शिंद्यांनी इंगजांना लिहिले होते. त्यावर इंग्रजानी महादजी शिंद्याना उत्तरादाखल पाठविलेल्या पत्रात लिहिले आहे की या सर्व सुविधा पुरवताना काही अडचणी येतात, सबब येथून पुढे मराठा तीर्थयात्रेकरूंनी काशी, प्रयाग व गया येथे नियमानुसार यात्राकर भरावा. लाला शंकरलाल(?)(लाला सेवकराम असे नांव असावे), पेशव्यांचा वकील व विश्वंभर पंडीत, मुधोजी भोसले नागपूरकर वकील यांना या संबंधी कळविण्यात आलेले आहे असेही त्यांनी पत्रात लिहिले आहे (CPC-VII, L.No.380, pp.136). अशा तऱ्हेने सर्वसाधारण लोकांना यात्राकर द्यावा लागत असे. पण राजघराण्यातील लोक व दरबारातील सरदार, दरकदार व मोठ्या सावकारांना करातून माफी मिळत असे. पण त्यासाठी आगाऊ अर्ज करून यात्रेकरूंची यादी व संख्या देऊन विनंती करावी लागत असे. पुढे इंग्रजांनी फक्त त्यांच्या मित्रांनाच करमाफीची सवलत देण्याचे धोरण ठेवले. यातही फक्त १०० यात्रेकरूंची

मर्यादा होती (Sinha 1953, L.No.7, pp.11-12; L.No.4, pp.614-615). वेळप्रसंगी यात्राकर द्यावा लागला तर त्याचाही मोठा भुर्दंड पडत असे. म्हणून नागपूरकर भोसले त्यांच्या यात्रेकरूंसोबत कोणी गरीब यात्रेकरू येऊ नये यावर कटाक्ष ठेवीत. दुसऱ्या रघुजी भोसल्यांची माता चिमाबाई या जेव्हा सन १७९२ मध्ये काशीयात्रेला जाण्यास निघणार या नुसत्या आवईनेच नागपुरात चारपाच हजार लोक जमा झाले. यात्रेबरोबर येणाऱ्या प्रत्येक माणसाचा यात्राकर आपणांस भरावा लागेल म्हणून भोसल्यांनी त्यांना यात्रेबरोबर जाण्यास मनाई केली. एकतर त्यांनी पुढे जावे अगर आपल्या यात्रेमागून यावे अशी ताकीद त्यांनी लोकांना केली. यापेक्षा कमी दर्जा असणारे बुंदेलखंडाचे कमाविसदार बाळाजी गोविंद हे जेव्हा यात्रेसाठी काशीस गेले तेव्हा त्यांच्या बरोबर दहा हजार यात्रा होती. परंतु त्यांनी सर्व माणसांचा कर स्वत: भरला. भोसल्यांपेक्षा दर्जाने लहान असणारा कमाविसदार जर यात्रेकरूंच्या सुखसोयीसाठी पैसा खर्च करत असेल तर मातबर भोसल्यांना हा खर्च का परवडू नये, तसेच या मुळे भोसल्यांच्या प्रतिष्ठेलाही धक्का पोहचला (Shejwalkar 1954, L.No.301, pp.390). श्रीधरपंत मुन्शी याने राजाची मर्जी गमावल्यावर वाराणशीच्या तीर्थक्षेत्रात आश्रय घेतला (काळे १९३६: २२५ आणि Sinha 1954: 428). अशा तऱ्हेने राजकीय सत्ता आणि धार्मिक दर्जा यामुळे अठराव्या शतकातील मराठी यात्रेकरु अलाहाबाद, बनारस व गया येथे मोठ्या प्रमाणावर गेले व तेथे त्यांनी घाट, वाडे व मंदिरे बांधली.

त्रिस्थळीयात्रेचे मार्ग व दस्तके

मराठा राज्यविस्ताराच्या काळी तीर्थयात्रा ही संकल्पना प्रयाग, काशी, गया तीन स्थानांपुरतीच मर्यादीत होती. नंतर मार्गातील सर्व दिशांच्या पवित्र तीर्थस्थानांची त्यात भर पडत गेली. हा शास्त्रार्थ नसून प्रयोग होता. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात त्रिस्थळी यात्रेची खात्रीलायक माहीती मिळविणे खूपच आवश्यक होते. चार धाम म्हणजे द्वारका, काशी, जगन्नाथपुरी व रामेश्वर हे महाराष्ट्रधर्माच्या वर्तुळाच्या परिघातील स्थाने होती. येथे जाणे हे मराठ्यांच्या त्या ठिकाणांवर असणाऱ्या ठराविक नियत्रंणामुळेच शक्य झाले. मराठा महासंघाने संरक्षण दिलेल्या मार्गावरची स्थाने/ठिकाणे आणि सुरक्षा यामुळे एक भौगोलिक सलग पट्टा पुणे ते इतर ठिकाणी यात्रेकरूकरीता उपलब्ध झाला.

बंगालची चौथ व सरदेशमुखी मिळविण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी सन १७४४ मध्ये पहिल्या रघुजी भोसल्यांना पाठविले. याचा फायदा घेत भोसल्यांनी ओडिसातील जगन्नाथपुरी हे पूर्वेकडील धाम घेतले. सन १६७६ नंतर तंजावरकर भोसल्यांनी रामेश्वर हे दक्षिणेकडील धाम घेतले. सन १७५० नंतर बडोद्याच्या गायकवाडांनी पश्चिमेकडील द्वारका हे तिसरे धाम मराठ्यांच्या अधिपत्याखाली आणले. चौथे धाम

बद्रीधाम हे मराठी प्रदेशापासून फारच दूर होते. त्यामुळे मराठी लोकांनी चौथे धाम म्हणून काशीला स्वीकारले.

अठराव्या शतकात चारधाम यात्रा ही मराठी राज्यकेंद्रीत झालेली होती आणि याचे वैशिष्ट्य म्हणजे मराठी संघराज्यातील वेगवेगळ्या संस्थानिकांच्या प्रदेशातून सलगपणे जात असलेल्या या यात्रेच्या रस्त्यावर सहाजिकपणे त्या संस्थानिकांकडून संरक्षण प्राप्त होत असे. हा रस्ता पुण्याहून उत्तरेला पवार, होळकर, शिंदे यांच्या प्रदेशातून म्हणजेच धार, देवास, महेश्वर, सागर, झाशी, ग्वाल्हेर, काल्पी येथून जात असे. दक्षिणेकडे प्रतिनिधी, पटवर्धन, तंजावरकर भोसले यांच्या प्रदेशातून, पश्चिमेला बडोद्यांच्या गायकवाडांच्या प्रदेशातून तर पूर्वेला नागपूरकर भोसल्यांच्या प्रदेशातून हा यात्रेचा पट्टा जात असे. अठराव्या शतकात आपल्या स्वत:च्या जातीय, भाषीय लोकसमूहाच्या तसेच राजेरजवाड्यांच्या ताब्यातील प्रदेशातून सलगपणे जात असलेला हा यात्रेचा रस्ता दुसऱ्या कुठल्याही वांशिक लोकगटांच्या बाबतीत अस्तित्वात नव्हता.

त्रिस्थळीयात्रेचे मार्ग (आकृती क्र.२, ३ आणि ४)

मराठ्यांच्या वाढत्या राजकीय आकांक्षामुळे त्यांनी ६ परगण्यामधून कर मिळविण्यात यशस्वी ठरले. त्याचाच परिणाम म्हणून ते दख्खनच्या बाहेरील प्रदेशाकडे वळले. १८ व्या शतकात पुणे ते दिल्ली तसेच पुणे ते तंजावर असा भौगोलिक पट्ट्यात मराठ्यांची छोटी-छोटी राज्ये/जहागीऱ्या स्थापन झाल्या. त्यामुळे महाराष्ट्रीय लोकांसाठी सुरक्षित असा मार्ग तयार झाला. धार, देवास, महेश्वर/इंदौर, उज्जैन, सागर, झाशी, ग्वाल्हेर आणि इतर मराठी राज्ये असल्यामुळे इतर लोकांपेक्षा महाराष्ट्रीय लोकांना जाण्या-येण्यासाठी सुरक्षित मार्ग अस्तित्वात आला.

मराठी प्रदेशातून त्रिस्थळी यात्रेला जाण्याचे कमीतकमी तीन मार्ग होते असे उपलब्ध पुराव्यावरून सांगता येते. त्यामध्ये एक मार्ग मिरज/पुणे/नाशिक येथून सुरू होत असे, तर दुसरा मार्ग नागपूर/रामटेक येथून सुरू होत असे. तिसरा मार्ग फार दूर दक्षिणेतून तंजावर प्रांतातून सुरू असलेला दिसतो. बडोदा, इंदूर, माहेश्वर, उज्जैन, धार येथून निघालेले मार्ग नंतर पुण्याहून निघालेल्या मार्गाला मिळत असत. मिरज/पुणे/नाशिक येथून यात्रा निघायची म्हणजे ती कार्तिकमासी कायगांव-टोके येथे प्रथम जमा व्हावयाची व बराच समुदाय जमला म्हणजे ती यात्रा पुढे खानदेश, बागलाण, नेमाड इत्यादी मुलखातून काशीकडे जावयाची असा पूर्वीपासून प्रघात होता. पेशवे तसेच मराठा सरदारांच्या घरातील स्त्रिया राधाबाई, काशीबाई, सगुणाबाई, येसूबाई, सरस्वतीबाई पटवर्धन यांच्या अठराव्या शतकातील काशीयात्रा वर्णने उपलब्ध आहेत. त्यातून त्रिस्थळी यात्रेला जाण्याचा मार्ग कळतो. निम्म्यापेक्षा जास्त मार्ग हा मराठा

सरदारांच्या अधिपत्याखालील प्रदेशातूनच जात असे. पुणे, कायगांव टोके, वेरूळ, ब-हाणपूर, सिरोंज, झाशी, काल्पी, बह्मावर्त, प्रयाग, काशी व गया असा जाण्याचा व उलट परत येण्याचा मार्ग असे. काशीहून गयेस जाण्यास चौदा दिवस लागत. टोक्यापासून प्रयाग ५४ व्या मजलीस पावले. वाटेत मुक्काम २६/२७ झाले व प्रवास ४६१ कोस झाला. रोजची मजल सरासरी ७/१० कोसांची असे. (भावे, १९७६:३२६)

दुसरा मार्ग नागपूरहून निघत असे. नागपूरकर भोसल्याचे राज्य नागपूर, छत्तीसगड, ओरिसा, बंगालवर असल्याने त्या प्रदेशातून निघणाऱ्या यात्रेलाही वाटेतील मराठा अधिकाऱ्यांचे संरक्षण प्राप्त होत असे. नागपूरहून काशीला जाण्याचा मार्ग पुढीलप्रमाणे आहे. (चापेकर १९३७: २५६)

नागपूर ते काशीच्या प्रवासाचे मुक्काम - शके १७४८, इ.स.१८२६			
मुक्काम	**मिती**	**मुक्काम**	**मिती**
कामथडी	फा.शु।।१	अमरपागंज	फा.व।।४
रामटेक	फा.शु।।२	मुकूंदपूर	फा.व।।५
कुरईचा घाट	फा.शु।।४	पणुनाथगंज	फा.व।।६
गणेशगंज	फा.शु।।७	मोहोगंज	फा.व।।७
धुमा	फा.शु।।८	हजमजगंज	फा.व।।८
सिंगपुरी	फा.शु।।९	कठडा	फा.व।।९
नर्मदा	फा.शु।।१०	लालगंज	फा.व।।१०
जबलपूर	फा.शु।।११	री.....वासणी	फा.व।।११
घासलपूर	फा.शु।।१२	मिरजामुरामूर	फा.व।।१२
नर्मदेचा घाट		आसी	फा.व।।१४
संजयगंज	फा.शु।।१५		
गोजवाडा	फा.व।।१		
मेहेर	फा.व।।२		

तिसरा मार्ग तंजावर ते काशी असा आहे. दक्षिण भारतात तमिळनाडू मध्ये तंजावर येथे भोसल्याचे राज्य होते. या घराण्यातील महत्वाचा राजा म्हणजे छत्रपती सर्फोजी महाराज (दुसरा) होय. (इ.स.१७९८ ते १८३२). यांनी सप्टेंबर १८२० ते एप्रिल १८२२ या दरम्यान त्रिस्थळी यात्रा केली. या यात्रेच्या वर्णनातूनच काशीयात्रेचा मार्ग समजून आला आहे. तो पुढील प्रमाणे आहे : तंजावर, वृद्धाचलम, तिरूपती, मंगलगिरी, श्रीशैलम, गंजम, जगन्नाथपुरी मार्गे प्रयाग, काशी, गया आणि परत येताना कलकत्ता,

जगन्नाथपुरी, नागपूर, आदिलाबाद, मल्लीपेट, शहाबाद, नांद्याळ, कडाप्पा, तिरूपती, कालहस्ती, कांचीपुरम, पणरोट्टी, चिदंबरम, तंजावर असा त्यांचा यात्रा प्रवासाचा येता-जातानाचा मार्ग होता (Bhosale 1999: 87).

दस्तक

प्रत्येक यात्रा ही सरकारचे कार्य आहे असे समजून आयोजित केली जाई. यात्रा सुरू होण्याआधी यात्रामार्गावरील प्रतिनिधी, मुत्सद्दी, वकील पाठविले जात. दिल्लीचा बादशहा, अयोध्येचा नवाब, शिंदे, होळकर, स्थानिक राजेरजवाडे, जमीनदार, कमवीसदार इत्यादी लोकांसाठी पत्रे पोहचवीत. यात्रेतील नित्य कामे, अन्नपुरवठा, रात्रीचा निवास, वाटेतील तसेच तीर्थांवरील कर व जकात यासाठी हे राजदूत जबाबदार असत. यात्रेला असणारा पेशव्याच्या आधारामुळे खर्चात बचत होई. पेशव्यांच्या विनंतीचा कोणीही अव्हेर करीत नसे. पानिपतच्या युद्धापर्यंत तसेच पेशवाई अखेरपर्यंत ही स्थिती होती. इंग्रजांच्या ताब्यात त्रिस्थळी गेल्यानंतर महादजी शिंदे व इतर सत्ताधारी हे पवित्र स्थानांना भेटी देण्यासाठी अनेक सवलती मागीत. सरस्वतीबाई पटवर्धनांच्या बाबतीतही हे घडले. दुसऱ्या अनेक यात्रेच्या नेत्यांप्रमाणे यात्रामार्गावर व तीर्थस्थानाला जात असताना लोकांच्या काळजीने त्या वॉरन हेस्टींग्जलाही भेटल्या व त्याच्याशी पत्रव्यवहारही केला.

यात्रेला जकातीच्या बाबतीत दिल्लींच्या बादशहाचा किंवा अयोध्येच्या नबाबाचा माफीचा दस्तक मिळाल्यास यात्रेतील मोठीच अडचण दूर होत असे. अशा प्रकारची माफी पेशव्यांसारख्या थोरांनाच शक्य असल्यामुळे यात्रेकरूंना त्यांचा आश्रय करण्यास तेही एक निमित्त होतेच. दुसऱ्यांच्या प्रदेशातून जाण्याचा तसेच त्या प्रदेशात वास्तव्य करण्याची परवानगीही त्या दस्तकाद्वारे दिली जात असे. त्यासाठी पेशवे तसेच त्यांचे सरदार यात्रेकरूंच्या सोयीसाठी वाटेतील मराठा सरदारांस यात्रेस सहकार्य व मदत करावी यासाठी विनंती पत्रे लिहित. दस्तकांसाठी वाटेतील इतर सरदार, अयोध्येचा नबाब, दिल्लीचा बादशहा, काशीचा राजा, तसेच सन १७७० नंतर इंग्रजानाही वेळोवेळी पत्रे लिहिण्यात येत. दिल्लीच्या बादशहाकडून दस्तके मिळवून द्यावीत अशी पत्रे दिल्ली दरबारातील मराठी वकील हिंगणे यांनाही लिहिली जात. हिंगणेही याविषयात लक्ष घालून मदत करीत असत. सरस्वतीबाई पटवर्धनांच्या यात्रेसाठी दस्तके मिळावीत म्हणून वॉरन हेस्टिंग्जलाही पटवर्धनांनी पत्रे लिहिली आहेत. पटवर्धनांसारखे अहिल्याबाई होळकर आणि महादजी शिंदे यांनीही इंग्रजांना दस्तकांसाठी पत्रे लिहिल्याची उदाहरणे पेशवे दप्तरात मिळतात. तारीख १०-११-१७५९ असेच एक पत्र पेशवे दप्तरात उपलब्ध आहे, त्यात यात्रेसाठी मदत करावी आणि दस्तके द्यावीत अशी विनंती करणारी पत्रे कोणकोणत्या सत्ताधिशांस पाठविली त्यांची यादी दिलेली आहे. ती पुढील प्रमाणे आहे (पेद २१, पत्र १७४, पृ.१८८).


शेवेसी नारायेणदास विज्ञापना ऐसीजे. आपले वडील बंधु गोवर्धनदास श्रीनाथजी द्वारावरून माहायात्रेस जाणार. ऐसियास कृपाळू होऊन मार्गी कोणेविशई उपसर्ग न लागे येविशई सरकारचे कमाविशदारास व मोगलास साहित्यपत्र

१ बलवंतसिंग कासीचा राजा
१ प्रयागचा सुभा
फारसी १ सुंदरशा गयाचा राजा
फारसी १ राम नारायेण पटणवाला
फारसी १ मनसुर आलीखानाचा नायब अयोध्येस आहे त्यास
१ शाहदाढा येथील कमाविसदास पत्र की तुम्ही खरगोन नर्मदेपावेतो स्वार प्यादे देऊन पोहचावणे म्हणोन नारो बलाल
१ कृष्णराव रामचंद्र कमाविसदार सरकार बिज्यागड व
१ इंदुरच्या कमाविसदारास जिवाजी शिंदे कृष्णाजी पवार
१ शाहज्यापूर व सारंगपूर येथील कमाविसदारास
१ उजेन येथील कमाविसदारास पत्र की सिरोजपावेतो बदरका देऊन पावते करणे म्हणून. पुढे श्री नाथजीस जातील, स्वार वगैरे देऊन पावते करणे म्हणोन.
१ गोविंद बलाल यास
१ माहादाजी गोविंद झासीकर
१ गोविंदपंत वैद्य रुजू गणेश संभाजी
१ गोपालराव गणेश बर्वे कुराजैनाबाद
३ अमानसिंग वगैरे बुंधले
१ मशारनिल्हे हिंदुपत ३
१ जगत राज ✻ ३ पाहडसिंग
१ सभासिंग २


३
१ बगेल्यास
१ अंतरवेदीत रूपराव खंचर जमीदार
१ प्रतापगडच्या राजास
१ वकिलास पत्र जे प्रयागचे सुभा यास सांगून मशारनिलेचे सर्व प्रकार साहित्य करणे म्हणोन प्रयोगचे वकिलासी येक पत्र ✻ ✻ यादवराव याचा ✻ ✻
१ उदेपूरचे राणाजीस पत्र की मशारनिले तेथ व नाथाजीद्वारावरीच सा। महिने राहतील तरी हरयेक गोष्टीचा परामृश करणे. आपले पदरचे आहेत सर्व प्रकार मशारनिलेचा साहित्य होय तो अर्थ करणे. परंतु येतात तेव्हां बदरका देऊन उजण बुरानपूर पावत करणे. जे काय गोष्टी सांगतील ते मान्य करून कार्या करून दिल्हे पाहिजे.
१ उदेपूर येथील वकिलास गोविंद कृष्ण पत्र की मशारनिले तेथे येत आहेत तर मार्ग कठीन.ऐसियासी तुम्ही राणाजीस सांगून स्वार वगैरे पुढे पाठऊन मशारनिलेस घेऊन जाणे. तेथून श्री नाथजीद्वारास जातील तरी बदरका देऊन पावता करणे. तेथे कांही दिवस राहातील. सर्व प्रकार गौर करणे. तेथून परतून येतां वेले बदरका देऊन उजेण बुरानपूर पावत करणे.
२ याखेरीज बुदि का वाव देपालपूर व नवलाई वगैरे राजास पत्र द्यावे दस्तक राहा(दा)रीचे
१ वासुदेव संभाजी कमाविसदार देपाळपूर त्रिंबक राजदेव कादार नवलाई

२९


येकून येकुणतीस पत्रे द्यावयाची आज्ञा करावी. सदरहूप्रमाणे पत्र देणे म्हणोन. येणेप्रमाणे साहित्यपत्रे व येक पत्र सेट गोवर्धनदाससेट यास की साहित्यपत्रे पाठविली ते पावतील सुखरूप यात्रेस जाणे ऐसे देणे. छ १९ रबिलावल सुर सितैन कार्तिक.



आकृती क्र.२ : काशीताई व सगुणाबाई यांच्या काशीयात्रेचा मार्ग



आकृती क्र.३ : नागपूर ते काशी यात्रा मार्ग



आकृती क्र.४ : सर्फोजीराजे भोसले यांच्या काशीयात्रेचा मार्ग
तंजावर ते काशी आणि काशी ते तंजावर

गंगाजल आणि कावडी

काशीची गंगा रामेश्वरला नेऊन शिवार्पण करणे अणि मृत्यूपंथाला लागलेल्या व्यक्तीला गंगाजल पाजणे ही प्रथा महाराष्ट्रीय समाजात दृढ झालेली दिसते. भारतातील तसेच नेपाळ मधील तीर्थस्थानांना गंगाजल पाठविण्याचा प्रघात अहिल्याबाईंनी पाडला. गंगेपासून दूर असणाऱ्या प्रदेशात या रिवाजाचे स्वागत झाले (Malcom 1924: 187). आजही त्यांच्या नावाने काही कावडे गंगेचे पाणी दक्षिणेच्या ठिकठिकाणच्या देवास नेतात. या कार्यापासून त्यांचे नांव सर्व हिंदुस्थानात रावापासून रंकापर्यंत यच्चयावत लोकांच्या तोंडी झाले (पुरूषोत्तम १९१३: ३०५). मराठा काळात गंगोदकाइतकी पवित्र वस्तू त्या काळी हिंदु लोकांना दुसरी नव्हती. गंगेचे दर्शन बहुतेकांना दुर्लभ. म्हणून गंगोदक कोणी घेऊन आल्यास त्या गंगोदकाचे सेवन आदरपूर्वक सर्वांकडून होई व ते आणणाऱ्यांची द्रव्य देऊन संभावना करण्यात येई. मराठा काळातील गंगाजलाचे महत्व आणि त्याची ने-आण करणाऱ्या कावडींचा इतिहास जाणून घेण्या अगोदर त्यांच्या आधीच्या काळातील म्हणजे प्राचीन व मध्ययुगीन काळात गंगाजलाचे महत्त्व काय होते हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

'चरकसंहिता' या आयुर्वेदातील सर्वात जुन्या ग्रंथात पाण्याच्या विविध प्रकारांवर एक स्वतंत्र प्रकरणच आहे. 'अंबूवर्ग' या नावाच्या प्रकरणात विविध नद्यातील पाण्याचे प्रकार सांगितले आहेत. हिमालयात उगम पावणाऱ्या नद्याचे पाणी पथ्यकारक किंवा पवित्र असते असे चरक सांगतो. गंगानदीसुद्धा हिमालयात उगम पावते, त्यामुळे चरकाचा वरील शेरा हा गंगेला सुद्धा लागू पडतो. गंगेच्या पवित्रपणामुळे तिच्याशी संबधीत असणारे सर्व देव ऋषीमुनी सुद्धा पवित्रच गणले जातात. अठराव्या शतकातील 'भोजनकुतूहल' या ग्रंथातही पाण्यावर स्वतंत्र प्रकरण असून त्यात भारतातील विविध नद्याच्या पाण्याचे वर्णन आहे. या प्रकरणात गंगेच्या पाण्याचे वर्णनही आढळते. गंगेचे पाणी हे सीत(पांढरे), स्वादु(गोड), स्वच्छ, अत्यंत रूचकर, पथ्यकारक, स्वयंपाकास योग्य, पाचककारक असून पापहरि म्हणजेच सर्व पाप नाहीसे करणारे, तृष्णा म्हणजेच तहान भागविणारे, मोह निर्माण करणारे, उत्तेजक आणि प्रज्ञा (बुद्धी) वाढविणारे असे आहे (Gode 1969: 140).

चरकसंहितेपासून म्हणजेच जवळजवळ दोन हजार वर्षापासून भारतीयांची गंगेच्या पाण्याबद्दल अशीच भावना आहे. प्रसिद्ध भारतविद्यावेत्ते पी.के. गोडे यांनी भारतातील हिंदूधर्मीय जनतेव्यतिरिक्त फार मोठ्या प्रमाणावर असणाऱ्या मुस्लिम जनतेची गंगेच्या पाण्याबद्दलच्या भावना काय आहेत यावर अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. त्यात ते म्हणतात की अध्यात्मिक गुणधर्मापेक्षा गंगेच्या पाण्याच्या औषधी गुणधर्मावर मुस्लिमांचा विश्वास होता. इब्नबतूता, तार्वेनिए आणि बर्निअर आदी प्रवाशांनी भारतातील

मुस्लिम राज्यकर्त्यांच्या गंगाजल प्रेमाबद्दल भरभरून लिहिलेले आहे. सन १३२५-५४ या कालखंडात इब्नबतूता या प्रवाशाने आशिया आणि आफ्रिकेचा प्रवास केला. भारतातील टपाल व्यवस्थेचे वर्णन करताना, दक्षिणेत दौलताबादहून राज्य करणाऱ्या मुहंमद तुघलकाला पिण्यासाठी गंगेचे पाणी आणले जात असे आणि इथून तीर्थयात्रेला जाणारे हिंदू हे चाळीस दिवसात गंगेपर्यंत पोहचत असत याची तो नोंद करतो (Gode 1969: 141-142).

सोळाव्या शतकातील 'ऐने-ए-अकबरी' या ग्रंथातही गंगेच्या पाण्याचे संदर्भ मिळतात. 'अमरत्वाचे पाणी' (the water of immortality) असे अकबर गंगेच्या पाण्याला म्हणत असे. हे पाणी आणण्यासाठी त्याने खास खातेच निर्माण केले होते. तो फारसे पाणी पित नसे. परंतु तरीही याकडे त्याचे बारकाईने लक्ष असे. घरी असताना तसेच प्रवासातही तो फक्त गंगेचेच पाणी पित असे. गंगाकाठाहून पाणी आणण्यासाठी त्याने खास माणसांची नेमणूक केली होती. जेव्हा त्याची राजधानी आग्रा किंवा फत्तेपूर सिक्री येथे असे, त्यावेळी पाणी 'शरून' मधून येत असे. पंजाबमध्ये तो असताना गंगेचे पाणी हरिद्वार येथून आणले जात असे. यमुना आणि चिनाबच्या पाण्यात काही प्रमाणात गंगेचे पाणी मिसळून ते स्वयंपाकासाठी वापरले जात असे. गंगेच्या पाण्यावरील अकबराचा असलेला विश्वास हा त्याच्या हिंदू धर्म व संस्कृतीच्या प्रभावाने आला असावा अशीही टिपण्णी पी.के.गोडे करतात. औरंगजेबानेसुद्धा अकबराचीच गंगेची पाणी वापरण्याची पद्धती सुरू ठेवली होती असे बर्निअर या प्रवाशाने लिहून ठेवले आहे. त्याच्या नबाबाकडून दररोज त्याला खाण्याचे पदार्थ तसेच एक सुरई गंगाजल पिण्यासाठी मिळत असे (Gode 1969: 142-143).

सन १७९० मध्ये कॅप्टन एडवर्ड मूर याने दक्षिण भारतातील सावनूरच्या नबाबाची भेट घेतली होती. तो लिहितो, ''तो फक्त गंगेचेचे पाणी पितो. त्यासाठी त्याने अनेक उंट आणि अब्दार म्हणजेच पाणके ठेवलेले होते.'' गंगेच्या पाण्यात असलेल्या औषधी गुणधर्मामुळेच हे नबाब गंगेचे पाणी पित असत. त्यापाठीमागे काहीही धार्मिक कारण आढळून येत नाही असे पी.के.गोडे लिहितात (Gode 1969: 144-145). सतराव्या शतकातील हिंदूच्या मनातील गंगाजलाचे महत्त्व तार्वेनिए (१६६०-१६६५) या प्रवाशाने लिहून ठेवले आहे. औरंगजेबाने काशीविश्वेश्वर आणि बिंदूमाधव मंदिर पाडायच्या आधी तार्वेनिए वाराणसीला आला होता. बिंदुमाधव मंदिराचे वर्णन करताना त्याने हिंदूचे गंगाजलाप्रती असलेले महत्वही विशद केलेले आहे. तो लिहितो, ''बिंदुमाधव मंदिर हे जगन्नाथ मंदिराप्रमाणेख प्रख्यात आहे. मंदिरापासून गंगेपर्यंत पायऱ्या बांधल्या होत्या व मधे मधे अंधेऱ्या मढी होत्या. यातील काही मढीत ब्राह्मण राहात, तर उरलेल्या मढींचा उपयोग ते स्वयंपाक बनविण्यासाठी करत. गंगास्नान आणि पूजापाठ केल्यावर ब्राह्मण स्वयंपाक तयार करण्यास लागत. त्यांना अशी भिती वाटत असे की कोणी अपवित्र माणसे आपणास

शिवणार तर नाहीत ना? हिंदूना गंगाजल पिण्याची आवड होती. गंगाजल पिण्याने त्यांची पापे नष्ट होतात असा त्यांचा विश्वास होता. नदीच्या स्वच्छ भागातून दररोज ब्राह्मण मडक्यात पाणी भरीत. पाणी भरलेली मडकी ते आपल्या प्रमुखाकडे नेत असत. त्यानंतर तो प्रमुख त्या मडक्यांची तोंडे केशरी फडक्याने बांधून त्यावर आपली मोहर उमटवत असत. आपल्या खांद्यावरून ती मडकी ते बाहेर आणत. खांदा बदलत-बदलत हे ब्राह्मण गंगाजलाची मडकी तीनशे-चारशे मैल सहज नेत असत. योग्य ठिकाणी आल्यावर ते गंगाजलाची मडकी विकीत असत किंवा भेट म्हणून कोणाला तरी देत असत. गंगाजल वाहून नेणाऱ्या ब्राह्मणांना भरपूर दक्षिणेची आस असल्याने, गंगाजल भेट मिळण्यासाठी त्या व्यक्ती श्रीमंत असणे आवश्यक असे'' (मोतीचंद्र १९६२: २२८).

मृत्युपंथाला लागलेल्या व्यक्तीला गंगोदक पाजण्याची हिंदूंमध्ये प्रथा आहे. विजयनगर सम्राट तिरूमलदेव याच्या शक १४४६ (सन १५२५) च्या शिलालेखात या प्रथेचा संदर्भ मिळतो. सन १५२५ मध्ये कृष्णदेवराय आजारी पडून मृत्यपंथास लागला, त्यावेळी त्याला गंगोदक दिले गेले. परंतु थोड्याच दिवसात तो बरा झाला असे हा शिलालेख सांगतो (Gode 1969: 148).

मराठा काळात गंगाजल आणि ते वाहून नेणाऱ्या कावडी लोकांचा मोठा वर्ग निर्माण झाला होता. गंगाजल पोहचविण्याचा एक व्यवसायच तयार झाला होता. फाल्गुन, शक १६७९ म्हणजेच सन १७५७ मध्ये गंगाजलाच्या कावडी आणणाऱ्या माणसास रूपये १५६५ दक्षिणा दिल्याची नोंद आहे. काशीहून पुण्यास २४ कावडी आणल्या, त्यांची मजुरी दर कावडीस २० रु. प्रमाणे व पुण्याहून रामेश्वरास त्याच कावडी घेऊन जाण्याची मजुरी ४० रु. प्रमाणे होती. म्हणजे काशीची एक कावड रामेश्वरास नेऊन आणावयाची तर ६० रु. खर्च येत असे. पुण्यास हरिद्वाराहून गंगोदकाच्या कावडी स्नानाकरता व पिण्याकरता आणीत असत (चापेकर १९३७: १६५).

पेशवे दप्तरात गंगोदकाच्या कावडी पोहचल्याच्या व गंगोदक घेऊन येणाऱ्या अजुरदारास पैसे देण्यात यावेत, अशा नोंदी मोठ्या प्रमाणात मिळतात. इ.स. १७५३ मध्ये राधाबाई पेशवे यांनी नानासाहेब पेशव्यांस लिहिलेल्या पत्रात गंगोदकाच्या कावडी मिळाल्याचे कळविले आहे. त्या लिहितात, ''दयाराम पुरोहित गड मुक्तेश्वर यांनी गंगोदकाच्या कावडी सुमारे ५ पाठविल्या त्या आम्ही येथे घेतल्या. त्याचे पत्र आले ते व अजुरदार यैसे पाठविले आहेत. तेथे आपण त्यांची बिदागी करावी'' (पेद १८, पत्र १२८, पृ.७३). अशाच अर्थाच्या दुसऱ्या पत्रात गंगोदकाच्या कावडी आणणाऱ्यास मेहनताना देण्याचा मजकूर आहे. ''हरिद्वाराहून सत्रा कावडी आल्या त्या पुण्यास रवाना केल्या आहेत. त्यास कावडी तेथे पोहचल्यावरील चिंतो बिस्वनाथ याजकडे देऊन माफजतीने ठेऊन सत्रा कावड्यास व दोन ब्राह्मण आहेत

त्यास अजुरा मागील सिरेस्तेप्रमाणे दप्तरी रूजू पाहून त्याप्रमाणे अजुरा देणे........याखेरीज राजश्री माहादाजी अंबाजी यास कावडी ३ तीन आल्या त्या सरकारात घेऊन पुण्यास रवाना केल्या आहेत. तरी चिंतो विस्वनाथ यांजकडे देऊन तिही कावडीचा अजुरा सिरस्तेप्रमाणे देणे (पेद १८, पत्र १२९, पृ.७४).

मराठा कालखंडात पुणे ते वाराणसी किंवा हिंदुस्थानात जाण्याचा जो मार्ग होता तो झाशी शहरावरून जात असे. झाशी ही पेशव्यांची जहागीर होती. पेशव्यांतर्फे या प्रांतावर गोविंदपंत खेर (बुंदेले) व त्यांच्या नंतर त्यांचा मुलगा बाळाजी गोविंद खेर यांची नेमणूक या प्रांतावर होती. त्यामुळे महाराष्ट्रातून हिंदुस्थानात जाण्यासाठी मराठी लोकांना त्यांचा फार आधार असे. हिंदुस्थानातील कोणताही व्यवहार यांच्या मार्फतच पेशवे करीत असत. गोविंदपंताचे कनिष्ठ बंधू बाबूराव हे पुण्यात पेशव्यात दरबारात असत. एकाच वेळी अनेक लोकांकडे गोविंदपंताद्वारे गंगाजलाच्या कावडी पाठविल्या जात. त्या ज्याच्या त्यास पोहचविण्याची जबाबदारी बाबूरावांवर असे. दि.२ एप्रिल १७५९ रोजीचे त्यांचे पत्र उपलब्ध आहे, त्यात बाबूरावांनी गंगोदकाच्या एकंदर वीर कावडी पुण्यामध्ये निरनिराळ्या व्यक्तींकडे पाठविल्याची नोंद आहे (मइसा १, पत्र १२८, पृ.२०७).

गंगाजलाच्या तसेच यमुनाजलाच्या कावडी गैरहंगामी पुण्यास पोहचत असत. त्या कोणत्या वेळी पाठविण्यात याव्यात याविषयी रघुनाथराव पेशव्याने बाळाजी गोविंदास दि. १६-५-१७७२ रोजी लिहिलेल्या पत्रात कळविले आहे (पेद ३२, पत्र १८९, पृ.१०४). ते पुढीलप्रमाणे "पो। रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. श्रीगंगेच्या व यमुनेच्या कावडी तुम्ही सालाबाद पाठविता त्या गैरहंगामी येऊन पोहचतात. तरी ऐसे न करणे. भाद्रपद मासी निवल पाणी पाहून कावडी भरवणे. सुमार ५० पनास; येमुनेच्या पंचवीस व गंगेच्या पंचवीस, एकूण पनास. त्यास अजुरा रुपये हजार पडत ऐसे करून कार्तिक मार्गेसीर्ष मासी येथे येऊन पोचत ते करणे."

बाळाजी गोविंद खेरांच्या अशाच एका पत्रात गंगोदकापासून गुलाबपाणी करवून ते पुण्यात पाठविल्याची नोंद मिळते (पेद १८, पत्र ५८, पृ.३५). "राजश्री बावाजी सिवदेउ यांणी श्रीरामेश्वरास कासीच्या कावडी ११ अकरा समागमे रामचंद्रभट यास देऊन पाठविल्या आहेत" (पेद ३२,पत्र १७१, पृ.९४). काशीच्या गंगाजलाच्या कावडी रामेश्वराला जाऊन वाहायच्या असा मराठी लोकातील रिवाजाला या पत्राद्वारे पाठबळ मिळते.

सदाशिव नाईक जोशी हे पहिल्या बाजीरावांची बहीण भिऊबाई हिचे सासरे होत. वृद्धापकाळी ते काशीवास करीत असून काशीतील पेशव्यांचे कारभारी होते. बाजीरावांस काशीहून पाठविलेल्या पत्रात ते लिहितात, "श्री तीर्थ येजमान सेवन करितात. आणखीहि ब्राह्मणद्वारा पाठऊन देणे. त्या पत्रावरून तीर्थ

कावडी ३ गंगाजल कावडी १ येकूण कावडी ४ पाठविल्या आहेत त्या पावतील'' (पेद १८, पत्र ३७, पृ.२२). या पत्रावरून बाजीरावांची गंगोदकावरील भक्ती दिसून

गोडसे भटजीकृत 'माझा प्रवास' या पुस्तकातही गंगेची कावड नेण्याचा प्रसंग वर्णिला आहे. प्रपंचाचे मदतीकरीता द्रव्य मिळवून घरी न्यावे या हेतूने गोडसे भटजी प्रवासास निघाले होते. परंतु तो हेतू साध्य झाला नाही. माता-पितरांकरिता गंगेची कावड नेण्याचा त्यांनी विचार केला. 'अनवाणी चालावे लागेल, कित्येक महिने कावड खांद्यावर वाहावी लागेल, गंगा कधी कधी जड होते,' असे सांगून सुद्धा निग्रहपूर्वक गोडसे भटजींनी कोकणातील आपल्या घरी, वरसईस ती कावड नेली. कावड नेत असताना त्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. काही संकटे दैवी होती, तर काही संकटे ही शारीरिक होती. दैवी संकटे म्हणजे कावड वाहून नेत असताना अचानक ती जड होणे व त्यामुळे खांद्यास भार सहन न होणे हे कारण होते. तर शारीरिक संकटात कावड वाहून नेण्यामुळे पायाला ढोपराखाली वूज येणे, पावलांना सूज येणे आदी गोष्टी आल्या. झोपलेले असताना कुलस्वामिनीने गंगेच्या रूपाने स्वप्नात दर्शन देऊन मी तुझ्या पाठीशी आहे असा आशिर्वाद दिला. या दैवी आशिर्वादामुळे गोडसे भटजींना कावड वाहून नेण्यास हुरूप आला. शारीरिक संकटात पाय सुजले होते, पावलांना भेगा पडल्या होत्या. त्यासाठी पायाचे पावलास कापसाच्या रजईचे फडके बांधणे, पायात पडलेल्या भेगात राळ व मेणाचे लुक्कण भरणे आदी उपाय केले गेले. दैवी आशिर्वादामुळे कावड अचानक हलकी झाली. त्यानंतर पुढील प्रवासात त्यांना कावड वाहून नेण्यास काहीही त्रास झाला नाही. घरी आल्यावर भटजींनी मावंदे घातले. कावडीने आणलेल्या गंगोदकाने माता-पितरांना स्नान घातले. मावंद्याला आलेल्या सर्व ब्राह्मणांना भोजनाच्या वेळी पळी पळी गंगा दिली. (वैद्य १९०७: १९५-२०३)

गंगापुत्र, प्रयागवळ, गयावळ आणि पेशव्यांचे तीर्थोपाध्ये

गंगापुत्र, प्रयागवळ आणि गयावळ हे अनुक्रमे वाराणसी, अलाहाबाद आणि गया येथील तीर्थपुरोहित आहेत. त्रिस्थळी यात्रेसाठी येणाऱ्या यात्रेकरूंचे धार्मिक विधी करण्याचे काम ही मंडळी शतकानुशतके करीत आहेत. महाराष्ट्रातील हजारो यात्रेकरू पुण्य कमविण्यासाठी आणि मोक्ष मिळविण्यासाठी त्रिस्थळीयात्रेला जात होते. याचे कागदोपत्री अनेक लिखित पुरावे मिळाले आहेत आणि ते प्रसिद्धही झाले आहेत. त्यातून या तीनही ठिकाणच्या तीर्थपुरोहितांसंबंधी माहिती मिळते. आजच्या सारखेच सतराव्या-अठराव्या शतकात गंगास्नान आणि काशीविश्वनाथाचे दर्शन हे काशीयात्रेचे मुख्य अंग होते. सोळाव्या शतकात महाराष्ट्रातून वाराणसीस गेलेल्या नारायणभट्टाने 'त्रिस्थलीसेतू' हा ग्रंथ लिहून प्रयाग येथील माघीस्नान आणि गया येथील श्राद्धविधी आणि पिंडदान हे धार्मिक विधी काशीयात्रेशी जोडून 'त्रिस्थळी यात्रा' लोकप्रिय करण्याचे काम

केले. हे धार्मिक विधी करण्याचे काम वंशपरंपरेने तेथील स्थानिक तीर्थपुरोहित म्हणजेच प्रयाग येथे प्रयागवळ, काशी येथे गंगापुत्र आणि गया येथे गयावळ करीत असत. प्रयागवळ, गंगापुत्र आणि गयावळ या तीर्थपुरोहितांची रोजी-रोटी ही त्रिस्थळी यात्रेला येणाऱ्या यात्रेकरूंवर अवलंबून होती. तीर्थस्थळांवर करीत असलेल्या धार्मिक विधींच्या बदल्यात हे तीर्थपुरोहित यात्रेकरूंकडून दक्षिणा घेत असत. त्यामुळे जास्तीतजास्त यात्रेकरू ज्यांच्याकडे जात असत त्या तीर्थपुरोहिताला अधिक उत्पन्न मिळत असे. त्यामुळे जास्तीत जास्त यात्रेकरू आपल्याकडे ओढण्यासाठी या तीर्थपुरोहितांमध्ये चढाओढ लागत असे. महाराष्ट्रातून एखादा श्रीमंत गृहस्थ किंवा राजे-रजवाडे त्रिस्थळी यात्रेला जाण्यास निघणार आहेत अशी वार्ता कर्णोपकर्णी या तीर्थपुरोहितांना लगेचच कळत असत. याचे कारण म्हणजे या तीर्थपुरोहितांचे गुमास्ते म्हणजेच प्रतिनिधी हे महाराष्ट्रात म्हणजेच दक्षिण भारतात सर्वत्र फिरून यात्रेकरूंची माहिती काढून ती आपल्या मालकाकडे पोहचवित असत. यात्रेकरूंना आपल्या बरोबर घेऊन येऊन आपल्या मालकाकडे पोहचविण्याची जबाबदारी या गुमास्त्यांवर असे. या गुमास्त्यांना वाटेतल्या मार्गाची खडानखडा माहिती असे, म्हणूनही अनेक यात्रेकरू अशा गुमास्त्यांची सेवा सहजपणांने स्वीकारीत असत. आधुनिक काळातील यात्रा कंपन्यांच्या एजंटाच्या कामाप्रमाणेच यांचे काम असे. अशा तऱ्हेच्या प्रयागवळांच्या आणि गयावळांच्या गुमास्त्यांची उदाहरणे रघुनाथराव विंचूरकर आणि औंधकर भवानराव पंतप्रतिनिधी यांच्या यात्रावर्णनांतून आढळून आलेली आहेत. (लेले, १९६४ व पंतप्रतिनिधी, १९४६) सातारच्या प्रतापसिंह महाराजांच्या कारकीर्दीतही अशाच एका गयावळाच्या गुमास्त्याला एका प्रकरणात अटक केल्याची नोंद आढळते (ठाकरे १९९८: १३४).

गंगाकाठावर आजच्यासारखेच पिंडदान होत होते. गंगाकाठावरील सर्व धार्मिक विधी गंगापुत्र करीत असत. हे गंगापुत्र यात्रेकरूंकडून खूप दक्षिणा वसूल करीत असत. सतराव्या-अठराव्या शतकातही आजच्यासारखेच ही कामे करण्याचा हक्क गंगापुत्रानांच असे. आलेल्या यात्रेकरूंची नोंद गंगापुत्र आपल्या वहीत करीत असत. गंगापुत्र आणि यात्रेकरूंमधला एक प्रकारचा हा करार असे. त्यानंतर यात्रेकरूंच्या कुटुंबामध्ये हेच आपले तीर्थपुरोहित आहेत असे समजले जाई. परंतु नव्याने येणाऱ्या यात्रेकरूंसाठी गंगापुत्रांमध्येच आपापसात भांडणे लागत. गंगाकाठावर त्यांची एकाधिकारशाही होती. परंतु काशीतील मंदिरामधील दानदक्षिणेवर त्यांचा अधिकार नव्हता. अठराव्या शतकात तर वाराणसीतील या गंगापुत्रांचा उपद्रव खूपच वाढला आणि त्यांच्यापासून यात्रेकरूंना आपला जीव वाचविणे जिकिरीचे होऊ लागले. वॉरन हेस्टिंग्सने वाराणसीच्या विकासासाठी खूपच काम केले. त्यापैकी वाराणसीच्या गंगापुत्रांचा उपद्रव कमी करण्याचे श्रेय त्याला जाते. या त्याच्या कामामुळेच सन १७८७ मध्ये वाराणसीतील श्रीमंत, पंडित आणि

महाजन म्हणजेच व्यापारी लोकांनी त्याला मानपत्र देऊन त्याच्या या कामाबद्दल त्यांचे आभार मानले (मोतीचंद्र १९६२: ३९६-३९७).

अठराव्या शतकात वाराणसीच्या तीर्थपुरोहितांमध्ये भांडण वाढायला कारणीभूत ठरले ते महाराष्ट्रीय तीर्थपुरोहित. वाराणसीतील गंगापुत्र हे गंगाकाठावर आणि वाराणसीतील तलावावर होणारे धार्मिक विधी करणे आणि दक्षिणा मिळविणे हा आपला वंशपरंपरागत हक्क समजत असत. पण अठराव्या शतकात महाराष्ट्रीय ब्राह्मण वाराणसीत येऊन स्थायीक झाले, त्यावेळेपासून तेहि या दक्षिणेत भागीदारी मागू लागले. त्यामुळे गंगापुत्र आणि पंचद्रविड तीर्थपुरोहितांमध्ये भांडणांची ठिणगी पडू लागली. या भांडणाची झलक पेशवे दप्तरातील ऐतिहासिक कागदपत्रांमधून आणि वाराणसीतील न्यायालयीन निवाड्यातून दिसून येते. पहिले भांडण सन १७१८ मध्ये झाले. महाराष्ट्र आणि दक्षिण भारतातून आलेल्या यात्रेकरूंकडून पूजा करण्याचा हक्क त्यांना आहे असे महाराष्ट्रीय ब्राह्मणांची मागणी होती. वाराणसीच्या काजीने खटला ऐकून पंचद्रविडांच्या बाजूने निर्णय दिला. परंतु त्यानंतर दोन वर्षातच दोन्ही गटात सलोखा होऊन गंगेच्या किनाऱ्यावर गंगापुत्रच पूजा करतील असे ठरले. सलोख्याच्या शर्तीचा भंग करणाऱ्यांस दंड होईल असेही ठरले (मोतीचंद्र १९६२: ३९७). परंतु हे मनोमिलन कधीही पूर्णपणे अंमलात येऊ शकले नाही. पहिल्या बाजीरावाचे काशीतील कारभारी सदाशिव नाईक जोशी होते. पेशव्यातर्फे त्यांनी काशीत घाट, मंदिरे, ब्रह्मपुरी, अन्नछत्रे बांधली. सन १७३५ मध्ये त्यांनी पहिल्या बाजीरावाला लिहिलेल्या पत्रात ते गंगापुत्रांच्या अरेरावीबद्दल लिहितात. ते म्हणतात की हा घाट बांधताना पैसा तर बाजीरावांचाच लागला आणि महाराष्ट्रातून येणारे यात्रेकरूही असेच मानतात. परंतु गंगापुत्र आणि अवरंद(?) असे मानावयास तयार नाहीत. हे भांडण दूर करण्याकरीता पेशव्यांनी आपले वजन खर्च करून बादशहाकडून एक पत्र घ्यावे असेही ते सुचवितात (पेद १८, पत्र ३६, पृ.२०). याच वर्षी म्हणजे सन १७३५ मध्ये पहिल्या बाजीरावांची आई राधाबाई या काशीयात्रेला येतात तेव्हा या गंगापुत्रांनी एक नवी चाल खेळली त्यामुळे पंचद्रविड ब्राह्मणांची मानहानी झाली. उमानाथ पाठक नावाच्या गंगापुत्राने राधाबाईंकडून लिहून घेतले की त्यांचे पुत्र बाजीराव आणि चिमाजीअप्पा आणि त्यांचे वंशज हेच त्यांना तीर्थोपाध्याय म्हणून मानतील (पेद ९, पत्र२५, पृ.१७). नारायण दीक्षित पाटणकर यांनी पहिल्या बाजीरावांना २६-१२-१७३५ रोजी लिहिलेल्या पत्रातून काशीच्या महाराष्ट्रीय ब्राह्मणांची पेशव्यांविषयी नाराजी दिसून येते. नारायण दीक्षितांच्या तक्रारीचा आशय असा की, बाईंनी पंचवीस तीस हजार रुपयांहून जास्ती रकमेचा दानधर्म गयेस केला, परंतु तो तारतम्य पाहून केला नसल्यामुळे महाराष्ट्र ब्राह्मणांना दक्षिणा मिळावी तितकी मिळाली नाही व इतर ब्राह्मणांना जास्ती मिळून बाईच्या लौकिकास उणेपणा आला. याचे कारण बाईचे सल्लागार महाराष्ट्रीय भिक्षुक नव्हते, काशीचे गौड ब्राह्मण किंवा पंडे वगैरे लोक होते (पेद ३०, पत्र १४७, पृ.११६-११७). नारायण दीक्षितांना ही

व्यवस्था बदलता आली असती, परंतु तसे केल्याने स्थानिक गौड ब्राह्मणांशी वाकडेपणा येऊन दीक्षितांना काशीत नांदणे बिकट झाले असते.

गयावळ, कासीकर, गंगापुत्र आणि प्रयागवळ यांच्या दांडगाईची माहिती महीपतराव कृष्ण चांदवडकरांनी आपल्या दोन पत्रात लिहिली आहे. हे महिपतराव चांदवडकर काशीत राहून पेशव्यांची कामे करीत असत. २०-७-१७७२ रोजी थोरल्या माधवराव पेशव्यांना पाठविलेल्या पत्रात त्यांनी काशीत धर्म करविण्याविषयी म्हणजेच दानधर्म करण्याविषयी आणि भाईराम वैद्यांचे औषध माधवरावांसाठी पाठविण्याविषयी चर्चा केली आहे. चांदवडकर दानधर्म करणार हे ऐकून गंगापुत्रांनी खूप उपद्रव देण्यास सुरूवात केली. दररोज येऊन धरणे धरावयास लागले. यामध्ये काशी नरेश चेतसिंग आणि त्यांचा दिवाण भाईरामपंत यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. रूपये थोडे, परंतु ब्राह्मण जास्त अशी परिस्थिती होती. पैशासाठी ते मरावयास सुद्धा तयार होते. 'आम्ही गंगापुत्र, कुटुंबवत्सल, तीर्थाचे स्थायीक, आम्हास धर्माचा अंश द्यावा, घेतल्याशिवाय सोडणार नाही,' असे गंगापुत्र म्हणून लागले (पेद ३२, पत्र १४४, पृ.६९-७०).

महीपतराव कृष्ण चांदवडकरांच्या सन १७७६ च्या दुसऱ्या पत्रानुसार असे समजते की गया, प्रयाग आणि काशीत गंगापुत्रांची मुजोरी फारच वाढली होती. पुण्याहून बातमी आली की पेशव्यांनी काशीतील ब्राह्मणांची वर्षासने वाटण्याची आज्ञा केली आहे आणि रावसाहेबांच्या अस्थि विसर्जनासाठी काशीस जात आहेत. ही बातमी ऐकताच गंगापुत्रांनी दक्षिणेसाठी महीपतरावांना घेरले. बोलाचालीनंतर हाणामारी झाली, काहींची डोकी फुटली (पेद ३२, पत्र १९३, पृ.११२).

वॉरन हेस्टिंग्सच्या वेळेला गंगापुत्र चांगल्या तऱ्हेने काबूत होते, त्यामुळे यात्रेकरूंसाठी काशीयात्रा ही फारच सुखकर झाली होती. सन १७८३ मध्ये मिरजकर पटवर्धन घराण्यातील सरस्वतीबाई पटवर्धन या त्रिस्थळीयात्रेला गेल्या होत्या. त्यावेळी प्रयाग, काशी व गया ही हिंदूची प्रमुख क्षेत्रे इंग्रजांच्या ताब्यात होती. यासाठी बाईंनी पेशवे सरकारचे पत्र जासूदजोडीबरोबर प्रयागच्या इंग्रजांकडे आगाऊ रवाना केले. म्हणून यमुना उतरल्यावर प्रयागापर्यंत दोन चौक्या होत्या तरी बाईंच्या यात्रेस एक पैसाही पडला नाही. प्रयागास प्रयागवळाबरोबर दक्षिणा करार केली ती दर स्वारीस रुपये तीस व सड्या माणसास रुपये तीन येणेप्रमाणे होती (भावे, १९७६:३२६). तीर्थपुरोहितपणा तर गंगापुत्रांची वंशपरंपरागत जायदाद होती. यासाठी काहीही करण्यास ते तयार होते. सन १८०३ मध्ये लॉर्ड वेलेशिया यांनी अशाच एका घटनेचा उल्लेख केला आहे. या साली नागपूरकर भोसल्यांची बहीण काशीयात्रेसाठी आली होती. काशीच्या सातहजार गंगापुत्रांनी तिच्याकडून खूपच दक्षिणा उपटण्याचा प्रयत्न केला. परंतु ते सर्व तिच्या शक्ती बाहेरील होते

आणि दक्षिणा दिल्याशिवाय गंगापुत्र धार्मिक विधी करण्यास तयार नव्हते. शेवटी मि. नीव यांनी मध्यस्थी करून योग्य दक्षिणा ठरवली, तेव्हा तिची यात्रा पूर्ण झाली (मोतीचंद्र १९६२: ३९८).

ईस्ट इंडिया कंपनीने सर्व दान-दक्षिणा सरकारी खजिन्यात भरण्याची आज्ञा दिली. परंतु सन १८०३ मध्ये गंगापुत्रांना गंगाकाठावर दक्षिणा घेण्याचा हक्क आहे असे मान्य करण्यात आले. सन १८१३ आणि १८२० मध्ये दिवाणी कोर्टाच्या निर्णयानुसार गंगापुत्रांनी पंचद्राविडांच्या विरूद्ध आपले अधिकार मिळविले. परंतु सन १८२१ मध्ये या भांडणात घाटिये आले. पंचगंगा घाटाची मालकी असणाऱ्या घाटियांनी असा दावा केला की गंगापुत्रांना मिळणारी दक्षिणा त्यांना मिळण्यात यावी. सन १८२१ मध्ये पिशाचमोचन आणि दुसऱ्या तलावांवर दक्षिणा घेण्यास पंचद्राविडांना अडविले. परंतु कोर्टाचा निर्णय विरूद्ध लागूनही ते त्यांच्या भूमिकेवर ठाम राहिले (मोतीचंद्र १९६२: ३९९).

गंगाकाठावर धार्मिक कृत्ये करण्याच्या या गोष्टी झाल्या. शहरात यात्रा करण्याची दुसरीच गोष्ट होती. सन १८१३ मध्ये वाराणसीच्या दिवाणी न्यायालयाने पंचद्राविडांच्या बाजूने निर्णय देऊन दक्षिण भारतातून येणाऱ्या यात्रेकरूंकडून दक्षिणा घेण्याचा हक्क असल्याचे मान्य केले. परंतु असे सर्व असले तरी या संबंधी वारंवार फौजदारी गुन्हे दाखल होत होते. पंचद्राविड आणि गंगापुत्रांमधील भांडण बघून दुसरे ब्राह्मणही यात दखल देऊ लागले. यात जोशी आणि जात्रावल बंगाली लोकांना जाळ्यात अडकवू लागले, तर गंगापुत्रांचे नोकर असलेले भंडरियेही आपला स्वत:चा कारभार चालवू लागले (मोतीचंद्र १९६२: ३९९).

सन १८२८-२९ मध्ये प्रिन्सेपने घेतलेल्या काशीच्या जनगणनेमध्ये काशीमध्ये ११ उपजातीचे महाराष्ट्रीय ब्राह्मण राहत असून त्यांची संख्या ११,३११ होती, तर गंगापुत्रांची लोकसंख्या १००० होती (मोतीचंद्र १९६२: ३८४). येनुगुला विरस्वामी या तेलगू भाषिक प्रवाशाने सन १९३० मध्ये त्रिस्थळी यात्रा केली. त्याने 'काशीयात्रा चरीत्र' नावाने आपले प्रवासवृत्त लिहिले आहेत. त्यात तो आपली निरीक्षणे नोंदवतो की एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला उत्तर भारतीय ब्राह्मण (की जे स्वत:ला गंगापुत्र म्हणवितात) यांनी वाराणसीमध्ये मोठ्या प्रमाणावर आश्रय दिला. हा आश्रय मुख्यत्वे धार्मिक आश्रय होता. घाटांवर धार्मिक कार्ये करणाऱ्या लोकांकडून ते दक्षिणा गोळा करीत. या सर्व घडामोडींचे केंद्र मणिकर्णिका घाट होता आणि ज्या कोणा यात्रेकरूला धार्मिक कार्ये करावयाची असत त्यांना या बलाढ्य गंगापुत्रांच्या 'संपर्क जाला'चा सामना करावा लागत असे. त्यांच्याशी जर सहकार्य केले नाही तर त्यांच्या रोषास बळी पडावे लागत असे. विरस्वामीने अशा उच्च यात्रेकरूंकडे लक्ष वेधले आहे. तंजावरचा राजा सर्फोजीने केदार घाटावर गंगास्नान केले आणि विधी केले ते दक्षिण भारतातील ब्राह्मणाकरवीच. विजयनगरच्या राजाचा निवास काशीमध्ये असताना गंगापुत्रांना चुकविण्यासाठी/टाळण्यासाठी एक वर्षे तो मणिकर्णिका घाटावर

गेलाच नाही. विरस्वामीच्या अंदाजानुसार त्यावेळी जवळजवळ बारा हजार गंगापुत्र वाराणसीमध्ये राहत होते (Sitapati P. and V.Purushottam 1973: 103).

प्रयागास जो स्थानिक तीर्थपुरोहित असतो त्यास प्रयागवळ असे म्हणतात. सन १८४८ मध्ये रघुनाथराव विंचूरकर हे उत्तर भारतातील यात्रा करीत असताना प्रयागाला पोहचले तेव्हा मकरमास सुरू झाला होता. प्रयागक्षेत्री मुंडनविधी महत्वाचा आहे. जीवत्पितृकांनीदेखिल मुंडन करावे असा विधि आहे. सौभाग्यवती स्त्रियांनी केसाचा काही भाग काढून त्रिवेणीतीर्थास अर्पण करावा लागतो. यासच वेणीदान म्हणतात. द्रविड देशातील सौभाग्यवती स्त्रिया तर सर्व केश काढतात. पूर्वी प्रयागक्षेत्री वेणीस्नानास आणि वेणीदानास सरकारी कर होता. परंतु सन १८४८ च्या आधी काही वर्षे तो कर इंग्रज सरकारने माफ केला (लेले १९६४: ६९,७०).

श्राद्धविधी आणि पिंडदानासाठी आलेल्या यात्रेकरूंकडून जास्तीत जास्त दक्षिणा उपटण्याकडे गयावळाचा कल होता. रघुनाथराव विंचूरकर हे गया येथे आले असताना त्यांनाही गयावळाकडून हाच अनुभव आला. गया येथे निरनिराळ्या प्रकारची श्राद्धे आणि पिंडदाने झाल्यानंतर शेवटच्या दिवस गयावळ यांचा मुख्य मागण्यांचा होता. एके दिवशी रघुनाथराव यांचा गयावळ अंगावर पुष्कळ अलंकार घालून मोठ्या थाटाने रघुनाथराव यांजकडे श्राद्ध भोजनास आला. श्राद्ध झाल्यावर रघुनाथराव यांनी अक्षयवट मूली पिंडदान केले. नंतर गयावळांची पूजा करून त्यास कापड दिले ते असे : भरगच्ची किनखाबी इंगरखा व त्याचप्रमाणे विजार, पल्लेदार शेला, बालमपेंची पागोटे, शालजोडी, धोतरजोडा, याप्रमाणे वस्त्रे देऊन त्याजवर पाचशे रूपये रोख दक्षिणा दिली. नंतर गयावळ याने फुलांचे माळेने रघुनाथराव यांचे हात बांधिले व एक फुलांची माळ हाताने त्यांच्या पाठीवर ठेवून तो ''आणखी काही द्या'' असे म्हणून मागू लागला. तेव्हा रघुनाथराव यांनी एक घोडा व बैलाचा रथ, ही दोन दाने देऊन दानसांगतार्थ दोनशे रुपये रोख दिले. त्यावर गयावळ हा 'महाराज येथे भूमिदान व ग्रहदान हे अवश्य झाले पाहिजे' असे म्हणून ते मागू लागला. त्यावरून रघुनाथराव यांनी आपले विंचूर इलाख्यांतील जहागिरीपैकी कोटमगांव तालुके निफाड या गावी जमीन बिघे ११० दर बिघा रुपया एक प्रमाणे ११० रुपये उत्पन्नाची व विंचूर येथील एक घर, असे दान देऊन त्यावर शंभर रुपये दानसांगतार्थ दिले. त्यावर 'आणखी काही तरी द्या म्हणजे हात सोडीन' असे गयावळाने म्हटले. तेव्हा रघुनाथराव यांनी आणखी तीनशे रुपये रोख दिले. त्यावर गयावळ म्हणाला की, ''महाराज! अक्षय्यवटाकडे पहा! विष्णुचरणाचे स्मरण करा व वित्तशाठ्य करू नका! कारण हा सर्व पितरांचा उद्धार होण्याचा समय आहे! आणि तो उद्धार आम्हांस संतुष्ट केल्याने होणार! हा प्रसंग वारंवार यावयाचा नाही. यास्तव आता मला संतोष होईल असे काही द्या!'' मग रघुनाथराव यांनी आणखी तीनशे रुपये रोख दिले. त्यावर गयावळाने गाय मागितली तेव्हा गाईबद्दल त्यांनी पन्नास रुपये रोख दिले. तेव्हा गयावळाने रघुनाथराव यांचे

हात सोडून म्हटले की, "अहो यजमान, आता मी संतुष्ट झालो! तुमचे सर्व पितृगण माझे वाक्ये करून उत्तम लोकास जातील! नारायण त्यांस अक्षय्य लोक देईल!" असे बोलून त्याने रघुनाथराव यांची पाठ थोपटली....... हे कृत्य झाल्यावर रघुनाथराव यांनी तेथे भोजन केले. नंतर सायंकाळी गयावळ यास घोडा दिला होता, त्या घोडयावर त्याला पोषाखासुद्धा बसवून वाजंत्री वगैरे वाद्यांचा घोष करीत व दारू सोडीत तेथील रीतीप्रमाणे गयावळाची मिरवणूक काढून त्यास मोठया समारंभाने त्याचे घरी पावते केले (लेले १९६४: ९७).

विंचूरकरांच्या गया येथील श्राद्धविधीचे वर्णन वाचताना गया येथील गयावळांबद्दलची अधिक माहिती सुद्धा समजते. गणेश सदाशिवशास्त्री लेले लिहितात की, "गया येथील गयावळ ब्राह्मण बहुत करून द्रव्यवान आहेत. त्यांत पेशवे, शिंदे, होळकर, भोसले यांच्या गयावळांस त्या त्या यजमानाकडून वर्षासने व कोणास गावही इनाम आहेत. कितीएक गयावळ श्रीमंतासारखे वागतात. बहुतेक गयावळांस पक्षी बाळगण्याचा फार षोक आहे. कितीएक गयावळांचे घरी चंडोल वगैरे पक्षांचे पिंजरे पंचवीस पन्नास किंबहुना शंभरपर्यंत असतात. हातावर पक्षी ठेवून ते बाहेर फिरतात. एकवार स्त्री वारली म्हणजे ते पुढे दुसरे लग्न करीत नाहीत. या कारणाने त्यांची वंशवृद्धि कमी आहे. त्या वेळेस बोहरीलालभय्या, वेणीरामकर्त्या, गंगाविष्णु, लछमन मेहेरवार, लालजी मेहेता हे गयावळ रघुनाथराव यांस द्रव्यवान दिसून आले. लछमन मेहेरवार हा होळकरांचा गयावळ आहे. त्यास होळकरांकडून तीन हजार रुपयांचे इनामी गाव आहेत. गया येथे अहल्याबाईने एक राममंदिर बांधिले आहे, त्याची देखरेख त्याजकडेस आहे. हाच विंचूरकरांचा गयावळ आहे" (लेले १९६४: १००,१०१).

सातारच्या प्रतापसिंह महाराजांच्या काळातील एक घटना अशी आहे. नागपूरचे मुधोजी भोसले उर्फ आप्पासाहेब भोसले यांच्याशी प्रतापसिंह महाराजांचा संपर्क असून ते इंगजी सत्तेविरूद्ध कट करीत आहेत असे बाळासाहेब नातू आणि सातारच्या इंग्रज रेसिडंटने आरोप केला होता. या आरोपाला साक्षीदार म्हणून त्यांनी १८३९-४० मध्ये एका गयावळाला पकडले होते. हा गयावळ म्हणजे गयेच्या गयावळाचा गुमास्ता होता. केशव सीताराम ठाकरे यांच्यासंबंधी लिहितात की, "जोधपूर कटातला महाराजाविरूद्ध अव्वल दर्जाचा जिवंत साक्षीदार म्हणून नातूकंपूने राघो गोपाळ गयावळ नावाच्या एका यात्रेकरूवरच घाड घातली. महाराष्ट्रातून काशीयात्रेला लोक जमा करून नेणारा गया येथील छोटेलाल वैद्य गयावळ यांचा हा एजंट. नेहमीसारखा श्रीभागीरथीची कावड घेऊन रामेश्वरला जाण्यासाठी आणि परत येताना गयेच्या यात्रेला लोक नेण्यासाठी हा माहुलीला आला होता" (ठाकरे, १९९८: १३४). अशा तऱ्हेने तीर्थोपाध्यायाचे अनेक गुमास्ते यात्रेकरूंना नेण्यासाठी दक्षिण भारतात फिरत असताना त्या काळात दिसून येत असत. सन

१८४८ मध्ये विंचूर संस्थानाधिपती रघुनाथराव विंचूरकर हे त्रिस्थळी यात्रेला आले असताना त्यांच्यासोबत विंचुरापासून प्रयागवळ व गंगापुत्र यांचे गुमास्ते असून त्यांचा खर्च वाटखर्च रघुनाथराव यांकडून मिळत असे (लेले १९६४: ६९,७०). औंधचे भवानराव पंतप्रतिनिधीही सन १८८० च्या दरम्यान त्रिस्थळीयात्रेस आले होते. त्यानीही प्रयागवळांच्या गुमास्त्यांचा उल्लेख केलेला आहे. ते लिहितात, ''देवीदीन आणि मसुरीदीन या नावाचे दोघे बंधु आमचे प्रयागवळ होते. पैकी देवीदीन आमचेबरोबर पुण्यापासून होतेच. यामुळे त्यांचा आमचा परिचय फार झाला होता. श्रीमंतांचे मूल, श्रीमंतांचेकडून आपणास हजारो रुपयाची प्राप्ति होणार, त्यांच्या मुलांचे लाड केले तर प्राप्तीत भर पडणार, म्हणून देवीदीन आम्हांस खेळवू लागले. आम्ही रेडा गरभार म्हटले तर ,''होय महाराज, नऊ महिने झाले आहेत,'' म्हणू लागले यात नवल काय? त्याचे ते हिंदीमिश्रित मोडकेतोडके मराठी ऐकून आम्हास प्रथम तर हसूच येई, पण झाली काय मौज की तीन महिने साधारण हिंदी बोलणाराचा सहवास बराच झाल्याकारणाने थोडे बहुत चुकतमाकत हिंदी बोलता येऊ लागले'' (पंतप्रतिनिधी १९४६: ३५२).

गयावळांच्या गुमास्त्यांच्या बद्दलही भवानरावांनी लिहिलेले आहे. ते लिहितात, ''गयेला गंगा, विष्णु व छोटेलाल म्हणून तीन भाऊ गयावळ असत. ते आपले हेर सर्व हिंदुस्थानात पाठवून जे जे यात्रेकरू त्रिस्थळीस जात असतील त्यांस आपले यजमान म्हणून शेपन्नास अथवा केव्हा केव्हा जास्त कोसांवरूनही आणीत असत. आम्ही पुण्यास गेल्याबरोबर या गंगाविष्णूचा हेड्या यजमानसाहेबांस येऊन भेटला. मग काय त्यास आम्ही यात्रेस निघालो ही बातमी कशी समजली कोणास ठाऊक! त्यास त्याच ठिकाणी यजमानसाहेब यांनी सांगितले की, ''आमचे गयावळ नारायणलाल आहेत. त्यांची पूजा आमचे मातुश्रींनी केली आहे. त्यांस आम्ही पुजणार. तुम्ही आमचे नादाला लागू नका. त्यावेळी हे प्रकरण इतकेच राहिले.'' (पंतप्रतिनिधी १९४६: ३५७)

या गयावळांचा दबदबा खूप असे. श्रीमंत यजमान मिळविण्यासाठी वेळप्रसंगी ते मारामारी करावयास सुद्धा मागेपुढे पहात नसत. मारामारी करण्यासाठी आपल्याबरोबर ते लाठीवानही जवळ बाळगत असत. भवानराव पंतप्रतिनिधींनी गया येथील गंगाविष्णू या गयावळाबद्दल एक हकीकत सांगितली आहे. ते लिहितात, ''गंगाविष्णू हे त्यावेळी फार श्रीमंत होते. त्यांच्यापाशी हत्ती असे आणि ते गया-वर्जनाचे वेळी वटावर हत्तीवरून येत असत. या गयावळांच्या श्रीमंत यजमानांच्या संबंधाने मारामाऱ्या होत असत. गंगाविष्णूशी तर असे पंचवीस लाठीवाले अशा मारामारीसाठी होते असे म्हणत होते.'' पंतप्रतिनिधींसारखा श्रीमंत यजमान मिळविण्यासाठी पंतप्रतिनिधींचा गयावळ नारायणलाल आणि वर उल्लेखिलेला गयावळ गंगाविष्णू याच्यात झालेल्या मारामारीची हकीकतही ते सांगतात. ते लिहितात, ''नारायणलाल गयावळ

काशीपासूनच आमचे बरोबर होता. तो विश्रांतीसाठी म्हणून एका घरात पडला होता. तेथे त्याला चोप देऊन, यजमान आपला करणेसाठी म्हणून गंगाविष्णूचे चार पांच धिप्पाड लाठीवाले त्या घरात शिरले. नारायणलाल मागील दाराने पळाला, तो आडवाटेने आमचे बिऱ्हाडी आला. थोडी विश्रांती घेऊन यजमानसाहेब (भवानराव पंतप्रतिनिधींचे वडील श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी) निघण्याचे तयारीत होते, तो नारायणलाल धावत आला आणि 'हे गंगाविष्णूचे लोक मला मारताहेत,' असे म्हणून यजमानसाहेब यांचे त्यांने पाय धरले. इतक्यात ते लाठीवालेही नारायणलालचे पाठोपाठ आले आणि 'किधर हे नारायणलाल?' म्हणून ओरडले. आपल्या राहत्या घरी परकी लोक आपल्या परवानगीवाचून आले आणि आता ते नारायणलालास धरणार, हे पाहिल्याबरोबर यजमानसाहेब यांनी एकदम नरसिंहावतार धारण केला. 'निकल जाव हमारे घरमेसे' असे म्हणून पहारेकऱ्याच्या हातातील तरवार घेऊन, ती उपसून ते एकदम एकटेच त्या पाच-सहा लाठीवाल्यांचे अंगावर गेले. हा महाराष्ट्रीय वीर एकदम तरवार उपसून अंगावर येत आहे, असे पाहिल्याबरोबर त्या गयावळांनी पळ काढला. हा सर्व तमाशा पाहणारे लोक 'दख्खनका राजा बडा कडवा है' असे म्हणत होते'' (पंतप्रतिनिधी १९४६: ३५७,३५८).

गयेस सर्व धार्मिक विधी झाल्यानंतर यजमानांच्या पाठीवर माळा टाकून गयावळ त्यांच्याकडून अधिक पैसे काढण्याकरिता त्यास फार छळत असत. केव्हा केव्हा तर संध्याकाळपर्यंत त्यांना तिष्ठत ठेवत. भवानराव पंतप्रतिनिधीही त्यांच्या बाबतीत घडलेला प्रसंग वर्णन करतात. ते लिहितात, ''यजमानसाहेब आणि मातुश्री हात जोडून बसलेले. त्यांच्या पाठीवर माळा टाकलेल्या आणि पुढे नारायणलाल गयावळ उभा राहिलेला, आम्हास अजून चांगले आठवते आहे. यजमानसाहेबांनी प्रथम हजार रुपयाचा आकडा सोडला. नारायणलाल म्हणाला 'महाराज, हमारा पेट भरता नाही.' दोन हजार, तीन हजार, चार हजार, तरी 'पेट नही भरता!' शेवटी पाच हजार रुपयांच्या थैल्या तेथे ओतल्या. आशा कोणास सुटली आहे? आणि नारायणलाल तर बोलून चालून गयावळ! कृतज्ञ असला म्हणून काय झाले? पाच हजाराचा ढीग पुढे ओतला तरी तो म्हणाला, 'महाराज, हमारा पेट नही भरता.' 'मग काय सर्व संस्थान तुमच्या स्वाधीन करावयाचे की काय?' असे जरा रागावून यजमानसाहेब मोठ्याने म्हणाले, त्या सरशी तो म्हणाला, 'आपके पितर सरग भयो.' कारण त्यास त्यांचा नारसिंहावतार माहीत होता. 'तेरे पितर सरग भयो' असे गयावळांनी म्हटल्याशिवाय पितरांचा उद्धार होत नाही, अशी परंपरेची समजूत आहे'' (पंतप्रतिनिधी १९४६: ३५९,३६०).

पेशव्यांचे तीर्थोपाध्ये

गंगातीरावरील धार्मिक विधी प्रयागवळ, गंगापुत्र करीत. किंबहुना हे विधी करण्याचा वंशपरंपरागत अधिकार त्यांच्याच असे. परंतु इतर धार्मिक विधी करण्यासाठी आपापल्या जमातीचे उपाध्ये नेमण्याची प्रथा

असलेली दिसते. मराठी लोकांनीही यासाठी मराठी उपाध्ये नेमल्याचे दिसते. पेशव्यांनीही त्रिस्थळी यात्रेचे उपाध्येपण वझे उपनामाच्या मराठी ब्राह्मणांना दिलेले दिसते. सन १७५८-५९ मध्ये बाळाजी बाजीराव पेशवे यांनी भास्करभट आणि धोंडभट वझे यांना तीर्थउपाध्यांची सनदच करून दिलेली प्रसिद्ध आहे (वाड डायरी ३, पत्र १६४, पृ.११५). त्रिस्थळी यात्रेचे उपाध्येपण कोणाचे यासाठी दस्तुरखुद वझे कुटुंबातच कलह लागला होता. तसेच प्रयागचे उपाध्ये कोण यावरही प्रयागचे देवधर आणि वझे कुटुंबामध्ये कलह लागला होता. हे दोनही कलह बाळाजी बाजीराव पेशव्यांनी या सनदेद्वारे निकालात काढलेले दिसतात.

बाळाजी विश्वनाथ पेशवे हे जेव्हा सन १७१८ च्या दरम्यान त्रिस्थळी यात्रेला गेलेले होते त्यावेळी त्यांनी भिकंभट वझे यांना उपाध्येपण दिलेले होते. नंतर त्यांच्या मातोश्रीही त्रिस्थळी यात्रेला गेल्या त्यावेळीही भिकंभट वझे त्यांच्या बरोबर होते. त्यावेळीही उपाध्येपण भिकंभटासच दिलेले आहे. यानंतर पेशवे घराण्यातीलच कोणी नारोपंत आणि लक्ष्मीबाई त्रिस्थळी यात्रेस गेले, त्यावेळी भिकंभट तेथे नसल्याने त्यांचे उपाध्येपण त्यांचे भाऊ बहीरभट वझे यांनी केले. राधाबाई पेशवे म्हणजे बाळाजी विश्वनाथांची पत्नी जेव्हा त्रिस्थळी यात्रेला गेल्या त्यावेळी वझे कुटुंबातील कोणीही नसल्याने प्रयाग येथील गोविंदभट देवधरांनी सर्व धार्मिक विधी केले. प्रयागचे उपाध्येपण देवधरांस द्यावे अशी मागणी देवधरांनी राधाबाईंना केली. परंतु राधाबाईंबरोबरील वेदमूर्ती आनंदभट कर्वे यांनी वझे हे पेशव्यांचे उपाध्ये असल्याचे सांगितले. त्यामुळे पिंडाची दक्षिणा देवधरांस न देता ती वझ्यांच्या नावाने अनामत ठेवली. मातोश्री द्वाराकाबाई गांगलीण या बाळाजी विश्वनाथांबरोबर त्रिस्थळी यात्रेस गेल्या होत्या. राधाबाई यात्रेला गेल्या त्यावेळी त्या काशीत राहत असल्याने उपाध्येपण कोणाकडे आहे याची चौकशी त्यांच्याकडे केली असता, त्यांनीही वझे हेच पेशव्यांचे उपाध्ये असल्याचे सांगितले. परंतु भिकंभट वझे यांच्या कुटुंबापैकी काशीत कोणीच हजर नसल्याने त्याचे उपाध्येपण त्यांचे पुतणे गोविंदभट वझे यांना दिले. पुढे राधाबाईं बरोबर गोविंदभट वझे महाराष्ट्रात आले त्यावेळी भिकंभटांची मुले भास्करभट आणि धोंडभट वझे हे नाशिक येथे असल्याचे समजल्याने मातुश्री राधाबाईंनी त्यांना बोलावून एक हजार रूपये दिले आणि प्रयाग येथील राहिलेली पिंडाची दक्षिणाही दिली. त्यावेळी गोविंदराव वझे यांनी स्वत:च्या आणि दोनही पुतण्यांच्या नावे त्रिस्थळी यात्रेच्या उपाध्येपणाच्या सनदा पहिल्या बाजीराव पेशव्यांकडून करून घेतल्या.

मध्यंतरीच्या काळात प्रयागच्या देवधरांनी पुण्यात येऊन नानासाहेब पेशव्यांकडून प्रयागच्या उपाध्येपणाच्या सनदा करून घेतल्या होत्या. पुढे मातुश्री काशीबाई म्हणजेच पहिल्या बाजीरावांच्या पत्नी त्रिस्थळी यात्रेला गेल्या त्यावेळी कुरा-जहानाबादेपासूनच भास्करभट आणि धोंडभट हे त्यांच्याबरोबर यात्रेत होते. प्रयाग येथील यात्रा करवून ते काशीबाईंना काशीस घेऊन गेले. त्यावेळी प्रयागास देवधर काहीच

बोलले नाहीत. परंतु काशीत गोविंदभट वझे यांनी मात्र उपाध्येपणाचा कब्जा काढला. यावेळीही मातुश्री द्वारकाबाई गांगलीण यांची साक्ष काढली. नारायण दीक्षित पाटणकर आणि वामनभट कर्वे यांनी त्यांना विचारले की, 'थोरल्या नानांनी म्हणजेच बाळाजी विश्वनाथांवेळी भास्करभटांचे आजे भिकंभट वझे आणि गोविंदभटांचे वडील बहीरभट वझे हे एकत्र कुटुंबात राहत होते की विभक्त होते.' द्वारकाबाई गांगलीण यांनी ते विभक्त राहत होते व उपाध्येपण भिकंभटासच दिले होते असे सांगितले. त्यामुळे पहिल्या बाजीरावांपासून गोविंदभट वझे यांनी घेतलेल्या उपाध्येपणाच्या सनदा रद्द करण्यात येऊन त्या भास्करभट व धोंडभट यांना देण्यात आल्या. पुढे जनार्दनपंताच्या पत्नी सगुणाबाई पेशवे त्रिस्थळी यात्रेस गेल्या असताना त्यांच्या बरोबर भास्करभट होते. यावेळी मात्र प्रयाग येथे रामभट देवधर व त्यांचे पुत्र काशीनाथभट देवधर यांनी कब्जा केला. त्यामुळे उपाध्येपण अनामत ठेवले. पुढे सगुणाबाई पुण्यास आल्यानंतर पुण्यात राहत असणाऱ्या काशीकर, प्रयागवासी आणि गयावासी ब्राह्मणांच्या साक्षी काढून वझ्यांच्या उपाध्येपणावर शिक्कामोर्तब झाले. देवधराकडचे उपाध्येपण काढून वझ्यांच्या नावाने नव्याने सनदापत्रे करून दिली.

उपाध्येपणाच्या या वतनात मोठ्या प्रमाणावर आर्थिक देवघेव होत असे. तसेच राज्यकर्ते असणाऱ्या पेशव्यांचे उपाध्ये असणे ही मानाची गोष्ट आहे. शेवटी उपाध्येपण हे वतन आहे. वतन हे नेहमी वंशपरंपरागत असते. त्यामुळे एखाद्या व्यक्तिच्या अनुपस्थितीचा फायदा घेऊन दुसरा माणूस उपाध्येपण करावयास लागला तर कलह हा ठरलेलाच होता.

प्रकरण चौथे

वाराणसीतील मराठा निर्मित स्थापत्य

(महाराष्ट्रीय लोकांनी बांधलेले घाट, वाडे, मंदिरे, अन्नछत्रे आणि ब्रह्मपुरी)

प्रास्ताविक

सन १७९० मधील ब्रिटीश म्युझियम मध्ये वाराणसीच्या गंगा किनाऱ्याचे चित्र असून त्यात गंगाकिनाऱ्यावरील तीर्थयात्रींची गर्दी, गंगेत स्नान करणारे, गंगेतून जाणाऱ्या व्यापारी बोटी यांचे चित्रण आढळते (Desai 2017: 122). या चित्रात गंगा नदीच्या पात्रात उतरणाऱ्या दगडी पायऱ्यांच्या मध्ये काही ठिकाणी रिकामी म्हणजेच पडीक जमीन असलेली दिसते. उंच तटबंदीयुक्त महाल, उतरत्या पायऱ्या, मंदिरांची उंच दिसणारी शिखरे, घुमट आणि मिनार यांना छेदणाऱ्या असमान रेषांनी बनलेले गंगा किनाऱ्याचे क्षितीज या चित्रात नजरेस भरते. नुसत्या नजरेनेच आपण या चित्रातून गंगा किनाऱ्यावरील इमारती, मंदिरे व घाट ओळखू शकतो. उदाहरणार्थ घाटाच्या पायऱ्यांवर जळत असलेल्या चिता आणि तेथेच स्नान करणारे यात्रेकरू बघितले तर मणिकर्णिका घाट सहजपणे ओळखता येतो तो त्याच्या पार्श्वभागी अजूनही अस्तित्वात असणाऱ्या जुन्या मंदिरांमुळे.

गंगा किनाऱ्यावरील हे ओळखीचे वाटणारे चित्र दिसते प्राचीन, पण बनलेले आहे सन १७९० मध्ये. काही दशकांपूर्वी मराठ्यांच्या आर्थिक स्रोत्रांनी बनलेले हे स्थापत्य वाराणशीच्या प्राचीन महतेच्या मानाने फारच अलिकडचे आहे. वास्तव हे आहे की वाराणसीचे आजचे मोठ्या प्रमाणात दिसणारे स्थापत्य हे मराठ्याच्या आश्रयामुळे निर्माण झालेले आहे. मराठ्यांनी या भागात आपले सत्ताकेंद्र स्थापन केले होते. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात दख्खनमध्ये (महाराष्ट्रात) त्यांनी आपले राज्य स्थापन केले. अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात त्यांनी आपले लक्ष उत्तरेकडे वळवून नर्मदा ओलांडली आणि पुढील काही वर्षात उत्तर भारत पादाक्रांत केला. दख्खन व माळवा भागात राज्य करणाऱ्या मराठा घराण्यांच्या देशव्यापी आश्रयामुळे वाराणसीला पुन्हा एकदा ''शिवाची नगरी'' म्हणून महती प्राप्त झाली. वाराणसीमध्ये पडीक अवस्थेत असणाऱ्या आणि केवळ संस्कृत प्रशस्तीमधून दिसून येणाऱ्या हिंदू मंदिरांची पुनर्बांधणी तसेच जीर्णोद्धार करण्याचे काम अठराव्या शतकात मराठ्यांनी केले. पूजा, धार्मिक परंपरा आणि तीर्थक्षेत्रीय परंपरांचे नवीनीकरण करणाऱ्या या मराठा पुरस्कृत पुनर्बांधणीच्या भौतिक घटकांची चर्चा या प्रकरणात करणार आहे.

मराठ्यांच्या राजाश्रयामुळे वाराणसीमध्ये निर्माण झालेले विविध तऱ्हेचे स्थापत्य - एक दृष्टिक्षेप

मराठ्यांच्या राजाश्रयाखाली वाराणसीमध्ये सर्वात प्रथम बांधल्या गेलेल्या स्थापत्याच्या संदर्भात पेशव्यांचे नाव अग्रक्रमाने येते. वाराणसीतील मराठी माणसांच्या उलाढालींची, मग ती धार्मिक असो वा स्थापत्या संबंधीची असो, माहिती मोगल बादशहा अकबराच्या कालापासून मोठ्या प्रमाणावर मिळण्यास सुरवात होते. त्यामध्ये महाराष्ट्रीय ब्राह्मणांचे योगदान मोठ्या प्रमाणावर दिसते. ही माणसे फक्त यात्रेसाठीच वाराणसीमध्ये आली नाहीत, तर ती तिथेच स्थायिक झाली व आपल्या विद्वत्तेने वाराणसीस नव्हे तर साऱ्या भारताचे नाव मोठे करते झाली. पेशवे काळात तर महाराष्ट्र आणि वाराणसीमधील संबंध अधिकच विस्तारले गेले आणि मराठी लोक मोठ्या संख्येने काशीयात्रेस जाऊ लागले. त्यामुळे पेशव्यांनीही वाराणसीमध्ये अधिक लक्ष देण्यास सुरवात केली आणि वाराणसीच्या सुधारणेसाठी पैसे खर्च करू लागले. बहुतेक महाराष्ट्रीय ब्राह्मण पेशव्यांकडून येणाऱ्या वृत्तीवर आपली उपजीविका करत आणि पेशव्यांच्या कल्याणार्थ पूजापाठ करीत. या ब्राह्मणांना राहण्यासाठी म्हणून पेशव्यांनी ब्रह्मपुरी आणि स्नान करण्यासाठी गंगेवर घाट बांधले. पहिल्या बाजीरावांचा वाराणसीमधील कारभारी सदाशिव नाईक जोशी म्हणून होते. त्यांनी पहिल्या बाजीरावांना गंगेवरील घाट, ब्रह्मपुरी आणि अन्नछत्र बांधण्यासाठी पत्रे लिहिली आहेत. या पत्रांमधूनच पेशव्यांचा वाराणसीतील उद्योगांची माहिती मिळते. वाराणसीतील मराठ्यांच्या स्थापत्याबाबतची विस्तृत माहिती या चार पत्रांव्यतिरिक्त इतरत्र फारच कमी प्रमाणात मिळत असल्यामुळे पुढे ती पूर्ण स्वरूपात दिलेली आहेत.

तारीख ८-८-१७३५ रोजी सदाशिव नाईक जोशी यांनी पहिल्या बाजीरावांना पत्र लिहिले आहे (पेद ३०, पत्र १३१, पृ.१०१). ते लिहितात, ''स्वामीनी ब्रह्मपुरीविसी लिहिले होते. त्यास, ब्राह्मणपुरीस जागा फार पाहिजे. ज्या स्थलात आठदाहा घरे होते तैसा जागा येकायेकी मिलत नाही. तलासात आहो. मिलाला म्हणजे घेऊन स्वामीस लिहून पाठऊ. गावात मसाला मिलत नाही. गावातील आधिकारी घाट बांधतो. हकिमीमुळे सर्व मसाला तो घेतो. घराचे दुणे मोल जाहाले आहे. नागर लोक फार आले त्यामुले घर माघ जाहाली. उपर स्वामीनी लिहिले की, दशासमेधी घाट घेतला आहे त्याचा पैका लागला आसेल तो लिहून पाठवणे. त्यावरून पूर्वी पत्रे लिहिली आहेत. वर्तमान सर्व लिहिले आसे. उपर, बाग वृधकालेस्वराजवल घेतली आहे. गावात आहे. त्यास चौफेर दिवाल पकी घातली. आत स्थले काही जाहाली, काही होणे आहेत. येका पंगतीस च्यार हजार पात्रे ब्राह्मणभोजन होईल यैसी जागा आहे. परंतु तयार जाहाली नाही. कार्तिक मासी काम लाऊन तयार करू. घाट बांधावयाविसी आज्ञा आली होती. कासीत स्थले तीन आहेत: पंचगंगा, मनकर्णिका, दशासमेध. या घाटी ब्राह्मण येऊन स्नाने करितेत. दोन स्थले

स्वामीची जाहाली. पंचगंगेचा घाट श्रीपतराऊ यानी बांधिला. आता यैसे स्थल नाही की जेथे ब्राह्मण येऊन स्नाने करीत यैसे स्थल नाही. याजकरिता उद्योग न केला. येक स्थल ब्रह्मनाल घाट बांधावयाचे आहे ते काम हाली होत नाही.''

पत्रात सदाशिव नाईक जोशींनी अनेक प्रश्नांची उत्तरे दिली आहेत, तसेच घाट बनविताना येणाऱ्या अडचणींचाही उल्लेख केला आहे. ब्रह्मपुरी बनविण्यासाठी नाईकांना मोठी जागा मिळत नाही. घाट बांधण्यासाठी मसाला म्हणजेच बांधकाम साहित्य मिळत नाही. याचे कारण म्हणजे त्या वेळचा वाराणसीचा फौजदार रुस्तम अली हा जरासंध घाटाच्या जागी मीर घाट बांधत होता (हा घाट हल्ली मानमंदिर घाटाच्या शेजारी आहे). त्याच्या साठी इमारती सामान खरेदी करण्यात येत होते. बाजारातील सर्व इमारती साम्मान यांनीच खरेदी केल्यामुळे नाईकांना त्यांचे घाट बांधण्यासाठी सामान मिळत नाही अशी त्यांची तक्रार आहे. नागर लोक वाराणसीला फार आल्यामुळे घराचे भाडे दुप्पट झाल्याचेही ते नमूद करतात. वृद्धकालापाशी बाग घेऊन त्याला 'चौफेर दिवाल' म्हणजेच चारही बाजूला भिंत बांधून एकाच वेळी चार हजार ब्राह्मण जेवू शकतील असे अन्नछत्रही बांधण्याच्या तयारीत ते आहेत असे सांगतात. पंचगंगा, मणिकर्णिका आणि दशाश्वमेध ही ठिकाणे घाट बांधण्यासाठी नाईकांनी निश्चित केली असून पंचगंगा आणि दशाश्वमेध घाट बांधून पूर्ण झाल्याचे आणि पंचगंगा घाट श्रीपतराव यांनी बांधल्याचेही ते लिहितात. ब्रह्मनाल घाट बांधू शकलो नाहीत हे ही ते नमूद करतात.

यापत्रावरुन असे दिसते की श्रीपतराव नावाच्या मराठी माणसाने पंचगंगा घाट बांधलेला आहे. पेशव्यांनी घाट बांधण्याच्या आधी किंवा त्याच दरम्यान त्यांनी हा घाट बांधलेला दिसतो. श्रीपतराव पंतप्रतिनिधी यांनी पंचगंगा घाट बांधला या अर्थाचा शिलालेखच पंचगंगा घाटावर होता. त्यात तो घाट श्रीपतराव पंतप्रतिनिधी यांनी बांधल्याचे स्पष्ट म्हटलेले आहे. म्हणजेच पेशव्यांबरोबर किंवा किंचीत थोडे आधी या प्रतिनिधी घराण्याने वाराणसीत घाट तसेच मंदिर बांधण्यास सुरवात केली असावी. याच प्रतिनिधींनी साताऱ्या जवळील संगममाहुली येथे अतिशय देखणे असे काशी विश्वेश्वराचे मंदिर बांधले.

सदाशिव नाईक जोशी यांचे दुसरे पत्रही याच विषयाचे आहे (पेद ४३, पत्र २, पृ.१). याही पत्रात ते मीर रुस्तुम अली याने बांधलेला जरासंध घाट पाडून मीर घाट बांधण्याच्या प्रसंगाचे वर्णन करतात. त्यामुळे इतरांना दुसरे घाट बांधण्यास मसाला (बांधकाम साहित्य) मिळण्यास अडचण पडत असल्याचे सांगतात. मणिकर्णिका आणि वीरेश्वर घाटाच्या पूर्वेस नागेश घाट बांधण्याचे त्यांनी निश्चित केले आहे. परंतु मणिकर्णिका घाट समीप असता या घाटावर कोणी स्नान करणार नाहीत तर हा घाट बांधून काय उपयोग आहे असे प्रश्नचिन्हही ते उभे करतात. सर्व ब्रह्मपुरी एकाच ठिकाणी बांधाव्या असे त्यांच्या मनात आहे.

परंतु योग्य त्या प्रमाणात जागा मिळत नाहीत. सध्या पाच ब्रह्मपुरींची जागा ताब्यात आली असल्याचे ते सांगतात. दशाश्वमेध घाटावरील जीर्ण हवेली पाडून तेथे नव्याने हवेली बांधून श्रीअद्वैतानंद स्वामीस देवून त्याशेजारील उर्वरीत जागेत बांधकाम करून आणखी दहा संन्यासाची व्यवस्था लावणार असल्याचेही ते लिहितात. बृधकालासनिध अडीच बीघे जागा घेऊन एक हजार माणसांसाठी अन्नछत्र बांधावयाचेही त्याचा मानस दिसतो.

सदाशिव नाईकांचे अशाच अर्थाचे तिसरे पत्र बाजीराव पेशवे व चिमाजीआप्पांना लिहिलेले आहे (पेद ३०, पत्र २८०, पृ.२०९) : ''घाटाचा आरंभ करावा तरी येथील अधिकारी याने गंगातीरी काम आरंभिले आहे, तेणेकरून अनकूलता न पडे. महाराजजी, श्रीमनकर्णिकेस घाट सिध जाहाला त्यासारिखे स्थल कोठेहि नाही, त्याघाटासारिखे स्थल आणिखी कोठे नाही. घाट बांधावा आणि ब्राह्मणस्नाने न वत (होत?) तेव्हा वृथा श्रम काये करावा? कासीत ठिकाणे ३: पंचगंगा, श्रीमनकर्णिका, दशासमेध. त्यामध्ये माहाराजाचे दोन ठिकाणी घाट जाहाला; मनकर्णिका, देशासमेध. पंचगंगेस तो स्थल नाही यैसे जाणोन मंदाकीनतीरी बागेस आरंभ केला. ते बाग सिध जाहालियावरी सविस्तर लिहीन. यात्रकरू लोक येतील त्यास राहावयासी जाता राहातील. दोन सहस्त्र ब्राह्मण येक पंगतीस भोजने होतील. तीन बिघे स्थल आहे. गावासनिध आहे. महिने ६ आरंभ केल्यास जाहाला आहे............................ . वेदमूर्ति नारायेण दीक्षित येथे आले. त्यास घर अनकूल करून दिले. ते बहुत कृपा करितेत.''

या पत्रात त्यांनी पहिल्या पत्रांप्रमाणेच घाटांचा उल्लेख केला आहे. मंदाकिनी म्हणजेच आत्ताचे मैदागिन येथे तीन बिघ्यामध्ये बाग करून यात्रेकरूंना राहण्यासाठी व्यवस्था करणार आहेत तसेच दोन सहस्त्र लोक एकाच पंक्तीस भोजनास बसू शकतील असे अन्नछत्रही तिथे असेल असे ते नमूद करतात. नारायण दीक्षित वाराणसीस पोहचले असून त्यांच्या रहाण्याची व्यवस्थाही केल्याचे नाईक लिहितात.

आपल्या चौथ्या पत्रात सदाशिव नाईक वाराणसीच्या घाटांसंबंधी चर्चा करतात (पेद १८, पत्र ३६, पृ.२०): ''माहाराजाही लिहिले घाटाविसी व अकरा ब्रह्मपुऱ्याविसी लिहिले तरी रावजी! मजवी (सी?) श्री आयुष्य देईल तरी तुमची सेवा (परलोकीची) करावी हा हेत बहुत आहे, तो विषये महाराजाही लिहिला तेणे करून संतोष जाहाला तो पत्री काये ल्याहावा? हे धर्मवासना या वयांत धरणे हे पुण्य वडिलाचे आहे ! ईश्वर तुम्हास हेच बुधी सर्वकाल देऊ. मी सेवक सिध आहे. घाटाचा व ब्रह्मपुऱ्याचे ठिकाण * * * * नागेशाचे देवलापासून आग्नेस्वराच्या घाटापावेतो स्थल आहे. त्यामध्ये तिसरी तक्षम स्थल हातास येते. बाकी राहिले तेहि काम लागल्याउपरी हातास येईल. सर्व स्थल हातास आल्याउपरी अकरा ब्रम्हपुऱ्या होतील. संन्याशास स्थले होतील. परंतु ते स्थल बाधावे, ब्रम्हपुऱ्या कराव्या, संन्याशास मठ करावे, त्यास रुपये

लक्षाहून दाहावीस अधिक लागतील. ....श्रीमनकर्णिका घाट सिध होऊन आजी पाच वरसे कार्तिकी पुर्णिमेस दीप लागती तेव्हां श्रीकैलास होऊन जातो ! पनास हजार माणूस मज धन्य धन्य म्हणतात. आणि मी नानास्वामीस धन्य म्हणतो. त्यांचे पुण्य तसेच आहे. माहाराजांचे पुण्य तसेच आहे. जे मनी धराल ते सिधीस पावेल. जरी माहाराजाचे चितास नागेशाचे स्थल मनास येईल तरी हे मोहीम(?) आहे. साल दरसाल वीस रुपये यैवज करून घ्यावा. यक साल द्रव्य आल्याउपरी काम सुरू * * * होणे ते ईस्वरइछेने होईल. चितास न ये तरी माझे विचारे घाट तरी आणखी चितांत यत नाही. अकरा ब्रह्मपुऱ्या हरकोठे ठिकाण पाहोन बांधो रुपये २५ लागती. दोन वरसामध्ये सिध होतील. या उपरी जे आज्ञा करितील ते होईल. फौजदार येथे भला आहे तोवरी काही चिंता नाही............... मनकर्णिका घाट सिध जाहाला सर्व लोक येथील तुमचे द्रव्य म्हणतेत. परंतु आम्ही आपल्या मुखे मणत नाही. देशाहून यात्रेकरू येतात व आपले महारास्ट आहेत याजवली म्हणतो, घाट घरे धर्म सर्व बाजीरावजीचा आहे. परंतु गंगापुत्र व येथील अवंरद (?) याजपासी म्हणत नाहीत. परंतु ते म्हणतेत. याकरिता पादशाही लिहिले अले तरी स्वामीचे नाव प्रशस्तपणे होईल. याचा उपाये जो होईल तो करणे.................... ब्राम्हणाली म्हणजे गंगेमध्ये आहे. लांबी गज पनाससाठी आहे. ते त्यामध्ये निमस्थल पाण्यामध्ये धसले आहे. ते बाधावे तरी लक्ष रुपशे गंगेमध्ये टाकून द्यावे तेव्हा पनास पाउणसे गज पातालाहून बांधोन काढावे. ते आपणा योग्य नवे.''

अकरा ब्रह्मपुरींविषयी ते लिहितात की नागेश मंदिर आणि यज्ञेश्वर(आग्नेश्वर) घाटा मधील जमीन त्याच्या ताब्यात आली असून बाकी जमीन मिळाल्यावर त्याजागी अकरा ब्रह्मपुरी आणि मठ बनतील. या सर्वांचा खर्च एक लक्ष रुपये होईल असे सांगतात. मनकर्णिका घाट बनून पाच वर्षे होऊन गेली आहेत आणि जेव्हा जेव्हा कार्तिकी पौर्णिमेला घाटावर दिवे लागतात तेव्हा घाटाचे सौंदर्य वर्णन करताना ते घाटाला 'श्रीकैलासा'ची उपमा देतात. हे पत्र जर सन १७३५ च्या दरम्यानचे असेल तर मनकर्णिका घाट सन १७३० च्या दरम्यानच बनला असावा. हा घाट बांधताना पैसा तर बाजीरावांचाच लागला आणि महाराष्ट्रातून येणारे यात्रेकरूही असेच मानतात. परंतु गंगापुत्र आणि अवरंद(?) असे मानावयास तयार नाहीत. हे भांडण दूर करण्याकरीता पेशव्यांनी आपले वजन खर्च करून बादशहाकडून एक पत्र घ्यावे असेही सुचवितात. मणिकर्णिका ते ब्रह्मनाल असा रस्ता त्याकाळी नव्हता. सन १७३५ च्या दरम्यान त्या ठिकाणी पन्नास-साठ गज लांबाची ब्रह्मनाली होती. या ब्रह्मनालीमध्ये भराव टाकून पन्नास पाऊणशे गज नदी पातळीपासून जमीनीपर्यंत वर बांधण्यासाठी लक्ष रूपये खर्च करू नयेत असेही मत ते नोंदवितात.

वरील पत्रातूनच कळते की पेशव्यांचे गुरु नारायण दीक्षित पाटणकर हे सन १७३५ च्या दरम्यान काशीत येऊन स्थायिक झाले. आपल्या जवळच्या द्रव्याच्या सहाय्याने त्यांनी अनेक गोष्टी काशीत केल्या. ब्रह्मेश्वर मंदिरापाशी नावाडयांची छोटीशी वस्ती होती, पण त्यावर घाट नव्हता. त्या जागी नारायणभट्ट दीक्षितांनी महाराष्ट्र ब्राह्मणांच्या घरांसाठी जागा खरेदी केली व ब्रह्माघाट आणि दुर्गाघाट बांधले आणि आपल्यासाठी घर बांधले. आजही त्या ठिकाणच्या वस्तीला 'नारायण दीक्षित की गली' असे म्हणतात. आसपासची काहार (नावाडी) वस्तीची जागा विकत घेऊन त्या ठिकाणी महाराष्ट्रीय ब्राह्मणांस घरे बांधण्यास फुकट जागा व द्रव्याची मदत केली. त्यांचे बरोबर जी कोकणस्थ मंडळी काशीस आली होती, त्यापैकी ज्यांची घरे बांधण्याची इच्छा होती, त्यासही जागा दिल्या. बोडस, चितळे, पाटणकर, वझे वगैरे मंडळीचे वाडे हल्ली त्या ठिकाणी आहेत. ह्याच ठिकाणी पुढे प्रतिनिधी, सांगलीकर, रामदुर्गकर, नाना फडणीस वगैरे मोठमोठ्या दक्षिणी सरदारांचे वाडे झाले व ते हल्लीही कायम आहेत (दीक्षित १९२५: २८-३०).

वाराणसीतील स्थापत्यामधील मराठ्यांचा सहभागाचे पुरावे सोळाव्या शतकापासून मिळतात. काशीतील विश्वेश्वराचे मंदिर इ.स. १५८५ मध्ये बांधले गेले ते महाराष्ट्रीय ब्राह्मण असलेले नारायण भट्टांच्या प्रेरणेने. परंतु याला पैसा लागला होता तो मोगल मनसबदार राजा तोडरमलचा. यानंतरचा वाराणसीतील स्थापत्यात मराठ्यांचा सहभाग दिसतो तो म्हणजे वर उल्लेखित पहिल्या बाजीरावांचा. या स्थापत्यात मात्र प्रेरणा आणि पैसा ह्या दोन्ही गोष्टी मराठ्यांच्याच होत्या. पेशव्यांचे वाराणसीतील कारभारी सदाशिव नाईक जोशी आणि पेशव्यांचे गुरू नारायण दीक्षित पाटणकर या दोघांच्या साह्याने पेशव्यांनी वाराणसीमध्ये घाट, ब्रह्मपुऱ्या, अन्नछत्रे बांधली. नंतरच्या काळात छत्रपतींचे मंत्री पेशवे, प्रतिनिधी, सचिव, नागपूरकर भोसले तसेच पेशव्यांचे सरदार शिंदे, होळकर, गायकवाड, विंचूरकर, पटवर्धन, नरगुंदकर भावे, नाना फडणीस, रास्ते, हिंगणे यांनी घाट, वाडे, ब्रह्मपुऱ्या आणि मंदिरे बांधल्याचे पुरावे मिळण्यास सुरवात होते. शिंद्यांचे अधिकारी राजवाडे, पोतनीस, जठार, आंग्रे तसेच नागपूरकर भोसले यांचे अधिकारी श्रीधर मुन्शी आणि बेनिराम आणि विश्वंभर पंडीत यांनीही वाराणसीत घाट, वाडे, मंदिरे बांधलेली दिसतात. याशिवाय शिक्षणासाठी वाराणसीत गेलेल्या मराठी ब्राह्मण मंडळींनीही तिथे वाडे व मंदिरे बांधल्याचे आढळून येते.

वर्णनाच्या सोयीसाठी सुरवातीला गंगातीरावरील 'घाट स्थापत्याचे वर्णन केले आहे. घाटावरील वाडे, मंदिरे, अन्नछत्रे, शिलालेख हे त्या घाटाचेच अविभाज्य अंग असल्याने विषयाच्या सलगतेसाठी त्यांचीही माहिती 'घाट' स्थापत्या बरोबर एकत्रितपणे दिली आहे. एखादा स्थापत्य प्रकार वेगळा काढून अभ्यासला तर त्यात ऐतिहासिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्या त्रुटी राहण्याची शक्यता आहे. ही वेगवेगळ्या प्रकारची स्थापत्ये असली तरी त्यांचा एकमेकांशी संबंध आहे. घाट सोडून वाराणसीत इतरत्र जी मंदिरे व


वाडे असतील त्यांची माहिती वेगळी दिली आहे. घाट, मंदिरे, अन्नछत्र व ब्रह्मपुरी यांच्या एकत्रित अभ्यासानेच वाराणसीतील मराठा स्थापत्य आश्रयाची व्याप्ती समजून घेता येता शक्य आहे.

वाराणसीमधील मराठा निर्मित गंगाकिनाऱ्यावरील ''घाट'' स्थापत्य (आकृती क्र.५)

''घाट'' या स्थापत्य आश्रयाला गती मिळते ती अठराव्या शतकातील पेशव्यांमुळे. वर उल्लेख केल्याप्रमाणे सन १७३० च्या दरम्यान मणिकर्णिका, दशाश्वमेध, पंचगंगा, दुर्गाघाट व ब्रह्माघाट बांधल्याचे पुरावे ऐतिहासिक कागदपत्रातून मिळण्यास सुरवात होते. सन १८३२ पर्यंत जवळजवळ वाराणसीतील बहुतेक घाट तयार झालेले दिसतात. १८६४ दरम्यान ग्वाल्हेरचे महाराजा जियाजीराव शिंदे निर्मित 'गंगामहल' घाटाची निर्मिती झाल्यानंतर गंगाकिनाऱ्यावर नवे घाट फारसे बांधलेले दिसत नाहीत. त्यामुळे सन १७३० ते सन १८६४ अशी जवळजवळ १३४ वर्षे गंगा किनाऱ्यावर मराठा निर्मित 'घाट स्थापत्याची'' निर्मिती होताना दिसते. आत्ता गंगाकिनाऱ्यावर जे घाट दिसतात त्यांची निर्मिती या कालादरम्यान झालेली आहे. मग प्रश्न पडतो की याआधी वाराणसीचा गंगा किनारा कसा असावा? या आधीही गंगा किनाऱ्यावर घाट असल्याचे संदर्भ मिळतात. मणिकर्णिका घाटाचा उल्लेख सातव्या शतकापासून मिळतो. गंगा स्नान आणि गंगेवरील विविध घाटांचे महत्त्व गाहडवाल कालापासून सुरू झालेले दिसते. त्यावेळी आदिकेशव घट्ट, वेदेश्वर घट्ट, कोटितीर्थ, त्रिलोचन घट्ट व स्वप्नेश्वर घट्ट हे घाट प्रसिद्ध असल्याचे दिसतात. अकबराच्या काळात (१५८३-९१) राल्फ फिच हा इंग्रज प्रवासी वाराणसीला आला होता. त्याने घाटांवरील धार्मिक विधींचे वर्णन केले आहे. त्यानुसार 'घाटीये कच्च्यामातीच्या चबुतऱ्यांवर बसून येणाऱ्या यात्रेकरूंकडून धार्मिक विधी पार पाडत होते.' राल्फ फिचने या घाटांची नावे दिली नाहीत (मोतीचंद्र १९६२: २१२). हे घाट व त्याला लागून असलेलेल्या मुहल्ल्यांची नांवे दिसून येतात ती वरदराज कृत (१६००-१६६०) गीवार्णपदमंजरी व ढुंढीराजकृत (१७०२-१७०४) गीर्वाणवाङ्मंजरी या ग्रंथातून. त्यात राजघट्ट, ब्रह्मघट्ट, दुर्गाघट्ट, बिंदुमाधव घट्ट, मंगलागौरी घट्ट, राम घट्ट, त्रिलोचन घट्ट, दशाश्वमेध घट्ट, केदार घट्ट आणि मानसरोवर घट्ट या घाटांचा उल्लेख आहे (मोतीचंद्र १९६२: २१४). परंतु राल्फ फिच या इंग्रज प्रवाशाच्या नोंदीनुसार हे घाट कच्च्या मातीचे होते. राजपूत आणि मराठ्यांनी या जुन्या घाटांच्या जागेवरच पक्क्या स्वरूपात दगडी घाट बांधलेले आहेत. मध्यंतरीच्या काळात गंगेच्या पुरामुळे हे घाट उद्‌भस्त झाले. त्यांच्या डागडुजीकडे दुर्लक्ष झाले. तरीही याही परिस्थितीत ते घाट आपले अस्तित्व टिकवून आहेत. गंगेवरील ८० घाटांपैकी १८ पेक्षा जास्त घाट मराठ्यांनीच बांधले आहेत. त्यामुळेच आजमितीस अस्तित्वात असणाऱ्या गंगा किनाऱ्यावरील घाट निर्मितीचे श्रेय बहुतांशपणे मराठ्यांना दिले जाते.

तालीका : मराठी लोकांनी वाराणसीत गंगा नदीवर बांधलेले घाट

मणिकर्णिका घाट	सन १७३० - सदाशिव नाईक जोशी यांच्या पत्रानुसार हा घाट पहिल्या बाजीरावांनी बांधला. सन १७९१ मध्ये या घाटाचे नूतनीकरण अहिल्याबाई होळकर यांनी केले.
दशाश्वमेध घाट	सन १७३० - सदाशिव नाईक जोशी यांच्या पत्रानुसार हा घाट पहिल्या बाजीरावांनी बांधला.
पंचगंगा घाट/बिंदुमाधव घाट	श्रीपतराव प्रतिनिधी यांनी हा घाट १७३० च्या दरम्यान बांधला.
दुर्गाघाट आणि ब्रह्माघाट	नारायण दीक्षित पाटणकर यांनी हे दोन्ही घाट १७३५ ते १७४८ च्या दरम्यान बांधले.
बालाजी घाट	थोरल्या माधवरावांच्या काळात रघुनाथराव पेशवे यांनी बांधला
अहिल्याबाई होळकर घाट	दशाश्वमेध घाटाशेजारील जागा विकत घेऊन सन १७९१ मध्ये हा घाट अहिल्याबाई होळकर यांनी बांधला.
भोसला घाट	नागपूरकर भोसले यांनी हा घाट सन १७९५ मध्ये बांधला.
गणेश घाट	अमृतराव पेशवे यांनी हा घाट सन १८०७ मध्ये बांधला.
राजा घाट उर्फ अमृतराव घाट	अमृतराव पेशवे यांनी हा घाट सन १८०७ मध्ये बांधला.
मुन्शी घाट	नागपूरकर भोसल्यांचे मंत्री श्रीधर मुन्शी यांनी हा घाट १८१२ ते १८२४ च्या दरम्यान बांधला.
संकठा घाट	गहिनाबाई गायकवाड यांनी बांधला
सिंधीया घाट	बायजाबाई शिंदे यांनी १८२७ मध्ये बांधला.
बाजीराव घाट	मणिकर्णिका घाटाशेजारी हा घाट दुसरा बाजीराव यांनी १८३० च्या दरम्यान बांधला.
ग्वालीयर घाट	ग्वाल्हेरचे महाराज दौलतराव शिंदे यांनी सन १८२८-२९ मध्ये हा घाट बांधला.
जठार घाट	एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ग्वाल्हेरचे महाराज जयाजीराव शिंदे यांचे दिवाण बालाजी चिमणाजी जठार यांनी हा घाट बांधला.
गंगामहल घाट	ग्वाल्हेरचे महाराज जयाजीराव शिंदे यांनी हा घाट सन १८६४ मध्ये बांधला.
त्रिलोचन घाट	नारायण दीक्षित पाटणकर यांनी बांधला.
बाळाबाई घाट	एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला बाळाबाई नावाच्या मराठी स्त्रीने हा घाट बांधला.



आकृती क्र.५: वाराणसीतील गंगातीरावरील घाटांचा नकाशा
राणा पी.बी.सिंग आणि प्रवीण एस.सिंग यांच्या पुस्तकातून साभार

मनकर्णिका घाट/मणिकर्णिका घाट (चित्र १ आणि चित्र २)

मणिकर्णिका तीर्थाचा उल्लेख पाचव्या शतकापासून मिळतो. गाहडवाल काळात म्हणजेच बाराव्या शतकात भट्ट लक्ष्मीधर रचित 'तीर्थ विवेचन' ग्रंथात मणिकर्णिका कुंडाचा उल्लेख आलेला आहे. त्यामध्ये वर्णन केल्यानुसार वाराणसीत यात्रेकरूंनी आल्यानंतर त्यांनी कोठेकोठे स्नान करणे गरजेचे आहे हे सांगितले आहे. त्यात गंगेमध्ये स्नान आणि मणिकर्णिका तीर्थातील स्नान अशा दोन वेगवेगळ्या नोंदी आहेत (मोतीचंद्र १९६२: १७१). त्यानंतर सतराव्या शतकात वरदराजकृत 'गीर्वाणपदमंजिरी' आणि अठराव्या शतकातील ढुंढीराजकृत 'गीर्वाणवाङ्मंजिरी' मध्ये मणिकर्णिकेचा उल्लेख आहे. या दोन्ही ग्रंथातील मुख्य पात्र जो ब्राह्मण जेव्हा आपल्या पत्नीला 'मणिकर्णिकेवर स्नानाला जातो' असे म्हणतो तेव्हा मणिकर्णिका तीर्थच अपेक्षित आहे. गीर्वाणपदमंजिरीमध्ये वाराणसीतील (सन १६०० ते १६५०) घाटांचे उल्लेख आलेले आहेत (मोतीचंद्र १९६२: २३३-२३५). परंतु त्यात मणिकर्णिका घाटाचा उल्लेख नाही. मणिकर्णिका घाटाशेजारील वीरेश्वर घाटाचा उल्लेख आहे (एकोणिसाव्या शतकापर्यंत वीरेश्वर घाट होता. आता त्याचे अस्तित्व शिल्लक राहिले नाही).

अठराव्या शतकापर्यंत मणिकर्णिका कुंडाबरोबरच मर्णिकर्णिकेचा घाटही असावा. पण तो कच्च्या स्वरूपात असावा. या कच्च्या घाटाला पक्का करण्याचे श्रेय जाते ते मराठा मंडळातील एक बाजीराव पेशवे (सन १७३०) आणि दोन अहिल्याबाई होळकर (सन १७९१) यांना. वर लिहिल्याप्रमाणे पेशव्यांचे कारभारी सदाशिव नाईक जोशी यांनी पेशव्यांच्या आज्ञेने मणिकर्णिका घाट सन १७३० मध्ये बांधल्याचे लिहिले आहे (पेद ३०,पत्र १३१, पृ.१०१). त्यावेळी मणिकर्णिका घाट आणि वीरेश्वर घाटाच्या पूर्वेकडे नागेश घाट बांधण्याचा त्यांचा मानस होता. परंतु नंतर तो मानस त्यांनी सोडून दिल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. मणिकर्णिका घाटांचे धार्मिक दृष्टीने असलेले महत्त्व मराठे समजून होते. घाट बांधल्यानंतर तीर्थयात्री तेथे स्नान करतात असेही सदाशिव नाईक लिहितात. कार्तिकी पौर्णिमेस या घाटावर जेव्हा दीप लागतात त्यावेळी श्रीकैलास सारखे वातावरण तयार होते. ते बघून यात्रेकरू बाजीरावांस धन्यवाद देतात अशीही पुस्ती ते जोडतात. (पेद १८, पत्र ३६,पृ.२०). याच घाटाचा दुसरा टप्पा येतो तो अहिल्याबाई होळकरांच्या काळात. सन १७३० मध्ये बाजीराव पेशवे यांनी बांधलेला मणिकर्णिका घाट हा पन्नास वर्षामध्ये डागडुजीअभावी मोडकळीस आला असावा. म्हणून सन १७८५ मध्ये अहिल्याबाई होळकर यांनी हा घाटाचे नूतनीकरण केले. अहिल्याबाई होळकर यांचा काशी येथील कारभारी बाळाजी लक्ष्मण यांनी अहिल्याबाईंना लिहिलेल्या पत्रात श्रीमनकर्णिकेच्या घाटाचे आणि त्यावरील तारकेश्वर मंदिरांचे काम चालू (नूतनीकरण) असल्याचे लिहिले आहे (ठाकूर, १९४४, पत्र क्र.१६८, पृ.२६२). काशी पुराणात उल्लेख असलेल्या

मनकर्णिका घाटाचे काम आपल्याकडून झाले, ती पुण्यांची गोष्ट आहे असेही ते प्रतिपादन करतात. मनकर्णिकेच्या घाटावर एक चौघडा व घड्याळ असल्यास उत्तम होईल असेही ते लिहितात. अहिल्याबाईं तर्फे या घाटावर तारकेश्वर व रत्नेश्वर अशी दोन मंदिरे बांधली गेली (मंदिर स्थापत्यात यांची वेगळी चर्चा केली आहे.).

घाट बांधण्यासाठी जी आर्थिक तरतूद लागत असे त्यासाठी अहिल्याबाई वेळोवेळी काशीच्या कारभाऱ्यांकडे पैसे पाठवीत असत. अशा तऱ्हेची बातमी नाना फडणवीसांचा महेश्वर दरबारातील वकील केसो भिकाजी याने नाना फडणवीसांस कळविली आहे. ३१ ऑक्टोबर १७८५ रोजी लिहिलेल्या पत्रात त्याने अहिल्याबाईंचे खाजगीकडील कारभारी गोविंद रघुनाथ गानू हे मनकर्णिका घाटाच्या कामासाठी पंचवीस हजाराच्या हुंड्या घेऊन गेल्याचे लिहितो. सन १७८५ पर्यंत दशाश्वमेध घाटाशेजारील अहिल्याघाट व गया येथील विष्णुपदाचे देऊळ तयार झालेले होते असेही या पत्रातून कळते. अहिल्याबाईंनी त्याची वास्तू(शांत) करण्यासाठी आपले खाजगीकडील कारभारी गोविंद रघुनाथ गानू यांना पाठवत आहे असेही वरील पत्रात नमूद आहे. मणिकर्णिकेच्या बांधकाम संबंधी अहिल्याबाईंची ही दोन पत्रे ही सन १७८५ मधील आहेत (पारसनीस, १९११, पत्र क्र.१०६, पृ.८६-८७).


मणिकर्णिका घाटाचे बांधकाम पूर्ण होण्यास सन १७९१ साल उजाडले. जवळजवळ सहा वर्षे हे काम चाललेले दिसते. २८ मार्च १७९१ रोजी मि. स्टुअर्ट याला लिहिलेल्या पत्रात अहिल्याबाई म्हणतात की त्यांनी मनकर्णिका घाट व त्यावरील मंदिर बांधलेले आहे. त्यांची वास्तुशांत/प्रतिष्ठापना वैशाख महिन्यात करण्याचे ठरविले आहे. हा समारंभ सुरळीतपणे पार पडेल आणि गंगापुत्र या प्रसंगी कोणतीही विघ्ने आणणार नाहीत हे पाहण्यासाठी वाराणसी/बनारसचा रेसिडेंट मि. डंकन आणि मॅजिस्टेट अली इब्राहीम खान यांना या समारंभासाठी उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात यावेत अशीही विनंती अहिल्याबाईंनी मि. स्टुअर्ट यांना केलेली दिसते (CPC-9, L.No.1054, pp.231). २३ एप्रिल १७९१ रोजी मि. स्टुअर्ट यांनी अहिल्याबाईंना पत्र लिहून कळविले आहे की, ''हा समारंभ सुरळीतपणे होण्यासाठी आणि गंगापुत्रांनी यामध्ये विघ्ने आणू नयेत यासाठी आपल्या विनंती नुसार मि. डंकन आणि अली इब्राहीम खान यांना उपस्थित राहण्याचे निर्देश दिलेले आहेत'' (CPC-9, L.No.1158, pp.249). गंगापुत्रांचा त्रास पहिल्या बाजीरावांस सुद्धा होता. मनकर्णिकेचा घाट बाजीराव यांनी बांधला. महाराष्ट्रातून येणारे सर्व यात्रेकरू असेच म्हणत असत. परंतु गंगापुत्र मात्र असे म्हणत नाहीत. त्यांनी असे म्हणावे यासाठी पेशव्यांनी आपले वजन खर्ची घालून दिल्लीच्या बादशहाकडून तसे पत्र आणावे असे पेशव्यांचा कारभारी सदाशिव नाईक जोशी पहिल्या बाजीरावांस लिहितात (पेद १८, पत्र ३६, पृ.२०).

काळाच्या ओघात मणिकर्णिका घाटाच्या उपयोगातही बदल घडून आलेले दिसतात. वाराणसीमधील अंत्यसंस्काराची जागा म्हणून मणिकर्णिका घाट प्रसिद्ध आहे. स्नान विधीची जागा ते अंत्यसंस्कार विधी करण्याची जागा असा बदल मणिकर्णिका घाटाच्या बाबत दिसून येतो. विधीतील पवित्रता ते विधीतील अस्वच्छता अशा दोन परस्परविरोधी गोष्टी यामध्ये दिसून येतात. सध्या ब्रिटीश लायब्ररीमध्ये 'पृथ्वीचा गोल' म्हणून एक नकाशा आहे. एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळातील या मराठा नकाशात पृथ्वीचा मध्य म्हणून चक्र मणिकर्णिका घाट दाखविला आहे. मुख्य म्हणजे काशीपेक्षा मणिकर्णिका घाटावर अधिक लक्ष केंद्रीत केलेले आहे (Desai 2017: 129). काशीखंड आणि त्रिस्थळीसेतू या दोनही ग्रंथात मणिकर्णिका घाटावर स्नान विधी करावेत असे सांगितले आहे. स्नान विधी करण्याची जागा ते अंत्यसंस्कार करण्याची काशीतील प्रमुख जागा म्हणून मणिकर्णिका घाटाची महती होण्यास कारण घडली ती व्यक्ती सुद्धा मराठीच होती. पेशव्यांचे धार्मिक गुरू नारायण दीक्षित पाटणकर यांनी मणिकर्णिका घाटावर स्मशानभूमीची स्थापना केली आणि डोंबाचा कर ही नीट ठरवून दिला असे त्यांच्या वंशजांचे म्हणणे आहे (दीक्षित १९२५: ४८-४९).


तारकेश्वर मंदिर, मणिकर्णिका घाट शिलालेख

मणिकर्णिका घाटावरील तारकेश्वर मंदिरावरील शिलालेख असा आहे (Burway 1922: 197).


श्रीमद्धोलकरोपाख्य: ख्यातो राजन्यदर्पहा ।
मल्लारिरावनामाभूत् खण्डेरावस्तु तत्सुत: ।।१।।
विलासीगुणिकल्पद्रु:शूरो वीरोऽभिशासित: ।
तत्पत्नी पुण्यचरिता कुलद्वयविभूषिता ।।२।।
अहिल्याख्यातया काश्यां त्रिषु लोकेषु कीर्तये ।
बद्धो घट्ट:सुसोपानो मणिकर्ण्या: सुविस्तृत: ।।३।।
तत्पार्श्वयोर्विधायेमौ प्रासादा वुन्नतौ प्र(पृ)थक् ।
तयो:पश्चिमदिक्संस्थे स्थापितौ गौतमेश्वरौ ।।४।।
प्राक्संस्थे तारकेशांक अहिल्योद्धारकेश्वर: ।
स्थापितो वसुदेवेभविद्यत्सम्मितवैक्रमे ।।५।।
रामेन्दूदधिभूयुक्ते (१७१३) शालिवाहनजे शके ।
राधशुक्ल द्वितीयाया गुरौ दुन्दुभिवत्सरे ।।६।।
घट्टोत्सर्ग: सुसंपन्नौ यजमानाभ्यनुज्ञया ।
स्वामिकार्य हितैकेच्छु र्जीयाजीरामहस्तत: ।।७।।
संवत् १८४८ वैशाख शुद्ध २ गुरुवार ।



चित्र १: मणिकर्णिका घाट



चित्र २: तारकेश्वर मंदिर आणि रत्नेश्वर मंदिर – मणिकर्णिका घाट



चित्र ३: दशाश्वमेध घाट




चित्र ४: धरहरा मशीद, पंचगंगा घाट

अर्थ:- क्षात्र (राजे) लोकांचा गर्व हरण कर होळकर आडनाव असलेला मल्हारिराव (मल्हारराव) नामे होऊन गेला. याचा पुत्र खंडेराव हा शूर, वीर, प्रसंशित, गुणवंतांचा कल्पवृक्ष आणि सुखसंपन्न असा (झाला), उभयकुलांना भूषण असलेली पुण्यचरित्र अशी अहिल्या नावाची त्याची पत्नी (आहे). तिने त्रिलोकात कीर्ती व्हावी म्हणून काशीमध्ये चांगल्या (सुंदर) पायऱ्याचा विस्तीर्ण असा मणिकर्णिकेचा घाट बांधला ।।१-३।। त्याचे बाजूस उत्तुंग अशी दोन स्वतंत्र मंदिरे बांधली. त्यांच्या पश्चिमेकडे गौतमेश्वराची (दोन?) स्थापना केली ।।४।। त्याचे पूर्वेस तारकेश्वराचे बाजूस अहिल्योद्धारकाचे (रामचे) मंदिर विक्रम संवत १८४८ मध्ये बांधले ।।५।। शालिवाहन शक १७१३ दुंदुभि संवत्सरातील ......शुक्ल द्वितीया गुरुवार या दिवशी स्वामिकार्य हितेच्छु अशा जियाजीराम(राव) च्या हस्ते घाटाचे उत्सर्जन (समर्पण) केले ।।६,७।। संवत् १८४८ वैशाख शुद्ध २ गुरुवार.


दशाश्वमेध घाट (चित्र ३)

धार्मिक व सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दृष्टीने हा वाराणसीतील सर्वाधिक प्रसिद्ध घाट आहे. ब्रह्माद्वारा दहा अश्वमेध यज्ञ केल्यानंतर याला 'दशाश्वमेध घाट ' म्हणून नाव पडले असावे असे परंपरा सांगते. या बाबतीत दुसरीही एक कथा सांगितली जाते की भारशिव राजांनी कुषाणांवर विजय मिळविल्यानंतर आपला आराध्य देव शिवाची नगरी काशी येथील गंगातटावर जिथे दहा अश्रमेध यज्ञ केले, ती जागा 'दशाश्वमेध घाट' म्हणून ओळखली जाऊ लागली. गाहडवाल काळात म्हणजेच बाराव्या शतकात भट्ट लक्ष्मीधर रचित 'तीर्थ विवेचन' या ग्रंथात दशाश्वमेध तीर्थाचा आणि मंदिराचा उल्लेख आलेला आहे (मोतीचंद्र १९६२: १७१). सतराव्या शतकातील वरदराजकृत 'गीर्वाणपदमंजिरी' ग्रंथात दशाश्वमेध घाटाचा उल्लेख आला आहे (मोतीचंद्र १९६२: २१४).

सुरवातीच्या काळात हा घाट कच्चा असण्याची शक्यता आहे. या घाटाला पहिल्यांदा पक्का करण्याचे काम बाजीराव पेशव्यांनी केले. पेशव्यांचा कारभारी सदाशिव नाईक जोशी यांनी २९-६-१७३५ रोजी लिहिलेल्या पत्रात दशाश्वमेध घाट बांधला असल्याचे लिहिले आहे. घाटाच्या माथ्यावरील हवेली जीर्ण झाली होती ती नवी बांधून ते स्थळ श्रीअद्वैतानंद स्वामीस राहण्यासाठी दिले. त्यासाठी रूपये ४४०० खर्च झाल्याचे ते नमूद करतात. घाटावरील उरलेल्या जागेत दहा संन्यास्यांना राहण्यास बांधकाम करण्याचा त्यांचा मानसही होता. त्याकरता दोन अडीच हजाराची तरतूद करावी लागेल असा अंदाजही ते वर्तवतात (पेद ४३, पत्र २, पृ.१). सन १७३५ च्या सुमारास हा घाट फार विस्तीर्ण होता. कालांतराने या घाटाचे तुकडे पडून त्यातून राजेंद्रप्रसाद घाट, अहिल्याबाई घाट, शीतला घाट व मुन्शी घाट तयार झाले. मानमंदिर



चित्र ३: दशाश्वमेध घाट



चित्र ४: धरहरा मशीद, पंचगंगा घाट

१७६

घाटाची निर्मिती ही दशाश्वमेध घाटातूनच झालेली आहे, पण ही निर्मिती मात्र सन १७३५ च्या अगोदरची आहे.

पंचगंगा घाट (बिंदुमाधव घाट) (चित्र ४ ते ८)

गंगा, धुतपापा, जीर्णनंदा, किरणा और सरस्वती या पाच नद्या गंगेला या ठिकाणी मिळतात अशी हिंदूची श्रद्धा आहे म्हणून या भागाला पंचगंगा घाट म्हणतात. त्यामुळे वाराणसीमधील हे मुख्य तीर्थ म्हणून गणले जाते. मोतीचंद्र हा घाट बनविण्याचे श्रेय राजा मानसिंगाला देतात. सन १६४२ मध्ये मिर्झाराजे जयसिंह यांनी या मंदिराला भेट दिली होती. तशा आशयाला शिलालेखही तिथे होता. त्यांनी या घाटाच्या शेजारी राजपूत राजपुत्रांच्यासाठी पाठशाला बांधली, ती इमारत आज 'कंगन की हवेली' म्हणून ओळखली जाते. गीर्वाणपदमंजिरीमध्ये (सन १६५०) या घाटाचा उल्लेख 'बिंदुमाधव घाट' म्हणून आला आहे. फ्रेंच प्रवासी टाव्हेरनी सन १६६५ मध्ये वाराणसीला आला असताना त्याने या मंदिराला भेट दिली होती. त्याच्यानुसार विंदुमाधव मंदिर पंचगंगा घाटापासून रामघाटापर्यंत पसरलेले होते (मोतीचंद्र १९६२: २२६). इ.स. १६६९ मध्ये औरंगजेबाने जेव्हा विश्वनाथ मंदिर पाडले, त्यावेळी बिंदुमाधव मंदिरही पाडले गेले आणि त्या जागी मशीद बांधली गेली. हा घाट मराठी परिप्रेक्षामध्ये येतो तो साधारणपणे सन १७३५ च्या दरम्यान. 'पंचगंगेचा घाट श्रीपतराऊ यांनी बांधला' अशा तऱ्हेचा उल्लेख पेशव्यांचा कारभारी सदाशिव नाईक जोशी आपल्या ८-८-१७३५ च्या पत्रात करतात (पेद ३०, पत्र १३१, पृ.१०१). खूप इतिहासकारांनी हा श्रीपतराऊ हा मराठी मनुष्य आहे अशी अटकळ बांधलेली आहे (मोतीचंद्र १९६२: २९६). परंतु या श्रीपतराऊचा उल्लेख असलेला शिलालेखच या घाटावर होता. साताऱ्याजवळील औंधच्या पंतप्रतिनिधी घराण्यातील श्रीनिवासराव ऊर्फ श्रीपतराव प्रतिनिधींच्या पत्नी राधाबाई यांनी विक्रमसंवत १७९२ मध्ये (इ.स. १७३५-३६) मध्ये हा घाट बांधल्याचा उल्लेख त्यात आला आहे (भागवत १९२९: २९९). शिलालेख संस्कृत भाषेत असून तो पुढील प्रमाणे आहे.


शिलालेख एक : पंचगंगा घाट/बिंदुमाधव घाट निर्मितीचा शिलालेख

श्री गणेशाय नम: स्वस्तिश्री विक्रमार्क द्विनवनग
धरा संमिते १७९२ क्रोधनाब्दे मासिषे शुक्ले दिक्
तिथी हरि भयुते जान्हवी विश्वशतुष्ट्यै श्रीशाहो:
श्रीनिवास: प्रतिनिधि पदग: परशुरामात्मज स्तज्जाया
राधा कृतोयं जयति नृहरि दंष्ट्राख्य घट्ट सुबद्ध:

अर्थ: विक्रम संवतातील १७९२ व्या वर्षी (म्हणजे शके १६५७ राक्षसनाम संवत्सरात) क्रोधननाम संवत्सरात श्री शाहू महाराजांचे प्रतिनिधी श्रीनिवासराव (ऊर्फ श्रीपतराव) परशुराम (जे परशुरामपंतांचे चिरंजीव आहेत) यांची पत्नी राधाबाई यांनी हा घाट बांधला.

साधारणपणे मराठी स्त्रिया या आपल्या पतीनिधनानंतर काशीयात्रेला गेल्याचे उल्लेख मिळतात. पेशव्यांच्या स्त्रिया राधाबाई, काशीबाई, सगुणाबाई, येसूबाई या पतीनिधनानंतरच काशीयात्रेला गेल्या होत्या. पंचगंगा घाट बांधणाऱ्या राधाबाई प्रतिनिधी या घाट बांधण्याच्या वेळी काशीयात्रेला गेल्या असतीलच याबाबत स्पष्टता दिसत नाही. श्रीपतराव प्रतिनिधी आणि त्यांच्या पत्नी राधाबाई हे दोघेही काशीयात्रेला गेले याचे उल्लेख मिळत नाहीत. राधाबाईंनी आपले पती श्रीपतराव यांच्या बरोबर सहगमन केले असल्यामुळे पतीनिधनानंतर त्या काशीयात्रेला गेल्या असतील हे ही संभवत नाही. राधाबाईंचे सतीचे वृंदावन संगम माहुली येथील कृष्णा नदीच्या काठावर आहे. याच श्रीपतराव पंतप्रतिनिधींनी संगम माहुली येथील काशीविश्वेश्वराचे मंदिर बांधलेले आहे. बाजीराव पेशवे यांनी काशीला न जाताच आपले कारभारी सदाशिव नाईक जोशी यांच्या मार्फत दशाश्वमेध आणि मनकर्णिका घाट बांधले व ते घाट बांधल्याचे श्रेयही लोक त्यांनाच देतात. नंतरच्या काळात अहिल्याबाई होळकर यांनी वाराणसीत अनेक मंदिरे, घाट, अन्नछत्रे उभारली. परंतु ही सर्व कामे त्यांनी आपल्या वाराणसीतील कारभाऱ्यामार्फतच केली. तद्वतच राधाबाई प्रतिनिधी यांनी सुद्धा हा घाट आपल्या कारभाऱ्यातर्फेच बांधला असावा. राधाबाई प्रतिनिधींनी घाट बांधला असा स्पष्ट उल्लेखच शिलालेखात आहे. परंतु लोकमानसात तसेच सदाशिव नाईक जोशींच्या पत्रानुसार घाट बांधण्याचे श्रेय दिले गेले आहे राधाबाईंचे पती श्रीपतराव यांना. म्हणजेच त्यावेळी समाजमनामध्ये असणारी पुरूषप्रधान संस्कृती आणि श्रीपतरावाचे राज्यकर्ता असणे हे दोनही मुद्दे इथे महत्वाचे ठरतात. याउलट अहिल्याबाई होळकर जेव्हा घाट बांधतात त्यावेळी तो घाट मात्र त्यांच्याच नावाने ओळखला जातो. इथे मात्र स्त्री असूनही अहिल्याबाईंचे राज्यकर्ती असणे हे लक्षण पुरूषप्रधान संस्कृतीवर मात करते.

याच पंचगंगा घाटावर मंदिरे बांधल्याचे आणखी दोन शिलालेख प्रसिद्ध असून तेही प्रतिनिधी घराण्याशी संबंधीत आहेत. छत्रपती भोसले घराण्याच्या सातारा आणि कोल्हापूर या दोन गाद्या तयार झाल्या. त्यामुळे छत्रपतींचे सेवक घराणे असणाऱ्या प्रतिनिधी घराण्यातही दोन शाखा तयार झाल्या. औधकर पंतप्रतिनिधी आणि विशाळगडकर पंतप्रतिनिधी म्हणून त्या अनुक्रमे सातारा आणि कोल्हापूर येथे कार्यरत झाल्या. हे सर्व सविस्तर विवेचन करण्याचे कारण की पंचगंगा घाटावरील पुढील दोन शिलालेख हे प्रतिनिधींच्या दोन शाखांशी संबंधीत आहेत. ते पुढील प्रमाणे आहेत.




चित्र ५: बिंदुमाधव मंदिर, बिंदुमाधव घाट



चित्र ६: पुराण श्रवण करण्यासाठी जमलेल्या मराठी महिला, बिंदुमाधव मंदिर



चित्र ७: बिंदुमाधव



चित्र ८: बिंदुमाधव मंदिर मंडप, बिंदुमाधव घाट

शिलालेख दोन : श्री सत्यभामाकृष्णेश्वर मंदिर शिलालेख

१.	श्री गणेशाय नमः संवत् १७९९ मार्गशीर्ष शुद्ध १२
२.	त्र्यंबकशर्मा पौत्रः श्रीमत्संभाजि राजा प्रतिनिधी
३	परशुरामशर्मा पुत्रः कृष्णशर्मा तत्पत्नी सत्यभामा
४.	नाम्नी तथा नृसिंह दंष्ट्रास्थले बिंदुमाधव सन्निधौ
५.	प्रासादो निर्मितः सत्यभामा कृष्णेश्वरशर्मा नाम्नालिंगं
६.	स्थापितं चौकल्ये इतयुप नामक गोपीनाथ भट्टाख्यः
७.	पौराणीको पि स्थापितः शुभमस्तु

अर्थ : विक्रम संवतातील १७९९ या वर्षी मार्गशीर्ष शुद्ध द्वादशी या दिवशी छत्रपती संभाजी राजे यांचे प्रतिनिधी परशुरामपंत यांचा मुलगा कृष्णराव यांच्या पत्नी सत्यभामाबाई यांनी मंदिर बांधून त्यात आपल्या व आपल्या पतीच्या नावाने श्रीबिंदुमाधव मंदिराजवळ सत्यभामा-कृष्णेश्वर नामक शिवलिंगाची स्थापना केली आणि त्याच्या व्यवस्थेकरिता गोपीनाथभट्ट चौकले यांची नियुक्ती केली (भागवत १९२९: ३००).

विक्रमसंबत १७९९, मार्गशीर्ष शुद्ध १२ म्हणजेच २८ नोव्हेंबर १७४२ असा हा शिलालेखाचा काळ असून शिलालेख संस्कृत भाषेत आहे. यातील छत्रपती संभाजी राजे (दुसरे) हे कोल्हापूर शाखेतील होते. सत्यभामाबाईंनी बिंदुमाधव मंदिराजवळ मंदिर बांधून त्यात शिवलिंगची स्थापना केलेली आहे हे यात नमूद आहे. औरंगजेबाने सन १६६९ मध्येच बिंदुमाधव मंदिर पाडून त्याठिकाणी मशिद उभारली होती आणि या शिलालेखाच्या काळापर्यंत म्हणजेच २८ नोव्हेंबर १७४२ पर्यंत या घाटावर नव्या बिंदुमाधव मंदिराची उभारणी झाली नसल्याचे पुढील शिलालेख क्र. तीन वरून समजते. त्यामुळे 'बिंदुमाधव सन्निधौ प्रासादो निर्मित' याचा अर्थ '(पूर्वी असणाऱ्या) बिंदुमाधव मंदिराजवळ मंदिर बांधले', असा घेणे आवश्यक आहे.

शिलालेख तीन : श्रीवेणीमाधव किंवा बिंदुमाधव मंदिर शिलालेख (चित्र ९)

|| श्री गणेशाय नम: ||


१	संवत् १८१२ शालिवाहन शके१६
२	७७ पार्थिवनाम संवत्सरे माघे मा
३	सि हरि तिथौ सौम्यवासरे श्रीमा
४	न् शाहूनृपस्तत्प्रधानाग्रणी
५	जगजीवन परशुरामस्त प
६	त्नी सुंदरा नाम्नी तया ब्रह्मपु
७	री सहित हरिहरप्रासाद: श्री
८	पंचगंगा तटे निर्मित: हरि
९	हरौ प्रियेतां कार्तिक शुक्ल वैकुं
१०	ठ चतुर्दश्यां हरिहरौ स्थापितौ शुभौ

अर्थ: विक्रम संवत् १८१२ मधील पार्थिवनाम संवत्सरात, शालिवाहनशकाच्या १६७७ व्या वर्षी माघ महिन्यातील महाशिवरात्री दिवशी सोमवारी शाहूराजांचे प्रमुख प्रधान जगजीवन परशुराम यांच्या पत्नी सुंदराबाई यांनी पंचगंगा नदीच्या काठी ब्रह्मपुरी बरोबरच हरिहरप्रासाद (हरिहराचे मंदिर) बांधले. कार्तिक शुद्ध चतुर्दशी या दिवशी हरिहरांची (मूर्तींची) स्थापना केली. हरिहर म्हणजेच बिंदुमाधव आणि जगजीवनेश्वर यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली. दोनही मूर्तींची गर्भगृहे वेगवेगळी असून एकाच छताखाली आहेत. प्रत्यक्षात मात्र 'बिंदुमाधव मंदिर' या नावानेच हे मंदिर ओळखले जाते. सदरचा शिलालेख जगजीवनेश्वराच्या गर्भगृहाच्या भिंतीवर कोरलेला आहे.

शिलालेख संस्कृत भाषेत असून बिंदुमाधव मंदिराची (हरिहर प्रासाद) उभारणी १ मार्च १७५६ या दिवशी तर त्यात मूर्तींची प्रतिष्ठापना ५ नोव्हेंबर १७५६ रोजी झाली. याच सुंदराबाईंनी देहली विनायक मंदिराशेजारी तलाव बांधल्याचा शिलालेख उपलब्ध आहे (भागवत १९२९: २९८). प्रतिनिधी घराण्यातील नंतरच्या काळातील प्रसिद्ध पुरुष श्री भवानराव पंतप्रतिनिधी आपले वडील श्रीनिवासराव यांच्या बरोबर काशीयात्रेला गेले होते. त्यांनी आपल्या आत्मचरित्रातही बिंदुमाधवाचे मंदिर सुंदराबाई यांनी उभारल्याचे लिहिले आहे (पंतप्रतिनिधी १९४६: ३५३).



चित्र ९: बिंदुमाधव मंदिर शिलालेख (शिलालेख क्र.तीन)



चित्र १०: बिंदुमाधव मंदिराच्या मंडपाच्या प्रवेशद्वारावरील शिलालेख (शिलालेख क्र.४)

शिलालेख चार : बिंदुमाधव मंदिराच्या मुख्य मंडपाच्या प्रवेशद्वारावरील शिलालेख

(हा शिलालेख या प्रबंधाद्वारे प्रथमच प्रसिद्ध होत आहे) **(चित्र १०)**

श्रीगणेशायनमः।। अक्षीन्द्रघ(ध)रामिते हरि तिथौ श्रीविक्रममाब्देश्रुगं(गे)गाघरा पार्थीववत्सेर विपुदि ने श्रीपंचगंगातटे।। हा या व्यस्य जगद्युतस्य नुपतेः पंतप्रधाना(मि)(भि) द्य श्रीमज्जीवन शर्मणे हरिहर प्रासा दनाम्नाकृते ।।१।। पतन्या सुंदर यास हैवरूचिरे श्री ब्रह्मपुर्‍यालये विष्णो कुल जात गोद्विजपतिः श्रीपरश रामत्मजः।। शभवक्षीषुनवस्थिरा (१९५३) परिमिते श्री श्रीनिवास प्रभुः।। राधाराधित वंद्य पाद युग लो दिव्य सभामंडपमः।।२।। दृष्ट संकुचित स्थले हरिकथा संकीर्तनाया पर श्रुध्देवैक्रमवत्सरे ऽ सुीगु रोवरिति विस्तीर्णकम मासे कार्तिक संज्ञके शचिदळे(लि) गोपालराया भि(मि)धब्दारा माधव पाद पाद्ययुगले ऽ निर्माय संप्रार्पयत ।।३।। शके १८१८ कार्तिक श्रु।।२ तारीख ६ माहे नवंबर सन १८९६ ।। श्रीबिंदुमाधवार्पणमस्ते।।

बिंदुमाधव मंदिरा समोरील मंडप ६ नोव्हेंबर १८९६ रोजी बांधला गेला हे या शिलालेखातून समजते.

दुर्गाघाट आणि ब्रह्माघाट (चित्र ११ व १२)

वरदराजकृत 'गीर्वाणपदमंजिरी' मध्ये दुर्गाघाट आणि ब्रह्माघाटाचा उल्लेख आला आहे. पंचगंगा घाटाला लागूनच दुर्गाघाट आणि ब्रह्माघाट आहेत. दुर्गाघाटावर असलेल्या ब्रह्मचारिणी दुर्गा मंदिरावरूनच या घाटाला दुर्गाघाट म्हणतात. ब्रह्माघाटावर सुद्धा बह्माचे मंदिर आहे. दोनही घाटांच्या आसपास मराठी लोकांची वस्ती आहे.

या घाटांना पक्का करण्याचे श्रेय जाते पेशव्यांचे धार्मिक गुरू नारायण दीक्षित पाटणकर यांना. नारायण दीक्षित यांचे काशीतील वास्तव्य १७३५ ते १७४८ या दरम्यान होते. याच दरम्यान ब्रह्माघाट आणि दुर्गाघाटाचे काम झाले. त्याच्या मृत्यूनंतरही हा घाट बांधण्याचे काम चालू होते व त्यासाठी पैसाही खर्च झाल्याची पत्रे उपलब्ध आहेत. दीक्षितांकडील एक माणूस बापूजी महादेव सन १७५१ मध्ये या घाटाच्या कामाबद्दल लिहितो (मइसा ३, पत्र ५४६, पृ.४८७) : ''दुर्गाघाटीचे काम, वरिले शिडी पहिलीच तेथपावेतो, फरश जाहाला आहे. दोन दिवस नबाबाचे सैन्याकरिता काम राहिले. चुनाही नव्हता. आता चुना आणिला. बीजेपासून काम पुढे चालीस लावितो. आता सत्वरीच तयारीस येईल.''



चित्र ११: दुर्गा घाट



चित्र १२: ब्रह्मा घाट

याच नारायण दीक्षितांचा मुलगा बाळकृष्ण दीक्षित यांनी आपले औरंगाबादस्थित थोरले बंधू वासुदेव दीक्षितांना ता. ७ जानेवारी १७५५ रोजी लिहिलेल्या पत्रात त्यांना काशीत घर बांधण्यासाठी मातुश्री राधाबाईंनी दहा हजार रूपये दिल्याची नोंद करतो. १९ एप्रिल १७५३ रोजी झालेल्या राधाबाईंच्या निधनानंतर या दहा हजारातील ३१५० रुपये दुर्गाघाटासाठी खर्च पडल्याची नोंद आहे (मइसा ३, पत्र ४५०, पृ.४१२).


नारायण दीक्षित यांच्या काशीतील अनेक सत्कृत्यापैकी तीन सत्कृत्ये त्यांच्या परोपकारी वृत्तीची आजही साक्ष देत आहेत : (१) सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत ज्यावरून अनेक भाविक, अभाविक, वृद्ध तरुण, संसारी, ब्रह्मचारी, विधुर संन्यासी, संत अगर असंत कार्यार्थ हिंडत असतात, ते ब्रह्मघाट, दुर्गाघाट व त्रिलोचन घाट दीक्षितांनी बांधले, (२) हरिश्चंद्र घाटावरील स्मशान भूमीचे विभाग पाडून दिले आणि मणिकर्णिका घाटावर स्मशानभूमीची योजना केली. त्या ठिकाणी डोंबांचा पूर्वापार हक्क असल्यामुळे ते यात्रेकरू वगैरे गैरमाहितगार लोकांस फार अडवीत व त्रास देत असत, तो न व्हावा म्हणून सरसकट श्रीमंतापासून गरीबापर्यंत सर्वांस सुलभ असा तेरा पैसे ढबु म्हणजे साडे सहा आणे कर घेण्याचा ठराव दीक्षितांनी करून दिला व तो ठराव अद्यापीहि चालू आहे, (३) श्रीभागीरथीचे घाटावर स्नाने करणारे व धुणे धुणारे यांचे गर्दीमुळे स्नानसंध्येस बसणाऱ्या ब्राह्मणांस फार उपसर्ग होत असे. तो टाळण्याकरिता ब्रह्म, दुर्गा व त्रिलोचन या घाटांपासून दूर पाण्यात शिड्या रोवून त्यावर तक्ते टाकण्यात आले व छायेकरिता तक्त्यावर मांडव व छत्र्या उभारण्याचा उपक्रम केला आणि त्याप्रमाणे आपापले घाटावर हद्दीहद्दीने अव्याहत चालू आहे. इतकेच नाही तर यात्रेकरू लोक देखील या कृत्यास मदत करितात. काही लोक आपले खर्चाने स्वतंत्र एक, दोन असे मांडव व छत्र्या उभारून देतात. नारायण दीक्षितांनी एक गोशाळा सुद्धा बनविली. या गोशाळेतील एका भागात आज श्रीराम आणि दुसऱ्या भागात सरस्वतीचे मंदिर आहे. माधुकऱ्याने एका वाड्यात दहा बिऱ्हाडे असल्यास प्रत्येक मजल्यावर न जाता एके ठिकाणी उभे राहावे व त्या ठिकाणी ज्यास माधुकरी घालणे असेल त्याने ती आणून घालावी असाही नियम त्यांनी केला (दीक्षित १९२५: ४८-४९).

बालाजी घाट (चित्र १३ व १४)

हा घाट पहिल्या माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत रघुनाथराव पेशव्यांनी बांधला असे दिसते. वर लिहिल्याप्रमाणे मराठ्यांची वाराणसीमधील घाट निर्माण प्रक्रिया पहिल्या बाजीरावांपासून सुरू झालेली दिसते. सदाशिव नाईक जोशी आणि नारायण दीक्षित पाटणकर यासारख्या माणसांकरवी पेशव्यांनी अनेक घाट, मंदिरे, ब्रह्मपुरी, अन्नछत्रे तसेच स्वत:साठी वाडे बांधले. अन्नपूर्णा मंदिर, काळभैरव मंदिर, अमृत विनायक मंदिर व अमृतेश्वर मंदिर ही काही मंदिरांची उदाहरणे आहे. पहिल्या बाजीरावांनी बांधलेल्या घाटांची



चित्र १३: बालाजी घाट आणि राघवेश्वर मंदिर



चित्र १४: बालाजी मंदिर, बालाजी घाट

ऐतिहासिक पत्रेच उपलब्ध आहेत. पहिल्या बाजीरावांनंतर नानासाहेब पेशवे आणि थोरले माधवराव पेशव्यांच्या काळातही ही प्रक्रिया सुरूच होती. त्याचे पुरावे रघुनाथराव पेशव्यांच्या पत्रातून मिळतात. सन १७६५ आणि १७६७ सालची रघुनाथरावांची दोन पत्रे उपलब्ध आहेत. धोंडो खंडेराव नावाचा रघुनाथरावांचा वाराणसीमधील कारभारी होता. तो रघुनाथराव पेशव्यांच्या आज्ञेने पेशव्यांसाठी घरे खरेदी करणे, वाराणसीच्या ब्राह्मणांना पुण्याहून पेशव्यांनी पाठविलेली वर्षासने देणे, गंगाजलाच्या कावडी पाठविणे तसेच वेळप्रसंगी राजकीय वर्तमान पाठविणे आदि कामे करीत असे. कारभाऱ्यांकडून पेशव्यांसाठी घरे खरेदी होत असे आणि घराच्या देखभालीसाठी हे कारभारी त्याच वाड्यात/घरात राहत असत. वेळप्रसंगी पेशवे घराण्यातील कोणी काशीस तीर्थयात्रेसाठी गेले तर त्यांची व्यवस्था या कारभाऱ्यांमार्फत त्या वाड्यात होत असे. धोंडो खंडेरावही अशाच एका पेशव्यांनी खरेदी केलेल्या वाड्यात राहत असे. पेशव्यांकडून यांना पैसेही मिळत असत. पण त्यात नियमितता दिसत नाही. याची कारणे बहुविध असण्याची शक्यता आहे. कारण पाठविलेल्या पैशाचा हिशेब कारभाऱ्यांकडून न आल्यामुळे पुढील पैसे मिळत नसतील. धोंडो खंडेरावचे हिशेब तपासण्यासाठी पेशव्यांनी रामचंद्रभटास पाठविले होते. धोंडो खंडेराव पेशव्यांस लिहितो की, ''रामचंद्रभटाच्या मने सर्व कारभार लबाड आहे. ते काही माझी अबरू ठेवीत नाहीत'' (पेद २९, पत्र ८६, पृ.८०).

पेशव्यांसाठी घरे खरेदी करताना तो लिहितो की, ''येक दोन घरे घेतली ती बहुत आहेत, निर्दोष अंतरगृही बाहेर आहेत; श्री गंगातीरी आहेत. याप्रमाणे घरे श्रीत आणखी नाहीत. येक स्वामीकारणे व येक छत घालावयासी ब्राह्मणभोजनास पाहिजे, यास्तव घेतले असे. याचा मनोरथ आपल्यावाचून कोण माझा पुरवील? अद्यापी पुरती खरेदी जाली नाहीत. च्यार दिवसा जाले नाहीत तो मागती विकावी हा अर्थ उत्तम नाही. आपण राजश्री रामचंद्राप्रमाणे, मी आपला किंकर आहे. ज्यांचा वंश नसतो तेहि श्रीकाशीतील घरे विकीत नाही. यास्तव सेवकाने तपशीलवार लिहिले असे. येकदा मजला कर्जदारांपासून मुक्त करावे. आपण कृपा करितील तरी सर्व होईल. अतःपर आज्ञेशिवाय कर्ज करणार नाही व आज्ञेशिवाय घरेही घेणार नाही. ही घरे कोणास देऊ नयेत. घरे थोर थोर आहेत. ब्राह्मणास दान घरे देणे तरी सेवकास लेहून पाठवावे, चौ पांचा हजारांत घर बहुत मिलतात. नवी घरे घेऊन ब्राह्मणांस आज्ञेप्रमाणे देईन. ही घरे दोन सरकारांत ठेवावी. बहुत उत्तम आहेत. पत्री कोठवर ल्याहावे?'' (पेद २९, पत्र ८६, पृ.८०).

रघुनाथराव पेशवे यांस १-११-१७६७ रोजी लिहिलेल्या पत्रात धोंडो खंडेराव लिहितात की, ''यंदा श्रीगंगेस पूर बहुत आला. सरकारचे दोनही वाडे गंगातीरी. त्यासी श्रीगंगाजल बहुत चढले तेणेकरून


श्रीगंगातीरी जे काम होते त्याचे मोठे मोठे पाथर निघोन गेले, त्याची मरामत जरूर केली पाहिजे'' (पेद २९, पत्र १९२, पृ.२००-२०४).

धोंडो खंडेरावच्या वरील दोन पत्रानुसार रघुनाथराव पेशव्यांनी आपल्यासाठी दोन वाडे/घरे खरेदी केली होती. गंगानदीला जेव्हा पूर आला/पाणी चढले त्यावेळी या वाड्यात पाणी शिरून वाड्याचे नुकसान झाल्याचेही यातून समजते. त्यानुसार हे दोनही वाडे गंगा किनारीच असण्याची शक्यता आहे. तसेच याच बालाजी घाटाच्या पायऱ्यांवर राघवेश्वर म्हणून राघोबादादांच्या स्मरणार्थ बांधलेले मंदिर आढळून येते. त्यामुळे पत्रात उल्लेखिलेले पेशव्यांचे वाडे याच बालाजी घाटाच्या ठिकाणी असण्याची दाट शक्यता आहे. या जागेव्यतिरिक्त आधीच्या पेशव्यांची गंगा किनाऱ्यावर इतरत्र जागा आढळत नाही. (नंतरच्या काळात रघुनाथरावांच्याच तीन मुलांनी - बाजीराव पेशवे (दुसरे), अमृतराव पेशवे आणि दुसरे चिमाजीआप्पा पेशवे यांनी नवीन जमीन खरेदी करून तिथे आपले वाडे/घाट बांधले)


इंग्रजांविरूद्धच्या सन १८५८ च्या उठावात पेशव्यांचा हात असल्याने उठावानंतर इंग्रजांनी पेशव्यांचा हा घाट जप्त केला. १८६४ च्या दरम्यान इंग्रजांनी या घाटाच्या जागेचा लिलाव केला तेव्हा ग्वाल्हेरच्या जयाजीराव शिंदे यांनी हा घाट खरेदी करून तेथे बालाजी मंदिर उभारले. या बालाजी मंदिरावरूनच नंतरच्या काळात या घाटाला 'बालाजी घाट' म्हटले जाऊ लागले.

अहिल्याबाई घाट (आकृती क्र.६, चित्र १५ आणि १६)


दशाश्वमेध घाटाचीच काही जागा विकत घेऊन अहिल्याबाईंनी (सन १७८९-९१) येथे घाट बांधला. कालांतराने या घाटाला स्वतंत्र घाटाचा दर्जा मिळाला व त्याला अहिल्याबाई घाट म्हणू लागले. मानमंदिर घाट, सध्याचा दशाश्वमेध घाट, प्रयाग घाट, शितला घाट, अहिल्याबाई घाट व मुन्शी घाट अशा तऱ्हेने मुळच्या दशाश्वमेध घाटाचे तुकडे पडलेले दिसतात. इंदौर संस्थानतर्फे या घाटावर एक कोनशिला बसविली असून त्यात या घाटाला 'दशाश्वमेध घाट, इंदौर स्टेट' असेच म्हटलेले आहे. इतर आश्रयदात्यापेक्षा अहिल्याबाई या वेगळ्या उठून दिसतात. त्यांचे सासरे मल्हारराव होळकरांनंतर त्यांनी माळव्याचा कारभार सांभाळला. शक्तीशाली शासक आणि पवित्र विधवा स्त्री अशा दोन प्रतिमा त्यांच्या जनमानसात होत्या. हे दोन्ही विरोधाभासी गुण आणि गुंतागुंतीच्या ध्येयाची झलक त्यांनी बांधलेल्या स्थापत्यातून दिसून येते. गंगानदीकाठावरील भल्या मोठ्या इमारतीतून त्यांचा काटेकोरपणा, तपस्या आणि साधेपणा दृष्टिस पडतो. या स्थापत्यात दुमजली प्राकार बांधलेला आहे. दुसऱ्या आश्रयदात्यानी बांधलेल्या अशाच प्रकारच्या स्थापत्यांपेक्षा हे स्थापत्य वेगळे वाटते.



आकृती ६: अहिल्याबाई होळकर घाटाचा पद्‌विन्यास
१. ब्रह्मपुरी २. वाडा ३. मंदिर
(देसाई माधुरी यांच्या पुस्तकातून साभार)



चित्र १५: अहिल्याबाई होळकर घाट



चित्र १६: अहिल्याबाई होळकर घाटावरील वाड्यातील आतील चौक

अहिल्याबाई घाटावरील वाडा व ब्रह्मपुरी —

उच्च मुगलवंशीय लोकांत नक्षीदार कमानी आणि स्तंभयुक्त बारादरीचा उपयोग सायंकाळच्या मौजमजेसाठी केला जात असे. गायक, वादक आणि नर्तकी याच्या द्वारा या बारादरीत मनोरंजनात्मक कार्यक्रम होत असत. जुन्या काळातील कुलीन स्त्रिया पडद्याआड राहत असल्याने या बारादरीतील कार्यक्रमात त्यांचा सहभाग नसे. त्यांचे मनोरंजनात्मक कार्यक्रम 'जनाना' मध्ये होत असत. अहिल्याबाईंच्या या वाड्यात अभिजन लोकांसाठी असलेली बारादरी बांधण्यात आलेली नाही.

अहिल्याबाईंची परिस्थिती वेगळीच होती. एका बाजूला विधवा स्त्री आणि दुसऱ्या बाजूला यशस्वी राज्यकर्ती अशी त्यांची दुहेरी भूमिका होती. अहिल्याबाईंनी दोन्ही भूमिका उत्तम रीतीने पार पाडल्या. अतिशय साध्या राहणीतील पवित्र विधवा स्त्री, त्याजबरोबर राज्यकर्ती आणि सार्वजनिक व्यवहारातील आश्रयदाती अशा तऱ्हेचे आपले व्यक्तीमत्व त्यांनी लोकांसमोर ठेवले. त्यांनी आपला धार्मिक स्थापत्य उभारण्याचा कार्यक्रम भारतभर राबविला. विशेषत: हिंदू धर्मातील शैवपंथीय तीर्थस्थानांशी त्यांचा संबंध आल्याचे दिसते. काशीतील विश्वेश्वर मंदिराशी त्या संबंधीत होत्या. एक स्त्री आश्रयदाती असल्यामुळे अहिल्याघाटावरील त्याचा वाडा 'मर्दानी' आणि 'जनानी' यात विभागला गेला नाही. एक चौकी वाड्यामध्ये भोवती निवासस्थाने बांधली आहेत. उच्च राहणीमानाची कोणतीही चिन्हे विशेषत: नक्षीकाम तथा अलंकरण यात दिसून येत नाही.

घाटावरील वाड्याशेजारी लगेचच दक्षिणेला अहिल्याबाईंनी ब्रह्मपुरी बांधलेली आहे. एकंदर ६० ब्राह्मण पुजारी किंवा त्यांच्या कुटुंबाला राहण्याची व्यवस्था त्यात करण्यात आली आहे (Burway 1922: 141). ब्रह्मपुरी आणि शेजारील वाडा, या दोन्ही इमारतींमुळे घाटाची दर्शनीय बाजू अत्यंत शोभनीय झाली आहे. धर्मार्थ कार्यासाठी ब्रह्मपुरी बांधल्यामुळे त्यातून त्यांची पवित्र आश्रयदाती अशी प्रतिमा लोकांपर्यंत पोहचण्यास मदत होते. घाटाचा दर्शनी भाग व त्याचे साधे अलंकरणविरहीत स्थापत्य यातून त्यांची साधी व सोज्वळ भूमिका तयार होण्यास मदत होते. वाड्याला असलेले मंदिराचे आणि ब्रह्मपुरीचे सान्निध्य, त्यावरील साधे अलंकरण आणि उच्च दर्जाचे इमारती साहित्य यामुळे आश्रयदात्याची दयाशील, सात्विक आणि भावभक्तीपूर्ण रूप पुढे येण्यास मदत होते.

भोसले घाट (आकृती ७, चित्र १७ ते २०)

हा घाट मराठा संघराज्यातील प्रमुख सरदार नागपूरकर रघुजी भोसले द्वितीय (सन १७८८-१८१६) यांनी बांधला. सेनासाहेब सुभा ही पदवी त्यांना सातारकर छत्रपतींकडून मिळाली होती. नागपूर हे त्यांच्या


जहागिरीचे केंद्र असून छत्तीसगड, ओडिसा, बंगाल प्रांतापर्यंत त्यांनी आपल्या सत्तेचा विस्तार करून भारतातील प्रमुख राज्यकर्ते म्हणून आपली प्रतिमा निर्माण केली होती. इतर मराठा सरदारांप्रमाणे नागपूरकर भोसल्यांची प्रतिमा सुद्धा हिंदू धर्मपरंपरेचे संरक्षक अशीच होती. —

भोसले यांचा वाडा व मंदिरे

भोसले घाटाच्या परिसरात खाजगी, धार्मिकपणाबरोबरच सार्वजनिक दर्शनीयताही दृष्टीस पडते. सन १७९५ च्या दरम्यान गंगातीरावर नागपूरकर भोसले यांनी किल्लेवजा हवेली/वाडा बांधला. या गुंतागुंतीच्या बांधकामात विविध स्थापत्यशैलींची आणि स्थानीक उदाहरणांची फेरमांडणी केलेली दिसते. या स्थापत्यात दोन चौकी तटबंदीयुक्त हवेली असून गंगा नदीच्या बाजूने वाड्यात शिरण्यासाठी भव्य दरवाजा आहे. वाडा दुमजली असून सर्वात वरच्या मजल्यावर दोन मंदिरे आणि बारादरी आहे. खालच्या बाजूला राहण्यासाठी खोल्या आहेत. या वाड्याच्या दुसऱ्या स्तरावर अभिजन लोकांच्या राहण्याची सोय केलेली आहे. निवासस्थानाची मुख्य खोली ही बुरूजामध्येच बांधली आहे. प्रत्येक बुरूजामधील खोली अष्टकोनी असून सुरूदार खांब आणि नक्षीदार महीरपींनी सुशोभीत आहे. निवासस्थानांना नदीच्या बाजूने छज्जे काढले आहेत.


सर्वात वरच्या तिसऱ्या स्तरावर बारादरी आणि दोन मंदिरे आहेत. लक्ष्मी-नारायण मंदिर हे वाडा बांधतानाच उभारले गेले. या घाटाचा निर्माता रघुजी भोसले (द्वितीय) यांच्या स्मरणार्थ सन १८४० च्या दरम्यान दुसरे मंदिर बांधले गेले. त्याचे नांव रघुराजेश्वर असे आहे. दोन्ही मंदिरे स्थापत्याच्या दृष्टीकोनातून एक सारखीच आहेत. सन १७२८ मध्ये नागपूरमध्ये त्यांनी बांधलेल्या रूक्मीणी मंदिर आणि महादेव मंदिराप्रमाणेच ही मंदिरे आहेत. वाड्यातील दोन्ही मंदिरे -लक्ष्मीनारायण मंदिर आणि रघुराजेश्वर मंदिरांची रचना गर्भगृह आणि समोर मंडप अशी आहे. गर्भगृहावरील शिखरावर मोठ्या प्रमाणात कोरीवकाम असून त्यात मूर्तीही आहेत. मंदिरासमोरील मंडप मुघल बारादरी प्रमाणे आहे. मंडप सपाट छताचा व सुरूदार खांबांनी (मुघलशैलीतील स्तंभ) बनला आहे. वाड्याबाहेरील इतर लोकांना वाड्यात येण्यास व मंदिरात दर्शन घेण्यास मज्जाव नाही. मंदिराभोवतालच्या ओवऱ्या बंदिस्त करून त्यात लोक राहत आहेत. बारादरी आणि मंदिरे यात प्रवेश करण्यासाठी गावाच्या बाजूने असलेल्या रस्त्याने आत प्रवेश करता येतो.

या स्थापत्यात बारादरीचा समावेश आहे. अभिजन मुघलवंशीय लोकांत नक्षीदार कमानी आणि स्तंभयुक्त बारादरीचा उपयोग सायंकाळच्या मौजमजेसाठी केला जात असे. गायक, वादक आणि नर्तकी याच्या द्वारा या बारादरीत मनोरंजनात्मक कार्यक्रम होत असत. नागपूरकर भोसले हे राज्यकर्ते होते. अनेक कलांना त्याचा उदार आश्रय लाभला होता. बारादरी स्थापत्यातील भव्यता, त्यातून दिसून येणारी



भोसले घाटाचा पद्‌विन्यास


१. लक्ष्मीनारायण मंदिर २. रघुराजेश्वर मंदिर ३. बारादरी



पक्षदर्शन, भोसले घाट

(देसाई माधुरी यांच्या पुस्तकातून साभार)

आकृती क्र.७



चित्र १७: भोसले घाट



चित्र १८: बारादरी, भोसले घाट



चित्र १९: लक्ष्मीनारायण मंदिर, भोसले घाट



चित्र २०: बाहेरील भागावरील अलंकरण, लक्ष्मीनारायण मंदिर, भोसले घाट


कलासक्तता यातून भोसल्याच्या जीवनशैलींची कल्पना करता येते. याच्या उलट अहिल्याबाईंच्या स्थापत्यात बारादरीचा अभाव दिसतो. त्यातून त्यांची पवित्रता आणि साधेपणा दिसून येतो.

गणेश घाट आणि अमृतविनायक मंदिर (आकृती ८, चित्र २१ आणि २२)


मराठा संघराज्यातील पेशवे पदाच्या संघर्षात अपयश आल्यानंतर इंग्रजांच्या सहकार्यांनी अमृतराव पेशव्यांनी काशी/वाराणसी येथे सन १८०४-०५ च्या सुमाराम आपला मुक्काम हलविला. पूर्वीच्या अग्नीश्वर घाटाची जमीन खरेदी करून अमृतराव पेशव्यांनी सन १८०७ मध्ये गणेश घाटाची निर्मिती केली. एका चौकोनी जागेमध्ये मंदिर आणि त्याची आसपासची जागा घाटात सामावलेलेली आहे. गंगातटाच्या बाजूने मोठ्या तटबंदीयुक्त बांधकामाने युक्त अशा चौकोनी स्थानामध्ये/जागेमध्ये गणेश मंदिर आणि त्यांच्या आसपासच्या ओवऱ्या आणि निवासस्थाने यात सामावलेली आहेत. अमृतराव पेशव्यांनी गणेश मंदिर बांधल्यामुळे या मंदिराला 'अमृतविनायक' असे संबोधले जाते. अमृतविनायक मंदिराचे गंगातटावरील स्थान फारच महत्त्वाचे आहे. धार्मिक महत्त्वाचा परिसर असलेल्या पंचगंगाघाटाचे सान्निध्य या घाटाला लाभलेले आहे. महाराष्ट्रात परंपरेने चालत आलेल्या पेशवाईतील मंदिर स्थापत्याचा प्रभाव या मंदिरावर पडलेला दिसतो. गर्भगृह आणि त्यासमोरील मंडप अशी या मंदिराची स्थापत्य रचना आहे. मंडपाला सुरूदार खांब (मुघल स्तंभ) आहेत. निवासस्थानाला जागा कमी आहे. याउलट या घाटाच्या शेजारी असणाऱ्या भोसला घाटावर खाजगी जागा म्हणजेच निवासस्थानांना जागा विपुल आहे. अमृतराव हे गणेशाचे निस्सिम उपासक होते व वाराणसीमधील इतर गणेश मंदिरांनाही त्यांनी अनेक तऱ्हेनी मदत केली होती.

राजा घाट उर्फ अमृतराव घाट आणि अन्नछत्र व मंदिरे (आकृती ९, चित्र २३,२४,२५)


अमृतराव पेशव्यांनी वाराणसीत बांधलेला दुसरा घाट म्हणजेच राजा घाट उर्फ अमृतराव घाट. इतर घाटावरील स्थापत्याची तुलना या घाटावरील स्थापत्याशी केली तर ते तुलनेने कमी उंचीचे आहे. परंतु त्यातही अन्नपूर्णा छत्राचे बांधकाम प्रेक्षणीय आहे. चुनार खाणीतील घडीव दगडांच्या साह्याने बांधलेल्या या अन्नपूर्णा छत्राच्या बांधकामात दोन गोष्टी सामावलेल्या आहेत. एक म्हणजे अन्नछत्र हे नेहमी मंदिर परिसरात असते आणि दोन म्हणजे काही वेळेला त्याजागी यात्रेकरूंसाठी राहण्याचीही सोय केलेली असते. ती जागा काही वेळेला धर्मार्थ भोजन व्यवस्थेसाठी, उदा. ब्राह्मण भोजनासाठी वापरली जाते. अमृतरावांनी या अन्नपूर्णा छत्राच्या स्थापत्यामध्ये गंगातटावर हवेली/वाड्याचेही स्थापत्य अंतर्भूत केले आहे. हवेली आणि अन्नपूर्णा छत्र हे दोन्ही एकमेकांनी अंतर्गत जोडलेली आहे. गंगेपासून सुरू होऊन वर चढत जाणाऱ्या पायऱ्यांच्या स्थापत्याने घाटाचे दोन भागात विभाजन झालेले आहे. उत्तरेतील भाग अन्नछत्राने व्यापलेला



गणेश घाटाचा पद्विन्यास
१. अमृतविनायक मंदिर २. निवासस्थान




पक्षदर्शन, गणेश घाट
(देसाई माधुरी यांच्या पुस्तकातून साभार)
आकृती क्र.८




चित्र २१: गणेश घाट




चित्र २२: अमृतविनायक मंदिर, गणेश घाट



राजा घाट उर्फ अमृतराव घाटाचा पद्विन्यास
१. अमृतेश्वर मंदिर २. अन्नपुर्णा छत्र
(देसाई माधुरी यांच्या पुस्तकातून साभार)
आकृती क्र.९



चित्र २३: अन्नपुर्णा छत्र, अमृतराव घाट



चित्र २४: राजा घाट उर्फ अमृतराव घाट



चित्र २५: अमृतेश्वर मंदिर, अमृतराव घाट


असून दगडी तटबंदीयुक्त भिंतींनी युक्त आहे. दक्षिणेतील बंदीस्त गच्चीवर तीन मंदिरे बांधलेली आहेत. यातील सर्वात मोठे मंदिर शिवाचे असून त्याला आश्रयदात्याचेच म्हणजे अमृतरावांचे नाव दिलेले आहे. ते मंदिर 'अमृतेश्वर मंदिर' म्हणून ओळखले जाते.

अन्नछत्रात चौकोनी स्तंभ असून नक्षीकाम फक्त हस्तावर आहे. निवासस्थान हे साधे असून मुख्य प्रकाराशी जोडलेले आहे. अमृतेश्वर मंदिराचे खांब सुरूदार (मुघल स्तंभ) आहेत. भोसले घाटाप्रमाणे या घाटावर बारादरी नाही. मागे लिहिल्याप्रमाणे बारादरी स्थापत्यातून आश्रयदात्याची उचभ्रू जीवनशैली/विलासी जीवन व अभिजातपणा दिसून येतो. या घाटावर अतिशय साध्या स्तंभावर छत्रीवजा बांधकाम केलेले आहे. होम-हवन करण्यासाठी ही जागा वापरत असावेत. या अन्नछत्रात पक्वानयुक्त ब्राह्मणभोजने अमृतराव घालीत होते.


अमृतविनायक मंदिर आणि अन्नपूर्णा छत्र यांचे एकत्र परिक्षण करणे जरूरीचे आहे. दोन्ही प्राकारांचे एकत्रित दर्शन गंगातीरावरील पवित्रता आणि भव्यता दर्शविते. अमृतराव आणि भोसल्यांच्या स्थापत्यातून मुघल शैलीचे अनुसरण दिसते. आपली ध्येये आणि प्राधान्यता ध्यानात ठेवून मुघल शैलीमध्ये थोडेसे बदल/दुरूस्त्या करून भोसल्यांनी तसेच अमृतरावांनी आपल्या स्थापत्यामध्ये त्या शैलीचा अंतर्भाव केलेला दिसतो. राजेशाहीमधील अलिप्तता यातून दिसून येते.

मुन्शी घाट (चित्र २६)

नागपूरकर भोसल्याचे सरदार श्रीधर मुन्शी यानी १८१२ ते १८२२ दरम्यान अहिल्याबाई घाटाशेजारी 'मुन्शी घाट' बांधला. तटबंदीयुक्त प्राकारामध्ये त्यांनी एक चौकी वाडा बांधला. भोसला घाट आणि मुन्शी घाट यांच्या स्थापत्यात काही फरक दिसतो. भव्य दरवाजा आणि बारादरी या राज्यकर्त्या निदर्शक खुणा मुन्शींनी आपल्या स्थापत्यात उपयोगात आणल्या नाहीत. परंतु त्याचबरोबर भोसला घाटावरील काही स्थापत्य पैलू त्यांनी आपल्या घाटावर उपयोगात आणल्या. भोसला घाटावरील दोन्ही कोपऱ्यावरील बुरूजातील निवासस्थाने आणि सर्वात वरील थरातील छतयुक्त ओवऱ्यांच्या स्थापत्याचे अनुकरण त्यांनी आपल्या घाटावर केले. आपले आश्रयदाते नागपूरकर भोसल्यांच्या स्थापत्याला/इमारतीला कोणत्याही प्रकारचा कमीपणा न येऊ देता अत्यंत संयमी भूमिकेतून त्यांनी आपला वाडा साधा बांधला. सन १९२० नंतर या घाटाचा दक्षिण भाग दरभंगाच्या राजाने खरेदी केला. त्यामुळे घाटाचे दोन भाग पडून दक्षिण भाग 'दरभंगा घाट' म्हणून ओळखला जाऊ लागला.



चित्र २६: मुन्शी घाट



चित्र २७: संकठा घाट

संकठा घाट (चित्र २७)

जागेची अचूक निवड, किल्लेवजा हवेल्या, भव्य दरवाजे आणि मुगल स्थापत्याचे अनुकरण इत्यादी वैशिष्ट्ये गंगाकाठावरील स्थापत्यात दिसून येतात. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास मराठा आश्रयदात्यांनी/अभिजनवर्गाने येथील अशा तऱ्हेच्या स्थापत्याचा आश्रय काढून घेतला. अर्थातच याचे उत्तर मराठ्यांच्या क्षीण होत गेलेल्या राजकीय सत्तेत मिळते. त्याच वेळी ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता सर्व भारतभर पसरली गेली.

वाराणसीवरील कंपनीचे वर्चस्व जरी सन १७८१ पासून होते तरी तेथील मराठा आश्रयदात्यांना कंपनीचा पाठिंबा होता. कंपनीचे प्रतिनिधी नबाब अली इब्राहीमखान यांनी अनेक आश्रयदात्यांना, अभिजनवर्गाला बनारसमधील आपला आश्रय/मदत चालू ठेवण्याविषयी पत्रे लिहिली आहेत. एकोणिसाव्या शतकात या आश्रयदात्याचा या भव्य स्थापत्यातील रस कमी कमी होत गेला. वाराणसीमधील धार्मिक जीवनाला सहाय्य करणाऱ्या आश्रयदात्यांचे मन बदलले गेले. सन १८३० नंतरच्या स्थापत्यात बदल झालेले दिसतात. आश्रयदात्यांकडून लहान व स्वतंत्र मंदिरे बांधली गेली. गंगातीरावरील हवेल्यांचा आकारही लहान होत गेला. धार्मिक कार्यक्रम आणि धर्मार्थ दाने ही मुख्य मंदिरांकडून म्हणजेच विश्वेश्वर मंदिर आणि अन्नपूर्णा मंदिरांकडून दिली जाऊ लागली. सन १८३० ते १८४० च्या दरम्यान उभारलेल्या स्थापत्यातून या बदलांची नोंद दिसून येते. नवीन प्रकल्पांचा निर्णय, व्यवस्थापन आणि त्यातील तंटे निवारण करण्यासाठी सन १८२३ साली ईस्ट इंडिया सरकारने यासाठी एक स्थानिक सुधारणा समिती नेमली. ज्यांना गंगातीरावर मंदिरे, घाट, वाडे बांधावयाची आहेत अशा आश्रयदात्यांनी या समितीकडे अर्ज करणे बंधनकारक केले. याला प्रतिसाद दिला तो एका मराठा आश्रयदातीने, म्हणजेच गहिनाबाई गायकवाड यांनी. अग्नेश्वर घाट आणि नदीत उतरण्यासाठी पायऱ्या बांधण्याचा अर्ज त्यांनी समितीकडे केला. लगेचच परवानगी मिळून त्या ठिकाणी मंदिर व घाट बांधला गेला (Desai 2017: 146). सत्ता बदलातील स्पष्टता यात दिसून येते. याच घाटाला संकठा घाट म्हणतात. सन १९२३ साली या घाटाची दुरूस्ती सयाजीराव महाराज (तिसरे) यांनी केली. तशा अर्थाचा शिलालेखच घाटावर लावला आहे.

बाजीराव घाट

सन १८३० नंतरच्या सत्ता बदलातील गंगातीरावरील दुसरी घटनाही मराठा आश्रयदात्याचीच आहे, ती घटना म्हणजे पदच्युत मराठा पेशवा बाजीराव दुसरा यांनी गंगाकाठावर बांधलेला घाट होय. सन १८१८ मध्ये मराठा सत्तेवरून पदच्युत झाल्यानंतर त्यांची रवानगी उत्तर प्रदेशात ब्रह्मावर्त या ठिकाणी झाली.

त्यानंतर बाजीरावांनी आपली संपत्ती वाराणसीमधील धार्मिक विधी आणि इमारत बांधकामाला मदत करणे यासाठी वापरण्यास सुरूवात केली.

दुसरे बाजीराव पेशवे यांनी घाट बांधण्यास गंगाकाठावरील स्थान निवडले ते सुद्धा वाराणसीमधील मराठी वस्तीकेंद्रीत भागातच. हे स्थान मणिकर्णिका घाटाजवळच होते. त्याच ठिकाणी अहिल्याबाईंनी घाट, तलाव व मंदिरे बांधलेली होती. एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला यात्रेकरूंमध्ये मणिकर्णिका घाट फार लोकप्रिय होता. त्यामुळे प्रस्थापित वाड्याचे स्थान गर्दीचे होते. या ठिकाणी अनेक मंदिरे व मढ्या होत्या. या मढ्यात मृत्युशय्येवर असणारे अनेक आजारी लोक पडलेले असत. बाजीरावांनी त्यांच्या शेजारील भागात तटबंदीयुक्त हवेली व पायऱ्यासुद्धा घाट बांधण्याचा अर्ज स्थानिक सुधारणा समितीकडे केला.

बाजीराव पेशवे (दुसरे) यांनी सादर केलेल्या आरेखनाला घाटाच्या शेजारील लोकांनी हरकती घेतल्या. बडाकृष्ण म्हणून मुन्शीलालचा नोकर होता. त्याने तक्रार केली की या बांधकामामुळे माझ्या मालकाच्या मंदिराला कमीपणा येता आहे. तसेच मंदिराकडे जायची वाट पूर्णपणे बंद होत आहे. जयरामगीर गोसावी या नागा साधुच्या पुढाऱ्याने तक्रार केली की 'दसनाम शिल्प' या मंदिराकडे जायची वाट बंद होत आहे. ह्या सर्व तक्रारी सुधारणा समितीकडे गेल्या. नवीन घाट व मंदिर यात एक अरूंद बोळ ठेवावा या अटीवर घाट बांधण्याची परवानगी बाजीरावांना मिळाली. घाट व हवेली बांधली गेली. सुधारणा समितीचा प्रमुख प्रिन्सेपने तक्रार केली की, 'घाटाचे बांधकाम सुमार दर्जाचे आहे. तसेच याच्या बांधकामाकडे फारसे लक्ष दिलेले नाही.' क्षीण होत चाललेली राजकीय सत्ता ओळखून बाजीरावांनी धार्मिक उत्सवावरील आपला खर्च/आश्रय कमी केला. अन्नपूर्णा मंदिर व त्याद्वारे चालणाऱ्या धर्मार्थ कार्यक्रमापुरताच आपला आश्रय त्यांनी चालू ठेवला (Desai 2017: 147-148). वाराणसीत आत्ता अस्तित्वात असलेले कालभैरवाचे मंदिर बाजीराव पेशवे (दुसरे) यांनी बांधले आहे. या कालभैरवासन्निध बाजीराव पेशवे यांनी आपल्यासाठी मोठा लाकडी वाडा बांधला (लेले १९६४: ८५). 'काठ की हवेली' म्हणून आजही हा वाडा ओळखला जातो.

सिंधिया घाट (चित्र २८)

या घाटाचे प्राचीन नांव 'वीरेश्वर घाट' असे होते. गीर्वाणपदमंजिरी मध्ये या घाटाचा उल्लेख येतो. घाटावर वीरेश्वर किंवा आत्मवीरेश्वर (शिव) मंदिर आहे. सन १३०२ मध्ये वीरेश्वर नांवाच्या व्यक्तीने हे मंदिर बांधले. या मंदिरावरूनच या घाटाला 'वीरेश्वर घाट' म्हणतात. सन १८३५ मध्ये दौलतराव सिंद्यांची पत्नी बायजाबाई शिंदे यांनी या ठिकाणी पक्का घाट बांधला. या घाटाचे स्थानही मणिकर्णिका घाटा शेजारी होते. इमारतीच्या आरेखनामध्ये नदीकिनाऱ्याकडे तोंड आणि भव्य प्रवेशद्वाराचा समावेश होता. यात सार्वजनिक


धार्मिक विधीसाठी जागा, पायऱ्या तसेच मढीचा समावेश होता. परंतु काळाच्या ओघात हा घाट नष्ट झाला. सन १८३५ मध्ये या घाटाच्या बांधकामाला सुरूवात झाली अशी कागदोपत्री नोंद आहे. परंतु प्रकल्पाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. या घाटाचा प्लॅन सन १९३१ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यातून या घाटाचे भव्य प्रवेशद्वार दिसून येते. सन १९०५ मध्ये घेतलेल्या फोटोवरून आणि या आरेखनावरून दिसून येते की वेलीयुक्त कमानी आणि सुरूदार खांब असून घाटाला तटबंदी नव्हती (Desai 2017: 148-149).

बायजाबाई शिंदे यांच्यापूर्वी तीन दशके भोसल्यांनी गंगाकिनाऱ्यावरील स्थापत्य कसे बांधावे याचे प्रात्यक्षिकच दाखविले होते. या बांधकामामुळे जनमानसात प्रतिमावृद्धी होते तसेच धार्मिकतेची/धर्मनिष्ठेची ओळख तयार होते. घाटावरील स्थापत्य बांधकामातून बायजाबाईंना जनमानसातील आपली राजकीय प्रतिमा दृढ करण्यास खूपच संधी होती. परंतु काळ बदलला होता, त्याच त्याच कृतीतून तेच तेच परिणाम निघण्याची गरज नाही. बांधकामासाठी बायजाबाईंनी अतिरिक्त खर्च केला नाही. अहिल्याबाई होळकरांच्या सारख्या शक्तीशाली विधवा स्त्री प्रमाणे बायजाबाईंनी फारच गुंतागुंतीचे व्यक्तीमत्व जनतेसमोर सादर केले. त्यांनी आपली गहणी पवित्र विधवा स्त्री प्रमाणे केली होती. साधे खाणे, जमिनीवर झोपणे अशा तऱ्हेचे त्यांचे वर्तन होते. तथापि याच्या विरूद्ध खर्चिक अशा घोड्यांच्या व्यवसायात त्यांना रस होता (Desai 2017: 148-149). बायजाबाईंचा घाट बांधण्याचा हेतू आधीच्या लोकांप्रमाणे फक्त धार्मिक नव्हता. त्यावेळच्या बदलत्या राजकीय भविष्यात या धर्मार्थ स्थापत्याला आश्रय देण्यात त्यांची स्वत:ची सामाजिक प्रतिष्ठा वाढविणे हा होती. सन जुलै १८३४ मध्ये चार्लस् मेटकॉफला लिहिलेल्या पत्रात त्या म्हणतात, 'In the hope of reward in future state and of a good name in this word, I resolved to build a ghat at the city of Benares" (Swami Medhasananda 2002: 348).

बायजाबाईंना समकालीन ब्रिटीश प्रवासी फॅनी पार्क आपले निरीक्षण नोंदवितात. त्या लिहितात की, ''घाटाचे बांधकाम चालू आहे. घाट अतिशय सुंदर आहे.'' पार्क पुढे लिहितात की, ''बायजाबाईंनी या घाटाच्या बांधकामासाठी १.५ हजार रूपये खर्च केले आहेत आणि घाट पूर्ण व्हावयास आणखी २ लाख रूपये लागण्याची शक्यता आहे.'' सन १७३४ मध्ये बायजाबाईंनी आपल्या पेढीतून ३.७ हजार रूपये या कामाकडे वळविले. पुढे हा पेढी उद्योग संकटात पडला, कारण धर्मार्थ कामासाठी वापरण्याऐवजी बायजाबाईंनी हा पैसा व्यक्तीगत कामासाठी वळविला. त्यामुळे पेढीच्या विश्वासार्हतेला तडा गेला. पेढीचे व्यवहार सुरळीत होण्यासाठी आणि धार्मिक गोष्टींसाठी हा फंड नीट कसा वापरता येईल यासाठी मेटकॉफच्या हस्तक्षेपाची त्यांनी मागणी केली. बायजाबाई आणि त्यांचा दत्तक मुलगा यांच्यातील भांडणे मिटविताना त्यांनी कोठीची/पेढीची मालमत्ता गोठविली. त्यामुळे गंगाकिनाऱ्यावरील हवेलीचे बांधकाम



चित्र २८: सिंधिया घाट



चित्र २९: जडाऊ मंदिर, जठार घाट

अर्धवट राहिले. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याकडून या घाटाचा जीर्णोद्धार केला गेला (Desai 2017: 148-149).

ग्वालीयर घाट


सन १९२८-२९ मध्ये ग्वाल्हेरचे महाराज दौलतराव शिंदे यांनी हा घाट बांधला. म्हणून या घाटाला 'ग्वालीयर घाट' म्हणतात. यापूर्वी हा भाग चोरघाटाचाच भाग होता. घाटावर निवासस्थान आणि तीन छोटी शिव मंदिरे आहेत. घाटाच्या उत्तर भागात गंगा किनाऱ्यावरून गल्लीत जाण्यासाठी पायऱ्या बांधलेल्या आहेत.

जठार घाट (चोर घाट) (चित्र २९)

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ग्वाल्हेरचे महाराज जयाजीराव शिंद्यांचे दिवाण बालाजी चिमणाजी जठार यांनी हा घाट बांधला. म्हणून त्यांच्या नावावरून या घाटाला 'जठार घाट' असे नांव पडले. घाटावर इमारत आणि लक्ष्मीनारायणाचे मंदिर आहे. मंदिरावर काचेच्या तुकड्यांनी जडावाचे अलंकरण केले आहे. म्हणून या मंदिराला 'जडाऊ मंदिर' म्हणतात. मंदिराच्या गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर 'राजे श्री बालाजी चिमणाजी जठार दीवान निसबत महाराजा शिंदे आलीजाबहादुर तथा श्रीमत् महाराजाधिराज जियाजीराव शिंदे आलीजाबहादुर' असा लेख कोरलेला आहे. प्रिन्सेपने या घाटाचा उल्लेख 'चोर घाट' म्हणून केला आहे. (हरिशंकर १९९६: ७१)

गंगामहल घाट (चित्र ३० आणि ३१)

सन १८६४ पर्यंत हा घाट संकठा घाटाचाच भाग होता. सन १८६४ मध्ये ग्वाल्हेरचे जयाजीराव शिंदे यांनी संकठा घाटाचा उत्तर भाग खरेदी करून तेथे भव्य इमारत बांधली. हाच गंगामहल घाट म्हणून ओळखला जातो. गंगाकिनाऱ्यावरील बाजूवर एकंदर तीन बुरूज असून उत्तर व दक्षिण दिशेकडील बुरूज अष्टकोनी असून मधील बुरूज गोलाकार आहे. घाटाकडील बाजूवर उत्तर व दक्षिण बुरूजावर जाण्यासाठी जिन्यांची व्यवस्था केली आहे. तटबंदीच्या आत राधा-कृष्णाचे मंदिर आहे. 'Sacred City of The Hindus ' या एम.ए. शेरिंगने सन १८६८ मध्ये प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात या घाटाचा प्रथम उल्लेख आलेला आहे.



चित्र ३०: गंगामहल घाट



चित्र ३१: राधाकृष्ण मंदिर, गंगामहल घाट

त्रिलोचन घाट आणि बाळाबाई घाट

ब्रह्मा घाट आणि दुर्गा घाटा बरोबरच नारायण दीक्षित पाटणकर यांनी 'त्रिलोचन घाट बांधला अशी माहिती नारायण दीक्षितांचे वंशज देतात. परंतु ब्रह्मा घाट आणि दुर्गा घाटाप्रमाणे मराठी ऐतिहासिक कागदपत्रांतून या घाटाचा उल्लेख येत नाही. घाट व आसपासच्या जागेत १३ मंदिरे असून त्यातील आठ शिवाची, दोन गणेशाची तर विष्णु, सूर्य व शक्तीची एक-एक मंदिरे आहेत. त्यातील त्रिलोचनाचे मंदिर हे अठराव्या शतकातील असून पुण्याचे रहिवासी नाथूबाला यांनी बांधल्यांची स्थानिक आख्यायिका आहे.

गायघाटाशेजारी 'बाळाबाई घाट' आहे. एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला बाळाबाई नावाच्या मराठी स्त्रीने हा घाट बांधल्याचे संदर्भ मिळतात. १८२२ साली प्रसिद्ध झालेल्या प्रिन्सेपच्या यादीत या घाटाचा उल्लेख मिळतो.

वाराणसीतील मराठा निर्मित मंदिर स्थापत्य

बाराव्या शतकात काशीमधील मंदिरांचा मुस्लिमांकडून विध्वंस झाल्यानंतर त्याआधीची मंदिरे काशीमध्ये शिल्लक राहिली नाहीत. तेराव्या शतकात काशी मध्ये मंदिरे पुन्हा उभी राहिली. मंदिरे बांधणे आणि पाडणे हा क्रम अकबराच्या काळापर्यंत सुरू होता. याच्याच काळात काशीमध्ये राजा तोडरमल आणि नारायणभट्ट यांच्या प्रयत्नाने विश्वेश्वर मंदिराची स्थापना झाली. अकबर आणि जहांगीर यांच्या राज्यकाळात राजा मानसिंगाने काशीमध्ये अनेक मंदिरे आणि घाट बांधले. राजा मानसिंगाने एका दिवसात हजार मंदिरे काशीमध्ये बांधण्याचा पण केला होता. हा पण पूर्ण करण्यासाठी काशीमधील सर्व दगडांवर/भिंतींवर मंदिरांची चित्रे काढून हा पण पूर्ण केला गेला अशी काशीमध्ये दंतकथा आहे (मोतीचंद्र १९६४: २१५). आत्ता जी आपण काशी पाहतो ती मराठ्यांनी निर्माण केलेली काशी आहे असे अ.स. आळतेकरांचे म्हणणे आहे (Altekar 1943: 23). सन १७३० नंतर मराठ्यांची दृष्टी काशीवर पडल्यानंतर खऱ्या अर्थाने काशीच्या सांस्कृतिक जीवनाच्या पुनरुस्थानाला सुरूवात झाली. त्यांनी घाट, ब्रह्मपुरी, अन्नछत्रे, धर्मशाळा आणि मंदिरे बांधली. अठराव्या शतकाच्या अंताला जेव्हा काशीचा कारभार इंग्रजांच्या ताब्यात गेला तेव्हा प्रामुख्याने मराठ्यांनी परत काशीमध्ये मंदिरे बांधण्यास सुरूवात केली आणि ही स्थिती एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत सुरू राहिली. मोतीचंद्रांच्या मतानुसार अठराव्या शतकाचा अंत हा कलेच्या ऱ्हासाचा काळ होता आणि याची स्पष्ट छाप आपणास काशीतील मंदिरावर आणि मूर्तिंवर दिसून येते. मोतीचंद्र पुढे म्हणतात की या काळातील मंदिराकडे आपण कलेच्या दृष्टीकोनातून न बघता केवळ श्रद्धेच्याच भावनेने बघतो (मोतीचंद्र १९६४: ४००).

मराठा निर्मित बहुतेक स्थापत्य प्रकल्प हे वाराणसी शहरातील धार्मिक व व्यापारी केंद्राच्या आसपासच स्थापित झाले. वाराणसीची ओळख फक्त हिंदूचे तीर्थयात्रेचे स्थान म्हणून राहिली नाही. देशव्यापी केंद्र ते मराठा प्रदेश यांना जोडणारे केंद्र म्हणून वाराणसीचे महत्त्व तयार झाले/वाढले. मराठा निर्मित अनेक मंदिरे-विश्वनाथ मंदिर, अन्नपूर्णा मंदिर, काळभैरव मंदिरे ही मणिकर्णिका घाटाच्या दक्षिणेला असलेल्या वाराणसीच्या मुख्य व्यापारी पेठेतच म्हणजेच चौखंबा बाजारपेठेतच आहेत. मराठा निर्मित आणखी काही स्थापत्य आहे ते त्रिलोचन घाट परिसरात म्हणजेच ठोक धान्य बाजारात आहे. यापेक्षा अधिक म्हणजे शहरातील फार मोठा धार्मिक परिसर म्हणजे गंगाकाठ होय. हा गंगाकाठ प्रवासी आणि व्यापारी वाहतुकीचे व व्यापारी केंद्र होते. वाराणसीमध्ये दिसणाऱ्या राजपूत घराण्यांनी निर्माण केलेल्या स्थापत्याला मागे सारून संपत्ती आणि शक्ती दाखविणाऱ्या मराठा निर्मित स्थापत्याने त्यांची जागा घेतली. सर्व दूर प्रांतातून येणाऱ्या लोकांसाठी वाराणसीमधील तो सर्वात प्रभावशाली देखावा होता.

मराठा निर्मित या मंदिर स्थापत्य प्रकल्पात वाराणसमध्ये नवी मंदिर निर्मिती करण्याऐवजी पूर्वीच्याच पवित्र स्थानांठिकाणी असलेल्या जून्या मंदिरांची पुनर्बांधणी करण्यात आली. अठराव्या शतकातील या नवस्थापत्य प्रकल्पात काही वेळेला जुन्या मोडकळलेल्या/पडीक मंदिरांची पुनर्बांधणी करण्यात आली किंवा चौदाव्या ते सोळाव्या शतकातील मार्गदर्शक पुस्तक अथवा काशी महात्म्यासारख्या प्रशस्तीपर ग्रंथात वर्णन केलेल्या जागी हे नवस्थापत्य आकारास आले.

चौदाव्या शतकातील 'काशीखंड' हा ग्रंथ आणि यातूनच माहिती घेऊन तयार केलेला सोळाव्या शतकातील नारायणभट्ट लिखित 'त्रिस्थळीसेतू' या ग्रंथात काशी, प्रयाग आणि गया या ठिकाणची सर्व पवित्र स्थाने व शास्त्रविधी प्रकारांचे वर्णन केले आहे. बाजीराव पेशवा प्रथम निर्मित वाराणसीमधील स्थापत्य हे वाराणसीमधील पाच स्नानस्थानांपैकी तीन स्नानस्थानांच्या जागी म्हणजेच दशाश्वमेध, मणिकर्णिका आणि पंचगंगा घाटाच्या जागीच निर्माण केले गेले. चौथे स्नानाचे ठिकाण आदिकेशव घाटाची पुनर्बांधणी ही ग्वाल्हेरच्या शिंद्यांच्या दरबारातील मराठा अधिकाऱ्याने केली. शहरातील प्रमुख शिवलिंग म्हणून 'काशीविश्वनाथ' लिंग आहे असे पहिल्यांदाच जोरकसपणे 'काशीखंड' आणि 'त्रिस्थळीसेतू' या ग्रंथात मांडण्यात आले आहे. नंतरच्या काळात या लिंगाची अहिल्याबाई होळकरांनी पुन:स्थापना केली. राजपूत राजांनी बांधलेल्या पण औरंगजेबाने पाडलेली व खंडहर बनलेली 'काशीविश्वनाथ मंदिर' आणि 'बिंदुमाधव मंदिर' मराठ्यांनी नव्याने बांधली. जुन्या ग्रंथात वर्णन केलेल्या यात्रा मार्गावरील पवित्र स्थानी मराठ्यांच्या आश्रयामुळे बनलेल्या मंदिर स्थापत्याने या शहरात यात्रेकरूंचा अखंड ओघ सुरू झाला व या तीर्थयात्रा पर्यटन उद्योगाचा विस्तार झाला. मराठा आश्रयाखालील ब्राह्मणी पूजाविधी परंपरेमध्ये निपुण असलेल्या

लोकांमुळे तीर्थयात्रा उद्योगाची वाढ झाली. अंतर्गृह यात्रामार्ग हा मणिकर्णिकेला सुरू होतो, मध्ये विश्वनाथ मंदिर लागते आणि दशाश्वमेध ते भोसला घाट दरम्यानच्या जागी तो संपतो. यात्रा मार्गावर ठिकठिकाणी मराठा निर्मित मंदिरे व देवळ्या दिसतात. वाराणसीच्या बाह्य सीमेवरून जाणाऱ्या पाच दिवसाच्या पंचक्रोशी यात्रेचे पहिल्यांदा वर्णन मिळते ते सोळाव्या शतकातील 'काशीरहस्य' या ग्रंथात. अठराव्या शतकात मराठी आणि बंगाली लोकांनी या यात्रेचा विस्तार मोठ्या प्रमाणात केला. मंदिर बांधणी व्यतिरिक्त मराठ्यांनी या यात्रा मार्गावरून जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी सोयीसुविधा निर्माण करण्याचा उपक्रम केला. अहिल्याबाईंनी यात्रा मार्गावर यात्रेकरूंसाठी धर्मशाळा व ब्राह्मणांसाठी निवासस्थाने बांधली. एकोणिसाव्या शतकात पंचक्रोशी यात्रा ही परंपरा बनली.

मराठ्यांनी प्रचंड प्रमाणावर निर्माण केलेल्या मंदिर स्थापत्याचा आढावा घेताना त्यातील काहीच प्रातिनिधीक मंदिरांचा आढावा येथून पुढे आपण घेणार आहोत. त्यातील सर्वात महत्वाचे मंदिर म्हणजे काशीविश्वनाथ मंदिर, याची चर्चा पुढे केली आहे. वाराणसीच्या तीर्थयात्रेतील या मंदिराचे अनन्यसाधारण महत्त्वाचे स्थान आहे. वसाहतकाळाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या मंदिराचा काल आणि आश्रयदाता ओळखणे खूपच सोपे आहे. या स्थापत्याची समकालीन पुरावे अजूनही अस्तित्वात आहेत. पुढील भागात या मंदिराचा इतिहास, त्याचा नाश तसेच त्याची पुनर्बांधणी आणि त्याचा अहिल्याबाईंच्या देशव्यापी धार्मिक स्थापत्य आश्रयाशी काय संबंध आहे याचे परिक्षण करणार आहे.

काशीविश्वनाथ मंदिराचा इतिहास

वाराणसी शहराची अधिदेवता म्हणजेच विश्वनाथ अथवा विश्वेश्वराचे मंदिर हे वाराणसी मधील सर्वात महत्त्वाचे मंदिर आहे. त्यात विश्वनाथाचे मूळ शिवलिंग आहे असे समजले जाते. या मंदिराचा इतिहास मोडका-तुटका असून त्या इतिहासात सलगता दिसून येत नाही. या मंदिराची उभारणी चार वेळा झाली असून इतिहासात हे मंदिर चार वेगवेगळ्या स्थानावर होते अशी स्मृती आहे. त्याच्या धाटणीत/शैलीत आणि स्थानात बदल होत गेले, विश्वनाथाचे लिंग हे आदिकालीन आहे अशी जरी उपासकाची मनोधारणा असली तरी सर्वात पहिल्या विश्वनाथ मंदिराचा कालखंड बाराव्या शतकाआधी जात नाही. तेराव्या शतकापर्यंत विश्वनाथ मंदिर हे हिंदूचे महत्त्वाचे मंदिर म्हणून उदयास आले नव्हते. बाराव्या शतकाच्या प्रशस्तीत विश्वनाथ मंदिराला फारच कमी स्थान मिळाले होते. त्यांनतर प्राचीन ग्रंथात अविमुक्तेश्वराच्या महत्तेची जागा हळूहळू विश्वनाथाने व्यापलीच पण प्रत्यक्षात त्याच्या स्थानावरही अतिक्रमण केले. विश्वनाथ मंदिराच्या बांधणी आणि पुनर्बांधणी मध्ये, तसेच मंदिराची महत्ता वाढविण्यात मराठी लोकांचे योगदान

आहे. नारायणभट्ट, नारायण दीक्षित पाटणकर आणि अहिल्याबाईं होळकरांच्या योगदानाचा अभ्यास करणे म्हणूनच आवश्यक ठरते

विश्वनाथ मंदिराचा सर्वात जुना संदर्भ बाराव्या शतकातील शिलालेखात मिळालेला असून विश्वनाथ मंदिराच्या पूजा/उपासनेत गाहडवाल राजा गोविंदचंद्र तसेच कर्नाटकातील यात्रेकरू देखील आकर्षित झाले होते (Eck 1999: 120). या मूळच्या विश्वनाथ मंदिराचे स्थान हे वाराणसी शहराच्या बरोबर मध्यभागी होते. इ.स. १२१२ मध्ये दुसरा शिलालेख मिळाला. त्यात गाहडवाल राजाचा पराभव बंगालचा सेन राजा विश्वरूपाने केला तेव्हा त्या विजयाप्रित्यर्थ त्याने असी, वरुणा आणि गंगा नद्यांच्या संगमावर असलेल्या विश्वेश्वर क्षेत्राच्या ठिकाणी या विजयाच्या स्मृतीप्रित्यर्थ जयस्तंभ उभारला असे म्हटले आहे (EI XXXIII, 322). सध्या अस्तित्वात असलेल्या रझिया मशिदीच्या ठिकाणी हे मंदिर होते असे सर्व जण समजतात/मानतात. दिल्लीचा सुलतान असलेल्या 'रझिया सुलतानाने' (१२३६-१२४०) हे मंदिर पाडून त्याजागी 'रझिया मशीद' बांधली. तेराव्या शतकाच्या शेवटी हे मंदिर पुन्हा दुसऱ्या स्थानी बांधले असावे. ते पंधराव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकात जौनपूरच्या शर्की राजवटीने पुन्हा नष्ट केले. याला पुरावा मिळतो तो जौनपुरच्या लाल मशिदीवरील शिलालेखाचा. इ.स. १४४७ मध्ये ही लाल मशीद बांधण्यात आली. त्यावेळी या मशिदीच्या बांधकामात बनारसमधील पद्मेश्वर मंदिरातील दगडांचा वापर केला गेला. त्यामध्ये काशीमध्ये इ.स. १२९६ मध्ये पद्मेश्वर मंदिर बांधले गेले असा आशय असलेला एक शिलालेखाचा दगडही चिंबण्यात आलेला आहे. तो लेख पुढील प्रमाणे आहे:

> तस्यात्मजः युचिर्धीरः पद्मसाधुरयं भुवि, काश्यां विश्वेश्वरद्वारि हिमाद्रिशिखरोपमं।
>
> पद्मेश्वरस्य देवस्य प्रकारमकरात्सुधी, ज्येष्टे मासि सिते पक्षे द्वादश्याम्बुधवासरे ॥
>
> चिखिते मे सदा याति प्रशस्ति प्लववत्सरे संवत् १३५३।

शिलालेखाचा अर्थ असा आहे की पद्मसाधु ने काशीविश्वेश्वराच्या मंदिरासमोर विक्रम संवत १३५३ म्हणजे इ.स. १२९६ मध्ये पद्मेश्वर मंदिर बांधले. म्हणजेच इ.स. १२९६ मध्ये काशी मध्ये विश्वेश्वर मंदिर अस्तित्वात होते. पंधराव्या शतकात जौनपुरच्या शर्की राजवटीत या पद्मेश्वर मंदिराचा विध्वंस होत असताना त्याच्या समोरील विश्वेश्वर मंदिराचाही विध्वंस केला गेला असण्याची शक्यता आहे (मोतीचंद्र १९६२: १९०).

इ.स. १५८५ मध्ये नवीन विश्वनाथ मंदिर परत उदयास आले/बांधले गेले. स्थानिक परंपरेनुसार हे मंदिर अकबराचा राजस्व मंत्री राजा तोडरमल आणि मूळचे महाराष्ट्रातील पण वाराणसीमध्ये स्थायिक

झालेल्या घराण्यातील नारायणभट्ट यांच्या दोघांच्या एकत्रित सहकार्याने हे बांधले गेले. देशात दुष्काळ पडला असताना नारायणभट्टांच्या प्रार्थनेमुळे पाऊस पडून सगळीकडे आनंद पसरला. त्यामुळे स्थानिक मुस्लिम अधिकाऱ्याच्या परवानगीने त्याला विश्वेश्वर मंदिर बांधण्याची परवानगी मिळाली (Altekar 1937: 48). नारायणभट्टांचा नातू दिवाकरभट्टांने सतराव्या शतकात लिहिलेल्या 'दानहारावली' ग्रंथात रामेश्वरभट्टांचा मुलगा नारायणभट्ट यांनी अविमुक्त क्षेत्र वाराणसीमध्ये विधिपूर्वक विश्वेश्वराची स्थापना केली असे लिहिले आहे. काशीत प्रचलित असणाऱ्या दुसऱ्या परंपरेनुसार एकदा राजा तोडरमलने वार्षिक श्राद्धविधीकरीता नारायणभट्टांना आमंत्रित केले. त्यावेळी नारायणभट्टांच्या उपस्थितीत राजाच्या दृष्टीस आपले पूर्वज पडले. यामुळे राजा व नारायणभट्टांचे संबंध दृढमूल झाले. त्यामुळे विश्वेश्वर मंदिर परत बांधण्याच्या कामाला आर्थिक सहाय्य राजा तोडरमलने केले (Altekar 1937: 49).

सन १५७४-१५७६ मध्ये मुघल सैन्याने बंगाल व बिहारवर मिळविलेल्या विजयामध्ये राजा तोडरमलचा प्रमुख सहभाग होता. मंदिर बांधण्याच्या वेळी हा बंगालचा सुभेदार होता. वाराणसी बंगालच्या सानिध्यात/जवळ असल्याने वाराणसीमधील या मंदिराला त्याचा उदार आश्रय लाभणे सहज शक्य होते. अकबरच्या सेवेतून निवृत्त होताना राजा तोडरमलने हरिद्वारला राहण्याची इच्छा व्यक्त केली होती (Das 1979: 130). त्याच्या या कृतीतूनच त्याचे हिंदू तीर्थक्षेत्रांविषयीचे प्रेम दिसून येते.

विश्वनाथ मंदिरा व्यतिरिक्त राजा तोडरमलने आणखी काही स्थापत्य बांधले आहे का याबाबत माहिती मिळत नाही. परंतु तोडरमलचा समकालीन तसेच मुघलांच्या दरबारातील वरिष्ठ मनसबदार/अधिकारी, अंबेरचा राजा मानसिंग, याने तोडरमलच्या विश्वनाथमंदिरासारखीच काही बांधकामे/स्थापत्ये वाराणसीमध्ये बांधली आहेत. हा सुद्धा वाराणसीमधील एक प्रमुख आश्रयदाता होता. त्याने हवेल्या, बागा, मंदिरे आणि मशिदीसुद्धा मुघल राज्यात बांधल्या. या त्याच्या स्थापत्य बांधणीतून फत्तेपूरसिक्री सारख्या समकालीन मुघल स्थापत्याची वैशिष्ट्ये झळकतात. मुगल मनसबदार, हिंदू राजा आणि कछवाह घराण्याचा प्रमुख या नात्याने त्याने या स्थापत्याला आश्रय दिला होता. राजा मानसिंग निर्मित स्थापत्याचा मोठा अविष्कार म्हणजे वृंदावन येथील प्रसिद्ध 'गोविंददेव मंदिर' होय (सन १५९०). या मंदिराचा मंडप हा अकराव्या शतकातील हिंदू मंदिराप्रमाणे साधारणपणे फुलीच्या (क्रूसाच्या) आकाराचा आहे. स्तंभ, हस्त, महिरपीयुक्त कोनाडे तसेच घुमट आणि त्याला छेदून जाणारी गजपृष्ठाकृती छते यातून मंदिराच्या आत अधिक मोकळी जागा निर्माण झाली. मशिदीच्या रचनेत जास्तीत जास्त लोकांना नमाज पढण्यासाठी अधिक जागा निर्माण केलेली असते. तद्वतच मुस्लिम लोकांच्या सहचार्याने हिंदू मंदिर स्थापत्य रचनेतही जास्तीत जास्त भक्तगणांना सामावून घेण्याच्या गरजेतून हे लक्षण मुघल स्थापत्य रचनेतून

हिंदू मंदिरामध्ये आलेले दिसते. राजा मानसिंग सारखे मुघल स्थापत्याला आश्रय देणारे, मुघल राजधानीपासून दूरच्या प्रादेशिक केंद्रावर नियुक्ती असणाऱ्या मुघल मनसबदारांमुळे या शैलीचा संपूर्ण मुघल साम्राज्यात प्रसार झाला (Asher 1992: 184-191).

मुघल आश्रयदात्याच्या अंतर्गत मोडणाऱ्या या छोट्या आश्रयदात्याच्या पार्श्वभूमीवर राजा तोडरमलच्या विश्वनाथ मंदिराकडे बघणे आवश्यक आहे. तोडरमल/नारायणभट्टाच्या विश्वनाथ मंदिराच्या सध्या अस्तित्वात असलेल्या स्थापत्यातून असे सूचीत होते की ते गोविंददेव मंदिरासारखेच आहे. सोळाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि सतराव्या शतकाच्या पूर्वार्धातीत उच्चपदस्थीय मुघल मनसबदार राजा तोडरमल आणि राजा मानसिंग द्वारा बांधलेल्या हिंदू स्थापत्याची दृष्यभाषा आणि स्थापत्यतंत्र हे एकसारखेच होते. या स्थापत्याचा भव्य आकार व उंची द्वारे त्याच्या आश्रयदात्याची संपन्न आर्थिक स्थिती व श्रेष्ठता दिसून येते. आधीच्या नागर शैलीतील मंदिरामधील पारंपरिक स्तंभ बांधणीमधून गजपृष्ठाकृती मोठ्या आकाराचे मंडप तयार झाले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर भाविक त्यामध्ये सामावून घेतले जावू लागले. भक्ती चळवळीतील सामूहिक उपासना पद्धतीला सामावून घेणारी अशी ही मंडपाची बांधणी होती. नक्षीकामातले वारकावे, मंदिराच्या वरील भागाला आधार देणारे हत्तीच्या सोंडेच्या आकाराचे हस्त, इमारतीच्या दर्शनीभागी पुढे आलेले झरोखे हे मुघल स्थापत्यशैलीतून उचलले गेले आणि स्थानिक व प्रादेशिक परंपराच्या विलयातून एक नवीनच वैशिष्ट्यपूर्ण मंदिर शैली निर्माण झाली.

राजा तोडरमलचे हे विश्वनाथ मंदिर हे शिवाला अर्पण केलेले आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या अवशेषातून असे लक्षात येते की हे मंदिर स्थापत्य मोठ्या प्रमाणावर वैष्णव मंदिर स्थापत्याशी जुळणारे आहे. मंडपाचा पदविन्यास साधारणपणे फुलीच्या आकाराचा (क्रुसाप्रमाणे) आहे. बाहेरील भिंतीवर गोविंददेव मंदिराप्रमाणे सलग थर आहेत. मेहराबीयुक्त भिंतीतील देवळ्या (कोनाडे) आणि दरवाजे, हत्तीच्या सोंडेच्या आकाराचे हस्त (brackets) यातून सोळाव्या शतकातील मुघल तसेच त्याच्या मांडलिकांच्या आश्रयाखालील स्थापत्य रचनेशी साम्य दिसून येते. यात वाराणसीमधील मानमंदिर घाटावरील हवेलीचाही अंतर्भाव होतो. मुघल स्थापत्य शैलीचा प्रभाव असणारे विश्वनाथ मंदिर हे वाराणसीतील एकमेव उदाहरण नव्हते. राजा मानसिंग किंवा ओच्छांचा राजा वीरसिंहदेव याने बांधलेल्या बिंदुमाधव मंदिराचाही पदविन्यास फुलीच्या आकाराचा (क्रुसाच्या आकाराचा) आणि भव्य घुमट असलेला होता असे सतराव्या शतकात भारत फिरायला आलेल्या जीन बाप्टीस्ट टाव्हर्नी (१६३६-१६४०) याने लिहिलेले आहे (Tavernier 1889: 180-181). बाल्ख प्रांतातील मुहंमद बिन अमीर वली बाल्खी हा जेव्हा सन १६२४ ते १६३१ मध्ये प्रवासी म्हणून भारतात आला होता, त्यावेळी त्याने 'अभूतपूर्व आणि तुलना करता न येणारे लाला वीरसिंह

देवाचे मंदिर' असे वर्णन केलेले आहे. परंतु हे स्पष्ट होत नाही की त्याचा रोख विश्वनाथ मंदिराकडे होता की बिंदुमाधव मंदिराकडे होता. वाराणसी मधील या मंदिरांना मोठ्या प्रमाणावर आणि भरपूर आर्थिक मदत मुघल दरबारातील हिंदू मनसबदार करीत होते.

विश्वनाथ मंदिराच्या उभारणीमध्ये प्रसिद्ध महाराष्ट्रीय ब्राह्मण नारायणभट्टांचा सहभाग असल्यामुळे या मंदिराची किर्ती आणि पवित्रता आणखीनच वाढली. संस्कृत विद्येला प्रोत्साहन आणि आश्रय देण्याच्या राजा तोडरमलच्या कृतीमुळे विश्वनाथ मंदिर उभारण्यापूर्वीच त्याची आणि नारायणभट्टांची ओळख व संबंध वाढले असण्याची शक्यता आहे किंवा राजा तोडरमलने केलेल्या श्राद्धविधी मध्येही त्यांचा सहभाग असल्यामुळे ते आधीपासूनच एकमेकांना ओळखत असावेत (Das 1979: 214-215). विश्वनाथ मंदिराच्या उभारणीसाठी आर्थिक मदत करा अशी खुद्द नारायणभट्टानेच राजा तोडरमलला विनंती केली असावी (Altekar 1943: 19). नारायणभट्टाने लिहिलेल्या विविध साहित्यग्रंथामुळेच सोळाव्या शतकात विश्वनाथ मंदिराचे महत्त्व वाढले. त्याने लिहिलेल्या 'त्रिस्थळीसेतू' या ग्रंथातील एक विभाग काशीवर असून 'काशीखंड' नामक ग्रंथातील माहिती मोठ्या प्रमाणावर त्यात घेतली आहे. काशीच्या धार्मिकतेचा एक स्रोत/साधन म्हणून विश्वनाथ मंदिराच्या महत्त्वावर अधिक जोर/भर दिला आहे (O'Hanlon 2010: 218). धर्मशास्त्र आणि धार्मिक कायदेकानू याबाबतीतले तंटे सोडविण्यासाठी काशीच्या ब्राह्मणसभा विश्वनाथ मंदिराच्या स्थानाचा वापर करीत होते. राज्याचे मुस्लिम अधिकारी सुद्धा वारंवार/नेहमी हिंदू समाजातील सामजिक-राजकिय तंटे सोडविण्यासाठी काशीतील या ब्राह्मण सभेशी सल्लामसलत करीत असत. विश्वनाथ मंदिर हे न्याय आणि नैतिकतेचे एक केंद्र बनले (O'Hanlon 2011: 265-266). या ब्राह्मण घराण्यांचे विश्वनाथ मंदिराशी फारच जवळचे संबंध होते. यातील बहुतेक घराणी ही महाराष्ट्रातून वाराणसीत स्थलांतरीत झाली होती. त्यामुळेच की काय उत्तरकालीन मराठ्यांच्या नजरेत या मंदिराचा जीर्णोद्धार करावा ही इच्छा उत्पन्न झाल्याची शक्यता आहे.

इ.स. १६६९ साली औरंगजेबाच्या आज्ञेनुसार विश्वनाथ मंदिर पाडले गेले. या मंदिराच्या मंडपाचा पदविन्यास तसाच ठेवून त्यावर आज अस्तित्वात असलेली मशीद उभारली गेली आहे. या मशिदीला 'ज्ञानवापी मशीद' असे म्हणतात. याला संदर्भ आहे तो ज्ञानवापीचा. औरंजेबाचे सैन्य जेव्हा हे मंदिर पाडायला/विध्वंस करायला आले, तेव्हा या ज्ञानवापीमध्ये विश्वनाथाचें लिंग टाकले गेले (Eck 1999: 126). याचप्रमाणे इ.स. १६७२ मध्ये औरंगजेबाच्याच आज्ञेने 'बिंदुमाधवाचे' प्रचंड मंदिर पाडले गेले. आज त्या ठिकाणी मशीद उभी असून ती 'औरंगजेबाची मशीद' म्हणून ओळखली जाते. बिंदुमाधवाचे एकोणिसाव्या शतकात पंचगंगाघाटावर पुनर्वसन करण्यात आले आहे. अशा स्थापत्य प्रकल्पामुळे शहराच्या

वैशिष्ट्यांमध्ये धार्मिक चिन्हांद्वारे बदल केले जातात. औरंगजेबाने वाराणसीचे नावच 'मुहंमदाबाद' करून वाराणसीला मुस्लिम ओळख देण्याचा प्रयत्न केला. मात्र तो असफल ठरला (Eck 1999: 135).

काशीतील हिंदू मंदिर पाडण्यापाठीमागे धर्म हे एकमेव कारण आहे असे सरधोपटपणे सांगितले जाण्याची शक्यता आहे. प्रत्यक्षात काशीतील हिंदू मंदिरे पाडण्यामध्ये औरंगजेबाचा धार्मिक तसेच राजकीय उद्देश होता. या मंदिरांच्या आश्रयदात्यांमध्ये असलेल्या मुस्लिम विरोधाला ताकीद/शिक्षा देणे असाही उद्देश होता. औरंगजेबाच्या कैदेतून सुटल्यानंतर शिवाजी महाराज हे काशीमार्गे महाराष्ट्रात आले. त्यांच्या काशीतील वास्तव्यात तेथील महाराष्ट्र ब्राह्मणांनी त्यांना मदत केली. त्याचा राग मनात ठेवून औरंगजेबाने विश्वनाथ तसेच इतर हिंदू मंदिरांचा नाश केला. वाराणसीच्या ब्राह्मणांचे मुघल दरबाराशी जवळचे संबंध होते हे ही कारण मंदिरांच्या विरोधी गेले (O'Hanlon 2011: 267). कारण औरंगजेबाचा सख्खा भाऊ दारा शुकोह हा वाराणसीचे ब्राह्मण आणि मुघल दरबार यांच्यातील दुवा होता, तसेच त्याचा आश्रयही त्यांना होता. त्याची हत्या सन १६५९ साली औरंगजेबाने केली. इ.स. १६५९ साली औरंगजेबाने दिलेले एक पत्र उपलब्ध असून त्यात वाराणसीच्या ब्राह्मणांना संरक्षण दिलेले आहे. यातून औरंगजेबाचा कारभार कळतो. औरंगजेबाच्या कट्टर धार्मिकतेमुळे त्याने वाराणसीतील हिंदूच्या प्रत्येक मंदिराचा नाश केला असे घडले नाही. परंतु त्याच फर्मानाच्या आधाराने त्याने काशीत नवीन मंदिरे न बांधण्याचा फतवाही काढला होता (मोतीचंद्र १९६२: २२५).

मुस्लिम सत्तेविरूद्ध हिंदू धर्माचे रक्षणकर्ते म्हणून मराठ्यांची प्रतिमा तयार झाली होती. यात काही आश्चर्य नाही की जेव्हा वाराणसीतील मराठ्यांचा आश्रय सुरू झाला त्यावेळी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी अनेक आश्रयदाते पुढे आहे. सन १७४३ मध्ये नानासाहेब पेशवे आणि मल्हारराव होळकर यांनी मशीद पाडून काशीविश्वेश्वराचे मंदिर बांधावे असा विचार केला होता. परंतु वाराणसीच्या ब्राह्मणांनी मुघल बादशहांच्या भीतीने याला विरोध केला. अवधच्या नबाबाकडून ईस्ट इंडिया कंपनीकडे जेव्हा वाराणसी प्रांत हस्तांतरीत झाला, त्यानंतर सन १७९२ साली पेशव्यांचा प्रमुख मंत्री नाना फडणवीस याने ज्ञानवापी मशीद पाडून त्याजागी विश्वनाथ मंदिर पुन: बांधण्याची परवानगी मागितली होती. परंतु ब्रिटीशांनी धार्मिक दंगे होतील या भीतीने ती परवानगी दिली नाही. सन १७७७ साली मल्हारराव होळकरांची सून अहिल्याबाई होळकर यांनी विश्वनाथाचे मंदिर बांधले. परंतु ते मूळच्या ज्ञानवापी मशिदीच्या स्थानी नसून त्याच्या शेजारील जागेत बांधले गेले. अहिल्याबाईंनी मंदिर बांधताना ईस्ट इंडिया कंपनीशी काय वाटाघाटी केल्या त्याबद्दल कागदोपत्री पुरावे मिळालेले नाहीत. परंतु मंदिराच्या स्थानाबाबत तडजोड केल्याने ईस्ट इंडिया कंपनीची परवानगी मिळाली असावी. मंदिराचे स्थान थोडेसे बदलले असले तरी अहिल्याबाईंचे विश्वनाथ

मंदिर लवकरच यात्रा मार्गात समाविष्ट झाले. लवकरच या मंदिराने वाराणसीच्या धार्मिक भूगोलामध्ये मध्यवर्ती स्थान मिळविले. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर नौबतखाना बांधण्याचे आदेश वॉरन हेस्टींग्जने वाराणसीचा/बनारसचा मॅजिस्टेट अली इब्राहीम खानास दिले.

वाराणसी आणि अहिल्याबाई

वाराणसीमध्ये शिवमंदिराचा जीर्णोद्धार करणे ही काही साधी गोष्ट नाही. काशीचे विश्वनाथ मंदिर बांधणे हे अहिल्याबाईंच्या आपल्या प्रदेशामधील आणि प्रदेशाबाहेरील मुख्यत्वे करून भारतातली हिंदू तीर्थस्थानामधील बहुआयामी स्थापत्य बांधणी प्रकल्पातील एक काम होते. त्यांच्या तीस वर्षाच्या राज्यकाळात अहिल्याबाईंनी अनेक धार्मिक इमारती बांधल्या. भारतभर पसरलेल्या बारा ज्योर्तिलिंगांपैकी आठ ज्योर्तिलिंगांना देणग्या दिल्या. त्यामध्ये वाराणसी, वैजनाथ, सोमनाथ, घृष्णेश्वर या मंदिरांचा समावेश होतो. अहिल्याबाईंनी शैव तसेच वैष्णव तीर्थक्षेत्रीही मंदिरे, धर्मशाळा, ब्रह्मपुरी आणि घाट बांधले. त्यामध्ये अयोध्या, मथुरा, गया, प्रयाग, वृंदावन, हरिद्वार, कांचीपूरम, उज्जैन , जगन्नाथपुरी, आणि रामेश्वर इत्यादी ठिकाणांचा समावेश होतो (Thakur 1969: 34-41). भारतभर तसेच नेपाळ मध्ये असणाऱ्या तीर्थस्थानांना गंगाजल पाठविण्याचा प्रघात अहिल्याबाईंनी पाडला. गंगेपासून दूर असणाऱ्या दक्षिणेतील प्रदेशात या प्रघाताचे स्वागत झाले (Malcolm 1924: 187). याच काळात दुसरे मराठी राज्यकर्ते सुद्धा मराठी राज्याबाहेरील तीर्थस्थानांच्या ठिकाणी धार्मिक दाने देत होती. परंतु या सर्वात अहिल्याबाईंचे काम लक्षवेधक ठरते.

अहिल्याबाईंच्या 'धार्मिक राज्यकर्ती' या प्रतिष्ठेचा परिणाम म्हणून त्यांना राज्याच्या कारभारचा आणि स्त्री राज्यकर्ती म्हणून अधिकार मिळाला. 'A Memoir of Central India (1824)' या ग्रंथात जॉन माल्कमने काही तोंडी मुलाखती घेतल्या, त्यात अहिल्याबाईंच्या काळात पेशव्यांच्या पुणे दरबारात काम करणाऱ्या ब्राह्मणाने काय सांगितले ते अधोरेखीत केले आहे. ब्राह्मण सूचीत करतो की, ''अहिल्याबाईंचा धार्मिक गोष्टींना असलेला आश्रय हे प्रशंसनीय (admirably calculated) कार्य आहे. त्यामुळे त्यांना राजकीय कूटनीतीमध्ये भरपूर फायदे मिळाले आहेत. त्यांचा शत्रू सुद्धा त्यांच्याकडे पवित्र स्त्री म्हणून बघतो'' (Malcolm 1924: 188-189). स्त्रियांना राज्यावर येण्याचा अधिकार नाही. संपूर्ण मराठेशाहीत अहिल्याबाईंच्या अगोदर फक्त महाराणी ताराबाईंचे एकमेव उदाहरण आहे. स्त्रियांना पत्नी किंवा राज्यकर्त्यांची विधवा म्हणून अथवा राज्याच्या वारसदाराची आई म्हणून राज्य करणे शक्य होते. परंतु मुलगी म्हणून कदापीही शक्य नव्हते. स्टुअर्ड गॉर्डनच्या मतानुसार एक प्रशिक्षण, दोन अधिकारीक कृत्ये आणि तीन दरबारात पाठिंबा देणाऱ्या नवीन कारभारी लोकांची फळी तयार करणे, या तीन पद्धतीद्वारे

मराठा स्त्री राज्यकर्तीला वैधता स्थापित करणे आणि विश्वासार्हता तयार करणे शक्य होते. यशस्वी मराठा स्त्री राज्यकर्तीला लष्कर, कारभारातील उच्च अधिकारी आणि नातेसंबंधांमध्ये आदर आणि प्रामाणिकपणा असणे आवश्यक आहे (Godon 1994: 74-78).

लष्करी, प्रशासनिक आणि कूटनीती संबंधींचे प्रशिक्षण अहिल्याबाईंनी आपले सासरे मल्हारराव होळकर यांच्याकडूनच मिळाले होते. स्त्री म्हणून त्यांना राज्यावर येण्याचा अधिकार नसल्याने त्या सहजासहजी उत्तराधिकारी झाल्या नाहीत. अनेक विघ्ने त्यामध्ये आली. त्यांच्या सासऱ्यांच्या पश्चात अहिल्याबाईं विधवा तसेच त्यांच्या मुलाची माता म्हणून राज्यांवर आल्या. त्यांचे पती खंडेराव (सन १७२३-१७५४) हे आधीच लढाईत मारले गेले होते. त्यांना मुलगा होता, तो उत्तराधिकारी झाल्यावर एका वर्षातच वारला. त्यांचा मंत्री गंगाधर यशवंताने रघुनाथरावांना पाठिंबा दिला. होळकर राज्याकरीता एक मुलगा दत्तक घ्या असे अहिल्याबाईंना रघुनाथरावांनी सांगितले. परंतु अहिल्याबाईंनी लष्कर, तसेच इतर सरदार - महादजी शिंदे आणि जानोजी भोसले यांच्या सहकार्याने दत्तक न घेता माधवराव पेशव्यांकडून राज्यकारभाराची सनद मिळविली. प्रशासकीय आणि लष्करीदृष्ट्या पाठिंबा व सहकार्य मिळविण्यासाठी त्यांनी आपल्या घराण्याशी नातेसंबंध नसणाऱ्या तुकोजी होळकरांची लष्करी दृष्टीकोनातून निवड केली. याच वेळी त्यांनी कारभारी मंडळात उत्तम कामगिरी दाखवू इच्छिणाऱ्या, नातेसंबंध नसणाऱ्या माणसांची निवड करण्याकडे लक्ष दिले (Godon 1994: 78).

अहिल्याबाईंचा धार्मिक स्थापत्याला असणाऱ्या आश्रयामुळे स्त्री राज्यकर्ती म्हणून त्यांना वैधता प्राप्त झाली. मोठ्या प्रमाणावरील धार्मिक स्थापत्याला दिलेला आश्रय ही काही त्यांची एकमेव व अद्वितीय अशी कामगिरी नव्हती. स्वत:चे पुतळे किंवा प्रतिमा शिल्पांचा उपयोग त्यांनी स्वत:च्या राजकीय उपयोजनात केला. यातच त्यांचे वेगळेपण दिसून येते. जयपूरच्या एका कलाकाराकडून अहिल्याबाईंनी आपल्या मूर्ती करविल्या व त्या इंदूर, अलाहाबाद, नाशिक, गया, अयोध्या, महेश्वर इत्यादि ठिकाणच्या मंदिरात ठेवल्या (पुरुषोत्तम १९१३: २३५). डाव्या हातात घेतलेले छोटे शिवलिंग, उजव्या हाताने पान अर्पण करताना आणि दररोजच्या वापरातील साध्या पेहरावातील अहिल्याबाईंच्या प्रतिमा मंदिरात कोरल्या गेल्या. हातात घेतलेले शिवलिंग आणि साधी पांढरी साडी नेसलेल्या अहिल्याबाईंच्या नंतरच्या काळातील चित्रांच्या पाठीमागील प्रेरणा याच प्रतिमांतून मिळाली आहे **(चित्र ३२ आणि ३३).**

होळकर आणि शिंदे घराण्यातील राज्यकर्त्यांच्या छत्रीत त्यांच्या प्रतिमा/शिल्प बसविणे ही पारंपरीक पद्धत होती. अहिल्याबाईंची गोष्ट वेगळी आहे. त्यांच्या मृत्यूनंतर नव्हे तर हयातीतच त्यांच्या प्रतिमा प्रतिष्ठित केल्या गेल्या. त्यांच्या राजधानीत महेश्वर येथे त्यांच्या स्मरणार्थ बांधल्या गेलेल्या छत्रीतच


नव्हे तर अनेक ठिकाणी त्यांच्या प्रतिमा प्रतिष्ठत/कोरल्या गेल्या. अहिल्याबाईंचे मराठी चरित्र लिहिणारे पुरूषोत्तम असे म्हणतात की या मूर्ती करविण्याचे व त्या मंदिरात ठेवण्याचे प्रयोजन हेच की, आपण एक ईश्वरभक्त आहोत व ईश्वराची प्रार्थना करीत आहोत असा आपला मागे लौकीक राहावा. त्या मूर्ती मंदिरात स्थापावयाच्या हेतूने ठेवल्या नसून ती ईश्वरसेवा करीत आहोत हे दाखविण्यासाठी त्या तेथे ठेवल्या आहेत. ह्यापेक्षा त्या मूर्ती घडविण्यात तिचा (अहिल्याबाईंचा) दुसरा हेतू कोणतात नव्हता (पुरुषोत्तम, १९१३:२३५). याउलट अहिल्याबाईंनी आपल्या मूर्तींचा उपयोग आपल्या राजकीय उपयोजनांमध्ये केला असे मत मेलिया बेली प्रतिपादतात (Shin 2015: 42). मेलिया बेली ''राजपूत आणि मराठा छत्री'' या त्यांच्या अभ्यासात असा युक्तीवाद करतात की, लिंगाच्या जवळ प्रतिमा बसविणे म्हणजे त्या राज्यकर्त्याला स्वर्गातील शिवाच्या दरबारातील मंत्री/दिवाण दाखविणे, राज्यकर्त्यांच्या अधिकाराला दैवी अधिष्ठान आहे हे जाहीर करणे हा हेतू यापाठीमागे असावा. शिंद्यांच्या छत्रीमध्ये स्मरणार्थ बसविलेल्या प्रतिमा/शिल्पामध्ये एखाद्या आज्ञाधारक मंत्र्याप्रमाणे नव्हे तर राज्यकर्ता म्हणून शिंदे ज्याप्रमाणे दरबारात पोषाख करीत, वावरत/हावभाव करीत असत, त्याच पोषाखाचे अंकन आणि हावभाव दिसतो. यातून शिवापेक्षा राज्यकर्त्यांचे श्रेष्ठत्व हे जास्त आहे हे अधोरेखीत होते. अहिल्याबाईंची प्रतिमा शिल्प संदिग्ध आहे. एकीकडे मंदिरातील प्रतिमेत त्यांना शिवाची उपासक म्हणून दाखविली आहे, तर दुसरीकडे डोळे उघडे ठेवून समोर पाहणाऱ्या अहिल्याबाईच्या प्रतिमेत दैवीशक्ती असून त्यांचे दर्शन घ्या असे दर्शनार्थींना सूचविते. या प्रतिमाशिल्पातून अहिल्याबाई या शिवभक्त तसेच अर्धदैविक महत्त्व असलेल्या राणी/राज्यकर्ती म्हणून पुढे येतात. तीर्थस्थानाच्या ठिकाणी असणाऱ्या मंदिरातील त्यांच्या प्रतिमा/शिल्पांना हक्काचे प्रेक्षक/दर्शनार्थी प्राप्त होतात. त्यामुळे दैवी गोष्टींच्या जवळीकी बरोबरच दूरदूरच्या ठिकाणीही त्यांचे अस्तित्व प्रस्थापित होते (Shin 2015: 42).

विविध मंदिरातील अहिल्याबाईंच्या प्रतिमांबाबत इथे विवेचन करण्याचे कारण की अहिल्याबाईंकृत विश्वेश्वर मंदिरात विश्वेश्वराच्या उजव्या बाजूला प्रदक्षिणेच्या डाव्या बाजूला कोपऱ्यात एका बाईंच्या मूर्तीची स्थापना आहे. तिच्या हातात शिवाची पिंडी आहे. ही मूर्ती अहिल्याबाईंचीच आहे. पण हल्ली तिला पंडे अज्ञानामुळे 'अन्नपूर्णा' म्हणतात (वझे १९३९: ३८). प्रस्तुत अभ्यासक सप्टेंबर २०१६ विश्वेश्वर मंदिरात मध्ये संशोधनासाठी गेलेला असताना तेथील पंड्याने त्या मूर्तीची ओळच 'अन्नपूर्णा' म्हणूनच करून दिली होती.

अहिल्याबाईंच्या या धार्मिक दानधर्मामुळे त्या फ़क्त 'स्त्री राज्यकर्ती ' या दर्जाबाबत जागरूक नव्हत्या तर त्यांनी त्या दर्जाचा उपयोग आपली राजकीय स्थिती बळकट करण्यासाठी आणि आर्थिक स्वातंत्र्य अबाधीत राखण्यासाठीही केला. अहिल्याबाईंच्या या धार्मिक आश्रयाला त्यांच्या खाजगीकडून



चित्र ३२: अहिल्याबाई होळकर यांची प्रतिमा, शिवमंदिर,
अहिल्याबाई होळकर घाट




चित्र ३३: अहिल्याबाई होळकर यांची प्रतिमा, मणिकर्णिका घाट

आर्थिक मदत मिळत होती. होळकर राज्यात ही सनद वंशपरंपरेने होळकर राज्यातील प्रमुख स्त्रीस मिळत असे. मल्हारराव होळकरांनी लष्करी मोहिमेत दिलेल्या सहभागाबद्दल पहिल्या बाजीरावांनी त्यांना मालवा प्रांत दिला. यात या सनदेचे बीज/मूळ आहे. प्रत्येक परगण्यातील काही भाग गौतमीबाई-मल्हाररावांची पत्नी यांना खाजगी म्हणून दिला गेला. जेव्हा अहिल्याबाई राज्यावर आल्या आणि सन १७६७ मध्ये माधवराव पेशव्यांकडून त्यांना या बाबतीत मान्यता मिळाली, त्यावेळी माधवराव पेशव्यांनी खाजगीवरील त्यांच्या मालकीहक्कांवर पुन्हा शिक्कामोर्तब केले. याच खाजगीतून अहिल्याबाईंनी आपली धार्मिक बांधकामे केली (Thakur 1969: 46-47). याच खाजगीतून अहिल्याबाईंनी आपली महेश्वर ही राजधानी वसविली. मल्हारराव होळकरांनी आधी तेथे किल्ला बांधला होता. परंतु अहिल्याबाईंच्या कारकिर्दीत महेश्वर हे उत्तर भारतातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हणून विकसीत झाले. महेश्वरला 'प्रतिकाशी' बनविण्याचा त्यांचा हा धाडसी प्रयत्न होता. गंगानदीप्रमाणेच पवित्र असणाऱ्या नर्मदेच्या काठी या शहराचे स्थान आहे. दोन्ही शहरातील भौगोलिक साम्यता ही महेश्वरला काशीची प्रतिकृती बनविताना निर्मात्यांना उपयोगी पडली असावी. वाराणसी मधील त्यांच्या निवास संकुलाप्रमाणेच महेश्वर येथील त्यांच्या निवासस्थानातूनही पवित्र नर्मदा नदीचे दर्शन घडते. अहिल्याबाईंनी नर्मदा नदीकाठावर इतर मंदिराबरोबरच 'काशीविश्वेश्वर' मंदिराचीही उभारणी केली आहे. धार्मिक भूगोलाच्या संदर्भात महेश्वर येथे राजधानी स्थापन करण्यात येथील स्थापत्य प्रकल्पाचीही मदत झाली आहे (Shin 2015: 44).

बहुउद्देशीय स्थापत्य प्रकल्पाला आश्रय देण्याच्या अहिल्याबाईंच्या या धोरणामुळेच वाराणसीला एक वेगळे स्थान लाभले आहे. अहिल्याबाईंच्या देशव्यापी तीर्थस्थानांमध्ये वाराणसी मधील स्थापत्य प्रकल्पांना त्यांनी अधिक मोठ्या प्रमाणावर आश्रय दिला आहे. वाराणसीमधील त्यांच्या प्रकल्पात मंदिरे, घाट, ब्रह्मपुरी, धर्मशाळा या बरोबरच खाजगी घरे व बागा याचाही समावेश होतो. अहिल्याबाईंचा राज्याबाहेरील सर्वात आधीचा स्थापत्य प्रकार म्हणजे इ.स. १७७७ साली त्यांनी बांधलेले वाराणसीमधील 'विश्वेश्वर मंदिर' होय. इथूनच त्यांचा देशव्यापी आश्रय सुरू झाल्याचा दिसतो. अहिल्याबाईंच्या वाराणसीमधील तीन महत्त्वाच्या मंदिरावर प्रकाश टाकताना पुढील भागात या मंदिरांमुळे निर्माण झालेले सातत्य, वैधता आणि अधिकारीत्व या भूमिकांचे परिक्षण करणार आहोत.

अहिल्याबाईंकृत काशीविश्वनाथ मंदिराचे स्थापत्य (आकृती क्र.१०)

अहिल्याबाईंनी वाराणसीमध्ये बांधलेली तीनही मंदिरे ही शिवाची आहेत. इ.स. १७७७ मध्ये बांधलेल्या विश्वनाथ मंदिराव्यतिरिक्त अहिल्याबाईंनी मणिकर्णिका घाटावर तारकेश्वर मंदिर (सन १७९१) बांधले (CPC-IX, L.No.1054, pp.231). तिसरे मंदिर हे दशाश्वमेध घाटाशेजारील अहिल्याघाटावरील हवेली/वाडा



अहिल्याबाई होळकर यांच्या विश्वेश्वर मंदिराचा पद्‌विन्यास



पक्षदर्शन (प्रिन्सेपकृत), अहिल्याबाई होळकर यांचे विश्वेश्वर मंदिर
(देसाई माधुरी यांच्या पुस्तकातून साभार)
आकृती क्र.१०

आणि ब्रह्मपुरी येथे बांधले. तीनही मंदिरे एकसारखी नाहीत. परंतु मंदिर स्थापत्याच्या दृष्टीकोनातून त्यामध्ये काही साधर्मे आहेत. कदाचित ती एकाच स्थपतीकडून बांधली गेली असावीत. गर्भगृहावर शिखर आहे. अनेक छोट्या छोट्या शिखरांच्या साह्याने बनलेल्या शेखरी शैलीत हे आहे. उत्तर भारतात दहाव्या शतकापासून ही शैली दिसून येते. मंडपावर घुमट किंवा पिरॅमिडच्या आकाराचे छत आहे. भिंतीवरील थर, स्तंभ तसेच इतर नक्षीकामाने मंदिर सजले आहेत. दारावर कोरलेल्या द्वारपालांव्यतिरिक्त मंदिराच्या इतर भागावर मूर्ती दिसत नाहीत. फुले तसेच इतर भौमितिक आकाराचे नक्षीकाम आहे. मंडपाचा आकार वेगवेगळा आहे. तर तीनही मंदिरांची गर्भगृहे सारख्याच आकाराची आहेत.

अहिल्याबाईंच्या विश्वनाथ मंदिराची प्रमाणबद्धता ही कोड्यात टाकणारी आहे. विश्वनाथ मंदिराची महती आणि प्रसिद्धी विचारात घेता त्याची भौतिक बांधणी बघून असमाधान वाटते. अहिल्याबाईंनी बांधलेल्या या मंदिरातील प्रमुख लिंगाच्या पूजेअर्चे साठी जागा तर मिळाली, मात्र यात जुन्या मंदिरातील प्रमाणबद्धता दिसून येत नाही. सोळाव्या शतकातील मंदिरापेक्षा हे मंदिर आकाराने फारच लहान असून १५.२४ मी. x १५.२४ मी. अशी या मंदिराची लांबी व उंची आहे. त्यामध्ये मोठा मंडप किंवा उंच छत नाही. मंदिराच्या स्थापत्यापेक्षा मंदिराचा कळसच अधिक नजरेस पडतो. सन १८३९ मध्ये या मंदिरावरील शिखर व मंडपावरील घुमटाला सोन्याचा पत्रा बसविला म्हणून याला "Golden Temple" असे म्हणतात. यात काही आश्चर्य नाही की विश्वनाथ मंदिराचे स्वरूप पाहून गोंधळलेला जेम्स फर्गुसन लिहितो की, '' फक्त ५० फूट (१५.२४ मी.) लांब आणि तितकीच उंची असणारे हे मंदिर हिंदूचे सर्वात पवित्र शहर असणाऱ्या काशीतील मुख्य मंदिर आहे'' (Fergusson 1876: 92).

आता प्रश्न उभा राहतो की अहिल्याबाईंनी बांधलेले विश्वनाथ मंदिर आकाराने लहान का? साधे उत्तर आहे की अहिल्याबाईंकडे आर्थिक स्त्रोत मर्यादीत होते. त्यांच्या खाजगीतून निरनिराळ्या स्थापत्य प्रकल्पांना एकाच वेळी आर्थिक मदत दिली जात होती (Thakur 1969: 54-57). त्यावेळेला हा काही फायद्यातला उद्योग नव्हता. दुसरे साधे उत्तर म्हणजे अहिल्याबाईजवळ मोठे मंदिर बांधण्यासाठी मोठी जागा उपलब्ध नव्हती. मल्हारराव होळकर आणि नाना फडणवीस यांची विश्वनाथ मंदिराच्या जागेवरील ज्ञानवापी मशीद पाडून त्याच जागी मंदिर बांधण्याची इच्छा होती. यातून मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी जुनी जागा महत्त्वाची होती हे दिसून येते. परंतु अहिल्याबाईंनी याबाबत तडजोड केली आणि जुन्या मंदिराशेजारील जागेत नवे मंदिर बांधले. जयसिंहाने बनविलेल्या सतराव्या शतकातील नकाशात ज्ञानवापी शेजारील जागा ही मध्यवर्ती जागा असून आजूबाजूला घरांची व दुकानांची दाटी होती. यामुळेच कदाचित मंदिर बांधण्यास मोठी जागा मिळाली नसावी. याउलट गयेतील विष्णुपद आणि वेरूळ येथील घृष्णेश्वर मंदिरे आकाराने मोठी

आहेत. बाजारपेठेतील मूळ जागी किंवा मूळ जागेच्या जवळच मंदिर बांधण्याच्या गरजेपोटीच भव्य मंदिराची गरज नजरेआड केली गेली असावी (Shin 2015: 47).

विश्वनाथ मंदिराच्या पदविन्यासात फारच नाविन्यपूर्ण दृष्टीकोन वापरात आणल्याचे दिसते. खूप शिवलिंगांना सामावून घेऊ शकणाऱ्या जागेची कमतरता असल्याने तसे झाले असावे. यामध्ये दोन चौकोनी गर्भगृहे असून दोन्हीवर शिखरे आहेत. त्यांना मध्यभागी चौकोनी मंडपाने जोडलेले आहे. मंडपावर घुमट आहे. पश्चिमेकडील गर्भगृहात शिवाचा रक्षणकर्ता दंडपाणीश्वराचे लिंग आहे. विश्वनाथाचे प्रसिद्ध लिंग पूर्वेकडील गर्भगृहात आहे. तिसरे लिंग वैकुंठेश्वर हे विष्णूशी संबंधीत असून दोन्ही गर्भगृहे जोडणाऱ्या मंडपाच्या मध्यभागी आहे. दोन्ही गर्भगृहे दिसण्यात सारखी असली तरी त्याच्या उंचीत आणि नक्षीकामाच्या बारकाव्यातून दंडपाणी आणि विश्वनाथ यांच्यातील श्रेष्ठ-कनिष्ठत्त्व ठळकपणे अधोरेखीत करण्याचा प्रयत्न स्थपतींनी केलेला दिसतो. पूर्वेकडील विश्वनाथाचे गर्भगृह हे पश्चिमेकडील दंडपाणीच्या गर्भगृहापेक्षा थोडेसे उंच आहे. यातून त्याचे श्रेष्ठत्व दिसून येते. पूर्वेकडील गर्भगृहावर जास्त नक्षीकाम असून फुलांचे वेगवेगळे प्रकार वेगवेगळ्या उंचीवरील थरांवर कोरलेले आहे. याउलट पश्चिमेकडील गर्भगृहावर भौमितिक हिऱ्याच्या आकाराचे नक्षीकाम फक्त भिंतीच्या जंघा भागावर कोरलेले आहे. पूर्वेकडील गर्भगृहाला चारही बाजूने प्रवेशद्वारे आहेत. याउलट पश्चिमेकडील गर्भगृह चारही बाजूने बंद आहे. त्यावर मध्यभागी देवकोष्ठे/कोनाडे आहेत. महाराजा रणजितसिंगांनी पूर्वेकडील गर्भगृहावरील शिखरावर आणि मधील मंडपावरील घुमटावर फक्त सोन्याचा पत्रा बसविला आहे. यातूनही विश्वनाथ आणि दंडपाणीतील श्रेष्ठ-कनिष्ठत्व दिसून येते.


अहिल्याबाईंकृत नवे विश्वनाथ मंदिर बांधताना शेजारील जुन्या मंदिराच्या स्थापत्याचा विचार केला गेला होता का? प्रमाणबद्धता आणि पदविन्यास यातील फरक सोडता सोळाव्या शतकातील मंदिर आणि अठराव्या शतकातील मंदिरांमध्ये काही संबंध असल्याचे दिसते ते फक्त भिंत्तीमध्ये आणि त्यावरील नक्षीकामाच्या बारकाव्यात. अहिल्याबाईंकृत विश्वनाथ मंदिरावरील शिखर हे शेखरी-शिखर शैलीतील असून मंदिराच्या कमी होत जाणाऱ्या अर्ध शिखरांनी/उपशिखरांनी युक्त आहे. भिंतींवर थर असून त्यावर नक्षीकाम आहे. दोन्ही मंदिरात थर आहेत, मात्र त्यांच्या नक्षीकामात कमी-जास्त फरक आहे. याउलट जुन्या विश्वनाथ मंदिरावरील शिखर नष्ट झालेले आहे. वाराणसीतील या आधीच्या काळातील मंदिरांचे काहीच नमुने शिल्लक आहेत. बाराव्या शतकातील कार्दमेश्वराचे मंदिर पंचक्रोशीयात्रामार्गाच्या सुरवातीलाच आहे. त्यावर शेखरी-शिखर शैलीतील शिखर असून भिंतींवर थर आहेत. नवीन मंदिरांसाठी आदर्श असा हा नमुना आहे. सोळाव्या शतकातील विश्वनाथ मंदिराच्या भिंतीवरील रचना/नक्षीकाम ही कार्दमेश्वर मंदिरापेक्षा अधिक जवळची आहे व नमुना म्हणून ती रचना अधिकच सहाय्यकारी/मार्गदर्शक ठरू शकते. अहिल्याबाईंकृत

विश्वनाथ मंदिराच्या भिंतींवरील थरांची रचना ही जुन्या विश्वनाथ मंदिरा सारखीच असून कुंभ आणि कलशानंतर वेदीबंदावर कपोतालीस आहे आणि जंघा भाग वेगवेगळ्या थरांनी विभागला गेला आहे. आधीच्या स्थापत्यातील नमुने म्हणजे प्रवेशद्वाराच्या कमानी/तोरणे हत्तीच्या सोंडेच्या आकाराचे हस्त आणि उलट्या कमळाच्या अलंकरणाने बनलेल्या आहेत. पश्चिमेकडील गर्भगृहातील देवकोष्ठांवर पायऱ्याच्या आकाराचे उद्गम आहेत. वाराणसीतील अस्तीत्वात असलेले सोळाव्या शतकातील स्थापत्य हे जरी प्रेरणेचे प्रमुख साधन असले तरी शेखर-शिखरी शैलीतील शिखरे आणि भिंतीवर कोरण्यात आलेले थर यातून दहाव्या शतकापासूनच्या स्थापत्य परंपरेची नाळ जोडली गेल्याचे दृष्टीस पडते.


दुसऱ्या बाजूला मंडपाच्या स्थापत्यात नवीन आकार समाविष्ट झाले होते. चौकोनी पदविन्यास असलेल्या मंडपात बारा स्तंभ असून त्याची खालील/तळाकडील बाजू अष्टकोनी असून वरची/शीर्षाची बाजू घुमटाकार आहे. स्तंभाचा आकार हा सर्वसाधारणपणे आधीच्या काळातीलच असून त्यावर घंटा आणि साखळीचे नक्षीकाम आहे. सोळाव्या शतकातील गोविंददेव मंदिरातील स्तंभ सुद्धा असेच असून त्याला कमळाकृती हस्त आहेत. फुलांचे नक्षीकाम समकालीन मुघल स्थापत्याची आठवण करून देते. स्तंभतळावर कमल पाकळ्यांची नक्षी असून शीर्षस्थानी उमललेल्या फुलांची नक्षी आहे. अशा तऱ्हेचे चित्रण मुघल तसेच राजपूत स्थापत्यात दिसते. पन्हाळीदार घुमट आणि त्याच्या तळाला असलेले पर्णाचे (अकेशस) अलंकरण आणि शीर्षाला पाकळ्यांची नक्षी (petalled finial) हे अठराव्या शतकातील मुघल स्थापत्याचे वैशिष्ट्य आहे. एकोणिसाव्या शतकातील विश्वनाथ मंदिरावरील साहित्यात मुस्लिम 'घुमटा' बद्दल बरीच समीक्षा झाली आहे. बाकीच्या हिंदु स्थापत्याशी हे विसंगत दिसते (Fergusson 1876: 92). अहिल्याबाईंनी विश्वनाथ मंदिर बांधले त्यावेळी हिंदू मंदिरांवर मोठ मोठे घुमट बांधले जात. घुमटाला कोणत्याही पंथाची/धर्माची संलग्नता राहिलेली नव्हती. गर्भगृहाच्या बांधणीतून आधीच्या काळातील राजपूत मंदिर स्थापत्याची, तर मंदिराला लागून असलेल्या मंडपावरील नक्षीकामाने समकालीन मुघल स्थापत्याची झलक मिळते.

अहिल्याबाई होळकर घाटावरील शिवमंदिराचे स्थापत्य (चित्र ३४ आणि ३५)


वाराणसीमधील अहिल्याबाई घाटावरील शिवमंदिरातही हेच नक्षीकाम दिसते. याच्या गर्भगृहावरही शेखरी-शिखर शैलीचे शिखर दिसते. त्याच बरोबर बारा स्तंभी चौकोनी मंडपावर घुमट आहे. भिंतींवरील थरांची रचना आणि पायऱ्यांचे उद्गम असलेले देवकोष्ठ हे ही विश्वनाथ मंदिराप्रमाणेच आहे. फरक दिसतो तो मंदिराच्या भिंती व वरील भागातील स्थापत्यातील अलंकरणात. भिंतींवर तसेच मंदिराच्या वरील भागावर कोणत्याही तऱ्हेचे नक्षीकाम आढळत नाही. मंडपाचे स्तंभ सुद्धा विश्वनाथ मंदिराप्रमाणेच आहेत. कमळ पाकळ्यांचे तळ आणि उलट्या कमल पाकळ्याचे हस्त याशिवाय त्यावर नक्षीकाम नाही.




चित्र ३४: शिवमंदिरावरील शिखर आणि धुमट
अहिल्याबाई होळकर घाट



चित्र ३५: कमळ पाकळ्यांचे स्तंभ, अष्टकोनी स्तंभ आणि
उलट्या कमळ पाकळ्यांचे हस्त
अहिल्याबाई होळकर घाट



चित्र ३६: तारकेश्वर मंदिर, मणिकर्णिका घाट, मार्ग २००५ मधून साभार



आकृती क्र.११: तारकेश्वर मंदिराचा पद्‌विन्यास, मणिकर्णिका घाट
(देसाई माधुरी यांच्या पुस्तकातून साभार)

मणिकर्णिका घाटावरील तारकेश्वर मंदिराचे स्थापत्य (आकृती ११, चित्र ३६)

अहिल्याबाईने बांधलेले तारकेश्वर मंदिर हे मणिकर्णिका घाटाच्या पायरीवर आहे. विश्वनाथ मंदिराप्रमाणे हे सार्वजनिक पूजास्थान म्हणून बांधले असून वाराणसीमधील सर्वात जास्त गर्दी असलेल्या घाटावर असून नदीपात्रातून सहजपणे दिसते. सन १८८५ मध्ये अहिल्याबाई होळकर यांनी मणिकर्णिका घाटाचे नूतनीकरण केले. अहिल्याबाई होळकर यांचा काशी येथील कारभारी बाळाजी लक्ष्मण यांनी अहिल्याबाईंना लिहिलेल्या पत्रात श्रीमनकर्णिका घाटाचे आणि तारकेश्वर मंदिराचे काम चालू असल्याचे लिहिले आहे. त्याच पत्रात पुढे त्याने अहिल्याबाईंची स्तुती केली असून हे काम केल्याने अहिल्याबाईंची किर्ती अनादीकाळा पर्यंत राहिल असे तो लिहितो (ठाकूर, १९४४, पत्र १६८, पृ.२६२). मणिकर्णिका घाटाचे वाराणसीमधील मध्यवर्ती स्थान लक्षात घेता या मंदिर बांधणीचा प्रकल्प हा अहिल्याबाईंच्या महत्त्वाच्या प्रकल्पातील एक असला पाहिजे. हे मंदिर आणि घाटाचे उद्‌घाटन वैशाख महिन्यात (एप्रिल-मे) सन १७९१ साली झाले. उद्‌घाटनाला वाराणीचा रेसिडेंट जोनाथन डंकन आणि मॅजिस्टेट अली इब्राहीम खान हजर होते. (CPC-IX, Letter No.1158, pp.249)

मणिकर्णिका घाटावरील जागेच्या कमतरतेमुळे तारकेश्वर मंदिराचा पदविन्यास हा इतर दोन मंदिरांपेक्षा वेगळा आहे. विशेषत: मुख मंडपाचा पदविन्यास वेगळा आहे. मुख मंडपाचा पदविन्यास चौकोनी नसून अरूंद-आयताकार आकाराचा आहे. मंडपात चार खांबांच्या दोन ओळी असून त्यावरील छत पिरॅमिडच्या आकाराचे आहे. गर्भगृहाचा आकारही इतर दोन मंदिरांपेक्षा वेगळा आहे. भिंतींवरील थर हे विश्वनाथ मंदिर आणि अहिल्याबाई घाटावरील मंदिरांच्या भिंतीवरील थरांप्रमाणेच आहेत. इतर मंदिरांप्रमाणेच या मंदिराच्या भिंतीवर तसेच शिखरावर अलंकरण नाही. देवकोष्ठावर पायऱ्यांचे उद्‌गम आहेत. दुसऱ्या बाजूला स्तंभ हे शोभिवंत आहेत. परंतु त्यावर विश्वनाथ मंदिराइतके अलंकरण नाही. स्तंभतळ कमळ पाकळ्यांचे असून त्यावरील आयताकृती चौकोनात उमलत्या फुलांचे चित्रण आहे. त्यावरील स्तंभाचा भाग अष्टकोनी असून त्यावर घंटा व साखळीचे अलंकरण आहे. गर्भगृहाला चारही बाजूंनी प्रवेशद्वारे असून कमळपाकळ्यायुक्त हत्तीच्या सोंडेच्या आकाराची तोरणे आहेत.

एखाद्या मंदिराचा जीर्णोद्धार करताना जुन्या मंदिरातील भौतिक घटकांची भूमिका काय असते? सोळाव्या शतकातील वाराणसीचे महत्त्व मराठा आश्रयदात्यांनी परत आणले का? सोळाव्या शतकातील स्थापत्य घटकांची नक्कल/परत मांडणी केली का? जुन्या पडीक असलेल्या स्थापत्याची पुनर्बांधणी केली तर त्या कृतीला 'जिर्णोद्धार' असे म्हणतात. अहिल्याबाईंनी जुन्या विश्वनाथ मंदिराचा जिर्णोद्धार केलेला नाही. पूर्णत: नवीन विश्वनाथ मंदिराची उभारणी केलेली आहे. अहिल्याबाईंकृत विश्वनाथ मंदिराची समीक्षा केली तर

शिखर, भिंतींवरील थर, हस्त व दारांवरील नक्षीकाम यातून आधीच्या काळातील मंदिर स्थापत्य शैली दिसून येते. विशेषत: सोळाव्या शतकातील मंदिर स्थापत्यातील घटक यात वापरले गेले. मुख्य प्रश्न असा आहे की आश्रयदात्याच्या कल्पना यात किती प्रमाणात उतरल्या किंवा कलाकारांकडून स्थानिक स्थापत्य परंपरा किती चालू राहिल्या याबाबत आपण साशंक आहोत. अहिल्याबाईंच्या बाबत असे म्हणता येईल की आश्रयदात्याचा सहभाग हा मंदिर स्थापत्यामध्ये नाही. विविध स्थापत्य निर्माण स्थळांवरून अहिल्याबाईंना येणाऱ्या पत्रातून असे दिसते की महेश्वरहून पाठविलेल्या कारागिरांवर सर्व जबाबदारी टाकलेली असते. उदा. इमारत बांधकाम साहित्य गोळा करणे आणि कारागिरांची नेमणूक करणे. मुख्यत्वे करून हे सर्व साहित्य आणि कारागीर स्थानिक साधनांतूनच/प्रदेशातूनच गोळा केले जात होते. अहिल्याबाईंच्या देशव्यापी मंदिर स्थापत्य प्रकल्पात एकसारखी स्थापत्यशैली दिसून येत नाही. स्थानिक परंपरा किंवा स्थानिक साहित्यच उपयोगात आणले गेले. उदा. घृष्णेश्वर मंदिर, वेरूळ, येथील स्थापत्य शैली ही यादवकालीन भूमिज शैलीच आहे. मंदिराची जागा आणि लागणारा पैसा हा दुसरा मुद्दा आहे. विश्वनाथ मंदिराच्या उलट अहिल्याबाईंनी गया येथे बांधलेल्या विष्णुपादाच्या मंदिराची जागा नदीकिनारी असून मोठी आहे. त्यामुळे सोळाव्या शतकातील राजपूत मंदिरांसारखा मोठा मंडप बांधलेला आहे. अहिल्याबाईंपुरता विचार करता असे दिसते की त्यांनी मंदिरांचे पावित्र्य, मंदिरांची जागा किंवा मूर्ती/प्रतिमा यामध्ये आधीच्या स्थापत्य शैलीतील घटक/परंपरा घेतल्याचे दिसून येते.

अहिल्याबाईकृत विश्वनाथ मंदिराचा नक्की कालखंड कोणता?

अहिल्याबाई होळकरकृत विश्वनाथ मंदिराचे बांधकाम केव्हा केले गेले याबाबत मराठी तसेच इंग्रजी कागदपत्रे उपलब्ध नाहीत. अनेक अभ्यासकांनी ती शोधण्याचा प्रयत्न केला, परंतु ती उपलब्ध होऊ शकली नाहीत. होळकर संस्थानाच्या देवस्थान यादी मध्ये अहिल्याबाईंनी बांधलेल्या स्थापत्यांची म्हणजेच घाट, अन्नछत्रे, मंदिरे, तलाव, विहीरी यांची यादी दिली आहे त्यामध्ये काशीविश्वेश्वर मंदिर अहिल्याबाईंनी बांधल्याची नोंद आहे, परंतु त्यात काळविषयक नोंद नाही. त्यामुळे या मंदिराचा कालखंड अनेक अभ्यासकांनी अंदाजाने वेगवेगळा दिला आहे. सर्व अभ्यासक या मंदिर निर्मितीचे श्रेय अहिल्याबाईंनाच देतात. काही अभ्यासक मंदिराची निर्मिती सन १७७७ साली झाली असे मत नोंदवितात, तर काही अभ्यासक सन १७८१ साली या मंदिराची निर्मिती झाली असे मत नोंदवितात (Desai 2017: 83). याचा अर्थच असा आहे की अहिल्याबाईकृत विश्वनाथ मंदिराच्या निर्मितीच्या कालखंडाबाबत मतभेद आहेत. या मंदिराच्या निर्मितीचा कालखंड सांगू शकेल असा एकच पुरावा सध्या उपलब्ध आहे तो म्हणजे या मंदिरातील दंडपाणीच्या गर्भगृहावर संगमरवरावर कोरलेला संस्कृत शिलालेख होय. हा शिलालेख मूळ जुन्या दगडावरचा नसून जुना दगड झिजत आला म्हणून त्यावरून नवीन दगडावर कोरून लावला आहे. लेख मात्र जुनाच आहे. तो

संस्कृत श्लोकात्मक असून त्यांत सर्व तिथि, वार, नक्षत्र यांचा स्पष्ट उल्लेख केला आहे. भाऊशास्त्री वझे यांनी आपल्या पुस्तकात या शिलालेखाचा पाठ दिला आहे (वझे १९३९: ३६). प्रस्तुत अभ्यासक सप्टेंबर २०१६ मध्ये विश्वेश्वर मंदिरात संशोधनासाठी गेलेला असताना हा शिलालेख त्याच्या पाहण्यात येऊन त्यांचे वाचनही त्याने लिखित स्वरूपात घेतलेले आहे. इ.स. १७७७ मध्ये अहिल्याबाईं होळकर यांनी श्रीविश्वेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला. हे सर्व कार्य 'जयराम शर्मा' या नांवाच्या ब्राह्मणाकडून करविले, अशा अर्थाचा मजकूर या शिलालेखात आहे. तो शिलालेख असा आहे :

स्वस्ति श्रीमदसीमभूमिवलयालंकारपाथोनिधेः
शेषोत्तीर्णसुधानिधानकलिकापूर्णाब्जजारोधसि ।।
माहेशाख्यपुरं जगत्प्रियकरं स्वःसंपदां श्रीहरं ।
स्वःसाम्राज्यविडतम्बि निस्तुलगुणं भूमंडलीमंडनम् ।।१ ।।
तत्राऽभूद्वसुधाधिपोऽतिमतिमान्सत्यप्रतिज्ञो महा-
वीरः सत्यपराक्रमोऽतिवशगाः पृथ्वीश्वराद्या यतः ।।
मार्तंडेश्वरसेवनात्तसकलो मार्तंडनिष्ठाग्रणीः ।
मल्हारजीत्यभिधानको द्विजपरः श्रीहोल्करोपाख्यकः ।।२ ।।
तस्येयं वसुधेश्वरी विजयते यात्रैकसक्ता स्नुषा ।
पत्नी तत्प्रतिमात्तवद्गुणवरापत्यस्य धर्मैक्यतः ।।
मार्तंडापरनामकस्य जगति ख्याता सतीनां मुखे-
ऽहल्याख्याऽपरमूर्तिदेवपरमा नाम्नाऽप्यहल्याऽमदा ।।३ ।।
आनंदकाननसुवासिनरादिजन्तु-
मोक्षप्रदानसमये खलु तारकोक्तिः ।।
एवं व्रतं परिगृहीतमनादि येन
तस्याज्ञया खलु तया जगदीश्वरस्य ।।४ ।।
यत्कारितं द्विजवरात्तसपर्ययाऽनया ।।
श्रीभारतप्रमुखसंश्रवणार्द्रचित्तया ।।
विश्वेश्वरस्य रमणीयतरं सुमंदिरं
श्रीपंचमंडपयुतं सदृशं च वेश्म ।।५ ।।
काश्यामन्तर्गृहे स्थाने स्वीये कैलासतोऽधिके ।
तदाज्ञया तदाप्तेन जयरामसुशर्मणा ।।६ ।।
कृतं तत् द्विजवर्येण काश्यां निवसता सदा ।
गतं विश्वेशकृपया निर्विघ्न परिपूर्णताम् ।।७ ।।
वार्धिवन्हिहस्तिचन्द्रमितसंवति वत्सरे ।
ग्रहरन्ध्रप्रतीकेन्दुमिते शाकेऽत्र कीलके ।।८ ।।
अब्दे याम्यायने भाद्रपदे मासि सितेतरे ।
पक्षे जन्माष्टमीनामतिथौ वारे विधोः शुभे ।।९ ।।
प्राजापत्ये तु नक्षत्रे योगे हर्षणसंज्ञके
तेन तुष्टो भवत्वीशो वांच्छितार्थप्रदः प्रभु ।।१० ।।
दृष्ट्वालेखंसमुच्छित्रं प्राचीनंनूतनंव्यधात् ।।
पक्षतौश्रावणेशुद्धे वन्हिनागाङ्क रूपके ।।

अर्थ: सर्व पृथ्वीला कंकणाप्रमाणे अलंकरभूत अशा समुद्रांतून शेषाप्रमाणे वर आलेल्या अमृतमय कलापूर्ण चंद्ररूपी कमलापासून निघालेल्या नर्मदेच्या तीरावर, जगताला आनंद देणारे, स्वर्गसंपत्तीच्या शोभेला हरण करून स्वर्गीय साम्राज्याला लाजविणारे, भूमंडलाला अलंकारभूत व निरुपम असे माहेश (महेश्वर) नावाचे नगर आहे. ।।१।। तेथे मल्लाजी (मल्हारराव) व होळकर उपनाम असलेला राज्यकर्ता झाला. तो अतिबुद्धिमान, सत्यप्रतिज्ञ, ब्राह्मणसेवक, महापराक्रमी वीर असून अनेक राज्यकर्ते त्याचे अंकित होते. तो मार्तण्ड (खंडोबा) भक्तांमध्ये श्रेष्ठ असून त्यास खंडोबाच्या सेवेमुळे सर्व (संपत्ती, राज्य इ.) मिळाले. ।।२।। त्याची ही अहल्या नावाची नावाप्रमाणे अहल्या असलेली, जवळ सतत देवाची मूर्ति (शिवलिंग) जवळ बाळगणारी अहंकाररहित, सतीमध्ये अग्रणी म्हणून जगात विख्यात झालेली मार्तण्ड (खंडेराव) नाम पतीशी धर्माने एकरूप झालेली त्याची (मल्हाररावची) सून राज्यकर्ती असून ती तीर्थयात्रेत निमग्न असते.।।३।। आनन्दकानन (काशी) येथे राहणाऱ्या मनुष्यादि प्राण्यांना मोक्ष देताना तारकमंत्राचा उच्चार करणे हे ज्याने व्रत(नियम) स्वीकारले आहे, त्या जगदीश्वराच्या आज्ञेने महाभारतादि ग्रंथश्रवणामध्ये रस असलेल्या तिने श्रेष्ठ ब्राह्मणांकडून अनुष्ठान करवून विश्वेश्वराचे उत्कृष्ट व सुंदर असे पाच मंडपांनी युक्त असे मंदिर निर्मिले ।।४,५।। तिच्या कडून प्राप्त झालेल्या काशीमध्ये कैलासापेक्षाहि अधिक असलेल्या स्वत:च्या अंतर्गृह स्थानामध्ये जयरामशर्मा नावाच्या नित्य काशीमध्ये राहणाऱ्या श्रेष्ठ ब्राह्मणाने करविले ते विश्वेश्वराच्या कृपेने निर्विघ्नणे परिपूर्ण झाले।।६,७।। संवत १८३४, शके १६९९, किलक संवत्सर, दक्षिणायन, भाद्रपद (श्रावण) वद्य ८ (जन्माष्टमी), सोमवार या शुभदिनी, प्राजापत्य (रोहिणी) नक्षत्र, हर्षण योग असताना (हे झाले). ईप्सितार्थ देणारा प्रभु (ईश्वर) यामुळे संतुष्ट होवो।।८,९,१०।।

या शिलालेखात (विक्रम)संवत १८३४, शके १६९९ असा काळा सांगितला आहे. मोडक जंत्री वरून याची इंग्रजी तारीख ११ ऑगष्ट १७७७ अशी येते. या मंदिराचा कालखंड नक्की ठरवायला हा एकच पुरावा सध्या उपलब्ध आहे. याला छेद देणारी एकच गोष्ट यात आहे, ती म्हणजे 'पाच मंडपानी युक्त असे विश्वेश्वराचे मंदिर निर्मिले' असा उल्लेख यात आला आहे. प्रत्यक्षातील मंदिरात पाच मंडप दिसत नाहीत.

विश्वनाथ मंदिर: मराठी जनमत आणि वास्तव

काशीविश्वेश्वर मंदिराचा अकराव्या शतकापासूनचा इतिहासाचा आढावा घेताना त्यात सन १७७७ पर्यंतच्या अहिल्याबाईकृत काशीविश्वनाथ मंदिराची स्थापना व त्याच्या स्थापत्याची चर्चा आतापर्यंत आपण केली. काशीतील शिवमंदिरांचे महत्त्व अधोरेखीत करताना मोतीचंद्र 'काशी के कंकड शिवसमान' या वाक्प्रचाराचाही उल्लेख करतात (मोतीचंद्र १९६४: ३९५). अहिल्याबाईंच्या या काशीविश्वनाथ

मंदिरासारखीच शिवाची मंदिरे काशीतील अनेक घरांच्या प्रांगणात अस्तित्वात असलेली दिसतात. मोतीचंद्रांच्या मताप्रमाणे अशा तऱ्हेची हजारो मंदिरे काशीमध्ये आजही आढळून येतात. त्यांनी या मंदिर उभारणीचे श्रेय हे अठराव्या शतकातील मराठी जनांकडे दिलेले आहे. अहिल्याबाईंकृत विश्वनाथ मंदिर हेही त्यातलेच एक आहे. आता प्रश्न असा आहे की सन १७७७ मध्ये अहिल्याबाईंनी विश्वनाथ मंदिर बांधल्यानंतरही मराठी राज्यकर्ते हे ज्ञानवापी मशिदीच्या जागीच मंदिर बांधण्याचा अट्टाहास का करीत होते? काशीमध्ये विश्वनाथाची अनेक मंदिरे असली तरी अहिल्याबाईंकृत विश्वनाथ मंदिरासारखी लोकप्रियता त्या मंदिरांना का लाभली नाही? काशीतील प्रमुख विश्वनाथ मंदिराचा दर्जा मिळविण्यासाठी अहिल्याबाईंच्या विश्वनाथ मंदिराला कोणत्या बाबींची मदत झाली? असे अनेक प्रश्न महत्त्वाचे ठरतात.

अठराव्या व एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जे राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक संक्रमण झाले त्याचा महत्वपूर्ण परिणाम विश्वेश्वराची परंपरा आणि या पवित्र भूमिवरील त्याच्या भूमिकेवर पडला. काशीखंडाचा अभ्यास केला तर असे दिसून येते की विश्वेश्वर हे श्रद्धेचे प्रतिक आहे. विश्वेश्वर मंदिराच्या अस्तित्वाच्याअभावी इतिहासातील मतभेद तसेच पुनर्जिवीत परंपरा या ज्ञानवापी मशीद आणि त्याच्या स्थानावर अधिकाधिक केंद्रीत झालेल्या दिसतात. सोळाव्या शतकातील विश्वेश्वर मंदिराचा अनपेक्षीतपणे औरंगजेबाकडून विध्वंस केला गेला. सहाजिकपणे या घटनेवर प्रतिक्रिया उमटल्या. मुस्लिम राज्यकर्त्यांकडून धार्मिक अन्याय होतो असा विचार मराठा राज्यकर्त्यात पसरला. अनेक मराठा सरदारात मंदिराच्या विध्वंसाचे प्रतिध्वनी उमटले. छत्रपती राजाराम महाराजांपासून ते पहिले बाजीराव, बाळाजी बाजीराव, थोरले माधवराव, रघुनाथराव पेशवे यांजबरोबरच मराठा संघराज्यातील इतर सरदार मल्हारराव होळकर, जयाप्पा, दत्ताजी, जनकोजी, महादजी शिंदे, नागपूरकर भोसले हेही काशीवर मराठी सत्ता मिळविण्यासाठी प्रयत्न करीत होते. विश्वनाथाची पुन:स्थापना करणे ही एकच भूमिका काशीवर प्रभुत्व मिळविण्या पाठीमागे असलेली दिसून येते. सन १७४२ मध्ये ज्ञानवापी मशीद पाडून तिथे विश्वेश्वर मंदिराची पुनर्बांधणी करावी असे मल्हारराव होळकरांस वाटले. मशीद पाडून त्याजागी विश्वेश्वर मंदिराची उभारणी करावी अशा तऱ्हेचे वैशिष्ट्यपूर्ण/वेगळेपणाची कृती मल्हारराव होळकरांची होती. परंतु त्याचे राजकीय/लष्करी विरोधक, अयोध्येचे नबाब यांनी त्यांत मोडता घातल्याने ही योजना सफल झाली नाही. या सर्व घडामोडींची चर्चा आपण राजकीय इतिहासात अगोदरच केलेली आहे. मंदिर उभारण्याच्या होळकरांच्या प्रयत्नात सातत्य दिसून येते. परंतु मशीद पाडून मंदिर उभारणे ही योजना राजकीयदृष्ट्या धोकादायक आणि विवादास्पद होती. मशीद न हलविता त्याच्या शेजारील जागेत मंदिर बांधण्याची योजना अहिल्याबाई होळकरांनी मांडली त्यावेळी त्या या योजनेत काही प्रमाणात यशस्वी झाल्या.

सन १६६९ मध्ये औरंगजेबाने नारायणभट्टकृत विश्वनाथ मंदिराचा विध्वंस करून त्याजागी मशीद बांधली. अस्तित्वात असलेल्या मंदिरातच तोडफोड करून मंदिराचे मशिदीत रूपांतर केले गेले होते. आजही हे मंदिर मशिदीच्या रूपाने आपल्या समोर आहे व ते स्थापत्य 'ज्ञानवापी मशीद' म्हणून ओळखले जाते. २२ सप्टेंबर १७५५ मध्ये वाराणसीच्या काझीने हीच ज्ञानवापी मशीद म्हणजेच उर्वरीत स्थापत्य पाडून टाकण्यासाठी मोर्चा काढला, त्याला काशी शहरात मोठ्या प्रमाणात विरोध झाला (Srivastava 1939: 30). विकोपास जाणाऱ्या या घटनेकडे त्रयस्थपणे बघणारा काशीचा राजा बळवंतसिंग यात विनाकारण ओढला गेला. हिंदूनी शहरातील दुकाने बंद केली व सर्व व्यवहार थांबविले. पेशव्यांचे गुरू पाटणकरांनी या विरोधात उपोषण केले (पेशव्यांचे गुरू नारायण दीक्षित पाटणकरांचा मृत्यू १७४९ मध्येच झाला होता. काशीत त्यांची गादी त्यांचा मुलगा बाळकृष्ण दीक्षित पाटणकर हे चालवित असत. त्यांनीच उपोषण केले असण्याची शक्यता आहे). बळवंतसिंगाने आपला तटस्थपणा सोडून दीक्षित पाटणकरांना उपोषण सोडण्यास भाग पाडले. काझीचे कृत्य आणि दीक्षित पाटणकरांचे सार्वजनिक उपोषण यामुळे विश्वेश्वर मंदिराकडे लोकांचे अधिक लक्ष वेधले गेले. ज्ञानवापी मशिदीचे आवार हे पवित्र स्थान असून यात्रेचे ठिकाण असल्याचे या घटनेमुळे सिद्ध झाले. मशिदीच्या जोत्याची पूजा होत होती. या कृत्यामुळे ही मंदिराची जागा आहे हे सिद्ध होत होते.

पुजारी लोक अनेकदा यात्रेकरूंना ज्ञानवापी मशिदीपर्यंत नेत असत. विजयराम सेन लिखित 'तीर्थमंगल' नावाचा बंगाली भाषेतील यात्रा प्रवास वर्णनपर ग्रंथ आहे. यात सेनांचे यजमान घोषाल आणि त्यांचा परिवार यांनी इ.स. १७६८ मध्ये भेट दिलेल्या यात्रा स्थानांच्या यादीमध्ये ज्ञानवापी मशिदीच्या स्थानाचा समावेश होता. विश्वेश्वर व अन्नपूर्णा मंदिर, पंचतीर्थ म्हणजेच ज्ञानवापी विहीर, दंडपाणी, महाकालेश्वर, नंदीकेश आणि तारकेश या मंदिरांना भेटी दिल्याचे ग्रंथात वर्णन केलेले आहे. याचाच अर्थ असा की बराच काळ त्यांनी ज्ञानवापी मशीद आणि आसपास व्यतीत केला होता. एकोणिसाव्या शतकात लोकप्रिय असणाऱ्या यात्रेपेक्षा सेनांची यात्रा ही बरीच वेगळी होती. त्यांच्या वर्णनात पंचक्रोशी आणि अंतर्गृह यात्रेचे वर्णन आढळत नाही. त्यामुळे ही धार्मिक परंपरा त्यावेळेपर्यंत अजून तयार व्हावयाची असावी (Desai 2017: 82).

हिंदूची पवित्र क्षेत्रे मथुरा व वृंदावन ही स्थळे हस्तगत करून घेण्याबद्दल पाटीलबाबास नाना फडणवीस एकसारखा तगादा लावीत होते. त्याचप्रमाणे श्री काशीक्षेत्रातील श्रीविश्वेश्वराचे देवालय निर्वेधपणे ताब्यात घेण्याबद्दलही ते अतिशय आग्रही होते. यासाठी त्यांनी महादजी शिंदेच्या मुत्सद्यांना वारंवार पत्रे लिहिली. ह्या प्रसंगी अलीबहाद्दाचे दिवाण भिकाजी नारायण यांनी दि. २२ मार्च १७८९ रोजी महादजी

शिंद्याच्या लष्करातून मथुरेहून जे पत्र लिहिले ते असे, ''सेवेसी भिकाजी नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता. छ२४ जमादिलाखर मु।। श्रीमथुरा वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीकाशीत श्रीविश्वेश्वराचे देवालय हजार वर्षाचे सर्वास ठाऊक आहे. त्यास अलीकडे पातशाईत कोणी काय समजावून मर्यादा केली. त्यास विश्वेश्वराचे स्थळ मोकळे होऊन, पूर्ववत देवालय व देवस्थापना व्हावी हे हिंदूधर्मास योग्य आहे. त्या काळी पातशहाजवळ उद्योग केलीयास होईल असे आहे. त्यास ऐसी गोष्ट जाहली पाहिजे की, फिरोन दवा न राहे. पूर्वापर मजकूर पातशाहास समजावून कधी कोणाकडून उपद्रव न होयसे पत्र करून घ्यावे. या गोष्टींचा उद्योग जरूर करावा. सांप्रत काळी काशीत इंग्रजांचा अंमल आहे. ते कोणाचे धर्मास अडथळा करीत नाहीत. येविसी त्यांसी बोलता येईल. विश्वेश्वराचे स्थळांत वस्ती असल्यास त्याचे इमल्याचा पैका देविला जाईल. परंतु पातशाहाची परवानगी निर्वेधपणे झाली पाहिजे. मथुरा वृंदावन ही स्थळे सरकार खालशांत असावी. त्यांच्या सनदा सरकारचे नांवे घेऊन पाठविणे म्हणून राजश्री पाटीलबाबांस पत्र सरकारचे लिहून पाठविले आहे. त्यास तुम्ही व राजश्री आपाजीराव सदरहू अन्वये मजकूर बोलून सनदा करून घेऊन पाठविणे म्हणोन आज्ञा आली! त्यास येविसींचे पर्याय तपशीले पाटीलबाबांसी दोन चार वेळा बोलिलो. आपाजीरावही होते. त्यास काशीचे मजकूराचा जाबस्वाल स्पष्ट काहीच सांगितला नाही. लोकांचे जाबस्वाल बोलतात की, ही गोष्ट केल्याने सर्वां यवनास वाकडे वाटेल. अस्फतद्दोले व इंग्रज एक आहेत. त्या पक्षी त्यांचीही इंग्रजास भीड पडेल. अशी पर्यायाची बोलणी बोलतात. परंतु आम्ही हेच उत्तर करीत आहो की, हे काम करावेच लागेल. येणेकरून आपला सर्व हिंदूत नक्ष होईल व सरकारसेवाही थोरलीच घडेल. कीर्तीस्पद होईल. अशी उत्तरे करीत आहो. पक्केपणे त्यांचे उत्तर होईल, त्याप्रमाणे मागाहून लिहून पाठवू. मथुरा वृंदावन येथील मजकूर, पातशाई फरमाने करून आणावयाचे मसूदे केले आहेत. दोहोचहू रोजात दिल्लीस पाठवून सनदा करून आणवितो. याप्रमाणे बोलले आहेत'' (इतिहास संग्रह, पुस्तक १ ऑगस्ट १९०९, अंक १, पृ.८).

नाना फडणवीसांनी जसा इंग्रजांविरूद्ध चौकडीचा तह केला होता तसाच इंग्रजांनी पुढाकार घेऊन पेशवा, निजाम व इंग्रज या त्रिवर्गाने टिपू सुलतान विरूद्ध १ जून १८९० ला तह केला. त्यातील मुख्य आशय असा होता की तिघांनी टिपूच्या राज्यावर मोहीम करून जो मुलूख सुटेल तो सारखा वाटून घ्यावा. नाना फडणवीसांचा कलकत्तेकर इंग्रजांकडील वकील लाला सेवकरामच्या १० जूलै १७९० च्या पत्रातही या तहाचा उल्लेख आहे. लाला सेवकराम लिहितो की, ''बडे साहेब (कॉर्नवॉलीस) २ महिनेपासून असे सांगत आहे की नव्या करारनाम्याप्रमाणे पेशवे टिपूवरील मोहिमेसाठी परशुरामभाऊ पटवर्धनाच्या नेतृत्वाखाली पन्नास हजार फौज मदतीसाठी पाठविणार आहेत. त्यावर दरबारातील लोक व सावकार असे म्हणतात की त्या बदल्यात पेशवे इंग्रजाकडून चाळीस पन्नास लक्ष रूपये घेतील. परंतु कंपनीकडे तर पैसे नाहीत. त्यामुळे

इंग्रजांकडे असलेली काशी घेऊन ते मदत करतील'' (इतिहास संग्रह, पुस्तक १, जून १९०९, अंक ११, पृ.१०१). या तहाबाबत गो.स. सरदेसाई लिहितात की, ''तह ठरत असताना नाना फडणवीसांनी इंग्रजांकडून काशी क्षेत्रांबाबत इंग्रजांकडे एक मागणी केली. काशी क्षेत्र इंग्रजांच्या ताब्यांत असून तेथील विश्वेश्वराचे मंदिर औरंगजेबाने पाडून तेथे मशीद बांधली होती, ती मशीद पाडून पुन: तेथे मंदिर पूर्ववत् करण्यास इंग्रजांनी मान्यता द्यावी अशी नाना फडणवीसांनी मागणी केली. मॅलेटने हे म्हणणे युक्तिने रहित करविले'' (मराठी रियासत ७: २९१).

नाना फडणवीसांचे आणखी एक बिनतारखेचे पत्र ज्ञानवापी मशिदीची जागा ताब्यात घेण्यासंबंधी मेणवली दप्तरात आहे (गोखले १९७३: ३७-४२). श्री आदि विश्वेश्वराचे स्थळाचे कबालेपत्र (करारपत्र) करून घ्यावे म्हणून त्यांनी आपले काशीतील कारभारी भास्करपंत कुंटे यांना कळविले होते. आदि विश्वेश्वराच्या स्थळाच्या आसपास गोसावींची (गोसावी नावाची जमात) जागा होती. करारपत्र साक्षीदारांच्या साक्षीनसी न करता कुंटे यांनी घाईघाईने गोसाव्याला दहा हजार रूपये देऊन ते स्थळ विकत घेतले. पुढे मागे मुसलमान वारसा हक्क सांगतील याकरीता आधी करारपत्र शेजाऱ्यांच्या साक्षीनसी करावे असे अनंत दीक्षित पेंडसे यांचे मत होते. परंतु नंतर पुढे कधीतरी अडचण निर्माण झाल्यास करारपत्र करू असे म्हणून कुंटे यांनी ती जागा गोसाव्याकडून विकत घेतली. परंतु पुढे खरोखरीच मशीद खणावयास प्रारंभ करताच मुसलमानांनी विरोध केला. दहा हजार रूपये देऊन ही जागा मुसलमान खरेदी करीतील असे समजून कुंटे यांनी गोसाव्याला सांगून त्या जमिनीचे वीस हजार रूपयाचे करारपत्र करून घेतले. ज्ञानवापी मशिदीच्या आसपाच मुसलमानाची जागा होती. त्यांच्या जागेतून मशिदीला वाट नव्हती. गोसाव्यांच्या जागेतूनच मशिदीला जाण्याची वाट होती. एकंदरीत कुंटे यांनी अशी वादात असलेली जागा घेऊन नवीन वाद निर्माण केला. या प्रकरणापुढील माहिती त्रिबंकराव परचुरे यांनी लिहिलेल्या दि. ४-७-१७९९ च्या पत्रात आली आहे. ती अशी- ''श्री काशी विश्वेश्वराचे स्थळाची जागा विकत घेतली त्यात मशीद नाही कबाले करून घेऊन ऐवज द्यावा ते न करिता ऐवज दिल्हा म्हणोन लिहिले ते कळले. त्यास हली तुम्ही कबलेपत्र करून द्यावी.'' पुढे या जागेचे काय झाले, करारपत्र साक्षीनसी पूर्ण केले का? याचा पत्ता कागदपत्राअभावी करता येत नाही.

अठराव्या शतकाच्या सुरवातीच्या दशकात काशीतील या धार्मिक दृष्ट्या पवित्र जागेमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात आली. वेगवेगळ्या, विविध तऱ्हेच्या आश्रयाद्वारे/आश्रयदात्यांद्वारे काशीखंडातून येणाऱ्या वर्णना आधारे यावर लक्ष केंद्रित केले गेले. आश्रयदात्यांनी आणि त्याच्या कारागिरांनी अंतर्गृहमार्गिकेमध्ये वेगवेगळ्या स्थांनी मंदिरे आणि दैवतांची प्रतिष्ठापना केली. नारायण दीक्षित पाटणकरांनी अठराव्या शतकाच्या सुरवातीला विश्वेश्वर मंदिराच्या परिघात अन्नपूर्णेच्या मंदिराचे पद्धतशीर

महत्त्व वाढविले. त्यांनी आपले आश्रयदाते पेशव्यांच्या साह्याने धर्मादाय कृत्यांद्वारे मंदिराला भेट देणाऱ्यांसाठी अन्नछत्र सुरू केले. शेरींग (१८६८) साली लिहिलेल्या ग्रंथात, ''हे मंदिर १५० वर्षापूर्वी पुण्याच्या राजाने (म्हणजेच पेशव्यांनी) बांधले.'' असे लिहितात. ज्ञानवापी स्थानाच्या सानिध्याचे भांडवल पाटणकरांनी केले. धर्मादाय संस्था/मंदिरांच्या साह्याने येणाऱ्या यात्रेकरूंना पडझड झालेल्या सोळाव्या शतकातील नारायणभट्टांच्या विश्वेश्वर मंदिराजवळ नेऊन पोहचविण्यात त्यांची भूमिका फार मोठी आहे. शेरींग लिहितो की, ''विश्वेश्वराच्या आज्ञेने सर्वांना अन्नदान करण्याची, कोणालाही भुके न राहू देण्याची अन्नपूर्णेची भूमिका होती. ज्यांना अन्नदान करणे शक्य आहे त्यांनी अन्नदान करावे'' (Sherring 1868: 57). या इथे अन्नदान करणारी अन्नपूर्णा ही प्रतीक रूपाने आहे. काशीखंडात या देवतेचा उल्लेख नाही. तरीही नंतरच्या काळात अन्नपूर्णा मंदिराचा समावेश अंतर्गृह यात्रेत करण्यात आला.


वरील विवेचनावरून असे दिसून येते की राज्यकर्ते, यात्रेकरू अथवा पुजाऱ्यांकडून सोळाव्या शतकातील विश्वेश्वर मंदिराच्या स्थानावर कधीही पूर्णपणे पाणी सोडले गेले नाही. हे स्थळ नेहमीच त्याच्या प्राचीनत्त्वाबद्दल आणि स्थानाबद्दल चर्चेत राहिले. जेम्स प्रिन्सेपने सन १८२२ मध्ये काढलेल्या या मंदिराचे कल्पनाचित्र (conjectural recontruction) काशीखंडावर आधारीत ब्राह्मणांच्या स्पष्टीकरणावर आधारीत होते. सर्वसाधारणपणे फुलीच्या आकाराचा पदविन्यास असलेल्या या मंदिरात ८ उपगर्भगृहे असून मधील ९ वे गर्भगृह हे प्रमुख देवता म्हणजेच विश्वेश्वरासाठी होते. व्यक्तीगत कल्पना, एकमेकांना जोडलेले मंडप, इतर देवतांना दिलेली नांवे ही उथळपणे काशीखंडावर आधारीत दिलेली होती. नंतरच्या काही दशकातच त्याने बनविलेल्या कल्पनाचित्रालाच खराखुरा पदविन्यास लोक समजू लागले. जसाजसा विश्वेश्वर मंदिराचा मुघल इतिहास अंधुक व्हायला लागला तसतसा त्याला सुरवातीच्या वसाहतील काळातील मतानुसार प्राचीन वारसा लाभू लागला.

सुरूवातीलाच लिहिल्याप्रमाणे अहिल्याबाईंचे विश्वनाथ मंदिरही इतर लोकांच्या विश्वनाथ मंदिराप्रमाणेच होते. परंतु ते इतर लोकांच्या विश्वनाथ मंदिरापेक्षा अधिक लोकप्रिय झाले ते त्याच्या स्थानमहात्म्यामुळे. त्याला लाभलेल्या प्राचीन सोळाव्या शतकातील विश्वेश्वर मंदिराच्या सानिध्यामुळे. अहिल्याबाईंनी आपल्या मंदिरासाठी जी जागा निवडली ती ज्ञानवापी मशिदीच्या अगदी जवळची होती. वर वर्णन केल्याप्रमाणे ज्ञानवापी मशिदीचा परिसर नारायण दीक्षित पाटणकरांनी आधीच धार्मिकदृष्ट्या नावारूपाला आणला होता. सोळाव्या शतकातील विश्वेश्वर मंदिर व ज्ञानवापीचे स्थान याकडे असणारे लोकांचे लक्ष यातून सामाजिक-धार्मिक बाबतीतले सातत्य दिसून येते. अन्नपूर्णा मंदिराच्या वाढत्या लोकप्रियतेचाही फायदा अहिल्याबाईंनी नव्याने बांधलेल्या विश्वेश्वर मंदिरासही झाला. विश्वेश्वर आणि दंडपाणी या दोन देवतेच्या गर्भगृहाने बनलेले हे मंदिर काशीखंडातील वर्णनाच्या आधारे बनलेले नाही. या मंदिरात

नंदीकेश आणि महाकालेश्वराची गर्भगृहे नाहीत. पुराणांवर आधारीत जुन्या कल्पनांचा यात समावेश नाही. राणी भवानीने नंतरच्या कालखंडात ज्ञानवापी मशिदीच्या परिसरात तारकेश्वराचे (आता भवानेश्वर) मंदिर बांधले. परंतु अहिल्याबाईंच्या या मंदिराशी त्याचा संबंध नाही. अहिल्याबाईंनीही तारकेश्वरांचे स्वतंत्र मंदिर मणिकर्णिका घाटावर बांधलेले आहे. परंतु अचानकच अलिकडे सन २००८ मध्ये तारकेश्वराचे स्वतंत्र मंदिर देवस्थान कमिटी मार्फत सध्याच्याच प्राकारात, विश्वनाथ मंदिराच्या मागील भागी बांधले गेले. पुराणांवर आधारीत जुन्या विश्वेश्वर मंदिरातील तारकेश्वराचे महत्त्व लक्षात घेऊन देवस्थान कमिटीने हे मंदिर बांधले असावे का? परंतु हा आजचा बदल आहे. अनेक देवतांच्या मंडपानी बनलेल्या मंदिराच्या जागी विश्वेश्वरावर लक्ष केंद्रित करणाऱ्या मंदिराची निर्मिती करण्यात आली. अशा तऱ्हेचे बदल करण्यात आलेले असताना सुद्धा अहिल्याबाईंकृत विश्वेश्वर मंदिर ज्ञानवापीच्या स्थानाला स्पर्धा करू लागले आणि हळूहळू हे मंदिर अंतर्गृह यात्रामार्गाच्या मध्ये समाविष्ट होऊन गेले. साधारणपणे चाळीस वर्षांनी केलेल्या वर्णनात जेम्स प्रिन्सेपने या बदलाचा आणि नवीन मंदिराच्या लोकप्रियतेचे निरीक्षण नोंदवले आहे. नागपूरकर भोसल्यांनीही सन १८४१ मध्ये एक चांदीची पालखी या मंदिराला अर्पण केली. महाराजा रणजितसिंह यांनीही अहिल्याबाईंकृत विश्वेश्वर मंदिरावरील शिखराला व मंडपावरील घुमटाला सोन्याचा पत्रा बसविला. नागपूरकर भोसले आणि महाराजा रणजितसिंहांसारखे वजनदार राजकीय दाते या मंदिराला लाभल्याने या मंदिराने नंतरच्या ५०-६० वर्षांच्या काळातच जुन्या विश्वेश्वर मंदिराची जागा घेतली.

मराठा लोकांनी बांधलेले वाडे, मंदिरे आणि इतर स्थापत्य

या प्रकरणात गंगातीरावर मराठी लोकांनी बांधलेल्या घाटावरील वाडे/हवेली, मंदिर स्थापत्यांची चर्चा केली आहे. काशीविश्वनाथ मंदिराचा इतिहास आणि स्थापत्य यावरही चर्चा केली. या व्यतिरिक्तही मराठी लोकांनी वाराणसीत इतर ठिकाणी राहण्यासाठी वाडे बांधलेले दिसतात. विशेषतः दुर्गाघाट, ब्रह्माघाट, भोसले घाट, दशाश्वमेघ घाट परिसरात मोठ्या प्रमाणावर मराठी वस्ती दिसते. दुर्गाघाटावर नाना फडणवीस, शिंद्यांचे कारभारी पोतनीस यांचे वाडे आहेत. दुर्गा घाटावर सांगलीकर पटवर्धन **(चित्र ४६)**, नरगुंदकर भावे, ग्वाल्हेरच्या शिंदे यांचे दिवाण राजवाडे, सरदार आंग्रे यांचे वाडे आहेत. गहनाबाई गायकवाड **(चित्र ४५)**, पंतप्रतिनिधी, पंतसचिव यांचेही वाडे आहेत. या शिवाय नारायण दीक्षित पाटणकर, वझे, पुणतांबेकर, सोलापुरकर, नेने, रटाटे, देव, पायगुंडे आदि कितीतरी विद्वान ब्राह्मण घराण्यांचे वाडे अस्तित्वात असल्याचे दिसतात. अठराव्या शतकात पेशवे, शिंदे, होळकर वगैरे मराठी राज्यकर्त्यांनी वाराणसीत अनेक ठिकाणी ब्रह्मपुरी वसविल्याचे संदर्भ मिळतात. ही ब्रह्मपुरी वसवितांना या लोकांनी आधीच अस्तित्वात असलेली घरे,



आकृती क्र.१२: पद्विन्यास, नाना फडणवीस वाडा, दुर्गाघाट
श्री.अशोक फडणवीस, पुणे यांच्या कडून साभार



चित्र ३७: नाना फडणवीस वाडा, दुर्गाघाट



चित्र ३८: देव्हारा, नाना फडणवीस वाडा



चित्र ३९: काठ की हवेली
दुसरे बाजीराव पेशवे यांचा वाडा, वाराणसी



चित्र ४०: वाडयाचा आतील चौक, काठ की हवेली

वाडे विकत घेऊन त्या घरांचे विद्वान ब्राह्मणांना दान दिलेले दिसते. रघुनाथराव पेशवे यांचे काशीतील कारभारी धोंडो खंडेरावांनी लिहिलेल्या पत्रात असा संदर्भ मिळतो (पेद २९, पत्र ८६, पृ.८०). पेशवे हे राज्यकर्ते म्हणजेच पैशाने सधन असल्याने त्यांच्यासाठी थोर थोर घरे म्हणजेच मोठी घरे खरेदी केली आहेत. पेशव्यांना जर ब्राह्मणांना घरे दान करण्याची इच्छा असेल तर धोंडो खंडेराव लिहितो की, ''ब्राह्मणास दान घरे देणे तरी सेवकास लेहून पाठवावे, चौ पांचा हजारात घर बहुत मिळतात. नवी घरे घेऊन ब्राह्मणास आज्ञेप्रमाणे देईन.'' यावरून असे लक्षात येते की ब्राह्मणास घरे दान देणे हे पुण्यकर्म समजले जात असे. त्याचबरोबर तयार घरच दान देण्याची प्रथा दिसते. त्यामुळेच आधीच अस्तित्वात असलेली घरे विकत घेऊन त्यानंतर ते घर ब्राह्मणास दान देत असत. सधन, सावकार अथवा राज्यकर्ते घराण्यांच्या घरांच्या/वाड्यांच्या बाबतीतही अशीच परिस्थिती दिसते. नाना फडणवीसांनी सुद्धा असाच तयार वाडा विकत घेतला, अशी माहिती त्यांच्या पुण्यातील वंशजानी प्रबंधकारास दिलेली आहे **(आकृती १२, चित्र ३७ आणि ३८)**. मिरजकर पटवर्धनापैकी सरस्वतीबाई पटवर्धन या काशीयात्रा करण्यास सन १७७३-७४ मध्ये आल्या होत्या. या प्रबंधात काशीयात्रा प्रकरणात त्यांच्या काशीयात्रेची माहिती दिलेली आहे. काशीत वास करण्यासाठी चार पाच हजारात वाडा विकत घेण्याची इच्छा त्या व्यक्त करतात (ऐलेसं ७, १९१२:३७८९). तुळशीबागकरांनीही काशीसही एक घर विकत घेतले होते असा उल्लेख ना.गो. चापेकर यांनी 'पेशवाईच्या सावलीत' या पुस्तकात केला आहे (चापेकर १९३७: २३). महाराष्ट्रातून बाराणसीसारख्या दूरच्या प्रदेशात जाऊन, जमीन घेऊन घराचे बांधकाम करणे हे कठीण काम असे. दुसऱ्या बाजीराव पेशवे यांनी मात्र कालभैरवाच्या मंदिराजवळ आपले सरदार विंचूरकरांकरवी स्वत:साठी वाडा बांधला होता. हा वाडा 'काठ की हवेली' म्हणून आजही प्रसिद्ध आहे **(चित्र ३९ व ४०)**. लाकडाचे कोरीव काम असणारा वाड्याचा भाग सध्या पडून गेला आहे. अर्धा वाडाच सध्या अस्तित्वात आहे. पण अशा तऱ्हेने घर बांधल्याची उदाहरणे कमीच आहेत. तयार वाडा विकत घेण्याकडेच लोकांचा कल असावा असा कयास आहे.


या वाड्यांच्या स्थापत्यावर स्थानिक स्थापत्य शैलीचाच प्रभाव आहे. इतर लोक आणि मराठी लोकांच्या वाड्यात वेगळेपण दिसून येत नाही. दोन, तीन किंवा त्यापेक्षा जास्त मजल्यांचे वाडे दिसून येतात. वाड्यात प्रवेश केल्यानंतर मध्यभागी चौक असतो व त्याभोवती खोल्याची रचना असते. खोल्याची दारे व खिडक्या वाड्याच्या मध्यभागी असलेल्या चौकात उघडतात. बहुतेक वेळा प्रवेशद्वाराच्या शेजारूनच वरील मजल्यास जाण्यास जिना असतो. भिंत सोडून पुढे आलेल्या छताच्या भागाला टेकू देण्यासाठी हत्तीच्या सोंडेच्या आकाराचे हस्त असतात व त्यावर उलट्या कमळपाकळीचे अलंकरण काही वाड्यात आढळते. घरांच्या बांधकामात खांबासाठी आणि छतासाठी दगडाचा वापर मोठ्या प्रमाणावर केलेला



चित्र ४१: घराच्या बाहेरील ओट्यावरील मंदिरे



चित्र ४२: संकरी गली, वाराणसी



चित्र ४३: भोरकर पंतसचिवांचे शिवमंदिर



चित्र ४४: सभामंडप, भोरकर पंतसचिवांचे शिवमंदिर



चित्र ४५: गहिनाबाई गायकवाड वाडा



चित्र ४६: श्रीमंत सांगलीकरांचा वाडा

आढळतो. वाडे खूप जुने असल्याने देखभाली अभावी वाड्यांची दुरावस्ता झालेली दिसून येते. सध्याच्या काळात मराठी घराण्यात स्थलांतराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे वाडे विकण्याचे प्रमाण अधिक आहे. मोठ्या वाड्याचे तुकडे करून विकल्यामुळे वाड्याच्या मूळ रचनेत अनेक बदल घडून आलेले दिसतात.

वाराणसीतील मराठा निर्मित काही मोजकी मंदिरे उदा. अहिल्याबाईंकृत काशीविश्वेश्वर मंदिर, तारकेश्वर मंदिर, भोसले घाटावरील नागपूरकर भोसल्यांनी बांधलेली मंदिरे यांच्या स्थापत्याची चर्चा या प्रकरणात आधीच केलेली आहे. बहुसंख्य मंदिरे ही महाराष्ट्रीय लोकांच्या वाड्यात बांधलेली दिसतात. वाड्यामध्ये बांधल्यांमुळे मोठ्या मंदिरांच्या ऐवजी लहान लहान मंदिरे बांधली गेली. कित्येक वेळा एका खोलीवजा जागेत मंदिराची स्थापना केलेली दिसते. त्यामुळे शिखरांचा पत्ताच नसतो. मंदिर स्थापत्यातील अनेक घटकांना वगळून स्थापत्याची मांडणी केलेली दिसते. काशीमध्ये असलेल्या संकरी गल्लीतील वाड्याबाहेरच्या ओट्यावर मंदिरांची/देवळ्यांची केलेली रचना ही कलेच्या दृष्टीने कमी दर्जाची ठरते **(चित्र ४१ आणि ४२)**. कित्येक वेळा मालकी हक्कामुळे तुकडे पडलेल्या वाड्यातील मंदिराची अवस्था निव्हाईनासारखी दिसते. अस्तित्वात असलेल्या मंदिराच्या मंडपाचे रूपांतर राहण्याच्या घरांमध्ये झालेली असंख्य मंदिरे काशीमध्ये दिसून येतात. दुर्गा घाटावरील पोतनीसांचे विठ्ठल मंदिर, ब्रह्माघाटावरील ग्वाल्हेरच्या शिंद्यांचे दिवाण दिनकरराव राजवाडे यांचे राममंदिर आणि राजमंदिर भागातील भोरकर पंतसचिवांच्या शिवमंदिराचे स्थापत्य हे पारंपरिक अठराव्या शतकातील पेशवेकालीन मंदिर स्थापत्याप्रमाणे दिसून येते **(चित्र ४३ आणि ४४)**. यामध्ये चौकोनी गर्भगृह, अंतराळ आणि पुढे लाकडी सभामंडप अशी या मंदिरांची रचना दिसून येते. मोतीचंद्रांच्या मतानुसार अठराव्या शतकाचा अंत हा कलेच्या ऱ्हासाचा काळ होता आणि याची स्पष्ट छाप आपणास काशीतील मंदिरावर आणि मूर्तिंवर दिसून येते. मोतीचंद्र पुढे म्हणतात की या काळातील मंदिराकडे आपण कलेच्या दृष्टीकोनातून न बघता केवळ श्रद्धेच्याच भावनेने बघतो (मोतीचंद्र १९६४: ४००). वाराणसीत मराठ्यांनी निर्माण केलेल्या मंदिर स्थापत्याच्या आधारावरच मोतीचंद्रांनी वरील विधान केले आहे.

नाना फडणवीस आणि कर्मनाशीचा पूल

श्रीकाशी क्षेत्राबद्दल प्रत्येक हिंदूच्या मनात आदरबुद्धी वसत असून तेथे काही पुण्यकर्म करावे म्हणजे आपणास मोक्षप्राप्ती होईल, असा भक्तीभाव पेशवाईमध्ये फार होता. त्यामुळेच मराठी लोकांनी गंगातीरावर अनेक घाट, तसेच काशीमध्ये अनेक मंदिरे बांधलेली दिसून येतात. परंतु यामध्ये वेगळेपण दिसून येते अशा स्थापत्यात नाना फडणवीसांनी कर्मनाशी नदीवर बांधलेला पूल (इतिहास संग्रह, १९१०, पुस्तक २,

अंक७), विंचूरकरांचे पोतनीस यमाजीपंतअण्णा यांनी पंचक्रोशी यात्रेकरूंसाठी वरूणा नदीवर बांधलेला पूल (लेले १९६४: ८६) आणि ग्वाल्हेरचे महाराज दौलतराव शिंदे यांच्या पत्नी यांनी बांधलेला ज्ञानवापी मंडपाचा आर्वजून उल्लेख करावा लागेल. नाना फडणवीस आणि पोतनीसांनी बांधलेले पूल सध्या अस्तित्वात नाहीत. बायजाबाईंनी बांधलेला ज्ञानवापी मंडप मात्र आजही उभा आहे. पोतनीसांनी बांधलेल्या पूलाची माहिती अधिक मिळत नाही. परंतु नाना फडणविसांनी कर्मनाशा नदीवर बांधलेल्या पुलाची हकीगत प्रसिद्ध आहे. त्रिस्थळी यात्रेमध्ये काशीहून गयेला जाताना वाटेत ही नदी लागते. या नदीचे जलस्पर्शाचा निषेध आहे. या नदीस पाणी विशेष नसते. परंतु तिचे पाण्याच्या स्पर्शाचा निषेध असल्यामुळे पूर्वी यात्रेकऱ्यास ती नदी उतरण्याला फार अडचण पडत असे. कर्मनाशा नदीच्या पाण्याचा स्पर्श होऊ नये म्हणून नौबतपुर जवळ यात्रेकरू मजदूरांच्या खांद्यावर बसून नदी पार करीत (लेले १९६४: ९१). नाना फडणवीसांच्या मनातही काशी येथे पुण्यकृत्य करावे असे होते. त्याप्रमाणे त्यांनी कर्मनाशी नदीवर पूल बांधण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी काशी येथील आपले कारकून भास्करपंत कुंटे यांना पुलाचे काम सुरू करण्याबद्दल लिहिले. त्यांनी पुलाचा पाया खणण्यास सुरुवात केली. परंतु नदीमध्ये वाळूचा भराव व पाण्याचा जोर विशेष होता, त्यामुळे पायास धर लागेना. तेव्हा त्यांनी पूर्वीच्या समजुतीप्रमाणे मांत्रिक बोलावून अनुष्ठानास सुरुवात केली व कुमारस्वामी कोमटी यांचे विद्यमाने, पुलाचे पायातील पाणी व वाळू बंद व्हावी यासाठी, शके १७१८ (इ.स. १७९६) साली अधिक भाद्रपद वद्य ८ पासून अनुष्ठानास प्रारंभ केला. ही गोष्ट नाना फडणवीसांस कळली, तेव्हा नानांनी पुलाचे कामास मांत्रिकी अनुष्ठानाचा काही उपयोग होणार नाही, असे भास्करपंत कुंटे यांस कळवून, अनुष्ठान बंद करविले आणि बेकरनामक एका युरोपियन कारीगरास (इंजिनियर यांस) २०,०००/- रुपये देऊ करून, पुलाचा पाया खोदण्यास प्रारंभ केला. त्याने पुलाचे पायातील पाणी काढावयास दोन बंब तयार करविले, परंतु ते लागू झाले नाहीत. तेव्हा त्याने कलकत्त्याहून कळीचे बंब आणवून काम पुरे केले. या गोष्टीवरून इंग्रजी यंत्रकलेची मदत मराठी राज्यामध्ये कशी घेऊ लागले होते याची कल्पना येते. नाना फडणवीसांनी बांधलेला पुल लवकरच पडला असावा. कारण याच ठिकाणी काही कालानंतर राजा पट्टनीमल यांनी पुन्हा पुल बांधला अशी नोंद आहे. (मोतीचंद्र १९६२: ३९६).

बायजाबाई शिंदे आणि ज्ञानवापी मंडप

अहिल्याबाईंचे विश्वनाथ मंदिर आणि ज्ञानवापी मशिदीच्या मधील भागात ज्ञानवापी आहे. ज्ञानाचे भांडार असलेली विहीर' अशी तिची ओळख आहे. शिवाचा वास या वापीत असतो अशी जनभावना आहे. काशीमध्ये दुष्काळ पडला असताना एका ऋषीने शिवाच्या त्रिशुलाने या वापीची निर्मिती केली अशी पुराणात कथा आहे. सन १५८५ मध्ये नारायणभट्टाने बांधलेल्या विश्वनाथ मंदिराचा औरंगजेबाने सन १६६९

मध्ये विध्वंस केला त्यावेळी तेथील पुजाऱ्याने विश्वनाथाचे लिंग सुरक्षिततेसाठी या ज्ञानवापीमध्ये टाकले होते अशी कथा आहे. याच वापीतील विश्वनाथ लिंग काढून सध्याच्या अहिल्याबाईंकृत विश्वनाथ मंदिरामध्ये त्याची स्थापना करण्यात आली आहे अशी जनभावना आहे. इ.स. १८२७ मध्ये ग्वाल्हेरचे महाराज दौलतराव शिंदे यांची विधवा पत्नी बायजाबाई शिंदे यांनी या ज्ञानवापीवर मंडप बांधला. दगडी खांबाच्या चार ओळी या मंडपात असून एकूण चाळीस खांबाच्या साह्याने हा मंडप बनविलेला दिसतो. मंडपात ज्ञानवापी असून भाविक लोक श्रद्धेने या ज्ञानवापीची पूजा करतात (Sherring 1868: 54).

प्रकरण पाचवे

वाराणसीचा महाराष्ट्रीय संस्कृतीवर झालेला परिणाम

प्रास्ताविक

तेराव्या शतकात महानुभव संप्रदायाशी निगडीत लीळाचरित्रातून मराठी माणसे काशीयात्रेला गेल्याची उदाहरणे मिळतात. संत वाड्मयातून संत ज्ञानेश्वर, नामदेव आणि चोखामेळा, संत एकनाथ, रामदास हे काशीयात्रेला जाऊन आल्याचे दाखले मिळतात. परंतु या काळातील वाड्मयीन पुराव्यांकडे फार बारकाईने पहावे लागते. काळाच्या ओघात या वाड्मयात अनेक उत्तरकालीन पाठभेद शिरलेले दिसतात. नंतरच्या काळात म्हणजेच पंधराव्या सोळाव्या शतकापासून मराठी समाज हा मोठ्या प्रमाणावर वाराणसीला शैक्षणिक आणि धार्मिक कारणांसाठी जाऊ लागल्याचे ठोस पुरावे मिळण्यास सुरवात होते. त्याची चर्चा इतरत्र केलेली आहेच. सतराव्या-अठराव्या शतकातील मराठ्यांच्या राज्यवृद्धीच्या प्रयत्नांमुळे वाराणसीला जाणाऱ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. शिवछत्रपतींपासून पुढील मराठा सत्ताधीशांनी आपल्या राजकीय आकांक्षेपोटी भारतभर आपले साम्राज्यविस्ताराचे कार्य सुरू केले. त्याकाळातील एकमेव हिंदू सत्ताधीश असलेल्या मराठ्यांचे लक्ष त्या काळातील हिंदूचे सर्वाधिक महत्वाचे शहर असलेल्या वाराणसीकडे जाणे सहाजिकच होते. राजकीय, शैक्षणिक, धार्मिक कारणांसाठी अनेक मराठी माणसे वाराणसीत जाऊ लागली. काही कायमची स्थायिक झाली, तर काही आपल्या उद्दिष्टांसाठी तात्पुरते जाऊन महाराष्ट्रात परत आले. नारायणभट्टकृत 'त्रिस्थळीसेतू' ग्रंथाच्या प्रभावाने आणि हिंदू धर्मशास्त्रातील रूढी, परंपरा, आचारविचार यामुळे हजारो मराठी माणसे, मराठी सत्ताधीशांनी निर्माण केलेल्या सुरक्षित मार्गाने काशी, प्रयाग, गया या तीन महत्वाच्या धार्मिक ठिकाणांना वारंवार भेटी देवू लागले. या संचारामुळे मराठी मन, मराठी विचार, मराठी आकांक्षा, मराठी समाजजीवन यांना नवीन क्षितीज प्राप्त झाले. आजूबाजूला दिसणारा नवीन प्रदेश, नवीन भाषा, नवीन समाज, नवीन रीतीरिवाज यांच्याशी मराठ्यांचा नव्याने परिचय झाला. दोन समाजांमध्ये आदान-प्रदान घडून आले. महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक व्यवस्था व चालीरिती, स्थापत्य, मराठी भाषा व साहित्य या सर्व गोष्टींवर उत्तर भारतीय जीवनशैलींचा विशेषत: वाराणसीचा प्रभाव पडलेला दिसतो.

हे सर्व समजून घेण्याअगोदर आधुनिक काळातील मराठी इतिहास संशोधकांनी आणि मध्ययुगीन इतिहास लेखकांनी महाराष्ट्र आणि वाराणसी संदर्भात संशोधन केलेल्या किंवा लिहिलेल्या गोष्टीमुळे इतिहास लेखनात काही काळ काय गोंधळ निर्माण झाला आहे हे पहाणे आवश्यक आहे. यादव नृपती रामचंद्रदेव याची वाराणसीवरील लष्करी स्वारी आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांची नामदेवांबरोबरची 'काशीयात्रा' या दोनही घटनांच्या बाबतीतील संशोधनाचा मागोवा पुढे घेतलेला आहे.

वाराणसी: ग.ह. खरे व वा.वि.मिराशी

महाराष्ट्रातील इतिहास प्रसिद्ध घराणे असणाऱ्या यादवांच्या शिलालेख आणि ताम्रपटामधून 'वाराणसी' या स्थळाचा एकूण तीनदा उल्लेख आला आहे. इतिहास संशोधक ग.ह.खरे यांनी आंबेजोगाई येथील चार शिलालेख प्रसिद्ध केले आहेत (खरे २०१०?: ६५-९१). त्यापैकी शिलालेख क्र.२ व ३ हे यादवांचा सेनापती खोलेश्वर याचे आहेत. शिलालेख क्र.२ मध्ये त्याने 'वऱ्हाडात असंख्य ब्राह्मणांचे वास्तव्यस्थान विख्यात, विस्तीर्ण असे वाराणसी नावाचे गाव वसविले' असा उल्लेख आहे. तसेच शिलालेख क्र.२ व ३ मध्ये वाराणसीचा राजा रामपाल यांचा पराभव केला' असाही उल्लेख आहे. दोन्ही शिलालेखांचा कालखंड इ.स. १२२८ च्या दरम्यानचा आहे. शिलालेख संशोधनाच्या वेळेला श्री. ग.ह.खरे यांना वऱ्हाडात 'वाराणसी' या गावाची स्थलनिश्चिती करता आली नसल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे. यादव नृपती रामचंद्रदेव याच्या इ.स. १२९० मधील पुरुषोत्तमपुरीच्या ताम्रपटामधून परत एकदा 'वाराणसी' गावाचा उल्लेख आलेला आहे (मिराशी(अ) १९६१: १४७-१७२). 'यादव नृपती रामचंद्रदेव याने वाराणसी म्लेंछाच्या हातातून सोडवून तेथे शार्ङ्गधराचे सुवर्णमय मंदिर बांधले' अशा अर्थाचा मजकूर पुरुषोत्तमपुरी ताम्रपटात आलेला आहे. म.म.मिराशींच्या मते ही वाराणसी म्हणजे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र बनारस अथवा काशी होय. सन १२८५-९० च्या काळात बल्बनच्या मृत्यूनंतर व दिल्लीत जलालुद्दीन खिलजी सत्तेवर येईपर्यंतच्या अराजकाच्या काळात रामचंद्रदेवाची ही स्वारी झाली असावी असेही ते म्हणतात. श्री. ग.ह.खरे यांना वाराणसी या स्थळाची निश्चिती वऱ्हाडात करता आली नाही आणि पुरुषोत्तमपुरी ताम्रपटात उल्लेखिलेले वाराणसी हे उत्तर भारतातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र 'वाराणसी' होय हे मिराशींनी प्रतिपादन केल्यामुळे पुढील अभ्यासकांनी (शंका-कुशंका उत्पन्न करत) यादव सम्राटांनी काशी (वाराणसी) पर्यंत लष्करी धडक मारली होती असे प्रतिपादन केले आहे.

मु.ग.पानसे लिखित 'यादवकालीन महाराष्ट्र' या ग्रंथात ग.ह.खरे यांच्या लेखाचा आधार घेत, 'सिंघण यादवाचा सेनापती खोलेश्वराने बनारसचा राजा रामपालावर आपली दहशत बसविली होती' असा उल्लेख केलेला आहे (पानसे १९६३: ३०). याच ग्रंथात पुढे वा.वि.मिराशींच्या संदर्भांचा आधार घेत

मु.ग.पानसे रामचंद्रदेव यादवाच्या संदर्भात लिहितात की, "मुसलमानांना वाराणसीमधून हाकलून दिले व तेथे शाङ्र्गपाणीचे एक सुवर्णमंदिर बांधले. ही घटना बहुधा दिल्लींचा सुलतान बल्बन याचा मृत्यू व जलालुद्दिनाचे राज्यारोहण यांच्या दरम्यान घडली असावी" (पानसे १९६३: ३४). ओंकार प्रसाद वर्मा लिखित 'Yadavas and their times' या ग्रंथात सुद्धा या संदर्भाचे वरील प्रमाणेच विश्लेषण केलेले आहे (Verma 1970: 147). भा.पं.बहिरट व प.ज्ञा.भालेराव लिखित 'वारकरी संप्रदाय : उदय व विकास' या ग्रंथात वा.वि.मिराशींच्या संशोधनाचा आधार घेत असे म्हटले आहे की, "इ.स.१२९० मध्ये ज्ञानेश्वरी लिहिली गेली. त्याच्यालगत दोन-तीन वर्षे आधी रामदेवाने यवनक्रांत काशी मुक्त करून तेथे शार्ङ्गधर मंदिर उभारले होते व ज्ञानेश्वरी लिहिली जात होती त्यावेळी काशी प्रत्यक्ष रामदेवाच्याच ताब्यात होती. म्लेंच्छाक्रांत काशी मुक्त करण्याच्या रामदेवाच्या या अभूतपूर्व पराक्रमामुळे ज्ञानराजांना ज्ञानेश्वरीत त्यांचा गौरव करावासा वाटला" (बहिरट व भालेराव १९८८: ३९). अशा तऱ्हेचा मजकूर पुढे इतिहासाच्या अनेक पुस्तकात समाविष्ट केलेला दिसतो.

काही काळाने डॉ. ब्रह्मानंद देशपांडे यांनी शिलालेख व ताम्रपटात उल्लेखिलेल्या 'वाराणसी' गावाची स्थलनिश्चिती ही वऱ्हाडातीलच अमरावती जवळील 'वनारसे' या गावाशी केलेली आहे (खरे २०१०?: प्रस्तावना पृ.७८). डॉ. ब्रह्मानंद देशपांडे 'देवगिरीचे यादव' या आपल्या पुस्तकात प्रतिपादन करतात की, 'वाराणसी म्हणजेच बनारसच असे गृहीत धरण्याची आवश्यकता नाही. विदर्भात वाराणसी नावाचा गाव असून तो सिंघणाचा सेनापती खोलेश्वर याचा पिता त्रिविक्रम याला अग्रहार म्हणून मिळाला होता (असे आंबे येथील शिलालेख क्र.२ मधून समजलेच आहे). अल्लाउद्दीनने देवगिरीवर जी स्वारी केली ती विदर्भाच्याच मार्गानेच. तेव्हा विदर्भात मुस्लिम सैन्याच्या काही तुकड्या राहिल्याही असतील. रामचंद्राने त्यांना हाकून लावून वाराणसी (सध्याचे वनारसे) हा प्राचीन अग्रहार पुनरुज्जीवित केला असेल.' शार्ङ्गधराच्या मंदिराचा संदर्भ ते पुरुषोत्तमपुरी येथील शार्ङ्गधराच्या मूर्तीशी दाखवून रामचंद्रदेवाने बांधलेले शार्ङ्गधराचे मंदिर पुरुषोत्तमपुरीतच बांधले असावे असे प्रतिपादन करतात (देशपांडे २०१३: १२१).

वाराणसी: ज्ञानेश्वर आणि देवीसिंग चौहान

संत नामदेवांच्या 'तीर्थावळी' नामक ग्रंथात ज्ञानेश्वर हे नामदेवांबरोबर काशीयात्रेला गेले होते असे प्रतिपादन केले गेले आहे. तीर्थावळीतील रचनांचा जनमानसावर असलेल्या प्रभावामुळे सर्वसामान्य लोकांनाही ज्ञानेश्वरांच्या काशीयात्रेबद्दल माहिती होती. या समजुतीला सहाय्यभूत ठरेल असा शिलालेखीय पुरावा इ.स. १९६८ मध्ये प्रसिद्ध इतिहास संशोधक देवीसिंग चौहान यांनी शोधला. त्यांनी 'ज्ञानेश्वराची काशीयात्रा शके १२१६' या लेखात ज्ञानेश्वर हे शके १२१६ (इ.स. १२९६) मध्ये काशीयात्रेला गेले होते असे प्रतिपादन

केले आहे (चौहान १९७३: २३७-२४२). काशीतील दशाश्वमेध घाटाशेजारील श्री घोडेकर यांच्या वाड्याशेजारील ज्ञानेश्वर मठात सापडलेल्या एका दगडी स्तंभावर लिहिलेल्या शिलालेखाचा ते यासाठी संदर्भ देतात. हा दगडी स्तंभ ज्ञानोबांच्या काशीयात्रेचे स्मारक म्हणून उभारलेला असून त्यावर 'संवत १३५१' आणि त्याच्या चार-पाच इंच खाली 'ज्ञानोबा' अशी अक्षरे कोरली असल्याचे त्यांनी लिहिले आहे. स्तंभाची कालौघात झीज झालेली असून स्तंभाच्या चारही बाजूंना तैलरंग लावला असल्याचेही ते नमूद करतात. संवत १३५१ म्हणजे शके १२१६ येतो. ज्ञानेश्वर हे नामदेव आणि सावतामाळी यांच्याबरोबर काशीयात्रेला गेले होते आणि सावतामाळी यांचा मृत्यू शके १२१७ मध्ये झाला. शके १२१६ हा शिलालेखात लिहिलेला कालखंड हा सावतामाळी यांच्या मृत्यूच्या आधी येत असल्याने ज्ञानेश्वरांची काशीयात्रा शके १२१६ मध्ये झाली असावी असा देवीसिंग चौहान निष्कर्ष काढतात. (वरील निष्कर्षासाठी त्यांनी कोणताही संदर्भ दिलेला नाही.) ज्ञानेश्वर हे नामदेवांबरोबर काशीयात्रेला आले तेव्हा याच मठात उतरले होते अशी परंपरागत समजूत घोडेकर यांच्या घराण्यात असल्याचे श्री.चौहान लिहितात.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे भाष्यकार आणि भागवत धर्माचे अभ्यासक डॉ.शंकर दामोदर पेंडसे यांनी या शिलालेखाबाबत काही शंका उपस्थित करून ज्ञानेश्वरांच्या काशीयात्रेच्या संदर्भात प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले आहे (पेंडसे १९६९: ३३५-३३६). अ) स्तंभावरील 'संवत १३५१ व ज्ञानोबा' ही अक्षरे रंगविलेली आहेत की कोरलेली आहेत? ब) संवत् आधी व ज्ञानोबा नंतर हा क्रम बरोबर दिसत नाही. क) ज्ञानोबांबरोबर नामदेवांचा उल्लेख नाही. या कारणांमुळे डॉ. पेंडसे यांनी ज्ञानेश्वरांच्या काशीयात्रेसाठी सदरील स्तंभावरील शिलालेखाचा पुरावा ग्राह्य धरता येत नाही असे मत प्रतिपादन केले आहे. संत नामदेवांच्या बरोबर ज्ञानेश्वर हे काशीयात्रेला गेले होते याचा उल्लेख नामदेवांच्या 'तीर्थावली' मधील अभंगात आलेला आहे. डॉ. शं.दा. पेंडसे यांनी 'तीर्थावळीतील काशीयात्रेचे तीन अभंग क्रम सोडून आलेले व भिन्न प्रकारच्या रचनेचे असल्यामुळे कोणीतरी ज्ञानदेवभक्ताने मागून जोडलेले दिसतात' असे मत मांडलेले आहे (पेंडसे १९६९: ३३२). यासर्व कारणांमुळे वाराणसीतील ज्ञानेश्वर मठातील स्तंभावरील शिलालेखातील मजकूर आणि त्याचा ज्ञानेश्वरांच्या काशीयात्रेशी दाखविलेला संबंध संशयाच्या घेऱ्यात येतो.

मराठी समाजमनातील वाराणसीचे महत्त्व बघता वरील दोन गोष्टींवर बिसंबून राहून मधल्या काळात संशोधकांनी महाराष्ट्र-वाराणसी संबंधात आपले अनेक निष्कर्ष काढले. काळाच्या ओघात जुने संशोधन त्याज ठरून नवीन संशोधन पुढे आले. बदलत्या इतिहास संशोधनाची दखल घेणे हे इतिहास अभ्यासकांसाठी आवश्यक असते. त्यामुळेच महाराष्ट्र-वाराणसी संबंधातील या दोन ऐतिहासिक गोष्टींची सविस्तर चर्चा वर केली आहे.

मराठा काळातील बखर वाङ्मय, संतचरित्रांवरील वाराणसीचा प्रभाव

आधुनिक काळातील इतिहास संशोधकांनी महाराष्ट्र-वाराणसी संबंधात केलेल्या संशोधनामुळे इतिहासात जसा गोंधळ निर्माण झाला, तसाच गोंधळ मराठा काळातील बखरकारांनी व संतचरित्रे लिहिणारे महिपतीबुवा ताहराबादकर यांनी निर्माण केला. तीर्थक्षेत्र काशी आणि काशीयात्रा यांचे मराठी समाजमनामध्ये आगळेवेगळे स्थान आहे. 'काशीस जावे नित्य वदावे' अशी मराठीत म्हण आहे. जन्माला आल्यानंतर एकादा तरी काशीला जाऊन यावे अशी समस्त मराठीजनांमध्ये उत्कंठा असलेली दिसून येते. आजही अनेक लोक समूहाने काशीयात्रेला जात असल्याचे चित्र आहे. काशीयात्रेला जाणे हे पुण्यप्रद कार्य आहे असे समजले जाते, याबरोबरच समाजातील लोकांना काशीयात्रा घडवून आणणे हेही पुण्यप्रद कार्य समजले जाते. समाजातील प्रत्येक माणसास लांबचा प्रवास, सुरक्षितता आणि आर्थिक बाबी या तीन गोष्टींमुळे काशीयात्रा करणे जमेलस असे नाही. त्यामुळेच आजही समाजातील समाजसेवक, पुढारी, धनिक लोक हे कधी आपल्या खर्चाने, कधी धर्मादाय संस्थाद्वारे काशीयात्रेचे संयोजन करीत असल्याचे मोठ्या प्रमाणावर दिसून येते. आजच्या काळात बस, रेल्वे आणि विमानप्रवासामुळे अशी काशीयात्रा करणे पूर्वीच्या पेक्षा अधिक सोपे झाले आहे. परंतु सतराव्या-अठराव्या शतकात यात्रेला जाणाऱ्या माणसास या सोयी उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे काशीयात्रेला गेलेली प्रत्येक व्यक्ती ही सुरक्षितपणे परत येईलच याची खात्री नसे. त्यामुळेच सुरक्षितपणे काशीयात्रेला जाऊन आलेल्या माणसाची समाजातील प्रतिष्ठा, मानमरातब वाढत असे. सतराव्या-अठराव्या शतकात काशीयात्रेच्या प्रथेचे उदात्तीकरण मोठ्या प्रमाणावर केले गेले. समाजातील या प्रथेचे प्रतिबिंब हे इतिहासावरही पडलेले दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराज, पेशवे तसेच इतर सरदार घराण्यातील माणसे, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत रामदास अशांसारखी माणसे ही आपल्या कर्माने प्रतिष्ठित पावलेली होती. नंतरच्या काळात या प्रतिष्ठित माणसांची समाजातील प्रतिमा अधिक ठळकपणे दाखविण्यासाठी त्यांच्या चरित्रकारांनी त्यांना काशीयात्रेला जाऊन आल्याचे दाखवून समाजातील त्यांच्या प्रतिष्ठेला अधिक उंची देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. समाजातील या काशीच्या स्मृतीची काही उदाहरणे पहाणे हे त्यादृष्टीने आवश्यक आहे. इरीना ग्लुश्कोव्हा यांनी या संबंधीत केलेले लिखाण हे या संदर्भात लक्षात घेणे आवश्यक आहे (Glushkova 2017: 176).

काशीच्या स्मृती आणि मराठी बखरकार

सतराव्या ते एकोणीसाव्या शतकातील समाजमनाचा मागोवा घेताना काशीच्या या स्मृतींचा प्रभाव मराठा इतिहासावरही पडलेला दिसून येतो. दस्तुरखुद्द छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधीत इतिहासावरही या स्मृतींचा पगडा पडलेला आहे. शिवाजी महाराजांची आग्रा भेट ही मराठा इतिहासातील एक ठळक आणि

रोमांचकारक घटना आहे. आग्रा ते राजगड हा प्रवास कसा झाला ते इतिहासात नमूद नाही. परंतु बखरी, काव्ये इत्यादीतून मात्र शिवाजीमहाराज त्रिस्थळी यात्रा करून गेले असे सांगतात. कृष्णाजी अनंत सभासद विरचित 'शिव छत्रपतींचे चरित्र' या बखरीत शिवाजी महाराजांनी छोट्या संभाजीला मथुरेतील मराठी ब्राह्मणांच्या घरी ठेवल्यांचे नमूद केले आहे. बखरकार सभासद लिहितो की, 'गया-प्रयागी यात्रा तुमचे ओळखीने तुम्ही आपल्यास करून देणे' असे म्हणून मथुरेतील ब्राह्मण कृष्णाजीपंतांस बरोबर घेऊन शिवाजी महाराज वाराणसीस गेले. तिथे त्यांनी गुप्तपणे स्नान केले, विश्वेश्वराचे दर्शन घेतले, प्रयाग येथे स्नान केले व गया येथे गयावर्जन केले. तेथे त्यांनी कर्ज घेऊन दानधर्म केला. तेथून ते स्वत:च्या राज्यात आपल्या घरी आले (साने १९२३: ४५). त्रिस्थळी यात्रेची महाराष्ट्रीय ब्राह्मणांनी पुरस्कृत केलेल्या धार्मिक कृत्यांशी वरील वर्णन बरोबर जुळते. सन १८१० साली लिहिलेल्या मल्हारराव चिटणीसकृत 'शककर्ते श्रीशिव छत्रपती महाराज' या बखरीतही शिवाजी महाराजांनी संभाजीस ठेवून बैराग्याच्या वेशात कुरूक्षेत्रास गेले. तेथून उत्तरमानस, हरिद्वार करून, गंडकी, अयोध्या दर्शन करून, श्रीकाशी व प्रयाग यात्रा करून गयेस आले. तेथे गयावर्जन करून देवगड चांदे मार्गे महाराष्ट्रात आले असे वर्णन आहे (साने १९२४: १४१).

जेम्स ग्रँड डफ, सी.ए. किंकेड, द.ब. पारसनीस, सदाशिव आळतेकर या आधुनिक काळातील मराठा इतिहासकारांनीसुद्धा बखरीवर विसंबून राहून शिवाजी महाराजांना त्रिस्थळी यात्रा घडवून आणलेली दिसते. जेम्स ग्रँट डफ बखरीचा उपयोग करून लिहितो की, ''शिवाजी आगऱ्यातून निसटला. गोसाव्याच्या वेषात त्यांनी धार्मिक ठिकाणांना भेटी दिल्या. परंतु ते परत कोणत्या मार्गान महाराष्ट्रात आले ते समाधानकारकरित्या समजत नाही.'' त्यानंतर सी.ए. किंकेड आणि द.ब. पारसनीस शिवदिग्विजय बखरीवर विसंबून लिहितात की, ''शिवाजी व त्यांचा गुरु वाराणसीला गेले. इतर यात्रेकरूंप्रमाणे पूजा केली. वाराणसी नंतर अलाहाबाद, गया करीत बंगालमध्ये गेले'' (Kincaid and Parasnis 1931: 77). अ.स.अळतेकरांनी यांनी १८५० च्या दरम्यान लिहिलेल्या शेडगांवकर बखरीतील शिवाजी महाराजांच्या काशी भेटी संबंधीत माहितीची दखल घेऊन ती नोंद कशी चुकीची आहे हे दाखविले आहे (अळतेकर १९४१: २८-३०). शेडगांवकर बखरीच्या कर्त्याने आग्र्याकडे जाताना शिवाजी महाराज काशीस बरेच दिवस राहिले असे लिहिले आहे (भावे १९१७: ५१). बखरकार लिहितो की, ''महाराजांनी काशीच्या जवळच आपला डेरा केला होता. तेथे सोनोपंत नावाच्या विद्वान पंडिताने त्यांची भेट घेतली व त्यांची सरभराई ठीक व्हावी म्हणून काशीच्या व्यापाऱ्यांना तेथे नवी दुकाने बसविण्यास त्याने सांगितले व त्यांनीही त्याप्रमाणे केले. जे व्यापारी, कामकरी वगैरे तेथे राहण्यास आले, त्यांनी तेथेच कायमची घरे बांधली व वसाहतीस शिवाजी महाराजांच्या नावावरून शिवपुर असे नाव पडले. शिवपुराहून महाराज नदीच्या ज्या घाटावर स्नानास जात, त्यासच पुढे राजघाट असे नाव पडले. महाराजांनी शिवपुरास एका देवीची व

पंचमुखी लिंगाची स्थापना करून त्या देवाजवळ एक विहीर बांधली व तिच्या बांधकामातील एका दगडावर आपण ती बांधली असल्याबद्दल लेखही लिहून ठेवला.'' अळतेकर या बखरीमधील माहितीतील विसंगतीवर नेमके बोट ठेवतात. ते लिहितात, ''बखरीतील ही हकीकत वरवर पाहिल्यास खरी वाटते, पण पूर्ण चौकशीअंती ती खोटी असल्याचे सिद्ध झाले आहे. शिवपुर हे गाव शिवाजी महाराजांच्या पेक्षा फार प्राचीन आहे. पंचमुखी लिंगाजवळ जी विहीर शिवाजी महाराजांनी बांधविली असे बखरकार म्हणतो, त्या विहिरीवर कोरलेल्या लेखावरून ती विहीर कानपुरमधील एका हिंदू संस्थानिकाने इ.स. १५८० मध्ये शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वी पन्नास वर्षे बांधविली होती असे दिसून येते. शेडगांवकरांची बखर इ.स. १८५० च्या सुमारास लिहिली गेली. त्यावेळी प्रतापसिंह महाराजांस इंग्रजांनी पदच्युत करून काशीजवळील शिवपुरमधील एका बंगल्यात नजरकैदेत ठेवले होते असा मजकूर आढळतो. प्रतापसिंह महाराजांबरोबर असणाऱ्या त्यांच्या परिवारातील एकाद्या माणसाच्या डोक्यामध्ये शिवपुर व राजघाट या नावावरून शिवाजी महाराजांच्या कासीवासाची कल्पना आली असावी व ती त्याने बखरकारास कळविली असावी. शिवाजी महाराज आग्र्याला जाताना बऱ्हाणपुर, भोपाळ, ग्वाल्हेर मार्गे गेले, तसेच परत येताना काशीला थांबले होते. पण त्यावेळी ते गोसाव्याच्या वेषात होते व त्यांच्या नावावरून शिवपूर व राजघाट ही नावे बखरकार म्हणतो त्याप्रमाणे पडणे शक्य नाही'' (अळतेकर १९४१: २८-३०). छत्रपती शिवाजी महाराजांचे संस्कृत चरित्र लिहिणारा कविंद्र परमानंद याने 'शिवभारत' नावाचा ग्रंथ काशी येथेच रचला होता. काशी निवासी पंडितांनी परमानंदांना शिवाजी महाराजांचे चरित्र सांगण्यांची विनंती केली. या ग्रंथात शिवाजी महाराजांचे इ.स. १६६१ पर्यंतचेच चरित्र आल्यामुळे शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीनंतर काशी, प्रयाग, गया या तीर्थक्षेत्रांची यात्रा केली याबाबत माहिती मिळत नाही (दिवेकर १९२७: १-३).

काशीच्या स्मृती आणि संतचरित्रकार महिपतीबुवा ताहराबादकर

विठोबा आणि रामाचे भक्त असलेले संतकवी ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास हे सुद्धा आपआपल्या साहित्यातून तीर्थक्षेत्रांना भेटी देण्याबाबतची उपयुक्तता सांगतात. वास्तविक यातील काही जण पंढरपूरला सुद्धा गेले नव्हते. यांच्यापैकी अनेक जण हे काशीयात्रा करून आल्याचे त्यांच्या चरित्रकारांनी वर्णन केलेले आहे. इरिना ग्लुश्कोव्हा यांनी या सर्व संतकाव्याच्या अभ्यास करून त्यांच्या काशीयात्रेच्या संबंधी काही टिप्पण्या केलेल्या आहेत. ज्ञानेश्वरांच्या नावावर मोडणाऱ्या अभंगांची शैली आणि कल हे ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीपेक्षा वेगळे आहेत हे सांगतांना त्या लिहितात की, ''ज्ञानेश्वरीतील एकाही ओवीत विठ्ठलाला संबोधीत केलेले नाही, याउलट बहुतेक अंभग हे विठ्ठलाच्या स्तुतीने भरलेले आहेत. त्यांनी पंढरपूरची जास्त स्तुती केली आहे तरी त्यांनी इतर तीर्थक्षेत्रांना वगळलेले नाही. एका अभंगात ते महाराष्ट्र

आणि महाराष्ट्राबाहेरील तीर्थक्षेत्राचा उल्लेख करताना उत्तरेतील वाराणसी, प्रयाग, त्रिवेणीसंगम, दक्षिणेतील श्रीशैलम पर्वतातील मल्लिकार्जुन मंदिर यांचाही उल्लेख केला आहे. प्रत्येक क्षेत्रांनंतर शब्द येतात - मी जातो (अमुक अमुक ठिकाणी) । मी पहातो (हे ठिकाण)। वाराणसी यात्रेस जाईन । प्रयाग तीर्थ पाहिन।।'' इरिना ग्लुश्कोव्हा यांनी यावर टिप्पणी करताना म्हटले आहे की, ''ज्ञानेश्वरी लिहिणाऱ्या ज्ञानेश्वरांची यात्रेला सहमती नव्हती अशा तऱ्हेचा निष्कर्ष यातून निघत असल्याने ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाचे अभ्यासक कानडे व नगरकर यांनी हे श्लोक ज्ञानेश्वरांच्या साहित्यकृतीतून वगळले आहेत.'' (Glushkova 2017: 189). अभंग लिहिणारे ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी लिहिणारे ज्ञानेश्वर या दोन वेगवेगळ्या व्यक्ती असाव्यात असा त्यांच्या सांगण्याचा उद्देश आहे.

नामदेवांच्या आदि आणि तीर्थावळी या दोन ग्रंथातून महाराष्ट्राबाहेरील तीर्थयात्रांचा परिचय घडतो. 'आदि' ग्रंथातून ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंतांच्या तीर्थयात्रेची माहिती मिळते, तर 'तीर्थावळी' या काव्यग्रंथातून ज्ञानेश्वर आणि नामदेवांच्या तीर्थयात्रांची माहिती मिळते. यामध्ये एका ठिकाणाहून दुसरीकडे जाताना केलेली तत्त्वज्ञानविषयक चर्चा आणि पंढरपूरला परत येताना वाटेत दिलेली ब्राह्मणभोजनांची जंत्री मिळते. इरिना ग्लुश्कोव्हा यांना सापडलेल्या दुसऱ्या हस्तलिखितात नामदेवांच्या तीर्थयात्रेमध्ये ज्ञानेश्वरांचा उल्लेख मिळत नसल्यामुळे त्यांनी ज्ञानेश्वर आणि नामदेवांच्या कालखंडाविषयी शंका उत्पन्न केली आहे. त्या लिहितात की, ''आदि काव्याच्या कर्त्याबद्दल वाद आहे आणि तीर्थावळीच्या वेगवेगळ्या प्रतीतील अनेक फरक बघून ज्ञानेश्वर आणि नामदेव हे वेगवेगळ्या काळात होऊन गेलेले दिसतात'' (Glushkova 2017: 190). संतचरित्रांचे अभ्यासक मु.श्री.कानडे हे सुद्धा तीर्थावळीतील यात्रां बाबतच्या अभंगातील ज्ञानेश्वरांच्या अनुलेखाने नामदेवांबरोबर ज्ञानेश्वरांच्या तीर्थयात्रेबाबत साशंकता व्यक्त केली आहे. डॉ. कानडे यांनी तीर्थावळीतील अभंगातून तीर्थक्षेत्रांचा जो क्रम दिलेला आहे त्याबाबतही शंका उत्पन्न करून त्यावरून नामदेवांच्या तीर्थयात्रेचा सुसंगत असा आलेख काढता येत नाही असे मत व्यक्त केले आहे (कानडे १९७६: ५१-५८). डॉ.शं.दा.पेंडसे यांनी तर तीर्थावळीला कांदबरीच म्हटले आहे (पेंडसे १९६९: ३३२).

पैठणचे रहिवासी असलेले संत एकनाथांनी आपल्या 'काशीमहिमा' या काव्यग्रंथात काशीयात्रेला जाणाऱ्या भक्ताला कोणकोणत्या गोष्टी आकर्षित करतात याचे सुरेख विवेचन केले आहे. त्यामध्ये काशीतील मुख्य देवता विश्वनाथ, गंगा भागीरथी नदी, काळभैरव देवता आणि पंचक्रोशी प्रदक्षिणा यांचा समावेश केलेला दिसतो. एका जनार्दनी नित्य कासीवास। परम सुखास पात्र झालो। अशा शब्दात आपल्या कासीवासातील आनंदाचे संत एकनाथ वर्णन करतात. या अभंगावरून एकनाथांनी काशीला भेट दिली असण्याची शक्यता आहे असे वाटते. त्यांचा मुलगाही तिथे स्थलांतरीत झाला होता अशी समजूत आहे.

पंचक्रोशी यात्रेची परंपरा आणि त्यामधील मराठी लोकांचे योगदान याच्यावर इरिना ग्लुश्कोवा यांनी अभ्यासकरून त्यातील मराठी लोकांच्या मोठ्या प्रमाणातील सहभागाबद्दल आपले मत व्यक्त केलेले दिसते (Glushkova 2017: 190).

ज्ञानेश्वरांप्रमाणेच तुकारामांनी सुद्धा पंढरपूरला भेट दिली नाही. त्यांचे सर्व अभंग हे त्यांच्या गावाभोवतीच घुटमळलेले दिसतात. असे असले तरीही तुकारामगाथेच्या काही संपादकांनी त्यांचे तीन अभंग निवडलेले दिसतात आणि त्याला ते नांव देतात- 'तुकारामाने यात्रेकरूंमार्फत भागीरथीनदीला पाठविलेले पत्र'. या तीन अभंगात प्रतिकात्मकपणाने तीन गोष्टी येतात (१) गंगा-भागीरथीनदी (२) विश्वनाथबाबा (३) गयेला पूर्वजांच्या श्राद्धाकरता होणारे गयावर्जन. यातून कथितपणे तुकारामांच्या उत्तरेतील काशीयात्रेचा प्रवास दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. वाराणसीपर्यंत असो सुखरूप। सांगावा निरोप संतासी हा । येथूनिया आम्हा जाणे निधामा।। या निर्याण अभंगातही तुकाराम काशीस सुखरूप पोहचल्याचा उल्लेख आढळतो (Glushkova 2017: 191).

समर्थ रामदासांच्या दासबोधातसुद्धा दोन जणांच्या मधील चर्चेमधून तीर्थयात्रेसंबंधीत माहिती मिळते. त्यातील एक जण तीर्थयात्रेच्या बाजूने बोलतो तर दुसरा तीर्थयात्रेच्या कठीणपणाबद्दल बोलतो. इरिना ग्लुश्कोव्हा यांना धुळ्याच्या समर्थ वाग्वदेवता मंडळात अनेक ऐतिहासिक बाडातून समर्थांच्या तीर्थयात्रेसंबंधीत काव्य मिळाले आहे. दुर्देवाने ते अजूनही अप्रसिद्ध आहे. 'समर्थ वाङ्मय अभ्यासक शं.श्री. देव हे रामदास विरचित काव्यातून तीर्थांबद्दलची लांबलचक यादी देतात. काशी, कांती, कोल्हापूर, काश्मिर, कुशावर्त किंवा अयोध्या, काशी, कोल्हापूर, मथूरा, दिल्ली अशा तऱ्हेच्या गावांच्या नावाची यादी देवांनी प्रसिद्ध केलेली होती. या तीर्थस्थानामागची कल्पना देव विशद करू शकले नाहीत,' असे इरिना ग्लुश्कोव्हा आपले मत प्रतिपादन करितात (Glushkova 2017: 191).

सन १७६१ च्या पानिपतच्या युद्धानंतर मराठी साम्राज्याला हादरा पोहचला. पण पुढच्या काळात थोरले माधवराव पेशवे, नाना फडणवीस आणि महादजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मराठी सत्तेने दिल्लीवर मराठी साम्राज्याचा झेंडा फडकविल्याचे दिसून येते. याच काळात मराठी साम्राज्याचा तो परमोच्च काळ समजला जातो. भारतातील जास्तीत जास्त प्रदेश मराठी सत्तेखाली तरी आला. त्यामुळे महाराष्ट्रातून उत्तर भारतात जाण्यासाठी मराठी लोकांना सुरक्षित आणि हक्काचा मार्ग तयार झाला. याच परिस्थितीचा फायदा घेत मराठी जनता आपले नशीब अजमावण्यासाठी उत्तर भारतात स्थलातरांसाठी तयार झाली. मराठी संघराज्याच्या मुळे तयार झालेल्या या सुरक्षित मार्गानेच मराठी लोकांनी याच काळात त्रिस्थळी यात्रा केल्याचे ऐतिहासिक कागदपत्रातून दिसून येते.

मराठी संत चरित्र ग्रंथाच्या साहित्याची सुरूवात सतराव्या शतकात झाली व अठराव्या शतकाच्या द्वितीयार्धापर्यंत शिखरावर पोहचली. महिपतीबुवा ताहराबादकर या व्यक्तिने सर्वसाधारणपणे इ.स. १७६० नंतर याने मराठी संताची चरित्रे मोठ्या प्रमाणात लिहिली. त्यात (१) भक्तविजय (२) संतलीलामृत (३) भक्तलीलामृत आणि (४) संतविजय या ग्रंथाचा समावेश होतो. सहाजिकच याच काळाचे अपत्य असणाऱ्या महीपतीबुवा ताहराबादकरांच्या साहित्यावरही त्रिस्थळी यात्रेचे गारूड पडलेले दिसते. सहाजिकच त्यांच्या साहित्यातले नायक म्हणजेच मराठी संतमंडळींनाही त्यांनी काशीयात्रा घडवून आणलेली दिसते.

महाराष्ट्रात त्यांनी लिहिलेली संतचरित्रे अद्यापही लोकप्रिय असलेली दिसतात. मराठी साम्राज्याच्या उत्तर काळात लिहिलेल्या या संतचरित्रांचा ऐतिहासिक तथ्यांच्या आधारे अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की मराठी लोकांच्या मनातील काशीच्या स्मृतींना महिपतीबुबा ताहराबादकरांनी आपल्या संतचरित्रातून उजाळा दिला आणि या सर्व संतमंडळींना काशीयात्रा घडवून आणलेली आहे. प्रत्यक्षात तसे घडलेच असेल याबाबत साशंकता आहे.

वाराणसीचा महाराष्ट्रातील धार्मिक, सामाजिक, भाषिक व्यवहारांवर झालेला परिणाम

सतराव्या-अठराव्या शतकात महाराष्ट्रातून वाराणसीला जाऊन स्थायीक होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले. त्यामुळे महाराष्ट्रीय संस्कृतीचा वाराणसीतील संस्कृतीवर झालेला परिणामाचे विवेचन या प्रबंधामध्ये केलेले आहे. याउलट वाराणसीय संस्कृतीचा परिणामही महाराष्ट्रीय संस्कृतीवर झालेला दिसतो. वाराणसी या तीर्थस्थानाचा, तेथील अनेक दैवतांचा विशेषत: काशी-विश्वेश्वर, काळभैरव वगैरे देवतांचा त्याचबरोबर तेथील गंगातीर्थ आणि गंगास्नानाचा, वाराणसीतील धार्मिक-सांस्कृतील जीवनाचा, भाषेचा, मंदिर व घाट स्थापत्याचा विशेष-वेगळा ठसा महाराष्ट्रीय समाजमनावर पडलेला दिसतो.

वाराणसी (काशी) या तीर्थस्थानाच्या पवित्रपणा बद्दलची महाराष्ट्रीय समाजातील भावना फार तीव्र असलेली दिसते. शिलालेख, ताम्रपट आणि ऐतिहासिक मोडी-मराठी कागदपत्रांमधून यासंबंधीत मजकूर दिसतो. एखाद्या धर्मसभेत, जात-पंचायतीत घेतलेला निर्णय त्यासंबंधीत लोकांनी पाळावा यासाठी त्यांना काही वेळेला काशी या तीर्थस्थानाची किंवा काशी-विश्वेश्वराची आण घालून शापवचनांद्वारे संबंधीतांना भय दाखविले जात असे. इ.स. १४१४ मधील विजयनगरचा संगम देवराय (प्रथम) याच्या वेळचा बांदोडे येथील शिलालेखाच्या शेवटी शापवचन लिहिले आहे. त्यात असे लिहिले आहे की, 'हा केला धर्म जो मोडील त्याने वाराणसीत श्रीविश्वेश्वरासन्निध सूर्यग्रहणाच्या वेळेस आपले आईबाप व गाई वधिल्या (असे समजावे), तो पापास जाईल' (तुळपुळे १९६१: ३०६). एका निवाडापत्राच्या/महजराच्या शेवटी ''कोन्ही हाकीम हिंदू

अनसारिखे हरकती करील ***त्यास कासीस गाये मारिलियाचे पातक असे*** व मुसलमाण हाकीम हरकती करील त्यास मकेस सोर मारिलियाची सोगंद असे'' अशा त-हेचा मजकूर आला आहे (कुलकर्णी २०१०: ४३). महाराष्ट्रातील ब्राह्मण जातीतील तंटे विषयक निवाडापत्रे काशीतील धर्मसभेने दिलेली आहेत. याची विशेष चर्चा 'मराठी समाज आणि ग्रामण्ये' या प्रकरणात केलेली आहे. काशीतील धर्मसभेने दिलेल्या प्रत्येक निर्णयपत्रांमध्ये 'काश्यां मुक्तिमंडपे' म्हणजेच काशी येथील विश्वेश्वराच्या मंदिरातील मुक्तिमंडपामध्ये हा निर्णय घेण्यात आला असा उल्लेख आढळतो. या निर्णयपत्रातील मजकूर संबंधीतांनी पाळावा म्हणून निर्णयपत्रांच्या शेवटी 'त्याशि श्रीविश्वेश्वराची आण ते अति पाषांड करिती..........' असे लिहून संबंधीतांना श्रीविश्वेश्वराच्या शपथेचे भय दाखविले आहे (पिंपुटकर १९२६: १५).

मराठी लोकांच्या काशीयात्रेचे वर्णन 'काशीयात्रा' प्रकरणामध्ये केलेले आहे. काशीयात्रेला जाण्याच्या तीव्र इच्छेपोटी मराठी लोकांनी आर्थिक मदती अभावी कर्जही घेतलेले आढळते आणि ते कर्ज फेडता न आल्यामुळे प्रसंगी त्यांनी ते कर्ज फेडण्यासाठी आपले वतन विकण्यासही मागे पुढे पाहिलेले दिसत नाही. याबाबतची घटना ऐतिहासिक कागदपत्रात येते ती अशी- एकदा वाईस्थित भिऊबाई देशपांडे आपल्या अंध मुलासह काशीयात्रेला गेली. त्यासाठी तिने दिडशे रूपयांचे कर्ज घेतले होते. काशीयात्रेहून आल्यानंतरही ते कर्ज तिला फेडता आले नाही. यात्रा केली याबद्दल पुण्य मिळाले, परंतू त्यासाठी घेतलेले कर्ज फेडता न आल्याने ज्याने आर्थिक मदत केली त्याला ते पुण्य मिळाले आणि यात्रेसाठी घेतलेले रूपये परत करता न आल्यामुळे आपण नरकात जाऊ या भितीपोटी भिऊबाई देशपांडे यांनी आपले देशपांडे वतन विकून आपले कर्ज फेडले. महाराष्ट्रीय समाजाच्या काशीयात्रेसंबंधी पाप-पुण्याच्या/स्वर्ग-नरकाच्या कल्पना किती टोकाच्या होत्या हे या गोष्टीवरून दिसून येते (कुलकर्णी २०१०: १६९-१८१). काही वेळेला प्रायश्चित्त म्हणून काशीयात्रा करावी असेही सांगण्यात येत असे. पुण्यात खाटकाने गाय मारली. कोतवालीकडील कारकून बालाजी दत्तात्रय यानी लांच खाऊन ती गोष्ट दाबण्याचा प्रयत्न केला. ते बैलाचे मांस असून तळेगांवाहून आणले असे भासविण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा गुन्हा उघडकीस आला. तेव्हा त्यास दंड करण्यात आला. जातिबहिष्कृत करून काशीयात्रेचे प्रायश्चित्त सांगण्यात आले (पेद २२, पत्र २२३, पृ.१२७). फलटण येथील दोन देशपांडे कुटूंबात भांडण होते. भांडणांचे रूपातर मारामारीत होऊन दोन्हीकडील एक एक मनुष्यास तलवारीची जखम होऊन त्यास मृत्यू आला. सबब ब्रह्महत्या घडल्यामुळे ब्रह्मसभेने जाती बहि:कृत करून, काशी-रामेश्वर यात्रा करण्याची शिक्षा दिली. यात्रेहून आल्यानंतर तुलापुरी प्रायश्चित्त विधी करून व ब्राह्मण भोजन करवून परत जातीत घेतले (पेद ४२, पत्र १३१,पृ.१०७).

विधवा, परित्यक्त्या स्त्रियांचे प्रमाण काशीमध्ये खूप आढळते. राधाबाई, काशीबाई, सगुणाबाई या पेशव्यांच्या स्त्रिया, सरस्वतीबाई या पटवर्धन घराण्यातील, मैनाबाई या धारच्या पवार घराण्यातील, बायजाबाई या ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्यातील स्त्रियांनी विधवा झाल्यानंतरच काशीयात्रा केलेली दिसते. नाना फडणीसांच्या आईचे उदाहरण तर फारच भयानक आहे. पानिपतच्या रणसंग्रामात नानांची आई गायब होते. अब्दालीच्या लष्करात आपली आई आहे अशी बातमी नानांना लागताच त्यांनी तिचा शोध घेण्याकरीता उत्तरेत माणूस पाठविला. आईला सोडविण्यासाठी कितीही द्रव्य देण्याची नानांची तयारी होती. जर खरोखरीच आई सापडलीच तर तिच्या जातीविषयी चौकशी करून नीट असेल तरच देशाच परत पाठवावी, नाही तर प्रयागास परभारेच पाठवावी. जर शुद्धच असेल, आणि तिची यात्रेस जाण्याचा आग्रहच असेल तरी तिस पाठवावी असे नाना लिहितात. अब्दालीच्या लष्करात राहून बाटवली जाण्याची शक्यता अधिक होती. नाना लिहितात, 'कदाचित ब्राह्मण्यास चवली असली, तथापि सर्वस्व खर्च करून प्रयागास पाठऊन द्यावी. म्हणजे पुत्रजन्माचे सार्थक!' (मइसा ६, पत्र ४११, पृ.४७७). त्यावेळच्या महाराष्ट्रातल्या विधवा, परित्यक्त्या स्त्रियांच्या सामाजिक दैन्यावस्थांची ही काही उदाहरणे होत.

मराठी लोक वाराणसीला दोन कारणांसाठी राहावयास जात असत. एक, संस्कृत विद्येतील उच्च शिक्षण घेण्यासाठी आणि दोन, आयुष्यातील अखरेच्या काळात मोक्ष मिळविण्यासाठी काशीसारख्या पवित्र ठिकाणी वास करण्यासाठी. सदरील दोन्ही गोष्टींसाठी समाजातील सर्वसामान्य लोकांसाठी 'काशीवास' करणे हे आर्थिक गोष्टीं अभावी शक्य नसे. अशा वेळी समाजातील दानशूर व्यक्ती, राज्यकर्ता वर्ग या आर्थिक बाबींचे निवारण करत असे. मराठी समाजासंबंधात शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, विंचूरकर, पटवर्धन, नागपूरकर भोसले, पेशवे याबरोबरीने अनेक नाईक, दीक्षित, गद्रे यासारख्या सावकार घराण्यांनी केलेली आर्थिक मदत विचारात घेतली पाहिजे. मराठी लोक अशा सधन लोकांकडून आर्थिक वृत्ती घेऊन काशीमध्ये कालक्रमणा किंवा शिक्षण घेत असल्याची असंख्य उदाहरणे ऐतिहासिक कागदपत्रांमधून आढळतात. अशा वृत्ती किंवा वर्षासने घेणाऱ्या माणसांनी 'श्री' म्हणजेच काशीमध्ये राहून राज्यांचे अभीष्ट चिंतन करावे एवढीच अपेक्षा असे. पहिल्या बाजीरावांच्या काळात सदाशिव नाईक आणि नानासाहेब पेशव्यांच्या काळात नारायण दीक्षित, त्यांचा मुलगा बाळकृष्ण दीक्षित हे पेशव्यांतर्फे काशीतील मराठी लोकांना वर्षासनाचे वाटप करीत असत. काही वेळा ही वर्षासने एक-दोन वर्षे मिळत नसे, त्यावेळी आर्थिक विवंचने मुळे ही वर्षासने नियमित मिळावी अशी असंख्य ऐतिहासीक पत्रे आढळतात. पहिल्या बाजीरावांच्या कारकिर्दीत सदाशिव नाईक-जोशी यांनी काशीतील मराठी लोकांसाठी अन्नछत्रे आणि ब्रह्मपुऱ्या वसविल्याचे दाखले आहेत. (पहा प्रकरण ३) इ.स. १७५९ मध्ये नानासाहेब पेशव्यांच्या कारकिर्दीतील एका पत्रात काशीतील ब्राह्मणांच्या वर्षासनाबाबत माहिती आली आहे. ''श्रीकाशीमध्ये ब्राह्मणांची वर्षासने आहेत ती पावली नाहीत म्हणोन

बोभाट झाला आहे. वाराणसीतील ब्राह्मणांमधील भांडणांमुळे ही वर्षासने मिळाली नसावीत. धर्माचा विषय असल्यामुळे त्यास अडथळा न करता वर्षासने द्यावीत,'' अशी सूचना नानासाहेब पेशव्यांनी वासुदेव दीक्षितांना केलेली आहे (मइसा ३, पत्र ५०१, पृ.४५९). काशीतील लोकांना वेळच्या वेळी वर्षासने मिळावीत यासाठी पेशवे सावकारी पेढ्यांमार्फत पैसे पाठवित असत. वाराणसीहून बाळकृष्ण दीक्षित रघुनाथराव दादांना लिहितात की, ' हरिदास कृपाराम याचे दुकानीची हुडी रु।। १०००० दाहा हजार रु।। ची पाठविली ती काली शुक्रवारी पावली........वर्षासनाचा हिशेब व कागद ऐसे हरभट मोडक यांबरोबर आजीव रवाना केले आहेत' (मइसा ११, पत्र ९३, पृ.७४). इ.स. १७६७-६८ मध्ये केशव दीक्षित पाटणकरांना वर्षासने वाटण्याची सनदच दिली आहे. त्यात असे म्हटले आहे की, 'श्रीकाशीत ब्राह्मण आहेत. त्यांची सन तिसा सितैनची वर्षासने वाटावयासी राजश्री नारो बल्लाळ भट कारकून पाठविले आहेत. वर्षासनाचा जाबता अलाहिदा पाठविला आहे. त्यास तुम्ही व मशारनिल्हे मिळून चौकशीने नेमणुकेप्रमाणे वाटणी करावी' (वाड डायरी ७: २). वर्षासन मिळणाऱ्या व्यक्तीने काशीवासा दरम्यान फक्त स्नानसंध्या करून रहावे, चाकरी कोणाकडे करू नये, कोणत्याही घालमेलीत पडू नये अशा अटीही वर्षासने देताना घातल्या जात असत (वाड डायरी ७: २). पेशव्यांतर्फे अंध, अपंग व्यक्तींच्या निवासाची सोयही काशीत होत असे. अशाच एका आत्मानंद सरस्वती स्वामी या अंध माणसास रवाना करताना त्याची राहण्याची सोय मंगलगौरीचे घाटी करावी अशी सूचना पेशवे करतात (पेद ४३, पत्र ११९, पृ.९९). काशीत राहून राज्याचे अभीष्ट चिंतन करणाऱ्या विद्वान ब्राह्मणाला वृत्ती म्हणजेच जमीनजुमला देऊन त्यातून येणाऱ्या उत्पन्नातून कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी पेशव्यांतर्फे सनदही दिली जात असे. अशा वेळी ही जमीन पेशव्यांच्या राज्यातील कोणत्याही भागातील असे. काशीमध्ये राहणाऱ्या सूर्यनारायण शास्त्री द्रविड यांना अशाच तऱ्हेची वृत्ती काल्पी प्रांतातील अकबरपूर, शहापूर गावात बाळाजी बाजीराव पेशव्यांनी दिलेली आहे (ठाकूर १९४४:७१).

महाराष्ट्रातील 'काशीविश्वेश्वर' मंदिरांची उभारणी (चित्र ४७ आणि ४८)

काशी हे शैक्षणिक केंद्र म्हणून उदयास येण्यास कारणीभूत ठरले ते मराठी पंडित. पंधराव्या-सोळाव्या शतकापासून एकोणीसाव्या शतकापर्यंत सतत महाराष्ट्रीय पंडित अधिक शिक्षणासाठी काशीस गेल्याची असंख्य उदाहरणांची चर्चा या प्रबंधात केलेली आहे. काशीतील विद्वत्तेचे क्षितीज अधिकाधीक उंचीवर नेऊन ठेवण्यात या महाराष्ट्रीय पंडितांनी रचलेल्या-लिहिलेल्या ग्रंथांचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. काशीमध्ये स्थायीक झालेल्या या पंडितांनी केलेल्या अध्ययन आणि अध्यापनामुळेच काशी हे भारतातील एक अग्रगण्य शैक्षणिक केंद्र म्हणून उदयास आलेले दिसते. यातील एक महत्त्वाचे पंडित म्हणजे

नारायणभट्ट! सतराव्या शतकात याच नारायणभट्टांनी 'त्रिस्थळीसेतू' या ग्रंथाची निर्मिती करून मराठी लोकांना त्रिस्थळी यात्रा करण्याची जिज्ञासा निर्माण केली. काशीतील मराठी पंडितांच्या मराठी साम्राज्यात सर्वदूर पसरलेल्या संपर्कजालाच्या आधारे अधिकाधिक लोकांना त्रिस्थळीयात्रेस येण्याचे आव्हान काशीतील मराठी पंडित करीत होते. यालाच पूरक म्हणजे मराठी सत्ताधिशांनी उत्तर भारतात उभारलेल्या सत्ताकेंद्रामुळे तयार झालेल्या सुरक्षित आणि हक्काच्या यात्रामार्गामुळे हजारो यात्रेकरू एकत्र येऊन काशीयात्रेचे पुण्य पदरात पाडून घेत होते. महाराष्ट्रातील काशीयात्रेच्या लोकप्रियतेची अनेक उदाहरणे ऐतिहासिक कागदपत्रातून दिसून येतात. वाहतूकीच्या साधनां अभावी काशीयात्रेला लागणारा वेळ सहा महिने ते एक वर्षे इतका येत असे. काही वेळा हा कालखंड वाढतही असे. राजकीय अस्थिरतेच्या मुळे आणि चोर-दरोडेखोरांमुळे प्रसंगी प्राणावरही बेतत असे. अशा प्रतिकूल परिस्थितीत जेव्हा एखादा माणूस त्रिस्थळीयात्रेस जात असे त्यावेळी तो जिवंत परत येईल यांची निश्चिती नसे. काशीविश्वनाथाचे दर्शन, चार्तुमासात करावयाचा कासीवास आणि गंगास्नानाचे महत्त्व, याचबरोबर प्रयागच्या त्रिवेणीसंगमावरचे माघी स्नान आणि गया येथील पितरांच्या श्राद्धाचे महत्व 'त्रिस्थळीसेतू' या ग्रंथात ठळकपणे अधोरेखीत केलेले आहे. मराठी समाजमनावर या ग्रंथात सांगितलेल्या गोष्टींचा खोलवर परिणाम झाल्याचे दिसून येते. सगळीच माणसे काही काशीयात्रेस जाऊ शकत नव्हती. अतिशय कष्टप्रद असलेली ही यात्रा पुरी करणे समाजातील काही मोजक्याच लोकांना शक्य होत होते. ज्या ठिकाणी जाण्यास कठीण आहे आणि त्यामुळे ऐहिक जीवनातील काही गोष्टी करणे जमत नाही असे पाहिल्यावर मानवी स्वभावानुसार ती ठिकाणे आणि त्या गोष्टी साकारण्यासाठी लोकांनी आपल्या जवळच्या प्रदेशातच या गोष्टींची निर्मिती करण्यास सुरूवात केली. आपल्या घरात-प्रदेशात राहून काशीविश्वनाथाचे दर्शन घेणे अवघड आहे असे वाटल्यावरून लोकांनी आपल्या गावातच शिवाचे मंदिर बांधून त्यास 'काशीविश्वेश्वर' असे नाव दिले. काशीस किंवा रामेश्वर येथे जाणे शक्य नसल्यामुळे लोकांनी अनेक गावात 'काशीविश्वेश्वर' आणि 'रामेश्वर' यांची मंदिरे उभारल्याची उदाहरणे महाराष्ट्रभर पसरलेली दिसतात. हिंदुधर्मातील व्यक्तिव्यतिरिक्त इतर धर्मीय माणसे काशीकडे कोणत्या पद्धतीने पाहतात याचा उत्तम नमुना म्हणजे फादरचे स्टिफन्सचे क्रिस्तपुराण होय. इ.स. १६१५ साली फादर स्टिफन्सचे क्रिस्तपुराण गोव्यामध्ये छापले गेले. मराठी भाषेचे महत्त्व सांगताना त्यांनी काशीचे उदाहरण दिले आहे.

तीर्थामध्ये काशी । का व्रतांमध्ये एकादशी ।।

भाषांमध्ये तैसी । मऱ्हाटी शोभिवंत ।।९८।।


मंगळवेढा, जि.सोलापूर येथील काशीविश्वेश्वराच्या देवळात एक मराठी शिलालेख आहे. शिलालेखाचा काळ शालीवाहन शके १४९४ असून हिपरग्याचा कुलकर्णी मंगळवेढ्याची मजमू करीत असता

त्याने देवालयाचा जीर्णोद्धार केल्याचा हा लेख आहे. जीर्णोद्धार करताना त्याने 'विश्वनाथ लिंगाची प्रतिष्ठापना केली' असा लेख आहे. शके १४९४ म्हणजे इ.स. १५७२ म्हणजेच यावेळी काशीमध्ये 'विश्वनाथाचे' मंदिर अस्तित्वात नव्हते. पुढे इ.स. १५८५ च्या दरम्यान ते नारायणभट्टाने बांधले. म्हणजेच इ.स. १५८५ च्या आधीच्या काशीविश्वनाथाच्या मंदिराची स्मृती महाराष्ट्रातील मराठी लोकांच्या मनात होती. या स्मृतीच्या आधारेच त्यांनी मंगळवेढ्यातील मंदिरात काशीविश्वनाथ लिंगाची स्थापना केली (राजवाडे १९९८: ५६).

महाराष्ट्रातील काशीविश्वेश्वर मंदिरांची यादी
काशीविश्वेश्वर मंदिर, वाई, जिल्हा सातारा
काशीविश्वेश्वर मंदिर, संगम माहुली, जि.सातारा
काशीविश्वेश्वर मंदिर, कोल्हापूर
काशीविश्वेश्वर मंदिर, बारामती, जि.पुणे
काशीविश्वेश्वर मंदिर, प्रकाशे, जि.नंदुरबार
काशीविश्वेश्वर मंदिर, मंगळवेढा,जि.सोलापूर
काशीविश्वेश्वर मंदिर, पंढरपूर, जि.सोलापूर
काशीविश्वेश्वर मंदिर, नीरा-नरसिंहपूर,जि.सोलापूर
काशीविश्वेश्वर मंदिर, तासगाव,जि.सांगली
काशीविश्वेश्वर मंदिर, चारठाणा, जि.परभणी
काशीविश्वेश्वर मंदिर, शनिवार पेठ, पुणे
काशीविश्वेश्वर मंदिर, शिवाजीनगर गावठाण, पुणे



चित्र ४७: काशीविश्वेश्वर मंदिर, संगम माहुली, जिल्हा सातारा



चित्र ४८: काशीविश्वेश्वर मंदिर, वाई, जिल्हा सातारा

काशी, गंगा यावरून मराठी भाषेत आलेले वाक्प्रचार

१. **त्रिस्थळी यात्रा**

काशी, प्रयाग, गया या तीन स्थळी जाऊन केलेली जी यात्रा, ती 'त्रिस्थळी यात्रा'. यावरून एका माणसाला एकाच कामासाठी अनेक ठिकाणी जाण्याचा प्रसंग येतो, त्याला 'त्रिस्थळी यात्रा' किवा 'त्रिस्थळी' असे म्हणतात.

२. **वाहिली ती गंगा राहिले ते तीर्थ**

पैसे दानधर्माकडे लागले तर पुण्यसंचय होईल, आपल्याजवळ राहिले तर आपल्याच उपयोगी पडतील, मिळून कोणत्याहि बाजूने फायदाच. (पाणी वाहून गेले तर ती गंगा-पवित्र नदी होते. बरे, वाहून न जाता एकाच जागी सांचून राहिले तरी त्याचे तीर्थ - पवित्र कुंड होते.)

३. **काशीकर**

पक्का भामट्या. काशीचे भामटे फार कुशल असतात, यावरून ''काशीकर'' याचा अर्थ वरीलप्रमाणे झाला आहे.

४. **शंभर काशिकर आणि एक नाशिककर**

शंभर काशिकरांच्या लबाडीच्या समान एका नाशिककराची लबाडी असते.

५. **वाहती गंगा आणि चालता धर्म**

वाहत्या गंगेच्या प्रवाहासारखा धर्म (भक्ती) सुद्धा प्रवाही असली पाहिजे. एकदा दानधर्म करणे पुरेसे नाही.

६. **काशीस भागीरथी नेणे**

जेथे जी वस्तू विपुल प्रमाणात आहे तेथे ती नेणे; विनाकारण श्रम करणे.

७. **मरावे काशी की मरावे मिराशी**

काशीत मरावे किंवा स्वत:च्या घरात/वतनावर/जमिनीवर मरावे. काशीत मेल्याने मोक्ष मिळतो, तर पैतृक/परंपरेने आलेल्या जमिनीतून पुढच्या पिढीच्या उपजीविकेची खात्री मिळते.

८. लेंड नाले गंगेस मिळता गंगा झाले

जेव्हा एखादा नाला किंवा प्रवाह गंगेपर्यंत पोहचतो तेव्हा त्यांची गंगा होते. जेव्हा एखादा लहानसा प्रवाह/नाला असतो तेव्हा त्या प्रवाहाला/नाल्याला कोणीही विचारीत नाहीत. परंतु तो जेव्हा पवित्र गंगा नदीत मिसळतो तेव्हा त्या पाण्याला गंगा नदीतील पाण्याचे पावित्र्य प्राप्त होते.

९. काशीरामेश्वराचे अंतर

अतिशय मोठा भेद, फरक, तफावत. काशी हे क्षेत्र भारताच्या अगदी उत्तरेस आहे आणि रामेश्वर हे क्षेत्र अगदी दक्षिणेस आहे. त्या वरून हा वाक्प्रचार रूढ झाला.

१०. गंगाजम्नी

प्रयाग येथे गंगा आणि जम्ना (यमुना) यांचा संगम होतो. तेथे दोन्ही नद्यांच्या पाण्यांच्या रंगाच्या भिन्नतेमुळे दोहींचे प्रवाह एकत्र झाल्यानंतरहि स्पष्ट दिसतात. यावरून दोन निरनिराळ्या परस्पर विरोधी वस्तूचे मिश्रण असा अर्थ.

११. आळशावर गंगा

गंगोदकाने स्नान घडले असता सगळ्या पापांचे क्षालन होते असा हिंदूंचा समज आहे आणि त्यासाठी ते लोक शेकडो कोसांवरून मोठे कष्ट सोसून गंगास्नानास जातात. अशा स्थितीत एखाद्याचे घरी गंगा आपण होऊन चालून आली तर तो मोठा भाग्यवान म्हटला पाहिजे. यावरून एखादी भाग्याची गोष्ट अनायासे घडून आली असता या म्हणीचा उपयोग करतात. सगराचे साठ हजार पुत्र शापाने दग्ध होऊन पडले असता भगीरथाने खाली आणलेल्या गंगेचा ओघ त्यांच्या अंगावरून गेल्यामुळे त्यांचा उद्धार झाला. या पौराणिक कथेशी या संप्रदायाचा संबंध आहे.

गंगा आली आळशावरी । आळशी देखूनी पळे दुरी ।। तुकाराम

१२. गंगाजळी

खजिना - गंगेचा प्रवाह जसा कधी खुंटावयाचा नाही, त्याप्रमाणे ज्यातले पैसे कधी संपावयाचे नाहीत असा खजिना.

१३. गंगेस (गंगेत) घोडे न्हाणे

कार्य तडीस गेल्यामुळे कृतकृत्यता वाटणे.

हा वाक्प्रचार जेव्हा शिवकालीन साधनात येतो तेव्हा गंगा म्हणजे गोदावरी समजली जाते. मराठे लोक ज्यावेळी उत्तर हिंदुस्थानात स्वाऱ्या करू लागले, तेव्हा भीमथडीच्या तट्टांना गंगेचे स्नान घालावयाचे. म्हणजे गंगेपर्यंतचा मुलूख काबीज करावयाचा असा त्यांचा विचार असे, या ऐतिहासिक गोष्टीशी याचा संबंध आहे.

१४. अडल्याची काशी कोणी जावे तिजपाशी

ज्याला कष्ट करावयाचे नसतात तो काशीला जातो. म्हणजेच जीवन जगण्यापुरते सुद्धा ज्याला पैसे कमविता येत नसतील त्याने भिकारी बनून काशीस जावे. जीवनातून निवृत्त झालेली, वृद्ध झालेली किंवा ज्यांना आपल्या चरितार्थासाठी काहीही कमाविता येणे शक्य नसते ती माणसे काशीस जातात. काशीस अनेक दाने धर्मार्थ दान देत असतात, अन्नदान करीत असतात. त्यातूनच मरेपर्यंत या लोकांचा चरितार्थ चालू शकतो.

१५. आळशाला गंगा दूर आणि पाप्याला काय पंढरपूर

आळशी माणसाला गंगा दूर असते तसेच पापी माणसाला जवळ असलेले पंढरपूरही दूरच असते.

१६. आळशावर गंगा लोटली

आळशी माणसावर गंगा ओतली. आळशी माणसाने काहीही केले तरी त्याला चांगली गोष्ट मिळते आणि ते त्याला अनपेक्षीत पणे मिळालेले असते.

१७. काशी केली वाराणसी केली तरी कपाळाची कटकट नाही गेली

काशी केली, वाराणसी केली तरी एखाद्याची चिंता मिटली नाही. मन:शांती मिळविण्यासाठी तीर्थयात्रा कामी पडत नाही.

१८. काशीस गेला काशीदास मथुरेस गेला मथुरादास

आपण जिथे जातो तिथलेच होऊन जाणे.

१९. काशीस गेल्याचे आपण सांगतो पण मांजर मारल्याचे सांगत नाही.

एखादा माणूस काशीस जाऊन आल्याचे सांगतो, परंतू मांजर मारल्यामुळे त्याला काशीस जावे लागले हे तो सांगत नाही. तो आपल्या चांगल्या गोष्टी सांगतो, पण वाईट गोष्टी सांगत नाही. मांजराला मारले तर त्या कृत्याच्या पापक्षालनासाठी काशीस जावे लागते अशी हिंदू धर्मात श्रद्धा आहे.

२०. गंगास्नान आणि तुंगापान

गंगास्नान करणारा आणि गांजा ओढणारा

काशी/वाराणसी/गंगा/विश्वनाथ यावरून पडलेली माणसांची नांवे

१. काशीबाई २. काशीनाथ ३. वाराणसीबाई ४. गंगाराम ५. विश्वनाथ ६. भागीरथीबाई ७. मनकर्णिका/मणिकर्णिका

स्थानिक नद्यानाही गंगासमान मानणारा मराठी समाज

अनादी काळापासून माणसाला 'पाणी हेच जीवन आहे' याची समज आहे. त्यामुळेच भारताची तारणहार बनलेल्या गंगा नदीचे महत्व भारतीय परंपरेत महनीय आहे. गंगास्नानाचे महत्व 'त्रिस्थळीसेतू' ग्रंथाने प्रतिपादले असल्याने आणि गंगा आपल्या प्रदेशापासून फार दूर असल्याने गावातीलच नदीला लोक गंगा समजू लागले. महाराष्ट्रातील प्रमुख नदी गोदावरीला आजही तिच्या काठावरील जनसमुदाय उत्स्फूर्तपणे गंगाच म्हणतो. या पुढची पायरी म्हणजे हाच जनसमुदाय आपल्या गावातील नदीलाच गंगा समजतो. यादव नृपती रामचंद्रदेवाच्या इ.स. १३१० मधील ताम्रपटात त्याने पुरुषोत्तमपुरी (जि.बीड) गाव ब्राह्मणांना अग्रहार म्हणून दान दिले आहे. या अग्रहाराच्या चतु:सीमा दर्शवताना या गावाच्या उत्तरेला गंगा नदी असल्याचे लिहिले आहे. अर्थातच ही गंगा नदी म्हणजे गोदावरी नदीच आहे (मिराशी १९६१: १४७-१६९). महाराष्ट्रातील अनेक नद्यांच्या नावातच गंगा शब्द असल्याचे दिसते.

महाराष्ट्रातील नद्याच्या नावात गंगा शब्द असलेल्या नद्यांची नावे	
दमणगंगा	जिल्हा ठाणे
पाताळगंगा, बाळगंगा	जिल्हा रायगड
बाणगंगा	जिल्हा सातारा
पंचगंगा, दूधगंगा, वेदगंगा,उत्तर व दक्षिण दूधगंगा	जिल्हा कोल्हापूर
येलगंगा	जिल्हा औरंगाबाद
पैनगंगा	जिल्हा हिंगोली, नांदेड
बाणगंगा	जिल्हा उस्मानाबाद, बुलढाणा
नळगंगा, विश्वगंगा, ज्ञानगंगा	जिल्हा बुलढाणा
पैनगंगा	जिल्हा वाशिम, यवतमाळ,चंद्रपूर,गडचिरोली
रामगंगा	जिल्हा यवतमाळ
वैनगंगा	जिल्हा नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर

दक्षिण काशी: संकल्पना आणि निर्मिती

प्रयागला त्रिवेणीसंगमामुळे महत्व आलेले असल्याने, महाराष्ट्रातही जिथे जिथे तीन नद्या एकत्र होतात किंवा तीन नद्यांचा संगम ज्या ठिकाणी होतो त्या ठिकाणांना पवित्र तीर्थस्थानांचा दर्जा मिळाल्याचे दिसून येते. उदा.प्रकाशे, जि.नंदुरबार. गयेला जाऊन श्राद्धविधी करणे सर्वसामान्याना शक्य नसल्यामुळे अशा संगम ठिकाणांचे महत्व वाढून तिथेच हे विधी केले जाऊ लागले. लोकांच्या सोयीसाठी नदीवर घाटही बांधले जाऊ लागले. क्षेत्रांच्या ठिकाणी विद्याभासाच्या सोई तयार केल्या गेल्या. वरील जास्तीत जास्त गोष्टी ज्या ठिकाणी आढळून येतात ती ठिकाणे महाराष्ट्रात 'दक्षिण काशी' म्हणून ओळखली जाऊ लागली. 'दक्षिण काशी' म्हणून ओळखली जाणारी महाराष्ट्रातील काही ठिकाणांची माहिती पुढे देण्यात येत आहे.

दक्षिण काशी पैठण

त्र्यंबकेश्वरला उगम पावणाऱ्या गोदावरी नदीच्या किनाऱ्यावरील पैठण म्हणजेच प्राचीन प्रतिष्ठानला एक पवित्र नगरी आणि प्राचीन संस्कृतीचे पारंपारिक केंद्र म्हणून अतिशय महत्त्व आहे. प्राचीन कालात धार्मिक केंद्रेच प्रामुख्याने शैक्षणिक केंद्रे होती. कारण समकालीन शिक्षणप्रणालीत धर्मशिक्षणाचा वाटा फार मोठा होता. प्रतिष्ठान नगरीला आपल्या साम्राज्याची राजधानी करणारे सातवाहन सम्राट सुविद्य असून वैदिकधर्माभिमानी

होते. त्यामुळे त्यांनी प्रस्थापित शैक्षणिक चळवळीस उदार आश्रय दिला. शैक्षणिक क्षेत्रात यावेळी पैठण हे दक्षिण भारताचे प्रमुख विद्यापीठ बनले होते अशा आशयाचे विपुल संदर्भ अनेक जैन ग्रंथातून मिळतात. 'कल्पप्रदीप' या विख्यात जैन ग्रंथात पैठणला 'ज्ञानपीठ' म्हणून गौरविले आहे.

पैठणला 'दक्षिण काशी' हे महत्त्व प्राप्त होण्यास एक संस्था कारणीभूत ठरली ती म्हणजे 'ब्रह्मसभा' होय. स्वर्गसम असलेल्या प्रतिष्ठानक तीर्थक्षेत्राचे वर्णन पेठण येथील सोमेश्वरदेवाच्या शिलालेखात आढळते. याच शिलालेखात पैठण येथील ब्राह्मणांचे "नानातर्कविचारसारनिपुणैविप्रैरनेकैवृतं " असे वर्णन आले आहे (तुळपुळे १९६३: ३६३-३६९). यावरून पैठण येथील विप्रवर्ग कसा होता याचा तर्क करता येतो. याच विप्राच्या सभेत म्हणजेच ब्रह्मसभेत ज्ञानेश्वरभावंडांनी आपली छाप पाडली. नानातर्कविचारसारनिपुण असलेल्या विप्रमंडळींनी ज्ञानेश्वरादी भावंडांना शुद्धिपत्र दिले. समाजातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे जातीव्यवस्था बंदिस्त झाली होती. कर्माच्या आधारावर जात ठरण्याऐवजी जन्माआधारे ती ठरविली जात होती. या व्यवस्थेला जेव्हा जेव्हा आव्हाने दिली गेली त्या त्या वेळी ग्रामण्ये उपस्थित झालेली दिसतात. ग्रामण्यामुळे पिडीत झालेला समाज किंवा मनुष्य त्याविरूद्ध दाद मागण्यासाठी ब्रह्मसभेकडे न्याय मागत असे. प्रचलित चातुर्वर्ण्य संस्थेत काही बिघाड झाल्यास प्रायचित्ताने शुद्ध करून घेण्याची कल्पना त्या कालखंडात रूढ होती. मात्र प्रायश्चित्त कोणते व कसे द्यावयाचे हे ठरविण्याचा अधिकार केवळ ब्रह्मसभेलाच होता. यासभेत वेद, श्रुती, स्मृती आणि मीमांसा जाणणाऱ्या पंडित ब्राह्मणांची आवश्यकता असे. इतकी पात्रता असणारे ब्राह्मण काही धर्मपीठातच उपलब्ध होत असत. तथापि असे ब्राह्मण पैठण येथे असल्याने पैठणच्या ब्रह्मसभेचा निर्णय मान समजला जात असे. ज्ञानेश्वरादी भावंडांना आळंदी येथील तथाकथित पंडितांनी व्रतबंधाचा हक्क नाकारला व त्यांना पैठण येथील ब्रह्मसभेकडून व्रतबंधास आवश्यक असणारे शुद्धिपत्र आणण्यास सांगितले. काशी येथील ब्रह्मसभेच्या निर्णयाप्रमाणे पैठणच्या ब्रह्मसभेचे निर्णयही समाज मानत असल्यामुळे पैठणला 'दक्षिण काशी' म्हणून जनमानसात मान्यता मिळालेली आहे.

काशीप्रमाणेच पैठणलाही 'मोक्षतीर्थ' म्हणून मान्यता मिळाली आणि 'दक्षिण काशी' असा पैठणचा गौरव केला जाऊ लागला असे सांगताना डॉ. मोरवंचीकर लिहितात की."यादव काळात पैठण विद्येचे माहेरघर असून तेथे अनेक आश्रम, शास्त्रमठ व पाठशाला होत्या. पाठक, वेदपाठक, दीक्षित, पंडित, उपाध्ये आणि भट या नावाची अनेक घराणी त्याकाळी पैठणमध्ये असल्याचे महानुभाव साहित्यावरून स्पष्ट होते. पाठशाळेत अध्यापन, तर मठामध्ये शास्त्रचर्चा चालत असे. यादव काळात मूर्तीपूजा, देवता-याग, व्रत-उद्यापन, दान व तीर्थयात्रा यांचे महत्त्व वाढले होते. समाजातील या स्थित्यंतरामुळे पैठणच्या वैदिक परंपरेला मोठा धक्का बसला. वैदिक पंडिताऐवजी पौरोहित्य करणारांचा नवा उपाध्यायवर्ग निर्माण झाला होता. हे

तीर्थाचे उपाध्ये असल्यामुळे यांना तीर्थोपाध्ये म्हणण्यात येत असे पैठणच्या तीर्थोपाध्यायांची परंपरा आजही दिसून येते. याच काळात उत्तर भारत मुस्लिम वर्चस्वाखाली गेल्यामुळे दक्षिण भारतातील पैठणसारख्या क्षेत्राचे महत्त्व वाढण्यास मदत झाली. कर्मकांड व व्रत वैकल्याचा प्रभाव असणाऱ्या परिसरात शेकडो मंदिरे निर्माण झाली. भिन्न व्रताची सांगता करण्यासाठी तीर्थयात्रेच्या निमित्ताने हजारो यात्रेकरू पैठणला भेट देऊ लागले. मुक्तीसाठी व्रत व व्रताचे उद्यापन ब्राह्मण भोजनाने व दानाने होत असे. तीर्थक्षेत्री दान केल्यामुळे त्वरीत मुक्ती मिळते ही भावना दृढ झाली होती.'' (मोरवंचीकर २०१८: १९८) पैठणचे कावळे घराणे हे शिवाजी महाराजांचे तीर्थोपाध्याय असल्यांची नोंद ऐतिहासिक कागदपत्रातून मिळालेली आहे.

पैठणला भरणारी सिंहस्थाची यात्रा आणि पंचक्रोशी यात्रा ही प्रयाग आणि काशीशी थेट संबंध दर्शविणाऱ्या गोष्टी आहेत. गोदावरीला दक्षिणेत 'गंगा' असेच संबोधले जाते. प्रयाग प्रमाणेच पैठणलाही सिंहस्थ यात्रा भरते. गुरू ग्रहाने सिंह राशीचक्रात प्रवेश केल्यानंतर या समारोहाचा आरंभ होतो. लोकसमजुतीप्रमाणे या कालखंडात सर्व देवदेवता गोदातटी वास्तव्यास येतात. म्हणून या काळात गोदातटाकास विशेष महत्त्व प्राप्त होते. विशिष्ट दिवशी मोठ्या प्रमाणात यात्रा भरून मोठी दाने दिली जातात. अशाच एका सिंहस्थ पर्वणीसाठी श्री चक्रधर प्रतिष्ठानास आले होते (मोरवंचीकर २०१८: १८०). काशीतील पंचक्रोशी यात्रा आणि त्यातील मराठी लोकांच्या सहभागाच्या पार्श्वभूमीवर पैठण येथील पंचक्रोशी यात्रेचे महत्त्वही अधोरेखीत करणे जरूरीचे आहे. पैठण महात्म्यात यासंबंधीत उल्लेख येतात. या पंचक्रोशीमध्ये गोदावरीलच्या पवित्र प्रवाहाच्या अनुषंगाने अनेक लहान-मोठी तीर्थस्थाने निर्माण झाली आहेत. सर्वसामान्यत: या पंचक्रोशीच्या यात्रेस गोदा व एला यांच्या संगमापासून आरंभ होतो व गोदा-वीरभद्रा यांच्या संगमी ही यात्रा परिपूर्ण होते. या दरम्यान असणारी तीर्थे ही बहुसंख्य जलतीर्थे असल्यामुळे या परिक्रमेत प्रत्येक तीर्थांच्या सान्निध्यात यात्रेकरूने स्नान करणे आवश्यक असते. पंचक्रोशीयात्रेमध्ये गोदावरी प्रवाहाच्या अनुषंगाने निघालेल्या पंचक्रोशीयात्रेच्या मार्गात 'प्रयाग' नावाचे तीर्थस्थल येते. त्रिस्थळी यात्रेमधील प्रमुख तीर्थ 'प्रयाग' च्या स्मृती जागृत करण्याचा प्रयत्न 'प्रतिष्ठान महात्म्य' यात केला गेला आहे असे दिसून येते (मोरवंचीकर २०१८: ७२).

दक्षिण काशी वाई

क्षेत्र महाबळेश्वरला उगम पासून महाबळेश्वरच्या पर्वतीय प्रदेशातून पठारी भागात कृष्णा नदी जिथे प्रवेश करते त्या भागात वाई हे गाव वसलेले आहे. प्राचीन आणि पौराणिक परंपरा लाभलेल्या या गावात कृष्णा नदीवर अनेक घाट आणि मंदिरे बांधलेली दिसतात. जरी लोककथा आणि पौराणिक कथांमधून वाईचे

अतिप्राचीनत्व समजत असले तरी आज दिसणाऱ्या वाईत मराठा कालीन अवशेषांची रेलचेल मोठ्या प्रमाणात दिसून येते. मराठा काळात विशेषत: पेशवे काळात सुखवस्तू मराठी ब्राह्मण वर्गाची वस्ती मोठ्या प्रमाणात वाईत झालेली दिसते. याच काळात वाईचे 'दक्षिण काशी' म्हणून महत्व मान्यता पावलेले दिसते. मराठा काळात काशी प्रमाणेच वाई येथेही वेदविद्येचे शिक्षण देणाऱ्या अनेक पाठशाळा अस्तित्वात आल्या. मराठा काळात धर्मविषयक अनेक निर्णय येथील धर्मसभेत झालेले दिसतात. पेशवे काळात पेशव्यांचे आप्त असलेल्या रास्ते सरदारांना वाई परिसराची जहागिरी देण्यात आली. सहाजिकच त्यांच्या आश्रयाने अनेक ब्राह्मण कुटुंबे या ठिकाणी राहावयास आली आणि आपला पारंपारिक व्यवसाय वेदविद्येच अध्यापन आणि अध्ययन करू लागली. या रास्ते जहागिरदारांनी कृष्णा काठावर अनेक घाट व मंदिरे स्वखर्चाने बांधलेली दिसतात. जरी हे घाट आणि मंदिरे मराठा स्थापत्यशैलीत असले तरी त्यावर काशीतील गंगाकाठावरील घाट व मंदिरांचा प्रभाव असावा असे वाटते. वर लिहिल्याप्रमाणे काशीविश्वनाथाचे दर्शन दररोज होण्याकरीता मराठी लोकांनी काशीविश्वनाथाची मंदिरे आपल्या गावात बांधली त्याला अनुसरून सरदार रास्ते यांनी सन १७६१ मध्येच कृष्णेकाठावर काशीविश्वेश्वर मंदिर बांधलेले दिसते. सरदार रास्ते यांनी बांधलेले घाट आणि मंदिरे केव्हा बांधले आणि त्याला खर्च किती आला त्यांची माहिती इतिहास संग्रह या मासिक पुस्तकात प्रसिद्ध झालेली आहे (इतिहाससंग्रह, पु,१, अं.९, १९०९).

कोणत्या देवाचे देऊळ	**बांधणाऱ्यांचे नांव**	**कधी बांधले तो शक/इ.स.**	**खर्च किती लागता ते रू.**
श्रीकाशीविश्वेश्वर	गणपतराव भिकाजी रास्ते	१६८३/१७६१	१,५०,०००/-
श्रीगणपती	गणपतराव भिकाजी रास्ते	१६८४/१७६२	१,५०,०००/-
श्रीगंगारामेश्वर	गंगाधरराव भिकाजी रास्ते	१६८७/१७६५	४०,०३०/-
श्रीभवानी	आनंदराव रास्ते	१६९०/१७६८	८६०/-
श्रीमहाविष्णू	आनंदराव रास्ते	१६९४/१७७२	२,१६,२१५/-
श्रीमहालक्ष्मी	आनंदराव रास्ते	१६९६/१७७४	२,७५,६३०/-
श्रीरामचंद्रजी	रामचंद्रराव भिकाजी रास्ते	१६९८/१७७६	१०,२४५/-
श्रीउमामहेश्वर पंचायतन	गंगाधरराव भिकाजी रास्ते	१७०४/१७८२	६०,०००/-
श्रीबहिरवदेव	गंगाधरराव भिकाजी रास्ते	१७०५/१७८३	१०००/-
श्रीसटवाई	गंगाधरराव भिकाजी रास्ते	१७०६/१७८४	३६०/-

दक्षिण काशी संगममाहुली, जि.सातारा

कृष्णा-वेण्णा संगमावर वसलेले हे छोटेसे गांव मराठ्यांची राजधानी सातारा शहरापासून फारच जवळ आहे. कृष्णा-वेण्णा या नद्याच्या संगमामुळे धार्मिक महत्त्व असलेल्या या ठिकाणी छत्रपती भोसले घराण्यातील महत्त्वाच्या व्यक्तिंची वृंदावने याठिकाणी बांधलेली आढळतात. सातारकर छत्रपतींचे प्रतिनिधी असलेल्या श्रीपतराव प्रतिनिधींनी संगममाहुली येथे काशी-विश्वनाथ मंदिराबरोबरच दुसऱ्या अनेक दैवतांची मंदिरे बांधलेली आहेत.

दक्षिण काशी कोल्हापुर

पंचगंगा नदीच्या काठावर वसलेले दक्षिण महाराष्ट्रातले कोल्हापूर हे प्राचीन नगर आहे. स्कंद पुराणातल्या करवीर महात्म्यात या नगराला 'दक्षिण काशी' असे म्हटले आहे. त्यात पुढे असे म्हटले आहे की काराष्ट्र (करवीर) देशाचा विस्तार दहा योजने असून हा देश दुर्गम आहे. याच देशात मध्यभागी लक्ष्मीनिर्मित क्षेत्र असून ते काशी इत्यादी क्षेत्रांहून अधिक पवित्र व दर्शनमात्रे पापांचा नाश करणारे आहे. इथे वेदपारंगत ब्राह्मण व ऋषी वास्तव्य करीत असून त्यांच्या दर्शनानेच पापक्षय होतो (जोशी १९६४: १०९). यादव राजा सिंघण कान्हरदेव यांच्या काळातील अब्दुल लाट, ता.शिरोळ येथील इ.स. १२५२ मधील शिलालेखात कोल्हापूरला दक्षिण वाराणसी, शिवकक्षेत्र आणि चौसष्ठी योगपीठ म्हटलेले आहे (Ritti and Karavirkar 2000: 109). इ.स.१५७९ मध्ये शृंगेरीपीठाच्या शंकराचार्यांनी कोल्हापूर येथे 'करवीर पीठ' स्थापन केले. इतिहासाचार्य राजवाडे यांनी करवीर पीठाच्या स्थापनेची माहिती असणारे जगद्गुरूंच्या आज्ञापत्रासारखे एक पत्र छापले आहे. त्या पत्रातही कोल्हापूरला 'दक्षिण काशी' असेच संबोधले आहे (मइसा ६, पत्र ४४७, पृ.५२६).

शिलाहारांच्या अनेक शिलालेखातून त्यांनी ब्राह्मणांच्या योगक्षेमासाठी अग्रहारांचे दान दिल्याचे संदर्भ मिळतात. अग्रहार आणि ब्रह्मपूरी ही शिक्षणाची केंद्रे होत.कोल्हापूर येथेही अशाप्रकारचे केंद्र होते. अग्रहाराचे प्रमुख आचार्य असतात. सर्वसाधारणपणे एखादे संपूर्ण गावच अग्रहार म्हणून राजा देई असे शिलालेखाद्वारे दिसून येते. या गावाचे उत्पन्नातून विद्यार्थ्यांचा योगक्षेम व आचार्याचा तनखा दिला जात असे. या पाठशाळेतून मुख्यत्वेकरून धार्मिक शिक्षणच दिले जात असे. शिलाहारांच्या दानपत्रात अनेक ब्राह्मणांचा महाब्राह्मण किंबहुना परमब्रह्मन असा उल्लेख आढळतो. त्यातील काहींचे क्रमविद, द्विवेदी आणि चतुर्वेदी असे वर्णन आले आहे. त्यायोगे त्यांचे वेदांचे अध्ययन सूचित होत असे. हे सर्व ब्राह्मण दूरदूरच्या प्रदेशातून येत असत. रूद्रभट्टोपाध्याय नावाचा एक ब्राह्मण तर चक्क वाराणसीहून आला होता (मांडके

२०१०: ७७). कोल्हापूरातील वेदविद्यांच्या अध्ययन आणि अध्यापनाची ही परंपरा मराठा कालखंडातही सुरू असलेली दिसते. मराठा कालखंडात वेदशास्त्रांच्या अध्यापनासाठी कोल्हापूरात सात पाठशाला असल्याचा संदर्भ मिळतो (जयतीर्थ २०१०: २५८). कोल्हापूरला असणाऱ्या करवीर पीठामार्फतही हिंदू धर्मातील धार्मिक तंट्याबाबतीतील न्यायनिवाडे दिल्याची उदाहरणे आहेत.

कोल्हापूरास दक्षिण काशीची उपमा देण्यामागे धार्मिक कारणांबरोबर भौगोलिक साधर्म्यसुद्धा महत्वपूर्ण कारण आहे. भोगावतीचा उत्तरवाहिनी प्रवाह याचीच साक्ष देतो. पुराणातून गंगेचे वर्णन करताना हा पवित्र जलप्रवाह स्वर्गात मंदाकिनी, पृथ्वीवर भागीरथी तर पाताळात भोगावती या नावाने प्रसिद्ध असल्याचे करवीर महात्म्यात म्हटले आहे. काशीच्या स्मृती जागृत करण्यासाठी कोल्हापूरला प्रयाग, दशाश्वमेध, मणिकर्णिका, काशिविश्वेश्वर मंदिर अशी नावे दिलेली अनेक स्थाने निर्माण केली गेली. भोगावती आणि कासारी नदीचा जिथे संगम होतो त्या भागाला 'प्रयाग चिखली' असे संबोधले जाऊ लागले. तिथून पुढे हा प्रवाह पंचगंगा नावाने कोल्हापूरात प्रवेश करतो त्याठिकाणी काशीची स्मृती जागविणाऱ्या अनेक तीर्थांची म्हणजेच प्रयाग(चिखली) पासून कपिलतीर्थ, शुक्लतीर्थ, विशाळतीर्थ, व्यास, कश्यप, गालव, गर्ग, वसिष्ठ, विश्वामित्र, अगस्ती, मयूर, तारक, दशाश्वमेध, सर्वतीर्थ इत्यादींची निर्मिती पंचगंगेत एकापुढे एक केली गेली आहे. पंचगंगेवर बांधण्यात आलेल्या अनेक घाटांच्या मुळेही काशीतील गंगातीरावरील घाट आणि त्याला लागून असलेल्या मंदिरांच्या स्मृती जागृत करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. काशीविश्वेश्वर मंदिर आणि मणिकर्णिका तीर्थाची निर्मिती महालक्ष्मी मंदिर प्रांगणातच करून कोल्हापूरला 'दक्षिण काशी' बनविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला गेल्याचे दिसून येते (राणिंगा २०१०: ४०; दामले आणि हर्डीकर २०१०: १०६).

दक्षिण काशी पंढरपूर

महाराष्ट्रीय समाजात त्रिस्थळी यात्रेची संकल्पना पक्की बसलेली दिसते. पंढरपूर या महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्राला 'दक्षिण काशी' असे समजले जाते. काशी, प्रयाग व गया या त्रिस्थळी यात्रेच्या ठिकाणांप्रमाणेच पंढरपूर, नीरा नरसिंहपूर आणि गोपाळपूर यांना अनुक्रमे काशी, प्रयाग आणि गया असे संत तुकारामांनी आपल्या अभंगात संबोधले आहे (दंडवते १९७२: २१).

उमाराणा एकसरी । वाराणसी ते पंढरी
दोघे सारिखे सारिखे । विश्वनाथ विठ्ठल सखे
तेथे असे भागीरथी । येथे जाणा भीमरथी
वाराणसी त्रिशूळावरी । सुदर्शनावरी पंढरी

मनकर्णिका मनोहर । चंद्रभागा सरोवर
वाराणसी भैरवकाळ । पुंडलिक क्षेत्रपाळ
धुंडीराज दंडपाणि । उभा गरूड कर जोडुनि
गया तेचि गोपाळपूर । प्रयाग नीरा नरसिंहपूर
तेथे असती गयावळ । येथे गायी आणि गोपाळ
शमीपत्र पिंड देती । येथे काळा निजसुखप्रति
संतसज्जनी केला काला । तुका प्रसाद लांधला

दक्षिण प्रयाग नीरा-नरसिंहपूर

ज्याप्रमाणे दक्षिण काशी म्हणून महाराष्ट्रातील अनेक तीर्थक्षेत्रे ओळखली जातात, त्याचप्रमाणे दक्षिण प्रयाग, दक्षिण गया या नावानेही अनेक तीर्थक्षेत्रे ओळखली जातात. वर उध्रुत केल्याप्रमाणे संत तुकारामांनी आपल्या अभंगातून नीरा-नरसिंहपूरला (दक्षिण)'प्रयाग' असे संबोधले आहे. प्रयाग म्हटले तर त्रिवेणी संगम आवश्यक ठरतो. याकरीता नीरा आणि भिमा नदीच्या संगमाच्या ठिकाणी गुप्त सरस्वतीचे अस्तित्व दर्शवून त्रिवेणी संगमाच्या संकल्पनेला परिपूर्णता आणली गेली आहे. नृसिंह मंदिराच्या आवारातच रामेश्वर, भीमाशंकर व काशीविश्वेश्वरांची मंदिरे आहेत. या तीनही शिवस्थानाच्या स्थानी स्वत: श्रीशंकर वास करतात अशी लोकांची श्रद्धा आहे. यामुळेच की काय नरसिंहपूर येथील लोकांनी काशी-रामेश्वर यात्रा करावयाची नाही असा संकेत आहे (दंडवते १९७२: ५३).

दक्षिण गया रामटेक

रामटेक हे विदर्भातील प्राचीन तीर्थक्षेत्र आहे. कालीदासाच्या मेघदूत काव्यातील रामगिरी पर्वत म्हणजेच विदर्भातील रामटेक होय असे म.म.वा.वि.मिराशी यांचे मत आहे. याच रामटेक पर्वतावर रामाचे व लक्ष्मणाचे मंदिर आहे. विदर्भातील वाकाटक साम्राज्याची राजधानी 'नंदीवर्धन' या रामटेक पासून जवळच आहे. वाकाटकराणी प्रभावतीगुप्ता हिच्या ऋद्धपूर येथे सापडलेल्या ताम्रपटात तो रामगिरिस्वामीच्याजवळ दिला होता (रामगिरिस्वामिन: पादमूलात) असा निर्देश आहे. हा रामगिरिस्वामी म्हणजेच रामगिरीवरील (रामटेकवरील) देवळांतील भगवान रामचंद्र होय असे वा.वि.मिराशी यांचे मत आहे. प्रभावतीगुप्ताच्या दुसऱ्या ताम्रपटातील दान 'भगवत्पादमूले निवेद्य' (भगवंताच्या पादुकांना अर्पण करून) दिले होते. याचाच अर्थ वाकाटकांच्या काळी रामटेकवरील देवालयात रामचंद्राची पादुकारूपाने पूजा होत होती. यादव काळात त्या मंदिरात लक्ष्मण, राम व सीता यांच्या मूर्ती देवालयात होत्या असा लक्ष्मणांच्या मंदिरातील यादवांच्या शिलालेखावरून कळून येते. मोगली आक्रमणात त्या तेथून काढून लपविल्या गेल्या. सध्याच्या काळात

मंदिरात दिसत असलेल्या राम व सीता यांच्या मूर्ती नागपूरच्या रघूजी भोसल्यांनी बसविल्याची नोंद बखरीत आहे. वरील सर्व प्रकार सविस्तरपणे सांगण्याचे कारण म्हणजे बिहारमधील गया येथे ज्याप्रमाणे विष्णूपादांची पूजा करण्यात येते, त्याप्रमाणे रामटेकवरही प्रारंभीच्या काळात भगवान रामाच्या पादुकांचीच पूजा होत होती (मिराशी(ब) १९६१: ७-१७).

वाराणसीतील मंदिर स्थापत्याचा महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्यावर पडलेला प्रभाव

सतराव्या शतकात शिवछत्रपतींनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे रूपांतर अठराव्या शतकात मराठा साम्राज्यात झाले. पेशवे, शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, नागपूरकर भोसले, विंचूरकर, माणकेश्वर, बुंदेले, कानडे, बिनीवाले वगैरे सरदारांनी उत्तरेत अटकेपर्यंत, पूर्वेस बंगाल-बिहार, पश्चिमेस गुजरात तर दक्षिणेत तंजावरपर्यंत मराठी साम्राज्याचा विस्तार केला. या विस्ताराच्या अनुषंगाने झालेल्या संचारामुळे मराठी मन, मराठी विचार, मराठी आकांक्षा यांना नवीन क्षीतीज प्राप्त झाले. आजूबाजूला दिसणारा नवा प्रदेश, नवीन भाषा, नवीन रीतीरिवाज, नवा समाज यांच्याशी मराठ्यांचा नव्याने परिचय झाला. दोन समाजांमध्ये आदान-प्रदान घडून आले. त्यातूनच उत्तर भागातील कितीतरी गोष्टींचे अनुकरण मराठी समाजाद्वारे केले गेले. त्यातीलच एक गोष्ट म्हणजे मंदिर स्थापत्य शैली होय.

मराठा कालखंडातील मंदिर स्थापत्याचे अभ्यासक डॉ. म.श्री.माटे यांनी महाराष्ट्रातील मंदिरांचे तीन प्रकारच्या स्थापत्य शैलीत विभागणी केली आहे. एक, नव यादव किंवा भूमिज शैली; दोन, नागर शैली आणि तीन, (पारंपारिक) मराठी शैली. यापैकी नागर शैलीतील मंदिरे ही काशीतील मंदिर स्थापत्याशी साधर्म्य साधतात.

उत्तर भारतात विशेषत: वाराणसीमध्ये मराठी समाजाने धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. वाराणसीतील मंदिर स्थापत्य आणि घाट स्थापत्य निर्मितीमधील मराठ्यांच्या सहभागामुळे त्यांचा उत्तरेतील धार्मिक स्थापत्याचा परिचय झाला. परिणामत: त्यांनी त्या गोष्टींचे अनुकरण महाराष्ट्रात केलेले दिसून येते. महाराष्ट्रात परंपरेने चाललेल्या हेमाडपंती म्हणजेच भूमिज शैलीतील मंदिर स्थापत्य आणि उत्तर कालखंडातील मराठा शैलीचे मंदिर स्थापत्य या दोन स्थापत्य शैलीच्या व्यतिरिक्त आणखी एका मंदिर शैलीचा प्रभाव महाराष्ट्रातील मंदिरांवर दिसून येतो, तो म्हणजे उत्तर भारतीय पद्धतीच्या 'नागर' मंदिराचा. नाशिकला ओढेकर, नारोशंकर, पेठे, नेवाशाला चंद्रचूड, कायगांव टोक्याला गद्रे, त्र्यंबकेश्वरला बाळाजी बाजीराव यांनी उत्तरेतील नागर स्थापत्य शैलीचे अनुकरण करून मंदिरे बांधलेली दिसतात. अशा घाटांची प्रमुख मंदिरे अशी -

त्र्यंबकेश्वर महादेव मंदिर (जि.नाशिक), सुंदरनारायण मंदिर, नाशिक, गोरा राम मंदिर, नाशिक काळाराम मंदिर, नाशिक, मोहिनीराज मंदिर, नेवासे (जि.अहमदनगर), सिद्धेश्वर मंदिर, टोके (जि.अहमदनगर), महादेव मंदिर, प्रवरासंगम (जि.अहमदनगर), महादेव, कायगांव (जि.अहमदनगर)

वरील सर्व मंदिरस्थापत्यात काशीतील मंदिरांच्या स्थापत्याचा प्रभाव दिसतो. गाभारा, अंतराळ, मंडप, मंदिरातील स्तंभ, त्यांची रचना, मंदिराच्या बाह्य भिंतीवरील रथांची रचना, तसेच गाभाऱ्यावरील शिखर आणि मंडपावरील घुमट यांचे अनुकरण वरील मंदिरात झालेले दिसते. फर्ग्युसनने काशीतील मंदिर शैलीला 'शेखरी' शैलीतील मंदिरे असे म्हटले आहे. महाराष्ट्रातील वरील मंदिरे ही याच शेखरी शैलीतील आहेत.

महाराष्ट्रातील नागर शैलीतील मंदिर स्थापत्याचे वर्णन डॉ.माटे यांनी पुढील प्रमाणे केलेले आहे. ''महाराष्ट्रातील मंदिरांमध्ये गाभारा, अंतराळ आणि मंडप पैकी गाभारा आणि मंडप चौरस असून अंतराळ आयताकार असते. रचनेसाठी सर्वत्र दगडी स्तंभ आणि तुला यांचा वापर केलेला दिसतो. गाभाऱ्याचे छत हे घुमटाकार तर अंतराळाचे छत सपाट असते. मंडपामध्ये बारा स्तंभ/अर्धस्तंभ असून त्यांचा एक अष्टकोन तयार होतो. या अष्टकोनावर तुळ्या बसवून त्यावर घुमटाकार छत बांधण्यात येई. मंडपाचा आकार बराच मोठा असेल तर मध्यभागी चार स्तंभ उभे करीत. त्यामुळे छताचे नऊ भाग पडत. मधल्या गाळ्यावर घुमटाकार छत असे तर इतर आठ गाळ्यांवर सपाट छत असते. छतांचे स्वरूप घुमटासारखे दिसले तरी हे छत बहुतेक ठिकाकणी झुकावाच्या पद्धतीने बांधलेले असे. खालून पाहिले म्हणजे एकावर एक अशी अनेक कडी ठेवलेली आहेत असे दिसते. या कड्यांवर 'गजतालू' हे प्रतीक कोरलेले असते. सर्वात वरच्या बिंदूपासून कमळाच्या कळीच्या आकाराचे झुंबर लोंबत असे. काही ठिकाणी तुळईपासून वरपर्यंत दगडी तीर बसविलेले दिसतात व त्यावर यक्ष-यक्षी, अप्सरा यांच्या मूर्ती घडविलेल्या असत. स्तंभ बहुकोनी असत व त्यावर हरप्रकारचे कोरीवकाम असते. माथ्यावर असणाऱ्या हस्तांवर कीचक-ठेंगणे यक्ष- कोरण्यात येत '' (माटे २००८: ८५-८८).

स्तंभ, हस्त यापेक्षाही गाभाऱ्याचे द्वारशाखेवर बारीक कोरीवकाम असते. एकात एक अशा तीन, पाच किंवा सात चौकटी असतात आणि प्रत्येकीच्या पायाशी द्वारपाल/द्वारपालिका घडविलेल्या असतात. मधल्या चौकटीवर अर्धस्तंभ व बाकीच्या चौकटींवर वेलपत्त्या, रत्नहार, यक्षयक्षी, व्याल अशा मूर्ती असतात. गणेशपट्टीवर मध्यभागी गणेशाची किंवा गाभाऱ्यातील देवतेचीच पण लहान आकाराची मूर्ती असते आणि उंबरठ्यावर पूर्णकुंभ, चंद्रशीला आणि कीर्तीमुख असते. भिंतीवर अर्थातच रथ आणि थर असतात. अठराव्या शतकातील मंदिरांच्या भिंतीवर मूर्तीकाम जवळपास कोठेच दिसत नाही.

मंदिरांच्या भिंतीवरील रथ व त्यावरील शिखर यासंबंधी डॉ. माटे लिहितात की, ''मंदिराच्या भिंतीवरील रथ सहसा भिंतीशी काटकोनातच असतात. त्यामुळे भिंर्तीवर हे रथ एकावर एक ठेवल्यासारखे दिसतात. प्रत्येक रथाच्या टोकावर अर्धशिखर किंवा शिखराच्या छोट्या प्रतिकृती बसविलेल्या असतात. यामुळे मुख्य शिखराच्या बाह्य रेषेला अधिकच उठाव येतो; ते चारही बाजूंनी निमुळते होत जाऊन आमलकापाशी थांबते. अर्धशिखरे व छोटी शिखरे यामुळे पाहणाराची दृष्टी क्रमाक्रमाने वर वर जात आमलकापर्यंत सहज पोचते. शिखराच्या किंचित फुगीर पण डौलदार बाह्यरेषा हे या नागर मंदिराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे '' (माटे २००८: ८५-८८).

प्रकरण सहावे

उपसंहार

प्रास्ताविक

सतराव्या-अठराव्या शतकात निर्माण झालेल्या आणि विकसित पावलेल्या मराठी सत्तेच्या प्रभावाने भारतीय उपखंडातील राजकारणाची दिशाच बदलून गेलेली दिसते. सतत सहाशे वर्षे यावनी सत्तेच्या अधिपत्याखाली तसेच दडपणाखाली वावरणाऱ्या मराठी समाजाला, पर्यायाने भारतीय समाजाला नवसंजीवनी देण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने आणि कार्याने घडून आलेले दिसते. शिवछत्रपतींच्या काळातील छोट्याशा राज्याचे रूपांतर नंतरच्या पावणे दोनशे वर्षाच्या काळात मोठ्या साम्राज्यात झाले. सहाजिकच यावनी सत्तेच्या सहाशे वर्षाच्या कालखंडात येथील समाजाच्या धार्मिक, सामाजिक आणि इतर व्यावहारिक गोष्टींवर जे हानीकारण परिणाम झाले त्यांची भरपाई करण्याचे काम मराठी सत्तेने केलेले दिसते. सतराव्या-अठराव्या शतकातील समाजाने नेतृत्व करणाऱ्या या मराठी सत्ताधिकाऱ्यांकेडून त्यावेळच्या धार्मिक, सामाजिक आणि इतर प्रश्न सोडविण्यावर भर दिलेला दिसतो. मराठ्यांच्या साम्राज्यनिर्मितीच्या पाठीमागे काही सूत्रे, काही ध्येय असल्याचे दिसून येते. भारतातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र काशी हे यावनी सत्तेच्या जोखडातून मुक्त करण्याचे ध्येय त्यांनी बाळगलेले दिसते. मराठ्यांचा पहिले राज्यकर्ते शिवाजी महाराज यांच्या काही कृतीतून हे ध्येय दिसून येते. सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी आपला अखेरचा श्वास याच काशीत घेतला. म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते छत्रपती प्रतापसिंह महाराजांपर्यत काशीशी संबंध आलेले दिसतात.

पंधराव्या-सोळाव्या शतकापासूनच महाराष्ट्रातील विद्वान घराणी काशीत स्थलांतरीत होत असल्याचे संदर्भ मोठ्या प्रमाणावर मिळू लागतात. ही घराणी काशीला नुसती स्थलांतरीत झाली नाहीत, तर आपल्या विद्वत्तेने काशीतील सामाजिक आणि धार्मिक जीवनाचे नेतृत्वही करीत होती. हिंदुधर्म विषयक अनेक ग्रंथाची त्यांनी निर्मिती केली. हिंदुधर्म विषयक सामाजिक आणि धार्मिक सुधारणा करणारे आणि न्यायव्यवस्थेवर परिणाम करणारे हे साहित्य असल्याने त्याचे महत्व मोठे होते. महाराष्ट्रातील सामाजिक आणि धार्मिक जीवनात घडणाऱ्या ग्रामण्यामध्ये न्याय मिळविण्यासाठी येथील समाज काशीतील विद्वान लोकांची व धर्मसभेची मदत घेत होता.

महाराष्ट्रातील राज्यकर्ता, अभिजन वर्गाबरोबरच सामान्य जनतेत "काशीयात्रा" लोकप्रिय असलेली दिसते. अनेक मराठी लोकांनी तर काशीलाच आपले निवासस्थान केले. मराठी लोकांमध्ये काशीची लोकप्रियता इतकी वाढली की मराठी राज्यकर्ते आणि अभिजन वर्गाने व्यापाराबरोबरच सामाजिक आणि धार्मिक गोष्टी, दानधर्म, वर्षासने यासाठी भरपूर खर्च केला. वाराणसीमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक केली. गंगातीरावरी घाट, मंदिरे, अन्नछत्रे आणि वाडे यांच्या निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च केला. यामुळेच अठराव्या शतकातील काशी ही "मराठी काशी" म्हणून ओळखली जाऊ लागली. महाराष्ट्रातील एकाही गावात, शहरात तसेच तीर्थक्षेत्री मराठी लोकांनी काशीसारखी आर्थिक गुंतवणूक केल्याचे दिसून येत नाही. हीच गुंतवणूक जर त्यांनी आपला राज्यकाभार आणि लष्करी सेवा सुधारण्यासाठी केली असती तर मराठेशाहीचा अंत कदाचित लांबला गेला असता. पावणे दोनशे वर्षाच्या कालखंडातील मराठी राज्य, संस्कृती, धर्म यावरील अभ्यासाने "महाराष्ट्र-वाराणसी परस्पर संबंध" या बाबतच्या काही निष्कर्षांची चर्चा पुढे केली आहे.

१. मराठी राज्याच्या पावणे दोनशे वर्षाच्या कालखंडात मराठ्यांचे राजकारण हे श्रीक्षेत्र वाराणसीलाच केंद्रस्थानी ठेवून आखले गेले. मुस्लिमांच्या ताब्यातून काशीविश्वनाथाची सुटका करणे हेच अंतिम ध्येय मराठ्यांनी बाळगलेले दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते छत्रपती राजाराम महाराजापर्यंत, बाळाजी विश्वनाथ पेशव्यांपासून दुसऱ्या बाजीरावांपर्यंत, नागपूरकर भोसले, शिंदे व होळकरांपर्यंत मराठ्यांच्या राज्यविस्तारात अनेक गोष्टींचा उहापोह झालेला दिसतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या छोट्याशा स्वराज्याचे रूपांतर पेशवे काळात मराठा साम्राज्यात झाले. सतराव्या ते एकोणीसाव्या शतकापर्यंत उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या मराठा साम्राज्यासाठी प्रयत्न करणाऱ्या मराठा राज्यकर्त्यांनी राजकीय, धार्मिक व सामाजिक परिस्थितीनुरूप आपापले धोरण आखले, प्रसंगी ते बदललेही. मराठा साम्राज्याच्या या दोनशे वर्षांच्या कालखंडात मराठ्यांनी एकाच गोष्टींचा ध्यास घेतलेला दिसतो. तो म्हणजे काशीतील विश्वनाथ मंदिराच्या पुन:स्थापनेचा. प्रत्येक मराठा राज्यकर्त्याच्या राजकीय धोरणात म्लेच्छांच्या ताब्यातून वाराणसी सोडवून तिथे विश्वनाथाची प्रतिष्ठापना करण्याची इच्छा व्यक्त करण्यात आली आहे. मराठ्यांनी हिंदुस्थानात अनेक लष्करी मोहिमा केल्या. राजपुतन्यातील राजपूत, दिल्लीतील मोगल बादशहा, अफगाणिस्तानातील अब्दाली आदि लोकांशी दोन हात करून आपल्या साम्राज्याची सीमा वाढविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. केलेल्या प्रयत्नात काही वेळा यश आले, तर काही वेळा अपयशही आले. पण प्रत्येक मोहिमेत पेशव्यांच्या आपले सरदार शिंदे-होळकर, विंचूरकर, कानडे आदि सरदारांना काशी ताब्या घेण्याच्या सूचना त्यांनी केलेल्या आहेत.

दिल्लीच्या बादशहांकडून जरी काशी, प्रयाग आणि गया या तीर्थक्षेत्रांच्या सनदा मराठ्यांना मिळाल्या असल्या तरी प्रत्यक्षात तो प्रदेश दिल्लीच्या बादशहाचा वजीर आणि आयोध्येच्या नबाब सफदरजंगाच्या ताब्यात होत्या. नबाबाने त्या प्रदेशावरचा स्वत:चा हक्क सोडला तरच काशी, प्रयाग व गया हे प्रांत मराठ्यांच्या ताब्यात येणार होते. त्यामुळेच नानासाहेब पेशवे यांनी आपल्या सरदारांना सफदरजंगाशी मिळते जुळते घेण्याचा सल्ला दिला होता. इ.स. १७५८ मध्ये मराठ्यांनी संपूर्ण पंजाब प्रांत पादाक्रांत केला. यावेळी ते यशाच्या सर्वोच्च स्थानी होते. यावेळी त्यांनी परत एकदा त्याच्या मनातील उद्दिष्टांसाठी प्रयत्न केले. शुजाउद्दौलाच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या वाराणसी, अयोध्या व अलाहाबाद यावर आपला ताबा असावा असा प्रयत्न केला. त्यांसाठी त्यांनी त्याला वजीर म्हणून नेमण्याचे तसेच अर्धा बंगाल देण्याचे आश्वासनही दिले. बळाचा वापर केल्याशिवाय हे शक्य नाही हे त्यांना इथेही दिसून आले. पानिपतच्या आघातानंतर जे परिणाम घडून आले त्यामुळे मराठ्यांना हेही शक्य झाले नाही.

पहिले बाजीराव पेशवे, नानासाहेब पेशवे आणि माधवराव पेशवे यांच्या उत्तर हिंदुस्थानच्या राजकारणाचे मुख्य ध्येय हे काशी, प्रयाग, गया आणि मथुरा ही हिंदूची पवित्र धर्मक्षेत्रे मुस्लिम सत्ताधीशांकडून ताब्यातून सोडविण्याचे होते. इ.स. १७३६ च्या एका पत्रात पहिल्या बाजीरावांनी मुघल बादशाहा मुहमंदशाला मदत करताना एक करार केलेला होता. त्या करारातील एक कलम हे प्रयाग, काशी, गया व मथुरा ही गावे स्वत:च्या जाहागीरीसाठी मागितल्याचे आहे. बाळाजी बाजीराव पेशवे यांनी देखील काशी, प्रयाग व गयेच्या सनदा बादशहाकडून मिळविल्या होत्या. श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांचे मरणसमयी झालेली नऊ कलमांची यादी इतिहास संशोधक दत्तात्रय बळवंत पारसनीस यांनी प्रसिद्ध केलेली आहे. त्यातील एक कलम असे आहे की, 'श्रीकाशी, प्रयाग ही दोन्ही स्थळे सरकारांत यावी, असा तीर्थरूपांचा हेत होता. त्यास प्रस्तुत करावयाजोगे दिवस आहेत. दहावीस लक्षांची जहागीर मुबदला पडली तरी देऊन दोन्ही स्थळे हस्तगत करावी. प्रयत्न करावा.'

थोरल्या माधवरावांच्या अकाली मृत्यूनंतर मराठ्यांना या प्रकरणाकडे लक्ष देण्यास वेळच मिळाला नाही. मराठे स्वत:च गृहकलहात अडकले होते. परंतु १७८६ नंतर नाना फडणवीस व महादजी शिंदे हे पुणे दरबार व दिल्ली दरबारात बस्तान बसविण्यात यशस्वी ठरले. त्यानंतर नाना फडणवीसांनी महादजी शिंदेंवर वेगवेगळी तीर्थस्थाने मराठ्याच्या ताब्यात घेण्यासाठी प्रोत्साहन तसेच दबाव टाकला आणि अवघ्या चारच वर्षात मराठ्यांनी वृंदावन, नंदगाव, मथुरा, बरसाना ह्या ठिकाणांवर प्रत्यक्ष ताबा मिळविला. परंतु यावेळी प्रयाग, वाराणशी व गया यावर ब्रिटीयांनी आपला ताबा बसविला होता. तरीही नाना फडणवीसांनी आपले प्रयत्न सोडले नाहीत. आसपासच्या घरांना नुकसान भरपाई देऊन काशी विश्वनाथच्या मंदिराची मूळ

जागेवर पुन्हा उभारणी करण्यासाठी कंपनी सरकारकडेही मान्यता मिळविण्याचे प्रयत्न केले. मुघल बादशहाच्या अखत्यारीतील प्रदेशामध्ये गोहत्याबंदीचे फर्मानही महादजी शिंदे यांनी मिळविले होते. मराठा इतिहासातील वरील सर्व घटना पाहता असे म्हणता येईल की मुस्लिमांच्या ताब्यातून काशीविश्वनाथाची सुटका करणे हेच अंतिम ध्येय मराठ्यांनी बाळगलेले दिसते. साधारणपणे इ.स.१७७० मध्ये वाराणसीवर इंग्रजांची सत्ता स्थापन झाल्याने त्रिस्थळी ताब्यात घेण्याच्या मराठ्यांच्या प्रयत्नांना कायमचा खो बसला.

२. वाराणसीस्थित मराठी शास्त्री-पंडितांची संस्कृत विद्येच्या क्षेत्रातील लक्षणीय कामगिरी

पंधराव्या-सोळाव्या शतकापासून अनेक महाराष्ट्रीय पंडित घराणी संस्कृतविद्येच्या अभ्यासार्थ वाराणसीत स्थलांतरीत झाली. त्यातील बहुतेक लोक वाराणसीत कायमचे स्थायिक झाले आणि आपल्या विद्वत्तेने वाराणसीची किर्ती वाढविण्यास कारणीभूत झाले. शेष, भट्ट, धर्माधिकारी, भारद्वाज, चर्तुधर, पुणतांबेकर, पायगुंडे आदि घराण्यांतील विद्वानांनी साहित्य, ज्योतिष, धर्मशास्त्र, व्याकरण, तंत्र, मीमांसा, वेदान्त, न्याय-वैशेषिक आदि विषयात अनेक ग्रंथांची निर्मिती केली. भट्ट घराण्यातील नारायणभट्टांची विद्वत्ता व सदाचरण यामुळे त्यांना 'जगद्गुरु' अशी पदवी दिली गेली व मन्त्रजागरणाचे वेळी सर्व वैदिकांमध्ये त्यांचे घराण्याला अग्रपूजेचा मान मिळू लागला. हा मान अजूनही त्या घराण्याकडे चालू आहे. धर्मसभा भरतात त्या वेळी गंधाचा पहिला मान भट्टांचा आहे.

भट्ट घराण्याप्रमाणे शेष घराणेही विद्वत्तेच्या क्षेत्रात अग्रेसर होते. या घराण्यात अव्याहत पंडित परंपरा आढळते. वेद व शास्त्र या विषयावरचा असा कोणताही भाग आढळणार नाही की ज्यात शेष पंडितांनी ग्रंथरचना केली नसेल. व्याकरण शास्त्रावर महत्त्वाची ग्रंथरचना करून काशीस व्याकरणपीठाचा मान मिळवून देणारे शेष पंडितच होते. भट्ट घराण्यातील नारायणभट्टांप्रमाणेच कमलाकरभट्टांचे निर्णयसिंधू आणि शूद्रकमलाकर हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. हिंदु कायद्यांच्या संबंधाने नीलकंठभट्टांचे ग्रंथ महत्त्वाचे आहेत, तर कायस्थधर्मप्रदीप लिहिणाऱ्या गागाभट्टांची विद्वत्ता, लौकिक व धर्मशास्त्रसंबंधी अधिकार ओळखूनच शिवाजी महाराजांनी स्वत:च्या राज्याभिषेकासाठी मुद्दाम त्यांना आमंत्रित केले होते.

उत्तर पेशवाईतील दोन प्रसिद्ध विद्वान न्यायमूर्ती रामशास्त्री आणि निलकंठशास्त्री थत्ते यांचे संस्कृत तसेच धर्मशास्त्रावरील शिक्षण हे वाराणसीस्थित पायगुंडे घराण्यातच झालेले होते. आधुनिक काळात म्हणजेच आंग्लकालीन संस्कृत विद्येतही मराठी पंडित काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे, राजारामशास्त्री कार्लेकर, बापूदेवशास्त्री यांचे योगदान न विसरता येण्याजोगे आहे.

३. महाराष्ट्रातील ग्रामण्यातील वाराणसीतील धर्मसभेचा सहभाग आणि त्यांच्या निर्णयपत्रांचा महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेवर झालेला महत्त्वपूर्ण परिणाम

सतराव्या-अठराव्या शतकात समाजातील सर्व स्तरातील जातींमध्ये ग्रामण्ये होत होती. बहुतेक वेळा हे तंटे स्थानिक पातळीवर सोडविले जात असत. पण जर ते स्थानिक पातळीवर सोडविले गेले नाहीत तर ते समाजाच्या वरच्या स्तरात मोडणाऱ्या धर्मसभा अथवा शंकराचार्यांच्या पीठाकडे अंतिम निर्णयासाठी जात असत. मध्ययुगात ब्राह्मणवर्ग हा 'ब्राह्मण्यांच्या श्रेष्ठ-कनिष्ठ या द्वंद्वात अडकला होता. महाराष्ट्रातील ब्राह्मण उपजातीतील अनेक ग्रामण्ये ही अंतिम निर्णयासाठी वाराणसीतील धर्मसभेकडे गेली. हे न्यायनिर्णय फारच गुंतागुंतीचे असत. सर्व ब्राह्मण जातीतील प्रतिनिधित्व असणाऱ्या या धर्मसभेकडून घेतलेल्या निर्णय हे नेहमी प्रागतिक विचारसरणीचेच ठरले. हे निर्णय अंतिम मात्र ठरले नाहीत. या निर्णयांनाही दर पन्नास पंच्याहत्तर वर्षांनी आव्हाने दिली गेली. परंतु दर वेळी महाराष्ट्रात ज्या उपजातींना ब्राह्मणत्व नाकारले गेले त्याच्याच बाजूंनी निर्णय दिला गेल्याचे दिसते. हिंदू धर्माच्या पुन:रूस्थानासाठी ब्राह्मण उपजातींनी एक झाले पाहिजे अशी आशा धर्मसभेने व्यक्त केलेली दिसते. ब्राह्मण जातीव्यतिरिक्त मराठा, कायस्थ, लिंगायत, जैन आदी जाती-पंथांबाबतही वाराणसीतील धर्मसभेने निर्णय दिलेले दिसतात. महाराष्ट्रातील मध्ययुगीन समाजव्यवस्थेतील धर्मनिर्णयाची पद्धत पुढील काळात बदलत गेली. तेरावे शतक ते सतराव्या शतकातील मध्ययुगीन काळातील राजकीय सत्ताकेंद्रे हे परधर्मीय अशा मुस्लिम सत्ताधाऱ्याकडे असल्यामुळे त्यावेळी अस्तित्वात असलेल्या धार्मिकसत्तेकडे हे निवाडे सोपविले असण्याची शक्यता आहे. शिवाजी महाराजांच्या उदयाच्या पार्श्वभूमीवर जर ग्रामण्य प्रकरणांकडे पाहिले तर असे दिसून येते की शिवाजी महाराजांनी सुद्धा ही ग्रामण्ये काशीतील तसेच स्थानिक महाराष्ट्रातील विद्वान मंडळींना आमंत्रित करून आपल्या राजकीय सत्तेच्या नियत्रंणाद्वारे सोडविण्याचा प्रयत्न केला. पण यावेळीही काशीतील धर्मसभेचा थोडाफार सहभाग दिसून येत होता. सन १६८० मध्ये छ.शिवाजी महाराजांचे निधन झाले. पुढील दशकात मोगल आक्रमण आणि घरातील दुहींमुळे मराठा राजकारण दुभंगले गेले. सन १७२४ मध्ये देवरूखे ब्राह्मणांनी परत आपली तक्रार काशीमध्ये न नेता प्रथम जंजिराच्या सिद्दीकडे आणि नंतर साताराच्या छत्रपती शाहू महाराजांच्या दरबारातील राजपुरोहितांकडे केली. काळाच्या ओघात सन १७२० पर्यंत राजकीय परिस्थिती स्थिरस्थावर झाली आणि सातारा, कोल्हापूर आणि पुणे या प्रशासकीय व आर्थिक केंद्रांच्या आश्रयाने चित्तपावन ब्राह्मणांचे नवे नेतृत्व पेशव्यांच्या रूपाने पुढे आले. न्यायिक अधिसत्ता असलेला एक नवीनच गट तयार झाला. रामशास्त्री प्रभुणेंच्या नेतृत्वाखाली त्यांची स्वतंत्र न्यायिक व्यवस्था विकसित झाली.

४. महाराष्ट्रीय समाजातील काशीयात्रेचे महत्त्व आणि काशीयात्रेतील मराठी समाजाचा असलेला लक्षणीय सहभाग

नारायणभट्टकृत 'त्रिस्थळीसेतू' या ग्रंथाने प्रयाग, काशी आणि गया या हिंदूच्या तीन तीर्थक्षेत्रांना एका माळेत गुंफले गेले. या ग्रंथाने काशीयात्रा महाराष्ट्रात लोकप्रिय झाली. महाराष्ट्रातील सत्ताधीशांच्या संरक्षणाखाली अनेक ऐतिहासिक व्यक्तिंनी काशीयात्रा केलेली दिसते. यामध्ये शिवाजी महाराजांपासून पेशवे घराण्यातील राधाबाई, काशीबाई, सगुणाबाई यांनी काशीयात्रा केलेली दिसते. त्रिस्थळी यात्रेचा मार्ग हा मराठी संघराज्यातील वेगवेगळ्या सरदारांच्या प्रदेशातून जात असल्यामुळे त्या सरदारांकडून संरक्षण प्राप्त होत असे. हा रस्ता पुण्याहून उत्तरेला पवार, होळकर, शिंदे यांच्या प्रदेशातून म्हणजेच धार, देवार, महेश्वर, सागर, झाशी, ग्वाल्हेर, काल्पी, दिल्ली येथून जात असे. दक्षिणेकडे प्रतिनिधी, पटवर्धन, तंजावरकर भोसले यांच्या प्रदेशातून, पश्चिमेला बडोद्याच्या गायकवाडांच्या प्रदेशातून तर पूर्वेला नागपूरकर भोसल्यांच्या प्रदेशातून यात्रा जात असे. अठराव्या शतकात आपल्या स्वत:च्या जातीय, भाषिक लोकसमूहाच्या तसेच राजेरजवाड्यांच्या ताब्यातील प्रदेशातून सलगपणे जात असलेला हा यात्रेचा रस्ता दुसऱ्या कुठल्याही वांशिक लोकगटांच्या बाबतीत अस्तित्वात नव्हता. या सर्व गोष्टींचा फायदा मराठी लोकांना मिळत असल्याने काशीयात्रेतील मराठी लोकांचा सहभाग हा इतरांपेक्षा जास्त दिसून येतो.

५. मराठा स्थापत्याचा परमोच्च बिंदू म्हणजे वाराणसीतील मराठा निर्मित स्थापत्य होय

वाराणसीतील मराठा निर्मित स्थापत्य हा मराठ्यांच्या स्थापत्याचा परमोच्च बिंदू समजला पाहिजे. वाराणसीतील गंगा किनाऱ्यावरील घाट व मंदिर स्थापत्य, अन्नछत्रे, वाराणसी शहरभर पसरलेली मराठा निर्मित मंदिरे आणि वाडे यातील विविधता दिसते. गंगा किनाऱ्यावरील भोसले घाट, अहिल्याघाट, गणेश घाट, बिंदूमाधव घाट, बालाजी घाट यातून दिसणारी स्थापत्याची भव्यता, घाटांवरील मंदिराची उंच उंच गेलेली शिखरे व त्यातून तयार झालेली गंगाकिनाऱ्यावरील स्थापत्यातील लयबद्धता यामुळे वाराणसीच्या गंगाकिनाऱ्याच्या मनोहारीते मध्ये भर पडलेली दिसते. वाराणसीच्या 'संकरी गल्ली'तून म्हणजेच अरूंद गल्लीतून जाणाऱ्या रस्त्यांच्या दोन्ही बाजूस उंचच उंच तीन-चार मजली वाड्याच्या भव्य भिंतींनी वाड्यांना भव्य हवेलीवजा स्वरूप प्राप्त झालेले दिसते. वाराणसी शहरातील आज दिसणाऱ्या स्थापत्यातून असे दिसून येते की अठराव्या शतकातील वाराणसी ही मराठा निर्मिती स्थापत्यातून उभी राहिलेली नगरी आहे. वाराणसीत मराठी लोकांनी बांधलेल्या मंदिर स्थापत्यावर नागर शैलीचा प्रभाव दिसतो. या नागर शैलीचे अनुकरण करून मराठ्यांनी महाराष्ट्रातसुद्धा या नागरशैलीत मंदिर उभारलेली दिसतात. वाराणसीतील या स्थापत्य निर्मितीत मराठा मंडळींनी आपला बराच खजिना रिता केलेला दिसतो. महाराष्ट्रातील कोणत्याही शहरात/गावात एवढ्या मोठ्या संख्येने घाट, मंदिरे व वाडे स्थापत्य वाराणसीतील स्थापत्याप्रमाणे आढळून

येत नाही. त्यामुळेच म्हणावे लागते की मराठा स्थापत्याचा परमोच्च बिंदू म्हणजे वाराणसीतील मराठा निर्मित स्थापत्य होय.

६. काशी-विश्वनाथ मंदिर उभारणीतील मराठी लोकांचे लक्षणीय योगदान

वाराणसी ही शिवाची नगरी समजली जाते. या शिवालाच वाराणसीच्या स्थानिक भाषेत 'विश्वनाथ' असे म्हणतात. याच विश्वनाथबाबाच्या दर्शनासाठी भारतभरातून असंख्य भाविक वाराणसीत येत असतात. वाराणसीतील धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक जीवनमान याच विश्वनाथबाबाला मध्यवर्ती ठेवून तयार झालेले दिसते. प्रत्यक्षात अकराव्या शतकापासून ऐतिहासिक पुराव्यातून दिसून येणाऱ्या विश्वनाथबाबाच्या मंदिराचे अस्तित्व हजार वर्षाच्या कालखंडात चार वेळा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे आढळते. परंतु प्रत्येक वेळी या मंदिराचे पुनरुत्थान झाल्याचे दिसून आले आहे. चार पैकी दोन वेळा हे पुनरुत्थान मराठी माणसांनी केलेले आहे. इ.स. १५८५ साली अकबराच्या बादशहाच्या कारकिर्दीत राजा तोडरमलच्या साह्याने नारायणभट्टांनी या मंदिराचे पुन:निर्माण केले. संस्कृत विद्येच्या अध्ययन आणि अध्यापनासाठी महाराष्ट्रातील पैठणहून गेलेले आणि वाराणसीत स्थायिक झालेल्या नारायणभट्टांनी आपल्या विद्वत्तेने वाराणसीतील विद्वत जगतात भट्ट घराण्याला प्रथम स्थान मिळवून दिले होते. नारायणभट्टांनी उभारलेल्या या विश्वनाथ मंदिराचा बरोबर चौऱ्याऐंशी वर्षांनी औरंगजेबाने इ.स. १६६९ साली विध्वंस करून त्या जागी मशीद उभारली. ती मशिद आज ज्ञानवापी मशीद म्हणून ओळखली जाते.

संपूर्ण मराठा कालखंडात मराठ्यांनी काशीविश्वनाथ मंदिराच्या मूळ जागी मंदिर बांधण्याचे अनेक प्रयत्न केले. नानासाहेब पेशवे, मल्हारराव होळकर, नाना फडणीस, महादजी शिंदे यांनी मूळ जागी मंदिर बांधण्याचे अनेक प्रयत्न केले. दिल्लीचा मोगल बादशहा, आयोध्येचा नबाब आणि शेवटच्या कालखंडात ईस्ट इंडिया कंपनीकडे त्यांनी मूळ जागी मंदिर बांधण्याची परवानगी वारंवार मागितली. परंतु त्यात या मराठी राज्यकर्त्यांना यश आले नाही. मंदिराची मूळ जागा सोडून जवळच्या-शेजारच्या जागेत मंदिर बांधण्याचा प्रस्ताव जेव्हा अहिल्याबाई होळकरांनी कंपनी सरकारच्या समोर ठेवला त्यावेळी अहिल्याबाईंना परवानगी मिळाली आणि त्यांनी इ.स. १७७७ साली शेजारच्या जागेत विश्वनाथ मंदिराची उभारणी केली. मराठ्यांना मूळ मंदिराच्या जागेतच मंदिर हवे होते. अहिल्याबाईंच्या विश्वनाथ मंदिराच्या प्रयत्नानंतरही मराठ्यांनी मूळ जागी मंदिर बांधण्याचे प्रयत्न सुरूच ठेवले होते. परंतु हिंदु-मुस्लिम दंग्याच्या संभावतेमुळे इंग्रजांनी त्या जागी मंदिर बांधण्यास परवानगी दिली नाही. परिणामी मूळ जागी मंदिर बांधण्यांत मराठ्यांना अपयश आले. कालांतराने अहिल्याबाईंनी बांधलेल्या विश्वनाथ मंदिरालाच मूळ विश्वनाथ मंदिर म्हणून जनमानसाकडून मान्यता मिळाली. अशा तऱ्हेने विश्वनाथ मंदिराच्या जडणघडणीत मराठ्यांच्या कर्तुत्वाचा मोठा सहभाग असलेला दिसून येतो.

७. वाराणसीच्या धार्मिक, सामाजिक, भाषिक संस्कृतीचा ठसा महाराष्ट्रीय संस्कृतीवर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसून येतो.

तीनशे-चारशे वर्ष मराठी लोकांनी वाराणसीत प्रतिमहाराष्ट्र उभा केला. परंतु त्यांनी आपल्या प्रांताची-देशांशी असलेली नाळ तोडली नाही. या लोकांनी भारतभर उभारलेल्या मानवी संपर्कजालाद्वारे वाराणसीतील संस्कृती, मग ती भाषिक असो, धार्मिक असो की सामाजिक असो, तिला त्या काळातील सर्वदूर पसरलेल्या मराठी समाजापर्यंत पोहचवली. काशी-विश्वेश्वराच्या धार्मिक महत्त्येचा आणि पवित्रतेचा फायदा घेत मराठी भाषेत अनेक वाक्प्रचार, म्हणी, शापवचने आली, स्थिरावली व लोकांच्या बोलीभाषेत चपखल बसली. मराठी लोकांना काशी-विश्वनाथांचे महत्त्व आणि पवित्रता इतकी भावली की त्यातील अनेक देवतांच्या नावांचा मराठी समाजाने आपल्या नामस्मरणात समावेश केला आणि हे कमी वाटून की काय त्यांनी नामस्मरणात खंड नको म्हणून ती नावे त्यांनी आपल्या अवती भोवती वावरणाऱ्या आप्तांना दिली की त्यामुळे त्यांचा नाम उच्चार केल्यामुळे आपोआपच भगवंताचे नामस्मरण करता यावे. काशीबाई, वाराणसीबाई, काशीनाथ, विश्वनाथ ही नावे मराठा काळात महाराष्ट्रात फारच लोकप्रिय असलेली दिसतात. वाराणसीला जाऊन काशीविश्वेश्वराचे दर्शन करता येत नसल्यामुळे या मराठी समाजाने आपल्या गावातच काशीविश्वेश्वर मंदिराची उभारणी केली. त्याहीपुढे जाऊन त्यांनी दक्षिण काशी, दक्षिण प्रयाग आणि दक्षिण गया या क्षेत्रांचीच उभारणी मराठी मुलखात केलेली दिसते. दक्षिण काशी म्हणून महाराष्ट्रातील कोल्हापूर, वाई, संगममाहुली, प्रकाशे अशी अनेक स्थळे उदयास आली. त्याठिकाणी काशीविश्वनाथाबरोबरच वाराणसीतील गंगाकिनाऱ्यावरील घाटांसारखे घाटही बांधले गेले. पंचगंगा, प्रयाग, ज्ञानवापी, मणिकर्णिका सारखी स्थळेही उभारली गेली.

इसवीसन सतराव्या ते एकोणिसाव्या शतक या दरम्यान महाराष्ट्र आणि वाराणसी यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास करताना समोर ठेवलेल्या उद्दिष्टांपर्यंत पोहचता आले आहे. सतराव्या शतकापासूनच मराठ्यांनी वाराणसीवर प्रभुत्व निर्माण करण्याचे ध्येय ठेवले होते. त्या काळातील राजकीय परिस्थितीच्या विश्लेषणातून हे ध्येय गाठताना मराठ्यांनी केलेले प्रयत्न ठळकपणे नजरेसमोर आले. त्यामुळेच अठराव्या शतकातील वाराणसी ही मराठी वाराणसी म्हणून ओळखली जाऊ लागली. तसेच महाराष्ट्रातील सामाजिक स्थित्यंतरात वाराणसीतील धर्मसभेने बजावलेल्या भूमिकेचा आढावा घेता आला. निरनिराळ्या वाक्प्रचार, म्हणी, शापवचने यातून मराठी लोकांच्या मनातील वाराणसीचे दिसणारे महत्त्व यांचा आढावा घेता आला. वाराणसी मधील मंदिरे, ब्रह्मपुरी, अन्नछत्रे आणि घाटांसारखे स्थापत्य यातून मराठी समाजाचा वाराणसीतील प्रभाव स्पष्ट झाला. ऐतिहासिक कागदपत्रे, बखरी, यात्रावर्णने व तत्सम दस्तावेज यांच्यातून संशोधनासाठी घेतलेल्या विषयाची नव्याने मांडणी करता आली.

संदर्भ

प्रकाशित मूळ साधने

मराठी साधने

(मइसा १) राजवाडे, वि.का. १८९८. *मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १*, वाई, मोदवृत्त छापखाना.

(मइसा २) राजवाडे, वि.का. १९००. *मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २,* कोल्हापूर, विष्णु गोविंद विजापूरकर.

(मइसा ३) राजवाडे, वि.का. १९०१. *मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ३*, कोल्हापूर, विष्णु गोविंद विजापूरकर.

(मइसा ६) राजवाडे, वि.का. १९०५. *मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ६,* कोल्हापूर, विष्णु गोविंद विजापूरकर.

(पेद) सरदेसाई, गो.स. *पेशवे दप्तरातून निवडलेली कागदपत्रे,* खंड १ ते ४५, गव्हर्नमेंट प्रिंटीग प्रेस (हे सर्व खंड १९३० ते १९३४ या कालावधीत प्रकाशित झालेले आहेत.

(मराठी रियासत) सरदेसाई, गो.स. २०१०. *मराठी रियासत,* खंड १ते ८, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन.

(कासंपया) सरदेसाई, गो.स. काळे या.मा. व वि.स.वाकस्कर (संपा.) १९३०. *काव्येतिहास संग्रहात प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक पत्रे यादी वगैरे लेख,* द्वितीय आवृत्ती, पुणे, चित्रशाळा प्रेस.

(वाड डायरी) वाड, ग.चि.*सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, खंड १ ते ९,* पुणे, डेक्कन व्हर्न्याक्यूलर सोसायटी (या मालेतील ग्रंथ १९०२ ते १९११ या कालावधीत प्रसिद्ध झाले).

(सिपेद १) Joshi, P.M. 1957. *Expansion of Maratha Power (1707-1761),* Selection from the Peshwa Daftar New Series, Vol.1, Bombay, Government Central Press.

(हिंगणे दप्तर १) खरे, ग.ह. १९४५. *हिंगणे दप्तर खंड १,* पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ.

(हिंगणे दप्तर २) खरे, ग.ह. १९४७. *हिंगणे दप्तर खंड २,* पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ.

(पुरंदरे दप्तर १) पुरंदरे, कृ.वा. १९२९. *पुरंदरे दप्तर भाग १*, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ.

(ऐलेसं ७) खरे, वा.वि. १९१२. *ऐतिहासिक लेख संग्रह भाग ७,* मिरज, वा.वि.खरे.

(ऐलेसं १५) खरे, वा.वि. १९४८. *ऐतिहासिक लेख संग्रह भाग १५,* मिरज, यशवंत वासुदेवशास्त्री खरे.

(साइसंमं १) सरदेसाई, गो.स. १९३४. *शिंदेशाहीची राजकारणे १७७४-१७९४,* भाग १, सातारा, सातारा इतिहास संशोधक मंडळाची ऐतिहासिक लेखमाला.

(साइसंमं २) सरदेसाई, गो.स. १९४०. *महादजी शिंदे आणि पेशव्यांचा कारभार १७७७-१७९३, भाग २,* सातारा, सातारा इतिहास संशोधक मंडळाची ऐतिहासिक लेखमाला.

पारसनीस, द.ब. १९११. *महेश्वरदरबाराची कागदपत्रे भाग २,* मुंबई, निर्णयसागर छापखाना.

ठाकूर, वा.वा. १९४४. *होळकरशाहीच्या इतिहासाची साधने- भाग१,* इंदूर, होळकर गव्हर्नमेंट प्रेस.

पारसनीस, द.ब. *इतिहाससंग्रह* (हे मासिक पुस्तक सन १९०८ ते १९१६ या कालावधीत प्रसिद्ध होत होते).

(पदमव) पारसनीस, द.ब.(काल अज्ञात). *परराष्ट्राच्या दरबारातील मराठी वकील,* मुंबई, निर्णयसागर प्रेस.

(दिमरा) पारसनीस, द.ब. (काल अज्ञात). *दिल्ली येथील मराठ्यांची राजकारणे,* मुंबई, निर्णयसागर प्रेस.

(शिचसा) मुजुमदार, गं.ना., चिं.ग. कर्वे आणि चि.ब. जोशी (संपा.). १९४२. *राजारामाची दिल्लींद्रपद प्राप्तीची इच्छा व योजना,* शिवचरित्र साहित्य खंड ५, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ.

English Sources

(CPC-VI) Ali, A.F.M.Abdul (ed.) 1938. *Calendar of Persian Correspondence,* Vol.VI, New Delhi, Imperial Record Department.

(CPC-VII) Sen, Surendranath (ed.) 1940. *Calendar of Persian Correspondence, Vo*l.VII, New Delhi, Imperial Record Department .

(CPC-IX) Sen, Surendranath (ed.) 1949. *Calendar of Persian Correspondence, Vol.IX,* New Delhi, National Archives of India.

Sinha, H.N. 1953. *Selections from the Nagpur Residency Records, Vol.III (1812-1817),* Nagpur, Government Printing, Madhya Pradesh.

Sinha, H.N. 1954. *Selections from the Nagpur Residency Records, Vol.IV (1818-1840),* Nagpur, Government Printing, Madhya Pradesh.

Shejwalkar, T. S. 1954. *Nagpur Affairs Vol.I,* Pune, Deccan College.

(EI XXXIII) Sircar, D.C. 1959-1960. *Epgraphia Indica Vol.XXXIII,* Delhi, Manager of Publication , Govt.of India.

संदर्भ ग्रंथ

मराठी

अळतेकर, अ.स. १९४१. *काशी-प्राचीन व आर्वाचीन इतिहास आणि स्थल-क्षेत्रवर्णन,* बडोदे, पुरूषोत्तम आत्माराम चित्रे.

अभ्यंकर, काशीनाथ वासुदेव २००७. *श्रीमद्भगवत्पतञ्जलिकृत व्याकरण महाभाष्य, प्रस्तावना खंड, भाग सातवा,* द्वितीय आवृत्ती, पुणे, डेक्कन एज्युकेशन सोसायटी.

आजगांवकर, गुं.फ. १९५५. *कुडाळदेशकर (इतिहास आणि व्यक्ति),* मुंबई, श्री.फ.र.प्रभु.

आपटे, द.वि.आणि स.म. दिवेकर १९२५. *शिवचरित्र प्रदीप,* पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ.

आपटे, द.वि. १९३०. अथणी -शेट्टी, *शिवचरित्र साहित्य* खंड २, संपा.दत्तो वामन पोतदार आणि गंगाधरराव नारायणराव मुजुमदार, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ.

आपटे, द.वि. १९३५. सारस्वतांचे ब्राह्मणत्व, पुणे, *भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक* वर्ष १५, अंक ४ .

ओक, प्रमोद १९९१ (दुसरी आवृत्ती). *पेशवे घराण्याचा इतिहास,* पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

उपाध्याय, बलदेव १९८३. *काशी की पाण्डित्य परंपरा,* वाराणसी, विश्वविद्यालय प्रकाशन.

काणे, पां.बा. १९३०. श्री शिवछत्रपती आणि गागाभट्ट, *शिवाजी-निबंधावली १,* पुणे, श्री शिवचरित्र कार्यालय

कानडे, मु.श्री. १९७६. ज्ञानदेव-नामदेवांची तीर्थयात्रा, *भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष ५७, अंक १-४.*

कानोले, विश्वेश्वर अंबादास १९५०. नांदेडचे शेष घराणे, *म.म.दत्तो वामन पोतदार अभिनंदन ग्रंथ,* संपा.सुरेंद्रनाथ सेन, पुणे, म.म.दत्तो वामन पोतदार एकसष्टीपूर्ती अभिनंदन समिती.

कामत, रामचंद्र कृष्ण (काल अज्ञात). *श्रीगुरुचरित्र,* मुंबई, केशव भिकाजी ढवळे.

काळे, या.मा. १९३६. *काशीराव राजेश्वर गुप्तेकृत नागपूरकर भोसल्यांची बखर,* नागपूर, मध्यप्रांत संशोधन मंडळ.

कुलकर्णी, अनुराधा २०१०. *लेखनप्रशस्ती,* मुंबई, शील प्रकाशन.

खरे, ग.ह. १९६०. *आज्ञापत्र,* पुणे, विद्यामंदिर प्रकाशन.

खरे, ग.ह. २०१०. खोलेश्वराचे आंबे येथील ४ शिलालेख, *दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने,* खंड १ ते ४, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ.

गुंजीकर, रा.भि. १८८४. *सरस्वती मंडल,* मुंबई, निर्णयसागर प्रेस.

गोखले, कमल १९७३. काशीतील विश्वेश्वराचे मंदिर, पुणे, *भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक वर्ष ५२, अंक १-४.*

चापेकर, ना.गो. १९३७. *पेशवाईच्या सावलीत,* पुणे, आर्यसंस्कृती मुद्रणालय.

चित्राव, सिद्धेश्वरशास्त्री १९३७. *भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश,* पुणे, भारतवर्षीय चरित्रकोश मंडळ

चौहान, देवीसिंग १९७३. ज्ञानेश्वराची काशीयात्रा शके १२१६, *दक्खिनी हिंदीतील इतिहास व इतर लेख* (संपा.) चौहान देवीसिंग, मुंबई, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे इतिहास संशोधन मंडळ.

जयतीर्थ, अनंत रामचंद्र २०१०. करवीरची वैदिक परंपरा, देगलूरकर गो.बं., अमरसिंह राणे, बी.डी. खणे (संपा.) *युगयुगीन करवीर इतिहास दर्शन,* कोल्हापूर, भारतीय इतिहास संकलन समिती.

जोशी, महादेवशास्त्री १९६४. *करवीर,* भारतीय संस्कृतीकोश, खंड दोन, पुणे, भारतीय संस्कृतीकोश मंडळ.

ठाकरे, के.सी. १९९८. *प्रतापसिंह छत्रपति आणि रंगो बापूजी म्हणजेच साताऱ्याच्या राज्यक्रांतीचा इतिहास, प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय, खंड दुसरा,* मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

ठाकूर, वा.वा. १९४४. *होळकरशाहीचा इतिहास भाग १ ला (इ.स.१६९३-१७९७),* इंदूर, होळकर गव्हर्नमेंट प्रेस.

तुळपुळे, शं.गो.(संपा.) १९६३. *पैठण येथील सोमेश्वरदेवाचा शिलालेख,* प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे, पुणे विद्यापीठ.

तुळपुळे, शं.गो. (संपा.) १९६३. *विजयनगरचा संगम देवराय(प्रथम) याच्या वेळचा बांदोडो शिलालेख,* प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे, पुणे विद्यापीठ.

दामले, आ.नी. आणि आरेन हर्डीकर २०१०. पंचगंगा स्मरेन्नित्यम, देगलूरकर गो.बं., अमरसिंह राणे, बी.डी. खणे (संपा.) *युगयुगीन करवीर इतिहास दर्शन,* कोल्हापूर, भारतीय इतिहास संकलन समिती

दिवेकर, सदाशिव महादेव १९२७. *कविंद्र परमानंदकृत शिवभारत,* मुंबई, सदाशिव महादेव दिवेकर.

दीक्षित, वामन बाळकृष्ण १९२५. *नारायण दीक्षित पाटणकर*, मुंबई.

देशपांडे, ब्रह्मानंद २०१३. *देवगिरीचे यादव,* पुणे, अपरांत प्रकाशन.

दंडवते, गो.ह. १९७२. *श्री क्षेत्र नीरा-नरसिंहपूर,* पुणे, श्री लक्ष्मीनृसिंह देवस्थान नीरा-नरसिंहपूर विकास व उत्कर्ष मंडळ.

धोपेश्वरकर, विश्वनाथ बापूजी १९००. *आमचे पुण्यक्षेत्र (काशी),* मुंबई, इंदुप्रकाश छापखाना.

निंबकर, रमेश विष्णु २०१०. *देवरूखे ब्राह्मणांचा इतिहास,* मुंबई, देवरूखे ब्राह्मण मित्रमंडळ.

पटवर्धन, पां.न. १९१३. शिवकालीन शास्त्री व पंडित (शेणवीजातिनिर्णय), पुणे, *भारत इतिहास संशोधक मंडळ वार्षिक इतिवृत्त शके १८३५.*

पानसे, मु.ग. १९६३. *यादवकालीन महाराष्ट्र,* मुंबई, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय.

(ऐति.स्पु.ले.) पारसनीस, द.ब. (काल अज्ञात). *ऐतिहासिक स्पुट लेख,खंड ३,* मुंबई, निर्णयसागर प्रेस.

(जुन्या ऐति.गोष्टी) पारसनीस, द.ब. (काल अज्ञात). *जुन्या ऐतिहासिक गोष्टी,भाग ४,* मुंबई, निर्णयसागर प्रेस.

(ऐति.टिपणे) पारसनीस, द.ब. (काल अज्ञात). *ऐतिहासिक टिपणे,भाग ३,* मुंबई, निर्णयसागर प्रेस.

पिसुर्लेकर, पांडुरंग १९६६. *श्री शांतादुर्गा चतु:शताब्दी महोत्सव ग्रंथ,* मुंबई, श्री शांतादुर्गा सेवा समिति.

पिंपुटकर, रा.स. १९२६. *चितळेभट्ट प्रकरण,* मुंबई, गणेश सदाशिव जोशी.

पुरुषोत्तम १९१३. *देवी श्री अहल्याबाई होळकर हिचे सचित्र चरित्र,* मुंबई, अनंत आत्माराम मोरमकर.

पेंडसे, शं.दा. १९६९. *महाराष्ट्राचा भागवतधर्म ज्ञानदेव आणि नामदेव,* पुणे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन.

पंतप्रतिनिधी, भवानराव १९४६, *आत्मचरित्र खंड १ अभ्यास,* औंध.

बहिरट, भा.पं. आणि प.ज्ञा. भालेराव १९८८. *वारकरी संप्रदाय : उदय व विकास,* पुणे, व्हीनस प्रकाशन.

भागवत, अ.ना. १९२९. *सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास,* ग्रंथांक २, औंध संस्थान.

भावे, वा.कृ. १९७६. *पेशवेकालीन महाराष्ट्र,* नवी दिल्ली, भारतीय इतिहास अनुसन्धान परिषद.

भावे, वि.ल. १९१७. *रूमाल पहिला, श्रीमंत महाराज भोसले यांची बखर (शेडगांवकर बखर),* ठाणे, मराठी दप्तर संस्था.

महाडीक, कृष्णस्वामी अे. १९५१. *त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या आणि शरभेंद्र तीर्थावळी,* तंजावर, सरस्वती महाल ग्रंथालय.

माटे, म.श्री. २००८. *मराठेशाही वास्तुशिल्प,* पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

मांडके, गिरीश २०१०. कोल्हापूरचा प्राचीन व मध्ययुगीन धार्मिक, सामाजिक व आर्थिक इतिहास, देगलूरकर गो.बं., अमरसिंह राणे, बी.डी. खणे (संपा.) *युगयुगीन करवीर इतिहास दर्शन,* कोल्हापूर, भारतीय इतिहास संकलन समिती.

मोतीचंद्र १९६२. *काशी का इतिहास,* बम्बई, हिन्दी ग्रन्थ-रत्नाकर प्राइवेट लिमिटेड.

मिराशी, वा.वि.(अ) १९६१. *यादव नृपती रामचंद्रदेव याचा पुरुषोत्तमपुरी ताम्रपट : शके १२१२,* संशोधन मुक्तावलि - सर चौथा, नागपूर, विदर्भ संशोधन मंडळ.

मिराशी, वा.वि.(ब) १९६१. *मेघदूतांतील रामगिरीचा शोध,* संशोधन मुक्तावलि - सर चौथा, नागपूर, विदर्भ संशोधन मंडळ.

मोरवंचीकर, रा.श्री. २०१८. *प्रतिष्ठान ते पैठण,* औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स.

राजवाडे, वि.का. १९१४. देवरूखे यांची मूलोत्पत्ति, *भारत इतिहास संशोधक मंडळ वार्षिक इतिवृत्त शके १८३६.*

राजवाडे, वि.का.(संपा.) १९२२. *राधामाधवविलासचंपू ,* पुणे, चित्रशाळा छापखाना.

राजवाडे, वि.का.(संपा.) १९२४. महिकावतीची उर्फ माहीमची बखर, पुणे, चित्रशाळा प्रेस.

राजवाडे, वि.का. १९९८. मंगळवेढे येथील एक मराठी शिलालेख, शहा मु.ब.(संपा.) *इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य,* खंड चौथा अभिलेख संशोधन, धुळे, इ.वि.का.राजवाडे संशोधन मंडळ.

राणिंगा, उमाकांत २०१०. स्थलपुराणांतून उलगडणारा करवीरचा भूगोल, देगलूरकर गो.बं., अमरसिंह राणे, बी.डी. खणे (संपा.) *युगयुगीन करवीर इतिहास दर्शन,* कोल्हापूर, भारतीय इतिहास संकलन समिती.

लेले, सदाशिवशास्त्री १९६४. *तीर्थयात्रा प्रबंध,* पुणे, देशमुख आणि कंपनी.

वझे, भाऊशास्त्री १९३९. *माझा चित्रपट व काशीचा संपूर्ण इतिहास,* पुणे, शंकर सखाराम दाते

वाकसकर, वि.स. १९३०. *शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर,* बडोदे.

विविधज्ञानविस्तार १८४९. *नागपूरकर तिसरे रघुजी भोसले यांचे काशीयात्रेविषयी पोवाडा,* विविधज्ञानविस्तार, पुस्तक ११, अंक ११-१२, नोव्हेंबर-डिसेंबर १८४९.

वैद्य, चि.वि. १९०७. *माझा प्रवास अथवा सन १८५७ सालच्या बंडाची हकीगत,* मुंबई, दामोदर सावळाराम आणि कंपनी.

सरदेसाई, गो.स. १९१४. *गागाभट्टाचे घराणे,* विविधज्ञानविस्तार,वर्ष ४५, अंक१२.

सरदेसाई, गो.स. १९४१. *मराठ्यांच्या राज्यकथा,* मुंबई, केशव भिकाजी ढवळे.

साने, का.ना. १९१०. *जोशी, पाध्ये व नानासाहेब पेशवे,* भारत इतिहास संशोधक मंडळ अहवाल शके १८३२.

साने, का.ना. १९२३. *शिवछत्रपतींचे चरित्र,* प्रकाशक का.ना.साने.

साने, का.ना. १९२४. *मल्हार रामराव चिटणीस विरचित शककर्ते श्री शिव छत्रपती महाराज ह्यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र,* प्रकाशन का.ना.साने.

सोहनी, रा.न. १९३७. *गौड सारस्वत ब्राह्मणांचा इतिहास,* गडहिंग्लज, रा.न. सोहनी.

हरिशंकर १९९६. *काशी के घाट : कलात्मक एवं सांस्कृतिक अध्ययन,* वाराणसी, विश्वविद्यालय प्रकाशन.

English Books

Altekar, A.S. 1937. *History of Benares : From the earliest times down to 1937,* Benares Hindu University.

Altekar, A.S. 1943. *Benares : Past and Present,* The 12th All India Oriental Conference, Benares Hindu University.

Asher, Catherine B. 1992. *Architecture of Mughal India,* Cambridge, Cambridge University Press.

Bhosale, Tulajendra Rajah 1999. *Rajah Serfoji-II,* Secretary, Tanjavur, Marathi Abhyas Parishad.

Burway, M.W. 1922 (Second Edition). *Devi Ahilyabai Holkar*, Indore.

Das, Kumudranjan 1979. *Raja Todal Mal,* Calcutta, Saraswat Library.

Desai, Madhuri 2017. *Banaras Reconstructed : Architecture and Sacred Space in a Hindu Holy City,* Hyderabad, Orient Black Swan.

Eck, Diana 1999. *Banaras: city of Light,* New York, Columbai University Press.

Fergusion, James 1876. *A History of Indian and Eastern Architecture, 2 Vol.,* London, John Murray.

Glushkova, Irina 2003. *Moving God(s)ward : The Idea of Tirth-Yatra,* in Bulletin of the Deccan College Post-Graduate and Research Institute, Vol.62-63:265-283.

Glushkova, Irina 2014. *Banaras the concept of tristhali (Yatra) and the inflow of the Marathas : An alternative view,* In Istvan Keul (ed.) Banaras Revisited, Wiesbaden, Harrassowitz Verlag.

Glushkova, Irina 2017. Looking around the institution of tirtha-yatra in the context of Maratha expansion, In Radhika Seshan (ed.) *Narratives, Routes and Intersections in Pre-Modern Asia*, London, Routledge.

Gode, P.K. 1954. *Nilkantha Caturdhara, The Commentator of the Mahabharata- His Genealogy and Descendants,* in Studies in Indian Literary History, Vol.II, Poona, Prof.P.K.Gode collected works publication committee, Bhandarkar Oriental Research Institute.

Gode, P.K. 1969. *Use of Ganges water by muslim rulers from A.D.1300 to 1800,* in Studies in Indian Cultural History, Vol.III, Poona, Prof.P.K.Gode collected works publication committee, Bhandarkar Oriental Research Institute.

Gordon, Stewart 1994. *Marathas, Marauders and State Formation in Eighteenth-century India,* Bombay, Oxford University Press.

Kasturi, Malavika 2012. The Lost and Small Histories of the City of Patronage: Poor Mughal Pensioners in Colonial Banaras, in Dodson, *Banaras: Urban Forms and Cultural histories*, New Delhi, Routledge.

Kincaid, C.A. and D.B. Parasnis 1931. *A History of Marath People,* Humphrey Milford, Oxford University Press.

Malcom, John 1924. *A Memoir of Central India, including Malawa and Adjoining Provinces, Vol.1*, London, Kingsbury, Parbury and Allen,

O'Hanlon, Rosalind 2010. Letters Home: Banaras Pandits and the Maratha Regions in Early Modern India, *Modern Asian Studies* 44,no.2 : 201-240

O'Hanlon, Rosalind 2011. Speaking from Siva's Temple: Banaras Scholar Households and the Brahman 'Ecumene' of Mughal India*, South Asian History and Culture* 2, no.2, 253-277.

Qanungo, K.R. 1937. Some side-lights on the History of Benares, Political and Social, thrown by the Selections from the Peshwas' Daftar,Poona, in *Indian Historical Records Commission,* Vol.XIV: 65-68.

Ranganathasvami, Aryavaraguru 1912. On the Seshas of Benares, *The Indian Antiquary,* Vol.XLI, November 1912: 245-253.

Ritti, Shrinivas and A.B. Karavirkar 2000. *Inscriptions from Kolhapur District,* Hampi, Karnataka, Kannada University.

Shastri, Harprasad 1912. Dakshini Pandits in Benaras, in *Indian Antiquary,* Vol.XLI, January 1912: 7-13.

Sherring, M.A. 1868. *Sacred City of the Hindus: An Account of Benares in Ancient and Modern Times,* London, Trubner and Co.

Shin, Heeryoon 2015. *Building a "Modern" Temple Town : Architecture and Patronage in Banaras, 1750-1900,* Yale University (Unpublished Ph.D.Thesis).

Singh, Rana P.B. and S. Pravin Rana 2006. *Banaras Region : A Spiritual and Cultural Guide,* Varanasi, Indica Books.

Sitapati, P. and V.Purushottam 1973. *Enugula Veeraswamy's Journal (Kasiyatra Charitra),* Hyderabad, Andhra Pradesh Government Oriental Manuscripts Library and Research Institute.

Srivastava, Ashirbadi Lal 1939. *Shuja-ud-Daulah Vol.I 1754-1765,* Calutta, S.N.Sarkar.

Swami, Medhasananda 2002. *Varanasi At the Crossroads,* Kolkata, The Ramakrishna Mission Institute of Culture.

Thakur, V.V. 1969. *Life and life's work of Shree Devi Ahilyabai Holkar,* Indore.

Tavernier, Jean Baptiste 1889. *Travels in India,* Trans.V.Ball, London, Macmillan and Co.

Verma, O.P. 1970. *The Yadavas and their times,* Nagpur, Vidarbha Samshodhan Mandal.

Pre-Ph.D. Coursework

The following registered Ph.D. student of the Deccan College Deemed University has completed the following coursework.

Name of the student: GIRISH DATTATRAY MANDKE

Registration No.: 106/Ph.D./ARC/294

Sr. No.	Course details	Certification	Supervisor's comment
A.	**ARC/LNG/SL -601:** Research Methodology Course	completed	5 credits
B.	**ARC/LNG/SL -602: (Enclosed Copies)** **B i. Term Paper: 1** **Title of the Paper:** शिलालेखातून दिसणारा कोल्हापूरचा प्राचीन इतिहास **Date of Submission:** १५-५-२०१८	completed	5 credits
	ARC/LNG/SL -603: **B ii. : Term Paper. 2:** **Title of the Paper:** बुलढाणा जिल्ह्याचा प्राचीन इतिहास **Date of Submission:** २८-११-२०१८	completed	5 credits
	ARC/LNG/SL -604: B iii.: Term Paper. 3: **Title of the Paper:** महाराष्ट्रातील इतिहास संशोधकांच्या कार्याचा परिचय **Date of Submission:** ६-५-२०१९	completed	5 credits
C.	**ARC/LNG/SL-605:** Any other research-related work -Details of the work done (Mention date of activity): **(Enclosed Copies).** I. Published Paper = 1. संशोधक जून २०१८ 2. संशोधक सप्टेंबर २०१८ II. Participated and presented paper in conference= 4 III. Participated Workshop IV. Participate in Seminar =1 V.	completed	5 credits
		passed	25 credits

Supervisor
(R.K. Mohanty)

(P.P. Joglekar)

Academic Section
pl. allow Shri Mandke to submit Final Synopsis as he has completed required coursework with 25 credits as per UGC Regulations
Thank you
CO
24.8.19

सं श्रुतेन गमेमहि

DECCAN COLLEGE

Post Graduate & Research Institute

(Deemed to University declared under section 3 of UGC Act 1956)
'A' Grade Re-accredited by NAAC
Office: Yerawada, Pune 411006. Web.: www.dcpune.ac.in

Certificate

Mandke Girish Dattatray

has completed 'The Certificate course in Research Methodology for Heritage Studies', conducted from June to December 2015 (One Semester).

and has been awarded with O grade

Date: 15 December 2015
Place: Pune
No. 42 /80, June - Dec. 2015

Dr. Pradnya Kulkarni
Coordinator

Prof. V. S. Shinde
Vice-Chancellor

INTERNATIONAL SEMINAR

ON

ARCHAEOLOGY AND LANGUAGE

AND

THE JOINT ANNUAL CONFERENCE OF INDIAN ARCHAEOLOGICAL SOCIETY (IAS-48TH) INDIAN SOCIETY FOR PREHISTORIC AND QUATERNARY STUDIES (ISPQS-42ND) INDIAN HISTORY AND CULTURE SOCIETY (IHCS-38TH)

HELD AT
DECCAN COLLEGE POST - GRADUATE & RESEARCH INSTITUTE,
(DEEMED UNIVERSITY), PUNE 6
6-9 OCTOBER 2014

CERTIFICATE

THIS IS TO CERTIFY THAT

PROF./DR. /MR./MS. Girish Mandke HAS CHAIRED A SESSION/ACTED AS RAPPORTEUR/ PRESENTED A PAPER/POSTER/PARTICIPATED IN THE INTERNATIONAL SEMINAR AND THE JOINT ANNUAL CONFERENCE.

Title of the session: Open

Title of the paper:

Sanskrit Inscription Dated 1742 AD from Nirgud, Taluka Junnar, District Pune

VASANT SHINDE
CONFERENCE CONVENER

COORDINATOR	COORDINATOR	COORDINATOR
ARATI DESHPANDE-MUKHERJEE	SHAILENDRA MOHAN	PRASAD JOSHI

INTERNATIONAL SEMINAR

ON

ARCHAEOLOGY AND LANGUAGE

AND

THE JOINT ANNUAL CONFERENCE OF INDIAN ARCHAEOLOGICAL SOCIETY (IAS-48TH) INDIAN SOCIETY FOR PREHISTORIC AND QUATERNARY STUDIES (ISPQS-42ND) INDIAN HISTORY AND CULTURE SOCIETY (IHCS-38TH)

HELD AT
DECCAN COLLEGE POST - GRADUATE & RESEARCH INSTITUTE,
(DEEMED UNIVERSITY), PUNE 6
6-9 OCTOBER 2014

CERTIFICATE

THIS IS TO CERTIFY THAT

PROF./DR. /MR./MS. GIRISH MANDKE HAS CHAIRED A SESSION/ACTED AS RAPPORTEUR/ PRESENTED ~~A PAPER~~/POSTER/PARTICIPATED IN THE INTERNATIONAL SEMINAR AND THE JOINT ANNUAL CONFERENCE.

Title of the session: Archaeology of the Deccan

Title of the paper:

Exploration at Ghanagad Fort and Surrounding Area, District Pune (2013-2014)

VASANT SHINDE
CONFERENCE CONVENER

COORDINATOR	COORDINATOR	COORDINATOR
ARATI DESHPANDE-MUKHERJEE	SHAILENDRA MOHAN	PRASAD JOSHI

CENTRAL UNIVERSITY OF KARNATAKA

International Conference on

"Pre Colonial Deccan: History, Culture & Literature"

Organised By

DEPARTMENT OF HISTORY & ARCHAEOLOGY

SCHOOL OF SOCIAL & BEHAVIORAL SCIENCE

CENTRAL UNIVERSITY OF KARNATAKA, KALABURAGI

In association with

HYDERABAD KARNATAKA REGION DEVELOPMENT BOARD (HKRDB)

Certificate of Acknowledgement

This is to certify that Prof./Dr./Mr./Ms Girish Mandke of Deccan College has chaired a session/participated/presented a paper titled Jainism in Early Medieval Western Deccan: Evidence from Pendur, Maharashtra. in the two-day International Conference on "Pre Colonial Deccan: History, Culture & Literature" held on 13th - 14th January 2016, organised by Department of History & Archaeology, School of Social and Behavioural Science, Central University of Karnataka, Kalaburagi.

Dr. Mohammad Nazrul Bari
Conference Secretary & Co-ordinator
Dept. of History & Archaeology

Dr. Romate John
Dean,
School of Social and Behavioural Science

शिक्षण प्रसारक मंडळीचे

सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे ३०.

शतकाब्दी महोत्सव

एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र

महाराष्ट्रातील वस्तूसंग्रहालयांचा इतिहास

प्रमाणपत्र

सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचा इतिहास विभाग व बी.सी.यु.डी., सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ ऑक्टोबर २०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या "महाराष्ट्रातील वस्तुसंग्रहालयांचा इतिहास" या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्रामध्ये श्री./श्रीमती./डॉ. गिरीश मांडके यांनी Maratha History या विषयावरील आपला शोधनिबंध सादर केला / चर्चासत्रात सहभाग घेतला, त्याबद्दल त्यांना हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(डॉ. सोपान शेंडे)
इतिहास विभागप्रमुख

(डॉ. दिलीप शेठ)
प्राचार्य

॥वसुधैव कुटुम्बकम्॥

INTERNATIONAL MUSEUM DAY 2016

Seminar on

'MUSEUMS & CULTURAL LANDSCAPES'

Certificate of Participation

Awarded to

Mr/~~Ms~~ GIRISH MANDKE ....of

DECCAN COLLEGE, MARATHA HISTORY MUSEUM ....

has attended and actively participated in the seminar organised by

Symbiosis Society's

Dr. Babasaheb Ambedkar Museum & Memorial &

Afro Asian Cultural Museum

on 18 th May 2016.

Place : Pune

Date : 18 th May 2016

Mrs. S.S. Mujumdar

Mrs. S. S. Mujumdar

(Hon. Director)

ISSN No.2394-5990



इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे,
या संस्थेचे त्रैमासिक

।। संशोधक ।।

जून २०१८

• शके १९४० • वर्ष : ८६ • अंक : २

• प्रकाशक •

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष

इ.वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे-४२४ ००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८

कार्यालयीन वेळ


सकाळी ९.३० ते १.००
संध्याकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य ८०/- रुपये

वार्षिक वर्गणी रु.४००/-
आजीव वर्गणी रु.४०००/- (१४ वर्षे)

विशेष सुचना: संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक,ड्राफ्ट वगैरे ''संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ धुळे'' या नावाने पाठवावी

***



लाकडी पाटीवरील सरस्वतीचे चित्र

अनुक्रमणिका

ग.चि. वाड व गो.स. सरदेसाई यांचे पेशवे दप्तरातील योगदान

–गिरीश मांडके, पुणे

सन १८१८ साली पेशवाई संपुष्टात येऊन ईस्ट इंडिया कंपनीचे सरकार आले. यानंतर भारताच्या इतिहासात अनेक गोष्टीत आमूलाग्र बदल घडून आले. त्यामध्येच भारतीय इतिहास लेखनातही महत्त्वपूर्ण बदल घडून आले. भारतावर राज्य करणाऱ्या मूठभर इंग्रज अधिकाऱ्यांना भारत समजून घेण्याकरिता संपूर्ण भारताचा त्याचबरोबर प्रांताचा इतिहासही लिहिला जाऊ लागला. महाराष्ट्र म्हणजे अर्थातच मराठ्यांच्या इतिहास लेखनात सुरुवातीच्या प्रयत्नात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो कॅप्टन जेम्स मूर (इ.स. १७८२), रॉबर्ट ऑर्म (इ.स. १७८२), एडवर्ड स्कॉट वेअरिंग (इ.स. १८१०), कॅप्टन जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ (इ.स. १८२६) यांचा. प्रत्येकांचे इतिहास लेखन हे कमअस्सल ऐतिहासिक साधनांवर आधारीत होते. यामध्ये सर्वात सुदैवी ठरला तो म्हणजे ग्रँट डफ. सातारचा राजा प्रतापसिंह भोसले यांच्या दरबारी ब्रिटिश रेसिडंट म्हणून काम करताना मराठ्याच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे अनेक मूळ ऐतिहासिक दस्तावेज त्याला अभ्यासाला मिळाले.

इंग्रजी राज्य आल्यानंतर खऱ्या अर्थाने ऐतिहासिक कागदपत्रांच्या एकत्रिकरणाला सुरुवात झाली. माउंट स्टुअर्ट एलफिस्टन याने याकामी पुढाकार घेऊन पुण्यामध्ये 'पेशवे दप्तर'ची स्थापना केली. इंग्रजी अंमलाच्या सुरुवातीच्या काळातील जमिनीच्या मालकी हक्काबाबतचे तंटे निकालात काढण्याच्या कामी या कागदपत्रांचा उपयोग केला जात असे. परंतु यामध्ये काही ऐतिहासिक कागदपत्रेही होती, त्यामुळे या कागदपत्रांपासून भारतीयांना दूर ठेवण्याचे इंग्रज सरकारचे धोरण होते. परंतु याचा उलटा परिणाम असा झाला की, भारतीय इतिहास संशोधकांनी स्वतंत्रपणे कागदपत्रे गोळा करण्यास, ते सुरक्षित ठेवण्यास व त्यांचा अभ्यास करण्यास मंडळे स्थापन केली. इ.स. १८१८ ते १८८६ पर्यंत अनेक इंग्रज अधिकारी हे या अभिलेखागारातील कागदपत्रे सुरक्षित ठेवणे, त्याच्या सूची तयार करणे व सरकारला आवश्यकता भासल्यास त्या कागदपत्रांचा उपयोग करणे, अशा स्वरूपाचे काम करीत होते. इ.स.

१८८६ साली पहिल्यांदा यातील कागद म्हणजेच पेशव्यांच्या रोजनिशांचे कागदपत्र प्रसिद्ध करावयाचे ठरविले ते मध्यविभागाचा कमिशनर रॉबर्टसन याने. ता. २८ फेब्रुवारी १८८६ रोजी ही योजना सरकारातून मंजूर होऊन आली. हे काम करण्याची जबाबदारी सरकारने श्री. गणेश चिमणाजी वाड यांच्यावर सोपवली.

गणेश चिमणाजी वाड व पेशवे रोजनिशांचे काम :

हे गणेश चिमणाजी वाड हे कोण होते व त्यांनी या संदर्भात काय काम केले हे अधिक जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल. त्यांचे वडील चिमणाजी मुकुंद वाड हे खानदेशात एदलाबाद येथे महालकरी होते. त्यामुळे गणेश वाड यांचे शिक्षण खानदेशात धुळे येथे झाले. तेथून ते मॅट्रिक झाल्यानंतर डेक्कन कॉलेजमधून सन १८७८ साली बी.ए. झाले. डेक्कन कॉलेजमध्ये त्यांच्याबरोबर असणाऱ्यांमध्ये लोकमान्य टिळक हे होते. बी.ए. झाल्यानंतर त्यांची मामलेदार म्हणून प्रथम खानदेशात नेमणूक झाली. पुढे बढती मिळून ते असिस्टंट कमिशनर झाले. हे काम करीत असतानाच त्यांना पेशवे दप्तरातील ऐतिहासिक कागदपत्र प्रसिद्ध करण्याच्या योजनेमध्ये सहभागी होता आले. न्यायमूर्ती रानड्यांचेही या प्रकल्पावर लक्ष होते.

पेशवे दप्तरातून ऐतिहासिक माहितीचे उपयुक्त कागद निवडून काढणे अत्यंत जिकीरीचे व कटकटीचे काम होते. सगळे कागद मोडीत. अनेक लोकांच्या वेगवेगळ्या हातवळणामुळे आधीच गुंतागुंतीची असणारी मोडीलिपी ही अधिकच दुर्बोध होते. या सगळ्या अडचणींचा सामना देत श्री. गणेश वाडांनी अनेक वर्षे काम करून पुणे आणि सातारा दप्तरांतील पेशव्यांच्या रोजकीर्दीतील निवडलेल्या कागदांच्या, त्यांच्या इंग्रजी सारांशासह ३२ खंड होतील इतकी सामग्री तयार केली. ही कागदपत्रे छापण्याची परवानगी वाडांनी सरकारातून मिळवून ठेवली होती. हे सर्व काम सरकारच छापणार होते. परंतु न्यायमूर्ती रानड्यांचा आग्रह पडला आणि हे काम त्यांनी १८९५-९६ साली पुनरुज्जीवित केलेल्या डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीकडे घेतले. सोसायटीतर्फे साताराचे दादासाहेब करंदीकर, सहस्रबुद्धे व दत्तात्रय बळवंत पारसनीस यांनी ही जिम्मेदारी घेतली. त्यातूनच शाहू रोजनिशीचा पहिला खंड १९०१-१९०३ मध्ये प्रसिद्ध झाला. याच दरम्यान गणेश चिमणाजी वाड याचे सन १९०२ मध्ये निधन झाले. पुढे सरकारच्या अनेक निर्बंधामुळे आणि नाउमेदी धोरणामुळे तसेच पुण्यातील प्लेगच्या साथीमुळे हे काम थंडावले. मग डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी आणि सरकारात वाटाघाटी होऊन नवी वाटणी ठरली. डायऱ्यांचे काम तेवढे सोसायटीने

पुरे करावे व उर्वरित काम करण्यासाठी मराठी इतिहासाचे आणि शिवाजी महाराजांचे अभिमानी मुंबईचे शेठ पुरुषोत्तम विश्राम मावजी पुढे सरसावले. डे.व्ह. सोसायटीचा शेवटचा खंड १९११ मध्ये प्रसिद्ध झाला. एकूण ९ खंड सोसायटीने काढले. त्यातले तीन रा.ब. पारसनीस यांनी, तीन रा.ब. काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांनी, दोन रा.ब. बापू पुरुषोत्तम जोशी यांनी आणि एक रा.ब. काशीनाथ नारायण साने यांनी संपादन केले व सोसायटीने आपली जबाबदारी संपविली. वाड निवडीपैकी राहिलेले कागदपत्र एक 'कैफियत यादी', दोन 'तह आणि करारनामे', तीन 'सनदापत्रातील माहिती', चार 'वतन-पत्रे, निवाड-पत्रे' या नावांनी पारसनीस व मावजी या जोड संपादकांनी तयार करून मावजी यांनी १९०८ ते १९१४ या काळात छापून प्रसिद्ध केली. तरीही वाड यांनी निवडलेली कागदपत्रे शिल्लक होती. पुढे पारसनीस यांनी आपल्या इतिहाससंग्रह मासिक पुस्तकातून पेशवे दफ्तरातील [illegible] आणि [illegible] झाली. याप्रमाणे डे.व्ह. सोसायटीचे नऊ, [illegible] मावजी यांचे चार आणि इतिहाससंग्रहातील दोन मिळून वाडांनी निवडलेल्या [illegible] एकूण पंधरा खंड प्रसिद्ध झाले

वाडांच्या डायरीचे अंतर्गत स्वरूप व सरकारी धोरण

वाड यांनी निवडलेल्या कागदात न्यायखाते, पोलीस, तुरुंग, टांकसाळ, नाणी, निरख, मजुरी, पेशव्यांचे मुक्काम, सरकारी कर्ज, व्यापार, कारखाने, वैद्यकीय आणि शस्त्रक्रिया, किताबती आणि बहुमान, सार्वजनिक इमारती आणि लोकोपयोगी कामे, टपाल खाते, धर्मसंबंधी आणि सामाजिक बाबती, कर, नोकर, मुशाहिरा, जमीन महसूल, लष्करी खाते, राजकीय गोष्टी इत्यादींविषयी भरपूर माहिती आली आहे. यात फक्त डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीच्या नऊ खंडातील साहित्याला इंग्रजी भाषांतर जोडलेले आहे.

ही कागदपत्रे प्रसिद्ध करताना सरकारने अनेक निर्बंध घातले होते. कागद कसे छापावयाचे यावरही सरकारचे नियंत्रण होते. वाडांनी निवडलेल्या कागदपत्रांचा अभ्यास करून न्या. रानडे यांनी पहिल्या खंडास एक विस्तृत प्रस्तावना लिहून दिलेली होती. परंतु इंग्रज सरकारने ती प्रस्तावना मूळ खंडाबरोबर छापण्यास मनाई केली. प्रस्तावनेत रानड्यांनी मांडलेले विचार हे याबरोबरच छापले तर ते सरकारला मान्य आहेत असा अर्थ होईल, म्हणून ते स्वतंत्रपणे छापले जावेत अशी सूचना सरकारने केली. पेशवे दफ्तराचा उपयोग इतिहास लेखनासाठी करावा या रानड्यांच्या प्रस्तावनेतील मजकुराने

पुणे दप्तरात अभ्यासासाठी प्रवेश मिळावा अशी लोकांची मागणी जोरदार सुरू होईल अशी सरकारला भीती वाटत होती.

भारतीय पुराभिलेख आयोगाची स्थापना
(Indian Historical records commission)

ग.ब. वाडांनी निवडलेल्या रोजनिशांचे खंड छापल्यानंतर सरकारी धोरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडून आले. इंग्रज अधिकारी ए.सी. लोगन व नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांनी पेशवे दप्तरातील कागदपत्रांचे ऐतिहासिक महत्त्व ओळखले होते. या कागदपत्रांचा अभ्यास केल्यास मराठ्यांच्या इतिहासावर अधिक प्रकाश पडू शकेल असे त्यांना वाटू लागले व त्यासाठी या कागदपत्रांच्या जंत्र्या तयार करून, [illegible] भारतातील [illegible] पार्श्वभूमी [illegible] ची. याच दरम्यान इंग्लंडमधील पुराभिलेखागारासंबंधी अनेक सुधारित निर्णय इंग्लंडच्या पार्लमेंटने संमत केले. त्याआधारे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने सुद्धा भारतातील पुराभिलेखागारामध्ये सवलती देण्यात याव्यात असे ठराव केले. १९०९च्या मोर्ले-मिंटो सुधारणा, १९१४ चे पहिले जागतिक युद्ध आणि भारतीय जनमताच्या रेट्यामुळे इंग्रज सरकारला भारतीय पुराभिलेख आयोगाची स्थापना करणे भाग होते. सन १९१९ मध्ये सिमला येथे पार पडलेल्या भारतीय पुराभिलेख आयोगाच्या पहिल्या बैठकीतच मराठ्यांच्या इतिहासाची साधने मुंबई विद्यापीठ व भारत इतिहास संशोधक मंडळाच्या सहाय्याने प्रसिद्ध करावीत असा ठराव झाला. या आयोगावर त्यावेळी प्रसिद्ध इतिहासकार जदुनाथ सरकारांबरोबरच भारतीय शिक्षण खात्यात कार्यरत असणारे तसेच पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी असलेल्या प्रा.बी.के. टाकोर यांची नियुक्ती झाली होती. या घटनेचे फलित म्हणजे डेक्कन कॉलेजचे तेव्हाचे प्रिन्सिपल ए.जी. रॉलिनसन यांनी आर.पी. पटवर्धनांच्या सहकार्याने प्रसिद्ध केलेला 'सोर्स बुक ऑफ मराठा हिस्ट्री' हा ग्रंथ होय.

गो.स. सरदेसाई व त्यांचे पेशवे दप्तर संबंधित संशोधकीय काम

भारतीय पुराभिलेख आयोगाची वार्षिक बैठक सन १९२१ साली पुण्यातच भरली. या वेळी पेशवे दप्तरातील कागदपत्रांच्या याद्या (फेरिस्त) तयार करण्याचा एक प्रस्ताव मंजूर करण्यात आला. या योजनेखाली जे फेरिस्त तयार करण्यात आले ते आजही

संशोधकांना उपयोगी पडत आहेत. पुराभिलेख आयोगावर असणाऱ्या जदुनाथ सरकारांना पेशवे दप्तरातील कागदपत्रांचे महत्त्व माहिती होतेच. यातील निवडक ऐतिहासिक पत्रे प्रसिद्ध करावीत यासाठी त्यांनी पुढाकार घेतला व या कामी गो.स. सरदेसाई यांची संशोधक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. सन १९२९ ते १९३४ या कालखंडात या कामाचे एकूण ४५ खंड प्रकाशित केले गेले. सन १७०७ ते १८४८ या कालखंडातील मराठ्याच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी एकूण ८६५० पत्रे यामध्ये आहेत. प्रत्येक कागदपत्रांच्या तारखा निश्चित करण्याचे काम केले गेले. ही पत्रे अभ्यासकांना उपयोगी पडावी म्हणून त्यांचे इंग्रज सारांशही देण्यात आले. त्याचबरोबर स्थलसूची व व्यक्तीसूचींची जोडही याला देण्यात आलेली आहे. या कागदपत्रांमध्ये पेशवे तसेच मराठा सरदारांची खाजगी पत्रे, उदगीर, पानिपत, खर्डा आदी लढाया, परकीयांशी प्रशासन व्यवस्था, छत्रपतींची पत्रे, धार्मिक तसेच सामाजिक [illegible] गोष्टींचा समावेश आहे. सरदेसाई यांनी केलेले हे काम मराठा इतिहासाच्या अभ्यासकांसाठी आदर्शवत असे आहे. पेशवे दप्तर संबंधित त्यांचे दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे त्यांनी संपादित केलेले 'पूना रेसिडेन्सी कॉरसपॉन्डन्स'चे पाच खंड होत. १९३६ ते १९५८ या काळात या मालेतील एकंदर १४ खंड जदुनाथ सरकारांच्या मार्गदर्शनाखाली तयार झाले. त्यातील मॅलेट, पामर, क्लोज आणि एलफिस्टन भाग १ व २ असे पाच खंड सरदेसाई यांनी संपादित केले. हे चारही जण पुणे दरबारात सन १७८६ ते १८१८ या कालखंडात इंग्रजांचे राजदूत म्हणून कार्यरत होते. पुणे दरबाराचे इंग्रजी दृष्टिकोनातून झालेले वर्णन हे या ग्रंथमालेचे वैशिष्ट्य होय. समकालीन घटनांच्या अचूक तारखा, भारतीय राजकारणाचे अचूक व चिकित्सक वर्णन, महत्त्वाच्या व्यक्तींचे स्वभावविशेष आणि त्यांची धोरणे आदी गोष्टींचे विस्तृत वृत्तान्त या ग्रंथांमधून दिसून येतात.

श्री. ग.चि. वाड व श्री. गो.स. सरदेसाई यांनी करून ठेवलेल्या या पर्वतप्राय कामाच्यामुळे मराठा इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात मजबूत व भक्कम पायाभरणी झाली. नंतरच्या काळात झालेले संशोधन याच वाटेने वाटचाल करत गेले. मराठा इतिहास संशोधनातील मूलभूत साधनाचा हा ठेवा कालौघात दुर्मिळ होत गेला आहे. आजकालच्या संशोधकांना याचा उपयोग करणे शक्य होत नाही. ग.चि. वाड यांनी प्रसिद्ध केलेल्या रोजनिशांचे १५ खंड व गो.स. सरदेसाई यांनी प्रसिद्ध केलेले पेशवे दप्तराचे ४५ खंड पीडीएफ स्वरूपात तसेच पुस्तक स्वरूपात लवकरात लवकर परत प्रसिद्ध होणे ही काळाची गरज आहे.

संदर्भ :

१. परांजपे पार्वतीबाई महादेव, कै. गणेश चिमणजी वाड यांच्या आठवणी व त्यांच्या 'पेशवे दप्तर' कार्याचे मूल्यमापन, १९७२

२. Sardesai G.S., Hand Book of the Records in theAlienation Office Poona, Government Printing Press, Bombay 1933

३. कुलकर्णी अ.रा., मराठ्यांचे इतिहासकार, डायमंड प्रकाशन, पुणे, २००७

४. 'पेशवे दप्तर' कार्यालयास आता 'पुणे पुराभिलेखागार' या नावाने ओळखले जाते.

ISSN No.2394-5990

इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे,
या संस्थेचे त्रैमासिक

।। संशोधक ।।

सप्टेंबर २०१८

● शके १९४० ● वर्ष : ८६ ● अंक : ३

● प्रकाशक ●

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष

इ.वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे-४२४ ००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८

कार्यालयीन वेळ


सकाळी ९.३० ते १.००
संध्याकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य ८०/- रुपये

वार्षिक वर्गणी रु.४००/-
आजीव वर्गणी रु.४०००/- (१४ वर्षे)

विशेष सुचना: संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक,ड्राफ्ट वगैरे ''संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ धुळे'' या नावाने पाठवावी

***



मंडळातील गजराजाचे प्राचीन शिल्प

अनुक्रमणिका

काशीताईंची काशीयात्रा

गिरीश मांडके, पुणे

(थोरले बाजीराव पेशवे यांच्या पत्नी काशीबाई यांनी त्यावेळी काशीयात्रा केली होती. त्यासंदर्भात यालेखात माहिती करुन देण्यात आली आहे.)

''१७४२ मध्ये नानासाहेब पेशवे बुंदेलखंडात छावणीस असताना पुढील सालारंभ त्यांनी काशी, प्रयाग, गया या यात्रा करून आले, त्या वेळी काशीताई बरोबर जाऊन ती दोन तीन वर्षे काशीसच राहिली.'' असे गो. स. सरदेसाई आपल्या रियासतित लिहितात. त्याच लेखात पुढे ते असेही लिहितात एकूण पाच वर्षे काशीताई काशीमध्ये राहिल्या. (मराठी रियासत खंड ४, पृ. १०१) परंतु तसे घडलेले दिसत नाही. सन १७४१ ते १७४२ आणि १७४६ ते १७४७ अशी दोनदा त्यांनी काशीयात्रा केली असे प्रसिद्ध झालेल्या पत्रांवरून दिसून येते. नानासाहेब पेशव्यांनी आपले काशीचे तीर्थोपाध्ये वझे यांना सन १७५८-५९ मध्ये लिहून दिलेल्या उपाध्येपणाच्या सनदेमध्येच चिरंजीव जनार्दनपंत व मातोश्री काशीबाई यांना दोनदा काशीयात्रेला पाठविल्याचा संदर्भ आहे. (वाड डायरी खंड, पत्र १६४, पृ. ११७) चिरंजीव जनार्दनपंत म्हणजे पहिल्या बाजीरावांचा मुलगा होय.

काशीताईंची पहिली काशी यात्रा

सन १७४१-४२ च्या सुमारास पेशव्यांचा बंगालकडे स्वारीस जाण्याचा विचार चालला होता. पेशव्यांची ही मोहिम दि. १८ डिसेंबर १७४१ पासून ३० जुलै १७४३ पर्यंत चालली. (मराठी रियासत ४, पृ. ३५) या स्वारीत पिलाजी जाधवही पेशव्यांच्या समागमे होते. १७ मार्च १७४२ ला पिलाजी जाधवांनी नानासाहेब पेशव्यांना लिहिलेल्या पत्रात काशीताईंनी काशीला यात्रेला येण्याचे संकेत दिलेले आहेत. (जोशी सिपेद १, पत्र ५७, पृ. ४२) पिलाजी जाधव लिहितात की, ''आम्ही हिंदुस्थानचे स्वारीस येत समई तीर्थरूप मातुश्री ताईंनी मजला महायात्रेस घेऊन जाणे यैसी आज्ञा केली. त्या कासीकडे जावयाचे जालियास घेऊन जाऊ अैसे आम्ही बोलिलो. तयास हाली बंगालियाकडे आमचा जावयाचा डौल आहे. ऐशी याम स्वामींचे मर्जीस येईल तरी मातुश्रींची रवानगी करावी.'' यावरून पेशव्यांच्या बंगालवरील मोहिमेच्यावेळी काशीबाई त्यांच्याबरोबर होत्या याबाबत खात्री होते. परंतु पेशव्यांच्या बरोबर त्या सतत होत्या याबाबत शंका आहे. पेशव्यांनी आपली खास माणसे किंवा सरदार त्यांच्याबरोबर दिले असावेत

आणि त्या वेळोवेळी स्वतंत्रपणे तीर्थस्थानांना भेटी देत असाव्यात असे वाटते.

याच मोहिमेत नानासाहेब पेशवे बुंदेलखंडात मोहिमेवर असताना त्यांच्या छावणीमध्ये असणाऱ्या खंडेराव बापूजी चिटणीस यांनी ८ नोव्हेंबर १७४२ रोजी लिहिलेल्या पत्रात 'मातुश्री व चिरंजीव बाबा कार्तिकस्नानाकरीता श्रीकाशीयात्रेमध्ये आहेत. स्नाने जाहली म्हणजे देशी येतील.' अशा तऱ्हेचा मजकूर काशीबाई आणि जनार्दनपंत यांच्या संदर्भातील असावा. (पे. द. २०, पत्र २८, पृ. २०) मराठी रियासतीमध्ये सरदेसाई यांनी हे पत्र काशीबाई संदर्भात दाखविले आहे. (मराठी रियासत ४, पृ. १०१). मइसा खंड २, पेशव्यांची शकावली या ग्रंथात जनार्दनपंत दि. ९ डिसेंबर १७४२ ला नाशिकमध्ये गोदावरी स्नान करीत आहे अशी नोंद मिळते. जर वरील पत्रातील मातुश्री या काशीबाईच आहेत असे समजले तर त्या डिसेंबर १७४२ मध्येच महाराष्ट्रात आल्या असाव्यात. तीर्थयात्री काशीयात्रेच्या परतीच्या प्रवासात येताना नाशिक-त्र्यंबकेश्वर मार्गे येऊन, तेथील देवदर्शन करतात. अशा तऱ्हेचे संदर्भ काशीयात्रेच्या परतीच्या प्रवासात मिळतात व या निमित्ताने अधोरेखित करणे गरजेचे वाटते. अशा तऱ्हेच्या परतीच्या प्रवासात जनार्दनपंत ९ डिसेंबर १७४२ ला गोदावरी स्नान करीत असावा.

याचवेळी बुंदेलखंडातून नानासाहेब पेशवे रघुजीला आवर घालण्यासाठी बंगालकडे जाण्यास निघाले. १ फेब्रुवारी १७४३ च्या पत्रात बातमी आहे की, "पटणे प्रांते न जाता प्रयाग, काशी क्षेत्रे जवळ जाणोन येथे आले. त्रिवेणी संगमी स्नाने झाली. सकल विधि उत्तम रीतीने जाहला. प्रयागच्या सुभाही आग्रहपूर्व नावा दिल्या. बहुत लोक नावांत बसून किल्याजवळ स्नाने करून वटदर्शन करून आले." (पुरंदरे दप्तर खंड १, पत्र १५०, पृ. १०१) पेशवे शकावलीत ९ फेब्रुवारी १७४३ ला घडलेला प्रकार वर्णन केला आहे तो असा. नानासाहेब पेशवे काशीजवळ येताच त्यांना काशी घेण्याची इच्छा झाली. त्याच्या जवळील सैन्य पाहताच काशीचा अधिकारी म्हणजेच अयोध्येचा नबाब चिंताक्रांत बनला. पेशव्यांनी काशी घेण्याचा प्रयत्न केला. तर काशीतील मराठी ब्राह्मणांचा शिरच्छेद करण्यात येईल असे त्याने काशीतील मराठी ब्राह्मणांना सांगितले. पुढे त्या ब्राह्मणांनी काशी न घेण्यासाठी पेशव्यांचे मन वळविले. नंतर पेशव्यांनी व इतरांनी साध्या वेशात जाऊन गंगास्नान केले. (मइसा, खंड २, पृ.९७)

वरील दिनांका दरम्यानचे खंडो गोमाजीने महादोबा पुरंदरे यांना लिहिलेले दि. २४ फेब्रुवारी १७४३ (?) चे पत्रांत असे लिहिले आहे की, "मातुश्री ताई वाराणसीत सुखरूप आहेत, गयेस गेली होती, आली असतील. माघस्नान यंदा जाले नाही. पुढे

करून येतील." (मइसा. खंड ६, पत्र १६३, पृ. २७०) या पत्रातील प्रसंग जरी खरा असला तरी या पत्राची तारीख तपासणे आवश्यक आहे.

येथपर्यंत काशीताईंच्या पहिल्या काशीयात्रेसंबंधी विवेचन केले. या विवेचनात काशीताईंची काशीयात्रा आणि नानासाहेब पेशव्यांची काशीयात्रा याबाबत वेगवेगळी चर्चा केली आहे. काशीबाईंच्या पहिल्या काशीयात्रेच्या प्रवासाचे वर्णन उपलब्ध नाही. परंतु त्या काशीस गेल्या हे नक्की. त्यांच्या काशी (वाराणसी) येथील वास्तव्याच्या दोन-तीन नोंदी कागदपत्रात मिळतात. परंतु त्या नोंदीच्या कालाच्या/तारखेच्या बाबतीत काही शंका उभ्या राहिल्या आहेत. वरील विवेचनावरून असे दिसते की नानासाहेबांनी काशीताईंच्या काशीयात्रेबाबत स्वतंत्र व्यवस्था केलेली दिसते. त्या व्यवस्थेच्या सहाय्याने काशीताईंनी काशीयात्रा केली व त्या व्यवस्थेच्याच सहाय्याने त्या स्वतंत्रपणे महाराष्ट्रात परत आल्या. नानासाहेबांनी [illegible] असताना 'प्रयाग, काशी जवळच आहे, [illegible] प्रयाग व काशीयात्रा केलेली दिसते. वरील विवेचना[illegible] असता असे दिसते की काशीताई काशीयात्रेहून महाराष्ट्रात नानासाहेबांच्या अगोदरच येऊन पोहचल्या असाव्यात. म्हणजेच पेशवे शकावलीतील जनार्दनपंताच्या गोदावरी स्नानाचा संदर्भ पाहता त्या डिसेंबर १७४२ मध्येच काशीयात्रेहून परत आल्याचे दिसते.

आता प्रश्न आहे तो म्हणजे 'काशीताई १७४२ ला काशीयात्रेला गेल्या त्या १७४७ ला परत आल्या. म्हणजे त्या जवळ जवळ पाच वर्षे काशीयात्रेत होत्या' या रियासतकारांच्या विधानाचा. काशीताई सन १७४२ ते १७४७ पर्यंत काशीयात्रेत असत्या तर पेशवे शकावलीतील नोंदी नुसार '२८ मे १७४३ ला त्या रामेश्वर यात्रेहून परत येतात' या नोंदीला काहीही अर्थ उरत नाही. तसेच काशीताईंच्या १७४६ च्या काशीयात्रेच्या प्रवासवर्णनांचे संदर्भही मोठ्या प्रमाणावर मिळतात. (याची चर्चा पुढे केली आहे) त्यामुळे काशीताई काशीयात्रेत पाच वर्षे होत्या या रियासतकारांच्या विधानाला पाठबळ मिळू शकत नाही. त्यामुळे वरील आणि पुढे केलेल्या विवेचनावरून त्यांनी दोनदा काशीयात्रा केली असे दिसून येते.

काशीबाईंची दुसरी काशीयात्रा

काशीबाई पहिल्या काशीयात्रेनंतर लगेचच रामेश्वर यात्रेला गेल्या असाव्यात. २८ मे १७४३ ला काशीबाई रामेश्वर यात्रेहून पुण्यास परतल्या अशी पेशव्यांच्या शकावलीत नोंद आहे. (मइसा खंड. २, पृ. ९३) वा. कृ. भावे लिखित 'पेशवेकालीन महाराष्ट्र'

मधील 'काशीयात्रा' हे प्रकरण आणि सरदेसाई गो. स. लिखित 'मराठी रियासत, खंड ४' मधील 'मातुश्री काशीबाईंची काशीयात्रा' बाबतच्या लिखाणानंतर काही ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध झाली ती जोशी पु. म. लिखित 'Selection from the Peshwa Dafter New Series Vol. I. Expansion of Maratha Power (1707-1761)' या पुस्तकात. त्यामुळे साहजिकच काशीबाईंच्या काशीयात्रे संबंधीत काही कालासंबंधीत नोंदीत सुधारणे करणे जरूरीचे आहे.

काशीबाई जानेवारी १७४६ च्या सुरूवातीला दुसऱ्यांदा काशीयात्रेसाठी निघाल्या असाव्यात. कारण १८ जानेवारी १७४६ च्या विसाजी दादाजीच्या पत्रानुसार तो मुक्काम भामोडे येथे काशीबाईंची वाट पहात होता. काशीबाई बरोबर त्यांचा भाऊ कृष्णराव महादेव जोशी चासकर तसेच विसाजी दादाजी हा खाजगी कारभारीही नानासाहेबाने दिला होता. यात्रेसाठी लागणाऱ्या उंटांची तसेच चाकीचे कामदार म्हणजे यात्रेसाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या जिनसांची व्यवस्था पाहणारी खाते व्यवस्था, [illegible] लागणाऱ्या [illegible] व्यवस्था पहाण्याचे काम विसाजी दादाजी यांजकडे होते. यात्रेसाठी लागणाऱ्या दस्तकांची व्यवस्था मराठ्यांचे दिल्ली येथील वकील बापूजी महादेव यांजकडून लवकरात लवकर करावी अशी नानासाहेब पेशव्यांपाशी त्यांनी विनंती केलेली आहे. (जोशी सिपेद, पत्र ६८, पृ. ५) काशीबाई कायगाव टोके, वेरूळ, बऱ्हाणपूर, सिरोंज, झांशी, काल्पी या मार्गाने प्रयागास गेली. काशीबाई प्रकृतीने अशक्त असाव्यात. बऱ्हाणपूर मुक्कामी त्यांचा भाऊ कृष्णराव चासकर लिहितो की मातुश्री ताईचे शरीर बहुत सुक्ष्म झाले आहे. यास्तव मजली लहान कराव्या लागत आहेत. (पे. द. १८, पत्र १३६, पृ. ७७)

सामान्य व गरीब लोकांना स्वतंत्रपणे यात्रा करणे अवघड असल्यामुळे कोणा तरी राजाच्या, संस्थानिकांच्या किंवा त्यांच्या कुटुंबातील स्त्रियांच्या आश्रयानेच यात्रेस निघावे लागे. कारण फौजेचे संरक्षण हे यात्रेतील मुख्य होऊन बसलेले साधन इतरांना सुलभ नव्हते. काशीबाई सिरोंज येथे पोचली (२८ मार्च १७४६) तेव्हा तिजजवळ दहा हजार यात्रा जमली होती. यात्रेसाठीची दस्तके व यात्रेच्या जकातीची माफी सर्वसामान्य माणसांपेक्षा थोरांना मिळणे सहज शक्य असे. अर्धी वाट चालून येऊनही यात्रेची दस्तकेही दिल्लीहून आलेली नव्हती. बाईचा कारभारी विसाजी दादाजी वारंवार बापूजी हिंगण्यांना त्याविषयी लिहिताना दिसतो. दस्तके वेळेवर न आल्यामुळे तब्बल दहा दिवस मुक्काम सिरोंजेस करावा लागला. सिरोंज येथेच बाईंच्या पायाला व्यथा

झाली होती. (पे. द. ४०, पत्र ३७, पृ. ३०) बाईंना काशीविश्वेश्वराचे दर्शन कसे घडते यांची काळजी विसाजीस होती असे वा. कृ. भावे लिहितात. परंतू यावेळी काशीमध्ये नारायणभट्टाने बांधलेले काशीविश्वेश्वराचे मंदीर अस्तित्त्वात नव्हते. औरंगजेबाने ते सन १६६९ सालीच पाडले होते. तर अहिल्याबाईंनी बांधलेले काशीविश्वेश्वराचे मंदीर साधारणपणे सन १७८१ च्या सुमारास बांधले गेले. मधील ११२ वर्षांच्या कालखंडात हिंदू लोक काशीविश्वेश्वराचे अस्तित्त्व त्या जागेवर आहे हे कल्पून/ समजून भक्तीभावाने त्या जागेचे दर्शन घेत असत.

सिरोजच्या पुढे बुंदेलखंडात मराठ्यांचे बुंदेल्याशी युद्ध सुरू होते. त्यामुळे पुढे संकरजी नारायण (?) त्यांच्या राऊतांच्या संरक्षणाखाली यात्रा झांशी, काल्पीवाटे यमुनापार झाली. बापूजी महादेव हिंगणे यांनी पाठविलेली दस्तके झाशी येथे प्राप्त झाली. (झांशी मिपेट १, पत्र ७०, ७१, ७२, पृ. ५२, ५३) काशीबाई पुढे प्रयागमार्गे काशीस त्यांस बहुल चतुर्थी उदवारी पोहचल्या. (झांशी मिपेट १, पत्र ७३, पृ. ५४)

काशीबाई काशीस आल्यानंतर त्यांच्या बरोबर सामना रंगला तो काशीचा राजा बलवंतसिंग याच्यांशी. खैरउद्दीन अलाहाबादी लिखित 'बलवंतनामा' या ग्रंथात काशीबाईसंबंधी पुढील माहिती आली आहे. बलवंतसिंगाचा भाऊ दासाराम याने बलवंतसिंगाशी काशी राज्यातील वाटा मिळावा म्हणून त्याच्या विरूद्ध विद्रोह केला होता. तीस-चाळीस हजार लोकांच्या समुदायाने आलेल्या पेशव्यांच्या मातोश्रींच्या संरक्षणासाठी सशस्त्र फौजही बरोबर होती. ते पाहून दासारामने काशीबाईपाशी शरण जाऊन काशीचे अर्धे राज्य बलवंतसिंगांपासून घेऊन देण्यांची विनंती केली. काशीबाईंनीही मागचा पुढचा विचार न करता त्याना साथ केली. दासारामला जर अर्धे राज्य दिले नाही तर काशीतील मराठ्यांचे सैन्य त्याच्या विरूद्ध पाठवू अशी काशीबाईंनी धमकी दिल्याची तक्रार बलवंतसिगांनी बादशहाकडे केली. अयोध्येचा नबाब सफदरजंगाचाही त्याला पाठिंबा होता. दिल्लीतील मराठ्यांचे वकील बापूजी महादेव हिंगणे यांनी याबाबतीत मराठे असे काही करणार असल्याचा इन्कार केला. पुढे याबाबतीत काहीही घडून आले नाही. (कानूनगो के. आर., पृ. ६५-६६) मराठी पत्रातूनही या घटनेसंबंधी माहिती येते. हिंगणे पेशव्यास लिहितो, "वाराणसीहून बळवंतसिंगाचे लिहिणे आले की दशाराम जमीनदास मातु:श्री कबिल्या सुद्धा घेऊन चालली आणि आम्हास सांगून पाठविले की यास अर्धे राज्य देणे, नाही तर फौज उतरेल. बादशहांनी बळवंतसिंगास कळविले, माझीच मातु:श्री जाणून त्यांचे साहित्य करणे, तुमची चार

माणसे मारली तर हरगीज न बोलणे. माझ्या म्हटलियावर माझे घरास आली." (मराठी रियासत ४, पृ. १००)

परंतु काशीराजा बलवंतसिंगाच्या मनात काशीबाईसंबंधी थोडा राग शिल्लक असल्याचे पुढील घटनेवरून कळून येते. काशीबाईंचा कारभारी विसाजी दादाजी दि. १७-७-१७४६ च्या पत्रात बलवंतसिंगाने काशीबाईंना त्रास दिल्याचे लिहितात. बलवंतसिंगाने काशीबाईंना पेशव्यांची मातोश्री म्हणून आपल्या राजवाड्यातच राहावयास जागा दिली व घोडी, उंट, शिलेदारांना दुसरीकडे राहावयास जागा दिली. पुढे आठ दिवसामध्ये पाच घोडी चोरांनी चोरली. बलवंतसिंगाकडे याबातीत तक्रार केल्यावर त्यातील दोन घोडी परत केली. त्यामुळे बाकीची घोडीही त्यानेच नेली असतील असे समजून त्याच्याकडे ती परत देण्याचा [illegible] होईल या भितीने त्याच्या म्हणण्या [illegible] स्थानिक [illegible] [illegible] असी [illegible] तक्रार [illegible] करणे असे नबाबाने राजास लिहून पाठविले. हे कळताच बापूजी हिंगण्याने काशीत चातुर्मासापर्यंत राहण्याची परवानगी बादशहाकडून मिळवून दिली. (पे.द. [illegible], पत्र ८२. पृ. ३५) काशीत काशीबाईंच्या पायाच्या व्यथेने परत उचल खाल्लेली दिसते. आजारपण, काशीतील पावसाळा यामुळे चातुर्मासातील चार महिने काशीसच मुक्काम झाला. पुढे नारायण दीक्षितांच्या सल्ल्याने कार्तिकस्नाने उरकून यात्रा गयेस गेली. (पे.द.९, पत्र ३९. पृ.२६) एक महिना यात्रा गयेस होती. सर्व धार्मिक विधी संपवून पौष शुद्ध चतुर्थीस यात्रेने माघस्नानाकरिता प्रयागास प्रस्थान केले. (पे. द. १८, पत्र १३९, पृ. ७९) यात्रा प्रयागास आली त्यावेळी नबाब अमीरखान मारला गेल्याची खबर आली. त्यामुळे प्रांतात जमीनदारांची गडबड उडाली. नवा सुभा नेमल्याखेरीज ही गडबड थांबणार नाही. या गडबडीमुळे यात्रेला धोका पोहचण्याचा संभव असल्यामुळे यमुना ओलांडताना मराठ्यांनी लष्कर तयार ठेवावे अशी यात्रेच्या कारभाऱ्यांनी रामचंद्रबाबास विनंती केली होती. (पे. द. ४७, पत्र ४७, पृ. ३८)

काशीबाईंचा वाराणशीस एक वर्ष राहण्याचा इरादा होता. कोणास राहाणे असेल तरी राहाणे, नाही तरी जाणे असे त्या म्हणत होत्या. काशीबाईबरोबर तीस चाळीस हजार यात्रा होती. श्रीमंताची आज्ञा त्रिस्थळी यात्रा करून परतावे अशी होती. काशीचा अधिकारी म्हणजे राजा बळवंतसिंग व अयोध्येचा नबाब सफदरजंग यांचे सहकार्य

काशीबाईंच्या यात्रेला नव्हते किंबहुना त्यांचा त्रासच यात्रेला होत होता. असे असताना सुध्दा काशीबाई काशीत राहावयाचा हट्ट करीत होत्या. प्रयाग पर्यंत कसे तरी घेऊन येतो. उत्तर भारतातील अशा राजकीय अस्थिरतेच्या मुळे त्यांचा कारभारी विसाजी दादाजी याला यात्रेच्या सुरक्षिततेची काळजी वाटत होती. (पे. द. ४०, पत्र ४९, पृ. ४०) यात्रेच्या सुरक्षिततेच्या काळजीने विसाजी दादाजीची पत्रे दिल्लीस बापूजी महादेव हिंगणे व दक्षिणेस नानासाहेब यांस गेली. त्यांची उत्तरे 'काशीतून लवकर निघा' अशी आली. काशीबाईंच्या यात्रेचा बंदोबस्त उत्तर हिंदुस्थानात मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांजकडेच होता. नबाब अमीरखान मारला गेल्याची प्रयागला जेव्हा बातमी आली. तेव्हा यात्रेला वाटेत शत्रूलोकांकडून त्रास होऊ नये म्हणून शिंदे-होळकरांनी काशीबाईंना लवकरात लवकर प्रयागहून निघण्याबाबत [illegible] ल्यावला. ([illegible]शी सिपंद १, पत्र ८१, पृ. ५९) तेव्हा काशीबाई रामचंद्रबाबास [illegible], "[illegible] आहे. [illegible] तर माझ्या चित्ताव काशीस [illegible] [illegible] राहाव. परंतु [illegible] बळेच आढून काढतात..... माझे जाणे काशीस होय तो नीट करणे." (पे. द. १८, पत्र १३५, पृ. ८८) काशीबाई अशारितीने काशीस राहण्यास हट्ट करू लागल्या तेव्हा यात्रेबरोबर असलेले बाईचे बंधू कृष्णराव चासकर यांनीही त्रागाच करण्याचे ठरविले. ते बाईस म्हणाले, "तुम्ही यमुना उतरीत नाही तरी आपण वेणीत (प्रयागची त्रिवेणी) जीव देतो. असे सांगून ते डेऱ्यातून निघोन गंगातीरी गेले." विसाजी दादाजी याच पत्रात (दि. ५-२-१७४७) रामचंद्रबाबास लिहितात की, "आम्ही बहुता प्रकारे सांगोन याच्या डेऱ्याजवळ मातुश्रीस नेऊन त्यास राहाऊन निदानी इतकाच विचार केला की, तुम्ही यमुना उतरून काल्पीच्या घाटास चला. तेथे राजश्री मल्हारराव व राजश्री जयाप्पा व राजश्री(रामचंद्र) बाबा आहेत. ते सांगतील तैसा विचार करावा. इतके ठरवून येथून कूच करावेसे जाले आहे. उद्या कूच करून पुढे येणार पण विश्वास येत नाही. घडीघडी विचार नवेच होतात. ये सोबतीने यावयाचे आम्ही कबूल करीत नव्हतो. त्यास बहुता प्रकारे श्रीमंतांनी सांगोन समागमे लावून दिल्हे. आजीपावेतो तिरस्थली यात्रा उत्तम प्रकारे सर्वांची जाली, या उपरी हे विघ्न निर्माण जाले, आम्ही गरीब माणूस हे तो संकट येऊन पडिले. जर तुम्हा पावेतो पावेसे केले आहे हे घडोन आले म्हणजे पुढे आपण विचार करणे तो करतील."(पे. द. ४०, पत्र ५०, पृ. ४१)

मातुश्री गयाश्राद्ध करून श्रीप्रयागास आली. प्रयागी मकरस्नान संपादिले. शिमगी